# "सोलापूर शहरातील वृत्तपत्रांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी"

('कल्पतरू' व 'सोलापूर समाचार' यांच्या विशेष संदर्भात) इ.स.१८६७ ते १९४७

इतिहास विभाग, तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे – ४११ ०३७

यांना सादर करावयाचा पीएच. डी पदवीसाठीचा शोधप्रबंध

अभ्यासक

**प्रा.राजेंद्रसिंह लोखंडे**

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. शीला पटवर्धन**

निवृत्त उपप्राचार्य व
इतिहास विभाग प्रमुख
आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे – ४११ ००४

नोव्हेंबर २०१३

# DECLARATION

This is to declare that references collected from other sources are duly acknowledged and remaining part of the present study is original contribution of myself to the thesis.

Rajendrasinh Sakharam Lokhande

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled "Solapur sharatil Vrittapatranchi Bharatiya Swatantryachalavalitil Kamagiri" ('Kalpataru' va 'Solapur Samachar' yanchya vishesh sandarbhat) A.D. 1867-1947 which is being submitted herewith for the Award of the degree of 'Doctor of Philosophy' in History Department of 'Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune' is the result of the original research work completed by Mr. Lokhande Rajendrasinh Sakharam under my supervision and guidence and to the best of my knowledge and belief the work embodied in this thesis has not formed earlier the basis for award of any other Degree similar title of this or any other University or examining body.

Place : Pune

Date : / /

Guide

Dr. Sheela Patwardhan

# ऋणनिर्देश

रयत शिक्षणसंस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपल्याकडील नव्वद तोळे सोन्याचे दागिने मोडून त्याग करणा-या लक्ष्मीबाई पाटील यांच्या आदर्शानुसार महाराष्ट्रात अनेकजणांनी पीएच.डी पदवी संपादन केली. त्यापैकी एक होण्याचे भाग्य मला लाभत आहे. यातच माझ्या जीवनाचे साफल्य आहे. त्यांना मी विनम्र अभिवादन करतो.

"सोलापूर शहरातील वृत्तपत्रांची भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी" ('कल्पतरु' व 'सोलापूर समाचार' यांच्या विशेष संदर्भात) इ.स. १८६७ ते १९४७ हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. या प्रबंधासाठी मला इतिहास विषयाचे गाढे अभ्यासक संशोधिका डॉ. शीला पटवर्धन प्रपाठक, उपप्राचार्य आबासाहेब गरवारे कॉलेज पुणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी माझ्याकडून प्रबंधलेखनाचे काम करवून घेतले. माझ्या छोटया मोठया शंकांचे निरसन केले. त्यांचा दांडगा व्यासंग, अनुभव यामुळे त्यांच्याकडून ब-याच चांगल्या गोष्टींचे ज्ञान मला मिळाले. त्यांच्या कुटुंबियांनीदेखील सहकार्य केले. त्याबदद्ल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

सोशल कॉलेजमधील इतिहास विभाग प्रमुख, संशोधिका डॉ. नभा काकडे यांनी संदर्भ साधने मिळवण्यासाठी मदत केली. अभ्यासाचे विविध पैलू अभ्यासण्यासाठी उदयुक्त केले. तसेच ज्येष्ठ राजकीय समीक्षक, डॉ. श्रीकांत येळेगावकर प्रमुख कार्यवाहक हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. या दोघांचेही मी आभार मानतो.

काकडे कुटुंबातील कल्पतरु चे संपादक विनायक गोविंद काकडे त्यांच्या पत्नी शामला काकडे, ॲड. अनिल काकडे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यांनी आपले अनुभव सांगून मला प्रोत्साहित केले. त्यांचा मी आभारी आहे. जयंतराव जक्कल, माजी आमदार निर्मलाताई ठोकळ, शंकरलाल जाजू, मौलासाहेब मक्तुमसाहेब आहेरवाडी, माधवराव पाटील यांनी मुलाखती दिल्या. त्यांच्या आठवणी सांगितल्या त्याबदद्ल त्यांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दीपक टिळक, कुलसचिव डॉ. उमेश केसकर, अधिष्ठाता प्रो. विजय कारेकर, प्रो. पोर्णिमा वाटे, नवनाथ भाडळे, पुणे विद्यापीठाच्या सहयोगी प्रोफेसर श्रध्दा कुंभोजकर, डॉ. सुरेश पाटील अधिकारी वर्ग कार्यालयीन व ग्रंथालय कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मला लाभले त्याबदद्ल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

लक्ष्मी उद्योग समुहाचे संस्थापक कै. जयकुमारजी पाटील, रयत शिक्षण संकुलाचे मार्गदर्शक उद्योगपती आण्णासाहेब पाटील, भाई एस. एम. पाटील माझे वडील सखाराम लोखंडे, सासरे स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय जाधव, बंधू प्रतापसिंह, विजयसिंह, कै.विक्रमसिंह उर्फ गोकुळ, अरविंद, अनिल, कै.सुलोचना व अरविंद जाधव, सौ. शीला व पांडुरंग जाधव यांचे आशिर्वाद माझ्या पाठीशी असल्यामुळे कामाचा व्याप सांभाळून मी संशोधन करु शकलो.

रयत शिक्षण संस्थेच्या मध्यविभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील यांच्या मार्गदर्शनामुळेच हा प्रबंध पूर्ण झाला. त्यांनी दिलेले प्रोत्साहन मी आयुष्यभर विसरणार नाही. आमच्या भगिनी उल्काताई संजीव पाटील यांनी मला वेळोवेळी शोधप्रबंधाबदद्लची विचारपूस करुन लवकर पीएच.डी. चा शोधप्रबंध पूर्ण करा असे प्रोत्साहन दिले. या उभयंताचा मी आभारी आहे.

माझा मित्र डॉ. प्रतापसिंह माने (कराड) यांनी अत्यंत तळमळीने माझ्याबरोबर राहून शोधप्रबंधासाठी मार्गदर्शन केले. त्याच्यामुळेच मी शोधप्रबंधाचे काम करु शकलो. माझा अत्यंत जवळचा जिवलग मित्र प्रीतम अष्टीकर (शहा), सौ. स्वाती शहा यांनी अत्यंत कळकळीने माझ्याकडून शोधप्रबंधाचे काम पूर्ण करुन घेतले. यांचे मी आभार मानणार नाही तर त्यांच्या ऋणात राहणे पसंत करेन.

माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजीव बावधनकर, अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे पाईक प्राचार्य सीताराम गोसावी, उपप्राचार्य उत्तमराव हुंडेकर, प्रा. मल्लिनाथ अंजुनगीकर, प्रा. सुरेश ढेरे, प्रा.प्रशांत नलवडे, प्रा. संतोष राजगुरु, डॉ.रावसाहेब ढवण, प्रा.सुमन केंद्रे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, माझा वर्गमित्र प्रा.डॉ. सत्यव्रत नुलकर, वृत्तसंपादक प्रताप नलावडे, बाळासाहेब आराध्ये, प्रा. लक्ष्मी रेडड्ी, प्रा. सोनाली गिरी, श्रीधर खरे, श्री प्रकाश कणसे, श्रीकांत माने यांनी अत्यंत आत्मियतेने वेळोवेळी सहकार्य केले त्याबदद्ल त्यांचा मी आभारी आहे.

माझी पत्नी प्रा. सुमन जाधव लोखंडे, माझा लाडका मुलगा स्वराज लोखंडे यांच्या सहकार्याशिवाय हा शोधप्रबंध पूर्ण होणे अशक्य होते. त्यांनी मला ऊर्जा दिली हेच माझे स्वामी समर्थ कृपेने यश आहे. शिल्पा चौधरी पवार, विशाल पवार, राजेंद्र सावंत परिवार (पुणे) यांनी सहकार्य केल्याबदद्ल आभारी आहे.

या शोधप्रबंधास मूर्त स्वरुप येण्यासाठी श्री. माधव देशपांडे (सोलापूर) यांचे सहकार्य मोलाचे ठरले. त्यांनी अत्यंत आत्मीयतेने व सहनशीलतेने प्रबंधाच्या टायपिंगचे काम वेळेत पूर्ण केले. शोधप्रबंधाची अंतिम प्रक्रिया विझक्राफ्ट पब्लिकेशन्स ॲण्ड डिस्ट्रिब्युशन प्रायव्हेट लिमिटेड, सोलापूर चे सर्वेसर्वा आमचे मित्र प्रा.डॉ. दीपक ननवरे, व्यवस्थापक ओंकार लोहोकरे, सौदागर पोळ, मनिषा जर्दे, शैलेश सरवदे यांनी पूर्ण केले. त्यांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

प्रुफ रिडींगचे काम ओंकार लोहोकरे व प्रा.डॉ सत्यव्रत नुलकर यांनी केले. त्यांचा मी आभारी आहे.

ज्ञात अज्ञात व्यक्तींनी मला केलेल्या सहकार्याबदद्ल सर्वांचा ऋणी आहे. कोणाचा नामनिर्देश अनावधानाने राहिल्यास दिलगीर आहे.

प्रा. राजेंद्रसिंह लोखंडे

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणे | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रकरण पहिले - विषय प्रवेश | १ - १0 |
| २. | प्रकरण दुसरे : | ११ - ६७ |
| | सोलापुरातील वृत्तपत्रांचा उगम, विकास आणि कार्य | |
| ३. | प्रकरण तिसरे | ६८ - १३४ |
| | सोलापुरातील वृत्तपत्रांचे सामाजिक प्रबोधन | |
| ४. | प्रकरण चौथे | १३५ - २२१ |
| | सोलापुरातील वृत्तपत्रांचे राजकीय प्रबोधन | |
| ५. | प्रकरण पाचवे | २२२ - २५७ |
| | 'कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचारचे' चिकित्सात्मक , टीकात्मक परीक्षण व योगदान | |
| ६. | प्रकरण सहावे | २५८ - २७0 |
| | उपसंहार | |
| ७. | संदर्भ ग्रंथ सूची | २७१ - २७९ |
| ८. | मुलाखती | २८0 - ३0४ |
| ९. | परिशिष्ट – १ | ३0५ - ३३१ |
| | निवडक अग्रलेख | |
| १0. | परिशिष्ट – २ | ३३२ - ३३७ |
| | सोलापुरातील वृत्तपत्रांचे बोधचिन्ह | |
| ११. | परिशिष्ट – ३ | ३३८ - ३५0 |
| १२. | परिशिष्ट – ४ | ३५१ |

प्रकरण १ ले

# विषयप्रवेश

सोलापूर हा महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचा जिल्हा आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाच्या सीमेवर सोलापूर जिल्हा वसलेला असल्याने या जिल्ह्याचे भौगोलिक महत्वही मोठे आहे. दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणूनही सोलापूरकडे पाहिले जाते. भीमा, सीना आणि माण या नद्यांच्या खोऱ्यात हा जिल्हा वसलेला आहे. मध्ययुगीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत ते अगदी स्वातंत्र्य लढ्याच्या काळापर्यंत अनेक कारणांनी सोलापूर जिल्हा नेहमीच प्रकाशात आणि प्रसिध्दीत राहिला आहे. सुती कापडाच्या उत्पादनामुळे आधुनिक काळात सोलापूर शहराचा उल्लेख गिरणगांव म्हणून केला जातो. कापड गिरण्या, कामगार वसती, चाळींची मोठी संख्या, विडी उद्योग यामुळे या शहराचे ग्रामीण स्वरूप अजूनही टिकून आहे. सोलापूर हे चालुक्यांच्या काळापासून ते यादवांच्या काळापर्यंत, पुढे बहामनी आणि मोगलांच्या काळातही सत्ताकेंद्र राहिले आहे. विजापूरचा आदिलशहा आणि हैद्राबादची निजामशाही यांच्यातील एक दुवा म्हणून सोलापूर जिल्ह्याकडे पाहिले जात असे. ईस्ट इंडिया कंपनीने मुंबईचे बेट सन् १६६१ साली आपल्या अंमलाखाली आणले, त्यानंतर जवळपास दीडशे वर्षांनी म्हणजे सन् १८१८ साली सोलापूर ब्रिटिशांच्या ताब्यात गेले.

इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यानंतर सोलापुरात वैचारिक जागृतीची सुरूवात झाली. याच दरम्यान सोलापुरात वृत्तपत्रांचा उदय झाला. सोलापुरात जनजागृती करण्यामध्ये वृत्तपत्रांचे योगदान लक्षणीय आहे. आण्णाजी इनामदार यांनी सोलापुरातील पहिले वृत्तपत्र 'कल्पतरू' सुरू केले आणि बळवंत काकडे यांनी 'आनंदवृत्त' अशी दोन वृत्तपत्रे सुरू झाली. म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय

कॉंग्रेसच्या स्थापनेच्याही आधी १0 वर्षे सोलापुरात वृत्तपत्र सुरू झाले होते. त्यापाठोपाठ दिनांक ३ फेब्रुवारी १८८५ पासून नरसप्पा जक्कलांचे 'सोलापूर समाचार' सुरू झाले आणि आणखी एका पत्राची भर यात पडली. सन् १९१४ ला पहिले जागतिक महायुध्द सुरू झाले त्याचीही दखल सोलापुरातील या पत्रांनी घेतली होती. लोकमान्य टिळक, म.गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा थोरांच्या विचाराने आणि कार्यांनी सोलापूर शहरातील जनता स्वातंत्र्य लढ्यामध्ये उतरली.

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्यात असहकार चळवळीचा प्रारंभ झाला. गांधीयुग सुरू झाले. इ.स.१९२0 ते १९४७ या कालखंडात सुत कामगार, विडी कामगार, ग्रामीण खेडूत अशा सर्वसमावेशक घटकांचा स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभाग वाढला. महात्मा गांधींना अटक केली तेंव्हा सोलापुरात प्रचंड मोठा जनक्षोभ उसळला होता. त्याचे पर्यवसान सोलापुरात लष्करी कायदा (मार्शल लॉ) लागू होण्यामध्ये झाले. मार्शल लॉ लागू झाल्याने सोलापूरचे नांव संपूर्ण जगभर पसरले. लष्करी कायद्याच्या या झंझावाती काळात सोलापुरातील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'गजनफर' आणि 'कर्मयोगी' अशा वृत्तपत्रांनी फार मोलाची कामगिरी बजावली. विशेषतः 'कर्मयोगी' मध्ये तरी मार्शल लॉ लागू होण्यापूर्वी जी दंगल उसळली आणि त्यात गोऱ्या पोलीसांनी सामान्य नागरिकांवर जो अनन्वीत अत्याचार केला त्याचा सविस्तर वृत्तांतच छापला होता. पोलीसांच्या गोळीबारात मृत्यू पावलेल्या आणि जखमी झालेल्या लोकांची यादीच प्रसिध्द केली होती. त्यामुळेच या घटना इंग्लंडच्या संसदेपर्यंत पोहोचू शकल्या.

दि. ८ मे १९३0 रोजी महात्मा गांधींना अटक झाल्याची बातमी सोलापुरात पसरली त्यानंतर सोलापूरच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या इतिहासातील व्यापक जनचळवळ उत्स्फूर्तपणे उभी राहिली. कोणाही नेत्यांशिवाय उत्स्फूर्तपणे लोक सहभागी झाले. त्यांतरचे सलग तीन दिवस सोलापुरात फक्त जनतेचे राज्य होते. नगरपालिकेवरही

तिरंगा झेंडा फडकावण्यात आला होता. याचा परिणाम म्हणून दिनांक १२ मे च्या मध्यरात्रीपासून सोलापुरात लष्करी कायदा लागू करण्यात आला. संपूर्ण देशामध्ये मार्शल लॉ लागू करण्याची ही एकमेव घटना होती. सोलापुरातील मार्शल लॉच्या घटनेनंतर नागरिकांमध्ये स्वातंत्र्य चळवळींविषयी जागृती निर्माण झाली पाहिजे अशी आवश्यकता वाटू लागली. त्यामुळे सोलापुरातील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार' यांनी अधिक जागरूकपणे काम करायला सुरूवात केली. मार्शल लॉच्या अंतर्गत ज्या चार हुतात्म्यांना इंग्रजांनी फाशीची शिक्षा सुनावली त्यात 'गजनफर' या साप्ताहिकाचे संपादक हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन हेही होते. त्यामुळे त्यांच्या अटकेनंतर ते साप्ताहिक ही बंद पडले. इंग्रज पोलिसांनी जे अनन्वित अत्याचार केले त्याचे यथासांग वर्णन छापून आणणाऱ्या 'कर्मयोगी' साप्तहिकाचे संपादक रामभाऊ राजवाडे यांनाही अटक झाली. त्यामुळे काही काळ 'कर्मयोगी' हे साप्ताहिकही बंद पडले.

सन् १८५७ ते १९४७ ही ९0 वर्षे देशाच्या इतिहासातील अत्यंत महत्वाची वर्षे होती. याच काळात स्वातंत्र्य लढा उभा राहिला आणि स्वातंत्र्यप्राप्तीही झाली. सोलापूरच्या इतिहासाच्या दृष्टीनेसुध्दा इ.स. १८६७ ते इ.स. १९४७ ही वर्षे महत्वाची होती. सन् १८६७ साली सोलापुरातील पहिले वृत्तपत्र निघाले. तेंव्हापासून देश स्वतंत्र होईपर्यंतचा कालावधी अत्यंत महत्वाचा ठरला. त्यामुळे या शहरातून प्रकाशित होणाऱ्या परंतु देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात मोलाचे योगदान देणाऱ्या 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'गजनफर', 'कर्मयोगी' आणि 'सोलापूर समाचार' या पत्रांचा अभ्यास संशोधनात्मक दृष्टीने करावा म्हणून प्रस्तुत "सोलापूर शहरातील वृत्तपत्रांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी" ('कल्पतरू' व 'सोलापूर समाचार' यांच्या विशेष संदर्भात) इ.स. १८६७ ते इ.स. १९४७ हा विषय निवडला आहे. विशेषतः मार्शल लॉच्या घटनेचे पडसाद सबंध जगभरातील वृत्तपत्रात उमटले, त्याची चिकित्साही अनेक दिवस महाराष्ट्रातल्या विविध पत्रातून येत राहिली. या चिकित्सेमुळेही या पत्रांच्या स्वातंत्र्य

लढ्यातील कामगिरीचा अभ्यास संशोधनात्मक पध्दतीने करावा अशी इच्छा मनात निर्माण झाली. 'सोलापूर समाचार' आजही दैनिक स्वरूपात चालू आहे. 'कल्पतरू' कार काकडे घराण्यातील डॉ नभा काकडे आणि जक्कल घराण्यातील त्रिगुण जक्कल यांच्याशी चर्चा केल्यानंतर या विषयाची व्याप्ती लक्षात आली. त्यामुळेही हा विषय संशोधनासाठी निवडण्याची प्रेरणा निर्माण झाली.

**यापूर्वी झालेले संशोधन :**

१) सोलापूर जिल्ह्याचा स्वातंत्रलढा - शं.भा.येवले.

२) सोलापूर मार्शल लॉ चा दैदिप्यमान इतिहास - य.दि.फडके भाषण पुस्तिका

३) हुतात्मा अब्दुल रसुल कुर्बान हुसेन - नी. त्र्यं. पुंडे

४) "कर्मयोगी" स्मरणिका - पु.ज.बुवा

**संशोधन करण्यापूर्वी वाचलेले ग्रंथ :**

1) What is History? - E.H. Carr
2) Reflection of History - J.Burckhardt
3) The Ideas of History - R.G. Collingwood
4) Essays in the Philosophy of History - R.G. Collingwood, Ed.by William Debbibs
5) Laws & Explanations in History - W.H. Dray
6) Philosophy of History in our time - Meyerhoff
7) Interpretation of History - A.G. Widgery
8) An Introduction to the Philosophy of History - W.H. Walsh
9) Introduction to Philosphy of History -Aron Raymond
10) Philosophy of Histoy - Goel

11) History, its Theory and Practice - Croce, Bendetto

12) History as a System - Gasset, Jose Ortegay

13) इतिहासाचे तत्त्वज्ञान - सदाशिव आठवले

14) इतिहासः शास्त्र आणि कला - वि. द. घाटे

15) संशोधकाचा मित्र - ग. ह. खरे

16) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. बोधनकर

**संशोधनाचा उद्देश ः**

"सोलापूर शहरातील वृत्तपत्रांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी" ('कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार' यांच्या विशेष संदर्भात) इ.स.१८६७ ते १९४७ हा विषय संशोधनासाठी निवडण्यामागील काही उद्देश खालीलप्रमाणे सांगता येतील.

लॉर्ड लिटनने 'व्हर्नाक्यूलर प्रेस ॲक्ट' नुसार देशी वृत्तपत्रांवर बंदी घातली. लॉर्ड लिटनचे हे वृत्तपत्रांवरील बंदीचे तत्व पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीपर्यंत चालू होते. महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेच्या विरोधात 'केसरी' या मराठी आणि 'मराठा' या इंग्रजी पत्रांनी परखडपणे जागृती घडवायला सुरूवात केली. महाराष्ट्रातील पुणे आणि मुंबई हे त्यावेळचे सत्तेचे आणि सत्ताविरोधातील चळवळीचे प्रमुख केंद्र होते. असे असले तरीही पुणे-मुंबई बाहेरही स्वातंत्र्य चळवळींच्या गतीविधी चालू होत्या. संपूर्ण महाराष्ट्रभर जागरूकता वाढलेली होती. सोलापुरात 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' अशा वृत्तपत्रांच्या माध्यमातून लोकजागृती घडत होती. मार्शल लॉ सारख्या देशव्यापी प्रभाव असणाऱ्या घटना सोलापुरात घडल्या, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारधारेला अनुसरून काम करणारी मोठी शक्ती सोलापुरात कार्यरत होती. वृत्तपत्रांचे योगदानही मोठे होते. या

सर्वच वृत्तपत्रांच्या कामगिरीचा संशोधनाच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली.

इ.स.१८६७ साली 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' हे पत्र निघाले, इ.स. १८८५ ला 'सोलापूर समाचार' निघाले, नोव्हेंबर १९२४ मध्ये लोकमान्यांचे कट्टर समर्थक रामभाऊ राजवाडे यांनी 'कर्मयोगी' हे साप्ताहिक सुरू केले तर हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बा न हुसेन यांनी 'गजनफर' हे साप्ताहिक डिसेंबर १९२७ मध्ये सुरू केले. या चारही पत्रांचा स्वभावगुण निराळा होता आणि विचारांची ठेवणही निराळी होती. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' हे गोपाळकृष्ण गोखले पुरस्कृत नेमस्तवादी होते. 'सोलापूर समाचार'ने मध्यम मार्ग स्विकारला तर 'कर्मयोगी' हे साप्ताहिक लोकमान्यांच्या जहाल विचारांचा पुरस्कार करणारे होते आणि 'गजनफर' हेही टिळकांच्या विचारांनी प्रेरित झालेले होते. प्रत्येकांनी आपापल्या पध्दतीने स्वातंत्र्य लढ्यात योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची आणि विचारांची नोंद घेणे हा उद्देश आहे.

या चारही पत्रांची कार्यकक्षा सोलापूर जिल्ह्याला व्यापणारी होती. सोलापुरातील सामान्य जीवन, कामगार चळवळी, रेल्वे, कापड गिरण्या, विडी उद्योग, सोलापूर नगरपालिका अशा सगळ्या क्षेत्रातील घडामोडी, प्रसंग, वादविवाद, समस्यांना आपल्या पत्रामध्ये स्थान दिले. सोलापूर हे पूर्वीपासूनच बहुभाषिक शहर राहिले आहे. मराठी, ऊर्दू, तेलुगु, कन्नड अशा सगळ्या भाषांना सामावणारे समाजजीवन या पत्रांमधून प्रतिबिंबित होत होते. सोलापुरात अशा सर्व भाषांची एकत्रित एक संमिश्र संस्कृती असूनही त्या त्या संस्कृतीचे वेगळेपण टिकून होते. या सर्व भाषांतील आणि समाजातील आंतरसंबंध या पत्रातून ठळकपणे परावर्तीत झाले आहेत. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून संमिश्र सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे हाही हेतू आहे.

सोलापूरच्या बहुभाषिक संस्कृतीतूनही स्वातंत्र्य चळवळ एकजीनसीपणे मोठी होत गेली. कामगारांच्या विविध चळवळी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे कार्य, हिंदुमहासभेचा

प्रभाव, महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभाव, मार्शल लॉ, त्यानंतरचे देशव्यापी पडसाद, चार हुतात्म्यांचे बलिदान अशा सर्व राजकीय घडामोडीचे एक दक्ष साक्षीदार म्हणूनही या पत्रांचे कार्य मोठे आहे. या कालातील छोट्यामोठ्या घटनांवर आधारित बातम्या, लेख, अग्रलेख हे एका अर्थाने समकालीन इतिहासाचा फार मोठा दस्तावेज आहेत. इतिहासाचा विद्यार्थी या नात्याने या दस्तावेजाचा अभ्यास करणे हा हेतू समोर ठेवून सदरचे संशोधन केले आहे.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात 'केसरी', 'मराठा' यासारख्या मोठ्या पत्रांबरोबरच स्थानिक पत्रांचेही योगदान मोठे आहे. राष्ट्रीय कॉंग्रेसचे विचार आणि कार्य ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचवून सामान्य जनतेच्या मनात स्वातंत्र्याविषयीची ओढ निर्माण करण्यात या जिल्हास्तरावरील पत्रांचा मोठा वाटा आहे. सोलापूर हे ब्रिटिशांच्या काळात मुंबई–मद्रास रेल्वे मार्गावरील प्रमुख औद्योगिक आणि व्यापारी स्थानक होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यास सोलापूरला एक अनन्यसाधारण महत्व आहे. स्वातंत्र्य लढ्यातील या सर्व घटनांची नोंद या चारही पत्रांनी घेतली. सोलापूर हे गिरणगांव म्हणूनही प्रसिध्द होते, दक्षिण भारताचे प्रवेशद्वार आहे, गिरण्या, रेल्वे यामुळे विकासोन्मुख शहर म्हणून याकडे पाहिले जाते. अशा काळाचा एक वृत्तपत्रीय धांडोळा घेण्याच्या उद्देशाने या विषयाची निवड केली आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा (Historical Method) वापर केला आहे. साधनांवर आधारित मांडणी करताना कालानुक्रम पध्दतीचा (Chronological Method) वापर केला आहे. आवश्यक तिथे विश्लेषणात्मक पध्दतीचा (Descriptive Method) अवलंब केला आहे.

**संशोधनाची साधने ः**

संशोधनासाठी संशोधनाची ठिकाणे, वाचनालये, संग्रहालये, खाजगी संग्रह, मुलाखती, सरकारी वाचनालये, दफ्तर, मुलाखती, शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय, सोलापूर विद्यापीठ ग्रंथालय, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय ग्रंथालय, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर, मराठी साहित्य ग्रंथ संग्रहालय, मुंबई, फर्ग्युसन महाविद्यालय ग्रंथालय पुणे, शासकीय ग्रंथालय पुणे, काकडे दप्तरखाना सोलापूर, समाचार प्रेस, सोलापूर, दयानंद महाविद्यालय ग्रंथालय, सोलापूर, श्रमिक पत्रकार संघ ग्रंथालय सोलापूर या ग्रंथालयाचा अभ्यासासाठी उपयोग झाला आहे.

'साधन नाही इतिहास नाही' या सिम्बासच्या उक्तीप्रमाणे संशोधनासाठी 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार' या दोन पत्रांच्या मूळ संचिकांचा वापर केला आहे. सन् १८६७ ते १९४७ या कालावधीतील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार'चे मूळ अंक, 'कर्मयागी'कार रामभाऊ राजवाडे यांचा गौरवग्रंथ, समाचारचा सुवर्णमहोत्सवी अंक तसेच काही स्मृती अंक यांचा वापर केला आहे.

**प्राथमिक साधने ः**

इ.स. १८६७ ते १९४७ या कालावधीतील उपलब्ध असलेले उपरोक्त अंक, श्री नरसप्पा आंबण्णा जक्कल यांचा गौरव ग्रंथ, 'कर्मयोगी' गौरवग्रंथ, सोलापूर गॅझेट, समकालीन प्रकाशित ग्रंथ, पुस्तिका यांचाही प्राथमिक साधने म्हणून उपयोग केला आहे.

**दुय्यम साधने ः**

मासिके, संशोधन पुस्तिका, माहिती पुस्तिका, विशेषांक, संबंधीत व्यक्ती, संस्थांच्या मुलाखती यांचा दुय्यम साधने म्हणून वापर केला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा ः**

विषय व्यापक असल्याने संशोधन अधिक टीकाक व सखोल करण्याच्या दृष्टीने हा विषय १८६७–१९४७ या कालावधीपुरता मर्यादित केला आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा कालखंड हा इ.स.१८५७ ते इ.स.१९४७ असा जवळपास ९0 वर्षांचा आहे. सोलापुरातील पहिले पत्र इ.स.१८६७ साली सुरू झाले. त्यामुळे इ.स.१८६७ ते १९४७ असा हा कालखंड निवडला आहे. या कालावधीतील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या चारही पत्रांचे सर्वच अंक उपलब्ध आहेत असे नाही. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार'चे काही अंक उपलब्ध आहेत. पण 'गजनफर' आणि 'कर्मयोगी' चे अंक कुठेच उपलब्ध नाहीत. त्यामुळे या दोन पत्रांच्या बाबतीत स्मृती ग्रंथ व इतर प्रकाशित पुस्तिका, गौरव ग्रंथ, लेख यावरच अवलंबून राहावे लागते. याच दृष्टीने या कालखंडातील काही निवडक वृत्तपत्रांची अभ्यासासाठी निवड केली आहे. कारण साधने मर्यादित आहेत.

**१८६७ पूर्व परिस्थिती ः**

दोन जागतिक महायुध्दे आणि त्या दरम्यानची परिस्थिती, देशभरातील विशेषतः महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळ, त्यामागची विचारधारा, हिंदु–मुस्लिम ऐक्य, पाकिस्तानच्या निर्मितीची तयारी या सर्वच घटनांबाबतची आपापली भूमिका उपरोक्त सर्व च पत्रांनी स्पष्टपणे मांडली.

सन् १९३0 चा मार्शल लॉ आणि त्यानंतरचे पडसाद याचा प्रभाव देशाच्या स्वातंत्र्य चळवळीवर पडला. त्याचीही नोंद 'कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार'ने व्यवस्थितपणे घेतली. या दरम्यान 'कर्मयोगी'चे प्रकाशन काही काळ बंद पडले आणि 'गजनफर' पूर्णतः बंद पडले होते.

स्थानिक घटक, घटना, समस्या, मर्यादा, संघटना आणि लढे, त्याचे नेतृत्व इत्यादी अनेक गोष्टी या चारही पत्रांच्या तत्कालीन प्रकाशित अंकावरून स्पष्ट होतात.

**सोलापुरचा आधुनिक इतिहास ः**

इंग्रजी सत्तेचा अंमल सोलापुरात १८१८ नंतरच सुरू झाला. पेशवाईचा शेवटचा तडाखा याच जिल्ह्यातील आष्टीच्या लढाईत बसला आणि पेशवाई संपली. इ.स.१८५७ च्या स्वातंत्रलढाईतही सोलापूरचा सहभाग उल्लेखनीय होता. आपली सत्ता बळकट करण्याच्या प्रयत्नात असतानाच हा उठाव झाला. पण ब्रिटीश सैन्याची शिस्त, आधुनिक शस्त्रे, आपसातील फंदफितुरी यामुळे या उठावाला अपयश आले. सोलापुरातील काही साहसी तरूणांनी थेट उत्तर हिंदुस्थानापर्यंत मजल मारली होती. सन् १८१८ ते १९४७ अशा १३0 वर्षांच्या ब्रिटिशांच्या राजवटीत सोलापुरात अनेक बदल झाले. सोलापूर हे एक गांव म्हणूनच त्यावेळी ओळखले जात असे. १८५२ पर्यंत सोलापूरचा उल्लेख 'कसबा' म्हणूनच केला जायचा. इ.स.१८१८ ते १८५२ पर्यंत सोलापूर केवळ २२५ एकरावर वसलेले होते. या सव्वादोनशे एकरात ३६00 घरे होती. १८५२ साली सोलापूर नगरपालिकेची स्थापना झाली आणि शहर म्हणून अस्तित्वात येऊ लागले. अनेक पेठा स्थापन झाल्या. याच काळात सोलापुरात ए डब्ल्यू गोल्डफिंच हे जिल्हाधिकारी म्हणून आले त्यांच्याच नावाने गोल्डफिंच पेठ स्थापन झाली. त्यानंतर मंगळवार पेठ, अशा अनेक पेठा निर्माण झाल्या. तरीही खऱ्या अर्थाने १८७४ पासूनच सोलापूरकडे शहर म्हणून पाहिले गेले.

प्रकरण २ रे

# सोलापुरातील मराठी वृत्तपत्रांचा उगम, विकास व कार्य

**१. विषय प्रवेश ः**

"सोलापूर शहरातील वृत्तपत्रांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी" ('कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार' यांच्या विशेष संदर्भात) इ.स.१८६७ ते १९४७ हा अभ्यास विषय घेऊन वृत्तपत्रांच्या इतिहासात डोकावताना आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी वृत्तपत्रांची वाटचाल पाहणे इतिहासाचा विद्यार्थी म्हणून आवश्यक वाटले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये सोलापूरचा सिंहाचा वाटा आहे. सोलापूरने देशाच्या स्वातंत्र्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. हे योगदान हौतात्म्याच्या रूपात होते, तसे वैचारिक चळवळींच्या रूपात होते, स्वदेशीच्या आंदोलनाच्या रूपात होते, तसे वृत्तपत्रांच्या माध्यमातूनही होते. सोलापूर हे महाराष्ट्र, आन्ध्र आणि कर्नाटकाच्या सीमेवर असल्याने अनेक भाषा आणि विविध संस्कृतीचा संगम असलेले, अनेक परंपरांनी नटलेले इथले समाज जीवन आहे. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'गजनफर', 'सोलापूर समाचार' आणि 'कर्मयोगी' अशा काही वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य आंदोलानत फार मोलाची भर घातली आहे. याशिवायही अनेक वृत्तपत्रे सोलापूर शहरात आणि जिल्ह्यात कार्यरत होते. पण अभ्यासाच्या सोयीसाठी व अभ्यास विषयाला न्याय देण्यासाठी 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'गजनफर', 'सोलापूर समाचार' आणि 'कर्मयोगी' या चार वृत्तपत्रांची निवड केली आहे. या चारही वृत्तपत्रांचा उगम, त्यांचा विकास, कार्यक्षेत्र, वृत्तपत्रांच्या संपादकांचे समाजातील स्थान, त्या काळातील सामाजिक स्थिती, स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा, स्वातंत्र्य लढ्यात या वृत्तपत्रांनी बजावलेली

भूमिका आणि त्यांचे कार्य अशा अंगाने या विषयाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यासाठी आवश्यक ती ऐतिहासिक कागदपत्रे, त्या त्या वृत्तपत्रांचे अंक, मुलाखती, तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास होण्यासाठी सामाजिक घटनांसंबंधी पूरक कागदपत्रे यांचा अभ्यास करून या विषयाला परिपूर्ण करण्याचा प्रयत्न या प्रबंधामध्ये केला आहे. सोलापुरातून निघणारी ही वृत्तपत्रे केवळ सोलापूर शहरच नव्हे तर सोलापूर जिल्हा आणि आसपासच्या परिसरात आपला प्रभाव पाडण्यात यशस्वी झाली होती. सोलापूरच्या सामाजिक जीवनाशी एकरूपता साधलेली असल्याने सामाजिक घटनांचा आणि स्थित्यंतराचा अंदाज येण्यासाठी काही ऐतिहासिक दस्तावेजांचाही अभ्यास केला गेला आहे. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार' या दोन प्रमुख वृत्तपत्रांनी आपली शंभरी गाठली तर 'गजनफर' व 'कर्मयोगी' ही वृत्तपत्रे अल्पायुषी ठरली. पण प्रत्येकाचा तत्कालीन समाजजीवनावर चांगलाच पगडा होता. या सर्व परिस्थितीचा अभ्यास सदर प्रबंधामध्ये करण्यात आला आहे. या विषयाची आवश्यकता म्हणून मराठी वृत्तपत्राचा इतिहास आणि विकास, प्रभाव याचाही याच अनुषंगाने अभ्यास केला आहे.

### २. सोलापूरच्या सामाजिक जीवनाचा प्रारंभ ः

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील सोलापूरच्या वृत्तपत्रांनी दिलेले योगदान हा अभ्यास विषय पाहण्यासाठी सोलापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहणे व तिचा वृत्तपत्रांच्या निर्मितीवर झालेला परिणाम पाहणे आवश्यक वाटते. स्वातंत्र्य लढ्यातील सोलापूरचे योगदान वादातीत आहे. सोलापूरच्या युवा पिढीने आपल्या अतुलनीय कामगिरीने स्वातंत्र्य इतिहासात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. इ.स.१८८५ साली कॉंग्रेसची स्थापना झाली. त्यावेळी मुंबई-नागपूर या दोन शहरानंतर सोलापूरचाच क्रम लागे. औद्योगिकरणाची सुरूवात होती. हातमागावर कापड निर्माण करणारे सोलापूर एक पमुख

केंद होते. इ.स.१८५२ साली सोलापूरात नगरपालिका स्थापन झाली.सन् १८७0 साली सोलापूरात सार्वजनिक सभा स्थापन झाली. इ.स.१८८0 साली सेलापूर युनियन क्लब सुरू झाला. इ.स.१८५८ साली वक्तृत्तोत्तेजक सभा स्थापन झाली.[१] अशा विविध संस्था संघटनांच्या माध्यमातून सोलापूरचे सामाजिक जीवन आकाराला येत होते. इ.स.१८८७ साली झालेल्या मद्रास कॉंग्रेसला सोलापुरातून सार्वजनिकरित्या आठ प्रतिनिधी पाठविले. यात 'कल्पतरू'पत्राचे संपादक गोविंद नारायण काकडे आणि 'ज्ञानप्रकाश' चे संपादक रामचंद्र मोरेश्वर साने यांचा समावेश होता. परत आल्यानंतर कॉंग्रेसच्या कार्याची माहिती देण्यासाठी त्यांच्या ठिकठिकाणी सभा घेतल्या.[२]

### ३. सोलापूरातील कॉंग्रेस व लो.टिळक

राष्ट्रीय कॉंग्रेसचे संस्थापक सर ॲलन ह्यूम यांनी १८९३ साली सोलापूरला भेट दिली. त्यांचे सोलापूर रेल्वेस्थानकावर भव्य स्वागत करण्यात आले. येथूनच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळीचा शुभारंभ सोलापूरात झाला. दादाभाई नवरोजी यांची लंडनच्या कॉमन्स सभागृहाचे प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल आनंदोत्सवही साजरा करण्यात आला.[३] इ.स.१८६७ साली श्री.बाळकृष्ण नारायण तथा बळवंतराव काकडे यांनी 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' ही वृत्तपत्रे सुरू केली. याच काळात सोलापूर जिल्हयात पंढरपूर व बार्शी येथेही काही वृत्तपत्रे सुरू झाली. १९0७ साली लोकमान्य टिळकांचे निस्सीम भक्त असलेले बळवंत शंकर लिमये यांनी 'स्वराज्य' साप्ताहिक सोलापूरात सूरू केले. सोलापूरातील राष्ट्रीय वृत्तीचे हेच पहिले वृत्तपत्र होय.[४] 'स्वराज्य' हे साप्ताहिक तसे अल्पजिवी ठरले. इ.स.१९0८ साली सरकारी रोषाला बळी पडून ते अखेर बंद पडले. पण या निमित्ताने लोकमान्य टिळकांचा सोलापूरशी सातत्त्याने संपर्क येत राहिला. लोकमान्य टिळकांचा सोलापूरशी ऋणानुबंध तसा खूप जुना होता. लोकमान्य टिळकांचे वडिल श्री. गंगाधर रामचंद्र टिळक याच जिल्हयात शिक्षणाधिकारी

होते. त्यामुळे लोकमान्यांचे बालपण व काही शिक्षण ह्याच जिल्हयात झाले.[५] लोकमान्य टिळकांची 'राष्ट्रीय नेते' म्हणून ओळख निर्माण झाल्यानंतर १९०७ मध्ये ज्यावेळी प्रथम सोलापूरात आले त्यावेळी त्यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. बार्शी, पंढरपूर, लातूर, सोलापूर आदि ठिकाणी भेटी देऊन स्वदेशीच्या मोहिमेला गतीमान करून त्यांनी प्रभावी रूप दिले. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सोलापूरातील संघटनात्मक बांधणीला टिळकांच्या या प्रवासाचा खूप फायदा झाला असे दिसते. 'कर्मयोगी' कर्ते रामभाऊ राजवाडे, भाऊसाहेब खडकीकर, गुलाबचंद दोशी आदि शिष्यवर्ग टिळकांना लाभला.

**४. म.गांधींचा सोलापूर दौरा ः**

इ.स.१९२१ साली म.गांधी यांनी सोलापूर जिल्हयाचा प्रथम दौरा केला. सोलापूर रेल्वेस्थानकावर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. आंदोलनात सोलापूरातील अनेक कार्यकर्ते कै.सामंत वकील यांच्या नेतृत्वाखाली सक्रीय झाले. १९२४ सालच्या मुळशी धरण सत्याग्रहात सोलापुरातील चक्रपाणि, काकडे ('कल्पतरू' कर्ते), कवि कुंजविहारी, देवस्थळी, कै.व्यं.गो.अंदुरकर या तरूणांनी सहभाग घेतला. याच सालात डॉ.अंत्रोळीकर कॉंग्रेसच्या कार्यात सहभाग घेतला. इ.स.१९२४ च्याच नागपूरच्या झेंडा सत्याग्रहातही अनेकांनी सहभाग घेतला. याच सालात डॉ.अंत्रोळीकर कॉंग्रेसच्या कार्यात सक्रीय झाले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सदस्यपदी त्यांची नियुक्ती झाली. डॉ.अंत्रोळीकर सोबत रंगनाथ विष्णू लळीत, कमलाकरपंत सुमंत, भि.ल.कवडी असे अनेक सहकारी लाभले.[६] १९२७ मध्ये म.गांधीनी कस्तुरबासह सोलापूरचा दौरा केला. करमाळा, कुर्डुवाडी, बार्शी, सोलापूर, वळसंग अशा ठिकाणी महात्मा गांधीच्या सभा झाल्या. दरम्यान, १९२२ साली 'कर्मयोगी' साप्ताहिकाचे प्रकाशन रामभाऊ राजवाडे यांनी सुरू केलेले होते.

इ.स.१९२७ साली डॉ.कृ.भी.अंत्रोळीकरांच्या नेत्तृत्वाखाली गिरणी कामगारांचा संप झाला. कुर्बान हुसेन गिरणी कामगारांचा नेता होता. त्यांनी 'गजनफर' (मराठी अर्थ -सिंह) हे साप्ताहिक सुरू केले. कामगारवर्गात या साप्ताहिकाला खूप मागणी होती. गिरणीकामगार संपात त्यांनाही तुरूंगवासाची शिक्षा झाली. इ.स. १९२८ साली सोलापूरात 'राष्ट्रीय गिरणी कामगार संघ' स्थापन झाला.

**५. नगरपालिका झेंडा प्रकरण ः**

इ.स.१९३0 साल उजाडले ते मुळात अनेक आव्हाने घेऊनच.म.गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. दिनांक १२ मार्च १९३0 रोजी दांडी यात्रा सुरू केली. गांधीजींच्या या 'दांडी यात्रेने' आणि जंगल सत्याग्रहाने देशभर ब्रिटिशांबद्दल असंतोष निर्माण केला.[७] याच सुमारास सोलापूरात कै.माणिकचंद शहा हे नगराध्यक्ष होते. दिनांक ४ एप्रिल १९३0 रोजीच्या नगरपालिकेच्या सभेत एक ठराव केला. नगरपालिकेच्या कार्यालयावर युनियन जॅक ऐवजी राष्ट्रीय तिरंगा ध्वज फडकवण्याचा! हा ठराव सर्वानुमते मंजुर झाला. दिनांक ६ एप्रिल १९३0 रोजी नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी मोठ्या उत्साहात नगरपालिकेवर तिरंगा फडकवला. सोलापूरला त्यावेळी मि.नाईट हे ब्रिटिश कलेक्टर होते. ते कमालीचे अस्वस्थ झाले. त्यांनी तिरंगा झेंडा उतरवण्यासाठी माणिकचंद शहा यांना दमदाटी केली. पण माणिकचंद शहा बधले नाहीत. उलट "नगरपालिका सदस्यांच्या परवानगीशिवाय तुम्हाला तो झेंडा उतरवता येणार नाही" असा खणखणीत जबाब दिला.[८] या गुन्हयाबद्दल ब्रिटिश सरकारने माणिकचंद शहा यांच्यावर लष्करी खटला भरून सहा महिने कारावास व दहा हजार रू. दंडाची शिक्षा ठोठावली. या ठरावात सामिल तत्कालीन पुढारी ब्रिटिश कलेक्टर नाईट यांच्या 'ब्लॅक लिस्ट' मध्ये गेले. तिथून सुरू झाला तो केवळ छळवाद !

### ६. तीन दिवसांचे स्वातंत्र्य व मार्शल लॉ ः

कायदेभंगाच्या चळवळीने देशव्यापी उग्र रूप धारण केले. सर्वत्र हरताळ, संप, बंद अशा आंदोलनाला उत आला. त्यात भर पडली ती म. गांधींच्या अटकेची! दिनांक ५ मे १९३0 रोजी म. गांधींना अटक झाली. दि. ५ मे रोजीच ही बातमी सोलापूरात थडकली. तत्कालीन पुढांयांच्या नेतृत्वाखाली दि. ५ मे च्याच रात्री ब्रिटिश सरकारच्या विरोधात घोषणा देत मिरवणूक निघाली. दिनांक ६ मे रोजी सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले. जुने कोर्ट, साखर पेठ, विजापुर वेस या भागातून प्रचंड मिरवणूक निघाली. सोलापूरच्या इतिहासात एवढी मोठी मिरवणूक कधीच निघाली नाही. वास्तविक पाहता गांधीजींना पकडल्याची बातमी अनपेक्षित नव्हती. आज ना उद्या सरकार गांधीजींना पकडणार हे भविष्यही अटळ होते. कारण आजपर्यंतच्या आंदोलनापेक्षा कितीतरी पटीने व्यापक आणि उग्र आंदोलन देशभर उभे राहीले होते. 'सशस्त्र सरकार अणि निःशस्त्र चळवळ असा हा लढा होता.' "नही रखना नही रखना, यह जालिम सरकार नही रखना" या घोषणेने सारे शहर दणाणून गेले.[१]

दिनांक ६, ७ व ८ मे १९३0 असे सलग तीन-चार दिवस निषेधाच्या मिरवणुका, जाहीर सभा, सभांमधील सरकारविरोधी प्रक्षोभक भाषणे, हरताळ, बंद अशा संतप्त वातावरणात सोलापूर शहर जगत होते. जनभावना या कोणत्याही पुढाऱ्यांच्या नियंत्रणाबाहेर गेल्या होत्या. दिनांक ७ मे १९३0 रोजी सकाळी लक्ष्मी-विष्णू गिरणी जवळ दंगल माजली. प्रचंड मोठा जमाव घोषणा देत, दगडफेक करीत म. गंधीचा जयजयकार करीत सर्वत्र फिरत होता. त्यातच भर पडली ते मुंबईचे देशभक्त वीर नरिमन आणि जमनालाल बजाज यांच्या अटकेची बातमी दिनांक ८ मे १९३0 रोजी सोलापूरात थडकली. युवा कार्यकर्त्यांमध्ये या दोघांची लेकप्रियता अधिक होती. दोघांची छायाचित्रे दोन घोडयावर ठेवून प्रचंड घोषणा देत मिरवणूक निघाली. ही प्रक्षुब्ध मिरवणूक बाळीवेशीत आली तेंव्हा त्यातील एका गटाने तुळजापूर वेशीतून रूपाभवानी मंदिराकडील

शिंदीच्या बनाकडे आपला मोर्चा वळविला. 'चला, रूपाभवानीकडे, शिंदीची झाडे तोडायला', कुणीतरी आरोळी दिली. जमाव तिकडे वळला. बघ्यांचीही संख्या वढली. पोलीस आले. पळापळी झाली. पोलिसांनी हाती लागेल त्याला उचलून तुरूंगात टाकले. जमाव आणखी चिडला. डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट मि. नाइट यांनी खवळलेला जमाव पाहिला गोळीबाराचा आदेश दिला. 'शंकर शिवदारे' हा तरूण कार्यकर्ता या गोळीबारात धारातिर्थी पडला. सोलापूरचा पहिला हुतात्मा शंकर शिवदारे![१०]

डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट मि. नाइट ५ लॉऱ्या भरून हत्यारी पोलिस शहरात पाठविले. प्रसंगी लाठी हल्ला, गोळीबार करण्याचे आदेश दिले. लोकांचा जमावही तितकाच प्रक्षुब्ध होता. लोकांनी मंगळवार पेठ पोलिस चौकी जाळली, कोर्टाला आग लावली.[११] लोकांचा वाढता संताप पाहून पोलीसांची दहशतही कुचकामी ठरली. अखेर सर्व प्रमुख अधिकारी व पोलीस हे शहर सोडून गेले. दिनांक ९, १0, ११, व १२ मे १९३0 या चार दिवसाच्या काळात सोलापूर शहारात एकही ब्रिटीश अधिकारी वा पोलीस हजर नव्हता. या चार दिवसात सोलापूर शहाराने 'संपूर्ण स्वातंत्र्य' अनुभवले. संपुर्ण शहर कॉंग्रेस कमिटीचे पुढारी आणि स्वयंसेवकांनी शहरातला बंदोबस्त नियंत्रण ठेवले. अक्षरशः 'गांधी राज्य' चालविले गेले. या दरम्यान कसलाही अनुचित प्रकार घडला नाही.

अखेर दिनांक १३ मे १९३0 रोजी सोलापूरात गोऱ्या मिलिटरीस पाचारण करण्यात आले. कर्नल पेज हा या मिलिटरीचे नेतृत्व करीत होता. सोलापुर शहरात मिलिटरी दाखल होण्यामागे आणखी एक पार्श्वभूमि होती 'एक जुने कम्युनिस्ट पुढारी ए. एस. आर. चारी नावाचे ख्यातनाम कायदेपंडित. त्यांचे आत्मचरित्र आहे 'memories of an unrepentant revolutionary'. या आत्मचरित्रात त्यांनी असं म्हटलं की 'सोलापूर हे "लिबरेट" – मुक्त झालं होतं. दिनांक ९, १0 अणि ११ मे १९३0 या तीन दिवशी हे शहर मुक्त होतं. इथल्या आणि पुण्याच्या गृहविभागाच्या अधिकाऱ्यांनी हिंदुस्थान सरकारला असं कळवलं की, 'ब्रिटीश राज्य गेलं आणि गांधींचं

राज्य आलेल आहे.' हे वाचल्यावर दिल्लीचे गृह विभागाचे अधिकारी खडबडून जागी झाले आणि त्यांनी तावडतोब तार पाठवून मुंबई सरकारच्या गृहसचिवाला कळवल की आता उशिर लावू नका, वेळ दवडू नका, ताबडतोप लष्करी मदत घ्या. [१२]

सोलापूरात दि. १३ मे १९३० पासून पण प्रत्यक्षात १५ मे १९३० पासून लष्करी कायदा (मार्शल लॉ) लागू झाला. सर्व नेत्यांची धरपकड, दिसेल त्याला गोळी घालण्याचे आदेश दिले गेले. तुळशिदास जाधवांना गांधी टोपी घातल्यावरून अटक केली. वास्तविक पाहता मंगळवार पेठ पोलीस चौकी व दोन पोलीसांच्या जळीत प्रकरणाशी मल्लपा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, किसन सारडा या चौघांचा काहीच संबंध नव्हता. पण, या प्रकरणी खोटी केस रचून चौघांनाही फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी पहाटे या चौघा वीरांना येरवडा जेलमध्ये फाशी दिली गेली. १२ जानेवारी म्हणजे संक्रांतीचा सण, सोलापूरात या वेळेस श्री.सिध्दरामेश्वराची गड्डा यात्रा भरते. फाशी देण्यासाठी देखिल जुलमी सरकाने असा पवित्र दिवस निवडला. आपल्या अलौकिक कतृत्वाने आणि जाज्ज्वल्य देशभक्तीने मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, किसन सारडा या सुपुत्रांनी भारताच्या स्वातंत्र्य लढयात सोलपूरचे नाव उज्ज्वल केले!

"दिनांक ८ मे रोजी शिंदीबन तोड सत्याग्रहामुळे उसळलेल्या दंगलीच्या निमित्ताने पोलिसांनी लॉऱ्यांमधून जो बेछुट गेळीबार करून निरपराध नागरीक व मुले ठार केली, या अन्यायाला जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी सोलापूरच्या 'कर्मयोगी' या साप्ताहिकाने एक विशेषांक १० मे १९३० रोजी काढला. संपादक रामभाऊ राजवाडे यांनी अतिशय तपशिलवार व बारकाईने माहिती व पुरावे गोळा करून खरी हकिकत जगासमोर आणली.[१३] 'कर्मयोगी' मध्ये छापून आलेल्या माहितीवर दै.केसरी मध्येही हे वृत्तांत छापून आले. त्याचे इंग्रजी भाषांतर होऊन सोलापुरातील अत्याचाराची खरी हकिकत इंग्लंडपर्यंतही पोहचली.

स्वातंत्र्य लढ्याचा हा दैदिप्यमान इतिहास आणि सोलापूरच्या चार हुतात्यांचे कर्तृत्व संपूर्ण देशभर नवी प्रेरणा देऊन गेले. या चळवळीला सोलापुरातील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या चार वृत्तपत्रांचे योगदान वादातीतच आहे. वृत्तपत्रांच्या निर्मितीला लागणारी देशातील व महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांचीही एक पार्श्वभूमी कारणिभूत ठरली. त्यामुळे देशातील तसेच मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

**७. वृत्तपत्रांचा उदय आणि विकासः**

भारतात जेम्स ऑगस्टस् हिकी याने 'बेंगॉल गॅझेट' या नावाने पहिले वृत्तपत्र सुरू केले. दिनांक २९ जानेवारी १७८0 रोजी 'बेंगाल गॅझेट' सुरू झाले.[१४] भारतातील वृत्तपत्रांची ही सुरूवात होती. मुंबईतील पहिले वृत्तपत्र १७८९ साली बॉम्बे हेरॉल्ड या नावाने सुरू झाले! वास्तविक पाहता मुंबई इलाक्यात इंग्रजांचा प्रभाव १६६५ पासूनच वाढू लागला होता. हळूहळू वृत्तपत्रांची संख्या वाढत जाऊन इ.स.१८८५ मध्ये ती ४२१ इतकी झाली.[१५] भारतातील वृत्तपत्राची सुरूवात ज्या बेंगाल गॅझेटने झाली त्यानंतर जवळपास ५२ वर्षांनी म्हणजे दिनांक ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. मराठीतील हे पहिले वृत्तपत्र. त्यामुळे 'दर्पण'ला आद्य मराठी वृत्तपत्र म्हटले जाते. मराठी वृत्तपत्रसृष्टीचा हा प्रारंभ होता. त्या आधीही एक मराठी वृत्तपत्र सुरू झाल्याचा पुरावा सापडतो. 'मुंबापूर वर्तमान' असे या वृत्तपत्राचे नांव होते. त्यामुळे कालमानाचा विचार करता 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र ठरत नाही. रविवार दिनांक २0 जुलै १८२८ या दिवशी मुंबापूर वर्तमानचा पहिला अंक प्रकाशित झाला. पण हे वृत्तपत्र फार दिवस चालले नसावे. कारण या वृत्तपत्राविषयी पुढील काळाच्या इतिहासात कुठेच उल्लेख सापडत नाही, वा त्याविषयी इतर वृत्तपत्रांनीही कधी

उल्लेख केल्याचे आढळत नाही. थोडक्यात, 'मुंबापूर वर्तमान' या वृत्तपत्राचा कुठेच ठावठिकाणा लागत नाही.

त्यामुळे उपलब्ध माहितीच्या आधारे आणि एकूण प्रभावाचा विचार करता बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' हेच मराठीतील पहिले वृत्तपत्र मानले जाते. मराठी वृत्तपत्रांचा आत्ताच्या काळात प्रचंड विकास झालेला दिसतो त्याची सुरूवात ही दर्पणपासून झाली. शन १८३२ साली म्हणजे पारतंत्र्याच्या काळात असे एखादे वृत्तपत्र प्रकाशित होत होते याचेच आश्चर्य वाटायला लागते. बाळशास्त्री जांभेकर हे लौकिक अर्थाने फार शिकलेले नव्हते पण त्यांच्या विद्वत्तेबद्दल सर्वांना आदर होता. बाळशास्त्रींनी वृत्तपत्रासारख्या प्रभावी माध्यमाचा प्रारंभ मराठीतून केला. कोकणातील देवगड तालुक्यात पोंभुर्ले या गावी १८१२ साली बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म झाला. सन् १८२५ साली बाळशास्त्री मुंबईत आले. १८३२ साली स्वतःच्या संपादकत्वाखाली 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले.

वृत्तपत्रांचे वर्तमान काळाशी अतूट नाते असते. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी त्याकाळचा वर्तमान जनतेसमोर मांडला. ब्रिटीश पत्रकार विकहॅम स्टेड म्हणतो, 'वृत्तपत्रे ही समाजाची रोजनिशी असतात.'[१६] सन् १८३२ ते २००९ या पावणे दोनशे वर्षाच्या काळात महाराष्ट्राच्या अनेक भागात वृत्तपत्रे निघाली. अनेक विचारप्रवाह, मतप्रवाहांचा पुरस्कार करणारी ही वृत्तपत्रे होती. त्या त्या काळातील स्थित्यंतराचे प्रतिबिंब वृत्तपत्रांमध्ये उमटत गेले. अनेक स्थित्यंतराचे साक्षीदार होत ही वृत्तपत्रसृष्टी अधिक परिपक्व होत गेली. स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रांनी स्वराज्याचे मीठ-जोंधळे हाती घेतले तर कधी सामाजिक प्रश्नांना ऐरणीवर आणले, कधी राजकीय सत्तांतरे घडवली तर कधी आर्थिक विकासासाठी कौल दिला. अशा अनेक स्थित्यंतरातून मराठी वृत्तपत्रसृष्टी अधिक परिपुष्ट होत गेली.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'केसरी'चा पगडा आणि प्रभाव मराठी वृत्तपत्रांवर शंभर – सव्वाशे वर्षांपर्यंत कायम राहीला. 'केसरी'ची ध्येयवादी पत्रकारिता, स्वातंत्र्य, स्वदेशी आणि समता या त्रीसूत्रीवर लोकमान्यांच्या लिखाणाचा सारा भर होता. केसरीच्या विचारांना एका अर्थाने यश लाभत होते. त्याचा प्रभाव केसरीच्या माध्यमातून सर्वदूर पसरत होता. लोकांच्या मनातील सूप्त स्वातंत्र्याकांक्षा अधिक धारदार होत होती. त्यामुळे इंग्रज सरकारच्या पायाखालची वाळू सरकायला सुरूवात झाली होती. इंग्रज सरकारच्या विरोधातील असंतोष जनतेमध्ये पसरत होता. म्हणूनच लोकमान्यांना 'असंतोषाचे जनक' म्हटले जात होते. हा वाढता असंतोष वृत्तपत्रांच्या माध्यमातून सरकार दरबारी पोहोचत होता आणि जनतेच्या मनात ठासून भरला जात होता, मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या दृष्टीने ही सर्वात जमेची बाजू होती. बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला तर 'केसरी'कारांनी या वृत्तपत्रांना वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. वृत्तपत्र हे प्रभावी अस्त्र आहे, परिवर्तन घडविणारे प्रभावी माध्यम आहे याचा पुरावाच जणू केसरीच्या वाटचालीने दिला. 'केसरी' चा उद्देशच टिळकांनी स्पष्ट केला होता, 'आमच्या मनातील विचार व तळमळ मराठी वाचकांच्या मनात उतरावी म्हणून आम्ही केसरीत लिहिले. तसा परिणाम झाला नाही तर श्रम फुकट गेले असे आम्ही समजू. वर्तमानपत्रांनी आपले काम निःपक्षपातीपणे व निर्भिडपणे बजावल्यास सरकरी अधिकाऱ्यांवर दबदबा राहतो.'[१७]

सन् १८३२ साली मराठी वृत्तपत्रांनी जन्म घेतला आणि १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. म्हणजे या ११५ वर्षात संपूर्ण भारतात आणि महाराष्ट्रातदेखील वृत्तपत्रांची वाढ मोठ्या प्रमाणावर आणि झपाट्याने झाली. स्वातंत्र्योत्तर काळातही वृत्तपत्रांची संख्या वाढली, पण म्हणावा तितका वेग मात्र राहिला नाही. थोड्याशा धीम्या गतीनेच वृत्तपत्रे वाढत होती. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात मात्र मराठीच नव्हे तर सर्व भाषिक वृत्तपत्रांना आधुनिक रूप आले. मराठी वृत्तपत्रांचा विस्तारही वाढला

आणि कार्यक्षेत्रही वाढले. गेल्या २५ वर्षात वृत्तपत्रांचा कल शहरी भागांकडून ग्रामीण भागाकडे सरकू लागला आहे. एकंदर मराठी वृत्तपत्रांची ही वाटचाल मोठी रंजक आणि उद्‌बोधक आहे.

## ८. वृत्तपत्रांची पूर्वपिठिका :

इंग्रजांच्या आगमनानंतरच 'वृत्तपत्र' ही संकल्पना भारतात रूजली. वृत्तपत्र हे ज्ञानप्रसाराचे, विचारप्रसाराचे महत्वाचे साधन आहे, याची जाणीव भारतीयांना इंग्रजी राजवटीच्या मध्यावरच झाली. भारतात सर्वप्रथम इंग्रजी वृत्तपत्रे सुरू होणे स्वाभाविक होते. कारण मुद्रणकला ही इंग्रजांबरोबरच भारतात आली. भारतीय समाज या माध्यमाला तसा अनभिज्ञ होता. 'मुद्रित वृत्तपत्र' हा प्रकार भारतीयांना नवीन असला तरी वृत्तप्रसार किंवा माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी मौखिक परंपरा भारतात पूर्वापार चालत आली आहे. 'महर्षी नारद' हे तिन्ही लोकांत भ्रमण करून माहितीची देवाण-घेवाण करीत असत. पौराणिक पंडित लोकांनी त्यांना 'कळीचा नारद' ही उपहासकारक पदवी बहाल केली असली तरी त्यांचा मुख्य हेतू हा माहितीचा वा बातम्यांचा प्रसार करून तिन्ही लोकांमध्ये जागरूकता आणली. महर्षी नरद हे जणू एक चालते-बोलते वृत्तपत्रच होते. त्यामुळेच नारदांना पत्रकारांचा आद्य गुरू मानले जाते. मुळात 'नारद' ही केवळ एक संकल्पना जरी मानली तरी ती सर्वप्रथम भारतीयांनी जगासमोर मांडली एवढी बाबदेखिल भारतीयांना अभिमान वाटावा अशीच आहे.

'नारद' या पौराणिक व्यक्तिमत्वाबरोबरच ऐतिहासिक काळातही 'खबऱ्या' ही संकल्पना भारतात अस्तित्वात होती. अन्य राज्यातील 'खबर' प्राप्त करण्यासाठी हे राजे लोक 'खबऱ्या' लोकांची नियुक्ती करीत असत. एकमेकांच्या राज्यातील माहिती प्रत्येक राज्यात पोहोचण्याचे 'खबऱ्या' हे महत्वाचे माध्यम होते. राज्याच्या विस्तारासाठी अथवा राजकीय महत्वाकांक्षेपोटी काहीवेळा आपापसात आक्रमणे केली जात त्याची इत्थंभूत

माहिती खबऱ्यांकडून मागविली जात. शत्रू गोटातील गुप्त हालचाली व माहिती प्राप्त करण्यासाठी आपली माणसे जागोजागी 'पेरण्या'ची पध्दत आपल्याकडे रूढ होती. काहीवेळा राजे लोक आपल्या प्रजेची स्थिती व मनःस्थिती जाणून घेण्यासाठी स्वतः 'वेषांतर' करून किंवा राजाच्या विश्वासातील माणसे असे वेषांतर करून फिरत असत. त्यातून जनतेची मानसिकता जाणून घेऊन राज्यकारभारात बदल करत असत. आज वृत्तपत्रे ही समाजमनाचा आरसा मानली जातात. तेच काम मौखिक पध्दतीने त्या काळातील खबऱ्यांनी केले आहे. त्या काळातील राज्य कारभाराची आवश्यकता म्हणून असे 'हेर खाते' अस्तित्वात आले. देश – परदेशातील बिनचूक बातम्या गोळा करणारे हेर हे जणू राजाचे डोळे आणि कान होते.

## ९. वृत्तपत्रांचे मुद्रणपूर्व स्वरूप :

छत्रपती शिवाजी महाराजांचे 'हेर खाते' तरी जगाच्या इतिहासात बिनतोड ठरावे असेच होते. शिवाजी महाराजांची 'गनिमी कावा' ही युध्दनीती या हेरांवरच अवलंबून असायची. कधी गोंधळी बनून, कधी गोसावी बनून, कधी मुल्ला–मौलवींच्या वेषात तर कधी कधी सरळ सरळ व्यापारी बनून या हेरांनी शत्रूपक्षातील शंभर टक्के खात्रीच्या बातम्या मिळविल्या. शिवाजी महाराजांच्या उभरत्या राजवटीत समर्थ रामदासांनी १२ वर्ष देशाटन केले. देशातील अन्याय–अत्याचाराची जाणीव समर्थांना झाली. म्लेच्छांनी मांडिलेला 'उच्छाद' त्यांनी शब्दबध्द केला.

'स्वधर्माआड जीं विघ्ने | ती तीं सर्वत्र उठिली
लाटिली, कुटीली देंवे | दाविली, काढिली बहु
विघ्नांच्या उठिल्या फौजा | भीम त्यावरी लोटला
भर्डिली, धिर्डिली रागे | रडविली, बडविली बळे
खौळले लोक देवाचे | मुख्य देवची उठिला

कळेना काय रे होते | आनंदवनभुवनी | |' [१८]

अशा या देशस्थितीचे वर्णन करून देशातील अराजकाची तीव्रता समर्थांनी छत्रपतींपर्यंत पोहोचवली. समर्थ रामदासांनी देशस्थितीचं वर्णन शब्दबध्द करून मौखिक परंपरेने आणि लिखित स्वरूपातही राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचं काम केलं आहे. याचा निश्‍चितच फायदा शिवाजी महाराजांना आपल्या ध्येयधोरणांच्या आखणीसाठी झाला. आजच्या भाषेत याचे वर्णन करायचे तर देशातील अराजकाचे यथास्थित वर्णन करणारे समर्थांचे हे वार्तापत्रच होते, असे म्हणायला जागा आहे.

'मुघल बादशहांच्या कारकिर्दीत बातमी लिहिण्याच्या कामाला अधिक व्यवस्थितपणा आला. 'बातमी लिहिणारे' ही एक स्वतंत्र संस्थाच तयार करण्यात आली होती. बादशहांना प्रत्येक सुभ्याची खबरबात मिळण्यासाठी त्यांनी प्रत्येक सुभ्यात 'बातमीदार' नेमीत असे त्यांना 'बाकिआनवीस' असे म्हणत. सुभ्यातील महत्वाच्या घडामोडींच्या हकीकती बादशहाच्या माहितीसाठी मुख्य 'बाकिआनवीसा'कडे लिहून पाठविणे हे त्याचे मुख्य काम असे.'[१९] बऱ्याचवेळा अशा अधिकृत माणसाकडून आलेल्या माहितीची, हकीकतीची खातरजमा करून घेण्यासाठी काही गुप्तहेर नेमले जात. त्यांना 'खुफियानवीस' म्हटले जात असे. मराठ्यांची सत्ता जशी विस्तार पावली तशी ही बातम्या मिळवण्याची यंत्रणादेखिल विस्तार पावली. पेशवाईत या हेर यंत्रणेचा चांगला विस्तार केला. कुणबिणी, आचारी, सेवेकरणी, विधवा स्त्रिया अशा विविध व्यवसायातील व परिस्थितील लोकांना त्यांनी या कामी लावले. अशा हेरांना 'नजरबाज' असे म्हटले जाई. अतिशय शोधक नजरेची व तत्पर सेवेची ही माणसे असत. मुंबई प्रमाणेच पुणे शहर हे देखिल पेशवाईच्या काळात 'घडामोडी'चे शहर बनले होते. त्यामुळे अशा शहरातील घडामोडीवर, बाहेरून येणाऱ्या व्यापाऱ्यांवर, इतर राज्यातील मुत्सद्यांवर 'नजर' ठेवण्याचे काम या 'नजरबाजां'कडे होते.[२०] अशा संशयास्पद हालचालींचा मागोवा

घेऊन त्यासंबंधी राजांना 'अवगत' करणारी यंत्रणा निर्माण करणे ही त्याकाळची आवश्यकताच होती.

नव्या ज्ञानाविषयी, नव्या तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता निर्माण होण्यामध्ये तत्कालीन सामाजिक स्थिती कारणीभूत ठरली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## १०. भारतात मुद्रणकलेचा प्रवेश ः

भारतामध्ये मुद्रण कलेचा प्रवेश सोळाव्या शतकात झाला. युरोपात मात्र याआधी १०० वर्ष म्हणजेच १५ व्या शतकातच मुद्रण कला विकसित झालेली होती.[२१] असे असूनही इंग्लंडमध्ये वृत्तपत्रांवी सुरूवात १६२१ मध्ये झाली.[२२] त्यानंतर ४० वर्षांनी ईस्ट इंडिया कंपनीने व्यापाराच्या हेतूने मुंबई बंदरात प्रवेश केला. सन् १६६१ ते १७५७ पर्यंत म्हणजे प्लासीच्या लढाईपर्यंत च्या कालखंडातील राजकीय उलथापालथी नंतर हिंदुस्थानची सत्ता इंग्रजांच्या ताब्यात जाऊ लागली. मुळातच भारत हा अनेक स्थानिक राजांच्या अधिपत्याखालील छोट्या-छोट्या राज्यांच्या तुकड्यामध्ये अस्तित्वात होता.[२३] एकसंघ राष्ट्र ही जाणीवही त्याकाळी नव्हती. त्यामुळे इंग्रज हे परकीय आहेत, त्यांच्या हाती देशाची सत्ता जाऊ देता कामा नये ही राजकीय प्रगल्भता त्याकाळी नव्हती. राजकीय यंत्रणा कोलमडलेली, आर्थिक मागासलेपण असल्याने हा पायाही निकामी झालेला होता. संपूर्ण भारतात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झालेली नसल्याने इंग्रजांना विरोध झालाच नाही. याचा स्वाभाविक परिणाम म्हणून इंग्रजी सत्ता या देशात सुस्थापित झाली.[२४]

इंग्रजांनी आपल्याबरोबर आधुनिक साधने आणली, आधुनिक विचार आणले. खुद्द इंग्लंडमध्येही तोपर्यंतच्या काळात वृत्तपत्रे प्रस्थापित झाली होती.[२५] व्यापार आणि धर्मप्रसार यावरच प्रारंभी भर देण्यात आला असल्याने वृत्तपत्रे सुरू करण्याची आवश्यकता भासली नसावी. लोकमत आजमावण्याची वा ते प्रकट करण्याची फारशी गरज निर्माण झाली नाही. आधी व्यापार वाढवायचा आणि त्यानंतर धर्मप्रसार व राज्यविस्तार करायचा

ही अटकळ तत्कालीन वसाहतवादी देशामध्ये नियमितपणे वापरली जायची. इंग्रजांचीही तीच नीती होती.

२९ जानेवारी १७८० रोजी 'बेंगाल गॅझेट' या नावाने भारतातील पहिले वृत्तपत्र जन्माला आले आणि वृत्तपत्रांवर चर्चा, वृत्तपत्रांचा विकास होऊ लागला. त्यातूनही वृत्तपत्रे आणि वृत्तपत्रकारांची समाजाशी बांधिलकी मान्य होऊ लागली. प्रसिध्द पाश्चात्य पत्रकार पॉल स्कॉट याबाबत म्हणतो, 'A journalist may be fervent patriot, an enthusiastic party member, a faithful employee but at the same time in his journalistic function, his first loyalty is not to country party or paper, but his readers' [२६]

## ११. भारतातील वृत्तपत्रांचा प्रारंभ ः

माणसाची वृत्ती मुळात चौकस आहे. आजूबाजूला घडणाऱ्या घटनांबद्दलचे कुतुहल ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. मानवी स्वभावाच्या या विलक्षण वैशिष्ट्यामुळेच तो 'बातमी' मिळवण्यासाठी प्रवृत्त झाला. कोणत्याही क्रांतीचा प्रारंभकाळ हा नकळतच होत असतो. हळूहळू क्रांतीच्या कक्षा रूंदावत जातात आणि प्रभावही वाढत जातो. मुद्रण क्रांतीचेही असेच झाले. या मुद्रणक्रांतीचा प्रारंभकाळ हा मोठा त्रासदायक आणि वेळखाऊ होता. साधारणतः १६ व्या शतकात मुद्रणकलेचा भारतात प्रवेश झाला. १६६१ साली मुंबईचा इलाका इंग्रजांच्या अंमलाखाली आला. हळूहळू पुढल्या शंभर-दिडशे वर्षा त हा अंमल संपूर्ण देशात पसरत गेला. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजांची भारतावरील पकड अधिक मजबूत आणि प्रभावी झाली. नोव्हेंबर १७८० मध्ये पिटर रीड व बी मेन्सिक यांनी 'इंडिया गॅझेट' सुरू केले. पुढे १७८४ मध्ये 'कलकत्ता गॅझेट' सुरू झाले. फेब्रुवारी १७८५ साली 'बेंगाल जर्नल', १७८६ साली 'कलकत्ता क्रॉनिकल' अशी

अनेक वृत्तपत्रांची जणू साखळीच सुरू झाली. या पहिल्या टप्प्यातील पत्रांचे वैशिष्ट्य असे की, ही सर्व वृत्तपत्रे बंगालमध्येच सुरू झाले.

मुंबईमध्ये वृत्तपत्रांची सुरूवात होण्याला १७८९ साल उजाडावे लागले. वास्तविक पाहता मुंबई इलाक्यात ब्रिटीशांचा अंमल याआधी शंभर वर्षे सुरू झालेला होता. त्यामानाने वृत्तपत्रांची सुरूवात फारच उशिरा झाली. १७८९ मध्ये मुंबईत 'बॉम्बे हेरॉल्ड' या नावाने मुंबईतील पहिले वृत्तपत्र सुरू झाले. बंगालमध्ये दिनांक २३ मे १८१८ रोजी 'समाचार दर्पण' हे बंगाली भाषेतील पहिले पत्र सुरू झाले. त्यानंतर १८२१ मध्ये राजाराम मोहन रॉयनी 'संवाद कौमुदी' सुरू केले.

## १२. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर एक दृष्टीक्षेप ः

याच कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात विविध जिल्ह्यात निघालेल्या प्रमुख वृत्तपत्रांचा एकत्रित ठोकताळा पुढील चौकटीत मांडला आहे. यातून मराठी वृत्तपत्राची वाटचाल महाराष्ट्र व्यापी कशी होती याचा अंदाज सहजपणे येऊ शकतो.

| क्र. | वृत्तपत्र | प्रकाशन | संपादक | वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|
| १. | दर्पण | ६ जानेवारी १८३२ | बाळशास्त्री जांभेकर | मराठीतील पहिले वत्तपत्र |
| २. | मुंबई अखबार | ४ जुलै १८४0 | | 'दर्पण'यात विलीन झाले. |
| ३. | प्रभाकर | २४ ऑक्टोबर १८४१ | भाऊ महाजन | जांभेकरांचे सहकारी |
| ४. | ज्ञानसिंधू | ७ फेब्रुवारी १८४२ | विरेश्वर ऊर्फ तात्या छत्रे | मुलांसाठी स्वतंत्र विभाग यांनी सुरू केला. |
| ५. | ज्ञानप्रकाश | १२ फेब्रुवारी १८४९ | कृष्णाजी त्रिंवक रानडे | १0३ वर्षे चालले |
| ६. | ज्ञानप्रसारक | १८५३ च्या सुमारास | | कोल्हापुरातून निघाले |
| ७. | वर्तमान संग्रह | १८५३ च्या सुमारास | | कोल्हापुरातून निघाले |
| ८. | शूभ सूचक | १0 डिसेंबर १८५८ | रामचंद्र आप्पाजी चितळे | साताऱ्यातील पहिले पत्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | वृत्तवैभव | ८ डिसेंबर १८६१ | खंडेराव बाळाजी | पंचांग आणि बाजारभाव |
| १0. | मालवा अखबार | ६ मार्च १८४९ | इंदूर – ग्वाल्हेर मधून प्रकाशित. मराठी, हिंदी, उर्दू अशा तिन्ही भाषेत. १८७३ पासून फक्त मराठीतून. | |
| ११. | पूर्ण चंद्रोदय | १८६१ | वासूदेव बल्लाळ मुळ्ये | मध्य भारतातील १ ले मराठी |
| १२. | देश सुधारेच्छु | १८६१ | | गोव्यातील मराठी पत्र |
| १३. | निबंधमाला | १८७४ | विष्णूशास्त्री चिपळूणकर | मासिक |
| १४. | इंदुप्रकाश | २ जानेवारी १८६२ | विष्णूशास्त्री पंडित | मुंबईतून निघाले. |
| १५. | सुबोध पत्रिका | ४ मे १८७३ | द्वारकानाथ वैद्य | प्रार्थना समाजाचे मुखपत्र |
| १६. | अरूणोदय | २२ जुलै १८६६ | काशिनाथ विष्णू फडके | ठाण्यातील पहिले पत्र |
| १७. | सूर्योदय | | गोपाळ गोविंद दावक | अरूणोदयशी स्पर्धा म्हणून |
| १८. | दीनबंधू | १ जानेवारी १८७७ | कृष्णराव भालेकर | प्रारंभी पुणे नंतर मुंबई |
| १९. | सत्वसदन | १८७0 | रावजी हरि आठवले | कुलाबा (रायगड) |
| २0. | जगमित्र | १८५४ | | रत्नागिरी |
| २१. | सत्यशोधक | नोव्हेंबर १८७१ | जरि नारायण लिमये | शंभरी पार केलेले पत्र |
| २२. | वेंगुर्ले वृत्त | १८७५ | विठ्ठल गोविंद बाण्वलीकर | लोकमतमध्ये विलीन |
| २३. | नासिक वृत्त | १८६९ | त्र्यंबक हरि काळे | णासिक |
| २४. | नासिक सनाचार | १८७५ | जरि विष्णू सहस्त्रबुध्दे | णासिक |
| २५. | खानदेश वैभव | १८६८ | बळवंत जनार्दन करंदीकर | खानदेशचे पहिले पत्र |
| २६. | आर्यावर्त | ५ ऑगस्ट १८७६ | के मो पंडित | धुळ्याचे २ रे साप्ताहिक |
| २७. | महाराष्ट्र मित्र | १८६८ | गणेश ना. कोल्हटकर | प्रसिध्द नट चिंतामणराव कोल्हटकरांचे वडिल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८. | 'कल्पतरू' | १८६७ | आण्णाजी गो. इनामदार | सोलापुरातील १ ले पत्र |
| २९. | 'आनंदवृत्त' | – | बळवंत नारायण काकडे | सोलापुरातून सुरू झाले. |
| | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या दोन्ही पत्रांचे संपादक इंदापूर भागातील. १८७४–१८७५ पासून ही दोन पत्रं एकत्र होऊन 'कल्पतरू' 'आनंदवृत्त' अशा जोड नावानी प्रकाशित होऊ लागले. बळवंत नारायण काकडे यांनी ते पुढे चालविले. शंभरी पार केलेले हे पत्र होते. | | | |
| ३०. | आनंदलहरी | १८७० | | गोव्यातील १ ले मराठी पत्र |
| ३१. | वऱ्हाड समाचार | १८६७ | खंडेराव फडके | वऱ्हाडातील १ले मराठी पत्र |
| ३२. | वैदर्भ | १८७० | त्रयंबकराव मुधोळकर | अकोला |
| ३३. | मराठा | २ जानेवारी १८८१ | लोकमान्य टिळक | निव्वळ इंग्रजीभाषेतील |
| ३४. | केसरी | ४ जानेवारी १८८१ | गोपाळ गणेश आगरकर | |
| | | विष्णूशास्त्री, टिळक, आगरकर, वामनराव आपटे, नामजोशी व डॉ गर्दे अशा सहा जणांनी मिळून केसरी व मराठा ही पत्रे चालू केली. १९०८ नंतर केसरीचे संपादक म्हणून कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, नंतर न चिं केळकर १९२० पासून संपादक. | | |
| ३५. | सुधारक | १५ ऑक्टोबर १८८८ | गोपाळ गणेश आगरकर | केसरीतील फाटाफुटीनंतर आगरकरांनी काढले. |
| ३६. | काळ | १५ मार्च १८९८ | शिवराम महादेव परांजपे | केसरीच्या प्रभावाबाहेरील पत्र |
| ३७. | गुराखी | १८९७ | नारायण भाट्ये | मुंबईतून निघत होते. |
| ३८. | भाला | ५ एप्रिल १९०५ | भास्कर बळवंत भोपटकर | केसरीच्या प्रभावळीतील पत्र |
| ३९. | राष्ट्रमत | २९ जून १९०८ | सीताराम केशव कपाले | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | वंदे मातरम् | ६ जानेवारी १९०८ | जरि रघुनाथ भागवत | वंदे मातरम् चळवळीवरून |
| **सोलापूर जिल्ह्यातील वृत्तपत्रे** | | | | |
| १. | ‘कल्पतरू’ | १८६७ | आण्णाजी गोविंद इनामदार | |
| २. | ‘आनंदवृत्त’ | – | बळवंत नारायण काकडे | |
| ३. | सुदर्शन | १८७८ | संपादक कोण, किती दिवस चालले याची नेमकी माहिती उपलब्ध नाही. | |
| ४. | पंढरी मित्र | | गोविंद सखाराम बिडकर | पंढरपुरातून निघत होते. |
| ५. | ‘सोलापूर समाचार’ | ३ फेब्रुवारी १८८५ | नरसय्या अंबण्णा जक्कल | १९३० साली दैनिकात रूपांतर, रॉयटरच्या बातम्या देणारे पुणे मुंबईनंतरचे पहिले दैनिक |
| ६. | प्रबोधरत्न | १८८५ | बार्शी | |
| ७. | पंढरी भूषण | १८८७ | पंढरपूर | |
| ८. | सोलापूर वृत्त | १८८८ | सोलापूर | |
| ९. | व्यापारी सोलापूर | १८९२ | सोलापूर | |
| १०. | चिंतामणी | १८९९ | | |
| ११. | सहस्त्रकर | १९०५ | | |
| १२. | विद्यावैभव | १९०५ | | |
| १३. | शिवाजी विजय | १९०९ | | |
| १४. | मनोविहार | १० जानेवारी १८८८ | श्रीनिवास ना. काकडे | अग्रलेख वा स्फुटे नसत |
| १५. | स्वराज्य | १९०७ | बळवंत शंकर लिमये | २० जून १९०८ रोजी लिमयेंना राजद्रोहाची शिक्षा झाल्याने बंद पडले. |
| १६. | ‘गजनफर’ | १९२७ | अब्दुल रसूल कुर्बान | ब्रिटीश सरकारने दिनांक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | हुसेन | १२ जानेवारी १९३० रोजी फाशी दिल्याने बंद पडले. कुर्बान हुसेन हे सोलापूरच्या चार हुतात्म्यांपैकी एक होत. |
| १७. | 'कर्मयोगी' | १९२४ | राजवाडे | |

सोलापुरातील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त,' 'सोलापूर समाचार', 'गजनफर' आणि 'कर्मयोगी' अशा चारही वृत्तपत्रांच्या निर्मितीची कहाणी वेगळी आहे. तसेच प्रत्येकाच्या निर्मिती मागची प्रेरणाही वेगळी आहे. इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याला जेमतेम दहा वर्ष झाली असतील नसतील तेंव्हा सोलापुरातील आद्य पत्र 'कल्पतरू' चा प्रारंभ झाला. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेच्या वर्षातच 'सोलापूर समाचार'चा जन्म झाला. पुढे इ.स.१९२४ साली 'कर्मयोगी' आणि इ.स.१९२७ साली 'गजनफर' ही दोन पत्रे सुरू झाली. या दोन्ही पत्राची वैशिष्ट्ये म्हणजे या दोन्ही पत्राचे संपादक व निर्मा ते प्रथम राजकीय क्षेत्रात समर्थपणे वावरणारे कार्यकर्ते होते. स्वातंत्र्य लढ्यात दोघांचेही स्वतंत्र स्थान आहे.

वृत्तपत्राच्या निर्मितीला निश्चित अशी सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी असतेच. किंबहुना या सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीचा स्वाभाविक अविष्कार म्हणूनही वृत्तपत्रांसारखे माध्यम उदयाला येते. सोलापुरातील वृत्तपत्रांच्या उदयाला अशीच काही परिस्थिती कारणिभूत ठरली असे म्हणायला भरपूर वाव आहे. सोलापूर जिल्ह्याचे सामाजिक व राजकीय तसेच व्यापारीदृष्ट्या महत्वही मोठे होते. म्हणूनच ही वृत्तपत्रे तुलनेने लवकर उदयास आली व स्थिरावलीदेखिल. त्यामुळे सोलापूरची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी पाहणे अगत्याचे ठरेल.

## १३. सोलापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी ः

सोलापूर हे महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रपदेशच्या सीमेवर वसलेले शहर आहे. सोलापूर जिल्हा ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या संपन्न आहे. पुरातत्वीय दृष्टीकोनातूनही या जिल्ह्याचे महत्व आहे. वृत्तपत्रांच्या निर्मितीसाठी निश्चित अशी एक सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी लागते. ही पार्श्वभूमी ज्या ऐतिहासिक मुशीतून निर्माण झाली ती पाहणे संयुक्तिक ठरेल. सोलापूरचा ज्ञात असलेला इतिहास इ.स. पूर्व ९० सालापासून उपलब्ध आहे. सोलापूर शहर हे इ.स. पूर्व ९० ते इ.स.३०० पर्यंतच्या काळात पैठण राजधानी असलेल्या शातकर्णी उर्फ आंध्रभृत्य राजाच्या ताब्यात होते.[२७] याचाच अर्थ सोलापूर शहर हे महाराष्ट्रातील प्रमुख मुलुखांपैकी एक होते. पुढे चालुक्य, राष्ट्रकुट त्यानंतर नवोदित चालुक्यांपर्यंत म्हणजे इ.स. ११८४ पर्यंतचा काळ या तीन घराण्यांच्या अंमलाखाली होता.

मौर्य, सातवाहन, गुप्त काळातील राजाचे शिलालेख अथवा मंदिर–स्थापत्य अवशेष मिळाले नाहीत. सोलापूरच्या इतिहासाचे लिखित साधन बदामीचा राजा चालुक्य कीर्तीवर्मन द्वितीय इ.स. ७४५ ते ७५७ चा ताम्रपट मिळाला आहे. हा ताम्रपट वक्कलेरी ताम्रपट म्हणून ओळखतात.[२८] विक्रमादित्य ६ व्याच्या मृत्यूनंतर चालुक्यांच्या सत्तेचा ऱ्हास झाला. तैल तृतीय हा बदामीच्या चालुक्यांचा शेवटचा राजा होता. बदामीच्या चालुक्याचा सेनापती बिज्जल कलचुरीने तैलतृतीयांचा पराभव केला आणि कलचुरीची सत्ता स्थापन केली.[२९] कलचुरी हे मूळचे मध्यप्रदेशातील होत. कलचुरी हे चेदी वंशापैकी एक असावेत. कलचरीच्या चेदी घराण्याची सत्ता मंगळवेढा परिसरात होती. कल्याणीचे चालुक्य आणि कलचुरीचे चेदी यांचे रक्ताचे संबंध होते. चालुक्यांकडूनच चेदी यांना सत्ता मिळाली.[३०] याचाच अर्थ सोलापूरच्या परिसरात सातवाहन, राष्ट्रकूट, बदामीचे चालुक्य, कल्याणीचे चालुक्य, कलचुरीचे चेदी यांची सत्ता होती. मध्यप्रदेशातील चेदी घराणे अज्ञात कारणांमुळे दक्षिणेत मंगळवेढा परिसरात

स्थिरावले.[३१] मंगळवेढ्यातून चेदी घराण्याचा विस्तार झाला. बिज्जल देवांच्या दरबारात महात्मा बसवेश्वर हे होते.[३२] महात्मा बसवेश्वरांचा कार्यकाल इ.स.११०५ ते इ.स.११६७ असा होता. महात्मा बसवेश्वरांचे कार्याचा प्रभाव आजही कर्नाटक आणि सोलापूर परिसरात दिसून येतो.

कल्याणीच्या चालुक्यानंतर कलचुरीच्या चेदीकडे सत्ता राहिली. बिज्जल देव द्वितीयने गंडरादित्य शिलाहारावर स्वारी केली. कल्याणीचे चालुक्य शिलाहार याजबरोबर हक्कलच्या कदंबावरही हल्ला केला. हक्कलच्या कदंबावर दोन स्वाऱ्या केल्याचा उल्लेख सोलापुरात सापडलेल्या शिलालेखावरून येतो.[३३] शिलहाराच्या महाराष्ट्रात १०–१२ शाखा असल्याचा उल्लेख येतो. त्यापैकी सर्वात जुनी शाखा अंकुलगे शिलाहार ही होती. असा उल्लेख अक्कलकोटच्या शिलालेखात नमूद आहे. सोलापूरचा पहिला उल्लेख इ.स.११३५ च्या शिलालेखात येतो.[३४] हामंडलेश्वर कलचरी बिज्जलदेव यांच्या राजवटीत सोनल्लिंग या गावात कन्नपय्या हा त्याचा अधिकारी होता. याच शहराचा उल्लेख इ.स.१६१६ मध्ये सोनलीपूर आणि आदिलशहाच्या काळात संदलपूर असा आढळतो.

इ.स. १४ व्या शतकाच्या पूर्वार्धातच देवगिरीच्या यादवांचा मुसलमानी आक्रमकांकडून पराभव झाला. दक्षिणेवर मुसलमानी अंमल सुरू झाला. दौलताबाद ही जणू दक्षिणेतील त्यांची राजधानी बनली. लुटालूट, जाळपोळ, नासधुसीच्या या काळ्याकुट्ट अंधाराला पहिल्यांदा छेद दिला तो हसनगंगू बहामनी याने. गुलबर्ग्यातून त्याने बहामनी राज्याची स्थापना केली. स्वाभाविकपणे सोलापूर बहामनी राजवटीखाली आले. सन् १३५८ ते १३७५ ही महमदशहा बहामनी याची कारकीर्द जनतेस अत्यंत सुखावह गेली.[३५] व्यापार उदीम वाढला, सुबत्ता आली. याच काळात सोलापूरचा किल्ला बांधला गेला असावा असा कयास आहे.[३६] बहामनीच्या काळात इ.स.१३९६ ला सोलापुरात पडलेल्या दुष्काळाचे वर्णन दुर्गादेवीचा दुष्काळ असे केले जाते. या

दुष्काळामुळेच सोलापुरातील व्यापार-उद्योग विस्ताराच्या वाढीला मर्यादा आल्या. या दुष्काळाचा प्रभाव सोलापूर शहरावर ५० वर्ष जाणवला. इ.स.१४५० पासून सोलापूरच्या विस्तार व विकासाला चालना मिळाली.[३७] देवगिरीच्या यादवाची सत्ता इ.स.१३१८ साली संपली. इ.स.१३२६-१३२७ ला दिल्लीहून देवगिरीला राजधानी स्थलांतरीत करण्यात आली. देवगिरीचे नामांतर संपत्तीचे केंद्र म्हणून दौलताबाद असे करण्यात आले. बहामनी राज्याचे राज्यकारभारासाठी आठ विभाग करण्यात आले पुढे त्याचेच स्वतंत्र राज्य बनले. कारण बहामनी राज्य कमकुवत बनले. त्यातून गुलबर्गा, विजापूर, कल्याण, बिदर असे स्वतंत्र राज्ये वेळोवेळी स्थापन झाली. भौगोलिकदृष्ट्या सोलापूर या सर्वांच्या मध्यावर येत असल्याने कधी विजापूरकरांच्या तर कधी अहमदनगरकरांचा सोलापूरवर अंमल चाले. सोलापुरात किल्ला असल्याने या लढायांची झळ सतत बसत होती.

दिल्लीच्या मोगलांनी दक्षिणेवर स्वारी करून इ.स.१५९९ साली अहमदनगर जिंकले. पण त्यातूनही नगरचा दिवाण मलिकचंदने मोगलांकडून काही प्रदेश सोडवून घेऊन आपली सत्ता स्थापन केली. औरंगाबाद ही राजधानी केली. इ.स.१६२३ मध्ये मलिकचंदने सोलापूर जिंकून घेतले. पण इ.स.१६३६ मध्ये विजापूरकरांशी केलेल्या तहात सोलापूर विजापूरकरांना बहाल केले. मोगलांनी पुन्हा आदिलशाहीवर चढाई केली तेंव्हा इ.स.१६८८ मध्ये सोलापूर मोगलांना बहाल केले.[३८] औरंगजेबाच्या मृत्यूनंतरही ते मोगलांच्या ताब्यात होते. त्यानंतर हैद्राबादच्या निजामाच्या ताब्यात गेले. पुढे इ.स.१७५८ च्या आसपास नानासाहेब पेशव्यांनी येथिल किल्लेदारांशी संधान साधून किल्लेदारास रू २५००० देऊन किल्ला ताब्यात घेतला. सन् १८१८ ला ब्रिटिशांनी हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यातून घेईपर्यंत म्हणजे जवळपास ५० वर्ष हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता.

दिनांक १६ फेब्रुवारी १८१८ ला ब्रिटिश सेनापती जनरल स्मिथ व मराठ्यांचा शेवटचा पेशवा बाजीराव दुसरा यांच्यात भीमा नदीकाठावर आष्टे या गावी लढाई झाली. या लढाईत मराठ्यांचा पराभव होऊन ब्रिटिशांनी सोलापूर जिंकले. सोलापूर शहर जिंकण्यासाठी मात्र ब्रिटिशांना आणखी तीन महिने मेहनत घ्यावी लागली. दिनांक १५ मे १८१८ ला मएाठ्यांनी शरणागती पत्करली. सोलापूर जिल्हा म्हणून पहिल्यांदा अस्तित्वात आला तो सन् १८३८ साली. पुढे जवळपास तीस वर्षांनी जिल्ह्याची पुनर्रचना करण्यात आली आणि स्वातंत्र्यानंतर १९४९ साली सोलापूरचे विलीनीकरण महाराष्ट्र राज्यात करण्यात आले. याचाच अर्थ सन् १८१८ ते १९४८ असे सव्वाशे वर्ष सोलापूरवर ब्रिटिशांची सत्ता होती.

थोडक्यात, शातकर्णीपासून चालुक्य, राष्ट्रकुट, पुन्हा चालुक्य, मुसलमानी आक्रमणानंतर मुघलांकडे, कधी अहमदनगरचा निजाम, कधी विजापूरचा आदिलशहा, हैद्राबादच्या निजामाकडून मराठ्यांकडे अशी सोलापूरची मालकी बदलत गेली. त्यामुळे सोलापूरच्या विकासाला पोषक असे वातावरण कधी निर्माण झालेच नाही. तीन राज्यांच्या सीमावर्ती भागात असल्यांने तेलुगु व कानडी संस्कृतीचा प्रभाव, मराठवाड्याशी निगडीत असल्याने काही व्यापाराच्या संधी निर्माण झाल्या परंतु त्या शाश्वत स्वरूपात रूपांतरीत करण्यासाठी योग्य अशी शासन व्यवस्था इथे नव्हती.

### १४. सोलापूरचा इतिहास ः

सोलापूरचा इतिहास वृत्तपत्रांच्या उदयाला अधिक कारणिभूत ठरला. सन् १८१८ ते सन् १९४७ अशा १३0 वर्षांच्या ब्रिटीशांच्या राजवटीत सोलापुरात अनेक बदल झाले. सोलापूर हे एक गांव म्हणूनच त्यावेळी गणले जात होते. इ.स.१८५२ पर्यंत सोलापूरचा उल्लेख 'कसबा' म्हणूनच केला जायचा. इ.स.१८१८ ते १८५२ पर्यंत सोलापूर शहर केवळ २२५ एकरावरच वसलेले होते. या सव्वादोनशे एकरात ३६00 घरे होती.

इ.स.१८५२साली सोलापूर नगरपालिकेची स्थापना झाली आणि शहर म्हणून अस्तित्वात येऊ लागले. अनेक पेठा स्थापन झाल्या. याच काळात ए डब्ल्यू गोल्डफिंच हे जिल्हाधिकारी म्हणून रूजू झाले त्यामुळे त्यांच्याच नावाने गोल्डफिंच पेठ स्थापन झाली. त्यानंतर मंगळवार पेठ, सोमवार पेठ अशा पेठा स्थापन झाल्या. तरीही इ.स.१८७४ सालापासूनच सोलापूरकडे शहर म्हणून पाहिले जाऊ लागले.[३९] सोलापूरच्या नागरी जीवनाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला तो इ.स.१८७४ पासूनच. शिक्षणाचे प्रमाण वाढले, नगरपालिकेच्या माध्यमातून शाळा सुरू झाल्या. सामाजिक संस्थांची संख्या वाढायला लागली. कापड गिरण्यांमुळे कामगारांची संख्या वाढली. आर्थिक स्तर वाढल्याने क्रय शक्ती वाढायला लागली. नगरपालिकेमुळे नागर जीवनशैली वाढायला लागली. दरम्यानच्या काळात मुंबई व पुण्यामधून वृत्तपत्रे निघायला लागली होती. देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचे रणशिंग अन्य शहरांमधून फुंकले जाऊ लागले. सोलापूरच्या नागरिकांमध्येही स्वातंत्र्याची ऊर्मी निर्माण होऊ लागली. स्वातंत्र्य लढ्यातील सोलापूरचा सहभागाबद्दल प्रकरण क्र. एकमध्ये विस्ताराने उल्लेख केला आहेच. ही सर्व पार्श्वभूमी वृत्तपत्रांच्या निर्मितीला कारणिभूत ठरली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**१५. सोलापुरातील वृत्तपत्रांचा उदय ः**

स्वातंत्र्याची चळवळ सर्वव्यापी होण्यामध्ये तत्कालीन वृत्तपत्रांची मोठी भूमिका होती. सोलापुरात वृत्तपत्रांचा उदय होण्यात राजकीय व सामाजिक परिस्थिती कारणीभूत होती, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण वृत्तपत्रे ही समाजजागृतीसाठीच जन्माला येतात. समाजाची विचारधारा सुनिश्चित करण्यात व समाजवर्तन घडविण्यात वृत्तपत्रे अग्रेसर झाली. विशेष म्हणजे भारतातील वृत्तपत्रांचा उदय हा पारतंत्र्यातच झालेला होता. समाजातील प्रत्येक घडामोडी आणि होणारे चढउतार याचेच प्रतिबिंब वृत्तपत्रात उमटत असते. समाजजीवनाचे छापील स्वरूप म्हणजे वृत्तपत्रे होत. वृत्तपत्रांची

ही जन्मदत्त भूमिकाच वृत्तपत्रांच्या विकासाला आणि प्रसाराला कारणिभूत ठरली. "एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील घडामोडींनी नवभारताचा आणि नव महाराष्ट्राचा पाया घातला. 'इंग्रजी शिक्षण' हा तरी पाया होताच पण त्याच्या जोडीला दळणवळणची साधने, उद्योगधंदे आणि विचार, प्रचाराची साधनेही लक्षात घेतली पाहिजेत. रेल्वे, वृत्तपत्रे आणि कारखानदारी यांनी केवळ भौगोलिक जवळीक साधली असे नसून नवे संवाद घडून जीवनाला नवी वळणेही दिली. नव्या नेतृत्वाने त्याचा अंगिकार केला आणि प्रबोधनाच्या परिवर्तनवादी पर्वास प्रारंभ झाला. त्यातही वृत्तपत्रांचे कार्य फारच मोलाचे आहे. नेणिवेतून जाणीवेकडे आणि जागृतीतून कृतीकडे, नवनिर्मितीकडे जनमानसाची वाटचाल व्हावी म्हणून वृत्तपत्रांनी बातमीपत्र, माहितीपत्र, विचारपत्र, समीक्षापत्र अशा अनेक भूमिका समर्थपणे सांभाळलेल्या आहेत. स्वातंत्र्य चळवळ आणि वृत्तपत्र विकास अलग करणे अशक्य आहे."[४०] त्यामुळेच सोलापूरच्या स्वातंत्र्य चळवळीचा आणि वृत्तपत्रांच्या विकासाचा अभ्यास एकत्रितच केला जाऊ शकतो. या दोन्ही गोष्टी 'कारण–परिणाम' अशा स्वरूपाच्या आहेत. "१९ वे शतक उजाडले त्याला सर्वार्थाने चमत्कार युग म्हणता येईल. छापण्याच्या कलेचा शोध वृत्तपत्राच्या वाढीचा कणा ठरला. वृत्तपत्रामध्ये छपाई यंत्रे व अन्य तांत्रिक साधनांची जसजशी वाढ होत गेली तसतसा वृत्तपत्रीय क्षेत्रात बदल होत गेला."[४१] वृत्तपत्रामध्ये छपाई तंत्राने क्रांती आणली असली तरी वृत्तपत्रांच्या निर्मितीचे ते कारण नव्हते. वृत्तपत्राच्या उदयाला कारणीभूत ठरली ती १९ व्या शतकातील सामाजिक व राजकीय परिस्थिती! "१७८० मध्ये 'हिकीज गॅझेट' निघाले आणि भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा जन्म झाला. इतर सर्व सुधारणांप्रमाणेच या सुधारणेचेही पितृत्व इंग्रजांकडेच जाते. हे खरे पण पुढे भारतीयांनी विशेषतः स्वातंत्र्य प्राप्तीसाठी या साधनाचा ज्या तऱ्हेने वापर करून घेतला तो संस्मरणीय इतिहास होय."[४२] ज्ञानोदयाच्या एका अंकात म्हटले आहे की, "वृत्तपत्रांनी लोकांचे एकमत होते. राजास लोकांचे बोभाट कळतात व लोकांना माहितगारी होते व झोपेत इकडचे

लोक आहेत ते जागृत होतील." याचाच अर्थ असा की, समाजामध्ये जागृती घडावी नवा 'ज्ञान प्रकाश' पसरावा. आपला देश म्हणजे काय, पारतंत्र्य म्हणजे काय, स्वातंत्र्य म्हणजे काय, या विषयीची स्पष्ट कल्पना यावी, गाढ अज्ञानाच्या, भोळेपणाच्या अंधःकारात निद्रीस्त झालेल्या समाजाला जागे करण्यासाठी वृत्तपत्राची निर्मिती झाली. लोकशिक्षण याच सामाजिकतेतून ती उदयास आली. 'इंग्रज कोण? कसा आला? आपण कोण? कसे आहोत? कसे होतो? कसे होऊ इच्छितो? या प्रश्नांची पेरणी करण्याइतपत मशागत या प्रथम पिढीतील सुशिक्षितांनी केली. दिशा अनेक होत्या. प्रयत्न विविधांगी होते. पण त्या सर्वांनी मुख्य साधन 'वृत्तपत्र' हाती धरले. संपादक समाजनायक झाला. शब्द शस्त्र झाले. ज्ञान नव विचारांचा पाया झाला.'[४३]

याचाच परिणाम म्हणून १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून स्वातंत्र्य चळवळी आणि वृत्तपत्रे यांचा विकास समांतर होत गेला. ६ जानेवारी १८३२ ला पहिले मराठी वृत्तपत्र 'दर्पण' हे बाळशास्त्री जांभेकरांनी काढले आणि मराठी वृत्तपत्रांचा श्रीगणेशा केला झाला.[४४] अल्पावधीतच वृत्तपत्रांचा विस्तार होत गेला. १८३२ पासून १९०८ पर्यंत निघालेल्या सुमारे ९० वृत्तपत्रात ३४ मराठी वृत्तपत्रे, ३१ गुजराती व बाकीची इतर अशी वर्गवारी दिसून येते. या काळात एक हजार प्रतींच्यावर निघणारी १४ वृत्तपत्रे होती. केसरी पत्राचा १८८२ सालचा खपाचा आकडा १८०० वरून ३५०० पर्यंत गेला होता.[४५]

इ.स.१८१८ मध्ये सोलापुरातील मराठा सत्तेचा शेवटचा सरदार गंगाधर पानसे व सरदार बापू गोखले यांचा जनरल मन्रोने पराभव केला. या पराभवानंतर जवळपास १८५८ पर्यंत म्हणजे चाळीस वर्ष सोलापुरावर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. इ.स.१८५८ पासून सोलापूरचा कारभार मुंबई प्रांताशी निगडीत झाला. सोलापुरात ब्रिटीशांची सत्ता असल्यामुळे औद्योगिकरण, व्यापारउदीम वाढण्यास चालना मिळाली. लोकशाही आणि उदारमतवाद ही मूल्ये इथे रूजण्यास मदतच झाली. संपूर्ण महाराष्ट्राला

व देशाला अभिमान वाटावा असा वृत्तपत्रांचा इतिहास सोलापूर जिल्ह्याला आहे. सोलापुरातील वृत्तपत्रांची परंपरा १५० वर्ष जुनी आहे.

## १६. सोलापुरातील प्रारंभीची वृत्तपत्रे ः

इ.स.१९३० ला सोलापुरात मार्शल लॉ लागू झाला. त्यानंतरच्या सहा महिन्यात सोलापुरातील चार तरूण देशभक्तांना फाशीची शिक्षा देण्यात आली. या बलिदानामुळे व त्याआधीच्या मार्शल लॉमुळे सोलापूरचे नांव संपूर्ण जगात पोहोचले. अर्थात ही देशभर पडसाद उमटवणारी घटना एका दिवसात घडली नाही. या घटनेची पार्श्वभूमी तयार होण्यासाठी लागणारी समाजजागृती, संघटना, संस्था आणि व्यक्ती यांची मानसिकता होणे खूप आवश्यकता असते. यासर्वांच्या बरोबरीने सोलापुरातील वृत्तपत्रांनी ही पार्श्वभूमी तयार केली. स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगणारं समाजमन घडविण्यात वृत्तपत्रांनी खूप महत्वाची कामगिरी बजावली. सोलापुरात प्रारंभी 'आनंदवृत्त', 'कल्पतरू', 'कल्पतरू' – 'आनंदवृत्त', या पत्रांनी सोलापुरातील पत्रसृष्टीचा श्रीगणेशा केला. शहराप्रमाणे सोलापूर जिल्हा परिसरातही काही पत्रे निघाली. इ.स.१८८५ मध्ये बार्शीतून 'प्रबोधरत्न', इ.स.१८८७ मध्ये 'पंढरीभूषण', सोलापूर वृत्त–१८८८, व्यापारी सोलापूर–१८९२, 'चिंतामणी'–१८९९, इ.स.१९०५ मध्ये 'सहस्त्रकार', याचवर्षी 'विद्यावैभव' हेही पत्र निघाले. इ.स.१९०९ मध्ये शिवाजी विजय, वारकरी अशी अनेक पत्रे सोलापुरातून निघाली.[४६] संपूर्ण देशभर आणि विशेषतः महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेली स्वातंत्र्य चळवळ, राजकीय जनजागृती आणि सामाजिक सुधारणांचे नवे वारे सोलापुरातही पोहोचले होते.या तप्त पार्श्वभूमी वर सोलापुरातील वृत्तपत्रांचा जन्म झाला.

## १७. सोलापूरचे आद्य वृत्तपत्र – 'कल्पतरू' ः

सोलापूर शहरही वर विषद केलेल्या पार्श्वभूमीपासून अलग नव्हते. स्वातंत्र्याकांक्षा आणि सुधारणावादी चळवळ या आधारावर चाललेल्या 'राष्ट्रीय' प्रवाहापासून सोलापूर अलग राहूच शकत नव्हते. रेल्वे, कापड गिरण्या आणि वृत्तपत्रे यांचा विधायक ठसा येथिल जनजीवनावर उमटलेला होता. सप्टेंबर १८६७ मध्ये 'कल्पतरू' हे साप्ताहिक सुरू झाले! सोलापूरचे हे आद्य वृत्तपत्र होय! वास्तविक पाहता सोलापूर येथे कै.आण्णाजी गोविंद इनामदार यांनी १८३२ च्या सुमारास 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' ही साप्ताहिके सुरू केली. कै.इनामदार हे मूळचे इंदापूरचे राहणारे. त्यावेळचे प्रसिध्द पुढारी श्री गोपाळ नृसिंह देशपांडे यांच्या सहकार्याने वरील दोन्ही वृत्तपत्रे सुरू केली. ती दोन्ही पत्रे आणि छापखाना कै.बाळकृष्ण नारायण तथा बळवंतराव काकडे यांना १८६७ साली बक्षीस म्हणून दिल्याचे कळते.[४७] कै.आण्णाजी इनामदार यांनी जरी आपली दोन्ही पत्रे १८३२ च्या सुमारास सुरू केली असली तरी १८६७ साली काकडे घराण्याकडे आल्यानंतर 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या दोन्ही पत्रावर स्थापनेचे साल १८६७ असे नमूद करण्यात आले. अन्यथा १८३२ साल गृहीत धरले तर दिनांक ६ जानेवारी १८३२ रोजी निघालेल्या 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राइतके महत्व व स्थान सोलापुरातील 'कल्पतरू'ला मिळाले असते.

'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' ही दोन्ही पत्रे काकडे घराण्याकडे का व कशी आली याचा इतिहास पडताळणेदेखिल अत्यंत रोचक आहे. काकडे घराणे हे मूळचे नगर जिल्ह्यातील नेवासे येथले.[४८] कालांतराने काही कारणाने ते नीरानरसिंगपुरास आले. काकडे कुटुंबियांची परंपरेने चालत आलेली भिक्षुकी वृत्ती होती. वेदाध्ययनी म्हणूनही ते प्रसिध्द होते. इंदापूर हे गांव नीरा नरसिंगपुरापासून जवळच आहे. तेथे सरदार देशपांडे हे छत्रपतींचे सरदार घराणे होते. या घराण्यातील श्री हणमंतराव देशपांडे यांनी काकडे यांना इंदापुरी आणले. तेथेच श्री आण्णाजी इनामदार यांच्याशी काकडे यांचा स्नेहसंबंध

जुळला. पुढे १८५६ च्या सुमारास बळवंतराव नारायण, श्रीनिवास नारायण व गोविंद नारायण हे तिन्ही काकडे बंधू अत्यंत विपन्नावस्थेत सोलापुरात आले. या तिन्ही बंधूंना सोलापुरातील श्रीमंत माईसाहेब कार्लेकर यांनी चांगला आधार दिला. जमीन दिली, घर दिले. काकडे बंधूंच्या कष्टाळू आणि प्रामाणिक स्वभावाचे हे फळ होते. अशा रितीने काकडे कुटुंब सोलापुरात स्थायिक झाले. त्यांच्या कष्टाळूपणाची, प्रामाणिकपणाची व व्यवहारी वागणुकीची कल्पना कै.आण्णाजी इनामदार यांना होती. इंदापूरपासूनचा स्नेह होता. त्यातूनच 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' ही दोन्ही पत्रे आणि छापखाना बळवंतराव काकडे चालवू शकतील अशी खात्री होती. त्यामुळेच १८६६ – १८६७ च्या सुमारास दोन्ही पत्रे आणि छापखाना बळवंतराव काकडे यांना विनामूल्य बक्षीस म्हणून मिळाला.[४९] आण्णाजी इनामदार हे त्यानंतर वृत्तपत्र व्यवसायातून निवृत्त झाले. या दोन्ही पत्राचे संपादक म्हणून बळवंतराव नारायण काकडे काम पाहू लागले. त्यामुळे 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या पत्रावर स्थापनेचा साल १८६७ असा नमूद करण्यात आला असावा.[५०]

### १८. कर्तृत्वसंपन्न काकडे घराणे ः

सन् १८६७ साली 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' चे संपादकत्व काकडे घराण्याकडे आले ते शेवटपर्यंत टिकले. काकडे घराण्याला प्रारंभापासूनच कष्टाळूपणाचे व प्रामाणिकपणाचे दैवी वरदान लाभले होते. इंदापूर जवळील नीरा नरसिंगपूरच्या भिक्षुकीवृत्तीपासून संपादकत्वापर्यंतचा काकडे घराण्याचा प्रवास हा थक्क करणारा आहेच. पण त्यांच्या कर्तृत्वाची छाप पाडणाराही आहे. बळवंत नारायण काकडे, श्रीनिवास नारायण व गोविंद नारायण काकडे या तिघांनीही कै. श्रीमंत माईसाहेब कार्ले कर यांचे प्रेम आणि कै.अण्णाजी इनामदार यांचा विश्वास संपादन केला. सन् १८९० साली बळवंतराव काकडे यांच्या निधनानंतर 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त'चे संपादक पद त्यांचे बंधू श्रीनिवास काकडे यांचेकडे आले. गोविंद नारायण काकडे यांनी काही काळ

महसूल खात्यात नोकरीही केली. पण श्रीनिवासरावांनी संपादकपदाची धुरा हाती घेतल्यानंतर कै.गोविंद काकडे यांनी महसूल खात्यातील नोकरी सोडून श्रीनिवासरावांच्या संपादकीय कामात मदत करू लागले.[५१] इ.स.१८६७ सालापासून बळवंतराव काकडेंनी 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त'ला एक व्यापक पाया उपलब्ध करून दिला. तीच व्यापकता श्रीनिवासराव यांनी आपल्या संपादकपदाच्या कारकिर्दीत कायम ठेवली. काही प्रमाणात वाढवली देखिल. शन् १९०३ साली श्रीनिवासराव काकडे यांचे निधन झाले. दरम्यानच्या काळात गोविंद नारायण काकडे यांनी संपादकीय विभागात काम करायला सुरूवात केली होतीच. स्वाभाविकपणे श्रीनिवासरावांच्या नंतर गोविंद नारायण काकडे यांच्याकडे संपादकपद आले. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त'चे हे तिसरे संपादक!

कै.गोविंद नारायण काकडे यांचे व्यक्तिमत्व बळवंतराव व श्रीनिवासराव या आपल्या बंधूंपेक्षा बहुआयामी होते. राजकीय व सामाजिक कार्यात त्यांनी प्रारंभापासूनच स्वतःला झोकून दिले होते. सन् १८८७ साली भरलेल्या मद्रास कॉंग्रेससाठी गोविंद नारायण यांची प्रतिनिधी म्हणून निवड झाली. राष्ट्रीय कॉंग्रेसचे ते सक्रीय पुढारी म्हणूनही ठळक कामगिरी बजवीत होते. पुढे १९०७ साली सुरतेमध्ये कॉंग्रेस अधिवेशनात लोकमान्य टिळकांचा जहाल गट आणि ना. गोखल्यांचा मवाळ असे दोन सरळ गट पडले. 'जहाल–मवाळ' हा वाद नव्याने सुरू झाला असे नाही. पण पहिल्यांदाच इतक्या तीव्रतेने प्रकट झाला. 'जहाल पक्षाची मते आपणास पेलू शकणार नाहीत म्हणून 'कल्पतरू' ने मवाळ विचारांची कास धरली.'[५२] गोविंद काकडे यांनी आपली संपादकपदाची कारकीर्द गाजवली ती आपल्या बाणेदार स्वभावाने आणि रोखठोक विचारांच्या लेखनाने! 'कल्पतरू' हे लोकप्रिय पत्र होण्यामध्ये गोविंद काकडे यांचा वाटा मोठा होता. यांच्या कारकीर्दीत 'कल्पतरू'वर काही अब्रुनुकसानीचे खटलेही भरले गेले. पण काकडे यांनी आपल्या बाणेदार वृत्तीला जराही आच येऊ दिली नाही. नंतर अक्कलकोट संस्थानबद्दल अतिशय निडरपणे 'वार्तापत्रे' चालवली. सन् १९२८ साली

'कल्पतरू' पत्राच्या षठ्यब्दीपूर्ती निमित्ताने 'सोलापूर समाचार' या आणखी एका पत्राने 'केसरी' चे संपादक न.चिं.तथा तात्यासाहेब केळकर यांच्या हस्ते सत्कार केला. ही घटनाच गोविंद काकडे आणि 'कल्पतरू'च्या सर्वव्यापीपणाची साक्ष देणारी आहे.[५३] सन् १९३४ साली गोविंदराव काकडे यांना देवाज्ञा झाली. पण तत्पूर्वी आपल्या हयातीतच आपले ज्येष्ठ चिरंजीव लक्ष्मणराव तथा तात्यासाहेब काकडे यांना संपादकपदाच्या खूर्चीवर बसविले. 'कल्पतरू' चे संपादकपद शेवटपर्यंत म्हणजे १९७४ पर्यंत ल.गो.काकडे यांच्याकडेच होते. लक्ष्मणराव काकडे यांनी आपल्या निर्भय लिखाणाने 'कल्पतरू' ला लोकप्रियता मिळवून देऊन वाचनीय केला यात शंका नाही.[५४]

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या निर्मात्यांनी प्रारंभापासूनच राष्ट्रीय स्तरावरील 'मवाळवादी' धोरणाची कास धरली. तरीही स्थानिक समस्या, प्रश्न, सामाजिक परिस्थिती यांच्याशीच आपली खरी नाळ जोडलेली होती. सोलापूर म्यूनिसिपालटीतही रा.ब.साठे, विनायकराव मुळे आदि मवाळ नेत्यांची बाजू उचलून धरण्यातही कधी कमीपणा मानला नाही. मवाळ वृत्ती, व्यावहारिक स्पष्टता, अफाट कष्ट उपसण्याची तयारी आणि आपण स्विकारलेल्या कामावर मनापासून निष्ठा या दैवी स्वभावामुळे 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' ला यश लाभले असे म्हटल्यास वावगे ठरू नये. सन् १८६७ ते १९७६ असे १0९ वर्ष अखंडपणे या पत्राचा प्रवास झाला.[५५] सर्वप्रकारच्या प्रतिकुलतेवर मात करीत सोलापूरसारख्या ठिकाणी हे पत्र इतके वर्ष चालविले गेले. यात काकडे घराण्यातील सर्वच संपादकांनी हे आव्हान पेलले.

'सोलापूरच्या इतिहासाचा अत्यंत विश्वासू, प्रामाणिक आणि साक्षेपी साक्षीदार असे 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' साप्ताहिक आहे. त्यांचे धोरण नेमस्त आणि सुधारणावादी होते. श्री.गोविंद नारायण काय किंवा लक्ष्मण गोविंद काय साप्ताहिकाचे धोरण तेच होते. सामाजिक तळमळीपोटी तोटा सहन करून त्यांनी साप्ताहिक चालविले आणि

अशक्य झाले तेंव्हाच पूर्णविराम दिला.'[५६] अशा रितीने सोलापूरचे हे आद्य वृत्तपत्र शतकाहूनही अधिक काळ यशस्वी वाटचाल करून १९७६ साली बंद झाले.

**१९. 'सोलापूर समाचार' चा उदय :**

'सोलापूर समाचार' हे सोलापुरातील दुसरे शतायुषी वृत्तपत्र. सोलापुरातील जुने वृत्तपत्र म्हणून 'सोलापूर समाचार' च उल्लेख केला जातो. नरसप्पा आवण्णा जक्कल यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. 'सोलापूर समाचार' हे नांव अहमदनगर येथे असणाऱ्या 'नगर समाचार' या पत्रावरून घेतलेले दिसते. जक्कल घराणे हे अहमदनगरहून सोलापूरला स्थायिक झाले. नगरमध्ये इ.स.१८७४ ला 'नगर समाचार' नावाचे वृत्तपत्र होते. व्हॉईसराय रिपन आणि डफरीनच्या काळात भारतात उदारमतवादी विचारसरणीचा प्रसार झाला. वृत्तपत्रावरील निर्बंध शिथिल झाले याच काळात ०३ फेब्रुवारी १८८५ ला सोलापुरात 'सोलापूर समाचार' या वृत्तपत्राची सुरूवात नरसप्पा आवण्णा जक्कल यांनी केली. आवण्णा जक्कल यांना छपाई यंत्राची विशेष माहिती होती. त्यांनी १८६८ मध्येच छापखान्याचे सर्व सामान अमेरिकेहून मागवले होते. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव गंगाराम हे वैद्यकीय व्यवसायात शिरले. तर मधले चिरंजीव श्री नरसप्पा हे वृत्तपत्र व्यवसायात आले. धाकटे चिरंजीव श्री बाबाजीराव हे फोटोग्राफीच्या व्यवसायात वाकबगार झाले.

श्री नरसप्पा यांचे एक स्नेही नसरवानजी करसेटजी सेटना हे इ.स.१८८२ साली सोलापूर येथे म्यूनिसिपालटीचे सेक्रेटरी म्हणून रूजू झाले. त्यांच्या आग्रहाखातर श्री नरसप्पा जक्कल सोलापुरात स्थलांतरीत झाले. त्यावेळी सोलापुरात 'कल्पतरू' हे वृत्तपत्र शिळाप्रेसवर छापले जात असे. इ.स.१८८५ साली नरसप्पा जक्कल आपल्या छापखान्याच्या साधनसामुग्रीसह सोलापुरात दाखल झाले. वर उल्लेख केल्याप्रमाणे ०३ फेब्रुवारी १८८५ रोजी 'सोलापूर समाचार' हे वृत्तपत्र सुरू झाले. 'सोलापूर समाचार'चा आकार डबल रॉयल एक अष्टमांश असा होता.[५७] शिळाप्रेसपेक्षा नरसप्पा जक्कल यांच्या

'सोलापूर समाचार' चा टाईप सुवाच्च आणि वळणदार असल्याने अल्पावधीतच समाचारची लोकप्रियता वाढली. त्यांनी आपल्या छापखान्यात अनेक व्यवसायिक छपाईची कामेही सुरू केली. त्यामुळे छपाईच्या धंद्यात लवकरच जम बसला. या छपाईच्या कामामुळे आणि फोटोग्राफीच्या व्यवसायामुळे श्री नरसप्पा जक्कल यांचा स्नेह समाजातील अनेक लोकांशी झाला. रेल्वेच्या छपाईची अनेक कंत्राटे त्यांना मिळाली. काही पैसा हाती शिल्लक राहिला. त्यामुळे त्यांनी ऑक्टोबर १९१३ मध्ये स्वतंत्र इमारत 'समाचार बिल्डींग'च्या रूपाने बांधली. या इमारतीमुळे 'सोलापूर समाचार' एका सुसज्ज व ऐसपैस जागेमध्ये छापला जाऊ लागला. सन् १८८५ ते इ.स.१९१४ अशी २८ वर्षे सर्वांशी मिळतेजुळते घेत नरसप्पा आवण्णा जक्कलांनी वृत्तपत्र चालविले.[५८] प्रारंभी 'सोलापूर समाचार' शिळा प्रेसवर छापले जात असे. सोलापूर जिल्ह्यातील वृत्तपत्र सृष्टीमध्ये अग्रगण्य स्थान 'सोलापूर समाचार' ला होते. 'सोलापूर समाचार' ने पहिले महायुध्द, दुसरे महायुध्द आणि १९२९ सालची जागतिक मंदी यासर्व काळात अतिशय प्रभावीपणे काम केले. नरसप्पा जक्कलांनी अखंडपणे २८ वर्षे समाचारची संपादकपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. समाचारला एक समाजमान्यता मिळवून दिली. समाचारची स्वतंत्र इमारत झाली. पण या नव्या इमारतीमधील त्यांचे वास्तव्य फारच अल्पकाळ ठरले. दिनांक २५ सप्टेंबर १९१४ रोजी श्री नरसप्पा आवण्णा जक्कल यांचे अर्धांगवायूच्या विकाराने निधन झाले. [५९]

श्री.नरसप्पा जक्कल यांना त्यांच्या वडिलांकडूनच वृत्तपत्र काढण्याची प्रेरणा मिळाली. केवळ वृत्तपत्रच नव्हे तर छापखान्याच्या धंद्यातील सर्व माहिती, कंपोझिंग, बायंडिंग, प्रिंटिंग वगैरे कामाची कुशलता त्यांच्या वडिलांकडूनच प्राप्त झाली. त्यामुळेच सोलापुरात टाईपचा छापखाना सुरू करण्याचा मान त्यांना मिळाला.[६०]

श्री.नरसप्पा जक्कल यांच्या निधनानंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री विठ्ठलराव नरसप्पा जक्कल हे 'सोलापूर समाचार'चे दुसरे संपादक झाले. इ.स.१९१३ ते १९३६

असे सलग २३ वर्ष विठ्ठलराव जक्कलांनी समाचारच्या संपादक पदाची जबाबदारी सांभाळली. विठ्ठलराव जक्कल स्वभावाने अतिशय गोड, निष्कपट आणि शांत होते. त्यांच्या या त्रिगुणी स्वभावामुळे फार मोठा लोकसंग्रह जमवला. सरकार दरबारी त्यांचे चांगले वजन होते. इ.स.१९१९ साली श्री.विठ्ठलराव जक्कल यांना 'रावसाहेब' आणि इ.स.१९३२ साली 'रावबहादूर' अशा बहुमानाच्या पदव्या मिळाल्या. विठ्ठलराव जक्कलांनी म्यूनिसिपालटीच्या कामातही लक्ष घातले. नगरपालिकेत पब्लिक वर्क्स, वॉटर वर्क्स वगैरे समित्यांचे चेअरमनपदही भूषविले. विठ्ठलरावांच्या कारकिर्दीतच 'सोलापूर समाचार' मध्ये अनेक नवीन यंत्रसामुग्री दाखल झाली. याच काळात श्री विठ्ठलराव यांचे धाकटे बंधू श्री बाबुराव यांनी इ.स.१९२४ पासून समाचारच्या संपादकीय कामात लक्ष घालायला सुरूवात केली.[६१] तत्कालीन पुढारी श्री.पु.ग.भेके यांनी समाचारमध्ये उपसंपादक म्हणून काम करायला सुरूवात केली. त्यांच्या प्रयत्नानेच 'समाचार' मध्ये दोन कॉलम इंग्रजी मजकूर छापण्यास प्रारंभ केला. पण तो फार यशस्वी झाला नाही. [६२]

वास्तविक पाहता जक्कल घराण्याकडे विद्वत्तेचा वारसा नव्हता आणि तशी श्रीमंतीही नव्हती. सरदार दरकदारीची मिजासही नव्हती किंवा सरंजामदारीही नव्हती. केवळ आत्मविश्वासाच्या बळावर पुढे जाण्याची शक्ती मात्र होती. "बदलत्या काळाला सामोरे जाण्याची, नव्या उद्योगात पाय रोवून उभे राहण्याची जिद्द मात्र होती. वृत्तीत सामोपचार होता, दृष्टीत सामाजिकता होती. म्हणून 'सोलापूर समाचार' ही जिल्ह्यातील वृत्तपत्रकारांची गंगोत्री ठरली."[६३] या नव्या बदलाला सामोरे जाण्याच्या वृत्तीतूनच साप्ताहिक 'सोलापूर समाचार'चा दैनिक समाचार झाला. जून १९३0 पासून दैनिक स्वरूपात समाचार निघू लागला. यात श्री आ.ब.शेडजाळे, श्री.व्यं.गो.अंदूरकर, श्री रॉय किणीकर, श्री पंचप्पा जिरगे, श्री.वि.गं.नगरकर आदि तरूण मंडळी उपसंपादक म्हणून काम करायला लागली.[६४] इ.स.१९३0 साल हे सोलापूरच्या इतिहासातील दैदीप्यमान वर्ष होते. दिनांक ८, ९, १0 व ११ मे १९३0 या काळात सोलापुरातल्या

नागरिकांनी संपूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव घेतला. आणि दिनांक १२ मे १९३० पासून सोलापुरात मार्शल लॉ लागू करण्यात आला. संपूर्ण ब्रिटीश राजवटीमध्ये मार्शल लॉ (लष्करी कायदा) लागू केलेले सोलापूर हे संपूर्ण देशातले एकमेव शहर होते. लष्करी कायद्याच्या दहशतीमुळे बऱ्याच लोकांनी आपले स्थावर जंगम मालमत्ता इथेच सोडून सोलापूर सोडून गेले. अशा दहशतीच्या काळातही लोकांची माहिती मिळविण्याची उत्सुकता लक्षात घेऊन जून १९३० पासून 'समाचार' दैनिक स्वरूपात काढायला सुरूवात केली. रावबहादूर विठ्ठलराव जक्कल यांच्या धाडसाचीच ही प्रचिती होती.

दिनांक ५ ऑक्टोबर १९३६ पासून श्री बाबुराव जक्कल यांचे नांव समाचारवर संपादक म्हणून प्रसिध्द होऊ लागले. "वृत्तपत्राच्या शक्तीचा समाजकार्यासाठी व सत्कार्या साठी कसा उपयोग करून घेता येतो हे श्री. बाबुरावांच्या दीघ—जीवनावरून कळून येते. संपादकीय सूत्रे हाती घेतल्यानंतर बाबुरावांनी बदलत्या अभिरूचीनुसार 'समाचार'ला आकर्षक स्वरूप देण्यास सुरूवात केली. अनेक खास अंक काढले."[६५] 'समाचार'ला आधुनिक स्वरूप देण्यात बाबुरावांचा वाटा मोठा होता. इ.स.१९३५ पासून मुंबईच्या 'रॉयटर' या वृत्तसंस्थेची तारेची सर्व्हीस घेतली. तसेच दिनांक १४ नोव्हेंबर १९४९ रोजी पीटीआयचा टेलिप्रिंटर बसवला. टेलिप्रिंटर बसवणारे सोलापूरचे पहिले दैनिक होण्याचा मान तरी मिळवलाच पण तोपर्यंत पुणे–मुंबईबाहेर टेलिप्रिंटरचा वापर करणाऱ्या दैनिकांची संख्या नगण्यच असावी.[६६] या दृष्टीने विचार करता 'समाचार' ने सोलापूरच्या वृत्तपत्रसृष्टीत फार मोठी क्रांती केली. पहिले 'दैनिक', पहिल्यांदा 'रॉयटर' वृत्तसंस्थेचा वापर, पहिल्यांदा 'पीटीआय'च्या बातम्या टेलिप्रिंटरवरून घेण्याचा मान समाचारकडे जातो. यावरूनच बाबुरावांच्या दूरदृष्टीची आणि धाडसाची कल्पना येते. वृत्तपत्रांच्या प्रारंभिक काळामध्ये एवढी धडाडी बाळगणारा संपादक सापडणे अवघडच.

"ध्येयनिष्ठ शब्दावडंबराने राष्ट्रात जागृती उत्पन्न होते हे सत्य असले तरीही ज्या विशिष्ट जनसमुहाकरिता आम्ही स्वीकृत कार्य आरंभिले होते, त्याची मनोभूमिका, त्यांची

अभिरूची, त्यांचे हिताहित पूर्णपणे ओळखूनच त्यांच्या हितवर्धनास पोषक असे व्यवहारी धोरण आम्हास स्वीकारणे क्रमप्राप्त होते."[६७] असे स्पष्ट व सुनिश्चित धोरण समाचारने आखले होते. हे धोरणच त्यांच्या यशाचे गमक आहे.

## २०. पत्रकारितेतील सिंह –'गज़नफर' ः

साधारणतः इ.स.१८७० ते इ.स.१९४७ या ७०–७५ वर्षाच्या कालखंडात सोलापुरात झालेली जनजागृती, स्वातंत्र्य चळवळ, सामाजिक सुधारणा या सर्वच चळवळींना गती मिळाली. त्या त्या पातळीवर समाजाला योग्य नेतृत्व मिळाले. 'मार्शल लॉ' हा तरी सोलापूरच्या इतिहासातील दैदीप्यमान कालखंड होता. जगन्नाथ शिंदे, मलप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन आणि श्रीकिसन सारडा या चार हुतात्म्यांना झालेली फाशी या सोलापूरच्या इतिहासातील महत्वपूर्ण घटना आहेत.[६८] देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात सोलापूरचे योगदान अत्यंत गौरवास्पद आहे. भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा आहे.

या चार नरवीरांपैकी अब्दुल रसूल कुर्बान हुसेन या शूरवीराने 'गजनफर' या ऊर्दू नावाचे मराठी साप्ताहिक काढले. 'गजनफर' या नावाने हे डिसेंबर १९२७ मध्ये सुरू झाले. पुढे इ.स.१९३० च्या मार्शल लॉच्या काळात बंद पडले. उणेपुरे अडीच वर्षाचे आयुष्य या साप्ताहिकाला लाभले. पण काळ्याकुट्ट अंधारात एखादी वीज चमकावी आणि तिच्या चमकण्याने सारा आसमंत उजळून जावा असेच कार्य 'गजनफर'ने आपल्या अडीच वर्षाच्या आयुष्यात केले. त्यामुळेच ते किती काळ चालले यापेक्षा कसे चालले याचा विचार करता 'गजनफर'चे कार्य खूप मोठे आणि मोलाचे होते हे सिध्द होते.[६९] 'गजनफर' या ऊर्दू शब्दाचा मराठी अर्थ सिंह किंवा केसरी असा होतो. याचा अर्थ अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांच्यावर वैचारिक आणि राजकीय प्रभाव लोकमान्य टिळकांचा होता हे स्पष्ट होते. 'मार्शल लॉ'च्या धांधलीत 'गजनफर' बंद पडले. "उण्यापुऱ्या अडीच वर्षात आर्थिक आपत्ती व संपादकाचे आजारपण यामुळे दोन – तीन महिने

प्रकाशनात खंड पडलेला होता. मध्येच एखादा अंक पंधरा दिवसांनी निघाला. या साप्ताहिकाचे अंदाजे १00 अंक प्रसिध्द झाले."[७०]

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या संपादकांनी 'गजनफर'चे स्वागत करताना लिहिले आहे, "येथे 'गजनफर' म्हणजे सिंह या नावाने मुसलमान समाजाचे साप्ताहिक पत्र मि. एम. बी. पठाण यांच्या संपादकत्वाखाली ता. १२-२७ पासून प्रत्येक शुक्रवारी प्रसिध्द व्हावयास लागले आहे. लोकशिक्षणाच्या दृष्टीने वर्तमानपत्र हे मुख्य साधन नसले तरी महत्वाचे साधन आहे. हिंदुप्रमाणे मुसलमानासही शिक्षणाची आवश्यकता आहेच. आमच्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात मुसलमानांनी स्वतःच्या समाजाकरिता मराठी भाषेत चालविलेल्या पत्रापैकी हे चौथे पत्र आहे. इतरांपेक्षा चटकन लक्षात येणारे वैशिष्ट्य म्हणजे पत्र स्वतःच्या छापखान्यात निघते आणि समाजवादी म्हणविते हे होय आणि निघालेल्या ४ – ५ अंकातील लेखावरून हेच धोरण दिसून येते. अधिकारवाणीने बोलणारी, लिहिणारी माणसे प्रत्येक समाजातील प्रत्येक गावात मिळतातच असे नाही. ही उणीव धड विचाराच्या आणि गोड लेखणीच्या माणसाला अधिकारी व्यक्तींच्या मतांची व राजकीय सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासाची जोड मिळेल तर भरून काढणे अशक्य नसते. मि.पठाण यांनी यादृष्टीने अवश्य प्रयत्न करावा यात त्यांना खात्रीने यश येईल... पत्र चिरायू होवो असे इच्छितो!"[७१] 'कल्पतरू'च्या संपादकांनी 'गजनफर'च्या संपादकांचा उल्लेख एम.बी.पठाण असा केला आहे. पण उपलब्ध इतिहास आणि अंक सांगतात की, संपादक अब्दुल रसूल कुर्बान हुसेन हे होते. एम.बी.पठाण हे कुर्बान हुसेन यांचे मामा होते. कदाचित दोघे मिळून ते चालविलेले असणार.[७२] लेखनशैली आणि लेखन विषयांची निवड ही एखाद्या सामाजिक व राजकीय कार्यकर्त्याच्या अनुभवावरून आलेली वाटते. त्यावरून हुतात्मा ए कुर्बान हुसेन यांनी ते संपादित केले असावे असे म्हणावयास जागा आहे.

"सोलापूरच्या पत्रकारितेवर केसरी व केसरीकार यांचा प्रभाव होता. 'कल्पतरू', 'कर्मयोगी', 'गजनफर' आणि समाचार या प्रमुख पत्रात 'कल्पतरू'चा तोंडवळा बराचसा 'ज्ञानप्रकाश'सारखा तर 'समाचार' अलिप्त वृत्तीने वृत्त देणाऱ्या बातमीपत्राचा, 'कर्मयोगी' प्रवृत्तीने, विचाराने केसरीची प्रतिकृती होती तर 'गजनफर' केसरीप्रणित राजकारणाची मुरब्बी चाल पुढे धडाडीने नेणारे, अल्पकाळ चुणुक दाखवून बंद पडलेले साप्ताहिक होते."[७३]

अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांनी आपल्या साप्ताहिकातून अनेकविध विषयांना स्पर्श केला. काही विषयांवर आग्रही विचार अत्यंत स्पष्टपणे मांडले. सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रश्नांचे विविध पैलू चांगल्या पध्दतीने हाताळले. स्वदेशी, शिक्षण आणि हिंदु-मुस्लीम ऐक्य अशा विषयांवर त्यांनी घेतलेली भूमिका केवळ 'गजनफर'लाच लोकप्रिय केली असे नाही तर सोलापूरच्या सामाजिक व राजकीय जीवनाला एक नवे वळण देऊन गेली. सामाजिक व राजकीय विषयांबरोबरच सोलापूर नगरपालिकेचा कारभार आणि नागरी समस्यांना देखिल 'गजनफर'ने आपली जागा दिली. या सर्व समस्या कुर्बान हुसेन यांनी अतिशय पोटतिडकीने मांडल्या. सोलापुरच्या सामाजिक व आर्थिक जीवनाला कापड गिरण्यांची पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे गिरणी कामगारांचे प्रश्न, त्यांचा राष्ट्रीय चळवळीतला सहभाग अशा अनेक विषयांवर 'गजनफर' मधून लेख छापून आले. त्यादृष्टीने 'गजनफर'ने खूपच प्रभावीपणे काम केले आहे.[७४]

### २१. अब्दुल रसूल कुर्बान हुसेन व मार्शल लॉ ः

हुतात्मा कुर्बान हुसेन हे डॉ.अंत्रोळीकरांचे शिष्य होते. कुर्बान हुसेन व त्यांचे मामा एम.बी.पठाण दोघेही विष्णू व लक्ष्मी गिरणीत कामावर होते. युवक संघाचे सदस्य, गिरणी मजदूर संघाचे कार्यकर्ते असल्याने विविध चळवळीत ते सहभागी होत असत. कुर्बान हुसेन यांना राष्ट्रीय चळवळीत सहभाग घेतल्याबद्दल गिरणीच्या

नोकरीवरून काढून टाकण्यात आले. सोलापुरातील खाटीक मशिदीजवळ त्यांच्या कुटुंबाचे आरसे व फोटो फ्रेमचे दुकान होते. पण कुटुंबाच्या या व्यवसायात कुर्बान हुसेन कधीच रमले नाहीत. त्यांचा ओढा नेहमी राष्ट्रीय चळवळीच्या कामाकडेच अधिक होता. उर्दू आणि मराठी अशा दोन्ही भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. अब्दुल रसूल हे त्यांचे मूळ नांव होते.[७५] पण सगळेजण त्यांना 'कुर्बान हुसेन' याच नावाने ओळखत असत. सार्वजनिक जीवनात त्यांची ओळख 'कुर्बान हुसेन' याच नावाने होत होती. महात्मा गांधींना दिनांक ५ मे रोजी अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेच्या निषेधार्थ दिनांक ८ मे १९३0 रोजी निघालेल्या निषेधाच्या मिरवणुकीत त्यांचा सहभाग होता.

दिनांक ८ मे १९३0 हा सोलापूरच्या इतिहासातील अत्यंत महत्वाचा दिवस. मिरवणुका, निषेधसभा, इंग्रज पोलीस व कलेक्टर यांच्याशी बाचाबाची आणि मंगळवार पेठेतील पोलीस चौकी दोन पोलीस शिपायांसह जाळली गेली. शंकर शिवदारे हा तरूण कार्यकर्ता गोळीबारात ठार झाला. तो सोलापूरच्या इतिहासातील पहिला हुतात्मा! या दिवसभराच्या दंगलीला इंग्रज पोलीसांनी जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला. ही दंगल म्हणजे हिंदू-मुस्लिम दंगल आहे असे भासवण्याचा प्रयत्न केला. या सर्व प्रकरणात कुर्बान हुसेन यांचा कुठेही सहभाग नसताना त्यांच्यावर खोट्या केसेस दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. या सर्व केसेसमधून सुटण्यासाठी कुर्बान हुसेन यांना माफीचा साक्षीदार होण्याची विनंती काही मुस्लिम नेत्यांनी केली. पण कुर्बान हुसेन यांनी ती धुडकावून लावली. यातून कुर्बान हुसेन यांची बाणेदार वृत्तीच दिसून येते. कवि कुंजविहारींच्या 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांना मार्शल लॉच्या अंतर्गत प्रथम पकडले ते दिनांक १४ मे रोजी. आणि पहिली शिक्षा झाली ती '१ वर्ष सक्त मजुरी आणि २ हजार रूपये दंड' तीही मार्शल लॉखाली.[७६] कुर्बान हुसेन यांच्या बरोबरीने जगन्नाथ शिंदे, श्रीकिसन सारडा, मल्लप्पा धनशेट्टी यांनाही अटक करण्यात आली. सर्वांना सुरूवातीला विजापूर जेलमध्ये ठेवण्यात आले

आणि नंतर येरवडा येथे त्यांना हलविण्यात आले. साक्षी पुरावे होऊन दिनांक ३0 जून १९३0 रोजी सेशन्स जज्ज मि. वाडिया यांनी आपले निकालपत्र वाचून चारही आरोपींना दोषी ठरवण्यात आले.चौघानाही फाशीची शिक्षा सुनावली गेली. दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही कवि कुंजविहारी यांची कविता म्हणत हसत हसत फाशीचा दोर कवटाळला!

सोलापुरातल्या शुक्रवार पेठेतील हाशमी प्रेसमध्ये दर शुक्रवारी 'गजनफर' छापून प्रकाशित होत असे. कुर्बान हुसेन संपादक व मस्तानसाहेब पठाण मुद्रक या दोघांनी 'गजनफर'चे प्रकाशन करायला सुरूवात केली. आपल्या क्रांतीकारक विचारांनी आणि कार्यानि स्वातंत्र्य चळवळीला त्यांनी वेग दिला. स्वतःच्या तत्वासाठी कुर्बान हुसेनला आपल्या नोकरीवर पाणी सोडावे लागले. इ.स.१९२८ साली कामगारांवर होणाऱ्या अन्यायासाठी कुर्बान हुसेननी संप पुकारला. त्यात जाम मिलचे नुकसान झाले म्हणून रूपये २२५२ नुकसान भरपाई मागणारा खटला त्यांच्यावर चालविला गेला.[७७] कोणतीही सामाजिक, राजकीय वा वैचारिक अशी पार्श्वभूमी नसताना 'कुर्बान हुसेन' नावाचा एक धगधगता यज्ञकुंड प्रज्वलित झाला. ही भारतमातेचीच देणगी म्हणावी लागेल. कामगारांविषयी कळवळा, हिंदू मुस्लिम ऐक्याचा आग्रह, मुस्लिम समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे ही धडपड, हिंदू – मुस्लिम समाजातील जुनाट कल्पना, चालीरिती व मागासलेपण दूर झाले पाहिजे अशा काही तत्वांनाच त्यांनी आपले जिवीत कार्य मानले. यावेळी कुर्बान हुसेन यांचे वय केवळ २२ इतके होते. एवढ्या कमी वयात विचार आणि कृती दोन्ही अफाट होते. हरिहर गुरूनाथ सलगरकर उर्फ कवि कुंजविहारी यांची गाजलेली कविता 'भेटेन नऊ महिन्यांनी, मनी धीर धरी शोक आवरी जननी' हे गीत १९२३ साली लिहिलेले आहे. अनेकांची आजही अशी समजूत आहे की, ते इ.स.१९३0 साली लिहिलं गेलेलं होतं. कुर्बान हुसेनला हे गीत फार आवडत असे आणि ते कवि कुंजविहारी यांना ते तुरूंगात असताना सांगत असे की, 'जर मला फाशीची

शिक्षा झाली तर तुमचं हे गीत गात गात मी फासावर चढेन.' ही प्रेरणा कुर्बान हुसेन यांची होती. [७८]

## २२. जहालमतवादी 'कर्मयोगी' :

देशाबद्दल ज्वलंत निष्ठा, असीम त्याग करण्याची तयारी आणि निष्कलंक समाजसेवा याचा त्रिवेणी संगम रामचंद्र शंकर उर्फ रामभाऊ राजवाडे यांच्या व्यक्तिमत्वामध्ये होता. रामभाऊ राजवाडे यांनी दिनांक २६ नोव्हेंबर १९२४ पासून 'कर्म योगी' या नावाने साप्ताहिक सुरू केले. इ.स.१९१७ ते इ.स.१९२० या काळात रामभाऊ राजवाडे यांनी वकिली व्यवसाय केला. इ.स.१९२० नंतर सोलापूरच्या सार्व जनिक जीवनात ते उतरले. आपल्या विचाराच्या प्रसारासाठी एखादे माध्यम हवे म्हणून 'राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळ लि.' या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोगटे होते. तर सेक्रेटरी कृ.ल.बावचकर हे होते याच संस्थेतर्फे 'कर्मयोगी' साप्ताहिक प्रकाशित होत होते. प्रभाकर वामन बर्वे हे 'कर्मयोगी' चे पहिले संपादक![७९] 'कर्मयोगी'साठी अद्ययावत छपाई यंत्रे खरेदी केली होती. रामभाऊ राजवाडे यांनी पुण्यात जाऊन केसरी कार्यालयात केसरीचे संपादक न. चिं. केळकर तथा तात्यासाहेब केळकर यांच्या हाताखाली काम केले होते. तेथे रामभाऊंना संपादकीय कामाचा व छपाई यंत्रणेचा पूर्ण अनुभव आला. इ.स.१९२६ च्या सुमारास रामभाऊ राजवाडे यांनी 'कर्म योगी' च्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. शेवटपर्यंत म्हणजे इ.स.१९३० पर्यंत ते संपादक पदावर होते. या अल्पशा काळात रामभाऊंनी 'कर्मयोगी' अतिशय लोकप्रिय केला. 'राष्ट्रीय विचारा' चा प्रसार हेच त्यांनी आपल्या साप्ताहिकाचे धोरण ठरविलेले होते. शेठ गुलावचंद हिराचंद, भाऊसाहेब खाडीलकर, पु.ग.वेके असे धडाडीचे सहकारी रामभाऊंना मिळाले. परखड विचार, स्पष्ट मांडणी, आक्रमक लेखनशैलीमुळे 'कर्मयोगी' वाचकांच्या पसंतीस उतरला.

मार्शल लॉच्या काळातील 'कर्मयोगी' ची कामगिरी संपूर्ण महाराष्ट्रात गाजली. इतकेच नव्हे तर इंग्लंडपर्यंत ही कामगिरी पोहोचली. दिनांक ८ मे १९३० रोजी सोलापुरात कलेक्टर मि.नाईट यांच्या सोल्जरांनी केलेला स्वैर गोळीबार, लोकांवर केलेले अत्याचार, लॉच्या भरून पोलीसांची शहरात बसविलेली दहशत यांची सविस्तर माहिती 'कर्मयोगी' ने अत्यंत धाडसाने दिनांक १० मे १९३० रोजी एक खास अंक काढून छापली. पोलीसांच्या या गोळीबारात अनेकजण ठार झाले. कित्येक जखमी झाले. सोलापुरात इंग्रजी पोलीसांनी जणू मृत्यूचे तांडवच चालविलेले होते. या गोळीबाराची खरी हकिकत, 'सोलापुरातील दंग्याची खरी हकिकतः १४४ कलम पुकारले!' या मथळ्याखाली रामभाऊ राजवाडे यांनी छापली. याचा परिणामही त्यांना भोगावा लागला. 'कर्मयोगी' चा हा 'जादा अंक' प्रचंड स्फोटक बनला. रामभाऊ राजवाडे यांना अटक झाली. सात वर्ष शिक्षा आणि १० हजार रूपये दंड करण्यात आला.[८०]

दिनांक १२ मे १९३० रोजी लष्करी कायदा लागू करण्यात आला. त्या कायद्याच्या नावाखाली रोज अनेकांची धरपकड चालू होती. पण रामभाऊ राजवाडेंना मात्र त्यांनी दिनांक १६ मे रोजी अटक केली. या दिवशी शुक्रवार होता. रामभाऊ राजवाडे हे सकाळी ११ वाजता 'कर्मयोगी' कार्यालयातील काम आटोपून घरी जेवावयास बसले होते. तेंव्हा पोलीस त्यांना पकडण्यासाठी आले. जेवण आटोपून रामभाऊ पोलीसांच्या स्वाधीन झाले. नंतर तीच गाडी कवि कुंजविहारी यांना अटक करण्यासाठी गेली. तेही जेवावयास बसले होते. त्यांचे जेवण झाल्यानंतर त्यांनाही लॉरीत घालण्यात आले.[८१]

'आठ मे' ची दंगल, त्यात पोलीसांनी स्वैर गोळीबार केलेला त्यामुळे शहरात चांगलीच दहशत निर्माण झाली होती. अशा वातावरणात दंग्याची खरी हकिकत गोळा करणे, मृत आणि जखमींची तसेच गोळीबार झालेल्या ठिकाणांची माहिती गोळा करणे हे सोपे काम नव्हते. केंव्हाही जीवाला धोका निर्माण होऊ शकतो अशी परिस्थिती होती.

तरीही न डगमगता अत्यंत धाडसाने सर्व माहिती एकत्र केली. प.रे.कोसंदर हे त्यावेळी 'कर्मयोगी' चे व्यवस्थापक म्हणून काम पाहात होते. त्यांनी या दिवसाची आठवण सांगितली आहे, "दिनांक ९ मे पर्यंत सर्व माहिती मिळवून दिनांक १0 मे १९३0 रोजी सायंकाळी ५ वा. 'कर्मयोगी' चा दंग्याची खरी हकिकत सांगणारा अंक निघाला. त्याची किंमत १ पैसा होती. तो अंक घेण्याकरीता 'कर्मयोगी' कचेरीपुढे इतका प्रचंड समुदाय जमला होता की, अंक देणेदेखिल मुष्कीलीचे झाले होते. अंक छपाईचे काम रात्रभर चालू होते. तरीही अंक अपुरे पडत होते. आणि त्यावेळी 'कर्मयोगी' चे व्यवस्थापक (मॅनेजर) होतो तेंव्हा विक्री झालेल्या अंकाचा रोखीचा एक मेमो आमचे सहीचा दिनांक १२ मे १९३0 चा पंधरा हजार प्रतिचा केलेला होता."[८२] जवळपास ७५ वर्षापूर्वी एखाद्या विशेष अंकाची विक्री एका दिवसात १५ हजार प्रती होते. याचाच अर्थ त्या घटनेची तीव्रता आणि त्यानंतर उमटलेले पडसाद लक्षात येऊ शकतात.

'कर्मयोगी' चे प्रकाशन दर गुरूवारी होत असे. पण ही प्रथा मोडून जनतेला खरी हकिकत कळावी व दहशतीचे वातावरण कमी व्हावे म्हणून शनिवार दिनांक १0 मे १९३0 रोजी प्रसिध्द करण्यात आला."त्या अंकातील सविस्तर नि पुराव्यासहित दिलेले वृत्त व जखमींची याची यादी प्रसिध्द होताच कलेक्टर मि.नाईट हे घाबरून गेले परंतु त्यावेळी त्यांना काहीच करता आले नाही. आणि लगेच एक – दोन दिवसात मार्शल लॉ पुकारण्यात येऊन शहरात धरपकडीचे सत्र सुरू झाले याचा फायदा घेऊन कलेक्टर मि.नाईट यांनी रामभाऊ राजवाडे यांच्यावर सूड उगवून घेण्याची संधी साधली."[८३]

### २३. श्री रामचंद्र शंकर उर्फ रामभाऊ राजवाडे ः

राजवाडे कुटुंब मूळचे कोकणातील. नोकरीच्या निमित्ताने ते इकडे आले. रामभाऊंचे वडिल श्री शंकरराव राजवाडे यांनी काही दिवस शिक्षकाची नोकरी करून पुढे सरकारी नोकरीत शिरले. आपली नोकरी चोखपणे बजावीत 'मामलेदार' पर्यंत त्यांची

बढती झाली. सातारा जिल्ह्यात वडूज गावी असताना दिनांक ७ एप्रिल १८७१ रोजी रामभाऊ राजवाडे यांचा जन्म झाला. मामलेदार पदावरून श्री.शंकरराव निवृत्त झाल्यानंतर त्यांनी सोलापुरात वास्तव्य केले. काही काळ सोलापूर नगरपालिकेतही त्यांनी काम केले.

इ.स.१९२५ साली रामभाऊंनी 'हनुमान व्यायाम शाळा' या नावाने आखाडा काढला. हा आखाडा ते स्वतः चालवित. दिनांक ४ फेब्रुवारी १९२९ पासून त्यांनी तालीम संघाची स्थापना केली. सोलापुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा स्थापन झाली ती रामभाऊ राजवाडे यांच्या घरातच! त्यावेळचे प्रचारक कै.दादाराव परमार्थ प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. इ.स.१९३२ साली मुंबई कायदे कौन्सिलच्या निवडणुकीत डॉ.वैशंपायन यांच्या विजयात रामभाऊ राजवाडे यांचा वाटा मोठा होता.[८४] मार्शल लॉ आणि दिनांक १0 मे १९३0 च्या 'कर्मयोगी' च्या अंकाबद्दल त्यांना अटक झाली. पुढे म.गांधी आणि आयर्विन यांच्यातील करारानुसार त्यांची सुटका झाली. इ.स.१९३७ च्या मुंबई असेंब्लीच्या निवडणुकीत ते 'लोकशाही स्वराज्य पक्षाचे' ते अधिकृत उमेदवार होते. डॉ.अंत्रोळीकरांच्या विरोधात त्यांना पराभव पत्करावा लागला. इ.स.१९३९ च्या हैद्राबाद सत्याग्रहात त्यांचा सहभाग होता. तत्पूर्वी इ.स.१९३५ साली आर्य समाजाची एक परिषद सोलापुरात भरली त्याला स्वा. सावरकर आले होते. ही परिषद यशस्वी करण्यातही ते आघाडीवर होते. इ.स.१९४१ साली वि.स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य संमेलन झाले. त्यातील राजवाडे यांचे भाषण चांगलेच गाजले. इ.स.१९४९ साली सोलापूरच्या पत्रकार परिषदेमध्ये त्यांचा सत्कार होऊन त्यांना रू. ५00 ची थैली अर्पण करण्यात आली. इ.स.१९४३ ते इ.स.१९४९ या काळात ते जवळजवळ अंथरूणावर पडूनच होते. दिनांक १७ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार वल्लभभाई पटेलांनी शेठ वालचंद यांना विशेष पत्र पाठवून त्यात कै.रामभाऊ

राजवाडे यांच्या प्रकृतीची चौकशी केली. दिनांक १८ एप्रिल १९४९ रेजी झुंझार पत्रकाराची, सच्चा देशभक्ताची जीवन यात्रा संपली. [८५]

## २४. अन्य वृत्तपत्रे :

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'गजनफर' आणि 'कर्मयोगी' या प्रमुख चार वृत्तपत्राशिवाय अन्यही बरीच वृत्तपत्रे या काळात सोलापुरातून निघत होती. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनीही आपापल्या परीने उल्लेखनीय योगदान दिले आहे. सुरत कॉंग्रेसनंतर जहालवादी आणि मवाळवादी असे दोन गट पडले. लोकमान्यांच्या नेतृत्वाखाली जहाल गट काम करू लागला. इ.स.१९०७ साली लोकमान्यांचे कट्टर पुरस्कर्ते श्री बळवंत शंकर लिमये यांनी सोलापुरात 'स्वराज्य' नावाचे साप्ताहिक सुरू केले. [८६] वास्तविक पाहता कर्मयोगीच्या आधी 'स्वराज्य' साप्ताहिक सुरू झाले होते. "स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे स्वतंत्र बाण्याचे साप्ताहिक" असे आपल्या ध्येय धोरणाचे स्पष्टीकरण करणारे ब्रीदवाक्यच 'स्वराज्य'च्या अंकावर छापले जायचे! श्री बळवंत शंकर लिमये यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'अभिनव भारत' या सशस्त्र गुप्त संघटनेचेही काम केले. '१८५७ चे स्वातंत्र्य समर' या पुस्तकाची छपाई लिमये यांच्याकडे सुरू होती. तोच सरकारला सुगावा लागला. 'स्वराज्य' च्या कार्यालयावर अचानक छापा घालून झडती घेण्यात आली पण लिमये यांनी वेळीच सावधगिरी बाळगली होती. हुतात्मा खुदीराम बोस याने मुझफरपूर येथील सेशन्स जज्ज मि.किंग्जफोर्ड यांच्यावर टाकलेल्या बॉम्बनंतर दिनांक १६ मे १९०७ रोजी लिमये यांनी 'बॉम्ब प्लेग हटविण्यात स्वराज्य हाच उपाय' असा अग्रलेख लिहिला होता. त्यानंतर दिनांक ३० मे १९०८ रोजीच्या अंकात 'राजद्रोह की प्रजाद्रोह' हा अग्रलेख लिहिला. त्याबद्दल त्यांना दिनांक ३० जून १९०८ रोजी अटक करण्यात आली. [८७] राजद्रोहाचा गुन्हा म्हणून साडेतीन वर्षे सक्त मजुरीची

शिक्षा ठोठावण्यात आली. त्यानंतर मात्र 'स्वराज्य' कायमचेच बंद पडले. अतिशय अल्पकाळात आपल्या तडफदार लेखणीने त्यांनी 'स्वराज्य' हे साप्ताहिक गाजवले.

याशिवाय सोलापूर जिल्ह्यातही काही वृत्तपत्रे निघाली. त्यांचाही उल्लेख करणे अभ्यास विषयाच्या दृष्टीने आवश्यक आहे. इ.स.१८६० साली श्री कांबळे यांनी पंढरपूर येथे 'पंढरी वैभव' साप्ताहिक सुरू केले. त्यानंतर इ.स.१८६९-७० च्या सुमारास गणेश केशव आणि विठ्ठल केशव लिमये या दोघा बंधूंनी 'पंढरी भूषण' हे पत्र सुरू केले.[८८] हे साप्ताहिक जवळपास १५-१६ वर्षे चालले. याबरोबरीनेच पंढरी समाचार, पंढरी मित्र अशीही साप्ताहिके चालू होती. बार्शी येथे इ.स.१८८५ साली श्री पारलिंग प्रभुआप्पा यांच्या संपादकत्वाखाली 'प्रबोध रत्न' सुरू झाले. इ.स.१८७८ साली सोलापूर येथेही 'सुदर्शन' नावाचे एक पत्र सुरू असल्याचे आढळते. मुंबईच्या नेटिव्ह ओपिनियन पत्राने सुदर्शनचे दोन अंक मिळाल्याची पोच आपल्या दिनांक १ सप्टेंबर १८७८ च्या अंकात दिली होती. पंढरपुरात श्री गोविंद सखाराम बिडकर यांचे 'पंढरी मित्र' नावाचे पत्र निघत असे. आणखी काही छोटी पत्रे निघाली - 'सोलापूर वृत्त' (१८८८), 'व्यापारी सोलापूर'-१८९१, 'चिंतामणी'-१८९९, 'सहस्त्रकर'-१९०५, विद्यावैभव-१९०५, शिवाजी विजय-१९०९ अशी काही पत्रे सोलापूर जिल्ह्यात निघाली.[८९]

''कल्पतरू'' पत्राचे भावंड म्हणून 'मनोविहार' नावाचे एक पत्र सोलापूर येथे दिनांक १० जानेवारी १८८८ रोजी सुरू झाले. दर मंगळवारी ते प्रकाशित होत असे. सुबोध वचने, वर्तमान सार, पत्रव्यवहार, बाजारभाव, कामगारांच्या नेमणुका अशा अनेक प्रकारचा मजकूर त्यात दिला जात असे. श्रीनिवास नारायण काकडे हे या मनोविहारचे चालक होते.[९०] सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील जैन समाजाच्या उध्दारासाठी सप्टेंबर १८८४ मध्ये निघालेले 'जैन बोधक' हे आणखी एक उल्लेखनीय पाक्षिक होते. शेठ हिराचंद नेमचंद हे या पाक्षिकाचे संपादक आणि संस्थापक होते. जैन समाजात शैक्षणिक,

सामाजिक वगैरे सुधारणा करून सदाचार, चारित्र्य संपन्नता, सत्प्रवृत्ती इत्यादी गोष्टींचे ज्ञान करून देऊन धार्मिक वृत्ती लोकांमध्ये बाणवायची अशा हेतूने हे पाक्षिक सुरू केले. इ.स.१९३४ पासून एका संपादका ऐवजी 'संपादक मंडळ' निर्माण केले आणि त्याद्वारे मराठी आणि हिंदी असे दोन विभाग चालू केले.

या सर्वच वृत्तपत्रांनी आपल्या परीने स्वातंत्र्य चळवळ व्यापक करण्यात व समृध्द करण्यात योगदान दिले आहे. भारतीय पत्रकारीता पारतंत्र्याच्या काळात जन्माला आली आणि पराधीनतेवर प्रहार करीत विकास पावली. सोलापुरातली वृत्तपत्रसृष्टीदेखील याला अपवाद नव्हती. सोलापुरातल्या पत्रकारितेनेही निद्रिस्त समाजाला जागे केले. जे जागृत झाले त्यांना मार्ग दाखवला, ज्यांना मार्ग सापडला त्यांना त्या मार्गावर चालण्याची हिंमत दिली. ते हिंमतीने चालले त्यांचा यथार्थ गौरवही केला. या वृत्तपत्रांनी समाजाला विचार दिला, विचारी मनाला महत्वाकांक्षेचे पंख दिले, आत्मबलिदानाची दीक्षा दिली.

इ.स.१९३0 च्या सत्याग्रहात तरी सोलापूरच्या दोन साप्ताहिकांची आहुती पडली. श्री.रामभाऊ राजवाडे यांच्या कर्मयोगी आणि हुतात्मा कुर्बान हुसेन यांचा 'गजनफर' या दोन्ही साप्ताहिकांची आणि त्यांच्या निर्मात्यांची आहुती या स्वातंत्र्य वेदीवर पडली. कै.हुतात्मा कुर्बान हुसेन यांना तरी फासावरच लटकावले. पण कै.रामभाऊ राजवाडे यांची गांधी–आयर्विन करारानुसार सुटका झाली असली तरी अत्याचाराने, अनन्वित छळाने त्यांच्यातील धडाडीचा पत्रकार संपला. मृत्यूपूर्वी काही वर्ष अंथरूणाला खिळून राहावे लागले. 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने!' अशीच मनोभूमिका सर्व पत्रकारांची होती. या सर्वांनाच माहीत होते की, संपन्न आणि सुसंस्कृत समाजाचा उगम होतो तो समर्थ सृजनशीलतेतच! स्वातंत्र्य हा तरी सृजनशीलतेचा गाभा आहे. गुलामांना, परावलंबितांना कुठली संपन्नता आणि कुठली संस्कृती? ज्यांचे मन आणि मनगट दास्यात धन्यता मानतात त्यांचे जीवन कधीच फुलू शकत नाही. देशाच्या वाट्याला आलेले

पारतंत्र्य दूर करावे, लोकांचे जीवन स्वातंत्र्यात फुलून यावे याच एका महत्वाकांक्षेने झपाटलेल्या व्यक्तीमत्वांनी, या पत्र निर्मात्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून सेवा केली.

स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारिता आजच्या पेक्षा खूपच भिन्न होती. समाज जीवनाची धाटणी पारंपारिक रितीरिवाजांच्या चौकटीतील चालचालवणूक, संकेत, श्रध्दा, पूजास्थाने इत्यादींच्या बांधबंदिस्तीतून संसूचनांची प्रक्रिया साधणे आजच्या मानाने खूपच अवघड होते. सहज लक्षात येते की, समाजजीवनाचा परिसर प्रभारित होता. परकियांचे प्रस्थापित वर्चस्व निर्विवाद होते. परकीयांनी 'त्यांची' परकेपणाची जाणीव इतक्या खुबीने झाकली होती की, जणू ते आपले परमेश्वर, प्रेषित, नियतीनियंत्रित राज्यकर्ते अशीच त्यांची प्रतिमा निर्माण करण्यात ते यशस्वी झाले होते. जीत व जेत्यांच्या उभयपक्षी लाभसाधीत इतकेच नव्हे तर जीतांच्या विशेष हितासाठी शासनाची जबाबदारी सांभाळीत होते! यावरून तत्कालीन परिस्थिती स्पष्ट होते. अशा काळात वृत्तपत्रासारखे साधन हाती घेऊन स्वातंत्र्य चळवळीचा पोषक असा वैचारिक लढा त्याकाळातील पत्रकारांनी लढला.

या काळात वृत्तपत्रांनी लोकांमध्ये जागृती करून स्वातंज्य चळवळीसाठी पोषक स्थिती निर्माण केली. शिवाय सांस्कृतिक, सामाजिक प्रबोधनाच्या बाबतीतही आघाडीवर होती.

# प्रकरण २ ले

# संदर्भ व तळटीपा

| क्र. | लेखक | संदर्भ ग्रंथ | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा | ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती, मुंबई, १९९४ पृ. १४ |
| २. | काकडे वि. गो. | मुलाखतीतून | |
| ३. | येवले शं. भा. | | पूर्वोक्त पृ. १५ |
| ४. | मराठी पत्रकार परिषद | मराठी पत्रकार परिषद स्मरणिका | २३ वे अधिवेशन पंढरपूर प्रकाशन समिती सन् १९७३ पृ. १९ |
| ५. | कित्ता | — | पृ. ९ |
| ६. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा | पूर्वोक्त पृ. २० |
| ७. | सहस्त्रबुध्दे शिरीष | बखर कॉंग्रेसची | राजहंस प्रकाशन, पुणे सन् १९८५ पृ. २०९ |
| ८. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा | पूर्वोक्त पृ. २१ |
| ९. | अंदूरकर व्यं. गो. | सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे | सोलापूर राष्ट्रीय साहित्य प्रकाशन समिती सन् १९५८ पृ. १३ , |
| १०. | कित्ता | — | पृ. २८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा | पूर्वोक्त पृ. २८ |
| १२. | डॉ. फडके य. दि. | सोलापूर मार्शल लॉचा दैदिप्यमान इतिहास | प्रकाशक – रविंद्र मोकाशी दिनांक ८ मे २००५ |
| १३. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा | पूर्वोक्त पृ. ३२ |
| १४. | Mahajan V D | Modern Indian History | Chand & Co. New Delhi 1955, Page 487 |
| १५. | रावसुब | 'स्वातंत्र्य वृत्तपत्राचा प्रभाव' | महाराष्ट्र टाईम्स दिनांक ८ फेब्रुवारी १९९८ मैफलपूर वार्ता पृ.८ |
| १६. | माडखोलकर ग. त्र्यं. | पखरण | नागपूर प्रकाशन, नागपूर १९७१ पृ. १ |
| १७. | गर्गे स.मा. | निवडक अग्रलेख | मान सन्मान प्रकाशन, पुणे प्र.आ. १९९७ पृ.५ |
| १८. | पुरंदरे बाबासाहेब | राजा शिवछत्रपति | पुरंदरे प्रकाशन, पुणे. (पूर्वार्ध व उत्तरार्ध) आवृत्ती १४ वी २००१ पृ.९०३ |
| १९. | लेले रा.के. | मराठी वृत्तपत्राचा इतिहास | कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८४ पृ. ११ |
| २०. | देशपांडे मा. धों. | एकनाथांच्या भारूडातील लोकसंवाद | लघु शोधनिबंध, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १९९२ पृ. ३४ |
| २१. | सुरेशचंद्र | समाचार पत्रोंका उदय व विकास | संपादक शिवकुमार गुप्त,श्री जैन संस्कृती संरक्षक संघ, जयपूर, पृ. १५९ |
| २२. | The New Encyclopaedia Britanica | Oxford, University Press, London,Vol. 26, Page 474 | व्हॅल्यूम २६ पृ. ४७४ |
| २३. | Mahajan V D Sethi R R | British Rule in India | , Chand & Co. New Delhi 1953 |
| २४. | सुरेशचंद्र | समाचार पत्रोंका उदय व विकास | संपादक शिवकुमार गुप्त, श्री जैन संस्कृती संरक्षक संघ, जयपूर, पृ. १६0 |
| २५. | कित्ता | — | पृ.१३ |
| २६. | स्कॉट पॉल मोरेर | द एज्यूकेशनल रोल ऑफ द प्रेस | लिग ऑफ नेशन्स पब्लिकेशन १९३१ पृ. क्र. ४९ |
| २७. | कुलकर्णी गणेश पंढरीनाथ | शतसांवत्सरिक ग्रंथ | सोलापूर नगरपालिका सन् १९५३, प्रकाशक ः अनंत जोशी |
| २८. | कित्ता | — | पृ.८ |
| २९. | डॉ. देशपांडे प्र. न. (सं) | 'संशोधक त्रिभाषिक', | इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे मार्च २00४ पृ. १७ |
| ३0. | कित्ता | — | पृ. १८ |
| ३१. | सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेट | | पूर्वोक्त पृ. ३८ व ३९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | कित्ता | — | पृ.१२ |
| ३३. | डॉ. देशपांडे प्र.न.(सं.) | — | पूर्वोक्त पृ. २२ |
| ३४. | सुपाते अमोल | (एम.लिब.अप्रकाशित शोधप्रबंध) | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. २००४ पृ. ०३ |
| ३५. | कुलकर्णी गणेश पंढरीनाथ | — | पूर्वोक्त पृ. २४ |
| ३६. | कित्ता | — | पृ.१५ |
| ३७ | दै. 'सोलापूर समाचार' | - | दिनांक ४ फेब्रुवारी १९३० पृ. ५ |
| ३८. | डॉ रोडे सोमनाथ | - | पूर्वोक्त पृ. ६२, ६३ |
| ३९. | कुलकर्णी गणेश पंढरीनाथ | — | पूर्वोक्त पृ. ३४ |
| ४०. | डॉ. पुंडे निळकंठ | स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापूरची वृत्तपत्रसृष्टी | दै. लोकमत शुभारंभ अंक दि. २४/१०/१९९३ |
| ४१. | डॉ. पवार सुधाकर | वृत्तपत्र व्यवसाय ः काल नि आज | पूर्वोक्त पृ. ४ आणि ५ |
| ४२. | कित्ता | — | पृ. ४ व ५ |
| ४३. | डॉ. पुंडे निळकंठ | स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापूरची वृत्तपत्रसृष्टी | लोकमत शुभारंभ अंक, दि. २४/१०/१९९३ |
| ४४. | लेले रा.के. | — | पूर्वोक्त पृ. ५६ |
| ४५. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६. | लेले रा. के. | — | पूर्वोक्त पृ. ६३३ |
| ४७. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. १८ |
| ४८. | काकडे वि. गो. | — | मुलाखतीतून |
| ४९. | कित्ता | — | पृ.४ |
| ५०. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त |
| ५१. | काकडे वि. गो. | — | मुलाखतीतून |
| ५२. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. २२ |
| ५३. | कित्ता | — | पृ.१० |
| ५४. | काकडे वि. गो. | — | मुलाखतीतून |
| ५५. | डॉ. काकडे नभा | सोलापूरातील आद्य वृत्तपत्र 'कल्पतरू' | दै. एकमत, दिनांक २८/०३/२०१० |
| ५६. | डॉ. पुंडे निळकंठ | — | पूर्वोक्त पृ.११ |
| ५७. | 'सोलापूर समाचार' | — | ज्युबिली अंक दिनांक १४ जानेवारी १९३६ |
| ५८. | कित्ता | — | पृ. ७ |
| ५९. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. २५ |
| ६०. | कित्ता | — | पृ. २६ |
| ६१. | 'सोलापूर समाचार' | — | ज्युबिली अंक पूर्वोक्त पृ. ९ |
| ६२. | जक्कल जयंतराव | — | मुलाखतीतून |
| ६३. | डॉ. पुंडे निळकंठ | — | पूर्वोक्त पृ. ६८ |
| ६४. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. २७ |
| ६५. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. २७ |
| ६६. | कित्ता | — | पृ. २८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६७. | 'सोलापूर समाचार' | — | पूर्वोक्त पृ. १ |
| ६८. | डॉ. फडके य.दि. | — | पूर्वोक्त पृ.२ |
| ६९. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक २९ डिसेंबर १९३१ पृ. १0,११ आणि १५ |
| ७0. | डॉ. पुंडे निळकंठ | हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन – कार्य व कर्तृत्व, | अमेय प्रकाशन, पुणे पृ. ३२ |
| ७१. | 'कल्पतरू' | — | दिनांक ८ जानेवारी १९२८ |
| ७२. | डॉ. पुंडे निळकंठ | — | दै. लोकमत पूर्वोक्त |
| ७३. | डॉ. पुंडे निळकंठ | हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन – कार्य आणि कर्तृत्व | पूर्वोक्त पृ. ३३ |
| ७४. | कु. बनसोडे पायल | हुतात्मा कुर्बान हुसेन ः जीवन व कार्य | अप्रकाशित शोध निबंध |
| ७५. | कित्ता | — | पृ.६ |
| ७६. | अंदुरकर व्यं. गो. | — | पूर्वोक्त पृ. १३२ |
| ७७. | प्रा. बेन्नूर फ.ह. | केसरी आणि 'गजनफर', | दै. 'सोलापूर समाचार', दि.२२ नोव्हेंबर १९८१ |
| ७८. | डॉ. फडके य. दि. | — | पूर्वोक्त पृ. १0 |
| ७९. | 'कर्मयोगी' | — | जन्म शताब्दी स्मरणिका दि. ७/0४/१९९१ |
| ८0. | कित्ता | — | पृ.१५ |
| ८१. | अंदूरकर व्यं. गो. | — | पूर्वोक्त पृ. ११२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८२. | ‘कर्मयोगी’ | — | पूर्वोक्त पृ. ८ |
| ८३. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. १३२ |
| ८४. | लेले रा. के. | — | पूर्वोक्त पृ. ६३३ |
| ८५. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. २८ |
| ८६. | लेले रा. के. | — | पूर्वोक्त पृ. ६३१ |
| ८७. | कित्ता | — | पृ.३ |
| ८८. | कित्ता | — | पृ.५ |
| ८९. | मराठी पत्रकार परिषद | — | पूर्वोक्त पृ. २४ |
| ९0. | डॉ पुंडे निळकंठ | — | दै. लोकमत शुभारंभ अंक पूर्वोक्त |

प्रकरण ३ रे

# सोलापुरातील वृत्तपत्रांचे सामाजिक प्रबोधन

आजच्या काळात वृत्तपत्रांचे वाचन ही दैनंदिन जीवनातील एक आवश्यक बाब बनली आहे. दैनंदिन वापराच्या वस्तुंइतकेच महत्व वृत्तपत्रांना मिळाले आहे. आजच्या बाजारपेठेचा प्रभाव असलेल्या काळात वृत्तपत्रांना उपभोग्य वस्तुही मानले गेले आहे. त्यामुळेच आपल्या सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. ताज्या बातम्यांसाठी वा घडामोडी जाणून घेण्यासाठी वृत्तपत्र जसे वाचले जाते तसे त्यातील इतर मजकुरांचेही वाचन केले जाते. त्याचाही प्रभाव वाचणाऱ्या व्यक्तींवर होतो. त्याची चर्चा लोकसमुहामध्ये गप्पांच्या माध्यमातून होते. एखाद्या वस्तुच्या जलद प्रसारासाठी किंवा वितरणासाठी वृत्तपत्रांसारखे दुसरे प्रभावी माध्यम नाही. शिक्षणाचे प्रमाण वाढले, सुशिक्षितांचे प्रमाण वाढले. त्याप्रमाणात वृत्तपत्रांची संख्याही वाढली. वाचक वाढले. वृत्तपत्रांची ही आजची स्थिती आपल्याला सगळीकडे पाहायला मिळते.

वृत्तपत्रांच्या प्रारंभीच्या काळात शिक्षणाचे प्रमाण कमी होते. वृत्तपत्रांची संख्या कमी होती. साक्षरतेचे प्रमाण मर्यादित होते. वृत्तपत्रे आकारानेही मर्यादितच होती. असे असले तरी वृत्तपत्रांच्या समाजमनावरील प्रभावात कोणताही बदल नव्हता. आजच्या इतकाच प्रभाव प्रारंभीच्या काळात होता. वृत्तपत्रांच्या कार्यात, प्रभावात कोणताही बदल झाला नाही. उलटपक्षी वृत्तपत्रांची सामाजिक जबाबदारी वाढतच गेली. घराघरापर्यंत जाऊन पोहोचण्याची क्षमता ही वृत्तपत्रांची खूप मोठी जमेची बाजू आहे. या क्षमतेमुळे वृत्तपत्रांवर अनेक प्रकारची जबाबदारी आपोआप येऊन पडते किंवा समाजाकडून ती लादली जाते. माहिती देणं, मनोरंजन करणं, प्रचार करणं, प्रबोधन करणं इ. अनुषंगिक कार्य तरी वृत्तपत्रांना करावीचा लागतात काळाच्या ओघात वाढलेल्या जबाबदाऱ्या असाच

यांचा उल्लेख करता येईल. पण वृत्तपत्रांचा जन्म हा मुळात सामाजिक सुधारणांच्या आग्रहापोटी झालेला आहे. 'भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा उदय मुळातच सामाजिक सुधारणांच्या आग्रही पुरस्कारासाठी झाला आहे. इ.स.१७८७ ते इ.स. १८८० या कालखंडात जेम्स ऑगस्टस् हिकीपासून ते राजाराम मोहन रॉय ते गो.ग.आगरकरांपर्यंत बहुतेक पत्रकारांची लेखणी सामाजिक सुधारणांसाठी झिजत होती.'[१] थोडक्यात वृत्तपत्रांची प्रसारक्षमता आणि समाजमनावर प्रभाव पाडण्याची क्षमता ही सामाजिक सुधारणांसाठी, प्रबोधनासाठी एक महत्वाचे साधन ठरली.

लोकांशी संवाद साधण्याची क्षमता हा या वृत्तपत्रांचा मूळ आधार असल्याने आणि मुळातच माणूस हा संवादशील प्राणी असल्याने वृत्तपत्रांचे सामाजीकरण झाले. 'Without communication an individual could never become a human being, without communication an individual could never become a part of human society, socialism is a life long process, beginning o the day of ones birth'[२] संवादाशिवाय मानव माणूस बनू शकत नाही, समाजाचा भाग बनू शकत नाही. मानवाच्या जन्मापासून सतत गतीमान असलेली समाजीकरण ही चिरंतन प्रक्रिया होय. ही संवाद घडवण्याची प्रक्रिया अधिक गतीमान झाली ती वृत्तपत्रांच्या माध्यमातून. समाजातील अंध रूढी, परंपरा, पुजा पध्दती, जातीप्रथा, स्त्री दास्यत्व, अस्पृश्यता, जरठ–बाला विवाह, बालविवाहाची प्रथा अशा अनेक सामाजिक समस्यांच्या निमूर्लनासाठी वृत्तपत्रांची भूमिका महत्वाची ठरली. मराठी वृत्तपत्रांचा जन्म झाला तो याच सामाजिक सुधारणेच्या तळमळीपोटी. समाजाशी निगडीत अनेक विषयांची चर्चा वृत्तपत्रांना करावी लागली. समाजात त्याकाळी साक्षरतेचे प्रमाण कमी होते. तरी या सुशिक्षित वर्गाच्या हाती सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय चाव्या होत्या. त्यामुळेच आगरकरांसारख्या समाजसुधारकांचे म्हणणे होते की, हा पुढारलेला वर्ग एकदा सुधारला की, नव्या ज्ञानाचे लोण समाजातल्या तळगळातील वर्गापर्यंत जाईल. यातून राजकीय

स्वातंत्र्य आधी की सामाजिक सुधारणा आधी हा वाद निर्माण झाला. टिळक आगरकर दोन प्रवाह निर्माण झाले. 'केसरी', 'सधारक' दोन वृत्तपत्रांनी दोघांच्या विचारांचे प्रतिनिधित्व केले.

'हरिभाऊ आपट्यांनी माजघरातल्या फणी-करंड्यापर्यंत आपलं वाङ्मय जावं या हेतूने 'करमणूक' पत्रातून केलेले लेखन हे तर नव्या समाज रचनेची ग्वाही देणारे ठरले. कुटुंब कल्याणाचा विचार त्यांनी करमणुकीच्या माध्यमातून मांडला. स्त्री हा कुटुंबाचा आणि म्हणून समाजाचा महत्वाचा घटक. या स्त्री जीवनाला आधुनिक स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून त्यावेळी नियतकालिकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.'[३] मराठी वृत्तपत्रांनी आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान अगदी सुरूवातीपासूनच सांभाळले होते. 'इ.स.१८६१ मध्ये 'ज्ञानदर्पण' या नियतकालिकात 'स्त्रीची आपल्या भ्रताराबरोबर वागणूक' यासारख्या विषयांवर निःसंकोचपणे लेख आलेला दिसतो.'[४] मराठी वृत्तपत्रांनी आपल्या प्रारंभापासूनच समाजहिताशी निगडीत असा कोणताच विषय वर्ज्य मानला नाही, हेच यावरून स्पष्ट होते. समाज सुधारणेच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी पत्रकारिता यातून दिसून येते.

१९ व्या शतकात स्वातंत्र्य, समता नि न्याय या मूल्यांचा पुरस्कार करून त्यासाठी अहर्निश झटणाऱ्या पत्रकारांनी पारंपारिक सनातनी, धार्मिक विचारांच्या पगड्यातून मानवाला मुक्त करून आज आधुनिकतेच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. इ.स.१८४८ ला 'प्रभाकर' पत्रातून लोक हितवादींनी जे विचार आणि कल्पना मांडल्या त्यांची काही अंशी तरी पूर्ती आजच्या प्रत्यक्ष जीवनात झालेली दिसते.'[५] सर्वच वृत्तपत्रांनी सुधारणावादी धोरण स्विकारले असे नाही. हिंदूंचे ख्रिस्तीकरण करणे ही त्याकाळातील मोठी समस्या होती. हिंदू धर्मावर प्रहार करणारे, हिंदू धर्माची कुचेष्टा करणारी अनेक पत्रे होती. तशीच ख्रिस्ती धर्मावर चालून जाणारी काही वृत्तपत्रे होती. काहींनी मध्यम मार्ग स्विकारला. हिंदुधर्मातील अंधःश्रध्दा, रूढी, चाली रिती य वाईटच

आहेत. नव्या ज्ञानाची कास धरताना अधिक डोळसपणे जुन्या परंपरांना तिलांजली दिली पाहीजे, असा समजुतीचा मार्ग काही पत्रांनी धरला. इंग्रजांनी रेल्वे आणली, कारखानदारी सुरू झाली, वाहतुकीची साधने वाढली या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणून जाती निर्मूलनाला मदत झाली. तसेच तत्कालीन वृत्तपत्रांनीही जाती निर्मूलनासाठी प्रयत्न केले.

वृत्तपत्रांच्या या सर्व सामाजिक धडपडीचा परिणाम म्हणजे नव्या राजकीय नेतृत्वाने या नव्या विचारांचा अंगिकार केला. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाला लवकर सुरूवात झाली असे म्हणता येईल. 'सोलापुरातील आद्यवृत्तपत्र 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार' अशा पत्रांनी समाजाची नेणिवेतून जाणीवेकडे, जाणीवेतून जागृतीकडे आणि नवनिर्मितीकडे वाटचाल व्हावी म्हणून या पत्रांनी बातमीपत्र, माहितीपत्र, विचारपत्र, प्रचारपत्र, समीक्षा पत्र अशा अनेक भूमिका समर्थपणे सांभाळल्या'[६] आर्थिक ऐपत नसतानाही केवळ सामाजिक जाणीवेपोटी चालवली जाणारी ही पत्रं होती. यातही कौतुकास्पद कामगिरी केली ती 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या पत्राने. सामाजिक तळमळीपोटी तोटा सहन करून त्यांनी साप्ताहिक चालविले आणि अशक्य झाले तेंव्हाच पूर्णविराम दिला. ब्रिटीश राजवटीचे अंतरंग, सामाजिक सुधारणांची निकड, दारिद्र्याचे दशावतार यावर मात करण्याची जिद्द आणि उद्योगप्रवणता, राजकीय सुधारणांची संथ पण परिपक्व वाटचाल अशा कितीतरी विषयांना स्पर्श करीत 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त'ने आपल्या सामाजिक जाणीवा समृध्द केल्या. [७]

**सोलापूरचे सामाजिक विश्व ः**

प्राचीन काळापासून सोलापूरला राजसत्तेचा वारसा लाभला आहे. राष्ट्रकूट, चालूक्य, चेदी, शिलाहार, यादव, बहामनी, आदिलशाही, निजामशाही, औरंगजेब, निजाम, मराठे आणि शेवटी ब्रिटीश अशा राजसत्ता सोलापूरवर राज्य करीत होत्या. सत्तेचा हा प्रत्येक घटक सोलापूरच्या सामाजिक जीवनाला प्रभावीत करीत होता.

सोलापूरच्या इतिहासाला समृध्द करण्यासाठी ही राजकीय स्थित्यंतरे जशी कारणीभूत ठरली तशीच सोलापूरची भौगोलिक स्थितीही कारणीभूत ठरली असे म्हणावयास वाव आहे. भीमा, सीना, माण नद्यांच्या पट्टयात वसलेल्या भूप्रदेशाला व्यापारी केंद्राचे स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे मध्ययगीन आणि आधुनिक काळापासून सोलापूर हे व्यापारासाठी प्रसिध्द ठिकाण ठरले.

सोलापूरची ही भूमी मराठी, कानडी, तेलुगु या त्रैभाषिक प्रदेशाला जोडणारी आहे. कर्नाटकातून आलेल्या लिंगायत समाजाने सोलापूरला विकसित केले तसेच आंध्र प्रदेशातून आलेल्या पद्मशाली समाजाने हातमागाद्वारे तयार होणाऱ्या कापडातून सोलापूरची कारखानदारी वाढवली. फलटण भागातून जैन समाजाने आणि मराठा कालखंडात मारवाडी समाजाने सोलापूरच्या व्यापारविश्वाला आकार दिला.[८] हैद्राबाद, गुलबर्गा, मुंबई यांच्या दरम्यानचे सोलापूर हे मुख्य व्यापारी केंद्र बनले ते यामुळेच. मध्यकाळात आणि पेशवे काळात बैलगाडी आणि उंटावरून वाहतुक होत असे. बार्शी, लातूर आणि सोलापूर या भागातून मुंबईला व्यापार होत असे. इ.स. १८५९ साली मुंबइ-रायचूर दरम्यान रेल्वेमार्ग टाकण्यात आला. कुर्दुवाडी, बार्शी, लातूर, सोलापूर ही शहरे रेल्वे मार्गानी जोडली गेली.[९] सोलापुरातील पहिली प्रसिध्द मिल सेठ मुरारजी गोकुळदास या मुंबईतील व्यापाऱ्याने सुरू केली. हैद्राबादकडून येणारा कापूस व सोलापुरात उपलब्ध असणारा स्वस्त आणि मुबलक मजुरवर्ग आणि पाण्याची उपलब्धता यामुळे शेठ लक्ष्मीदास खिमजी यांनी लक्ष्मी कॉटन मिल सुरू केली. तर मालप्पा यांनी नरसिंग गिरजी मिल स्थापन केली. अशा पध्दतीने सोलापुरात कापड उद्योगाच्या रूपाने कारखानदारी सुरू झाली. 'कामगार' या नव्या समाज घटकाची भर पडली. दोन्ही महायुध्दात सोलापूरच्या कापड उद्योगाला चांगलेच महत्व प्राप्त झाले. सोलापूरच्या सामाजिक जीवनाला कामगार वर्गामुळे एक नवा आयाम प्राप्त झाला. कष्टकरी समाजाचा उदय ही सोलापूरच्या सानाजिक जीवनाला कलाटणी देणारी घटना होती.

त्यामुळे धार्मिक, सामाजिक प्रश्नांपेक्षा कष्ट आणि मजुरी हे प्रश्न महत्वाचे बनले. त्याचा एक फायदा मात्र नक्की झाला तो म्हणजे समाज संघटित व्हायला मदत झाली.

सोलापूरचे सामाजिक विश्व हे प्रारंभापासूनच बहुभाषिक आणि बहुधार्मिक राहिले आहे. मराठी, कानडी, तेलुगु, सिंधी, गुजराती, मारवाडी याबरोबरीनेच निजामी राजवटीच्या प्रभावामुळे उर्दू भाषेचा समावेशही इथल्या लोकजीवनात मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. आंध्र प्रदेश आणि कर्नाटक यांच्या सीमावर्ती भागात असल्याने तिन्ही राज्यांच्या संस्कृतीचा मिलाफ येथे पाहायला मिळतो. रेल्वे, कापड व्यवसाय, कापड गिरण्या यामुळे कामगार हा घटकही येथे प्रभावी ठरला. इ.स.१८५२ सालीच सोलापूरला नगरपरिषदेची स्थापना झाली. त्यामुळे समाज जीवनाला एक प्रशासकीय पैलू लाभला. अनेक विचार प्रवाह, अनेक मतप्रवाह त्यामुळेच इथे सहजपणे रूजले. एका अर्थाने बहुआयामी संस्कृतीचा झालेला इथल्या समाज जीवनात पाहायला मिळतो.

कोणत्याही समाज कार्यकर्त्याला समाजाच्या मनात असणाऱ्या भावनांचा, श्रध्दांचा, मानमान्यतांचा वेध घ्यावा लागतो. अशी जाणीव असणाराच खरा पत्रकार आपला प्रभाव समाजमनावर पाडू शकतो. अशा संपादकांचे पत्र समाजाकडून स्वीकारले जाते. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या बाबतीत असेच घडले असे म्हणावयास वाव आहे.

## 'कल्पतरू' कारांचे सामाजिक योगदान ः

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' हे केवळ सोलापूरचे आद्यवृत्तपत्र आहे किंवा या पत्राने शतायुषी वाटचाल केली इतकाच उल्लेख पुरेसा नाही. तर सोलापुरात सामाजिक प्रबोधनाच्या पर्वाचा प्रारंभ करण्याचे श्रेयही 'कल्पतरू' कडे जाते. बळवंत नारायण काकडे व श्रीनिवास नारायण काकडे या दोघा बंधूंकडे एक नितळ व संयमशील व्यक्तीमत्व म्हणून पाहिले जात होते. या दोघांचा सार्वजनिक जीवनातील वावर हा अत्यंत संवेदनशील होता. लोकशिक्षण घडविण्याची तळमळ त्यांच्या कार्यात होती.

त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत कै.गोविंद नारायण काकडे यांनीही आपल्या सामाजिक जीवनाला आकार दिला. या तिघांचीही वैचारिक बैठक ही सुधारणावादी होती. ना.गोपाल कृष्ण गोखले, न्या.रानडे, लोकमान्य टिळक, म.गांधी यांच्या विचारांची आणि कार्याची रूजवात सोलापूर जिल्ह्यात केली ती 'कल्पतरू'च्या संपादकांनी![१०]

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या पहिल्या पानावर पत्राच्या नावाच्या (मास्टहेडच्या) वरच्या बाजूस 'श्री सिध्देश्वर प्रसन्न' असे छापलेले असायचे. श्री.सिध्देश्वर हे सोलापूरचे ग्रामदैवत तरी आहेच पण त्याशिवाय आंध्र प्रदेश, कर्नाटकच्या सीमावर्ती भागात श्री सिध्देश्वरांची भक्ती करणारा मोठा वर्ग आहे. लोकांच्या दृष्टीने ते अत्यंत श्रध्देचे ठिकाण आहे. त्यामुळे श्री सिध्देश्वराचे देवस्थान हे गेली साडे सातशे-आठशे वर्ष लोकांच्या श्रध्देचा विषय राहिलेला आहे. श्री.सिध्देरामेश्वराचे सोलापुरातील मंदिर हा सोलापूरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळेही 'कल्पतरू' कारांना याचे महत्व पटले असावे. सोलापूर ही सिध्दरामेश्वरांची कर्मभूमी असल्याने त्यांचे लोकमानसातील स्थान बळवंतराव काकडे जाणून होते. त्यामुळेही 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या मास्टहेडच्याही वरच्या बाजूस 'श्री.सिध्देश्वर प्रसन्न' असे छापणे त्यांना अगत्याचे वाटले असावे. संक्रांतीच्या दरम्यान भरणारी गड्डा यात्रा आणि यात्रेदरम्यान निघणारी काठ्यांची मिरवणुक हा अनेक अर्थाने समाजावर प्रभाव पाडणारा विषय आहे. सोलापूरच्या सुप्रसिध्द चार हुतात्म्यांना याच यात्रेच्या दरम्यान म्हणजे दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी फाशी देण्यात आली. त्यामुळे या यात्रेलादेखिल एक राष्ट्रीय भावनेचे, राष्ट्रभक्तीचे, त्यागाचे मोल प्राप्त झाले. फार पूर्वी म्हणजे इ.स.१८८५ मध्ये बाबा कादरीच्या मशिदीवरून श्री.सिध्देश्वर मंदिराच्या नंदीध्वजाची (काठ्यांची) मिरवणुक नेण्यास मुसलमानांनी हरकत घेतली. त्यामुळे जातीय दंगा उसळला. हिंदु-मुसलमान यांच्यातील सोलापुरातील हा पहिला दंगा होय.[११]

याशिवाय इ.स.१९४२ च्या दरम्यानही एकदा असाच दंगा उसळला. वारंवार काही छोट्या-मोठ्या कारणांनी सुरामारी, हाणामारीसारखे प्रकार घडतच होते.

अशा अनेक कारणांनी 'गड्डा यात्रा' हा संवेदनशील विषय बनला होता. सोलापुरातल्या सगळ्याच समाजसुधारकांसाठी तो काळजीचाही विषय बनलेला होता. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या संपादकांनी हा विषय हाताळला नसता तरच नवल होते. 'सोलापूरची श्री सिध्देश्वराची यात्रा फार मोठ्या प्रमाणात नि अतिशय थाटात पडत असे. पण अलिकडे तिला विस्कळीतपणा येऊन तिच्या भवितव्याबद्दल औदासिन्य निर्माण झाले. ५-६ वर्षापूर्वीची ऐन यात्रेतील जातीय सुरामारी इत्यादी गोष्टीमुळे यात्रेस ओहोटी लागली. परंतु यंदा या यात्रेत नवचैतन्य ओतण्यासाठी सोलापूरच्या अनेक संस्थांनी चंग बांधला. सोलापूर शहर शांतता कमिटीने पुढाकार घेऊन देवस्थान पंच, तालिम संघ, मुस्लिम लीग नॅशनल गार्डस्, राष्ट्रसेवा दल व लोकसेवा संघ यांचे साहाय्याने परिश्रमपूर्वक आखणी करून जे कार्य केले त्याचे दृष्य फळ म्हणजेच यंदाची मोठी यात्रा होय. मध्यंतरीच्या मागासपणामुळे आजचे रूप उठावदार दिसत आहे' [१२]

हा जसा जातीय सलोखा राखण्याचा विषय हाताळला तसाच लोकांच्या श्रध्दा, यात्रेबद्दल असणारी लोकांची ओढ आणि भावना लक्षात घेऊनही 'कल्पतरू'कारांनी या विषयाला प्राधान्य दिलेले दिसते. कारण सोलापूर शहराला जातीय दंग्यांची थोडी काळी पार्श्वभूमी लाभली आहे. हिंदू-मुस्लिम जातीय दंग्यांच्या बाबतीत हे शहर सुरूवातीपासूनच संवेदनशील मानले गेले आहे. इ.स.१९२५ साली सोलापुरात दोनवेळा जातीय दंग्याने पेट घेतला. दिनांक २ ऑगस्ट १९२५ रोजी दंगा झाला तेंव्हा १0 हिंदू आणि ३ मुसलमान जखमी झाले. ही दंगल पोलिसांनी लवकर काबूत आणली तरी हिंदू-मुसलमानातील वैमनस्य कमी झाले नाही. वर्षातून दोनवेळा शुभराय बुवाच्या मठातून रथयात्रा निघते. या मिरवणुकीत वाद्य वाजवू नयेत असा हट्ट मुसलमानांनी धरला. त्यावरून ऑक्टोबर १९२५ मध्ये पुन्हा दंगल उसळली. मशिदीतून सोडावॉटरच्या बाटल्या

फेकण्यात आल्या, दगडफेक करण्यात आली. यात ७३ हिंदु आणि १0 मुसलमान जखमी झाले.[१३] इ.स.१९२७ च्या जुलै महिन्यातही रथयात्रेच्यावेळी पुन्हा दंगल उसळली. ३ हिंदू आणि २ मुसलमान बळी पडले. तर ४१ मुसलमान व २१ हिंदू जखमी झाले.[१४] स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही सोलापूर शहर नेहमीच हिंदू-मुसलमान दंग्याचे एक प्रमुख केंद्र राहिले आहे. इ.स.१९४७ सालीही अशाच जातीय दंग्यांना सोलापूर शहराला सामोरे जावे लागले. अशा सर्व तणावाच्या परिस्थितीत वृत्तपत्रांसारख्या प्रसार माध्यमांना अतिशय संयमी भूमिका घ्यावी लागते. एका जबाबदार सामाजिक जाणीवेचे दर्शन वृत्तपत्रांना घडवावे लागते. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' नेही अशाच संयमीपणाचे दर्शन घडविले. सोलापूरचे तत्कालीन डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट मि.क्रॉस्थवेट यांनी या दंग्याच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील सर्व पत्रकारांची एक बैठक बोलावली. जातीय दंग्याविषयी बातम्या देताना कोणती खबरदारी घ्यावी यासंबंधीचे पत्रक 'साहेब बहादुरांनी' समजावून सांगितले. 'सोलापुरात गडबड केल्याने पंजाब-बंगालच्या फाळणीवर त्याचा काही परिणाम होणार नाही, उलट येथल्या गडबडीत सोलापुरातील लोकांचीच प्राणहानी होण्याचा संभव आहे.'[१५] याची स्पष्ट जाणीव 'कल्पतरू' कारांनी आपल्या पत्रातून सोलापूरकरांनी दिली.

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' ने महिलाविषयक घडामोडींना तेवढेच प्राधान्य दिले. स्त्री शिक्षणाचा अत्यंत प्राधान्याने पुरस्कार केला. सार्वजनिक कार्यात स्त्रीयांचा सहभाग वाढावा यासाठीही 'कल्पतरू'कारांनी विशेष प्रयत्न केले.[१६] स्वातंत्र्यपूर्वकाळात महिलांचा सामाजिक कार्यातील सहभाग तसा नगण्यच होता. सोलापुरात याचकाळात एक 'महिला व्याख्यानमाला' चालत होती. ही व्याख्यानमाला चालविण्यात आणि मोठी करण्यात श्रीमती सुमतीबाई शहा, जयदेवीबाई लिगाडे, सौ. केशरलाल शहा, नगराध्यक्ष शेठ चंडक तसेच श्रीमंत नागप्पा अब्दुलपूरकर यांचे योगदान मोठे होते. या सर्वांनी प्रत्येकी रू. १0१ देणगी गोळा करून व्याख्यानमाला प्रारंभ केली. सेंट्रल टॉकीजची जागा

सर्वांना सोयीची होती. अनेक महत्वाच्या विषयांवर या व्याख्यानमालेत विचार मांडले जात असत. 'स्वतंत्र हिंदुस्थानातील स्त्रियांची कर्तव्ये' सारखे विषय व्याख्यानमालेत जात. प्राध्यापिका ताराबाई जोशी, श्रीमती ताराबाई मोडक, इंदुमती चिमणलाल शेठ, डॉ.कमलाबाई देशपांडे, सौ.हंसाबेन मेहता, सौ.इंदिराबेन मायदेवसारख्या वक्त्यांना या व्याख्यानमालेसाठी आमंत्रित केले जात असे. या सगळ्या उपक्रमाचा 'कल्पतरू' कारांनी मोठ्या कौतुकाने स्वागत केले. ते एका पत्रात म्हणतात, 'मालेचे विषय पाहिले म्हणजे स्त्री जीवनाचा इतक्याने विचार अन्य मालेमध्ये होणे कठीण वाटते. शहराच्या वाढीच्या दृष्टीने अशा संस्था अनेक निघाल्या, त्या कार्यक्षम ठरल्या तर शहरास उपकारक ठरतील म्हणून आम्ही तूर्त या व्याख्यानमालेचे स्वागत करतो.'[१७]

कोणत्याही वृत्तपत्राचे यश हे त्याच्या विश्वासार्हतेवर अवलंबून असते. लोकजीवनाशी, समाजाशी जोडलेली नाळ हे वृत्तपत्रांचे सर्वात मोठे भांडवल असते. 'कल्पतरू' कारांनी आपल्या पत्राच्या माध्यमातून आणि वैयक्तिक संपर्काच्या माध्यमातून समाजाशी असलेली ही नाळ अधिक घट्ट केली. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मधील विविध वृत्तांमधून, स्तंभामधून, बातम्या व लेखांमधून लोकांना माहिती मिळे, ज्ञान मिळे. शहर व जिल्ह्यातील लहान सहान घटना व घडामोडींना 'कल्पतरू'मध्ये स्थान मिळत असे.त्याकाळातील समाजामध्ये असलेली शिथिलता घालवून नवचैतन्य निर्माण करण्याचं काम 'कल्पतरू' ने केले. 'गोखले-रानडे प्रणित सामाजिक व राजकीय विचारांचं धुरिणत्व 'कल्पतरू' ने स्वीकारले असल्याने स्वाभाविकपणे सुधारणावादी व नवसमाज निर्मितीची प्रेरणा घेऊन हे वृत्तपत्र चालले. समाजमनाला नवा सामाजिक चेहरा मिळवून देण्यात 'कल्पतरू' चा वाटा मोठा आहे.'[१८] गणेशोत्सव व शिवजयंतीच्या माध्यमातून टिळकांनी समाज जागृतीचे नवे तंत्र समाजाच्या हाती दिले आणि स्वदेशी चळवळीचे शस्त्र दिले. पण जेंव्हा लो.टिळकांना १९०८ साली सहा वर्षाची शिक्षा झाली आणि या शिक्षेचे खापर ना.गोपाळकृष्ण गोखले यांच्यावर फोडण्यात आले. टिळकांच्या या शिक्षला ना.गोखले

हेच कारणीभूत होते असे सूचित करण्यात येत होते. त्यावेळी 'केसरी' कार लोकमान्य टिळकांना धारेवर धरायलाही 'कल्पतरू' कार कचरले नाहीत, हे विशेष![१९]

गोविंद नारायण काकडे हे त्यावेळी 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' चे संपादक होते. त्यांच्या लिखाणात ना.गोखले, रानडे यांच्या प्रागतिक विचारां प्रभाव होता. गोखले यांच्यावर केलेल्या दोषारोपांच्या संदर्भात 'कल्पतरू' कारांनी लिहिले –

"केसरीकारांच्या अकलेचे तारे तुटले!!"

"अलिकडे कित्येक दिवस केसरीकर्त्यांच्या बुध्दीस भ्रंश झाला आहे. निदान भ्रष्ट बुध्दीच्या एखाद्या वेड्याप्रमाणे ते नेहमी बहकत राहण्याचे सोंग तरी करीत आहेत... अलीकडे त्यांची साधारण तऱ्हा अशी ठरून गेली आहे की, त्याबद्दलचे खापर नेमस्त पक्षावर फोडलेच म्हणून समजावे."[२०] असे क्वचित कठोरपणाचे लिखाण 'कल्पतरू' ने केले. एकंदर त्यांची वृत्ती नेमस्तपणाची होती. धोरणही ऋजुतेचे होते. आपला संयम ढळू न देता 'कल्पतरू' कारांनी मार्ग काढला.

अंधरूढी आणि परंपरांनी बरबटलेल्या समाजाला नव्या विचारांची, नव्या श्रध्दांची जोड देण्याचं काम त्याकाळच्या वृत्तपत्रांनी केले. प्रेतयात्रा व मृतांचे संस्कार यासारखे विषयदेखिल वृत्तपत्रांनी आपलेसे मानले. त्याही पुढे जाऊन असे विषय ही समाजसुधारणेसाठी एक संधी मानून त्यावर आपले भाष्य केले. चुकीच्या प्रथांवर बंदी घालावी, स्त्रीयांच्या केशवपनास प्रतिबंध करावा यासाठीही 'कल्पतरू' ने पुढाकार घेतलेला दिसतो. त्यासाठी जगातील पुढारलेल्या देशातील पध्दती आणि कायदे काय आहेत याविषयीही माहिती 'कल्पतरू' मधून दिली जात असे. विशेषतः स्त्रीयांचे केशवपन व स्मशानभूमीत केले जाणारे भोजन याविषयीच्या वातम्या 'कल्पतरू'मध्ये दिसतात.[२१] विधवा पुनर्विवाह हादेखिल त्याकाळी अत्यंत संवेदनशील असा विषय होता. हा विषय वृत्तपत्रांनी हाताळणे हे देखील धाडसाचे मानले जात असे. विधवा पुनर्वि वाहाला प्रोत्साहन मिळावे म्हणून देशभरात कुठे एखादी अशी घटना घडली की, त्याचे वृत्त

आवर्जून 'कल्पतरू' मध्ये छापले जात असे. चाळीसगावातील यजुर्वेदी माध्याद्दीन शाखेच्या एका १७ वर्षीय ब्राह्मण विधवेचा वैश्य जातीतील पुरूषाशी पुनर्विवाह झाल्याचे वृत्तही 'कल्पतरू' ने दिले.[२२]

कोणताही समाज अधिक संवेदनशील आणि जागरूक राहायचा असेल तर सामाजिक संस्थांची भूमिका फार महत्वाची असते. सामाजिक संस्था, संघटना या समाज ब्दलण्यासाठी खूप महत्वाची भूमिका बजावत असतात.

वृत्तपत्रकारांना आपल्या शहर व जिल्ह्याची स्थिती नेमकेपणाने ठावूक असणे अत्यंत आवश्यक असते. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या संपादकांनाही या स्थितीची जाणीव पुरेशी होती असे अनेक वृत्तांमधून आणि लेखांमधून दिसून येते. या लोकस्थितीची व भौगोलिक स्थितीची जाणीव असल्याशिवाय सामाजिक प्रश्नांना हात घालता येत नाही. सोलापूर जिल्ह्याच्या स्थितीबाबत कल्पतरू कार लिहितात, "पूर्वी पासून म्हणजे फार दिवसांपूर्वी आमचा हा सोलापूर गांव व्यापाराचा गांव आहे. या जिल्ह्यासाठी सहा तालुके आहेत. या जिल्ह्याच्या लगत मोगलाई आहे. तालुक्याचे गांव पंढरपूर, माढे, करमाळे, बार्शी असे चार तालुके व मेहरबान वार्सनसाहेब सेकंड असिस्टंट कलेक्टर यांचे चार्जात आहे. सांगोले व सोलापूर शहर कलेक्टरसाहेब यांनी आपल्याकडे ठेविले आहेत व सोलापूर शहर डेप्युटी कलेक्टर यांचे अमलात आहेत. याप्रमाणे कामाची वाटणी योजत ही कामे अशा रितीने चालतात. परंतु ज्याप्रमाणे पुणे जिल्ह्यात वहिवाट चालते, त्याप्रमाणे या ठिकाणी काही अंशी कमी आहे असे म्हटल्यास चालेल कारण या जिल्ह्यात बहुत करून लिंगायत लोकांची वस्ती फार आहे. त्यात ते लोक बहुतकरून व्यापारी आहेत व त्यास विद्या मुळीच कमी असते त्यायोगाने त्या लोकांस आपले महत्व किंवा हक्क किंवा सरकारशी कोणत्या रितीने वागावे हे माहित नाही. तेंव्हा हे लोक बहुतेक करून अज्ञानासारिखे आहेत. यात संशय नाही. पुणे जिल्ह्यात बहुतकरून लोक विद्वान व सुशिक्षित आहेत. त्यायोगाने कायद्याचा अंमल जारी

राहतो. या जिल्ह्यात अविद्येची कृपा असल्याने लोक फार अज्ञानात राहतात व नानातऱ्हेचे अपायही सोसतात."

"तेंव्हा या रयतेस सर्वतोपरी सरकारशी कोणत्या रितीने वागावे व आपले हक्क व दावे मागावे असे प्रकार समजण्यास एक असोसिएशन हे साधन आहे. तेंव्हा आमचे जिल्ह्यातील लोक जर मदत करतील आणि एक असोसिएशन स्थापन होईल तर देश सुधारणेचे कारण होईल असे खचित आहे"[२३]

देश सुधारायचा असेल तर सामाजिक संघटन आवश्यक आहे. या ना त्या कारणाने समाज एकत्र आला पाहिजे ही आवश्यकता ओळखूनच 'कल्पतरू' कारांनी अशा एखाद्या असोसिएशनची सुरूवात व्हावी अशी आवश्यकता प्रकट केलेली दिसते. सोलापूरच्या सार्वजनिक जीवनाला अजून प्रारंभ झालेला नव्हता. लोक धार्मिक व वैयक्तिक कारणानेच एकत्र येत असत. पण त्या एकत्र येण्याला सामाजिक आशय नव्हता. ब्रिटीश राजवटीनंतर सामाजिक जीवनाला सुरूवात झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शहराच्या ज्ञात असलेल्या इतिहासात शहर हे नेहमी या ना त्या राजवटीमध्ये सातत्याने हेलकावे खात होते. प्रत्येक राजवटीमध्ये पध्दती निराळ्या होत्या. चालीरिती, नियम आणि सामाजिक जीवनाच्या पध्दती निराळ्या होत्या. त्यामुळे सोलापूरचे स्थिर असे सामाजिक जीवन विकसित झाले नाहीच. ब्रिटीश राजवटीने अशी स्थिरता पहिल्यांदा आणली. ब्रिटिश लोकांच्या जीवन पध्दतीचाही थोडा प्रभाव लोकांवर पडला. सार्वजनिक जीवनाला थोडी सुरूवात होऊ पाहात होती. त्यामुळेच 'कल्पतरू' कारांनी वर उल्लेख केलेली अपेक्षा कालसंगत वाटते. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मधील अग्रलेखामधून अशा सार्वजनिक जीवनाची आवश्यकता या ना त्या निमित्ताने व्यक्त केली जात असे. याचा परिणाम म्हणूनच काही सार्वजनिक सभासारख्या संस्था येथे सुरू झाल्या.

**सोलापूर सार्वजनिक सभा ः**

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या दिनांक १६ जानेवारी १८७0 रोजीच्या संपादकीयमध्ये संपादकांनी एखादी असोसिएशन असावी जेणेकरून देशहित साधला जाई ल अशी अपेक्षा केली होती. अशी एखादी सार्वजनिक संस्था सुरू व्हावी ज्यात लोकांना सहभागी होऊन विचारांची देवाण घेवाण करता येईल, चर्चा घडेल असा प्रस्ताव मांडला होता. या संपादकीय लेखाचा परिणाम म्हणून काही जाणते लोक अनौपचारिकपणे एकत्र येऊन ही कल्पना उचलून धरली आणि एक निश्चित असा आराखडा तयार केला. लोकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून व आवश्यकतेनुसार कार्यक्रमांची आखणी करता येईल तसेच संस्थेची औपचारिक घोषणा करावी अशी कल्पना मांडली गेली. "This historic meeting was held on 14th August 1870. The invitation were sent to a number of distinguished citizens including government officers. Invitation made it clear that the purpose of gathering was to discuss the issue of formation of an associration in the city. The meeting was open to all. Mr. Annaji Govind Inamdar, the owner and editor of Kalptaru Ani Anand Vritta had undertaken the responsibility of of convenig the meeting and pioloting the conduct of the proceedings. And to the pleasure of all the enthusiastic gathering of more or less 500 to 700 people discussed and ratified the proposal. Mr. A. G. Inamadar warmly welcomed the people and explained the purpose of gathering together at this particular hour in the history."[२४] सोलापुरातील आघाडीचे वकील श्री दिनकर बल्लाळ चक्रदेव आणि श्री विश्वनाथ नारायण सहस्त्रबुध्दे यांनी पुढकार घेऊन आण्णाजी गोविंद इनामदार यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मान्यता दिली. अनेक वक्त्यांनी यावेळी असोसिएशन स्थापन करण्याच्या कल्पनेला पाठींबा दिला. अनेकांच्या पाठींब्यांने "सोलापूर सार्वजनिक सभा" असे नामकरण या पहिल्या वहिल्या सार्वजनिक संस्थेचे करण्यात आले. याच सभेमध्ये "सोलापूर सार्वजनिक सभे" ची कार्यकारी समिती जाहीर करण्यात आली आणि सभेचे पुढील काळातील कामकाज आणि जबाबदारी या कार्यकारी समितीवर सोपविण्यात

आली. कार्यकारी समितीच्या सदस्यांनी या सभेची कार्यवाही नीटपणे पार पाडण्याची शपथ घेतली. त्यातील काही मान्यवर याप्रमाणे ः –

श्री रामचंद्र सखाराम मामलेदार

श्री रावसाहेब माधवराव जानोजी (सब – जज्ज)

श्री श्रीनिवास कृष्णा शिरस्तेदार

श्री दिनकर बल्लाळ चक्रदेव वकील

श्री गणेश बाबाजी मते

श्री नारायण गोविंद वकील

श्री गोपाळराव बाबाजी हेडमास्तर

श्री नरहर जनार्दन जोशी

श्री विश्वनाथ नारायण सहस्त्रबुध्दे

श्री नरसप्पा गुराप्पा डॉक्टर

श्री कृष्णराव मुळेकर

श्री सदाशिव रामचंद्र गद्रे वकील

श्री सिद्रामप्पा कारंजे

श्री वासुदेव बल्लाळ शिरस्तेदार

श्री रावजी अनंत मुळे

श्री गोविंद भास्कर

श्री वासुदेवराव हेड अकौंटंट – इरिगेशन

श्री रामचंद्र गोविंद मंगरूळकर

श्री नारो बापूजी मोडक वकील

श्री विश्वनाथ गणेश शिरस्तेदार

श्री नरहर विठ्ठल अत्रे

श्री तुकाराम कृष्णा रायचूरकर

श्री विष्णु गोविंद गोडबोले

श्री विष्णु दोड्डी – चिफ कॉन्स्टेबल सोलापूर

श्री पंढरीनाथ वामन राळेरासकर – चिफ कॉन्स्टेबल

श्री नरसिंगराव अनंत खजीनदार

श्री केशवराव नारायण प्रोपायटर वऱ्हाड समाचार

श्री खंडेराव व्यंकटेश देशपांडे

श्री व्यंकटेश दत्तात्रय सब रजिस्ट्रार

श्री सखाराम कृष्णा लिमये

श्री सुखलाल छटराम वकील

श्री पंढरीनाथ रामचंद्र कवठेकर

श्री नालचंद फतेचंद गुजर

श्री नारायण वेणुराव हेडकारकून

श्री आझम हसन साहेब रेशिमगार

श्री पांडुरंग आनंदराव लिमये

श्री आनंतचंद्र माळगी

श्री रामभट्ट काटेगांवकर

श्री नाना वैद्य

श्री नागो नारायण

श्री श्रीपाद राजाराम चाटी

श्री परशुरामपंत फडके

श्री सखाराम जनार्दन पाटणकर वकील

श्री प्रल्हाद भटजी मित्रगोत्री

श्री बाळाजी सिध्देश्वर केळकर, ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’, मालक

श्री महादेव सिध्देश्वर केळकर, ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’, व्यवस्थापक

श्री आण्णाजी गोविंद इनामदार, ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’, वार्ताहर

श्री गणेश दिनकर रानडे

श्री गणेश बाळकृष्ण

श्री बाळाजी महादेव ओव्हर्सिअर

श्री दिनकर जनार्दन

श्री वामनराव फलटनकर

श्री रामभाऊ जोशी

श्री सिद्रामप्पा लोखंडे

श्री ज्योतीचंद नेमचंद

श्री गणपत प्रसाद परांडकर

श्री नागय्या पदगाजी कोमटी

श्री आझम तय्यद अली कमरूद्दीन बोहरी

श्री टाटाजी माहीमकर

श्री सिध्दय्या कपळी

श्री महालिंगप्पा सावळे

श्री बापूशेठ कासार

श्री आबा वडगांवकर

श्री गुरूशांतप्पा करंजे

श्री दत्तात्रय भडंगे

श्री लक्ष्मण दिनकर शिंत्रे [२५]

आदि उपस्थितांची नांवे लगेचच्या 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मध्ये छापून आली. याचाच अर्थ या सार्वजनिक सभेचे महत्व किती आहे याचा अंदाज आपल्याला येतो. या सार्वजनिक सभेच्या बरोबरीने आणखी काही सामाजिक संस्थांचा जन्म याच सुमारास झाला. एखादे वृत्तपत्र सामाजिक चळवळीला कशा पध्दतीने गतीमान करते याचा पुरावा म्हणजे या सामाजिक संस्था आहेत.

**सोलापूर युनियन क्लब :**

सोलापुरातील युवकांना संघटित करण्यासाठी सोलापूर युनियन क्लब ही संस्था सुरू झाली. सोलापुरातील सुशिक्षित तरूणांमध्ये सामाजिक जाणीव जागृत करण्याच्या उद्देशाने ही संस्था सुरू झाली. सुरूवातीला काही माजी विद्यार्थी आणि शिक्षकांनी सातत्याने एकत्रित येऊन सामाजिक प्रश्नांची चर्चा करून कृती करण्याचा निर्णय घायला सुरूवात झाली.[२६] प्रारंभी या क्लबचे सभासद मर्यादित ठेवून ज्येष्ठ नागरिकांकडून योग्य ते मार्ग दर्शन घेऊन या क्लबचे कामकाज चालावे अशी कल्पना होती. जेणेकरून सामाजिक प्रश्नांवरची पकड चांगली राहून ते सोडविण्याकडे अधिक कल राहील. पण कालांतराने या क्लबची आणि कार्याची उपयुक्तता लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिक, सरकारी अधिकारी आणि सुस्थितीतील जमिनदारांनी या क्लबची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला. क्लबच्या कार्याची उद्दिष्टे आणि उपक्रम यांची व्यापकता वाढवली. काही अंशी क्लबची आर्थिक ताकद आणि मनुष्यबळ वाढविण्यासाठीही मदत केली. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' ने या क्लबच्या प्रत्येक घडामोडींना आपल्या वृत्तांमध्ये स्थान दिले. प्रत्येक कार्यक्रमाच्या सविस्तर बातम्या दिल्या. या क्लबच्या अंतर्गत खेळल्या जाणाऱ्या खेळांची यादी पाहिली तरी आपल्याला पुरेसा अंदाज येऊ शकतो की, किती मोठ्या प्रमाणावर या क्लबची उपयुक्तता होती. या क्लबच्या क्रिकेट टीमने सोलापूर, विजापूर आणि गुलबर्गा येथे क्रिकेटच्या स्पर्धा खेळल्या आहेत.[२७]

या क्लबचा केवळ खेळावरच भर होता असे नाही तर तत्कालीन सामाजिक प्रश्नांवर भाषण देण्यासाठी वेळोवेळी व्याख्यानांचे आयोजन केले जात असे. या भाषणामध्ये सामान्य माणसाच्या हिताचे विषय आवर्जून घेतले जात असत. इ.स.१८९0 पासून 'ग्रिष्म व्याख्यानमाला' आयोजित केली जाऊ लागली. या व्याख्यानमालेला नागरिकांचा अतिशय चांगला प्रतिसाद मिळत होता.[२८] असे असले तरी साधारणतः १८९0 च्या काळातील क्लबचे तत्कालीन सेक्रेटरी श्री आण्णाजी रावजी देगांवकर यांनी सभासदांच्या आळशीपणाबद्दल आणि उद्दिष्टापासून भरकटण्याबद्दल सडकून टीका केली.

सोलापूर युनियन क्लबच्या वतीने त्यांच्या सभासदांना वेळोवेळी होणाऱ्या काही सामाजिक परिषदांना, चर्चासत्रांनाही पाठविले जात असे. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या दिनांक २३ डिसेंबर १८९४ च्या एका अंकात एक बातमी दिली आहे. त्यानुसार युनियन क्लबचे उपाध्यक्ष श्री सखाराम रामचंद्र किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली क्लबची मिटींग झाली. त्यात युनियन क्लबचे १0 सदस्य सामाजिक परिषदेसाठी निवडण्यात आले. ते १0 सभासद असे ः –

श्री सखाराम रामचंद्र किर्लोस्कर

श्री श्रीधर नारायण साठे

श्री चिमाजी रघुनाथ करकरे

श्री नारायण बळवंत सरंजामे

श्री गौतम मोतीचंद शहा

श्री गणेश बळवंत झगडे

श्री शंकर आप्पाजी देगांवकर

श्री डॉ. एन ओ पायरस

श्री प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर

श्री गोविंदराव अब्दुलपूरकर [२९]

दिनांक २४ नोव्हेंबर १८९५ च्या 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या अंकात अशाच आणखी एका सामाजिक परिषदेसाठी २० जणांची निवड झाल्याचे वृत्त दिले आहे.[३०] सोलापूर युनियन क्लबने अशा अनेक उपक्रमातून समाजाचे स्वतःचे मत घडविण्यात मोठी भूमिका बजावली आहे. याशिवाय काही छोट्या छोट्या कार्यक्रमांद्वारे लोकांना एकत्र आणण्याचा आणि त्याद्वारे चर्चाविमर्ष घडविण्याचाही प्रयत्न केला आहे. उदा. सेवा निवृत्त झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांचा निरोप समारंभ आयोजित करणे. सोलापुरात नव्याने रूजू होणाऱ्या ब्रिटीश व भारतीय अधिकाऱ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करणे अशा माध्यमतून लोकांना एकत्र आणणे नव्या विचारांची आणि नव्या अधिकाऱ्यांची सर्व सामान्य लोकांना ओळख करून देणे.[३१] असा हेतू या कार्यक्रमांच्या आयोजनामागे होता.

सोलापूर युनियन क्लबच्यावतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणात आयोजित केला जाणारा कार्यक्रम म्हणजे "दसरा!" दसऱ्याच्या कार्यक्रमाचे विशेष आयोजन केले जात असे. छापील निमंत्रण पत्रिका सर्व सभासदांना पाठविली जात असे. खास दसऱ्यासाठी विशेष मंडप वगैरे उभारला जाई आणि लोकांना दुपारी बरोबर ३.०० वा. एकत्र यायला सांगितले जात असे. डिस्ट्रीक्ट कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर अशा मान्यवरांची भाषणे आयोजित केली जात असत. संगीत स्पर्धा, स्वागत गीत स्पर्धांचे आयोजन केले जाई. त्यानंतर सर्व मान्यवरांसह जमलेले लोक दसऱ्याच्या सिमोल्लंघनाच्या शोभायात्रेत सहभागी होत. अत्यंत उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणात ही शोभायात्रा निघत असे. शमीवृक्षाचे पूजन करून एकमेकांना अलिंगन देत दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या जात. शमीवृक्षाची पाने सोनं म्हणून एकमेकांना दिली जात असत.[३२] प्रत्येक वडीलधारी माणसे एकमेकांच्या घरी जाऊन पान-सुपारी घेत असत. दसऱ्यादिवशी संध्याकाळी प्रत्येकजण एकमेकांच्या घरी जाऊन आदरातिथ्य स्वीकारत पानसुपारीचा मान घेत आणि सोनं देत असे. सर्व सामान्य लोक संध्याकाळी कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर यांच्या घरी जाऊनही

सोन देत असत. दसऱ्याच्या दिवशी आकर्षक दारू काम केले जाई. संध्याकाळी होणारी ही आतषबाजी आणि दारूकाम हे दसऱ्याच्या सणाचे महत्वाचे वैशिष्ट्य मानले जात असे. दसऱ्याच्या दिवशी अशा दारूकामाची प्रथा ही पेशव्यांच्या काळापासून पडली असल्याचे डी.बी.पारसनीस यांनी आपल्या संशोधनात म्हटले आहे.[३३] पुण्याला पेशव्यांच्या काळात पर्वतीच्या डोंगरावर दसऱ्याला आकर्षक दारूकाम केले जाई व ते पाहण्यासाठी स्वतः पेशवे जातीने हजर असत.

अशा पध्दतीने अत्यंत आकर्षक व नयनमनोहर अशा दारूकामाने दसऱ्याची संध्याकाळ सजलेली असे. पुण्याच्या पेशव्यांच्या दसऱ्याप्रमाणेच सोलापूरचाही दसरा अत्यंत उत्साहाने आणि आनंदाने संपन्न होत असे. सोलापूर युनियन क्लबच्या पुढाकाराने दसऱ्याचे दारूकामही तितक्याच जोमाने आणि आकर्षक पध्दतीने पार पडत असे. या वैशिष्ट्यपूर्ण दारूकामामुळे सोलापूरचे नांव सर्वत्र पोहोचले होते. सोलापूरच्याच श्री जी बी मते यांनी या दारूकामावर "अग्निक्रीडा" नावाचे पुस्तकही लिहिले आहे.[३४] श्री जी बी मते यांना सातव्या एडवर्डसमोरही अशीच आकर्षक आतषबाजी करत निरनिराळ्या आकारातील व प्रकारातील दारूकाम सादर करण्याची संधी मिळाली. सोलापूर शहराने ही आकर्षक दारूकामाची परंपरा आजही कायम ठेवली आहे. सोलापुरातील सुप्रसिध्द "गड्डा" यात्रेच्यावेळी आजही दारूकाम केले जाते. शेवटच्या दिवशी होणारे हे दारूकाम पाहण्यासाठी आजही आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रातून लाखो लोक येतात. अलिकडे या दारूकामाला अत्यंत आधुनिक असे स्वरूप आले आहे.

**सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा ः**

सोलापूरचे सामाजिक जीवन समृध्द करण्यामध्ये ज्या सामाजिक संस्था व संघटनांचा सिंहाचा वाटा आहे त्यात 'सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा' या संस्थेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. सोलापूरचे नांव उज्ज्वल करण्यामध्ये या संस्थेचा वाटा मोठा

आहे. आपल्या स्थापनेची शंभरी पार करत आजही सातत्याने कार्यशील राहणारी व विस्तारत जाणारी ही संस्था आहे.[३५] काळानुसार आपल्या कार्यशैलीमध्ये सुधारणा करत आल्याने या संस्थेला समाजाकडून मिळणारा प्रतिसाद आजही आश्चर्यकारक असा आहे. पूर्वीच्या काळी या संस्थेने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धा या लहान मोठ्या सर्व लोकांसाठी होत्या पण आत्ताच्या काळी या स्पर्धा केवळ शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीच आयोजित केल्या जातात. पूर्वी प्रत्येक वक्ता स्पर्धकाला ३० मिनिटाचा वेळ दिला जात असे आता तो ७ मिनिट इतका दिला जातो.

सोलापूर नगरपरिषदेनंतर आपल्या स्थापनेची शताब्दी साजरी करणारी 'सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा' ही एकमेव संस्था आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. तसे पाहता 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या वृत्तपत्रानेही आपल्या वयाची शताब्दी साजरी केली. पण नंतर लगेच हे वृत्तपत्र आर्थिक नुकसानीमुळे नाईलाजास्तव बंद करावे लागले. या वृत्तपत्राला बदलत्या काळानुसार बदल करणे जमले नाही. आपल्या पारंपारिक स्वरूपाच्या बाहेर पडून वृत्तपत्राच्या रचनेत आणि 'कव्हरेज'मध्ये बदल करता न आल्याने वृत्तपत्र बंद करावे लागले. सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा ही संस्था याला अपवाद ठरली. काळानुसार आपल्या स्वरूपात आणि कार्यशैलीमध्ये सातत्याने बदल करत नव्या युगाचे नवे विषय हाताळत राहिल्याने या सभेला नागरिकांचा पाठिंबा मिळत गेला. समकालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक विषयांची, प्रश्नांची चर्चा सातत्याने करत राहिल्याने आणि काळानुसार आधुनिक साधनांचा वापर करत राहिल्याने या सभेला शंभरीनंतरही आपले अस्तित्व कायम टिकवता आले.

सोलापूर शहरातील नागरिकांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, शैक्षणिक दर्जा वाढावा, नवे नवे ज्ञान आत्मसात करता यावेत यासाठी शहरातील काही मान्यवरांनी एकत्र येऊन इ.स.१८८४ साली 'सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा' स्थापन केली. वास्तविक पाहता असाच प्रयत्न इ.स.१८७० साली एकदा झाला होता. पण तो यशस्वी होऊ

शकला नाही.[३६] 'सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा' ही संस्था स्थापन करण्यामध्ये श्री.सत्येंद्रनाथ टागोर, श्री.मल्लाप्पा वारद, श्री.दिनकर बल्लाळ चक्रदेव, श्री.प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर, श्री.गोविंद नारायण काकडे (संपादक, 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त') आणि श्री.गणेश व्यंकटेश जोशी आदि मान्यवर व्यक्तींचा पुढाकार होता. विविध विषयांवर मराठीतून उत्कृष्ट रित्या भाषण देण्याचे कौशल्य वाढीस लागावे हाच या सभेचा प्रधान हेतू होता. सामाजिक सुधारणेसाठी वक्तृत्व हीच एक कला उपयुक्त ठरणारी आहे यावर या सभेचा ठाम विश्वास होता. या सभेच्या वर्गणीदारांची एक सर्व साधारण सभा होती. शिवाय पदाधिकारी आणि निवडक ३ ते ५ सदस्यांचे कार्यकारी मंडळ असे. सभेचा सेक्रेटरी दोन ते तीन महिने अगोदरच किमान चार विषय वक्तृत्व स्पर्धेसाठी सुचवत असे. यातील तीन विषय सर्व नागरिकांसाठी खुले असायचे व एक विषय केवळ विद्यार्थ्यांसाठीच राखीव असायचा. खुल्या गटातील तीन विषयांपैकी एक विषय हा आवर्जून तत्कालीन राजकीय परिस्थितीशी निगडीत असायचा. उदा. 'भारतातील सरकारी यंत्रणेमध्ये कोणते बदल करायला हवेत?', 'प्रतिनिधी सरकार म्हणजे काय?' असे विषय घेतले जात असत.[३७] दुसरा विषय हा स्वाभाविकपणे सामाजिक, आर्थिक वा धार्मिक विषयाशी निगडीत असे. कारण तत्कालीन समाजजीवनाशी जोडलेले हे विषय असल्याने त्यांचा अंतर्भाव हमखास असायचा. इ.स.१८८६ मध्ये वक्तृत्व स्पर्धेसाठी "घाशीराम कोतवाल" शी निगडीत विषय निवडण्यात आला होता.[३८] तत्कालीन सरकारच्या विरोधात वक्तव्य न करता वक्त्याला सरकारी वकीलाप्रमाणे आर्ग्यूमेंट करावी लागत असे. याचाच अर्थ तत्कालीन वृत्तपत्राच्या माध्यमातून हा विषय लोकांच्या चर्चेमध्ये आलेला होता आणि संयोजकांना वक्त्याच्या माध्यमातून या प्रकरणाचे स्वच्छपणे, निरपेक्षपणे चित्रण उभे करायचे होते. तरीही अशा विषयांवर त्या काळातही टीका टिप्पणी झालीच. योगायोगाने इ.स.१९८0 च्या दरम्यान

विजय तेंडुलकरांनी याच प्रकरणाशी निगडीत एक नाटक रंगभूमीवर आणले आणि तेही वादापासून दूर राहू शकले नाही.[३९]

वक्तृत्व स्पर्धेसाठी काही विषय शैक्षणिक समस्यांशी निगडीत असत. नैतिक शिक्षणाची उपयुक्तता काय आहे, हे विषयही तितकेच महत्वाचे होते. अशा सगळ्या विषयांना सामावून घेणारी वक्तृत्व स्पर्धा सोलापूरच्या सामाजिक जीवनाला अधिक समृध्द करणारी ठरली.

अशा अनेक सामाजिक संस्थांच्या उभारणीमध्ये 'कल्पतरू' कारांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग होता. काही संस्थांच्या विकासामध्ये 'कल्पतरू' चे संपादक गोविंद नारायण काकडे, त्यानंतरच्या काळात लक्ष्मण गोविंद काकडे यांचा महत्वपूर्ण वाटा होता. या सगळ्याच संस्थांनी सोलापूरचे सामाजिक जीवनात महत्वपूर्ण भर घातली. सोलापूरमध्ये सामाजिक जीवनाला खरा आकार आला तो या सामाजिक संस्थांमुळेच, असे म्हटले तर वावगे ठरू नये. श्री गोविंद नारायण काकडे, श्री सिताराम विष्णू भावे, श्री रामचंद्र त्र्यंबक पटवर्धन, श्री शरणप्पा कौलगी, श्री.महादेव सरसिंग अब्दुलपूरकर, नारायण विष्णू सारोळकर, महादेव रामचंद्र रानडे आदि अनेक मान्यवरांनी या संस्थांना सार्वत्रिक करण्यामध्ये मोठी भूमिका निभावली. वक्तृत्त्वोत्तेजक सभा, सोलापूर युनियन क्लब, सोलापूर सार्वजनिक सभा अशा संस्थांनी शहरातील सुशिक्षित नागरिकांना एकत्र येण्याची, विचारविनिमय करण्याची सवय लावली. ब्रिटीश नागरिकांप्रमाणे सार्वजनिक जीवन जगण्याची एक नवी प्रथा सुरू झाली. या सर्वांचा परिणाम म्हणून भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक सशक्त होण्याला मदतच झाली.

**अन्य सामाजिक सुधारणांचे प्रयत्न :**

स्वातंत्र्यपूर्व काळातील समाज हा अंध रूढी, चाली प्रथा यांनी ग्रासलेला होता. तेंव्हा च्या समाजाच्या मनावर या गोष्टींचा भयंकर पगडा होता. आपल्या समाजाला या

रूढींच्या जोखडातून बाहेर काढल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य मिळणारच नाही हा आगरकर प्रणित विचार सर्वत्र रूढ झालेला होता. बऱ्याच अंशी ते खरेही होते. जुन्या काळातील सतीप्रथा, कन्या हत्या या सारख्या तत्कालीन प्रथांविषयी 'कल्पतरू' कारांनी विशेष लेखांमधून आसूड ओढले आहेत. हिंदुस्थानातील जुन्या प्रचलित चालीरितींपैकी तीन चाली अधिक अन्यायकारक होत्या. असे 'कल्पतरू' कारांचे म्हणणे होते. त्या तीन चाली म्हणजे – सती प्रथा, कन्या हत्या आणि त्रागा. यापैकी सतीची प्रथा ही हिंदुस्थानात सर्वत्र घट्ट रूजलेली होती. सगळ्याचा भागात या चालीचा पगडा असला तरी सगळीकडे विधवा सती जातच होत्या असे नाही. राजस्थानात सतीची प्रथा अधिक प्रबळ स्वरूपात होती. कन्या हत्येची पध्दतही बहुतांशी रजपूत लोकांमध्ये जास्त होती. त्रागा करण्याची पध्दतही याच लोकांमध्ये अधिक आढळून येते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या चालींचा समाजमनावर एवढा पगडा होता की, त्या नाहीशा होतील असे कधी वाटलेही नव्हते. या सगळ्याचा चाली रिती लोकव्यवहारातच रूढ होत्या असे नाही तर त्याचा धर्माशी संबंध जोडला गेला असल्याने त्या अतिशय काटेकोरपणे पाळल्या जातही होत्या. त्यामुळे त्याचे निर्मूलन करणे फारच कठीण होते.

सती आणि कन्या हत्या या सगळ्यांना माहित असलेल्या चाली आहेत. पण 'त्रागा' विषयीची माहिती केवळ 'कल्पतरू' कारांनी पहिल्यांदा दिली. त्रागाची चाल ही देखिल रजपूत लोकांमध्येच अधिक रूढ होती. 'त्रागा' म्हणजे शब्दशः त्रागा करणे होय. एखाद्या ऋणकऱ्याकडून सावकाराकडून घेतलेले कर्ज वसूल करावयाचे असेल तर हा त्रागा वापरला जात असे. रजपुतांमध्ये चारण आणि भाट यांच्याबद्दल अतिशय पूज्यभाव व आदरयुक्त भिती समाजामध्ये असे. एखाद्या सावकाराने एखाद्या ऋणकऱ्याला कर्ज दिले की, तो चारण समाजातील एखाद्या व्यक्तीला जामीनदार म्हणून घेत असे. कालांतराने कर्जदार कर्ज फेडण्यास उशीर लावत असेल तर हा जामीन राहिलेला चारण कर्जदाराच्या घरी जाऊना त्रागा करीत असे. स्वतःच्या गळ्याची शिर

कापून त्यातून येणारे रक्त कर्जदाराच्या अंगणात सांडत असे. ब्रह्महत्येसारखे चारण हत्येचे पातक आपल्या माथी नको म्हणून कर्जदार आपल्या सावकाराचे सर्व पैसे देऊन स्वतःही मुक्त होई आणि त्या चारणालाही जामीनदारीतूनही मुक्त करीत असे.[४०] पुढे इंग्रजी कायदा आला, न्याय पध्दती आली. त्यामुळे सावकाराचे काम अधिक सोपे झाले. या कायद्यामुळे त्रागाची पध्दतीही बंद झाली.

अशा अनेक चालीरिती व प्रथांबद्दल 'कल्पतरू' कारांनी आपले समाजप्रबोधनाचे कार्य अविरतपणे चालवले.

**काम सोड क्रोध सोड, लोभ टाक मोडूनी**
**मोह खोड दंभ फोड, द्वेष मार झोडूनी |**
**घे दया क्षमा सुशांती आदरेच ओढूनी**
**हो भवाब्धि पार नित्य सत्य ज्ञान जोडूनी ||** [४१]

अशा काव्यमय ओळींमधून समाजाला मार्गदर्शन करण्याचे कार्य 'कल्पतरू' ने केले. यातून समाजातील षड्रीपूंना हद्दपार करून एक चांगल्या समाजाच्या निर्मितीचा वसा 'कल्पतरू' कारांनी आपल्या हयातीत निभावला. समाजप्रबोधनाचे महत्वाचे माध्यम म्हणून 'कल्पतरू' कारांचे कार्य चिरंतन आहे.

**'सोलापूर समाचार' चे सामाजिक प्रबोधन** ः

'कल्पतरू' नंतर जवळपास १८ वर्षानी निघालेले आणि शतायुषी ठरलेले सोलापुरातील दुसरे वृत्तपत्र म्हणजे 'सोलापूर समाचार' होय. दिनांक ३ फेब्रुवारी १८८५ रोजी 'सोलापूर समाचार' ची सुरूवात झाली. वास्तविक पाहता समाचारच्या संपादकांना कोणतीही सामाजिक वा राजकीय पार्श्वभूमी वारसा हक्काने मिळालेली नव्हती. पण समाचारचे संस्थापक संपादक नरसप्पा जक्कल यांनी आपलीच स्वतःची नवी वाट निर्माण केली. संपादकांनी समाचारच्या माध्यमातून सोलापूरच्या सामाजिक चळवळीशी समरस

होत समाजमनाशी आपली नाळ जोडली. सोलापूरला समाचार सुरू होण्यापूर्वी इ.स.१८७४ मध्ये आवण्णा जक्कल यांनी अहमदनगर येथे 'नगर समाचार' या नावाने वर्तमानपत्र सुरू केले.[४२] एवढाच काय तो अनुभव जक्कल यांच्या पाठीशी होता. जक्कल घराणे हे मूळचे आंध्र प्रदेशमधील. इ.स.१८00 मध्ये जक्कल घराण्यातील लिंगुजी इस्तारी जक्कल यांनी कुटुंबाच्या पालनपोषणासाठी आंध्र प्रदेश सोडले आणि महाराष्ट्रात घोडनदी (शिरूर) येथे आले. इंग्रज सरकारच्या मिलिटरी स्टोअरमध्ये नोकरी पत्करून कामाला प्रारंभ केला. घोडनदी, मुंबई नंतर अहमदनगर असा प्रवास करीत ते अहमदनगरात थोडे स्थिरावले. तेथेच लिंगुजी जक्कल यांचे चिरंजीव आबण्णा जक्कल यांनी 'नगर समाचार' हे वर्तमानपत्र सुरू केले. नगर जिल्ह्यात ते वृत्तपत्र अत्यंत लोकप्रिय झाले. चटकदार व आकर्षक बातम्या, समतोल वृत्तीने प्रकाशित झालेले अग्रलेख आणि लोकजगृतीचे अचूक निरीक्षण यामुळे नगर समाचार लोकप्रिय झाले.

सोलापूर जिल्हा म्हणजे अत्यंत मागासलेला, अज्ञानी होता. शहरातील व्यापार व उद्योगधंद्यामुळे लोकसंख्येत भर पडत गेली. ही वाढलेली लोकसंख्या म्हणजे मजुरांची आणि कामगारांचीच होती. त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी होते. व्यापारी हे परंपरागत व्यापारी असल्याने त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण हे केवळ व्यापारी ज्ञानापुरतेच मर्यादित होते. अशा या वातावरणात वृत्तपत्रासारखी चळवळ विकसित व्हावी हे विशेषच. त्यातही ज्या घरामध्ये शिक्षणाचा वा सामाजिक कार्याचा किंवा राजकीय कामाचा कोणताही पूर्वानुभव नसताना नरसप्पा जक्कलांनी 'सोलापूर समाचार' च्या माध्यमातून किमया करून दाखवली असेच म्हणावे लागेल. केवळ ध्येयात्मक उच्च तत्व डोळ्यासमोर ठेवून समाचार पत्राची वाटचाल करणे अवघड असते याची पुरती जाणीव 'समाचार'कर्त्यांना होती. समाचारने निव्वळ शब्दांची आतषबाजी न करता, लोकांच्या अभिरूचीकडे, त्यांच्या समस्यांकडे अधिक लक्ष दिले. "ध्येयनिष्ठ शब्दावडंबरांनी राष्ट्रीय जागृती उत्पन्न होते हे सत्य असले तरी ज्या विशिष्ट जनसमुहाकरीता आम्ही स्वीकृत कार्य

आरंभिले होते त्यांची मनोभूमिका, त्यांची अभिरूची, त्यांचे हिताहित पूर्णपणे ओळखूनच त्यांच्या हित संवर्धनास पोषक असे व्यवहारी धोरण आम्हास स्वीकारणे क्रमप्राप्तच होते."[४३] अशी स्पष्ट भूमिका 'समाचार' च्या संपादकांची होती.

वास्तविक पाहता समाचारचे संस्थापक संपादक नरसप्पा आबण्णा जक्कल मूळचे आंध्र पदेशचे, मातृभाषा तेलुगु, सोलापुरात तशे नव्यानेच राहायला आलेले अशा विपरित परिस्थितीत एक मराठी वृत्तपत्र सुरू करून ते शंभर वर्ष टिकवणे हीच मुळात आश्चर्य कारक घटना आहे. 'सोलापूर समाचार' आजही चालू आहे. आता या पत्राचे नांव 'विश्व समाचार' असे आहे. वृत्तपत्र सुरू करण्यापूर्व जक्कल घराण्याचा सोलापूरशी तसा संबंध नव्हता. त्यामुळे सोलापूरची सामाजिक परिस्थिती त्यांना माहित असण्याचे कारण नाही. असे असूनही नरसप्पा जक्कलांमधील संपादकांनी एका 'लोक शिक्षका' ची भूमिका चांगली निभावली आहे. कोणत्याही पत्राचा संपादक हा 'संपादक' म्हणून आपल्या पत्राबरोबरच जन्माला येतो. 'सोलापूर समाचार' च्या बाबतीतही असेच झाले. पत्राच्या वाढीबरोबरच संपादकही वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ होत गेला असावा.

समाचारच्या संपादकांनी आपल्या वाचकांच्या प्रश्नांबाबत अतिशय तत्परता दाखविली. वाचकांच्या मनोभूमिकेचा विचार करून वृत्तपत्रातील सगळे विषय हाताळले. "सोलापूर जिल्ह्यातील अशिक्षित मागासलेल्या वर्गाला त्यांच्या विकारवश मनःप्रवृत्तीची अचूकपणे पकड घेऊन त्यांच्या संकोचित मनोभूमिकेवर ज्ञान प्रेरणा करण्याचे दुर्घट कार्य आम्ही स्वीकारलेल्या व्यवहारी व लोकहितकारी धोरणांमुळे यशस्वी होऊ शकले. हे प्रतिपादन करण्यास आम्हास बिलकुल प्रत्यवाय नाही. कोणतीही शस्त्रक्रिया करताना शस्त्राच्या तीक्ष्णतेची जाणीव न होऊ देता त्याच्या गुंगीतच काम उरकून घ्यावे लागते. तद्वतच अज्ञानी जनसमुहात ज्ञान प्रसार करताना त्या जनसमुहाची ग्रहण शक्ती, त्यांच्या मनोवृत्तीचे विशिष्ट वळण लक्षात घेऊन कटुत्वाची प्रखरता लक्षात घेऊन ती जाणवू न देता सहजसुलभतेने ज्ञानदान देण्याचे कार्य 'समाचार'ने निरलस बुध्दीने आणि यशस्वी

रितीने पूर्ण केले आहे."[४४] समाचारने ५0 वर्षाच्या वाटचालीनंतर प्रकट केलेले हे मनोगत आहे. एक अभ्यासक म्हणून या प्रकटनाकडे लक्ष वेधणे आवश्यक वाटले. ५0 वर्षाच्या वाटचालीनंतर समाचारच्या संपादकांच्या विचारामध्ये वैचारिक दृढता आलेली दिसते ती या प्रकटनातून जाणवते.

समाचारने सोलापूरच्या सामाजिक जीवनात मोलाचे योगदान दिले आहे. समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनांना 'समाचार'मध्ये महत्वाचे स्थान दिले जात असे. सोलापूर शहराला हिंदु-मुस्लिम दंग्यांची कटू पार्श्वभूमी लाभलेली आहे. अनेकवेळा हिंदू-मुस्लिम दंग्यांनी सोलापूर शहर होरपळून निघाले आहे. त्या त्यावेळी 'समाचार' ने अतिशय संयमी भूमिका घेऊन समाजातील सौहार्द वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. देशभरात कुठेही हिंदू मुस्लिम दंगा असो वा हरिजनांनांचे मंदिरप्रवेश असोत 'समाचार' ने आपली भूमिका अतिशय स्पष्ट शब्दांत मांडली आहे.

अस्पृश्यता निवारण चळवळीतील 'सोलापूर समाचार' ची भूमिक महत्वपूर्ण होती. म.गांधींनी तीन घटकांवर आधारित स्वातंत्र्य लढा चालविला. जागृती, प्रबोधन, यंग इंडिया, हरिजन ही वृत्तपत्रे प्रबोधनासाठी चालविली. शामजिक ऐक्य निर्माण व्हावे. समाजातील वर्गभेद नष्ट व्हावा म्हणून दलितोध्दारासाठी स्त्री शिक्षण वगैरेसाठी चळवळ केली. या तीनही घटकांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वसामान्य व्यक्तीला चळवळीत समाविष्ट करून घेतले. म.गांधींनी चातुर्वणीय व्यवस्थेचा पुरस्कार केला. गांधींनी कामगार, शेतकरी मजूर यांच्या हक्कासाठी लढा दिला. त्याच बरोबर स्पृश्य अस्पृश्य हा भेद दूर व्हावा म्हणून अस्पृश्यता निवारण चळवळ व्यापक प्रमाणावर वाढविली. सोलापुरातही अस्पृश्यता निवारण चळवळ यशस्वी ठरली.

गांधी-आंबेडकर यांच्या चर्चेतून पुणे करार घडून आला. या कराराने अस्पृश्यांचा संयुक्त मतदार संघात समावेश झाला. अस्पृश्यांचे प्रश्न सामाजिक असल्याने म.गांधीनी येरवड्याच्या तुरूंगातून भारत सेवक समाजातर्फे पत्रक वाटून अस्पृश्यता निवारण्याचा

प्रयत्न चालविला होता. अस्पृश्यांना गुरूवायूर मंदिर खुले करण्यासाठी प्रयत्न केले. या मंदिर प्रवेशाला बहुसंख्य स्पृश्यांचा विरोध असेल तर तो निर्णय मी ही मान्य करेन असे म.गांधींनी म्हटले. पण केवळ अडथळा आणला जात असेल तर २ जानेवारीपासून मी श्री  कौलप्पाबरोबर उपोषण करणार असे जाहीर केले. लोकमत जागृत करण्यासाठी कस्तुरबा गांधी, राजगोपालाचारी, उर्मिलादेवी अशा अनेकांनी दौरे काढून गुरूवायूर मंदिर अस्पृश्यांना खुले करून महात्मा गांधींचे प्राण वाचविण्यासाठी बहुसंख्यांनी आपला कौल गुरूवायूर मंदिर अस्पृश्यांना खुले करण्याकडे द्यावा यासाठी 'सोलापूर समाचार' ने "गुरूवायूर मंदिर खुले करा" असा अग्रलेख लिहिला.

शावनेर येथिल सार्वजनिक विहीरी, मंदिरे अस्पृश्यांना खुले व्हावेत म्हणून अस्पृश्यता निवारण समितीने खूप प्रयत्न केले.त्यास यश मिळाले नाही. त्यासाठी अस्पृश्यता निवाराण समितीचे कार्यकर्ते श्री तुळशीदास यांनी उपवास केला तेंव्हा सावनेरचे गुरूवायूर मंदिर खुले झाले, पण विहीरी खुल्या झाल्या नाहीत. त्यामुळे तुळशीदास यांचा उपवास चालूच राहिला. शेवटी सावनेर येथिल नागरिकांना सभा घेऊन मंदिर व विहीरी दोन्ही खुली केल्याचा ठराव करावा लागला तेंव्हा ३६ तासाचा उपवास तुळशीदास यांना मागे घ्यावा लागला. 'सोलापूर समाचार' ने आपल्या अंकात "३६ तास उपवास केल्यावर विहीरी–मंदिर खुली झाली" अशी बातमी दिली.[४५]

म.गांधींच्या संदेशाप्रमाणे अखिल हिंदुस्थानात अस्पृश्यता निवारण दिनाचा कार्य क्रम घेण्यात आला. या दिनानिमित्त अस्पृश्यांच्या वस्तीची पाहणी करणे, त्यांच्या तक्रारी, अडचणी समजावून घेणे, स्पृश्य आणि अस्पृश्यांची मुले एकत्र खेळणे तसेच जाहीर सभांच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणाचा प्रसार करणे असे अनेक कार्यक्रम अनेक ठिकाणी पार पडले. "अस्पृश्यता निवारणाच्या विरोधकांनी लक्षात ठेवावे की, काळ बदलला आहे. काळाबरोबर पावले पडली पाहिजेत. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिला त्यांच्या शिक्षणाची अडचण दूर झाली तर कोणता फरक पडेल. कारण धर्मांतर करून

अस्पृश्य हा स्पृश्य ठरतो. पण दिनवाणे उभ्या असलेल्यांना समानतेने वागवित नाहीत. त्यामुळे म.गांधींनी म्हटले की, अस्पृश्यांच्या आडरानातून हरिजनांना बाहेर आणा. हा म.गांधींचा संदेश आपण ऱ्हदयात ठेवावा" अशी विनंती 'सोलापूर समाचार' ने केली.[४६]

म.गांधींनी अस्पृश्यांच्या निवारणासाठी त्यांच्यात जशी जागृती घडविली त्याचप्रमाणे त्यांचे हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न केले. कारण हे अस्पृश्य हे आपल्या घरातील बंधूप्रमाणेच आहेत हे गांधींनी सांगितले. सार्वजनिक विहीरी, मंदिरे खुली करण्यासाठी प्रसंगी उपोषणाचे शस्त्र उगारले. समाजातील सनातनी वर्गाचा होणारा विरोध त्यामुळे हरिजन मंदिर प्रवेशाचे बिल सादर केले. हे बिल व्हॉईसराय लॉर्ड विलिंग्टन यांच्याकडे गेले असून ते मंजूर व्हावे म्हणून शेकडो ठिकाणी सभा झाल्या. सनातनी वर्गानीही ते मंजूर करू नये अशी मागणी केली असली तरी सनातनींपेक्षा सुधारकांचे बहुमत दिसून येते. यावरून व्हॉईसराय साहेब मंदिर प्रवेश बिलाला संमती देऊन त्याचा शेवट करतील अशी अपेक्षा 'सोलापूर समाचार' ने व्यक्त केली.[४७]

'सोलापूर समाचार' ने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील बातम्यांबरोबरच सामाजिक स्थितीकडेही लक्ष दिले. स्त्रीशिक्षणाकडेही समाचारने समाजाचे लक्ष वेधले. "ज्या काळात स्त्रीयांना गुलामी वृत्तीने दिवस काढावे लागत होते, सक्तीने सती जावे लागत होते, बालविवाह करावा लागत असे त्याकाळी स्त्रीयांची शिक्षणास सुरूवात म्हणजे भयंकर पाप समजले जात असे. त्याठिकाणी आता सर्वस्वाचा लोप होऊन एकदम उलट असे प्रकार घडून येऊ लागले आहेत या सर्वांच्या बुडाशी आहे ते म्हणजे स्त्री शिक्षणाची होत असलेली प्रगती होय.[४८] प्राचीन काळापासून भारतात स्पृश्य-अस्पृश्यांची दरी पाहावयास मिळते. काळाच्या ओघात ती कमी होताना दिसते. पूर्वी अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ मानण्यात येई. सध्या मात्र त्यांचा शेजार सहन करण्याची उदारताही पहावयास मिळते. त्यांना समान दर्जाने वागविण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.[४९]

अस्पृश्यांचा प्रमुख प्रश्न म्हणजे मंदिर प्रवेश होय. पुण्यातील पर्वती सत्याग्रहाच्या वेळी 'सोलापूर समाचार'ने समाजामध्ये जी स्पृश्य-अस्पृश्य दरी आहे ती कमी झाली पाहिजे. त्यासाठी अस्पृश्यांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी विचारवंतांना झटावे लागेल असे म्हटले. अस्पृश्यतेचे निवारण व्हावे अशी इच्छा असणाऱ्या यादीमध्ये शेठ भागोजी, बाळोजी कीर यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्यामुळे रत्नगिरी येथील पतीत पावन मंदिर श्री शंकराचार्यांच्या हस्ते उघडण्यात आले. हे मंदिर हिंदू म्हणविणाऱ्या व्यक्तीस खुले बनले. म्हणून 'सोलापूर समाचार' ने म्हटले की, अस्पृश्यांना सत्याग्रहासारखा मार्ग शोधीत बसविण्यापेक्षा त्यांना आपणच पतीत पावन मंदिरासारखे मुक्तद्वार निर्माण करणे हितावह आहे असा अग्रलेख लिहिला.[५०]

हिंदू-मुस्लिम ऐक्याला संपूर्ण देशातच हरताळ फासला गेला होता. सर्वत्र हिंदू - मुस्लिम दंग्यांनी आगडोंब उसळला. विद्वेषाचे वातावरण पसरले. अशा विषयांवरही 'सोलापूर समाचार' ने आपली लेखणी चालविली. दिवसेंदिवस हिंदूंचे ऐक्य भंग पावत चालले आहे. एकाच आईच्या दोन भावंडामध्ये बेकीचे भूत शिरले आहे. हिंदू व मुसलमान एक दिलाने, एक भावनेने एकाच ध्येयनिष्ठेने कर्तव्याला जागतील तर जगातील कोणतीच ताकद त्यांच्यात बिघाड उत्पन्न करू शकणार नाही. पण ऐक्याअभावीच कानपूर, बनारस येथे दंगे उद्‌भवले. हिंदू मुसलमानाच्या सण समारंभातही एकी असली पाहिजे. तरच दोन्ही समाजातील उतवीळपणा थोपवून धरता येईल. ही गोष्ट नुकत्याच पार पडलेल्या बकरी ईदच्या सणावरून स्पष्ट होते. दिल्ली, अलाहाबाद, कानपूर, सूरत, मुंबई येथिल पुढाऱ्यांनी गडबड होऊ नये म्हणून शांततेसाठी स्वयंसेवक उभ केले. पण बंगालमध्ये दंगा झालाच. त्यामुळे 'सोलापूर समाचार' ने हिंदू मुस्लिम ऐक्याच्या अभावाचे वर्णन करताना म्हटले "बकरी ईद आणि बेकी"[५१]

भारतामध्ये हिंदू समाजामध्ये देखिल उचनिचता ही ठासून भरलेली होती. वाईट चालीरिती आणि कुप्रथांविरूध्द 'समाचार' ने अक्षरशः जणू युध्दच पुकारले होते.

समाजातील अनिष्ट प्रथांविरूध्द अतिशय स्पष्ट शब्दात लेख व अग्रलेख लिहून समाचारने या गोष्टींचा समाचारच घेतला. असाच प्रकार नागपूर जिल्ह्यात पारडी गावी घडला. स्वतःला उच्च जातीतील समजल्या जाणाऱ्या हिंदुंनी शिकलकऱ्या हिंदुंना आपल्या विहिरीवर पाणी भरण्यास मज्जाव केला. उन्हाळ्याचे दिवस होते. त्यामुळे शिकलकरी समाजाची अवस्था फारच वाईट झाली. केवळ काही जण उच्च जातीचे तर काही जण नीच जातीचे. हे ठरवणारेही उच्चवर्णीयच. हा अन्याय का म्हणून सहन करायचा. एकाने वरीष्ठ जातीच्या नावावर कनिष्ठ जातीतील लोकांवर अन्याय करायचा आणि तो त्यांनी सहन करायचा अशी अपेक्षा करायची हे सर्वकाळ शक्य नसते. आपल्यावर होणारा अन्याय पाहून शिकलकऱ्यांनी मुसलमानांच्या विहिरीकडे धाव घेतली. त्यावेळी तुम्ही धर्मांतर केल्यास पाणी भरू देऊ अशी अट मुसलमानांनी घातली. दुष्काळाचे दिवस असल्याने पाण्याअभावी मरण्यापेक्षा धर्मांतर करणे चांगलेच या विचाराने शिकलकऱ्याच्या १00 लोकांनी धर्मांतर करून मुस्लिम धर्म स्विकारला. उरलेलेही त्याच मार्गाचा अवलंब करण्याच्या तयारीत आहेत असे वृत्त 'सोलापूर समाचार' च्या वार्ताहराने दिले. तेंव्हा 'समाचार' च्या संपादकांनी "स्वहित शत्रू हिंदू समाज" हा अग्रलेख लिहून या भेदाभेदाला वाचा फोडली.[५२]

इंग्रजी सरकारने सार्वजनिक संस्था व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी कायद्याने खुली केली होती. तरी स्पृश्य लोक हरिजनांना किती निर्दयपणे वागवित आहेत हे 'समाचार' ने वेळोवेळी दाखवून दिले. सोलापूरच्या अस्पृश्योध्दार सभेत नाशिकचे श्री वा न मराठे यांचे व्याख्यान चालू असताना दगडफेक झाली. श्री मराठे यांचे भाषण संपण्यापूर्वीच 'दगडे येण्यास सुरूवात झाली' असे समाचारने आपल्या बातमीत म्हटले होते. 'अशा तऱ्हेची नामर्द वृत्ती स्वीकारणारे व बायकांच्या नथीतून तीर मारणारांना पुरूष म्हणण्याची देखिल लाज वाटते.' अशा परखड शब्दात 'समाचार' ने या हीन वृत्तीची निर्भर्त्सना केली. 'एक एक दगड थोड्या थोड्या वेळाच्या अंतराने येतच होता.

असा प्रकार शेवटपर्यंत चालला तरी थोड्या खळबळीशिवाय काही झाले नाही व सभा शेवटपर्यंत पार पडली.' [५३] अशा स्पष्ट व परखड शब्दातील वार्तांकन 'सोलापूर समाचार' मध्ये आढळते.

"माणसे एकमेकांपासून कितीही भिन्न असली तरी ती मूलतः सारखी आहेत. म्हणून त्यांना मिळणारी वागणूकही सारखी असली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचे काही नैसर्गिक हक्क असतात ईश्वरदत्त म्हणा किंवा माणसाची माणूस म्हणून जी प्रकृती आहे तिच्यातच अंतर्भूत असलेले नैसर्गिक हक्क असणे हे माणसातले मूळचे सारखेपण आणि सर्व माणसांना हे हक्क सारखेपणाने बजावता येणे, सर्वांना समान वागणूक लाभणे यालाच सामाजिक समता म्हणता येईल. जगण्याचा हक्क, मालमत्तेचा हक्क, करार करण्याचा हक्क, विचार स्वातंत्र्याचा हक्क हे सर्व हक्क जर अबाधित राहण्यासाठी समाजातील सर्व घटक धडपडत असतील तर तो समाज समताधिष्ठीत आहे असे म्हणता येईल." [५४] अशा समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी वृत्तपत्रांची भूमिका फार महत्वाची आहे. आपल्या हक्कांची जाणीव समृध्द होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागरणाची आवश्यकता असते. रोज घडणाऱ्या घटनांमधून सामाजिक समता कशी अधोरेखित होईल याची काळजी वृत्तपत्रांसारख्या माध्यमांनी करावयाची असते. अशा अनेक घटनांचा अन्वयार्थ लावताना वृत्तपत्राच्या पानापानात सामाजिक समतेचे दर्शन कसे घडेल याचा प्रयत्न संवेदनशील संपादक करतोच. समाजहिताची जाणीव असणारा संपादक सामाजिक समतेचे तत्व आपल्या दृष्टीआड कधीच होऊ देत नाही. असाच प्रयत्न 'सोलापूर समाचार'ने अनेक वेळा केलेला दिसतो.

ज्यावेळी 'स्त्री शिक्षण' हा शब्ददेखिल सहन केला जाऊ शकत नव्हता अशा काळात सोलापुरात स्त्री शिक्षणाचे काही प्रयत्न चालू होते. पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या व उच्च विद्याविभूषित लोकांची संख्या जास्त असलेल्या शहरांमध्येही स्त्री शिक्षणाची चर्चा भितभितच केली जात असे. अशा काळी सोलापूरसारख्या शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या

मागासलेल्या शहरात सौ.लक्ष्मीबाई देशमुख, सौ लक्ष्मीबाई किर्लोस्कर, सौ.पार्वतीबाई देगांवकर, सौ.बसव्वाबाई वारद अशा कर्तृत्ववान महिलांनी स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेतला. काही 'शिक्षणप्रेमी सद्‌गृहस्थांच्या मदतीने व सहानुभूतीने "सरस्वती मंदिर" ही शिक्षण संस्था इ.स.१८९५ साली स्थापन केली. त्याकाळची परिस्थिती लक्षात घेता या महिलांनी टाकलेले हे एक धिरोदात्त पाऊल होते, असेच म्हटले पाहिजे. सौ.लक्ष्मीबाई किर्लोस्कर, सौ.बसव्वाबाई वारद, सौ शिवूबाई जक्कल वगैरे स्त्रियांनी पुढाकार घेऊन संस्थेत येऊन बसू लागल्या. केवळ प्रौढ स्त्रीयांकरीता नाही तर 'भावी गृहिणीं' करीता शिक्षणाची सोय झाली पाहिजे हे लक्षात घेऊन बालिकांना प्रवेश देण्यासाठी जनजागरण सुरू केले. घरोघर जाऊन स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिले. या सर्व चळवळीला 'सोलापूर समाचार' ने प्रोत्साहन तरी दिलेच पण त्याशिवाय जक्कल घराण्याचा प्रत्यक्ष सहभाग यात होता.[५५] कारण 'समाचार' चे संपादक श्री विठ्ठलराव जक्कल तसेच त्यांच्यानंतरचे संपादक श्री बाबुराव जक्कल यांचा सार्वजनिक जीवनातला प्रभाव आणि सहभाग चांगलाच होता.

श्री विठ्ठलराव जक्कल यांना इ.स.१९२१ साली सरकारने 'रावसाहेब' ही पदवी आणि इ.स.१९३१ साली 'रावबहादूर' ही मानाची पदवी दिली होती. यावरूनच त्यांचा सामाजिक कामातील सक्रीय सहभाग दिसून येतो. त्यामुळे सोलापुरातील महिलांनी सुरू केलेल्या 'सरस्वती मंदिर' या पहिल्या स्त्री शिक्षण संस्थेच्या उभारणीत जक्कलांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग होता. या शिक्षणसंस्थेच्या माध्यमातूनच 'सोलापूर संयुक्त महिला मंडळा' ची स्थापना झाली. या मंडळाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले जात असत. स्त्रीयांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी 'महिला शिक्षण सप्ताह' यासारखे कार्यक्रम राबविले जात असत. हे महिला मंडळ मध्यवर्ती महिला मंडळाशी जोडलेले होते. महिला शिक्षण सप्ताहाच्या उद्‌घाटनाच्यावेळी मध्यवर्ती मंडळाच्या सौ इंदिराबाई देवधर यांचे भाषण आयोजित केले होते. "याप्रसंगी शहरातील प्रमुख महिलांप्रमाणेच

आमंत्रित पुरूषवर्गही उपस्थित होता."[५६] अशी बातमी 'समाचारने दिली होती. अशा अनेक सामाजिक उपक्रमाला 'सोलापूर समाचार' ने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन दिले. अनेकवेळा अशा बातम्यांना 'समाचार' च्या पहिल्या पानावर स्थान दिले.

समाचारच्या संपादकांनी जसे स्त्री शिक्षणाच्या बाबतीत व त्यांच्या सामाजिक सहभागाच्या बाबतीत प्रयत्न केले तसेच लहान मुलांमध्ये तरूणांमध्ये शारिरीक बल वाढावे म्हणून अनेक प्रयत्न केले. विशेषतः तरूणांमध्ये बलोपासनेची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी यासाठी श्री बाबुराव जक्कलांनी खूप प्रयत्न केले. "इ.स.१९१९ साली पाडव्याच्या मुहुर्तावर श्री बाबुराव जक्कल यांचे खटपटीने 'बाल समाज' या नावाची संस्था सुरू करण्यात आली. या संस्थेकडून या समाजातील तरूण वर्गामध्ये शारिरीक व शैक्षणिक उन्नतीचे बरेच प्रयत्न झाले."[५७]

हुंडाविरोधी चळवळही याच काळात अधिक सक्रीय झाली होती. अनेक ठिकाणी हुंडा न घेण्याच्या – न देण्याच्या सामुदायिक शपथा घेतल्या जात होत्या. हुंडा न घेता लग्न केल्यास त्या नवरदेवाला बरीच प्रसिध्दी मिळत होती. याकाळात एखादी आश्‍चर्य कारक घटना घडली तर त्याला योग्य ती प्रसिध्दी दिली जाई. स्वातंत्र्य चळवळीने आणि स्वदेशीने जोर धरला होता. सिंधमध्ये एका लग्नात वधुवरांचा पोशाख नखशिखांत खादीचा होता आणि वधु पक्षाने हुंडा म्हणून नवरोबाला एक चरखा आणि एक पौंड कापूस दिला.[५८] ही समाचारने दिलेली बातमी आजच्या काळात थोडी गमतीशीर आणि आश्‍चर्यकारक वाटेल. पण स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक वातावरण आणि त्या काळातील सामाजिक स्थिती लक्षात घेता या बातम्यांचे महत्व पटायला लागते.

'सोलापूर समाचार' ने आपल्या वृत्तपत्रात सर्व प्रकारच्या बातम्यांना स्थान दिले होते. समाजाशी निगडीत असे सर्व विषय समाविष्ट करण्याच्या हातोटीमुळे समाचारने समाजातील प्रत्येक घटकाला आपलेसे केले. इ.स.१८९६ सालातील काही ठळक बातम्या पाहिल्या की त्याची व्यापकता लक्षात येते. याच वर्षी सोलापुरात मोठा दुष्काळ

पडला होता. त्यासंबंधीच्या वार्तांकडे दृष्टीक्षेप टाकल्यास दुष्काळाची तीव्रता लक्षात येते. दुष्काळामुळे व्यापाऱ्यांनी केलेली नफेखोरी, जनावरांचे व माणसांचे हाल, सरकारचे प्रयत्न या सगळ्यांवर झगझगीत प्रकाश टाकणाऱ्या या बातम्या आहेत हे लक्षात येते.

- "हैद्राबादचे गंगाधर शास्त्री या प्रसिध्द मांत्रिकाने मे. कलेक्टरांचे बंगल्यावर चमत्कृती पूर्ण प्रयोग करून दाखविले. साहेबांच्या सांगण्याप्रमाणे मंत्र सामर्थ्याने त्यांनी अननस, फणस वगैरे इकडे न मिळणारी फळे काढून दाखविली."
- "मुंबईचे शेठ लखमीदास खिमजी यांनी या साली लक्ष्मी गिरणी स्थापण्याचे ठरविले. श्री.थोबडे यांच्या मळ्याची ४८ एकर जागा दर एकरास ३४0 रू या दराने घेण्यात आली. त्याचप्रमाणे हैद्राबादचे राजा ग्यानगिरजी व नगरशेठ श्री वारद यांनी दुसरी गिरणी काढण्याची तयारी जोरात सुरू केली."
- "या साली जिल्ह्यात पाऊस कमी झाला व फायद्याच्या आशेने सोलापूरच्या व्यापाऱ्यांनी धान्याची मोठी खरेदी केली व कांही व्यापारी सट्टेही खेळू लागले. त्यामुळे धान्याचे भाव वाढले. परंतु त्याचा परिणाम गरीब लोकांवर विपरित झाला. धान्य लुटण्याची अफवा शहरभर पसरली. हजारो लोक बाजारात उभे राहिले. उत्तर हिंदुस्थानातही दुष्काळाचा तडाखा या साली जास्त होता. येथिल सावकारांनी व म्युनिसिपालटीने ६0 हजार रू चा फंड गोळा करून स्वस्त मालाची धान्याची दुकाने उघडली. या वेळी ज्वारीचा भाव रूपयास ६ शेर असा होता. शनिवार ता. 0७/११/१८९६ रोजी ज्वारी ४ शेर (रूपयास) झाली. रविवारी ढोलगे वाजवीत गरीब लोक कलेक्टरांच्या बंगल्यावर गेले. १५-१६ हजार लोक बाजारात जमले. धान्य वगैरे मालाच्या लुटालुटीस सुरूवात झाली. गुंड्या बोरामणी वगैरेच्या घरावर हल्ला झाला. पोलीसांस गोळीबार करावा लागला. गोळीबाराने ३ इसम मेले व ४/५ जखमी झाले. या लुटालुटीने सुमारे २५/३0 हजारांचे नुकसान झाले. या प्रकरणामुळे येथिल त्यावेळचे कलेक्टर श्री देशमुख

यांची बदली करण्यात आली असे म्हणतात. सोलापूरप्रमाणेच या साली बार्शी, अक्कलकोट, कलबुर्गी वगैरे ठिकाणी धान्याची लुटालुट झाली."

- "ता. १६ नोव्हेंबर १८९६ रोजी नरसिंग गिरजी गिरणीचा पाया घालण्यात आला."
- "लक्ष्मी मिलचे मालक शेठ लखमीदास यांनी या सालच्या दुष्काळातील निराश्रीत मुलांचा प्रतिपाळ करण्याचा खर्च करण्याचे कबूल केले."
- "दुष्काळामुळे शेतकऱ्यांनी खाटकांना जनावरे विकल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातून कातडे व शिंगाच्या आशेने हजारो जनावरे खाटकांनी कापली."
- रिलिफ वर्क्स काढून गरीब लोकांना मदत करण्याचा यासाली सरकारने प्रयत्न केला. परंतु त्याचा फायदा फारसा झाला नाही. सोलापूर जिल्ह्यात या कामावर ४० हजार लोक जगत होते. व सुमारे २१ हजार मुलांनाही पोसण्यात येत होते. कसायाकडून सोडविलेली सुमारे १८०० जनावरे येथील पांजरापोळात ठेवण्यात आली होती. येथील साळी कोष्टी वगैरेचे हातून रिलीफ वर्क्सवरील कामे होईनात म्हणून त्यांनाही मदत करण्याकरीता खटपट करण्यात आली. या प्रसंगी लो. टिळक मुद्दाम सोलापुरास आले होते."[५९]

सोलापूर शहर व जिल्ह्याच्या दृष्टीने इ.स. १८९६ हे वर्ष बऱ्याच अर्थाने महत्वपूर्ण ठरले. मोठ्या दुष्काळाने लोकांची सत्वपरीक्षा पाहिली. शर्वात मोठा दुष्काळ असल्याने तो ऐतिहासिक ठरला. काही चांगल्या घटनाही या वर्षात घडल्या. नरसिंग गिरजीचा पाया घातला गेला. कुर्डुवाडी ते बार्शी या मार्गावरील पहिली रेल्वे (इंजिन) चाचणी करण्यात आली. भारतात प्लेग या साथीच्या रोगाला प्रारंभ मुंबईतून झाला. लोकांच्या जीवनावर बरे वाईट परिणाम करणाऱ्या अशा अनेक घटना या काळात घडल्या.[६०]

जवळपास १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून सोलापूर शहराचे स्वरूप बहुभाषिक होत गेले. इ.स. १८०० सालापासून आंध्र प्रदेशातील तेलुगु भाषिक समाज येथे

स्थायिक झाला आहे. मराठी व कन्नड भाषिकांची संख्या येथे आधीपासूनच जास्त होती. व्यापार उदीम वाढला, उद्योगधंदे वाढले. मराठी, कानडी, तेलुगु या भाषांबरोबरच सिंधी, गुजराथी, मारवाडी या भाषिकांची संख्या इथे वाढू लागली. आपापल्या जातीतील लोकांच्या विकासासाठी, समाजाचे सुसंघटन करण्यासाठी, आपला समाज सुशिक्षित व्हावा यासाठी त्या त्या जातीतील पुढाऱ्यांची धडपड होऊ लागली. एका अर्थाने हे नव्या जाणीवांचे दिवस होते.

या परिषदेचे अध्यक्ष व सेवा निवृत्त डिस्ट्रीक्ट जज्ज श्री सी सी हुलकोटी यांचे अध्यक्षीय भाषण दिनांक १३ नोव्हेंबर १९४५ च्या 'सोलापूर समाचार'च्या अंकात छापले आहे. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री हुलकोटी म्हणाले, "आजची शिक्षण पध्दती ही सदोष असून ती आपल्या देशांस व जातीस पोषक अशी नाही. प्रचलित शिक्षणाने केवळ पदवीधर निर्माण केले असून त्याने उदरभरणाचा प्रश्न सोडवला नाही. काही पदवीधरांना सरकारी नोकरीत प्रवेश मिळाला. काही वकील, काही डॉक्टर यांची स्थिती देशाच्या राहणीच्या मानाने थोडीफार बरी आहे. ही गोष्ट वगळली तर बहुजन समाजाची स्थिती काय आहे. सुशिक्षित पदवीधरांना स्वतःच्या व स्वतःच्या देशाचा जो उद्योगधंदा, व्यापार उदीम या शिक्षणाने क्वचितच समरस होता आले आहे. हिंदुस्थानसारख्या देशात व्यापाराची औद्योगिक वाढ झाल्याशिवाय देशाची झपाट्याने प्रगती होणे शक्य नाही व नेमक्या याच साधनांचा चालू शिक्षणांत अभावपूर्ण आहे. म्हणून आता शिक्षणात बदल होऊन ते औद्योगिक, यांत्रिक, शास्त्रीय नि व्यापार विषयक झाले तरच देशाचा तरणोपाय आहे."[६६] तसेच याच अधिवेशनाच्या दरम्यान श्री बाबासाहेब वारद यांची सविस्तर मुलाखत 'सोलापूर समाचार' ने 'आमच्या प्रतिनिधीकडून' घेतली व ती सविस्तर छापली.

याच अधिवेशनाच्या दरम्यान वीरशैव लिंगायत महिलांचे देखील अधिवेशन पार पडले. "आजरोजी दुपारी ४ वा. वीरशैव महिला शिक्षण परिषदेचे १ ले अधिवेशन श्री सिध्देश्वर देवालयात सौ. पुट्टमणीदेवी सरनाईक यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाले.

प्रथमतः ईशस्तवन व स्वागतपद झालेवर स्वागताध्यक्षा सौ. संगव्वाबाई अब्दुलपूरकर यांनी उपस्थित प्रतिनिधी व अध्यक्ष यांचे स्वागत करून पुढील प्रमाणे भाषण केल्या. त्या म्हणाले, 'स्त्री शिक्षणाचे महत्व आपल्या वीरशैव समाजात म्हणावे तितके नाही. याचे कारण माझ्या मते आपल्या पुरूषवर्गाचे लक्ष शेतकी व व्यापार असल्याने पुरूषवर्गातही शिक्षणाचा अभाव फार दिसून येत आहे. नाही म्हणण्यास कर्नाटक व मैसूर प्रांतात आपल्या पुरूषांत शिक्षण प्रगती थोडी फार दिसून येते."[६१]

या वीरशैव महिला अधिवेशनाला 'सोलापूर समाचार'ने चांगलीच प्रसिध्दी दिली. स्वागताध्यक्षा सौ.संगव्वाबाई अब्दुलपूरकर, श्रीमती चिमणाबाई पटणे व महिला परिषदेच्या सेक्रेटरी सौ. जयदेवीबाई लिगाडे यांची छायाचित्रे छापली होती.[६२]

"सर्व शिक्षणात अग्रगण्य आहे. ही गोष्ट सर्वश्रुत व निर्विवाद आहे. कारण 'धर्मे प्रतिष्ठितम् निखलं जगत्' असे श्रृति वचन आहे. "धारणः द्धर्म इत्याहू धर्मेण विधुतः प्रजाः | यस्मध्दारण संयक्तः स धर्म इति निश्चयः ||" शिक्षण म्हणजे नुसते वाचणे लिहिणे नव्हे. शिक्षणाने खरे व शाश्वत सुख मिळाले पाहिजे. खरे सुख धर्माखेरीज दुसऱ्या कोणत्याही विषयाने मिळू शकत नाही."[६३] असे मर्मग्राही विचार महिला अधिवेशनाच्या अध्यक्षा सौ. पुट्टमणीदेवी सरनाईक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडले. एकंदर हे अधिवेशन सोलापूरच्या सामाजिक चळवळीला गती देणारे ठरले, असेच म्हणावे लागेल.

**अन्य समाजघटकातील सामाजिक चळवळी :**

सोलापुरात बहुसंख्येने असलेल्या मराठा, पद्मशाली, मुसलमान, जैन अशा समाजातही आपापल्या समाजासाठी धडपडणारी मंडळी होती. या सर्वांचे लक्ष शैक्षणिक विकासावर केंद्रीत झालेले होते. मराठा शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था श्री भ.रा.शिंदे व श्री स.रा.सूर्यवंशी यांच्या प्रयत्नातून इ.स.१९१९ साली अस्तित्वात आली. याच

संस्थेकडून इ.स.१९२१ साली वसतिगृह सुरू करण्यात आले. त्यावेळचे संस्थेचे उपाध्यक्ष श्री मा.मा.गव्हाणे यांनी जागा उपलब्ध करून देण्यासाठी धडपड केली. म्यूनिसिपालटीने व लोकल बोर्डाने इमारतीसाठी मदत दिल्यामुळे सध्याची इमारत उभी राहिली. जैन समाजही अधिक संघटित होता. नव विचारांची कास धरणारा होता. शिवाय धनाढ्य होता. त्यामुळे जैन समाजातील शिक्षणसंस्था तुलनेने लवकर आकारास आल्या. श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा इ.स.१८८५ सालीच सुरू झाली. तर चतुराबाई श्राविका विद्यालय ही संस्था इ.स.१९१२ साली सुरू झाली. जैन मुलींना व स्त्रीयांना धार्मिक शिक्षणाबरोबरच व्यावहारिक शिक्षण देणे हे या संस्थेने ध्येय ठरविले. इ.स.१९२३ साली ब्राह्मण समाज सेवा संघातर्फे गरीब विद्यार्थ्यांचे पालन पोषण व शिक्षणाकरीता डॉ.चाटी अनाथ विद्यार्थीगृह सुरू करण्यात आले. दुसरीकडे बहिष्कृत समाजाची सर्वांगिण उन्नती करण्याकरीता मुंबईच्या बहिष्कृत हितकारणी मंडळाने इ.स.१९२५ च्या जानेवारी महिन्यात बहिष्कृत समाज शिक्षण मंडळ व विद्यार्थी आश्रमाची स्थापना केली. इ.स.१९२५ सालीच भोईराज शिक्षण मंडळ सुरू झाले. सोलापुरातील मुस्लिम समाजास अरबी भाषेचे शिक्षण देण्याकरीता खान बहादूर हाजी हजरत खान यांनी आपले चीरंजीव आमदार नजीक खान यांच्या नावाने इ.स.१८९२ साली होम मैदानाजवळ 'लतिफीया अनाथगृह' सुरू केले. मुसलमानांतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी इ.स.१९२८ साली 'अंजुमने तरगीबे तालीम' ही संस्था खान बहादूर मुनशी ईस्माईल यांनी सुरू केली.[६४]

अशा अनेक संस्था या काळात सुरू झाल्या. या संस्थांच्या माध्यमातून त्या त्या समाजामध्ये शिक्षणाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी खूप मदत झाली. साधारणतः इ.स.१८८५ पासून ते इ.स.१९३0 पर्यंतचा हा काळ शैक्षणिक, सामाजिक चळवळींना आकार देणारा होता. समाजाच्या जाणीवा अधिक वाढवणारा हा काळ होता. समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण होते आहे, हेच या विविध संस्थांच्या

स्थापनेवरून दिसून येते. या सर्व संस्था संघटना स्थापन होण्यासाठी वृत्तपत्रांची भूमिका खूप लक्षणीय होती. सोलापुरातील वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनजागृती झाल्यामुळेच वेगवेगळ्या जाती समुहामध्ये आपले मागासपण झटकून टाकून पुढे जाण्याची प्रेरणा निर्मा ण झाली. 'सोलापूर समाचार' ने या सामाजिक चळवळीला प्रोत्साहन दिले.

भारतात बालविवाहाची प्रथा पूर्वापार चालू आहे. बालविवाहाची प्रथा रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकप्रबोधनाची गरज होती. कायद्याने बालविवाहाला बंदी घातली गेली. 'शारदा कायदा' असे या कायद्याचे नांव होते. या कायद्यानुसार लग्नासाठी मुलीचे वय १४ वर्षे आणि मुलाचे वय १८ वर्षे असणे बंधनकारक ठरले. हा कायदा झाला असला तरी समाजात या विषयी जनजागृती झाल्याशिवाय या कायद्याचे पालन केले जाऊ शकणार नाही, हेही तितकेच खरे! यासाठी समाजसुधारकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेले प्रयत्न अत्यंत महत्वाचे होते.

सोलापुरात या 'शारदा कायदा' भंगाचे एक प्रकरण खूप गाजले. सोलापुरातील जैन समाजातील पुढारी श्री माणिकचंद गांधी यांनी मुला-मुलीचे वय कमी असतानाही विवाह केला जात असल्याप्रकरणी सोलापूर येथिल ॲडिशनल जज्ज यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला. या अर्जानुसार 'श्री जीवराज मोतीचंद कासेगांवकर यांच्या मुली कु.प्रभावती (वय १४) कु.मनोरमा (वय १३) या दोघींचा विवाह ७ मे १९३१ रोजी संध्याकाळी ६ वा करण्याचे योजिले होते. पण दोन्ही वरांचे वय १६ ते १७ च्या दरम्यान असल्याने वधु-वरांचे वय अज्ञान समजले जावे व हा विवाह रद्द ठरवावा.' असा अर्ज दाखल केला. "ही दोन्ही लग्ने मेहेरबान कोर्टाने तहकूब करावीत तसेच वधु-वरांच्या आई-बापांच्या हातून आपल्या मुलांचे अशी लग्ने करण्याने हित संरक्षण होणार नाही. सबब त्यांचे अज्ञान पालन करण्यास नालायक आहेत. म्हणून त्यांचे पालन करणारा मी म्हणून कोर्टाने मला नेमावे." असा अर्ज दाखल केला. कोर्टात ४ वाजता दोन्ही वधु-वरांच्या आई-वडिलांनी साक्षी-पुराव्यात सिव्हील सर्जनची सर्टिफिकीटे सादर केली.

त्यावरून दोन्ही वधु–वरांची वये 'शारदा कायद्या' चा भंग करणारी नाहीत असे ठरवून श्री माणिकचंद यांचा अर्ज नामंजूर ठरवला.[६५] या प्रकरणाला 'सोलापूर समाचार' ने मोठी प्रसिध्दी दिली. साक्षी पुराव्यानुसार हे लग्न कायदेशीर ठरले असले तरी या प्रकरणाच्या निमित्ताने समाजात मोठी जागृती निर्माण केली. समाजातील अंध रूढींवर आणि वाईट प्रथांवर विश्वास ठेवून मुलां–मुलींवर अन्याय करणाऱ्या तसेच कायद्याचा भंग करणाऱ्या मनोवृत्तीवर याचा चांगलाच परिणाम झाला.

या प्रकरणात 'सोलापूर समाचार' ने केवळ प्रसिध्दी देण्याची भूमिका घेतली. पण त्यामुळे हे प्रकरण सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचू शकले. त्याचा योग्य तो परिणाम झालाच. वृत्तपत्रातील बातमीची विश्वासार्हता असतेच. त्याचा नकळत परिणाम समाजावर होतो. वृत्तपत्रात बातम्या कोणत्या असाव्यात हे बहुतांशी संपादकांच्या संवेदनशीलतेवर अवलंबून असते. संपादक हा समाजाभिमूख असेल तर समाजाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत समस्यांना वाचा फोडण्याचे काम तो करतो. असेच काही 'समाचार' च्या बाबतीत झाले. 'शारदा कायदा' प्रकरणाने अपेक्षित तो परिणाम साधला गेला. अशा घटनांचे निमित्त साधून वृत्तपत्रांना लोकशिक्षण करावेच लागते. तोच त्यांचा धर्मही असतो. स्त्री शिक्षण असो, सती प्रथा असो वा बालगुन्हेगारी सर्वच बाबतीत समाजाला वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रबोधन घडवून एक दिशा देण्याचे काम करावे लागते. अंधःश्रध्दा व अनिष्ट रूढी प्रथांमध्ये सापडलेल्या समाजाला नव्या विचाराच्या प्रकाश वाटेने घेऊन जाण्याचे कार्य वृत्तपत्रांना करावे लागते. याचेच आदर्श उदाहरण 'समाचार' ने घालून दिले.

**'गजनफर' चे सामाजिक योगदान ः**

'गजनफर' हे साप्ताहिक हुतात्मा कुर्बान हुसेन यांनी सुरू केले. सोलापूरच्या वृत्तपत्रसृष्टीत अल्पकाळ चमकून अंतर्धान पावणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे 'गजनफर' अल्पकाळ चालले. पण अतिशय प्रभावी काम या साप्ताहिकाने केले. हे साप्ताहिक डिसेंबर १९२७ मध्ये सुरू झाले आणि मे १९३0 च्या 'मार्शल लॉ' च्या काळात बंद पडले. उण्यापुऱ्या अडीच वर्षाच्या काळात आर्थिक आपत्ती व संपादकांचे आजारपण यामुळे २ ते ३ महिने प्रकाशनात खंड पडला. अडीच वर्षाच्या काळात जेमतेम १00 अंक प्रकाशित झाले असावेत. क्षणभरच वीज चमकून अंतर्धान पावावी तसा हा 'गजनफर' नावाचा तारा निखळला. 'गजनफर' चे संपादक श्री अब्दुल रसूल कुर्बान हुसेन म्हणजे एक धगधगते यज्ञकुंडच होते. ज्वलंत राष्ट्रनिष्ठा, हिंदू मुस्लिम ऐक्याची प्रामाणिक तळमळ आणि समाजाविषयी प्रेम असे 'अब्दुल रसूल कुर्बान हुसेन' या व्यक्तिमत्वाचे वर्णन करता येईल. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब म्हणजे 'गजनफर' हे साप्ताहिक होय. सोलापुरातील सुप्रसिध्द कवी कुंजविहारी हे 'गजनफर' कारांचे स्फूर्तिस्थान होते.

दुर्दैवाने 'गजनफर' चे अंक आज उपलब्ध नाहीत. पहिला अंकही उपलब्ध नाही. पण संपादकाच्या आजारपणामुळे खंडित झालेले प्रकाशन पुन्हा सुरू करताना "आत्मकथन" या अग्रलेखात कुर्बान हुसेन म्हणतात, "समाजसेवा आणि लोकशिक्षण या पवित्र हेतुने 'गजनफर' जन्मास आला." लोकसेवेची अत्यंत तीव्र तळमळ असल्यामुळे आणि आमचा संकल्प पूण्यकारक असल्यामुळे कर्त्या करवित्या 'पाक परवर दिगार' ने लोकसेवेची संधी पुन्हा दिली. ईलाही कृपेने लाभलेल्या संधीचा पूर्ण उपयोग करण्यासाठीच 'गजनफर' आजला लोकसमाजापुढे येत आहे."[६६]

धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि औद्योगिक प्रश्नांची सडेतोड चर्चा करताना कोणाच्याही धाकधपटशाला किंवा आमिषाला भीक घालणार नसल्याचा मनोदय त्यांनी निःसंकोचपणे व्यक्त केला. धार्मिक बाबतीत 'गजनफर' पूर्ण सहिष्णू असला तरी इतर

धर्मियांनी त्यांच्या धर्मावर उडवलेले शिंतोडे 'नामर्दपणे' सहन करणार नाही. अशी सडेतोड वृत्ती घेऊनच हे साप्ताहिक जन्माला आले. 'मजूरवर्गाच्या चळवळीत 'गजनफर' दीनदुबळ्या मजुरांची गाऱ्हाणी जनतेपुढे मांडून निर्भिडपणे त्यांची बाजू राखील. मजूरबंधूंच्या खऱ्या गाऱ्हाण्याची दाद लावताना तो मालक आणि मजूर यांचे परस्पर विषयक नाते आपुलकीचे आणि प्रेमाचेच ठेवण्याचा प्रयत्न करील. राष्ट्राच्या उन्नतीसाठी मालक आणि मजूरवर्ग मग तो गिरणीच्या आवारातील असो वा शेतीच्या कुंपणामधला असो या दोघांचीही राष्ट्राला सारखीच गरज आहे हे 'गजनफर' कधीही विसरणार नाही.

'गजनफर' ने पुढे म्हटले आहे की, "मजूर शेतकरी तरूणवर्ग, मुसलमान आणि समाज यांची सेवा करण्यासाठी पुन्हा चालू झालेला 'गजनफर' कोणतेही आणि कितीही जबरदस्त अडथळे आले तरी न थबकता पुढे जाईल आणि कसलीही बिकट परिस्थिती त्याच्यावर कोसळली तरी तो यापुढे बंद पडणार नाही अशा आत्मविश्वासानेच लोकसमाजाला व राष्ट्रपुरूषाला "अस्सलाम अलैकूम" करीत आहे!"[६७]

कितीही अडथळे आले तरी 'गजनफर' चे प्रकाशन बंद करणार नाही हा कुर्बान हुसेन यांचा निश्चय कितीही पक्का असला तरी नियतीच्या मनात वेगळेच होते. सोलापुरात दिनांक ८ व ९ मे १९३0 च्या दरम्यान उसळलेल्य दंगलीचा कट रचला या आरोपाखाली कुर्बान हुसेन यांना पकडण्यात आले. दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी इंग्रज सरकारने त्यांना फासावर चढवण्यात आले. वास्तविक पाहता कुर्बान हुसेन यांच्यामध्ये एक जन्मजात कार्यकर्ता होता. त्यांचा स्वभाव हा चळवळीत रमणारा होता. समाज कार्याची आवड होती. समाजाविषयी प्रामाणिक तळमळ होती. समाज प्रबोधनाची प्रचंड क्षमता असलेला एक संवेदनशील संपादक फासावर गेल्याने 'गजनफर' या साप्ताहिकाची जणू भुणहत्याच झाली असे म्हणावे लागेल.

'गजनफर' ने आपल्या अल्प आयुष्यात सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांचे विविध पैलू अतिशय प्रगल्भपणे हाताळले आहेत. 'स्वातंत्र्य', 'शिक्षण',

'स्वदेशी', 'हिंदू मुस्लिम ऐक्य', 'नगरपालिका व तिचा कारभार' असे अनेक विषय 'गजनफर' ने अतिशय जिव्हाळ्याने हाताळले. 'गजनफर' साप्ताहिकाची भाषा अतिशय प्रौढ व डौलदार होती. त्यांच्या लेखनशैलीमध्ये आव्हान होते, आक्रमकता होती. समतोल आणि अंतरंग स्पष्ट करणारे विवेचन, प्रसंगी वक्रोक्तीपूर्ण आणि उपहासगर्भ लेखनामुळे दर शुक्रवारचा 'गजनफर' चा अंक वाचकांची उत्कंठा वाढविणाराच होता."[६८]

अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांना जेमतेम २१ वर्षाचे आयष्य लाभले. इतक्या लहान वयात समाजसेवेची इतकी प्रखर तळमळ लाभलेली होती. लेखणी आणि वाणीतील धारदारपणा आणि त्याच्या जोडीला प्रखर राष्ट्रनिष्ठा यामुळे कुर्बान हुसेन तरूणांच्या व कामगारांच्या गळ्यातील ताईत बनलेले होते. कुर्बान हुसेन यांचे कार्य आणि व्यक्तिमत्व सगळंच आचंबित करणारं होतं. हुतात्मा कुर्बान हुसेन यांचा जन्म एका सामान्य व गरीब कुटुंबात झालेला असल्याने गरीबीचे चटके त्यांनी स्वतःच सोसलेले होते. त्यांच्या वडिलांचे फ्रेम मेकरचे साधे एक दुकान होते. कुर्बान हुसेन स्वतः लक्ष्मी – विष्णू गिरणीचे कामगार होते. त्यामुळे त्यांना अत्यंत गरीबी आणि हालअपेष्टांना, दारिद्र्याला आयुष्यभर सामोरे जावे लागले त्याचंच प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात पडलेले होते. त्यांच्या लिखाणाला स्वानुभवाची जोड होती. 'गजनफर' च्या माध्यमातून सामान्य माणसांच्या दुःखाला वाचा फुटायला लागली. गरीबांच्या वेदनांना शब्दरूप आले. या वैशिष्ट्यामुळे अधिक तीव्रतेने लोकांसमोर जाऊ शकले.

सोलापूर शहर हिंदू मस्लिम वैमनस्याने ग्रासलेले होते. इ.स.१९२५ साली दोनवेळा आणि इ.स.१९२७ साली एकदा इथे जातीय दंग्यांचा उद्रेक झाला. तसे यापूर्वीही अनेकवेळा दंगे झालेले आहेतच. पण जेंव्हा कुर्बान हुसेन यांचा काळ ग्रहीत धरला तर या दोन वर्षात तीन वेळा जातीय दंगली उसळल्या. कुर्बान हुसेन हे स्वतःच या जातीय दंग्याचे साक्षीदार होते. त्यामुळे त्यातून झालेली जीवित हानी, वित्त हानी

आणि दोन्ही समाजघटकांत रूंदावत गेलेली दरी त्यांच्या मनाला बोचत होती. त्यामुळेच त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आग्रह आयुष्यभर धरला. मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढल्याशिवाय या समाजाचा दृष्टीकोण विशाल होणार नाही. आणि त्याशिवाय उन्नती होणार नाही. याची पुरेशी जाणीव कुर्बान हुसेन यांना होती. म्हणूनच आपल्या भाषणातून आणि 'गजनफर' मधील लिखाणातून त्यांनी हिंदु-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला. कुर्बान हुसेन हे कृतीशील संपादक असल्याने त्यांच्या लिखाणाला कृतीची जोड असे. त्यामुळे हिंदू मुस्लिम दंग्याच्यावेळी केवळ मुस्लिमांची बाजू घेतली असे नाही तर प्रसंगी मुस्लिम समाजातील अंध रूढी आणि परंपरा यावरही त्यांनी आसूड ओढले. मुस्लिम समाजाला त्यांनी 'आत्मज्ञानासाठी आणि आत्मशुध्दीसाठी' प्रवृत्त केले. खऱ्या अर्थाने इस्लाम जाणणारा तो समाजसेवक होता. 'रमजाने शरीफ' चे महत्व समजावून सांगताना ते म्हणतात, "एमजाने शरीफचा पवित्र महिना आत्मशुध्दीसाठी आहे. या महिन्यातील प्रत्येक धार्मिक कर्तव्य कर्म या आत्मशुध्दतेसाठीच आहे. या महिन्यातील प्रत्येक चलन वलनसुध्दा आत्मशुध्दी साधण्यासाठीच आहे. या महिन्यातील नित्य नैमित्तिक कर्माच्या आचरणाने चित्तशुध्दी, विचारशुध्दी आणि देहशुध्दी या शुध्दी त्रयी सहजासहजी साधता येतात. रमजाने शरीफच्या या उभ्या महिन्यातील शुध्दीविषयीच्या परिपूर्णतेसाठी घडणाऱ्या खैरातीला-दान धर्माला श्रेष्ठ स्थान आहे."[६९]

जेंव्हा जेंव्हा संधी मिळेल तेंव्हा मुसलमान समाजाला खरा 'इस्लाम' समजावून सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. इस्लाम धर्मात खैरातीला – दान धर्माला श्रेष्ठस्थान आहेच. त्यातही अन्नदान श्रेष्ठ मानले जाते. एकाच दिवशी केलल्या अन्नदानापेक्षा कायमच्याच अन्नदानाचे मनःपूर्वक निःसंशय अधिक आहे. सणावारासाठी नवनवीन कपड्यांसाठी पैसे खर्च करतो. हेही परदेशी कापडासाठी पैसे खर्च करण्यापेक्षा "स्वदेशी कापड" घेण्यासाठी खर्च केले तर आपल्या हीनदीन अनाथ, बेकार व दरिद्री

बांधवांच्या पोटात चार घास अन्न पडणार आहे. पोटात पडलेल्या अन्नाने त्यांचा आत्मा संतुष्ट झाल्यास हे अन्नदान ऐहिक व पारलौकिकदृष्ट्या सर्वश्रेष्ठ आहे."[७०]

परदेशी कापडाच्या खरेदीतून आपण एका अर्थाने एत्तद्देशीय विणकर – मोमीन समाजाच्या पोटावर पाय देत आहोत. रमजानचा एक महिना पवित्र भावनेने उपवास करून शेवटी परदेशी कपडे अंगावर घालताना ढाका – कालिकत वगैरे सुप्रसिध्द ठिकाणच्या विणकर वर्गाच्या मोडलेल्या अंगठ्यातून वाहणाऱ्या रक्तात परदेशी कापडाची पैदास होते हे लक्षात ठेवा! दीनदुबळ्या विणकरांच्या पवित्र रक्ताने विटाळलेला कपडा अंगावर घालून 'ईद' साजरी केल्यास सबंध महिन्यात केलेली आत्मशूध्दी फोलच ठरणार नाही का? असा परखड सवाल मुसलमान समाजाला करतात. "मुसलमान बंधूंनो! निदान ईदच्या पाक दिवशी तरी 'नापाक' परदेशी कपडा अंगावर घालू नका!" असे कळकळीचे आवाहनही त्यात आहे. आपल्या धर्मातील कट्टरता लक्षात घेऊनही त्यातील अनिष्ठ प्रथांवर प्रहार करण्याचे धाडस केवळ एक सच्चा समाजसुधारकच दाखवू शकतो.

मुसलमान समाजाच्या शिक्षणाबद्दलही 'गजनफर' च्या संपादकांचा तितकाच ओढा होता. आपला समाज सुशिक्षित झाल्या शिवाय समाजाचे मागासपण संपणार नाही याची जाणीव त्यांना होती. होतकरू मुसलमान तरूणांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने गव्हर्नर साहेबांना भेटून ज्या मागण्या केल्या त्याचा पाठपुरावा त्यांनी आपल्या साप्ताहिकातून केला आहे. "लोकांत शिक्षणाची अभिरूची वाढते आहे. त्यामुळे त्या वाढत्या अभिरूचीची सोय करण्यासाठी भरपूर शिक्षणसंस्था सरकारने चालू करायला पाहिजेत. निरनिराळ्या जातीत व धर्मात सलोखा निर्माण करण्यासाठी एकत्र शाळा असाव्यात आणि विद्यार्थी दशेच्या कोवळ्या अंतःकरणावर परस्पराविषयी सलोख्याचे – परधर्म सहिष्णूतेचे गोड संस्कार झाले म्हणजे ते वज्रलेप होतात." असे ठाम प्रतिपादन करण्याची प्रगल्भता कुर्बान हुसेन यांच्याकडे होती.

‘शेरे आणि ताशेरे’ हा साप्ताहिक ‘गजनफर’ चा वैशिष्ठ्यपूर्ण भाग म्हणावा लागेल. अत्यंत खुमासदार शब्दांमध्ये हसत हसत टोपी उडवणारे सदर म्हणजे ‘शेरे ताशेरे’ [७१] समाजातील एखाद्या घटनेवर, व्यक्तीवर अत्यंत मार्मिकपणे टीका, कधी उपहासगर्भ विनोद तर कधी अक्षरशः खिल्ली उडवत एखादे ढोंग समाजासमोर उभे करणे अशा विविध माध्यमातून कुर्बान हुसेन यांनी समाजाचे प्रबोधन केले आहेत. गिरणी कामगाराचे प्रश्न असोत की, सोलापूर म्युनिसीपालटीतील सावळा गोंधळ असो, एखाद्या कार्यकर्त्याचे दुटप्पी वागणे असो हसता हसता अंतर्मूख करायला लावणाऱ्या या ‘शेरे ताशेरे’ मथून संपादकांनी खूप काही साध्य केले असेच म्हणावे लागेल.

बेळगांवच्या साहित्य संमेलनात कानडी–मराठी वाद उफाळून आला. त्याविषयीही ‘गजनफर’ कारांनी अतिशय परखड मते समाजासमोर मांडली आणि व्यापक दृष्टीकोण देण्याचा प्रयत्न केला. “कानडी व मराठी या दोन्ही भाषा एकाच देशाची दोन अंगे आहेत. मराठी सरस्वतीचा सत्कार खऱ्या कानडी वाग्सेवकांनी करणे उचित आहे आणि तो त्यांनी केला. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्या कन्नड भाषा पंडितांना इतका गंभीर सारासार कुठला असायला? असा परखड सवाल करून पुढे म्हणतात की कानडीचा कैवार घेऊन नसती रणे माजविणाऱ्या अंध अभिमानी कन्नड पंडितांनी खुप लक्षात ठेवावे की एकाच सरस्वतीची कानडी – मराठी ही दोन स्वरूपे आहेत. एका स्वरूपाच्या स्तोमभरात दुसऱ्याची नालस्ती करणे मूळ एकाच सरस्वती मातेची अवहेलना करणे होय![७२]

अत्यंत तरूण वयात सामाजिक व राजकीय कार्यात स्वतःला झोकून देणाऱ्या हुतात्मा कुर्बान हुसेन यांचे कार्य एवढ्यावरच थांबत नाही. स्वातंत्र्यासाठी बलिदान देऊन कुर्बान हुसेन यांनी सोलापूरची ही भूमी अधिक पवित्र केली आहे. कुर्बान हुसेन त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी हसत हसत फासावर गेले. ‘गजनफर’ हे साप्ताहिक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चालविले. झेमतेम अडीच वर्ष हे साप्ताहिक चालले. सामाजिक

ऐक्य हा कुर्बान हुसेन यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी केवळ कुर्बान हुसेन यांनाच फाशी दिली गेली असे नाही तर त्यांच्या बरोबर 'गजनफर' साप्ताहिकही देशाच्या स्वातंत्र्यासाठी बळी गेले.

हिंदू मुस्लिम या दोन्ही समाजामध्ये सर्वमान्य होईल असे नेतृत्व सोलापुरात पुन्हा जन्माला आलेच नाही. यावरून कुर्बान हुसेन यांची महत्ता लक्षात येते.

"समाजसेवा आणि लोकशिक्षण हा त्यांचा उद्देश होता. समाजवादी ऐक्य प्रवर्तक चळवळींना त्यांनी पाठींबा दिला. शेतकरी व मजूर यांच्या संघटना बांधण्यात त्यांनी आपला सहभाग दिला. शांततापूर्ण संपाचा अधिकार मजुराला परमेश्वरानेच दिलेला आहे असा त्यांचा दावा होता. अग्रलेख, स्फूट, सूचना आणि शेरे ताशेरे या सदरातून मजुरांच्या प्रश्नांचा उहापोह 'गजनफर' मधून सतत चालू होता. लक्ष्मी – विष्णू मिलमध्ये २०–२५ वर्ष सेवा केलेल्या काही कामगारांना एकदम कामावरून काढून टाकण्यात आले. त्यावरील 'गजनफर' ची टीका टिप्पणी ही कॅपिटॅलिझम, बोल्शेविझम आणि मालकमजूर संबंध या परस्परावलंबी विचारधारांचे मर्म बाळबोध शब्दांत सांगणारी आहे. समाजातील शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य, कर्तव्यशून्य पुढारी आणि भेदनीतीने दुरावलेली मने या पार्श्व भूमीवर चळवळ चालविणे म्हणजे हालअपेष्टांना आमंत्रण देणेच होते. झुंजार वृत्तीच्या निर्भय मनाच्या आणि दृढ निश्चयाच्या 'गजनफर' कारांनी हौतात्म्य स्विकारले. पण धैर्या कडे पाठ फिरवली नाही."[७३]

"मुसलमान समाजाच्या मागासलेपणाची खंत आणि शैक्षणिक विकासाची गरज त्यांनी 'गजनफर' च्या अनेक अंकातून सविस्तर चर्चिली आहे. नव्या शिक्षण संस्था काढाव्यात म्हणून सतत आवाहनही केलेले आहे. मुसलमान समाजाचे पुढारी वैचारिक दृष्ट्या मागासलेले व संकुचित वृत्तीचे, स्वार्थ साधणारे असल्याची खंत 'गुप्त शत्रुंचा सुळसुळाट' या अग्रलेखात व्यक्त करून आत्मनिरीक्षणाचा प्रयत्न केला आहे."[७४]

ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ नीळकंठ पुंडे यांनी आपल्या 'मार्शल लॉ आणि सोलापूरचे चार हुतात्मे' या पुस्तकात हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांच्या कार्याचा व कार्या मागील विचारांचा आढावा घेतला आहे. "डॉ.कृ.भी.अंत्रोळीकरांचे नेतृत्वाने सभा, परिषदा, मोर्चा, मिरवणुका यांत सर्वांबरोबर सहभागी होत असतानाच श्री कुर्बान हुसेन यांनी स्वतःची खास कार्यसाधने उभी केली. समाजवादाकडे नेणाऱ्या मजूर चळवळीच्या पायाभरणीत त्यांचा मोठा सहभाग होता. 'हेड जॉबरला लाच देण्याऐवजी महिना चार आणे भरून मजूर संघाचे सभासद व्हा. ते तुमच्या, मजुराच्या पोटाला मिळतील. पगार झाला म्हणजे १0–५ रूपये दारूत घालविता ते घालवू नका. आपल्याला संघ तीन गोष्टींकरता पाहिजे –

१. पोटभर अन्न आणि अंगभर कपडा.

२. राहावयास हवेशीर चांगली घरे.

३. मालकांच्या निष्ठूरपणामुळे ज्या मजुरांचे हाल होतात त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करणे."

या विचारात त्यांच्या मजूर चळवळीचे मुख्य सूत्र आहे."[७५]

हुतात्मा कुर्बान हुसेन यांना नियतीने फार छोटे आयुष्य दिले. पण जे दिले ते अतिशय भव्यदिव्य करण्यासाठी दिले. उण्यापुऱ्या २१ वर्षाच्या आयुष्यात कुर्बान हुसेन ज्या तडफदारपणे जगले त्याच तडफेने त्यांची लेखणी आणि वाणी चालली. मनामध्ये समाजाविषयीची अत्यंतिक तळमळ घेऊन हा कार्यकर्ता शेवटच्या क्षणापर्यंत देशासाठी जगला आणि शेवटी देशासाठीच मेला.

**'कर्मयोगी' चे सामाजिक योगदान ः**

'गजनफर' च्याही आधी दोन वर्ष म्हणजे इ.स.१९२४ साली सुरू झालेले पत्र म्हणजे साप्ताहिक 'कर्मयोगी' होय. कै. रामचंद्र ऊर्फ रामभाऊ राजवाडे यांनी हे पत्र

सुरू केले. लोकमान्य टिळकांच्या गीता रहस्यातील 'कर्मयोग' या शब्दावरून त्यांनी आपल्या साप्ताहिकाला नांव दिले. रामभाऊ राजवाडे यांचा पींडच मुळात एका सच्चा सामाजिक कार्यकर्त्याचा होता. विद्यार्थी दशेपासून अंगी बाणवलेली कडक शिस्त, कुशाग्र बुध्दीमत्ता, बाणेदार वृत्ती आणि संघटनशील स्वभाव यामुळे रामभाऊ राजवाडे सामाजिक कार्यात ओढले गेले. रामभाऊ राजवाडेंचा स्वभाव लोक संग्रहाचा असल्याने त्यांनी विविध क्षेत्रातील अनेक माणसे जोडली. इ.स.१९०७ साली कै. राजवाडे सोलापूरच्या नॉर्थकोट प्रशालेतून ते मॅट्रिक झाले. त्यांना देशी खेळांची आवड होती. कुस्ती, दांडपट्टा, कबड्डी, हुतूतु, आट्यापाट्या, अशा मैदानी खेळावर त्यांचे विशेष असे प्रेम होते. शरीर प्रकृती धडधाकट होतीच. पण त्याबरोबरच ते 'हायस्कूल स्कॉलर' म्हणूनही आपली विद्यार्थी दशा गाजवली.

मॅट्रिक झाल्यानंतर रामभाऊंनी महसूल खात्यात पाच-सहा वर्ष नोकरीही केली. या पाच सहा वर्षाच्या अनुभवानंतर त्यांनी नोकरी सोडली. "उपजत गुण म्हणा की त्यांचे अंगी बाणेदार राष्ट्रीय वृत्तीचा उदय पावू लागला म्हणून म्हणा त्यांना सरकारी नोकरीची बंधने नकोशी वाटू लागली. मनातील भावना उघड व्यक्त न करता त्यांनी नोकरी सांभाळून वकिली परीक्षेची तयारी सुरू ठेवली व १९१५ च्या अखेरीस ते हायकोर्ट प्लीडरचे परीक्षेत उत्तीर्ण झाले."[७६]

वकिलीची परीक्षा पास झाल्यावर त्यांनी वकिली व्यवसायात प्रवेश केला. इ.स.१९२२ नंतर सोलापुरातील अनेक सार्वजनिक संस्था, संघटनांशी रामभाऊंचा संबंध आला. अनेक संस्थांच्या कार्यकारी मंडळावर ते कार्यरत होते. त्यातूनच त्यांचा सार्व जनिक कामाचा पींड घडत गेला. प्रचंड बुध्दीमत्ता, खणखणीत आवाज, विषय मांडण्याची हातोटी, असामान्य व्यक्तिमत्व आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे सोलापूरच्या सार्व जनिक जीवनात त्यांनी आपला दबदबा निर्माण केला. या सामाजिक कार्याला काही तरी साधन हवे म्हणून 'राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळ लि.' ही संस्था त्यांनी स्थापन केली. या

संस्थेच्या माध्यमातूनच दिनांक २६ नोव्हेंबर १९२४ पासून 'कर्मयोगी' नावाने साप्ताहिक सुरू केले. थोडक्यात या साप्ताहिकाचा जन्मच सामाजिक प्रबोधनाच्या गरजेतून झालेला आहे. असे म्हणण्यास वाव आहे.

रामभाऊंच्या सामाजिक कामाचा आवाका मोठा होता. शिवाय विविधांगी कामाची त्यांची दृष्टी होती. 'हनुमान व्यायाम मंदिर' हे त्यांच्या दूरदृष्टीचे मूर्तिमंत प्रतिक होते. या व्यायाम मंदिराची स्थापना अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत झाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील जातीव्यवस्थेचे स्वरूपही घट्ट आणि अंधतेने भरलेले होते. त्या काळात रामभाऊ राजवाडे यांनी व्यायाम मंदिराची स्थापना केली. या व्यायाम शाळेला 'ब्राह्मणाची तालीम' असा उपहास गर्भ टोलाही हाणला जात होता. तसा शिक्काही या व्यायामशाळेवर मारला गेला. पण अशा अनेक समजुती दूर करून सर्व हिंदु समाजाला ही तालीम 'आपली' वाटण्यासाठी धडपड केली. याच संस्थेमुळे सोलापुरातील सर्व तालीम संस्थांचा एकच 'तालीम संघ' रामभाऊंच्या नेतृत्वाखाली तयार झाला. या तालीमबाज लोकांत खिलाडूवृत्ती निर्माण करून ती वाढीला लावण्याचे कार्य या 'कर्मयोगी' कारांनी केले. रामभाऊ राजवाडे हे एक उत्तम वाक्ते होते. कोणत्याही विषयावर सखोल विचार प्रकट करणे आणि त्यातून राष्ट्रीय भावना जागृत करणे हाच त्यांच्या भाषणाचा कल असायचा. एका कार्यक्रमातील भाषणाची बातमी 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मध्ये प्रकाशित झाली ती अशी, "संघशक्तीच्या अभावानेच पेशवे, निजाम, मोगल वगैरेंचा पराभव झाला. असे इतिहास सांगतो. आकड्यांचा हिशोब सोडला तर बहुसंख्य गवाळे लोकांना कवाईतीत तरबेज असणाऱ्या अल्प लोकांनी जिंकले. ही गोष्ट सत्य आहे. आपल्यामध्ये खिलाडूवृत्ती वाढली पाहिजे, खेळामध्ये विकासाला वाव आहे. क्रीडमंडळींमध्ये मतभेद आहेत पण त्यामुळे कामालाच अडथळा येणार असेल तर ती मंडळालाच नव्हे तर संपूर्ण शहराला कमीपणाची गोष्ट आहे." [७७] प्रत्येक संस्था एकजीनसीपणाने राहतील तर त्याचा

फायदा शहराच्या विकासाला व अंतिमतः राष्ट्रीय भावना जागृत होण्याला मदतरूप ठरू शकतात, असे त्यांचे ठाम मत होते.

कै. रामभाऊ राजवाडे यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. कुस्तीच्या आखाड्यात जसे ते रमत होते तसेच ते एखाद्या संगीताच्या मैफलीतही तितकेच तल्लीन होत होते. पण कार्यक्रम कोणताही असो, संस्था कोणतीही असो, तिचे अंतिम ध्येय समाजाच्या, राष्ट्राच्या विकासाचे असले पाहिजे ही तळमळ त्यांच्याकडे होती. सोलापुरातील श्रीराम संगीत विद्यालयाशीही त्यांचा निकटचा संबंध होता. "सोलापूर येथिल श्रीराम संगीत विद्यालयाचा तेरावा वार्षिक समारंभ दे. राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली गुजराथ समाज हॉलमध्ये दिनांक २२/१० रोजी रात्री मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. समारंभास अलोट गर्दी जमली होती. विद्यालयातील चालकांचे ईशस्तवनपर पद्य आणि विद्यालयातील मुलामुलींचा गायन वादनाचा व नृत्याचा सुंदर कार्यक्रम झाल्यानंतर विद्यालयाचा अहवाल दाखविला. विद्यालयासाठी घतना पसंत करण्यात येऊन सल्लागार मंडळ निवडल्याचा आणि संगीत विद्येबद्दल जनतेमध्ये अभिरूची उत्पन्न होऊन कलेचा विकास व्हावा या उद्देशाने विद्यालयातर्फे उत्तम गायक व वादकांचे कार्यक्रम वर्गणीदार व हितचिंतक यांचेकरिता नियमितपणे करण्याचा नवीन उपक्रम आखल्याचा अहवालामध्ये विशेष करून उल्लेख होता. अध्यक्ष समारोपात म्हणाले, "जीवनक्रम सुखकारक करण्याकडे गायन वादनासारख्या कलांचा अत्यंत उपयोग आहे. म्हणून सरकारने अशा संस्थांना ग्रॅण्टसच्या रूपात मिळणाऱ्या मदतीला काटकसरीची कात्री न लावता ग्रॅण्टस् द्यावेत. जेणेकरून संगीत शिक्षक व पालकांसाठी प्रोत्साहन मिळेल."[७८] असे प्रतिपादन रामभाऊंनी आपल्या भाषणात केले. संगीत विद्यालयाच्या एका कार्यक्रमासाठी रामभाऊंना आमंत्रित करण्यात आले होते तेंव्हा त्यांनी वरील विचार प्रकट केले. या कार्यक्रमाची बातमी 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मध्ये छापून आली. राजकारणाच्या

धकाधकीतही कै. राजवाडे हे उत्तम रसिक होते. त्यामुळे संगीतासारख्या कार्यक्रमांना त्यांची आवर्जुन हजेरी असायची.

सोलापूरच्या साहित्यिकांशीही त्यांचा जवळचा संबंध होता. दिनांक २८ जून १९३१ रोजी सोलापूरच्या साहित्य मंडळाची स्थापना झाली. त्याच्या कार्यकारीणीवरही राजवाडे यांचे नांव आहे. "साहित्याची सर्वांगिण सेवा करून जनतेत वाङमयाची अभिरूची वाढवावी याच हेतूने या साहित्यमंडळाचा घाट घातला. कै. रामभाऊ राजवाडे या साहित्यमंडळाचे सक्रीय कार्यकारिणी सदस्य होते."[७९] असे दिसते.

रामभाऊंनी सुरू केलेले 'कर्मयोगी' साप्ताहिक हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचेच एक अविभाज्य अंग होते. कै.रामभाऊंच्या वरोवर शेठ गुलाबचंद हिराचंद, भाऊसाहेब खडकीकर, पु. ग. भेके वगैरे जहाल लेखनशैली असणारी मंडळी होती. श्री प्र.वा बर्वे वकील हे 'कर्मयोगी' चे पहिले संपादक होते. या सर्वांच्या कामाचा एक समान धागा म्हणजे सर्वचजण लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. सगळ्यांचाच सोलापूरच्या सामाजिक जीवनात ठळकपणे वावर होता. 'कर्मयागी' साप्ताहिक केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशभर गाजले ते दिनांक ८ मे १९३0 च्या सोलापुरातील प्रकरणाची खरी हकिकत छापल्यानंतर! या प्रकरणानंतर रामभाऊ राजवाडेंना ७ वर्ष शिक्षा आणि दहा हजाराचा दंड करण्यात आला. रामभाऊंच्या अटकेच्या काळात डॉ जगदेवराव देशमुख यांनी संपादकपदाची धुरा सांभाळली. पण अखेर इ.स.१९३२ च्या जानेवारीमध्ये सरकारने प्रेस ॲक्टखाली 'कर्मयोगी' साप्ताहिक कायमचे बंद पडले."[८0] म.गांधी–आयर्विन करारानुसार कै रामभाऊ राजवाडे यांची सुटका झाली. इ.स.१९३२ साली 'कर्मयोगी' साप्ताहिक बंद पडले. तरीही राजवाडे यांचे सामाजिक कार्य अखेरच्या श्वासापर्यंत चालूच होते.

"कि घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने, बुध्द्याच वाण धरिले करि हे सतीचे" या उक्तीनुसार रामभाऊनी हेतुपुरस्सर, जाणीवपूर्वक या खडतर मार्गाचा अवलंब केला.

रामभाऊ राजवाडे हे बहुआयामी व्यक्तीमत्व होते. साप्ताहिक 'कर्मयोगी' हे त्यांच्या अनेक आयामांपैकी एक होते. रामभाऊंनी आपल्या सहवासाने, विचाराने, कृतीने, मार्ग दर्शनाने अनेक कार्यकर्ते घडविले. त्यांचे बोलणे आणि करणे यातील अंतर फार कमी होते. पहिल्या महायुध्दानंतर सगळीकडे प्लेग वगैरेसारखे साथीचे रोग भयानक स्वरूपात पसरलेले होते. या साथीच्या काळात तरूण मंडळींच्या साथीने हजारोंना मदत केली. कुणाच्याही मरणाला आणि तोरणाला चुकायचे नाही हा जणू त्यांचा स्वभाव होता. वेळी रामभाऊंना रामभाऊंना सहा सहा वेळा स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी जावे लागले तरीही त्यांच्या नियमात कधी खंड पडला नाही. हे करीत असताना त्यांनी कधीही जातीपातीचा विचार केला नाही. सोबतच्या तरूणांच्या मनातही तो येऊ दिला नाही. जातीव्यवस्थेला जणू त्यांनी आपल्या कृतीतून चोख उत्तर दिले होते. सर्वांवरचा प्रसंग सारखाच जाणून त्यांनी मदत करण्यात कै. राजवाडेंनी कधीच कमीपणा मानला नाही.[८१]

राजवाडेंना कुस्तीची आवड होती. सोलापुरातील अनेक तालीम संघाशी त्यांचा निकटचा संबंध होता. हिंदू-मुसलमानांमध्ये तणावाचे वातावरण असताना कुस्तीचे निमित्त होऊन हे वातावरण अनेकवेळा अधिकवेळा तंग होत होते. अशावेळी राजवाडे आपल्या अधिकारवाणीने दोन्ही गटांना शांत करीत असत. यासंबंधीचा एक प्रसंग श्री शेळगीकरांनी एका लेखात लिहिला आहे, "कै. राजवाडे हे एक तालीमबाज कुस्तीगीर वकील होते. अगदी अलीकडील प्रसंग सोलापुरातील ब्राहमण पैलवान नरसिंह यांची पंजाब तालीमीतील प्रसिध्द पैलवान सरदार याचेबरोबर चुरशीची कुस्ती नेमली होती. कुस्ती संध्याकाळी पाच वाजता होती. राजवाड्यांची नेमणूक सरपंच म्हणून झाली होती. सरकारी अधिकारी हजर होते. पोलीस बंदोबस्त भरपूर होता. दिवस फार अवघड होते. हिंदू मुसलमानांचे सलोख्याचे संबंध फारच दुरावले होते. कुस्तीस अतोनात गर्दी झाली होती. कुस्ती मेकानिकी थिरटरात होणार होती. कुस्तीची वेळ झाली. जनसमज फारच उत्सुक होता. दोन्ही पैलवान आपापल्या दैवतांचे व गुरूंचे जयघोष करीत

आखाड्यात उतरले. सिंह गर्जना झाली. पहिली सलामी दिली गेली. कुस्ती चुरशीची होती. पंच व सरपंच डोळ्यात तेल घालून बिजलीसारखे इकडून तिकडे हालत होते. अर्धा तास झाला कुस्तीचा निकाल लागला नाही. अखेर वेळ संपली व कुस्ती बरोबरीने सोडण्याचा निर्णय पंचानी दिला. पैलवान सरदार व त्यांची मंडळी यांनी निकालाविरूध्द गडबड करण्याचा प्रयत्न केला. काय होईल याबद्दल प्रेक्षकांमध्ये गडबड, बडबड सुरू झाली. पण कै. राजवाडे डगमगले नाहीत. पंचांचा निर्णय बरोबर होता. त्यांनी दोन्ही पैलवानांच्या गर्जना आपल्या अधिकारवाणीने थांबविल्या. दोन्ही पैलवानांची मनगटे आपल्या सामर्थ्यवान हातांनी घट्ट पकडली व दोघांनाही हाताने खेचून प्रेक्षकांसमोर आणून सरकारी अधिकाऱ्यांसमक्ष कुस्ती बरोबरीने सुटल्याचा निकाल जाहीर केला. लोक चर्चा करीत निघून गेले. प्रसंग टळला व सोलापुरात शांतता निर्भंग राहीली. हा राजवाड्यांच्या प्रसंगावधानाचा व धैर्याचा क्षण नव्हे काय?"[८२]

सोलापुरातील हिंदू-मुसलमान वैमनस्य सर्वश्रुत होते. हिंदू मुसलमान दंग्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात सोलापूर कुप्रसिध्द होते. वातावरण नेहमीच तंग असायचे. रामभाऊ तरी हिंदूंचे आघाडीचे पुढारी होते. असे असूनही जेंव्हा जेंव्हा हिंदू-मुसलमानांमध्ये वातावरण तणावाचे असायचे तेंव्हा तेंव्हा रामभाऊ दोन्ही समाजामध्ये निडरपणे फिरून लोकांची डोकी शांत ठेवण्यासाठी प्रयत्न करीत असत. त्यांच्या निःपक्षपातीपणाबद्दल सर्वांना खात्री असायची. याचे मुख्य कारण म्हणजे निःस्वार्थ वृत्ती आणि सर्वस्तरावरील त्यांचे असलेले निकटचे संबंध!

समाजातल्या अनिष्ट रूढी प्रथांबद्दल राजवाडे यांच्या मनात चीड होती. स्वतः कट्टर हिंदुत्ववादी असूनही हिंदु धर्मातील अंध रूढींबद्दल, चालीरितीबद्दल त्यांनी आपली मते अतिशय मोकळेपणाने व्यक्त केली आहेत. अशा गोष्टींवर त्यांनी कधीच पांघरूण घालण्याचा किंवा पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला नाही. समर्थन करण्याचा प्रश्नच नव्हता. हिंदुत्वाबद्दलचा त्यांचा दृष्टीकोनही अतिशय व्यापक व शास्त्रशुध्द होता.

स्वा.सावरकरांचा लाभलेला सहवास किंवा मार्गदर्शन यामुळेही हिंदुत्वाबद्दलची त्यांची दृष्टी व्यापक बनली असावी. हिंदु-मुसलमान या दोन समाजात जेंव्हा जेंव्हा तणावाची स्थिती निर्माण झाली तेंव्हा तेंव्हा रामभाऊ राजवाडेंनी टोकाची किंवा पक्षपाती भूमिका घेतली नाही. वातावरण लवकरात लवकर शांत होऊन संबंध पुन्हा सलोख्याचे कसे होतील याचा त्यांनी नेहमी प्रयत्न केला.

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'गजनफर' अशी अनेक वृत्तपत्रे त्याकाळी निघत होती. सर्वांशीच रामभाऊ राजवाडेंचे सलोख्याचे संबंध होते. आजच्या इतकी व्यावसायिक स्पर्धा त्याकाळी वृत्तपत्र क्षेत्रात नव्हती. तरीही समव्यवसायिकांशी संबंध कसे असावेत याचा एक वस्तुपाठ म्हणजे रामभाऊंचे व्यक्तीमत्व होते. 'सोलापूर समाचार' चे संपादक बाबुराव जक्कल रामभाऊ राजवाडेंबद्दल सांगतात की, "श्री रामभाऊ यांच्या 'कर्मयोगी' पत्राशीही आमच्या समाचार पत्राचा शेवटपर्यंत सलोख्याचा संबंध राहिला. श्काच व्यवसायात असून स्नेहाचे संबंध असणे कठीण असते परंतु श्री राजवाडे यांचा असा अष्टपैलू होता की, ते सहसा सार्वजनिक आयुष्यात शत्रुत्वाची भावना निर्माण होऊ देत नाहीत. ते हिंदू पुढारी असतानासुध्दा शहरातील समंजस मुसलमान पुढाऱ्यांशी त्यांचे संबंध सलोख्याचे होते."[८३]

दुर्दैवाने दिनांक १० मे १९३० च्या 'सोलापूरच्या दंग्याची खरी हकिकत' सांगणारा 'कर्मयोगी' चा अंक वगळला तर बाकीचे कोणतेही अंक उपलब्ध नाहीत. अन्यथा रामभाऊ राजवाडे यांच्या सामाजिक कार्याचा व प्रबोधनाचा फार मोठा पट आणखी उलगडत गेला असता. 'कर्मयोगी' साप्ताहिक फार दिवस चालू शकले नाही. पण या अल्पकाळातही इंग्रज सरकारच्या राजकारणाचा पर्दाफाश करण्याचे महत्कार्य 'कर्मयोगी'ने केले. दिनांक १० मे १९३० चा 'कर्मयोगी' चा अंक हा त्याचा जळजळीत पुरावा आहे. के. रामभाऊ राजवाडे यांचा सार्वजनिक जीवनातला वावर अत्यंत सहजतेचा होता. कुठलाही बडेजाव नाही. त्यामुळे अनेकांना आपले वय व प्रतिष्ठा सोडून सहजपणे संवाद

साधता येत होते. याचा परिणाम असा झाला की, सोलापुरातील अनेक मंडळे, संस्था, संघटनांच्या निर्मितीमध्ये आणि उभारणीमध्ये कै.राजवाडे यांचा सिंहाचा वाटा होता. या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य प्रदीर्घ परिणाम साधणारे होते. विविध सभा – संमेलने व कार्यक्रमातून त्यांनी व्यक्त केलेले विचार हे त्यांच्यातील एका प्रगल्भ समाजसेवकाचे विचार होते. त्यांच्यातील प्रबोधनकाराचे दर्शन त्यांच्या कार्यातून घडते.

'कल्पतरू' आणि आनंदवत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' व 'गजनफर' या सर्वच वृत्तपत्रांनी सोलापूरच्या सामाजिक जीवनास एक नवी दिशा देण्याचं काम केलं आहे. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' व 'सोलापूर समाचार' ही दोन पत्रे शतायुषी ठरली. तर 'गजनफर' आणि 'कर्मयोगी' ही अल्पायुषी ठरली. असे असले तरी प्रत्येक पत्रांनी आपापल्या कुवतीने व मार्गाने समाजाला जागरूक ठेवण्याचं काम केलं आहे. शिक्षण, व्यापार–उद्योग, सामाजिक, सांस्कृतिक, हिंदू मुस्लीम ऐक्य अशा अनेक विषयांवर या सर्वच पत्रांनी समाजहिताच्या भूमिकेतून आपली भूमिक चोख बजावली आहे. याशिवाय समाजाला जातीप्रथा, रूढी परंपरा, अनिष्ट चालीरिती, विधवा पुनर्विवाह, सतीप्रथाविरोध, शेतकरी, कामगार, मजूर असे कितीतरी विषय सर्वांनी हाताळले. कधी एखाद्या छोट्याशा बातमीच्या माध्यमातून किंवा कधी सविस्तर लेखाच्या माध्यमातून तर कधी शेरे ताशेरे सारख्या स्फूटातून समाजातल्या ढोंगावर प्रहार करण्याचे काम केले. या चारही पत्राचे एक समान वैशिष्ट्य असं की या चारही पत्राचे संपादक सोलापूरच्या सार्व जनिक जीवनात तितक्याच प्रभावीपणे आणि ठामपणे वावरले. त्यामुळे यांच्या लेखणीला प्रत्यक्ष कृतीची जोड होती. अनुभवाची साथ होती.

इ.स.१८६७ पासून म्हणजे 'कल्पतरू' च्या जन्मापासून इ.स.१९४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्याच्या उदयापर्यंत या चारही वृत्तपत्रांनी समाज प्रबोधनाचा जो जागर उभा केला आहे त्यातून खरे सोलापूरचे सामाजिक जीवन अधिक संपन्न झाले. समाजातील शैथिल्य संपन्न संपून एक नवी चेतना निर्माण केली गेली. मरगळ संपून नवविचारांची एक

ओढ समाजाला लागली. सोलापुरात निर्माण झालेल्या विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, साहित्यिक चळवळी, व्यापारी संस्था निर्माण झाल्या. त्यातल्या बऱ्याचशा संस्था आजही कार्यरत आहेत. याचे कारण असे की, सोलापुरातील वृत्तपत्रांनी सामाजिक प्रबोधनाचे कार्य तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवले होते. सामाजिक उणिवा दूर करण्यासाठी किंवा कोणतेही बदल समाजाने स्वीकारण्यासाठी, नव्या योजना अस्तित्वात येण्यासाठी जनमत जागृत होणे गरजेचे असते. तेच महत्वाचे कार्य सोलापुरातील वृत्तपत्रांनी मोठ्या हिरीरीने केलेले दिसते.

सामाजिक कुप्रथा, वाईट चालीरिती, बालविवाह, बहुपत्नीत्व यासारख्या अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी व शिक्षणाविषयी जागृती निर्माण केली. मुलामुलींना शिक्षण दिले पाहिजे यासाठी वृत्तपत्रांनी केलेली जागृती फार मोलाची ठरली. अशा अनेक कारणांसाठी वृत्तपत्रांचे सामाजिक प्रबोधनातील योगदान निश्चितच मोठे आहे.

प्रकरण ३ रे

# संदर्भ व तळटीपा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. धारूरकर वि.ल. | आजकालची पत्रकारिता | रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती, ऑक्टोबर १९८४, पृ. २९, ३0 |
| २. | प्रा. केवल जे कुमार | मास कम्युनिकेशन इन इंडिया | जयको १९७९ पृ. २0८ |
| ३. | डॉ. पवार सुधाकर | वृत्तपत्र व्यवसाय ः काल नि आज | पृ. ३८ |
| ४. | कित्ता | -- | -- |
| ५. | कित्ता | -- | -- |
| ६. | प्रा. डॉ. निलकंठ पुंडे | स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापूरची वृत्तपत्रसृष्टी | दै. लोकमत दिनांक २४/१0/१९९३ पान २ |
| ७. | डॉ. नभा काकडे | -- | मुलाखतीतून |
| ८. | 'सोलापूर समाचार' | ज्यूबिली विशेषांक | दिनांक १४ जानेवारी १९३६ पृ. १६५ |
| ९. | सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेट | -- | महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, रिव्हाईजड् एडिशन, मुंबई १९७७ पृ. ९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | प्रा. डॉ. निळकंठ पुंडे | --- | दै. लोकमत पुर्वोक्त |
| ११. | सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेट | --- | पूर्वोक्त |
| १२. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | --- | दिनांक १९ जानेवारी १९४७ |
| १३. | फडके य. दि. | विसाव्या शतकातील महाराष्ट्र | खंड तिसरा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. ऑक्टोबर १९९१ |
| १४. | हिंदुस्थान सरकार | व्हॉईसरायचे भारतमंत्र्यास पत्र, | होम I पॉलिटीकल फाईल क्र. II / XII दिनांक १३ सप्टेंबर १९२७ |
| १५. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | --- | दिनांक ६ जुलै १९४७ |
| १६. | काकडे वि गो. | --- | मुलाखतीतून |
| १७. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | | दिनांक ५ ऑक्टोबर १९४७ |
| १८. | लेले रा. के. | मराठी वृत्तपत्रांचा इतिहास | पूर्वोक्त |
| १९. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | --- | दिनांक ६ जुलै १९४७ |
| २०. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | --- | दिनांक २० ऑगस्ट १९३३ |
| २१. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | --- | दिनांक २७ ऑगस्ट १९३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक १६ जानेवारी १८७0 |
| २३. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २१ ऑगस्ट १८७0 |
| २४. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक १0 जानेवारी १८८६ |
| २५. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २८ ऑगस्ट १८९२ |
| २६. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक ७ सप्टेंबर १८९0 |
| २७. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २३ डिसेंबर १८९४ |
| २८. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २४ नोव्हेंबर १८९५ |
| २९. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २४ नोव्हेंबर १८९५ |
| ३0. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २१ ऑक्टोबर १८८८ |
| ३१. | Parasnis D. B. | Poona in Baygone Days | Published by – Parasnis D B, Poona, page 113 to 136 |
| ३२. | काकडे गो. ना. | ब्रहमविद्या प्रवोधरत्न | प्रस्तावनेतून, लेखक जी बी मते प्रकाशक – आर जी मते, सोलापूर – १९0२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | जक्कल बाबुराव | कै. सत्येंद्रनाथ टागोरांनी १८८५ साली स्थापन केलेल्या वक्तृत्तोत्तेजक मंडळीचा इतिहास (लेख) | स्मरणिका (१९८५) वक्तृत्तोत्तेजक मंडळी, सोलापूर. पृ. १ |
| ३४. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २२ जानेवारी १८७१ |
| ३५. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २९ जानेवारी १८८६ |
| ३६. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक एप्रिल १८८६ |
| ३७. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | दिनांक २४ जून १८९४ |
| ३८. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | — | उपरोक्त |
| ३९. | 'सोलापूर समाचार' | ज्युबिली अंक | वर्ष ५१ वे, १४ जानेवारी १९३६ |
| ४0. | कित्ता | | पृ.६ |
| ४१. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक ११ डिसेंबर १९३२ |
| ४२. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक २0 डिसेंबर १९३२ |
| ४३. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक २४ जानेवारी १९३३ |
| ४४. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १३ जून १९३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक ३ मार्च १९३३ |
| ४६. | कित्ता | — | — |
| ४७. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १४ एप्रिल १९३९ |
| ४८. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १५ जून १९३१ |
| ४९. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक ७ जानेवारी १९३४ |
| ५0. | प्रधान ग् प्र, , जाधव रा ग | हीरक महोत्सवी निवडक साधना | खंड ६, सामाजिक व सांस्कृतिक, साधना प्रकाशन, पुणे २00७ |
| ५१. | जक्कल जयंतराव समाचारचे माजी संपादक | — | मुलाखतीतून |
| ५२. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १२ ऑक्टोबर १९४६ |
| ५३. | 'सोलापूर समाचार' | ज्यूबिली अंक | उपरोक्त पृ. ३0 |
| ५४. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १४ जुलै १९३१ |
| ५५. | 'सोलापूर समाचार' | ज्यूबिली अंक | उपरोक्त पृ. १६, १७ |
| ५६. | कित्ता | — | पृ.२ |
| ५७. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक ११ नोव्हेंबर १९४५ |
| ५८. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १३ नोव्हेंबर १९४५ |
| ५९. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १४ नोव्हेंबर १९४५ |
| ६0. | कित्ता | — | — |
| ६१. | कित्ता | — | — |
| ६२. | 'सोलापूर समाचार' | ज्यूबिली अंक | पूर्वोक्त, पृ. १४१ ते १५६ |
| ६३. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १२ मे १९३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४. | सा. 'गजनफर' | — | दिनांक १५ फेब्रुवारी १९२९ |
| ६५. | कित्ता | | |
| ६६. | डॉ पुंडे नीळकंठ | हु.अब्दुल रसूल कुर्बान हुसेन–कार्य आणि कर्तृत्व | पूर्वोक्त पृ. ३४ |
| ६७. | सा. 'गजनफर' | — | दिनांक ८ मार्च १९२९ |
| ६८. | कित्ता | — | |
| ६९. | डॉ. पुंडे नीळकंठ | हु.अब्दुल रसूल कुर्बान हुसेन–कार्य आणि कर्तृत्व | पृ. ११३ |
| ७०. | उपरोक्त | — | पृ. १२१ |
| ७१. | कु. बनसोडे पायल जयभिम | हुतात्मा कुर्बान हुसेन – जीवन व कार्य | अप्रकाशित शोध निबंध, वालचंद महाविद्यालय, सोलापूर – ऑगस्ट २००७ |
| ७२. | डोका मो.इरफान मो. इब्राहीम | 'गजनफर'चे कार्य | अप्रकाशित शोध निबंध, दयानंद महाविद्यालय, सोलापूर, २००५ |
| ७३. | डॉ. नीळकंठ पुंडे | मार्शल लॉ आणि सोलापूरचे चार हुतात्मे | सुविद्या प्रकाशन, सोलापूर. प्रथमावृत्ती २००९ |
| ७४. | कोसंदर प.रे. | 'कर्मयोगी' ः रामभाऊ राजवाडे | जन्मशताब्दी स्मरणिका दिनांक ७ एप्रिल १९९१ प्रकाशक ः रामभाऊ राजवाडे जन्मशताब्दी स्मरणिका समिती. पृ. २ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७५. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २ जुलै १९३९ |
| ७६. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २९ ऑक्टोबर १९३९ |
| ७७. | डॉ. पुंडे नीळकंठ | ‘कर्मयोगी’ ः रामभाऊ राजवाडे | उपरोक्त, पृ. २९ |
| ७८. | मराठी पत्रकार परिषद | स्मरणिका ः २३ वे अधिवेशन पंढरपूर | सन् १९७३ पृ. १९ |
| ७९. | श्री शेळगीकर गोविंद बाजीराव | ‘कर्मयोगी’ ः रामभाऊ राजवाडे | जन्मशताब्दी स्मरणिका उपरोक्त पृ. ३१ |
| ८०. | कित्ता | | पृ.३३ |
| ८१. | बाबुराव नरसप्पा जक्कल (संपादक, ‘सोलापूर समाचार’) | ‘कर्मयोगी’ जन्मशताब्दी स्मरणिका | उपरोक्त पृ. ६६ |

प्रकरण ४ थे

# सोलापुरातील वृत्तपत्रांचे राजकीय प्रबोधन

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात देशातील वृत्तपत्रांचे मोठे योगदान आहे. इ.स.१८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यानंतर देशवासीयांची विशेषतः क्रांतीकारकांची स्वातत्र्याकांक्षा अधिक प्रबळ झाली. ब्रिटीशांना या देशातून हाकलून देऊन देश स्वतंत्र केला पाहिजे ही मनीषा निर्माण होऊ लागली. या स्वातंत्र्याकांक्षेला संघटनात्मक आकार मिळाला तो भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर. कारण इ.स.१८५७चा उठाव ब्रिटीशांनी दडपून टाकला. अनन्वित अत्याचार केले. त्यातून प्रचंड दहशत निर्माण झाली. “अठराशे सत्तावन्नचं स्वातंत्र्ययुध्द दडपताना ब्रिटीशांनी दाखविलेली सूडबुध्दी आणि केलेले अनन्वित अत्याचार यामुळे विशेषतः उत्तर भारतात जबरदस्त दहशतीचं वातावरण निर्माण झालं होतं. ब्रिटीश वसाहतवादाला आव्हान देण्याचीच क्षमता संपल्यासारखी झाली. इ.स.१८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने कागदी दिलासा तेवढा दिला. प्रत्यक्षात इ.स.१८५९ अखेर हिंदुस्थानवर ब्रिटीश सरकारची पकड अधिक पक्की झाली.”[१] अठराशे सत्तावनच्या उठावाने ईस्ट इंडिया कंपनीची जागा प्रत्यक्षात ब्रिटिश सरकारने घेतली.

असे असले तरी भारतीयाम्च्या स्वातंत्र्य मिळविण्याच्या इच्छेला व्यापक रूप मिळाले ते कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर. तिथून स्वातंत्र्याची चळवळ, राष्ट्रीय कॉंग्रेस आणि भारतातील वृत्तपत्रे या तिन्हींच्या एकजुटीतून देश स्वतंत्र झाला. त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ आणि वृत्तपत्रांचा विकास हे एकत्रितपणे विकसित झाले, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. “सोमवार दिनांक २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोवालिया टॅंक जवळील गोकुळदास तेजपाल संस्कृत पाटशाळेच्या सभागृहात भारतीय

राष्ट्रीय कॉंग्रेसचं पहिलं अधिवेशन भरलं. जेमतेम बाहत्तर-पंचाहत्तर प्रतिनिधी उपस्थित होते. 'ॲलन ऑक्टेव्हीयन ह्यूम' - हिंदुस्थान सरकारच्या गृहखात्याचे माजी सचिव! त्यांच्या डोक्यातून अशा एखाद्या राष्ट्रीय परिषदेची कल्पना पुढे आली. मुळात एखादा मेळावा घ्यावा असे ह्यूम साहेबांच्या मनात १८९३ पासून घोळत होते. प्रत्यक्षात यायला इ.स.१८८५ साल उजाडलं. ह्यूमसाहेबांच्या बरोबर होते दिनशा वाच्छा आणि काशिनाथ त्र्यंबक तेलंग या तिघांच्या प्रयत्नातून पहिल्या अधिवेशनाचे आणि त्याबरोबरच भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या संघटित प्रयत्नांचे तोरण बांधले गेले.

वास्तविक पाहता भारतामध्ये ब्रिटिशांच्या विरोधात वेळोवेळी उद्रेक होत होता पण तो विस्कळीत स्वरूपात होता. एवढ्या अवाढव्य ब्रिटीश सत्तेच्या विरोधात होणारे असंघटित स्वरूपाचे विद्रोह किंवा बंड वेळोवेळी कुचकामी ठरले. त्यासाठी आधुनिक विचारसरणीवर आधारलेला व्यापक स्वरूपाचा लढा आवश्यक होता. अशा लढ्यात जास्तीत जास्त लोकांना सामील करून सामील करून घेणारी आणि चिकाटीनं लढा चालविणारी राजकीय यंत्रणा हवी होती. ही आवश्यकता कॉंग्रेसच्या स्थापनेने पूर्ण झाली, असे म्हणायला वाव आहे. इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या या पहिल्याच अधिवेशनाला देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून बाहत्तर प्रतिनिधी मंडळी आली होती. कारण दिनांक २८ डिसेंबर १८८५ रोजी ॲलन ह्यूम यांनी पहिल्या सभेचे अध्यक्ष म्हणून कलकत्याचे नामांकित वकील आणि ह्यूमसाहेबांचे स्नेही व्योमेशचंद्र बॅनर्जी यांचं नाव सुचवलं आणि अधिवेशनाला प्रारंभ झाला.[२]

दिनांक २८ डिसेंबर १८८५ रोजी भरलेल्या कॉंग्रेसच्या पहिल्याच अधिवेशनाला हजर असलेल्या पत्रकारांची संख्या नजरेत भरणारी होती. देशभरात त्यावेळी ४७५ वृत्तपत्रे निघत होती. वृत्तपत्रे हे प्रभावी अस्त्र आहे याची जाणीव तोपर्यंत समाजामध्ये झाली होती. केसरी, मराठा, नव विभाकर, नसीम हिंदुस्थानी, द ट्रिब्यून, द इंडियन

युनियन, द स्पेक्टेटर, इंदुप्रकाश, हिंदु आणि क्रिसेंट इतक्या वृत्तपत्राचे संपादक हजर होते.[३]

'द इंडियन' या कलकत्त्याच्या वर्तमानपत्राचे संपादक नरेंद्रनाथ सेनजी यांनी इ.स.१८८५ सालीच आपल्या पत्रात जवळपास सहा लेख लिहून देशभक्तांनी एकत्र येण्याची आवश्यकता व्यक्त केली होती. अनेक घटकांचा प्रभाव पडूनच समाजाची वैचारिक जडणघडण होत असते. त्यातील काही घटक हे दृश्य स्वरूपातील असतात तर काही घटक अप्रत्यक्ष स्वरूपात समाजाला दिशा देण्याचं काम करीत असतात. समाजाची जडणघडण करण्यामध्ये वृत्तपत्रांनी फार महत्वाची भूमिका बजावली आहे. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रे हीच जनसंवादाची माध्यमे होती. त्यामुळेच तत्कालीन वृत्तपत्रांनी केलेले काम हे अत्यंत महत्वाचे होते. इ.स.१८३२ मध्ये सुरू झालेल्या पहिल्या मराठी पत्रापासून म्हणजे जवळपास १७0 वर्षापासूनच्या प्रयत्नांनी महाराष्ट्राचा वैचारिक चेहरामोहराच बदलून टाकला. स्वातंत्र्य, समता या मूल्यांचा प्रसार वृत्तपत्रांमुळेच सर्वदूर होऊ शकला. समाजाला पारंपारिक व सनातनी विचाराच्या पगड्यातून बाहेर काढण्यात वृत्तपत्रांनी मोलाची कामगिरी पार पाडली. ज्ञानप्रसार, बुध्दीप्रामाण्यवाद, व्यक्तीस्वातंत्र्य या शब्दांची पहिली ओळख इ.स.१८४८ साली 'प्रभाकर' या लोकहितवादींच्या पत्राने करून दिली. पुढे टिळक, आगरकर, हरिभाऊ आपटे, शिवरामपंत परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, न.चिं.केळकर, म.फुले, कृष्णराव भालेकर, माडखोलकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आचार्य जावडेकर, कालेलकर अशा कितीतरी पत्रकारांनी समाजाला वैचारिक दिशा दिली. 'स्वातंत्र्य प्राप्ती' हे या पिढीने पहिले उद्दिष्ट समाजासमोर ठेवले.[४]

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यामध्ये इ.स.१८८५ साली स्थापन झालेली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस जितकी महत्वाची आहे तितकेच इ.स.१८३२ पासून विशेषतः इ.स.१८४८ पासून मराठी वृत्तपत्रांनी घडवलेला जागर महत्वाचा आहे. लोकमान्य

टिळकांची 'संपूर्ण स्वातंत्र्याची' हाक आणि स्वदेशी चळवळ देशव्यापी ठरवण्यात वृत्तपत्रांचा सहभाग अनन्यसाधारण आहे. म.गांधींनी सुरू केलेले असहकार आंदोलन हे स्वातंत्र्यचळवळीला लाभलेले महत्वाचे वळण होते. या आंदोलनानेच म.गांधींची 'राष्ट्रीय नेता' म्हणून प्रतिमा उभी केली. यात तत्कालीन वृत्तपत्रांचा वाटा मोठा आहे. लोकमान्य टिळक असोत वा म.गांधी या दोघांच्याही नेतृत्वाला आणि विचारांना व्यापक 'जनाधार' मिळाला तो वृत्तपत्रांमुळेच. देशाच्या स्वातंत्र्याची ऊर्मी आणि चळवळीचे वैचारिक अधिष्ठान गावपातळीपर्यंत पोहोचले ते वृत्तपत्रांमुळेच. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलनाची तीव्रता अधिक वाढत गेली.

संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात घडणाऱ्या घटनांचे पडसाद सोलापुरात उमटतच होते. इ.स.१८५७ च्या उठावात भाग घेण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील साहसी तरूणांनी थेट उत्तर हिंदुस्थानपर्यंत मजल मारली होती.[५] इ.स.१८८५ साली कॉंग्रेसची स्थापना झाली. त्याकाळात सोलापूर हे महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकाचे शहर होते. मुंबई, पुणे व नागपूरनंतर सोलापूरचा नंबर लागे. त्यावेळी महाराष्ट्रातील औद्योगिकरण अगदी बाल्यावस्थेत होते. मुंबई–मद्रास या रेल्वेमार्गावरील सोलापूर हे महत्वाचे स्थानक होते. मराठवाड्याचे प्रवेशद्वार आणि महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रच्या सीमांना जोडणारे महत्वाचे शहर, त्यामुळे सगळ्याच राष्ट्रीय घटनांचे पडसाद सोलापुरात उमटल्याशिवाय राहात नव्हते. सोलापुरातील राजकीय जागरणाची सुरूवातही याच काळात झाली. म्हणूनच 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'गजनफर' आणि 'कर्मयोगी' या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य लढ्यात दिलेले योगदान आणि या पत्रांच्या माध्यमातून झालेले राजकीय प्रबोधन याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सोलापूर ः राजकीय जीवनाचा प्रारंभ ः**

ब्रिटीश भारतात मुंबई इलाख्यात कापड उद्योगाची दोन प्रमुख केंद्र होती. एक मुंबई तर दुसरे सोलापूर. सोलापुरात पहिली कापड गिरणी मुरारजी गोकुळदास शेठजी यांनी इ.स.१८७४ साली सुरू केली. तसेच लक्ष्मी आणि नरसिंग गिरजी या दोन गिरण्या इ.स.१८९८ साली सुरू झाल्या आणि १९२० च्या दशकात विष्णू आणि जाम मिल या दोन गिरण्यांची भर पडली. सोलापूरचे वैशिष्ट्य म्हणजे कापड उद्योगाबरोबरच रंगकाम, छपाई, दाळी चामडे आदि उद्योगही विकसित होत होते. सोलापुरातील राजकीय जागरणाचा प्रारंभही याच काळात झाला. इ.स.१८५२ साली सोलापूर नगरपालिकेची स्थापना झाली. सोलापुरातील आद्य वृत्तपत्र 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' हे पत्र इ.स.१८६७ साली सुरू झाले. इ.स.१८९३ साली कॉंग्रेसचे संस्थापक अध्वर्यू सर ॲलन ह्यूम यांनी सोलापूरला पहिल्यांदा भेट दिली. पुढे इ.स.१९०७ साली लोकमान्य टिळकांनी तर इ.स.१९२१ आणि इ.स.१९२७ साली महात्मा गांधींनी सोलापूरला भेट दिली. स्वा.सावरकरांनीही सोलापूरला भेट दिली. अशा अनेक घटनांनी सोलापूरचे राजकीय जीवन आकाराला आले. त्यातूनच खऱ्या अर्थाने राजकीय जीवनाला प्रारंभ झाला.

**नगरपालिकेची स्थापना ः**

दिनांक १ ऑगस्ट १८५२ रोजी सोलापूर नगरपालिकेची स्थापना झाली. प्रारंभी जिल्ह्याचे कलेक्टर हेच नगराध्यक्ष म्हणून काम पाहात होते. त्यानंतर दिनांक ५ ऑगस्ट १८८५ रोजी पहिले लोकनियक्त नगराध्यक्ष म्हणून रावबहादूर आप्पाजी रावजी देगांवकर यांनी पदभार स्वीकारला. सोलापुरात नगरपालिकेच्या रूपाने एका 'नागरी' जीवनाला प्रारंभ झाला. राजकीय जागरणाची ही नांदीच म्हणावी लागेल. शहराच्या समाजजीवनाचं आणि सामाजिक घटकांचं नेमकं आकलन वृत्तपत्राला असणं किती आवश्यक आहे याचं

एक उदाहरण म्हणजे 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मध्ये सोलापूरच्या लोकसंख्येची जातीनिहाय दिलेली आकडेवारी म्हणता येईल. "या शहरात ब्राह्मण वस्ती पुष्कळ अंशी कमी आहे असे म्हटले तरी चालेल. लिंगायत वाणी यांचा भरणा फार असून साळी व मोमीन यांची वस्तीही फार आहे."[६] या सामाजिक रचनेचा परिणाम पुढे नगरपालिकेच्या सभासदत्वाच्या वेळी दिसून आला. पहिल्या नगरपालिकेसाठी सभासदांची नियुक्ती करताना प्रत्येक समाजाला प्रतिनिधीत्व मिळेल याची दक्षता घेऊनच ९ नगरसेवकांची नियुक्ती करण्यात आली. यामुळे नगरपालिकेच्या कारभारात सोलापूर शहरातील सर्व समाजाच्या लोकांचे प्रतिनिधीत्व होताना दिसून आले. नगरपालिकेचे हे सरकारनियुक्त सभासद होते. सोलापूरच्या राजकीय जीवनाचा आरंभ होता. नगरपालिकेच्या प्रशासनाचा, एकंदर कारभाराचा अनुभव सोलापुरातील राजकीय कार्यकर्त्यांना यायला लागला.

"नगरपालिका ऊर्फ 'शहर सुधारणा सभा' ही एका अर्थाने सार्वजनिक जीवनाचा केंद्रबिंदू होती. दिनांक १ ऑगस्ट १८५२ रोजी स्थापना झालेली ही पालिका राजकीय व सामाजिक बदलांच्या टप्प्यांची साक्षी आहे. तिचे अधिकार व कार्यक्षेत्र, नियुक्त की निर्वा चित प्रतिनिधी, अध्यक्ष निर्वाचित की नियुक्त, अध्यक्षांचे अधिकार व कलेक्तर यांचे अधिकार यातील संवाद-विसंवाद सभागृहाचे पक्षीय स्वरूप, राष्ट्रीय निशाण पालिकेवर फडकावल्याचा प्रश्न, गव्हर्नर, कलेक्टर इ. राज्यकर्त्यांच्या पतिनिधीना व स्वातंत्र्य लढ्यातील नेत्यांना मानपत्र देण्याचा प्रश्न सार्वजनिक सुविधांचे प्रश्न, करपध्दती इ. भावत झालेल्या चर्चा, वादविवाद, बहिष्कार, मोर्चे, मिरवणुका अशा अनेक गोष्टी नागरिकांत नव्या जाणीवा विकसित करण्यास कारणीभूत झाल्या. सहा एप्रिल एकोणीसशे तीस रोजी देशभक्त लक्ष्मण बळवंत भोपटकर यांचे नगरपालिकेवर जो राष्ट्रध्वज फडकाविण्यात आला आणि युनियन जॅक खाली उतरविण्यात आला तो प्रसंग, त्यावेळची भाषणे व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहिला की नगरपालिकेचे चळवळीतील महत्व

लक्षात येते."[७] नगरपालिकेचे अध्यक्ष श्री सखाराम रामचंद्र किर्लोस्कर व कलेक्टर यांच्यात नगरपालिकेच्या वार्षिक वृत्तांताबद्दल खूप वाद झाला होता. हा वाद बराच रंगल्याने त्याची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये झाली होती. हा वाद म्हणजे आपल्या पारतंत्र्याची बोचरी जाणीव देणारा ठरला. स्वातंत्र्य चळवळीचे पडसाद नगरपालिकेच्या कामकाजात उमटत होते. नगरपालिका ही राजकीय नेत्यांसाठी सार्वजनिक जीवनाची कार्यशाळा ठरली. लोकशाही म्हणजे काय, शासन म्हणजे काय, प्रशासन म्हणजे काय याचा अभ्यासच या माध्यमातून होत होता.

सोलापूर नगरपिते हे शहरातील विविध संस्थांचेही पदाधिकारी होते. एवढेच नव्हे तर पुढे जाऊन लोकसभेचे प्रतिनिधीही सुरूवातीला नगरपितेच होते. इ.स.१८७0 ते इ.स.१९३0 या साठ वर्षातील कालखंडात अनेक सार्वजनिक व राजकीय कार्यकर्त्यांची जी जडणघडण झाली ती याच नगरपालिकेच्या कारभाराने घडवली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. शहरात अनेक सामाजिक व राजकीय संस्थादेखिल याच कालखंडात निघाल्या. त्यामुळे सार्वजनिक जीवन अधिक प्रगल्भ व आशयसंपन्न करण्यामध्ये या नगरपालिकेचा वाटा मोठा आहे यात वादच नाही. या कालखंडातील सभासदांमध्ये समंजसपणा होता, परस्पर सहकार्याची भावना होती, त्यांच्या कार्यामध्ये आणि हेतूमध्येही प्रामाणिकपणा होता, अथक प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी होती. याशिवाय आपण पारतंत्र्यात आहोत ही खंत त्यांच्या मनात सतत सलत होती. "श्री गणेश जिवाजी केळकर, बळवंत नारायण काकडे, आप्पाजी रावजी देगांवकर, बापूराव परशुराम फडके, गणेश बाबाजी माटे, दिनकरपंत ऊर्फ तात्यासाहेब चक्रदेव, श्रीनिवास नारायण काकडे, सिताराम विष्णू भावे, विष्णू रघुनाथ लेले, गणेशकृष्ण साठे, डॉ. महादेव रामचंद्र रानडे, जगन्नाथ मोरेश्वर सामंत, प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर, सिद्रामप्पा रूद्राप्पा पसारे, पंचप्पा उंबरजे, भिमाशंकर थोबडे, सखाराम रामचंद्र किर्लोस्कर, अप्पासाहेब वारद, शेठ नारायण दास भय्या, गौतम मोतिचंद शहा, आबण्णा लिंगूजी जक्कल, नरसप्पा आबण्णा

जक्कल, विठ्ठल गंगाराम पानादी, डॉ. प्रभाकर बाळाजी केसकर, मे. कदीर साहेब दफेदार, गोविंद नारायण काकडे, रामचंद्र गणेश खडकीकर, रामचंद्र शंकर राजवाडे, डॉ. वासुदेव काशिनाथ किर्लोस्कर, गणेश दादाजी पुंडे, कमलाकर रामचंद्र सुमंत, हरिहर गुरूनाथ सलगरकर ऊर्फ कवि कुंजविहारी, बॅ. सरदार, शिवबाळप्पा अप्पाराव देशमुख, मल्लिकार्जून आप्पाराव पाटील, माणिकचंद रामचंद शहा, शेठ हिराचंद नेमचंद दोशी, जिवाप्पा सुमाना ऐदाळे, खान बहादूर हाजी हजरत खान, विठ्ठल नरसप्पा जक्कल, डॉ.कृ.भि.अंत्रोळीकर, महाजन वकील, रामकृष्णजी जाजू, तुळशीदास जाधव, परशराम राठी आदिंची नावे केवळ वानगी दाखल देता येतील. सारा जिल्हा एकत्र येत असे. स्पर्धा होती पण कमरेखाली वार नव्हते. स्वार्थी हितसंबंधाचे वारे लागले नव्हते. परिणामी स्वातंत्र्य लढ्यात सोलापूर मागे नव्हे तर पुणे – मुंबईबरोबर होते. इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या संस्थापकापैकी एक ए. आ. ह्यूम यांनी सोलापूरला भेट दिली होती. लोकसभेचे मानपत्रही त्यांना दिले होते"[८] यावरूनच सोलापूरच्या सार्वजनिक जीवनात नगरपालिकेचे महत्व अधोरेखित होते.

कॉंग्रेसचे संस्थापक सर ॲलन ह्यूम यांनी ३० नोव्हेंबर १८९३ रोजी सोलापूरला भेट दिली. त्यावेळी रेल्वे स्थानकावर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.[९] ह्यूम साहेबांच्या या भेटीचे वर्णन 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मध्ये छापून आले. सोलापूरच्या राजकीय जीवनातील 'सर्वात मोठी घटना' असेच वर्णन केले.[१०] संपूर्ण शहरभर सलोख्याचे वातावरण होते. सोलापूरच्या नागरिक समितीच्या वतीने ह्यूम साहेबांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ह्यूम साहेबांच्या आगमनाने आणि जोरदार स्वागताने सोलापुरात राजकीय चळवळीला मूर्त स्वरूप आले.

इ.स.१९०७ साली लोकमान्य टिळकांनी सोलापूरला भेट दिली. टिळकांचा हा पहिलाच दौरा सोलापुरातल्या राजकीय नेत्यांना चांगलीच प्रेरणा देऊन गेला. इ.स.१९२१ साली महात्मा गांधी सोलापुरला पहिल्यांदा आले. त्यांची असहकार

चळवळ, त्यानंतरचा नागपूरचा झेंडा सत्याग्रह अशा एका नंतर एक घटनांनी सोलापूरच्या राजकीय जीवनाला एक गती मिळाली. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे दिनांक ९, १० व ११ मे १९३० या तीन दिवसांत सोलापूरकरांनी अनुभवलेले स्वातंत्र्य! या तीन दिवसात सोलापूरवर ब्रिटीशांचे नव्हे तर चक्क भारतीयांचे – सोलापूरकरांचे – राज्य होते. याचे दुसरे टोक लगेच दुसऱ्या दिवशी अनुभवायला मिळाले ते 'मार्शल लॉ' च्या रूपाने. ब्रिटिश सरकारने संपूर्ण हिंदुस्थानातील पहिला आणि शेवटचा 'मार्शल लॉ' लागू केला तो सोलापुरात! भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात सोलापूरच्या चार हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सोलापूरच्या 'मार्शल लॉ' आणि चार हुतात्म्यांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. अशा जाज्वल्य देशभक्तीची आणि असीम त्यागाची बीजे समाजमनात रूजली आणि वाढली. त्यात सोलापुरातील वृत्तपत्रांनी केलेल्या सामाजिक व राजकीय प्रबोधनाचा वाटा मोठा आहे.

**संपादकांचा राजकीय सहभाग :**

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या सर्वच पत्राचे संपादक राजकीय व सामाजिक जीवनतील कार्यात तितक्याच धडाडीने आघाडीवर होते. इ.स.१८८७ साली मद्रास येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाला सोलापूर जिल्ह्यातून आठ प्रतिनिधी–सार्वजनिकरित्या प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. त्यात 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' चे संपादक गोविंद नारायण काकडे यांचा समावेश होता.[११] 'सोलापूर समाचार' चे संपादक कै.विठ्ठलराव जक्कल यांनी इ.स.१९२६ साली नगरपालिकेची निवडणूक लढवली. तर त्यांचे बंधू कै.बाबुराव जक्कल यांनी इ.स.१९३३ साली राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार म्हणून नगराध्यक्षपदाची निवडणुक लढवली आणि जिंकलीही.[१२] या दोन्ही शतायुषी वृत्तपत्राच्या संपादकांचा सोलापूरच्या राजकीय

जीवनात प्रदीर्घकाळ वावर होता. 'कर्मयोगी' पत्राचे संपादक कै.रामचंद्र शंकर ऊर्फ रामभाऊ राजवाडे यांची 'सावरकर भक्ती' हीच त्यांची ओळख आणि शक्तीदेखिल होती. दिनांक ८ मे १९३० रोजी सोलापुरात झालेल्या पोलीसी अत्याचाराचे साद्यंत वर्णन करणारा 'कर्मयोगी'चा विशेष अंक काढला होता. 'सोलापूर येथील दंग्याची खरी हकिकत' या मथळ्याखाली १० मे १९३० च्या 'कर्मयोगी' मध्ये छापण्याची जी हिंमत दाखवली त्याला इतिहासात तोड नाही. 'गजनफर' हे साप्ताहिक सोलापूरच्या ऐतिहासिक चार हुतात्म्यांपैकी एक असलेले हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांनीच सुरु केले होते. थोडक्यात या चारही पत्राच्या संपादकांनी सोलापूरच्या राजकीय पटलावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला होता. राजकीय पुढारी, ध्येयनिष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कृतिशील संपादक, विचारवंत अशीच प्रतिमा लोकांमध्ये रूजलेली होती. या राजकीय व सामाजिक कार्यामुळेच त्यांच्या पत्रांची समाजाशी असलेली नाळ अधिक घट्ट झाली. त्यामुळेच 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' व 'गजनफर' या चार वृत्तपत्राच्या माध्यमातून केले गेलेले राजकीय प्रबोधन या प्रकरणातून अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

### कल्पतरू आणि 'आनंदवृत्त' ः सुधारणावादी व मवाळ

सोलापूरचे आद्य वृत्तपत्र म्हणून ख्याती पावलेले 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' हे मुळातच सुधारणावादी आणि मवाळ प्रवृत्तीचे होते. सोलापूरच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासाचा अत्यंत साक्षेपी साक्षीदार म्हणूनच या पत्राकडे पाहिले पाहिजे. सोलापूरच्या सार्वजनिक जीवनाचा आणि राजकीय प्रबोधनाचा विकास 'कल्पतरू' च्या पानापानातुन दिसून येतो. या पत्राचे संपादक गोविंद नारायण काकडे, लक्ष्मण गोविंद काकडे या सर्वांनीच साप्ताहिकाच्या नेमस्त आणि मवाळ धोरणामध्ये कधीच बदल केला नाही. समाजाविषयी असलेली तळमळ आणि स्वातंत्र्याची जाणीव सामान्य जनतेपर्यंत

पोहोचवण्यात हे साप्ताहिक कमालीचे यशस्वी झाले. शतकभराची वाटचाल करून हे साप्ताहिक इ.स.१९७५ साली बंद पडले. जवळपास ११0 वर्षाच्या वाटचालीत केवळ दोन वर्ष ते फायद्यात चालले.[१३] 'कल्पतरू' हे साप्ताहिक वृत्तीने आणि विचाराने रानडे – गोखले विचारसरणीचे बोट धरून चालणारे हे पत्र होते. सामाजिक व राजकीय समस्यांची उत्तरे शोधताना याच नेमस्त व मवाळ धोरणाचा पाठपुरावा या पत्राने केला. रानडे–गोखले यांच्या प्रागतिक विचारसरणीचा पुरस्कार शेवटपर्यंत केला. "राजकीय व सामाजिक बावतीत पत्राचा रोख नेमस्त धोरणाचा होता. रानडे–गोखले यांच्या विचारसरणीचा पुरस्कार निःस्पृहपणे हे पत्र करीत होते."[१४]

इ.स.१९0८ साली लोकमान्य टिळकांना सहा वर्षाची शिक्षा झाली तेंव्हा तिचे खापर ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्यावर फोडण्यात आले. या शिक्षेला गोखले कारणीभूत झाले असे निदान सूचित तरी करण्यात येत होते. या दोषारोपाच्या संदर्भात, 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या पत्रात संपादकांनी पुढीलप्रमाणे अग्रलेख लिहून समाचार घेतला होता. गोविंद नारायण काकडे हे त्यावेळी 'कल्पतरू' चे संपादक होते व पत्र नेमस्तवादी होते. ते 'कल्पतरू' च्या आपल्या एका अंकात म्हणतात, "अलिकडे कित्येक दिवस केसरीकर्त्यांच्या बुध्दीस भ्रंश झाला आहे. निदान भ्रष्ट बुध्दीच्या एखाद्या वेड्याप्रमाणे ते नेहमी बहकत राहण्याचे सोंग तरी करीत आहेत. ... अलिकडे साधारण त्यांची तऱ्हा अशी ठरून गेली आहे की, सरकारने जहाल ऊर्फ विध्वंसक पक्षाशी विरोध धरला की, त्याबद्दलचे खापर नेमस्त पक्षावर फोडलेच म्हणून समजावे. ... रा.टिळकांना शिक्षा करविण्यात ना.गोखले यांचे अंग होते असे स्पष्टपणे म्हणण्याची केसरीकारास छाती नव्हती किंवा हिंदुपंचा इतका मूर्खपना नव्हता. म्हणून तसे स्पष्ट म्हणण्याचे जरी त्यांना धाडस झाले नाही. तथापि ना.गोखले हे भावडेपणाने लॉर्ड मोर्ले यांच्याजवळ रा.टिळकांच्या संबंधाने काही तरी वेडेवाकडे बोलले असलेच पाहिजेत व त्यामुळेच

टिळकांना शिक्षा झाली. अशा तऱ्हेची असंबध्दपणाची, नालस्ती करण्यासारखी टीका करण्यास केसरीकार एका पायावर तयार......"[१५]

असे असले तरी टिळकांचे स्वदेशीचे धोरण व चळवळ, त्यांनी सुरू केलेले गणेशोत्सव व शिवजयंती यासारखे समाजशिक्षणाचे उपक्रम 'कल्पतरू' कारांनी तितक्याच जोमाने उचलून धरले.[१६] वृत्तपत्रे ही राष्ट्रजागरणाची प्रभावी साधने आहेत. स्वातंत्र्य आणि राजकीय सत्तांतराचा संदेश मना-मनात रूजवण्यासाठी वृत्तपत्रांची भूमिका निःसंशयपणे कौतुकास्पद होती. "The press was an effective instrument of nationalists both in transmitting the message of freedom to the masses of India and raising public conscious of the nationalists strugle"[१७] या राष्ट्रीय जागरणाचा प्रत्यय 'कल्पतरू' च्या प्रत्येक अंकामधून येतो. समाजातील प्रत्येक घटकाचे महत्व ओळखून त्यांना कार्यप्रवण करणे हेच वृत्तपत्रांचे कार्य आहे याची जाणीव 'कल्पतरू' कारांना होती.

'कल्पतरू' ने आपल्या वाचक कक्षेत येणाऱ्या तरूणांनाही आपल्या लेखांमधून, बातम्यांमधून जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. "सोलापूर जिल्ह्यातील तरूणांस विनंती" या मथळ्याखाली 'कल्पतरू' कारांनी लिहिले होते, "देशात चाललेल्या एकंदर चळवळीत व धामधुमीत तरूणांनी आपल्या योग्य स्थानाची सदैव जाणीव ठेवून जर आपले कर्तव्य केले तर यशप्राप्ती दूर नसते. परंतु आजकाल सर्वत्र पसरलेल्या शैथिल्याचा परिणाम राष्ट्रातील चळवळीवर दिसून येत आहे. तरी या आणिबाणीच्या प्रसंगी तरूण वर्गात संघटना उत्पन्न करून कार्यप्रवृत्त करणे अवश्य आहे."[१८] अशा लेखांमधून सोलापुरातील तरूण संघटित झाले पाहिजेत व राष्ट्रकार्यात सहभागी झाले पाहिजेत अशी अपेक्षा 'कल्पतरू' च्या संपादकांनी वेळोवेळी व्यक्त केली आहे.

"सोलापूरकरांची आलस्यप्रियता" अशा रोखठोक शब्दांत सोलापूरच्या जनतेची त्यांच्या आळसाबद्दल खरडपट्टी काढली आहे. या लेखात ते म्हणतात, "ज्यावेळेस सर्व

राष्ट्र किंबहुना सर्व हिंदुस्थान खळबळून जागे झाले आहे, त्यावेळेस सोलापूरसारख्या ठिकाणी कोनतात्याही प्रकारची चळवळ दिसून येऊ नये ही जितकी आश्चर्याची तितकीच खेदाची गोष्ट आहे."[१९] या आवाहनाचा व्हायचा तो परिणाम झाला. पुढे सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ फोफावली. प्रत्येक स्तरावरील लोक या चळवळीत सहभागी झाली. न् भूतो न् भविष्यती असा इतिहास सोलापूरच्या तरूणांनी आणि सर्व सामान्य जनतेने करून दाखविला. शैथिल्य निर्माण झालेल्या, राष्ट्रीय चळवळीबाबत उदासिनता निर्माण झालेल्या समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य 'कल्पतरू' कारांनी केले. प्रसंगी वृत्तपत्रांना समाजशिक्षकाची भूमिका वठवावी लागते. समाजाला जागृत करणे, राष्ट्रीय परिस्थितीची जाणीव करून देण्याचे कार्य पत्रकारांना करावे लागते. वृत्तपत्रांच्या अस्तित्वाचा तोच एक हेतू असतो. सामाजिक व राजकीय परिस्थितीचे भान ठेवून दिशा देण्याचे आद्य कर्तव्य या आद्य पत्राने पार पाडले असे म्हणावे लागेल. सोलापुरात राजकीय प्रबोधनाच्या पाऊलवाटा निर्माण करण्याचे सारे श्रेय 'कल्पतरू' ला जाते.

काहीवेळा वाचकांचे लक्ष वेधून घेतले जाईल अशा पध्दतीने चौकोनात काही बातम्या दिलेल्या असत. ज्या वाचकांना विचार करायला लावत असत. "हिंदुस्थानात एकंदर सैन्य २ लक्ष १८ हजार आहे त्यापैकी ब्रिटीश सैन्य फक्त ६0 हजार आहे. एकंदर सैन्यामागे ५७ कोटी खर्च केला जातो. त्यापैकी ३२ कोटी रूपये ब्रिटीशांच्या घशात जातात."[२0] म्हणजे ब्रिटीशांनी आपल्या देशाची आर्थिक पिळवणूक कशा पध्दतीने चालवली आहे, याचे प्रत्यक्ष दर्शनच 'कल्पतरू' ने घडवून दिले आहे. ही आर्थि क पिळवणूक आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर दीर्घकाळ परिणाम करणारी आहे याची जाणीव सामान्य नागरिकांना झाली पाहिजे, या पारतंत्र्याची चीड निर्माण झाली पाहिजे हा हेतू होता. त्यातून स्वातंत्र्य चळवळीमध्ये अधिक तरूणांनी, सामान्य नागरिकांनी

सहभागी होऊन ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी पुढे आले पाहिजे हाही हेतू अशा बातम्या देण्यामागे असावा. 'कल्पतरू' च्या संपादकांची तळमळ यातून दिसून येते.

'कल्पतरू' कारांची वैचारिक बांधीलकी जरी गोखले–रानडे प्रणित नेमस्त विचारांशी असली तरी "प्रसंगानुसार कठोर धोरणांचा आणि शब्दांचाही अवलंब 'कल्पतरू' च्या संपादकांनी केला आहे. नेमस्त विचारांचा प्रभाव असलेल्या पत्राने तत्कालीन परिस्थितीत राजकीय चळवळीच्या प्रवाहाचे भान त्यांनी नेहमीच ठेवले. सरकारच्या धोरणांवर टीका केलीच परंतु कॉंग्रेसच्या धोरणातील दोषही दाखवून दिले. 'चर्चिल साहेबांची गर्वोक्ती' या संपादकीयमध्ये चर्चिल परराष्ट्रीय मंत्री असताना वसाहतीबद्दल त्यांचे जे भाषण झाले त्याबद्दल लिहिताना 'कल्पतरू' कार म्हणतात, "महायुध्दानंतरही ब्रिटिश मुत्सद्यांच्या दृष्टीकोनात यत्कींचितही बदल झालेला दिसत नाही. जगाचे अस्तित्व गोऱ्या लोकांसाठीच आहे असे त्यांना वाटते. आफ्रिका काय किंवा इंडिया काय कोणासच स्वातंत्र्य कालावधीनेही मिळण्याची शक्यता नाही."[२१] वाचकाला पारतंत्र्याची जाणीव करून देण्याचा हेतू यात दिसून येतो. वाचकांना आंतरराष्ट्रीय परिस्थितीची जाणीव करून देत असतानाच सामान्य नागरिकांच्या मनात पारतंत्र्याबद्दलचा सल अधिक तीव्र करण्याचा प्रयत्न 'कल्पतरू' कारांनी केला. आपले कल्याण करण्याच्या नावाखाली आपली लुबाडणूक होते आहे हे जाणवून देऊन एक नवी ऊर्मी निर्माण करण्याचा प्रयत्न यांनी केला. 'कल्पतरू' कारांची वैचारिक बांधिलकी रानडे–गोखले यांच्या सुधारणावादी विचारांशी होती. वास्तविक पाहता पत्रलेखकाला अशी कोणतीही बाजू घेता येत नाही. पत्रकार या नात्याने निःष्पक्ष भूमिका ही आदर्श वत्‌च असते. ही जाणीवदेखिल 'कल्पतरू' कारांनी जाणीवपूर्वक जोपासली. प्रसंगी नेमस्तांच्या वरवरच्या, सरकारधार्जिण्या धोरणावरही कठोर टीका केली. एका अंकात 'नेमस्त व जनता' या लेखात त्यांनी हा पक्ष मिळून मिसळून जनतेत प्रचार करीत नाही असे स्पष्ट म्हटले आहे. [२२]

"एकोणीसाव्या शतकातील विचारयुध्दे शब्दसामर्थ्याने केली गेली. वृत्तपत्र व्यवसायाने माणसाच्या वाणीला शस्त्राचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. अशाच पध्दतीचे स्वरूप 'कल्पतरू' चेही होते. 'कल्पतरू' कारांनी लोकप्रियतेचा मुद्दा गौण मानला. वृत्तपत्र व्यवसायातून काही आर्थिक लाभ होईल अशी अपेक्षा कधीही बाळगली नाही. ११0 वर्षात दोन वर्ष नफा आणि बाकी तोट्यातच हे पत्र चालले."[२३]

राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्वर्यू सर ॲलन ह्यूम यांनी दिनांक ३0 नोव्हेंबर १८९३ रोजी सोलापूरला भेट दिली. त्यावेळी सोलापूर पिपल्स असोसिएशनच्या वतीने ह्यूम साहेबांचा जाहीर सत्कार करून त्यांना मानपत्र दिले गेले. या मानपत्राचा मसुदा दिनांक ३ डिसेंबर १८९३ च्या 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' मध्ये प्रकाशित करण्यात आला.[२४] तो पुढीलप्रमाणे ः-

प्रति,

**ए.ओ. ह्यूम**

**जी. सी.**

महोदय,

आम्ही 'सोलापूर पिपल्स असोसिएशन' चे सर्व सभासद सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या वतीने या जुन्या आणि ऐतिहासिक शहरातील आपल्या पहिल्या भेटीच्या निमित्ताने आदरपूर्वक आपले स्वागत करीत आहोत.

या देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिकांच्या विकासासाठी आणि सबंध देशाच्या विकासासाठी आपण अनेक वर्ष निःस्वार्थपणे व अथकपणे केलेले कार्य हे निश्चितच कौतुकास्पद आणि आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. आपल्या कार्याची आम्ही नम्रपणे दखल घेत आहोत. विचारांचा भरभक्कम पाया असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील एका मोठ्या संस्थेची निर्मिती करणाऱ्या आपल्या या महान कार्यामुळे आपले नांव या भारताच्या

आधुनिक इतिहात अत्यंत आदराने घेतले जाणार आहे. एका समान उद्दिष्ट आणि आकांक्षांसाठी एक केंद्रीभूत राजकीय चळवळ उभी करणे आवश्यक होते. या देशाच्या समृध्द व परिपक्व विकासासाठी लोकांच्या आशा – आकांक्षांना एका सुव्यवस्थित व सुनियंत्रित रचनेत बांधण्यासाठी या राष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून एक मजबूत आधार देणे आवश्यक होते. या देशाच्या कालानुरूप प्रगतीसाठी व भविष्यातील कल्याणासाठी आपल्या दूरदर्शीपणाने एका पर्वाला प्रारंभ झाला आहे. त्याचे निश्चितच आनंददायी परिणाम दिसून येतील.

भारताला कोणी सच्चा आणि प्रेमळ मित्र नाही आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसला कष्टाळू सल्लागार आणि उत्साही पाठबळ देणारा नाही. जर आमची राष्ट्रीय कॉंग्रेस चळवळ यशस्वी होऊ शकत असेल तर ती केवळ इंग्लंडच्या न्याय्य व सच्चेपणावरच यशस्वी होऊ शकेल. पूर्वेकडील एक भक्कम आधार म्हणून इंग्लंडमध्ये जर आमच्या देशाकडे न्यायाच्या आणि विशालतेच्या नजरेने पाहिले तर भविष्यात इंग्लंडचा पूर्वेकडील भक्कम आधार म्हणून भारताची ओळख होऊ शकते. आज लोकांची मोठ्या प्रमाणावरील मान्यता या सगळ्या गोष्टींना मिळते आहे. हे समाधानकारक आणि प्रोत्साहक परिणाम दिसतायत ते केवळ आपल्या अविश्रांत आणि निष्ठापूर्वक परिश्रम करणाऱ्या इंग्लीश अधिकाऱ्यांमुळेच. आम्हांप्रती असलेली सहानुभुती आणि सहकार्य देऊन आमच्यावतीने आणि आमच्यासाठी केलेल्या निःस्वार्थ सत्कार्यामुळे आपण या देशातील लोकांच्या निस्सीम आदराचे, प्रेमाचे आणि स्तुतीचे धनी झाला आहात. ही संपूर्ण देशानेच व्यक्त केलेली कृतज्ञता आहे असे म्हणण्याचे धाडस आम्ही करतो आहोत.

आपण या देशासाठी आपली ऊर्जा, मेहनत आणि बुध्दीमत्ता या देशाच्या भल्यासाठी समर्पित केली. त्यामुळेच आमच्या मनात आपण कायमस्वरूपी स्थान निर्माण केले आहे.

आपण कॉंग्रेसच्या जनरल सेक्रेटरी पदावरून निवृत्ती घेण्याच्या विचारात आहात अशा अफवा आहेत. आम्ही खात्रीने सांगतो की अशा अफवांना कोणताही आधार नाही. आपल्याला निवृत्तीचा विचार करावा लागेल अशी कोणतीही कृती आमच्या कडून घडणार नाही. आमच्या कार्याला आत्ता कुठे प्रारंभ झाला आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि लोकांच्या न्यायासाठी चालणारा हा मोठा घटनात्मक संघर्ष आहे. यात अनेक अडचणी येणार आहेत. आत्तापर्यंत जे कुशल मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले त्याहीपेक्षा अधिक या पुढील काळात लागणार आहे. कॉंग्रेसचे संस्थापक आणि जनरल सेक्रेटरी म्हणून आपणच ते देऊ शकता. त्यामुळे आम्हाला खात्री आहे की, आपण आमच्या सोबत असा किंवा आपल्या दूरच्या पाश्चात्य घरामध्ये असा आपले विशाल मन आणि ऱ्हदय कायम आमच्यासोबत राहणार आहे.

शेवटी आम्हाला एक तीव्रतेची आणि कळकळीची इच्छा प्रकट करायची आहे ज्या इच्छेला संपूर्ण देशातील जनतेचा एकमुखी आवाज साथ देईल की, आपल्या वापसीनंतर इंग्लंडच्या निवडणुकांत आपल्याला बहुमताने सत्ता प्राप्त होईल आणि आपण पुन्हा जेंव्हा भारतात याल तेंव्हा 'हाऊस ऑफ कॉमन्स' सभागृहाचे प्रतिनिधी म्हणून याल. आपल्या रूपाने त्या सभागृहात भारताची बाजू मांडणारा एक भारताचा हितचिंतक आम्हाला भेटेल.

आपले आणि आपले सहकारी श्री मॉर्गम ब्राऊन यांचे मनःपूर्वक आभार. आपण या शहराला भेट दिली, हे शहर आपल्याप्रती कृतज्ञ राहील. आशा आहे की, ही भेट पहिली आणि शेवटची नसणार. यापुढेही हा बंध कायम राहील.

**आपले,**

**आज्ञाधारक चाकर**

राष्ट्रीय राजकारणाची चर्चा जशी होत होती तशी स्थानिक राजकारणावरही सडेतोडपणे मतप्रदर्शन केले जात असे. स्थानिक पुढाऱ्यांच्या राजकीय जाणीवा प्रगल्भ करण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाटा असतो. इ.स.१९१९ च्या कायद्याने प्रांतिक कायदेमंडळ अस्तित्वात आले. त्यातही संघटित राजकीय पक्षांचे अस्तित्व नगण्यच होते. त्यामुळे या प्रांतिक कायदेमंडळाचे कामकाजही यथातथाच चाले. सोलापूर जिल्ह्यातून श्री के.एम.हजरतखान, श्री सलगर व श्री शामराव लिगाडे असे तीन आमदार प्रांतिक मंडळावर होते.[२५] पण या तीनही आमदारांना इंग्रजी समजत नव्हते, इंग्रजी बोलणे दूरच! तत्कालीन स्थितीमध्ये आमदारांचा निश्चित असा गट नव्हता, ठराविक कार्यक्रम नव्हता. आमदारांना स्वतःच्या कर्तव्य व जबाबदारीबद्दल फारशी जाणीव नव्हती. आमदार या नात्याने आपण नेमके काय करावे आपली भूमिका काय याविषयी स्पष्टता नव्हती. त्यामुळे प्रांतिक मंडळातील आमदारांची भूमिका केवळ नामधारी होती. सरकारला कोणताच विरोध ते करीत नसत. त्यामुळे नोकरकपातीपासून ते करमणूक करापर्यंत अनेक विषयांना निमूटपणे मान्यता देणे एवढेच त्यांचे काम होते. सरकारच्या धोरणांना, निर्णयाला विरोध होत नव्हताच. म्हणजे त्याकाळी एत्तद्देशियांच्या राजकीय जाणीवा किती प्राथमिक स्वरूपाच्या होत्या याचा अंदाज येईल. अशा काळात 'कल्पतरू'च्या संपादकांनी केलेल्या राजकीय प्रबोधनाचे महत्व लक्षात येते. 'कल्पतरू'च्या माध्यमातून राजकीय प्रबोधनाची जी ज्योत प्रज्ज्वलित झाली त्यातून राजकीय पुढाऱ्यांसाठी काही प्रकाशवाटा निर्माण झाल्या असतीलच.

'कल्पतरू' मधील लेखांच्या मथळ्यावरूनही त्यांच्या विषयांची व्यापकता आणि विचारांचा आवाका लक्षात येतो. 'हिंदुस्थानचे कर्ज'[२६], 'स्थानिक गिरणी कामगारांचा संप'[२७], 'बॅ. जीना व मतदार संघ'[२८], 'जातीविषयक तंटे'[२९], 'राष्ट्रीय ऐक्य व येथील जातीभेद'[३०] अशा अनेक लेखांमधून त्यांनी राष्ट्रीय राजकारणाचे अनुसंधान साधले गेलेले दिसते. स्थानिक समस्यांनादेखील वृत्तपत्राने चांगले स्थान दिलेले होते. सोलापूर

नगरपालिका, त्यातील राजकारण, सदस्यांची कर्तव्ये, नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतील चुरस, उलथापालथ, सोलापूरचा पाणीप्रश्न असे कितीतरी प्रश्न आणि विषय 'कल्पतरू' ने हाताळले. 'सोलापूरचे पाणी' या लेखात तरी सोलापूरच्या पाणी पुरवठ्याची बिकट अवस्था आणि भविष्यातील उपाययोजना किती आवश्यक आहे यावर प्रकाश टाकला.[३१] आज जवळपास पाऊणशे वर्षानंतर सोलापूरची पाणी समस्या कायम आहे. यावरूनच कल्पतरूने शहर विकासाचा किती दूरदृष्टीने विचार केला होता हे जाणवते. समाजाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी ही पत्रकारिता होती असेच म्हणावे लागेल. "समाज सुसंस्कृत होण्यासाठी केवळ मूठभर लोक नव्हे तर सर्व समाज तसा झाला पाहिजे. समाज सुधारणेवर भर देत असताना सर्व बाजूंनी समाज सुधारला पाहिजे याचे त्यांना भान होते. परकीय सत्तेने कसे दुःख, दारिद्र्य निर्माण होते आहे याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच आर्थिक जीवन सुधारले पाहिजे, समाजसुधारणा झाल्या पाहिजेत, शिक्षणाच्या संधी अधिकाधिक लोकांना मिळाल्या पाहिजेत हे विचार प्रकर्षाने प्रतिपादन करणारे 'कल्पतरू' हे पत्र होते."[३२]

स्थानिक इतिहासाबद्दलही माहिती 'कल्पतरू' मधून मिळते. जगातील वैज्ञानिक प्रगतीची माहितीही दिल्याचे आढळते. ('कल्पतरू' दिनांक १५ एप्रिल १९२८) 'कल्पतरू' हे केवळ वृत्तपत्र नव्हते तर ते मतपत्रही होते. समाजनिष्ठ पत्रकारितेची कास धरत असताना कधी तथाकथित 'वृत्तपत्रीय आवेश' आणि घणाघाती टीका वा प्रचारकी थाट 'कल्पतरू' कारांनी आपल्या लेखणीतून येऊ दिला नाही. सोलापूरला मे १९३0 मध्ये जी 'क्रांती' झाली, अमानुष पोलीसी अत्याचार सहन करून येथील जनतेने ३ दिवसाचे अल्पजीवी का असेना 'स्वातंत्र्य' उपभोगले आणि १२ मे १९३0 नंतरचा 'मार्शल लॉ' अनुभवला, यातून गेल्या अनेक वर्षांपासून सामान्य जनतेच्या मनात धगधगत असलेला अग्नीच दिसून येतो. या सर्व घटनांची, घडामोडीची माहिती 'कल्पतरू'ने समाजापर्यंत पोहोचवली."[३३]

सोलापुरात सार्वजनिक सभा, सोलापूर युनियन क्लब, सोलापूर वक्तृत्त्वोत्तेजक सभा, सोलापूर पिपल्स असोसिएशन अशा अनेक संस्था-संघटनांनी आपापल्या पध्दतीने राजकीय जागरणाला सुरूवात केली होती. पुण्याची सार्वजनिक सभा, मुंबईतील 'बॉम्बे पिपल्स असोसिएशन' अशा अनेक संस्थांशी निगडीत राहून अथवा त्यांच्या मार्गदर्श नाखाली सोलापुरातील संस्था काम करीत होत्या. दिनांक २६ ऑगस्ट १८५२ रोजी बॉम्बे असोसिएशन ची स्थापना झाली. एत्तद्देशियांच्या सरकारविषयीच्या तक्रारी ब्रिटीश सरकारपुढे मांडून त्याचे समाधान मिळवणे हा या असोसिएशनच्या स्थापनेचा हेतू होता. "But the Bombay Association could not either fulfill its purpose or be replies of the British Parliament as suggested by N. G. Madgaonkar. Its representations were too outspoken to be entertained by then Conservative British Government and the (1857) First War of Independence seriously affected its working. It took more or less decade (1867) to revive its working and it was at this time that new Associations were being established all over Maharashtra"[३४] हे अगदीच खरे होते की, ठाणे सार्वजनिक सभा स्थापन झाली ती, ६ फेब्रुवारी १८६८ रोजी आणि दिनांक २ एप्रिल १८७० रोजी पुणे सार्वजनिक सभा स्थापन झाली.

दिनांक १४ ऑगस्ट १८७० रोजी सोलापूर सार्वजनिक सभेचा प्रारंभ झाला. ही सार्वजनिक सभा स्थापन होण्यामध्ये 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' चा मोठा वाटा होता. अशी एखादी सभा असावी ही कल्पना सर्वप्रथम 'कल्पतरू' कारांनी १६ जानेवारी १८७० च्या संपादकीयमध्ये मांडली. याचा तपशिलवार उल्लेख चौथ्या प्रकरणात आलेला आहे. सोलापूर सार्वजनिक सभेने लोकांच्या हिताशी निगडीत असे अनेक प्रश्न हाताळले. यशस्वीरित्या धसास लावले.

इ.स.१८७१ मध्ये सोलापूर सार्वजनिक सभेने जकातीचा प्रश्न यशस्वीरित्या मार्गी लावला. व्यापाऱ्यांना आपल्या मालाच्या जकातीच्या पावत्या मंगळवार पेठ येथिल

जकातीच्या कार्यालयातून घेऊन जावे लागत असे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मंगळवार पेठेत जाऊन जकातीची पावती घ्यावी लागे. यात वेळ आणि पैसा, श्रम वाया जात असत. त्यामुळे या भागाला मंगळवार पेठ जकात चौकी असेच नांव पडले होते. ही समस्या जाणून घेऊन सार्वजनिक सभेने प्रस्ताव मांडला की, मुंबई, सुरत, अहमदाबाद अशा शहरात जकात नाके ज्या पध्दतीने शहराच्या बाहेर प्रवेश करतानाच असतात त्याचप्रमाणे सोलापूर शहराच्या प्रवेशालाच जकात नाके उभे करावेत. यामुळे जकातीचे विकेंद्रीकरण तरी झालेच पण त्याचबरोबर शहराचा भागही विस्तारला गेला. सोलापूर म्युनिसीपालटीने अर्थातच ही सूचना मान्य केली आणि सोलापुरातील जकात नाके शहराच्या बाहेर गेले.[३५]

सोलापुरात भाजी आणि मटन यांची एकत्रितच विक्री केली जात होती. सार्व जनिक सभेकडे एका 'रहिवाशा' ने एक अर्ज करून भाजी आणि मटन मार्केट वेगळे केले जावेत अशी मागणी केली. मटनाचे मार्केटमुळे भाजी विक्रेत्यांना आणि ग्राहकांना खुपच त्रास होत होता. सोलापूर सार्वजनिक सभेचे सेक्रेटरींनी ही तक्रार सोलापूर म्युनिसीपालटीकडे मांडली. त्यातून मटन आणि भाजी दोन्ही वेगवेगळ्या भागात विकले जाऊ लागले. दोन्ही मार्केट वेगळे झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले.[३६] सार्वजनिक सभेने असे अनेक स्थानिक प्रश्न घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न केला. सार्वजनिक सभेच्या प्रत्येक घडामोडीची आणि कार्यक्रम उपक्रमाची बातमी कल्पतरूने प्रकाशित केली. त्यामुळे सभेचे कामकाज लोकांपर्यंत पोहोचण्यास व लोकांमध्ये सार्वजनिक सभेबद्दल विश्वास निर्माण होण्यास मोठी मदतच झाली.

'कल्पतरू' ने आपल्या ३४ व्या अंकात दिनांक २८ एप्रिल १८७२ च्या अंकात म्हटले आहे,

**“सोलापूर प्रांतातील लोकांची स्वदेशप्रीती व सार्वजनिक हक्क संरक्षणार्थ उद्योग”** ः

सोलापूर प्रांतातील लोक स्वदेश प्रिती करीत आहेत व आपले हक्काचे बचावासाठी कसे झटत आहेत याची काही उदाहरणे ः

सोलापूर येथे एक सार्वजनिक सभा आहे. ती सभा देश कल्याणार्थ आपले काम फारच झटून करीत आहे. ह्या सभेचा पुढाकार मुख्यत्वेकरून विद्वान लोकांनी व वकील मंडळींनी घेतला आहे. ह्या सभेने (सार्वजनिक सभा) आपल्या प्रांतातील तालुक्यात पंढरपूर व करमाळे आणि माढे येथे सभा स्थापन केल्या. तसेच सांगोले व बार्शी येथे स्थापण्याचा विचार चालू आहे.

तालुक्याशिवाय इतर कसबे व गावागावात सभा स्थापण्याचा विचार सोलापूरची सभा करीत आहे. सोलापूर सभेचे सभासद स्वतःचे मिळकतीचे कामापेक्षा सार्वजनिक हितासाठी फारच झटत आहेत व सवड मिळेल तेंव्हा पाद्रीप्रमाणे जागोजाग लोकांस स्वहितामृत ज्ञानाचा उपदेश करीत आहेत.

इंग्लिश सरकारची व आपली अत्यंत प्रिती व परस्पर लोभाने वागून सरकारकडून आपले हित करून घ्यावे व सरकारासही यथायोग्य काळी मदत करावी असा या सभेचा हेतू आहे. स्वदेश भूमिचा अभिमान तसेच स्वदेश वस्तुंचा अभिमान ही सभा बाळगते.

देशातील संपत्तीचे मालक आपण असून केवळ आपले अज्ञानावस्थेमुळे आपले पालन करण्याचा व मालमत्तेचे व्यवस्थेचा इंग्रज सरकारने पत्कर घेतला आहे. तसेच सरकार म्हणजे प्रजेचे सुखाचे पुढारी आहे हे येथिल लोक सार्वजनिक सभेच्या योगाने चांगल्या प्रकारे समजू लागले आहेत.

सोलापूर येथे सभासदास व इतर लोकांस व वकील मंडळीस सरकारी कामगारांस परस्पर प्रितीभाव उत्पन्न होऊन लोक फार सुखात व आनंदात वागत आहेत. तंटे-बखेडे, द्वेष मुळीच नाहीत असे म्हटले तरी चालेल.

दुष्काळ पडल्यानंतर लोकांनी दहा हजार रूपये वर्गणी गोळा करून  शेकडो गरीबास भाकरी वाटून त्यांचे संरक्षण केले. बार्शी व माढे येथेही असेच घडले. या कृत्यास मुख्य पुढारी गणेश बाबाजी माटे वकील, सरकारी प्रॉसिक्यूटर व सोलापूर सार्व जनिक सभेचे जॉईंट सेक्रेटरी हे होते.

सार्वजनिक संबंधाने कोर्टास दावे लागले तर साक्षीदार पोटगी भत्ता घेऊन तो सभेकडे लागलीच देतात. सर्वांचा पैसा वर्गणीने लौकर जमा होतो. एकोप्यात व स्नेहीपणात मौज असून तसे होण्यात स्वदेशाचे कल्याण आहे, असे येथिल लोक समजतात. सार्वजनिक सभेचे पुढारी मेंबरास इतर लोक फार मान देतात व नेहमी त्यांचे आज्ञेत ते वागतात. अनाथ कैद्यातर्फे वकील लोक कधीकधी फुकट काम चालवितात. सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी विश्वनाथ नारायण व दिनकर बल्लाळ हे देशकल्याणार्थ वारंवार प्रितीने झटतात.

सोलापूरचे तलावास ज्या मार्गाने पाणी येते त्या ठिकाणी शौचकूप बांधले होते. पण रयतेने फिर्यादी लावून पाण्याचा मार्ग जतन केला. गावकूस पाडण्यास प्रारंभ केला होता पण सरकारामध्ये दाद नेऊन काम बंद पाडले. आता मॅजिस्ट्रेटने पुन्हा बांधून द्यावे असे सभेचे म्हणणे आहे. याचा निकाल अजून लागलेला नाही, प्रकरण कोर्टात आहे.

देश रिवाजाची माहिती होऊन वक्तृत्त्व शक्ती वाढावी या हेतूने येथे गेले एप्रिलपासून नवीन ज्ञानवर्धक या नावाची सभा स्थापन झाली आहे. म्यूनिसीपल कमिटीनचे हिशेब पाहणे व सरकारास आणि कमिटीस सूचना देणे हे काम सार्वजनिक सभा नित्यशः मनःपूर्वक करते. कसाई लोकांनी हिंदूंचे सोयीसाठी दुकाने दूर नेण्याचे कबूल केले.

काही ठिकाणी मुकादमे सार्वजनिक सभेत निकाल होणार असे ऐकिवात आहे व चौकशीचे काम पाच जज्ज बसून होणार असेही विचारात आल्याचे कळले. तलावातील गाळ काढण्यास लोकांनी एक हजार रूपये दिले.

अद्याप सभेची बाल्यावस्था आहे. तथापि सभा आपले शक्तीप्रमाणे काम ठीक करीत आहे. असे उत्तरोत्तर वृध्दीने नीट चालेल तर इतर ठिकाणपेक्षा सोलापूर प्रांत खचितच पुढारीपणाने नाव गाजवील यात संशय नाही."[३७] यावरूनच लक्षात येते की, कल्पतरूने सार्वजनिक सभेच्या कार्याला किती मोठे प्रोत्साहन आणि प्रसिध्दी दिली. सार्व जनिक सभेने लोकांमध्ये आपल्या नागरी सुखसुविधा मिळविण्यासाठी जागृती घडवून आणली. राजकीय साक्षरताक्ष एका अर्थाने 'कल्पतरू'ने घडवली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सोलापूर सार्वजनिक सभा ही पुणे सार्वजनिक सभेशी निगडीत होती. अतिशय चांगले संबंध आणि संपर्क या दोन्ही सभांमध्ये होता. दिनांक २६ जानेवारी १८७३ रोजी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यातील सार्वजनिक सभेचे पुढारी गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक काका' यांनी स्वदेशी वस्तुचे उत्पादन, विक्री आणि खरेदी तसेच स्वदेशी वस्तुंचे उत्पादन वाढण्यासाठी सोलापुरात काही उद्योग सुरू करता येतील का याविषयी सभेच्या बैठकीत चर्चा करावी असे या पत्रात सुचविलेले होते. या बैठकीस रावसाहेब माधवराव जानोजी, सबॉर्डिनेट जज्ज, श्री आप्पाजी रावजी मामलेदार, श्री सदाशिवराव गद्रे, श्री जी बी मते, श्री डी बी चक्रदेव, श्री एन व्ही देशमुख, श्री गोपाळ अनंत सहशिक्षक आणि इतर असे मान्यवर सभासद या बैठकीस उपस्थित असल्याचे 'कल्पतरू' च्या पत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे.[३८]

सोलापूर सार्वजनिक सभेचे तत्कालीन सेक्रेटरी श्री व्ही एन सहस्त्रबुध्दे यांनी आपल्या कारकिर्दीत एक वैशिष्ट्यपूर्ण काम केले. इंग्लंडच्या मेंबर ऑफ पार्लमेंटचे सभासद मि. हेन्री फॉसेट यांनी भारतीयांच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन श्री सहस्त्रबुध्दे यांनी त्यांना सार्वजनिक सभेच्या वतीने मानपत्र पाठविले. या मानपत्रास उत्तर म्हणून श्री फॉसेट यांनी एक पत्र पाठविले व या पत्रात सोलापूरकरांच्या भावनांचा मी आदर करीत असल्याचे सांगितले. मि.फॉसेट यांचे हे पत्र 'कल्पतरू' ने

आपल्या दिनांक १३ जुलै १८७३ च्या अंकात प्रकाशित केले आहे. या पत्राचा मसुदा असा ः –

**४९ बेस बरोगार्डन्स, लंडन. टा. ७ जून १८३**

मेहेरबान,

बाबू विश्वनाथ नारायण सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी सोलापूर यांस विनंती करतो की, सभेचे नावाने जे मानपत्र आम्हास तुम्ही पाठविले त्याकरीता माझे मनःपूर्वक आभार. आपण सोलापूर सार्वजनिक कमिटीस कळवावे.

हिंदुस्थानाकरीता जे थोडेसे मजकडून जाहले ते तुम्हास फार वाटले. आपणास खात्रीपूर्वक असे कळवितो की, हिंदुस्थानातील जी मला पुष्कळ मानपत्रे आली आणि त्या देशातील लोकांचे कल्याणाकरीता जे कांही पार्लमेंट सभेत घडून आले त्याबद्दल तेथिल लोकांनी जो मला मोठा मान दिला तेणेकरून हिंदुस्थानच्या विषयावर जितके माझ्याने लक्ष पुर्वेन तितके लक्ष पुर्वीण्याकरीता मला उत्तेजन देईल.

पुन्हा मी माझ्या सत्य भावाने तुमचे व सार्वजनिक सभेच्या कमिटीच्या सभासदांचे आभार मानतो.

**– हेन्री फॉसेट**

सदरचे पत्राला 'कल्पतरू' ने मोठी प्रसिध्दी दिली.[३९]

सोलापूर सार्वजनिक सभेप्रमाणे सोलापूर युनियन क्लब ही संस्थादेखिल देश कल्याणार्थ कार्य करीत होती. राजकीय जागरणात या क्लबचाही मोठा वाटा आहे. विविध परिषदांसाठी, कॉंग्रेससाठी प्रतिनिधींची निवड करणे व पाठविणे, मानपत्र देणे अशा अनेक कामांचा समावेश होतो. दिनांक ३0 नोव्हेंबर १८९३ रोजी इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे संस्थापक श्री ॲलन ऑक्टोव्हीयन हयूम यांनी सोलापूरला भेट दिली. त्यावेळी सोलापूर युनियन क्लबने हयूम साहेबांचा मानपत्र देऊन सत्कार केला. हयूमसाहेबांच्या

उपस्थितीतच इ.स.१८९३ च्या मद्रास कॉंग्रेससाठी सोलापूरच्या प्रतिनिधींची निवड करण्यात आली.[४०]

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' च्या अन्य एका अंकात गव्हर्नर लॉर्ड रिपन यांना मानपत्र देण्यासाठी मुंबईला युनियन क्लबचे शिष्टमंडळ पाठविण्यात आले होते. या शिष्टमंडळात शेठ वीरचंद दीपचंद, सखाराम रामचंद्र किर्लोस्कर, शरणप्पा कोडगी (श्री वारद यांच्यावतीने), दिनकर बल्लाळ चक्रदेव, गणेश जीवाजी केळकर, काझी सुलतान, प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर, बापूजी परशुराम फडके, सखाराम नेमचंद आणि नारायण पंढरीनाथ आदि जणांचा या शिष्टमंडळात समावेश होता.[४१]

सोलापूर सार्वजनिक सभा, सोलापूर युनियन क्लब, देशहितैशिनी सभा, वक्तृत्त्वोत्तेजक सभा अशा अनेक संस्था आणि संघटनांनी सोलापूरचे सार्वजनिक जीवन व्यापले होते. या संस्थांमुळे राजकीय प्रबोधनाची वाट अधिक प्रशस्त झाली होती. या सर्व संस्थांच्या प्रत्येक कार्यक्रमाला व उपक्रमाला 'कल्पतरू' ने भरभरून प्रसिध्दी दिली. त्यामुळे या सर्व कार्यक्रमाला जनतेचा सहभाग वाढला. लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण झाली. याचे सर्वाधिक श्रेय 'कल्पतरू' कारांना निःसंशयपणे जाते.

'कल्पतरू' ने पारतंत्र्याची जाणीव जनतेला करून दिली. लोकांमध्ये त्यांच्या वर्त नात आणि विचारात सुधारणा व्हावी म्हणून तसे विचार लोकांपर्यंत पोहोचवले. भारतीयांमधील फुटीरवृत्ती, संकुचितपणा, परधार्जिणेपणा, भेदभाव, जातीवाद ही सगळीच आपल्या पारतंत्र्याची कारणे आहेत. या वस्तुस्थितीवर 'कल्पतरू' कारांचा विश्वास होता. 'कल्पतरू' कारांनी सोलापूरकरांना स्वतःच्या हक्काची आणि कर्तव्याची जाणीव करून दिली. स्वावलंबनाचे धडेही दिले. राज्यकर्त्यांच्या मर्यादा आणि त्यांचे अन्यायी धोरण जनतेसमोर उघड केले. याविरूध्द सनदशीर मार्गाने कशी चळवळ उभी करता येई ल याचे दिशादर्शनही केले. मराठी वृत्तपत्र सृष्टीत सातत्याने ११० वर्ष चाललेले 'कल्पतरू' हे वृत्तपत्र सोलापूरच्या सामाजिक व राजकीय जीवनाचा एक अविभाज्य अंग

बनले होते. एखाद्या नंदादीपाप्रमाणे अत्यंत संयमाने ते शांतपणे तेवत राहिले व सोलापूरच्या समाजजीवनाला प्रकाशित करीत राहिले यात शंका नाही.

**'सोलापूर समाचार' ः राजकीय प्रबोधन ः**

'सोलापूर समाचार' हे शतायुषी ठरलेले सोलापूरातील दुसरे पत्र होय. वास्तविक पाहता समाचार कर्त्यांना कोणताही राजकीय विचारांचा वारसा लाभलेला नव्हता किंवा राष्ट्रीय चळवळीची परंपरा त्यांच्या कुटुंबात नव्हती. तरीही 'सोलापूर समाचार' ने राष्ट्रीय जागरणात केलेले कार्य कौतुकास्पद आहे. आपली वाटचालीची दिशा कशी असावी हे निश्‍चित करून संथपणे आणि तितक्यच ठामपणे समाचारकर्त्यांनी वाटचाल केली. थोडासा कल हा सरकारधार्जिणा वाटत असला तरी सामान्य जनतेशी असलेली त्यांची नाळ पक्की जोडलेली होती. 'समाचार' ने आपल्या संपूर्ण वाटचालीत जनतेच्या हिताशी वा त्यांच्या प्रश्‍नांशी कधी प्रतारणा केली नाही.

'सोलापूर समाचार' कर्त्यांना वृत्तपत्र व्यवसायाचा अल्पसा पूर्वानुभव 'नगर समाचार' मुळे आला होता. छायाचित्र कलेची आवड असल्याने व्यवसायाच्या निमित्ताने जक्कल घराणे सोलापुरात आले. त्यानंतर ३ फेब्रुवारी १८८५ रोजी 'सोलापूर समाचार' ची मूहुर्तमेढ रोवली. वडिल आबण्णा जक्कल यांचा छापखाना होता. त्यातच आणखी सुबक टाईपाची भर घालून कै.नरसप्पा जक्कलांनी सोलापुरात छापखाना टाकला. म्हणजेच मूळ व्यवसाय हा छापखान्याचा व छायाचित्रकलेचा होता. त्याला जोडूनच नगरप्रमाणेच 'सोलापूर समाचार' हे पत्र अस्तित्वात आले. छापखान्यामुळे कलेक्टर, नगरपालिका, रेल्वे अशा विविध सरकारी कार्यालयांशी संपर्क येत गेला. शहरातील धनिक व्यापारी, प्रतिष्ठित मंडळी व पुढाऱ्यांसोबत जक्कलांची उठबस वाढली. याचा स्वाभाविक फायदा 'समाचार' चालण्यावर झाला. 'समाचार' मुळे जक्कलांचा जनसंपर्क अधिक वाढला. परिणामी छपाईचा व्यवसायही अधिक स्थिरावला.

'सोलापूर समाचार' ची ही सर्व जन्मकथा डोळ्यासमोर आली की जक्कलांचा मूळचा पिंड हा पत्रकाराचा नव्हता. राजकीय वा सामाजिक कायकर्ता म्हणूनही त्यांनी कारकिर्द घडविली नव्हती. योगायोगाने जक्कल घराणे वृत्तपत्र व्यवसायात आले. छपाई च्या अंगभूत ज्ञानाने व व्यावसायिक गुणवत्तेने ते वृत्तपत्र व्यवसायात रमले. याशिवाय संस्थापक नरसाप्पा जक्कलांची लोकसंग्राहक वृत्ती 'समाचार' ला अधिक बळकट करत गेली. 'सोलापूर समाचार' चे धोरण प्रारंभापासूनच सर्वसंग्राहक व सर्वांशी मिळतेजुळते घेण्याचे असल्याने खटके उडण्याचा किंवा विशेष काही अडचणी निर्माण होण्याचे प्रसंग त्यांच्या आयुष्यात सहसा कधी आले नाहीत. स्वतःच्या इमारतीत वृत्तपत्र व छापखाना आल्यानंतर, १९१४ साली नरसप्पा कालवश झाले. २८ वर्षे त्यांनी आपले पत्र वाढत्या स्थैर्याने चालविले. त्यानंतर त्यांचे चिरंजीव विठ्ठलराव जक्कल हे समाचारची जबाबदारी सांभाळू लागले. विठ्ठलरावांची वृत्तीही वडिलांसारखीच असल्याने व सरकार दरबारी त्यांनी वळण ठेवल्याने पत्राचा जम अधिक बसला. 'रावसाहेब' ही पदवी देऊन सरकारने विठ्ठलरावांच्या कार्याचा गौरवही केला."[४२]

संस्थापक नरसप्पा जक्कलांनी 'समाचार' ची धुरा २८ वर्षे वाहिली. एवढ्या वर्षा च्या कालावधीत वृत्तपत्राचा 'स्वभाव', रचना, धाटणी आणि विचारधारा निश्चित होणे सहज शक्य होते. परराज्यातून (आंध्र प्रदेश) इथे मराठी मुलुखात येऊन मातृभाषा तेलुगु असतानाही मराठी भाषिक पत्र प्रस्थापित करणे तसे सोपे नव्हते. त्यामुळेच नरसप्पा जक्कलांचे कर्तृत्व अधिक ठळकपणे दिसून येते. "नरसप्पा जक्कलांनी आपल्या निधनापूर्वीच विठ्ठलराव जक्कलांना संपादकपदी बसविले होते. विठ्ठलराव जक्कल दिनांक २८ एप्रिल १९१३ पासूनच संपादक पदावर आरूढ झाले."[४३] 'सोलापूर समाचार' आजही दैनिक 'विश्व समाचार' या नावाने चालू आहे. आपल्या सव्वाशे वर्षाच्या वाटचालीत 'समाचार' पत्रामध्ये कधीही आक्रमकपणा, उथळपणा किंवा राजकीय अभिनिवेश दिसला नाही. 'सोलापूर समाचार' चे हे सर्व टप्पे तपशिलाने विचारात घेण्याचे कारण असे की,

समाचारने आपल्या पानांवर कधी राजकीय रंग चढू दिला नाही. समाचारची राजकीय प्रबोधनाची स्वतःची एक चौकट ठरलेली होती. त्या चौकटीत राहूनच समाचारने लोकांना राजकीयदृष्ट्या शहाणे केले.

"सोलापूरचे सार्वजनिक जीवन कसे सुधारेल?" ही प्रामाणिक तळमळ सोलापूर समाचारच्या संपादकांना होती. सोलापूर म्यूनिसीपालटी हे सार्वजनिक जीवनाचे एक प्रमुख केंद्र असल्याने तेथिल घडामोडींना, शहराच्या नागरी समस्यांना प्राधान्य दिले जात होते. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत समस्यांचा उहापोह करणारी लेखमाला प्रसंगोपात्त प्रकाशित केली जात होती. "आज आमच्या म्युनिसिपालटीचे मेहेरबानांनी ड्रेनेज बांधून घेतले आहेत. पण त्यातून वाहायला व घाण न्यायला पाणीच नाही. टाकळी योजनेची वास्तुशांती कधी होणार? यंदा पाण्याच्या बाबतीत परमेश्वराने हात दिला आहे तर अन्नाच्या बाबतीत तो डोळे वटारू लागला आहे. आम्ही निसर्गावर विसंबतो थोडे (?) बेफिकीर राहातो आणि निसर्गावर मात करणे शक्य असतांना! आजची दुनिया वेगवान आहे, आपण लंगडत जाऊन उपयोग नाही."[४४] असे वास्तववादी लिखाण 'गिरीधर' या नावाने संपादकांनीच लिहिलेले दिसते. याच लेखात अनेक विषय हाताळलेले आहेत. शिक्षणाविषयी ते लिहितात, "सक्तीचे शिक्षण कायदा लागू असला तरी बरीच मुले शाळांमधून जात नाहीत. त्याचप्रमाणे नागरिकही – प्रौढ नागरिकही बऱ्याच प्रमाणात निरक्षर आहेत. त्यासाठी केवळ साक्षरता योजना म्हणजे शाळा असे स्वरूप न ठेवता मनोरंजन, शारिरीक शिक्षण, सामाजिक, राजकीय व नैतिक दर्जा उच्च होईल अशी बौध्दीके यांची नोंद ठेवावी. यासाठी अशा ध्येयांनी काम करणाऱ्या संस्थांचे सहकार्य घ्यावे. व्यापारी शाळा व पहिलवानांसाठी सोलापूर प्रसिध्द आहे. त्या व्यायाम शाळांना बरीच जोड द्यावी." [४५]

सोलापुरच्या बहुभाषिक संस्कृतीचा समाचारकर्त्यांना सार्थ अभिमान होता. या बहुभाषिक संस्कृतीविषयी याच लेखात ते पुढे म्हणतात, "आपले शहर हे एक संगम

स्थान आहे. नद्यांचे नव्हे तर संस्कृतीचे. कन्नड, मराठी, गुजराथी, पंजाबी, तेलंगी अशा निरनिराळ्या संस्कृतीचे नागरिक येथे आहेत. त्यातील उत्कृष्ट गोष्टींचा आचारोपचार घेऊन एक सर्वोत्तम सोलापूरी संस्कृती निर्माण करण्याचे प्रयत्न व्हावेत. राष्ट्रात भिन्न भाषा, कला, संस्कृती असू शकतात. परंतु त्यांच्या संस्कृति संगमाने ते राष्ट्र जिवंत व आदर्श होत असते. सोलापूरच्या नागरिकांनी आदर्श निर्माण करण्याचा मान घ्यावा. कित्येकांना भिन्न भाषा या भांडखोर सवईच वाटतात. माझा अनुभव उलटा आहे. मी एक बहुभाषी प्राणी आहे. मला मराठी, गुजराथी, इंग्रजी चांगले येते तसेच हिंदी, उर्दू, कानडीशी माझी ओळख आहे. यापैकी जी भाषा बोलणारी व्यक्ती मला भेटेल तिच्याच भाषेत मी बोलतो आणि माझ्यावरील त्यांचे प्रेम वाढत आहे. संस्कृती साधनात ही कला हवी. कन्नडीगांची कर्नाटक गल्ली, तेलुगु भाषिकांचे तेलंगण स्थान, गुजराथ्यांची गुजराथ वाडी वगैरे प्रकार सोलापुरात नाहीत आणि नसावेतही. सोलापुरच्या वैभवाला वाढविणारे वालचंद घराणे, हरिभाई देवकरण घराणे आणि बरेचसे गिरणीवाले गुजराथी आहेत. देशकार्यासाठी पण यातील लोकांनी आपला वाटा उचलला आहे. कानडी बोलणारे श्रीमान वारद घराणे, श्री अब्दुलपूरकर, श्रीमंत काडादी घराणे यांनी नाही का सोलापूरचा गौरव वाढविला आणिा मल्लप्पा काकांना कोण विसरेल? मारवाडी मंडळी व्यापारी व दानशूर तर आहेतच. पण पू. जाजू व स्वर्गीय राठीजी, तेलगु भाषिकांतील पुल्ली, बेत, चन्नापट्टण वगैरे लोकांनी हेच केले. सोलापूरचे चार हुतात्मे हे चार संस्कृतीचे एक प्रतिक आहेत. 'येथे धर्म न् जाति सगळे एकचि होती' महाराष्ट्राविषयी तर अधिक लिहिणे नलगे. ही उक्ती सोलापूरला लागू पडते. हिंदु, लिंगायत, जैन, पारशी, आर्यसमाजी, मुसलमान सगळेच गुण्यागोविंदाने राष्ट्रकार्यार्थ व सोलापूरच्या गौरवार्थ झटले, झटावे."[४६]
अशा अनेक विचारगर्भ लेखांनी सोलापूरच्या लोकांमध्ये राष्ट्रीय व राजकीय जागृतीची बीजे पेरली गेली. वर उल्लेख केलेला अंकामध्येच आचार्य दादा धर्माधिकारी यांचा 'बहुजनसमाजवाद' या विषयावर लेख दिलेला आहे. या लेखात त्यांनी बहुजनसमाजवाद

म्हणजे काय? ब्राह्मणेतर चळवळ कशी होती? अशा अनेक प्रश्नांचा उहापोह दादा धर्माधिकारी यांनी आपल्या लेखामध्ये केला आहे. ते म्हणतात, "वर्गभेद नाहीसे झाले तर जातीभेद नाहीसे होतील यात शंका नाही. आर्थिक विषमता गेली म्हणजे सर्व लोकांचा आर्थिक दर्जा समान होईल आणि त्यामुळे परस्पर संबंध वाढतील. झेथे वर्गभेद म्हणजे आर्थिक भेद आहेत तेथे दोन वर्गात फारसे साामाजिक संबंध नसतात. पण एकाच जातीच्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा सारखा नसला तरी त्यांच्यात सामाजिक व्यवहार होतो..." "या देशातील वरिष्ठ वर्ग किंवा पांढरपेशा वर्ग हाही जातीमूलक आहे. इतर देशातील वरिष्ठ वर्ग किंवा पांढरपेशे फक्त आर्थिक दर्जामुळे किंवा विशिष्ठ व्यवसायामुळे तसे बनलेले आहेत. पण हा देशातील धंद्याचा जातीशी अभेद्य संबंध असल्यामुळे फक्त पांढरपेशे वर्गवादी नाहीत तर पांढरपेशा जातीही आहेत. म्हणून पांढरपेशा वर्गाचे वर्चस्व नाहीसे करण्याचा प्रयत्न करताना, पांढरपेशा जातीचे वर्चस्व नाहीसे करण्याचा प्रयत्नही ओघानेच करावा लागतो..."[४७] अशा अनेक विचारवंत लेखकांचे लेख हे समाचारचे वैशिष्ट्य होते.

'समाचार' ने पक्षीय राजकारणाच्या चौकटीत वावरण्यापेक्षा नेहमीच राष्ट्रीय राजकारणाला प्राधान्य दिल्याचे अनेक प्रसंगातून जाणवते. पक्षीय राजकारणातील आरोप – प्रत्यारोप, व्यक्तीद्वेष, कोणत्या तरी एका विचाराची तळी उचलून धरण्याचे किंवा कोणत्या तरी पक्षाचे प्रचारकी थाटाचे लिखाण अशा कोणत्याच गोष्टीला 'समाचार' ने आपल्या अंकात थारा दिला नाही. याचा अर्थ समाचारला राजकारण व्यर्ज होते असा नाही. तर सर्व राजकीय विचारधारांपासून समाचारने स्वतःला समान अंतरावर ठेवले होते किंवा सर्व राजकीय विचारांपासून समान अंतर ठेवून आपली वाटचाल केली. हे पथ्य जेवढ्या कटाक्षाने पाळले तेवढ्याच हिरीरीने राष्ट्रीय राजकारणात स्वतःला झोकून दिले. देश हिताचे जे आहे त्याचा प्रचार करायचा आणि जे देशविघातक आहे त्याचा विरोध करायचा असा सरधोपट मार्ग 'समाचार' ने स्वीकारला. याचा परिणाम असा झाला की,

व्यक्तीगत पातळीवर अथवा पक्षाच्या पातळीवर वादाचे, अडचणीचे प्रसंग 'समाचार' कर्त्यांवर आले नाहीत. [४८]

'मार्शल लॉ' ही सोलापूरच्या राजकीय, सामाजिक जीवनातील अत्यंत महत्वाची घटना होती. दिनांक ६ मे १९३० ते १२ मे १९३१ असा जवळपास एक वर्षभराचा कालावधी केवळ सोलापूरच नव्हे तर संपूर्ण देशाच्या राजकारणाच्या आणि स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने अत्यंत वेगवान घडामोडीचा काळ होता. दिनांक ९ ते ११ मे १९३० असे तीन दिवस सोलापूरकरांनी औटघटकेचे का असेना पण मनःपूर्वक अनुभवलेले स्वातंत्र्य, दिनांक १२ मे १९३० पासून अंमलात आलेला मार्शल लॉ, अमानुष अत्याचार आणि सर्व देशभक्तांची झालेली धरपकड, इंग्रजी सोल्जरांनी त्यांच्यावर केलेले अमानुष अत्याचार, रस्त्यावरून काढलेली धींड, आणि सर्वात शेवटी सर्व देशभक्तांना दोषी ठरवून ठोठावलेली अमानुष शिक्षा, दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी सोलापूरच्या चार सुपुत्रांना देण्यात आलेली फाशी या सगळ्या घटनांच्या समग्र उल्लेखाशिवाय आणि अभ्यासाशिवाय सोलापूरचा इतिहास पूर्ण होऊच शकत नाही. केवळ देशभरातच नव्हे तर इंग्लंडच्या पार्ल मेंटपर्यंत या सर्व घटनांची नोंद घ्यावी लागली, इतक्या या घटना महत्वाच्या आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या आहेत. 'कल्पतरू' असो वा 'समाचार', 'कर्मयोगी' असो वा 'गजनफर' या सगळ्याच पत्रांचा इतिहास म्हणजेच सोलापूरचा स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास आहे. त्यामुळे या घटनांचा प्रत्येक पदर इथल्या पत्रांशी जोडलेला आहे. प्रत्येक पत्रकर्त्यांनी आपल्या कर्तृत्वाने या लढ्याला अधिक सशक्त केले आहे.

'सोलापूर समाचर' ही याला अपवाद नाही. या काळातील वातावरण अतिशय प्रक्षोभक व स्फोटक बनलेले होते. दिनांक १२ मे १९३० पासून मार्शल लॉ अंमलात आणला गेला. या कायद्यांतर्गत अनेक राजकीय पुढाऱ्यांची, कार्यकर्त्यांची, सामान्य नागरिकांचीसुध्दा धरपकड करण्यात आली. अनेकांना शिक्षा सुनावली गेली. दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी कै. मल्लप्पा धनशेट्टी, कै. जगन्नाथ शिंदे, कुर्बाम हुसेन व

श्रीकिसन सारडा या क्रांतीकारकांना फाशी दिली गेली. या सर्व घटनांची तपशिलवार माहिती देऊन 'सोलापूर समाचार'ने लोकांमध्ये जागृती घडवून आणली. सोलापुरात घडणाऱ्या घटनांचे पडसाद जनमानसात उमटत असत. या क्रिया – प्रतिक्रियांच्या काळात प्रत्येक घटनांची तपशिलवार माहिती देऊन 'सोलापूर समाचार' ने अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. 'मार्शल लॉ' खाली अटक करण्यात आलेल्या आरोपींना सोडण्यात यावे यासाठी दयेची विनंती करणाऱ्या सभा–बैठकांचे आयोजन केले जात असे. त्याचीही दखल 'समाचार' ने घेतली.[४९]

देशभरामध्ये या काळात टिळक नावाची जादू काम करीत होती. टिळकांच्या नंतर गांधी युग अवतरले. त्यामुळे देशात स्वातंत्र्य प्रेमाला नुसते उधाण आले होते. लोकांच्या देशप्रेमाला एक नवे भरते आले होते. सोलापूरसाठी त्यातल्या त्यात दिनांक ८ मे १९३० ते मे १९३१ हा वर्षभराचा काळ स्वातंत्र्य लढा टिपेला पोहोचवणारा ठरला. दिनांक ८ मे १९३१ रोजी सोलापूरच्या तुळजापूरवेशीतील चौकात सभा भरली. त्यातील सर्व वक्त्यांनी वर्षभरापूर्वी म्हणजे ८ मे १९३० रोजीची घटना, त्यानंतरचा मार्शल लॉ, चार हुतात्म्यांना दिलेली फाशी या सर्वच घटना कशा अन्यायकारक होत्या याचे वर्णन केले. त्याची इत्थंभूत बातमी 'समाचार' ने दिली.

'मार्शल लॉ' च्या काळातीलच एक महत्वाची घटना पण तितकीशी प्रकाशात आली नाही. धारासनाच्या (गुजरात) मिठागारावर हल्ला करण्यासाठी सोलापुरातून काही तरूण गेले होते. त्यात कै.भाऊ रेवाप्पा हुल्ले हे पोलीसांच्या लाठीमारात शहीद झाले. ही घटना दिनांक ९ जून १९३० रोजी घडली. म्हणजे सोलापुरात अजूनही 'मार्शल लॉ' चा अंमल होता. अशा तणावाच्या काळातही या तरूणांनी दाखवलेले धाडस म्हणजे क्रांतीकारकांच्या पंक्तीत जाऊन बसणारेच होते. या घटनेची 'सोलापूर समाचार' ने बातमी दिली. त्यामुळे सोलापूरच्या स्वातंत्र् लढ्याची तीव्रता लोकांसमोर आली. त्यातून अनेक तरूणांनी प्रेरणा घेऊन या कार्यात उडी घेतली. बरोबर एक वर्षांनी दिनांक ९ जून

१९३१ रोजी कै. हुल्ले यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सोलापुरातील टिळक चौकात मोठी सभा भरली. त्याचेही सविस्तर इतिवृत्त 'सोलापूर समाचार' ने दिले. [५०]

'समाचार' ने नेहमी अगदीच मिळमिळीत धोरण स्वीकारले होते असे नाही. समाचारच्या संपादकांनी शक्यतो सामोपचाराचा मार्ग कधी सोडला नाही पण संधी मिळेल तेंव्हा आणि आवश्यक तेंव्हा सरकारला कानपिचक्या जरूर दिल्या आहेत. 'मार्शल लॉ' मध्ये बंदी झालेल्या कैद्यांना अन्य शहरातील राजबंद्यापेक्षा अतिशय कठोर शिक्षा सुनावल्या गेल्या. म.गांधी – आयर्विन करारानुसार या राजकीय कैद्यांना सुनावलेली शिक्षा माफ करण्यातही आली. या प्रकरणाला अनुसरून 'समाचार' ने लिहिले, "या निर्णयाकडे पाहिल्यानंतर गांधी–आयर्विन करारनाम्याप्रमाणे वागण्यास आता अधिकारी वर्गाची मनोवृत्ती काही प्रमाणात क्षमाशील झालेली आहे असे दिसून येईल. परंतु ती यापूर्वीच दिसून आली असती तर यापेक्षा अधिक उत्कृष्ट परिणाम दिसून आला असता. अखेर थोड्याशा उशिरानेच का होईना परंतु सरकारला सुबुध्दी सुचली व दिल्लीच्या तहनाम्याप्रमाणे आपलीही वागण्याची तयारी आहे हे सरकारने दाखवून दिले. सरकारच्या धोरणात हा जो बदल झाला आहे बदल झाला आहे तो काही महिन्यापूर्वीच झाला असता तर देहान्त दंड झालेल्या आरोपींच्या शिक्षाही कदाचित बदलल्या गेल्या असत्या!"[५१] अतिशय रास्त मुद्दा हाती घेऊन 'समाचार' ने हा विषय चर्चिला आहे. वास्तविक पाहता समाचारने उपस्थित केलेला मुद्दा सोलापूरच्या स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने अधिक महत्वाचा होता. सरकारला हे शहाणपण उशिरा सुचल्याने सोलापुरातील राजबंद्यांना त्याचा फायदा होऊ शकला नाही. गांधी–आयर्विन कराराची अंमलनजावणी थोडी आधी झाली असती तर कै. मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, श्रीकिसन सारडा यांची फाशीही रद्द होऊ शकली असती. अर्थात, हे इतके सहज आणि सोपे नव्हते. म.गांधींनी कठोर भूमिका स्वीकरली म्हणूनच लॉर्ड आयर्विनला नमते घ्यावे लागले.

सोलापूरच्या स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने समाचारने उपस्थित केलेला मुद्दा अतिशय रास्त होता हे यावरून लक्षात येईल.

याच खटल्यातील एक महत्वाचे आरोपी होते कै. रामभाऊ राजवाडे! 'कर्मयोगी' या साप्ताहिकाचे ते संपादक होते. या साप्ताहिकाने सोलापुरच्याच नव्हे तर देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची कामगिरी मार्शल लॉच्या काळात बजावलेली आहे. त्याचा स्वतंत्रपणे अभ्यास याच प्रकरणात पुढे आलेला आहे. कै.रामभाऊ राजवाडे यांनी केलेल्या हिमालयाएवढ्या धाडसामुळेच दि. ८ मे १९३० रोजीच्या अत्याचाराची माहिती जगासमोर येऊ शकली. शेवटी रामभाऊ राजवाडे यांनाही पकडण्यात येऊन त्यांनाही कठोर शिक्षा सुनावण्यात आली. पण गांधी – आयर्विन करारातून कै. रामभाऊ राजवाडेंचे नांव वगळण्यात आले याबद्दल 'समाचार' ने खेद व्यक्त केला. [५२]

याच संदर्भातील दैनंदिन घडणाऱ्या घटनांची तपशिलात नोंद समाचारने घेतली आहे. गांधी आयर्विन करारानुसार कमी झालेल्या शिक्षांच्या प्रत्येक घडामोडीकडे 'समाचार' चे लक्ष होते. दिनांक १७ एप्रिल १९३१, २० एप्रिल १३९१, २१ एप्रिल १९३१ अशा सलग बातम्या व अग्रलेख लिहून समाचारने लोकांमध्ये जागरूकता घडवून आणली. सोलापुरातील कोर्ट जळीत प्रकरण अतिशय गाजले. दिनांक ८ मे १९३० रोजीच्या प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने सोलापुरातील कोर्ट त्याच्या कागदपत्रांसह जाळून टाकले. मंगळवार पेठेतील पोलीस चौकी जाळली अशा अनेक घटनांनी सोलापूरचे वातावरण प्रक्षुब्ध झालेले होते. दिनांक १२ मे १९३० पासून मार्शल लॉ ची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानुसार मोठ्याप्रमाणावर धरपकड होऊन शिक्षा सुनावल्या गेल्या. त्यातील काही जणांच्या शिक्षा कमी झाल्याची बातमी समाचारने दिली. 'जगन्नाथ मास्तर व भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या शिक्षा हायकोर्टात कमी झाल्याची बातमी दिनांक १७ एप्रिल १९३१ च्या अंकात दिली आहे. "कोर्ट जळीताचे व कटाचे खटल्यातील हायकोर्टा चा निकाल सांगण्यास न्यायाधीशांना तीन तास लागले. जजमेंट १९० पानांचे आहे असे

म्हणतात. जगन्नाथ मास्तर व छन्नुसिंग यांना अनुक्रमे ११ र्षे व ९ वर्षे अशा शिक्षा बाकीचे खटल्यतील मिळून भोगवयाच्या होत्या. (म्हणजे जगन्नाथ मास्तर यांना कोर्ट केसमध्ये ७ व.स.म. चावडी केसमध्ये २ व स.म.दारूगत्याच्या केसमध्ये २ व स.म. छन्नुसिंग यांना कोर्टकेसमध्ये ७ व. स.म. चावडी केसमध्ये २ व.स.म.) त्या सर्व एकदम भोगाव्या असा हायकोर्टाने निकाल दिल्यामुळे दोघांना ७–७ वर्षाच्याच शिक्षा भोगावयाच्या आहेत."[५३]

दिनांक ८ मे १९३0 रोजीच्या कोर्ट जळीत, पोलीस चावडी व दारूगुत्याजवळील आंदोलनात अनेकांना कठोर शिक्षा झाल्या. पण पुढे गांधी–आयर्विन करारनाम्यानुसार या शिक्षा व आकारलेला दंड माफ करण्यात आले. पण यात कै.रामभाऊ राजवाडे यांचा समावेश नसल्याने या घटनेवर 'सोलापूर समाचार' ने "गोडीला गालबोट लागले" असा अग्रलेखच लिहिला. यात संपादकांनी लिहिले आहे, "सोलापूर येथे गेल्यावर्षी मार्शल लॉ मधील मिलिटरी कोर्टाकडून ज्यांना शिक्षा व दंड झाला होता, त्यांची भोगावयाची राहिलेली शिक्षा व न भरलेला दंड माफ करून मुंबई सरकारने त्यांना बंधमुक्त केल्याचे जाहीर केले, याबद्दल कोणासही आनंदच वाटेल. मार्शल लॉ कैद्याच्या शिक्षा व दंडाबाबत जाहीर केलेल्या पत्रकात मुंबई सरकारने असे म्हटले आहे की, "कायदेभंगाच्या चळवळीत इतर ठिकाणी झालेल्या शिक्षांपेक्षा सोलापूर येथे लष्करी अमलाखाली झालेल्या शिक्षा जरी फारच निराळ्या स्वरूपाच्या असल्या व त्यावेळी अत्याचाराला उत्तेजन देण्याच्या कृत्यापासून इतर वेळेपेक्षा सार्वजनिक शांततेला फारच मोठ्या प्रमाणात धोका पोहोचण्याचा संभव होता. तरी व्हॉईसरॉय व मि. गांधी यांच्या दरम्यान झालेल्या समेटास अनुसरून, या शिक्षांची फेरतपासणी करण्याचे गव्हर्नर इन कौन्सिलने ठरविले, व त्याप्रमाणे या शिक्षांची फेरतपासणी केली. सध्या बदललेली परिस्थिती लक्षात घेता लष्करी कायद्याखाली शिक्षा झालेल्या लोकांनी जी शिक्षा आत्तापर्यंत भोगली ती न्यायदानाच्या पूर्ततेसाठी पुरी झाली आहे असे गव्हर्नर इन कौन्सिलला वाटत आहे. याच

दृष्टीने या कैद्यांच्या उरलेल्या शिक्षा माफ करण्याचे व ज्यांच्या दंडाच्या रकमा अद्याप भरलेल्या नाहीत, त्या सर्व माफ करण्याचे त्यांनी ठरविले आहे."

वरील निर्णयाकडे पाहिल्यानंतर गांधी आयर्विन करारानाम्याप्रमाणे वागण्यास आतां अधिकारी वर्गाची मनोवृत्ती काही प्रमाणात क्षमाशील झाली आहे. असे दिसून येईल. ही क्षमाशील मनोवृत्ती आजच्या परिस्थितीतही इष्ट परिणामीच होईल परंतु ती या पूर्वीच दिसून आली असती तर यापेक्षा अधिक उत्कृष्ट परिणाम घडून आला असता आणि सरकार व जनता यांचे सख्यत्व व सहकार्य याविषयी काहीच अडचण राहिली नसती. अखेर थोड्याशा उशिरानेच का होईना पण पण सरकारला सुबुध्दी सुचली व दिल्लीच्या तहनाम्याप्रमाणे आपलीही वागण्याची तयारी आहे असे सरकारने दाखवून दिले..." या संपादकीयात पुढे म्हटले गेले आहे, "...याशिवाय सोलापूरच्या ज्या कैद्यांना माफी देण्यात आली ती सरसकट नसून श्री राजवाडे यांना वगळण्यात आले आहे. म्हणून असमाधान वाटते. वास्तविक श्री राजवाडे यांनाही सर्व कैद्यांबरोबर मुक्त करणे अत्यंत जरूर होते, परंतु त्यांना सोडण्याची सरकारला इच्छा होत नाही असे दिसते. सरळ रस्त्याने चालता चालता आडरानांत शिरण्यासारखा हा प्रकार झाला आहे. सर्व कैद्यांना सोडण्याचे औदार्य दाखववायाचे पण एकट्या दुकट्या करतांच कंजुषपणा करायचा याला मुत्सद्देगिरीचे धोरण म्हणता येणार नाही. आडमार्गी अदूरदर्शी व दुटप्पी धोरणाचेच हे उदाहरण होय." [५४]

ब्रिटिश सरकारच्या धोरणाविषयी टीका करताना इंग्रजांनी आपली पिळवणूक कशी चालवली आहे याचे साद्यंत वर्णन 'समाचार' ने आपल्या अनेक संपादकीय लेखातून केले आहे. "हिंदुस्थानचा सुवर्णक्षय" या संपादकीय लेखात संपादक म्हणतात, "सुवर्ण भूमी म्हणून प्राचीन काळी विख्यात असलेला हिंदुस्थान देश आमच्या काळी स्मशानभूमी म्हणून बोट करून दाखविण्या इतका हीन दशेस जाऊन पोहोचला आहे. ज्या देशातील दगडमाती आणि विटाच काय पण धूरसुध्दा सोन्याचा निघतो म्हणून जगभर ख्याती.

त्याच या हिंदुस्थानातील सोन्याचा धूर आत्ता परदेशात जाऊन साठू लागला आहे. सुवर्ण मय हिंदुस्थानला आता सुवर्णक्षय झाला आहे!

क्षय झाल्यानंतर मनुष्य ताबडतोब मरत नसतो. महामारी, पटकी इत्यादी रोग माणसाला पटकन उचलून यमदरबारी दाखल करतात. परंतु क्षयरोगाचे तसे नाही. तो माणसाला झिजून झिजून इतकी प्रेतकळा आणतो की, त्याच्यात आणि मेल्या माणसात फरकच उरत नाही! सांप्रत हिंदुस्थानचीही स्थितीही अशीच झाली आहे.

हिंदुस्थानातून विलायतेकडे चाललेला सोन्याचा प्रवाह पाहिला म्हणजे हिंदुस्थानला सुवर्णक्षय लागला आहे, हे वैद्यकीय परीक्षेवाचून कोणालाही सहज समजून येईल! या सुवर्णक्षयाची बाधा सुमारे चार महिन्याखाली झाली असून तेंव्हापासून हा रोग बळावतच चालला आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या देशातील सोन्याची निर्यात जी चालू झाली ती अद्यापपर्यंत चालूच आहे. दर आठवड्याला मुंबई बंदरातून हिंदुस्थानातील सोने परदेशी रवाना होऊ लागले आहे. कधी २९ लक्ष कधी ४६ लक्ष तर कधी एक कोटी दोन कोटी रूपयात अन् आता चार चार कोटी रूपये किंमतीच्या सोन्याच्या लगडी बोटीत घालून परदेश गाठत आहेत..."

"सोन्याच्या निर्यातीकडे सरकार लक्ष देवो अगर न देवो परंतु लोकांनी तरी सुवर्ण क्षयाचे परिणाम लक्षात घेतले पाहिजेत. एकदा बाहेर गेलेले सोने परत मिळवणे कठीण जाईल असे जे पं. मालवियांनी म्हटले आहे ते यावेळी हिंदी लोकांनी पूर्ण ध्यानात ठेवणे जरूर आहे. पुढे स्वस्त भावात सोने विकत घेता येईल अशा गैर समजुतींने यावेळी सोने विकावयास काढणे केव्हाही हितकारक होणार नाही कारण सोन्याचे भाव खाली जाईल अशी आशा नाही. अमेरिका, फ्रान्ससारख्या सुवर्ण वेड्या राष्ट्रात आज हिंदुस्थानातील सोन्याचा प्रवाह जात आहे. तो येथून परत फिरणे फार कठीण आहे. यास्तव स्वहीत आणि देशहित अशा दोन्ही दृष्टीने सोन्याची परदेशी निर्यात करणे जाणून बुजुन शुध्द वेडेपणा आहे..."[५५]

कॉंग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केल्यापासून गांधी – आयर्विन मुलाखतीने झालेल्या समेटापर्यंतचा काळ ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्वाचा गणला जाईल असाच महत्वाचा आहे. 'सोलापूर समाचार' ने या कालावधीतील महत्वाच्या घटनांची एक जंत्रीच दिली आहे. क्रमवार दिलेल्या घटनांनी हिंदुस्थानचा इतिहासातील अत्यंत वेगवान घडामोडीचा काळ एका दृष्टीक्षेपात दिला आहे. म.गांधी व लॉर्ड आयर्विन यांच्यासारख्या बड्या लोकांची नांवे या घडामोडीने हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासात कोरून ठेवली जातील!

कॉंग्रेसने ता. ३१ डिसेंबर १९२९ च्या मध्यरात्री रावी नदीच्या किनाऱ्यावर पूर्ण स्वातंत्र्य जाहीर केले. ता. २६ जानेवारी १९३0 रोजी कॉ. वर्कींग कमिटीने तयार केलेला स्वातंत्र्याचा ठराव सर्व देशभर वाचण्यात आला.

ता. १२ मार्च रोजी म. गांधी व त्यांचे पहिले ७८ सैनिक यांनी 'निमक का कायदा' तोडण्यासाठी साबरमती आश्रमातून बाहेर पडून दांडीकडे कूच केले. ता. ५ मे रोजी दांडी येथे महात्मा गांधींना अटक करण्यात आली व येरवडा तुरूंगात राजकैदी म्हणून ठेवले.

मजूर पक्षाचे वर्तमानपत्रकर्ते व मुख्य प्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांचे खाजगी प्रतिनिधी मि. जॅज स्टीफीन येरवड्यात म. गांधींची मुलाखत घेतली. सरकारने ता. २६ ऑगस्टला कॉंग्रेसची वर्कींग कमिटी बेकायदा ठरवली व सभासदांस शिक्षा ठोठावल्या!

लॉर्ड आयर्विन यांच्या ता. २९ जानेवारीच्या जाहीरनाम्याने म. गांधी व वर्किंग कमिटीच्या सभासदांची मुक्तता. ता. ३१ जानेवारीला कॉ. वर्किंग कमिटी अल्हाबादेस भरून समेटाच्या अटीचा मसुदा तयार करण्यात आला.

कराची कॉंग्रेसचे अध्यक्षपदास डॉ. सरदार वल्लभभाई पटेलांची योजना. ता. ६ फेब्रुवारीस पं. मोतीलालजींचे लखनौ येथे देहावसान. ता़ ८ फेब्रुवारीला डॉ. सपुंची कॉंगेस पुढाऱ्यांशी मुलाखत. ता. १२ फेब्रुवारी रोजी म. गांधींनी ठरविलेल्या तहाच्या अटीस कॉंगेस वर्किंग कमिटीची मान्यता.

महात्मा गांधींचे ता. १४ फेब्रुवारीला बड्या लाटसाहेबांना पत्र! ता. १६ फेब्रुवारी रोजी बड्या लाटसाहेबांकडून महात्माजीस आमंत्रण. ता. १७ फेब्रुवारी. ळॉर्ड आयर्विन – गांधी मुलाखत. ता. १८ फेब्रुवारी रोजी समेट फिसकटण्याची चिन्हे. वर्किंग कमिटीने म. गांधींना ता. २४ फेब्रुवारीस समेटाबद्दल मुख्त्यातरी दिली.

ता. १७ फेब्रुवारीस आयर्विन – गांधी समेट. ता. २८ फेब्रुवारीला वर्किंग कमिटीचा ता. व्हाईसराय साहेबांच्या प्रतिकुल योजनेस नकार. समेट मोडण्याची भिती. ता. १ मार्च रोजी महात्माजींनी सबंध दिवस व रात्रभर बडवा छाटांची भेट घेतली. गांधी शूल्टर मुलाखत. टा. ३ मार्चला मिठ कायदेभंगाचा विजय.

ता. ४ मार्चला गांधी – आयर्विन तहनाम्यावर सह्या आणि वर्किंग कमिटीची मान्यता.[५६]

अत्यंत वेगवान घडामोडीचा हा काळ खास वाचकांच्या माहितीसाठी व राजकीय जागृतीसाठी ‘समाचार’ ने आपल्या अंकात छापला. मोतीलालजी नेहरूंचे हिंदुस्थानच्या राजकारणात बरेच वर्चस्व होते. त्यांच्या दुःखद निधनानंतर संपूर्ण देशभर दुःख कळा पसरली होती. ठिकठिकाणी शोकसभांचे आयोजन करून त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात आली. सोलापुरातही दुखवट्याची सभा आयोजित करण्यात आली. त्याची वार्ता ‘समाचार’ ने दिनांक ९ फेब्रुवारी १९३१ च्या अंकात दिली आहे. “पं. मोतीलाल

नेहरू यांच्या शोचनीय निधनाबद्दल दुःख प्रदर्शित करण्याकरिता सोलापूरकरांची जाहीर सभा टिळक चौकात शनिवार ता. ७ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजतां येथिल शेठ गुलाबचंद यांचे अध्यक्षतेखाली भरली होती.

या सभेस रा. भाऊसाहेब खडकीकर, डॉ. वैशंपायन, डॉ. जगदेवराव देशमुख, रा. ब. मुळे, मेसर्स जसावला, शिवबाळप्पा देशमुख, नेरूरकर एन्जिनिया, शांताराम, कै. कुर्बानहुसेनचे बंधु, रावसाहेब निंबर्गीकर वगैरे सद्गृहस्थ उपस्थित होते. सभेस सुमारे ६–७ हजाराचा जनसमुदाय जोडला होता."[५७] अशी बातमी 'समाचार'ने दिली.

स्वातंत्र्यपूर्व काळात ठिकठिकाणी जाहीर सभा, संमेलने होत असत. जागोजागी चौक सभा आयोजित केल्या जात असत. प्रांतिक स्तरावरील नेते मंडळी सोलापुरात येऊन त्यांची भाषणे आयोजित केली जात असत. अशा सर्व भाषणाच्या बातम्या 'समाचार' ने छापून लोकांपर्यंत पोहोचवल्या. लोकमान्य टिळक, म. गांधी, स्वा. सावरकर, पं. मदन मोहन मालवीयजी, न. चिं. केळकर अशा अनेक मान्यवरांच्या जाहीर सभा सोलापुरात झाल्या. सेनापती बापट यांची सभा दिनांक २९ ऑगस्ट १९३१ रोजी रात्री ९ वा. सुरू झाली आणि ११.३0 वा. संपली. या सभेची बातमी दिनांक १ सप्टेंबर १९३१ रोजीच्या समाचार मध्ये दिली. "इंग्रजांच्या सत्तेखाली येऊन हिंदुस्थानने महापातक केले आहे असे इंग्लंडातले मजुर म्हणत असतात. कसेही होवोपण हिंदुस्थान इंग्रजांच्या हातून जावो. अशीच त्यांची इच्छा आहे. आणि आपलीही तीच इच्छा आहे. पण इच्छा असून उपयोग काय?" पुढे बापट आपल्या भाषणात म्हणाले, "सोलापुरात गुंड लोक फार आहेत असे मी ऐकतो. तो गुंडपणा फार उपयोगात येतो. पण तो भलत्या कामाला नको. त्या गुंडगिरीला वळण लागले पाहीजे. गुंडगिरीसुध्दा देशाच्या उपयोगात आणा. देश पाहिजे असेल तर दीनपणा टाकून द्या. भीक मागणे विसरा. म. गांधींना पाठींब दिला तर रा. टे. परिषदेचे गाठोडे मोठे होईल. चार आणे देऊन कॉंग्रेसचे सभासद व्हा पण मारामारी करणार नाही असा महामंत्र म्हणा."[५८]

राजकीय विषय असो वा सामाजिक 'समाचार' ने कधीही टोकाची भूमिका घेतली नाही. सरकारवर टीका करताना कधीही अश्लाघ्य भाषेचा अवलंब केला नाही. जेंव्हा सरकार चुकलेले असेल तेंव्हा बोचरी टीका केली पण काही वेळा सरकारला समजुतीने सल्लाही दिला. सोलापूरच्या राजकीय कैद्यांची शिक्षा कमी करावी अशी जेंव्हा मागणी जोर धरू लागली तेंव्हा 'समाचार'नेही या विषयावर अग्रलेख लिहिला. पण त्यात प्राप्त परिस्थितीचे पूर्ण आकलन करून असे लिहिले, "१९३० सालच्या विशिष्ट परिस्थितीत लोकांना दहशत बसण्यासाठी जबर शिक्षा देणे एकवेळ न्याय्य ठरले तरी ती परिस्थिती बदलल्यानंतर व शांतता प्रस्थापित झाल्यानंतर सरकारनेही सदर शिक्षेचा दयाळू बुध्दीने फेरविचार करणे जरूरीचे आहे. असे आम्हास वाटते. या पध्दतीने जगातील सर्व सुधारलेल्या राष्ट्रात धामधुमीच्या काळात दिलेल्या शिक्षेचा फेरविचार होतो. दहा दहा वीस वीस वर्षाच्या शिक्षा दिलेल्या असताना जर्मनी, इटली, रशिया वगैरे देशातील राज्यकर्त्यांनी नेहमीची शांततेची स्थिती उत्पन्न झाल्याबरोबर वर्ष-सव्वा वर्षात स्वातंत्र्य दिले आहे. हिंदुस्थानातही मोपला बंडातील कैद्यांना सरकारने सोडले, ब्रहमदेशच्या बंडात ब्रिटीश राज्य उलथून पाडण्यासाठी केलेल्या कटाच्या आरोपावरून पांच वर्षाच्या शिक्षा झालेल्या कैद्यांना सरकारने दया दाखवून एक वर्षाची शिक्षा भोगल्याबरोबर नुकतेच गेल्या सप्टेंबरमध्ये सोडून दिल्याचे उदाहरण आमच्या समोर आहे. वरील गुन्ह्यापेक्षा सोलापूरच्या आरोपींचा गुन्हा निःसंशय अधिक भयंकर स्वरूपाचा नाही व ते दयेस पात्र नाहीत असे कोणालाही म्हणता येणार नाही."[५९] सोलापूरच्या कैद्यांना बंधमुक्त करणं किती न्याय्य आहे ते अशा उदाहरणांसह 'समाचार' ने जनतेला व सरकारला पटवून दिले आहे.

सोलापुरात कापड गिरण्याचा प्रारंभ हा जवळपास १८८१ नंतर झाला. त्यामुळे गिरणी कामगार हा एक मोठा घटक सोलापूरच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पटलावर प्रभाव टाकून होता. गिरणीमध्ये थोडै जरी काही घडले वा बिघडले तरी त्याचे

परिणाम सोलापूरच्या नागरी जीवनावर पडलेले असायचे. इ.स.१९३१ च्या दरम्यान तसेच इ.स.१९३४ च्या दरम्यान गिरणी कामगारांच्या संपाने सोलापूरचे जनजीवन विस्कळीत झालेले होते. त्याच परिणाम राजकारणावर व आर्थिक आघाडीवर होत होता. या संपाच्या बाबतीतील सर्व घडामोडी व्यवस्थापन व मजूर संघ अशा दोन्ही बाजूने व्यवस्थित मांडणी करून छापल्या जात असत. 'गिरणी मॅनेजरचे मजूर पुढाऱ्यांना उत्तर' या शिर्षकाखाली बातमी दिली आहे, "ता. २ रोजी दुपारी जुन्या गिरणीचे मॅनेजर व गिरणी कामगारांचे पुढारी यांच्यामध्ये २॥ तास वाटाघाट होऊन किरकोळ चार पाच मागण्यांचा विचार झाला. येथपर्यंतची हकीकत कालच्या समाचारात दिली आहे. ता. ३ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून वाटाघाटीस सुरूवात झाली आहे. ज्या कामगार संघाच्या सेक्रेटरींनी कामगारांच्या मागण्या नोटीसीने मॅनेजरकडे पाठविल्या. त्याकडे दुर्लक्ष करून तुमच्या स्वतःच्या मागण्या काय आहेत ते आम्हाला सांगा असे गिरणी मॅनेजरनी म्हटल्यावर, नोटीसीने पाठविलेल्या त्याच आमच्या मागण्या आहेत. दुसऱ्या तिसऱ्या कोणत्याही नाहीत असे मजूर पुढाऱ्यांनी सांगितले...... तरी सर्व गिरण्यांच्या मजुरांनी एक होऊन संपाचे सभासद झाले पाहिजे. सर्व गिरण्यांचे मालक आता एके ठिकाणी असणार आहेत. त्यांत मजुरांचा फायदा तरी होईल नाहीत तर तोटा तरी होईल..."[६०] अशा पध्दतीची भाषणं मजूर पुढाऱ्यांनी केली. ही भाषणं 'समाचार'ने जशास तशी छापून ती संपूर्ण कामगार वर्गापर्यंत पोहोचवली.

त्यानंतरच्या काळात संपाची स्थिती अधिकच बिघडत गेली. 'संपाचा चेंडू जोराने उडणार' या शिर्षकाखाली एक बातमी समाचारने दिली. त्यात 'कर्मयोगी' पत्रावर मजुरांच्या सभेमध्ये टीका केल्याचाही उल्लेख केला आहे. "ता. ३० रोजी सायंकाळी ६.३० वाजता मजुर मैदानावर प्रचंड सभा झाली. या सभेत कॉक्त बेके हे आले होते. परंतु त्यांच्यावर १४४ कलमाखाली दोन महिने भाषण बंदीची नोटीस बजावण्यात आली होती व ही बंदी झुगारून देण्याचा त्यांचा विचार दिसला नाही. सभेत बऱ्याच वक्त्यांची

भाषणे झाली त्यातील निम्म्याहून अधिक मजुरांपैकीच होते. एका मजुर वक्त्याने स्पष्ट इशारा दिला होता की, कॉ बेके यांना भाषण बंदी झाली असली तरी त्यांच्या मागे आम्ही शंभर बेके निर्माण करू शकतो व भाषणे करू शकतो हे सरकारने लक्षात ठेवावे.

खॉ. खाजाभाई, कऱ्हाडकर व इतर काही मजुरांच्या भाषणानंतर डॉ. अंत्रोळीकर यांचे भाषण झाले. त्यावेळी झिमझिम पाऊस पडत होता तरी सर्व लोक अंग भिजत बसलेले दिसत होते..."[६१] पुढे सर्व वक्त्यांच्या भाषणाचा तपशिल या बातमीमध्ये दिला आहे.

सोलापुरातील गिरणी कामगारांचा हा संप खूप चिघळला. तेंव्हा दिनांक ११ ऑगस्ट १९३१ च्या 'समाचार' मध्ये "सोलापूरच्या मजुर संपाची चढती कमान!" या शिर्ष काखाली तपशिलात बातमी दिली. "ता. ४/८/३१ रोजी सोलापूरच्या सर्व गिरण्यांना सुट्टी असल्याकारणाने त्या दिवशी संप फोफावण्याचे उपाय करण्याचे ठरले होते. सकाळपासून रात्रीपर्यंत एका पाठीमागे एक अशा १३ सभा सोलापूरच्या सर्व भागात भरविण्यात आल्या. दुपारी १ वाजता देगांवलाही एक सभा झाली. देगांव सोलापूरच्या दोन मैलाच्या बाहेर असल्याने तेथे कॉ. बेके यांच्या भाषण बंदीची अडचण वाटणार नाही व ते बोलतील अशी कल्पना होती परंतु कॉ. बेके यांनी भाषण केले नाही..."[६२] अशा तपशिलात ही सर्व बातमी देण्यात आली आहे.

सोलापुरात बिडी आणि कापड उद्योग हाच मुख्य व्यवसाय असल्याने कामगारांची संख्या जास्त होती. त्यामुळे सोलापुरातील समाजकारण आणि राजकारण तसेच अर्थ कारण हे या कामगारांभोवतीच फिरत राहिले. परिणाम स्वरूप कम्युनिस्ट पक्ष इथे मोठ्या प्रमाणावर आपला प्रभाव टिकवून होता. सोलापुरातील श्रमिकांची चळवळ सशक्त करण्यामध्ये अनेक कम्युनिस्ट पुढाऱ्यांचा वाटा होता. कम्युनिस्ट पक्षाने स्वातंत्र्यपूर्व काळातही सोलापुरच्या समाजमनावर चांगलाच प्रभाव पाडलेला होता. बिडी आणि कापड गिरण्यांमधील कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी सतत झटत राहून त्यांचे संघटन

करण्यामध्ये कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला. यात कॉ. रघुनाथ व कॉ. मिनाक्षी कऱ्हाडकर (साने), कॉ. रा. के. बेके, कॉ. खाजाभाई, कॉ. जी डी साने, भाई छन्नुसिंह चंदेले अशा अनेक नेत्यांचा मोठा वाटा आहे. "गिरणी कामगार, पद्मशाली श्रमिक आणि हे कुंपणाआडचे श्रमिक या तिघांना एकत्र आणून डावी चळवळ सोलापुरात पुढे नेणे ही गोष्ट सोपी नव्हती. परंतु अत्यंत जिद्दी अशा ध्येयनिष्ठ कम्युनिस्ट नेतृत्वाने ती साध्य करून दाखविली. कारण प्रत्येक समाजातील सामाजिक न्यायाची उर्मी असलेल्या तरूणांना त्यांनी जवळ आणले आणि त्या त्या समाजातीलच तरूण नेतृत्व तयार केले."[६३]

सोलापुरातील कामगारांची चळवळ असो वा बिडी उद्योगातील समस्या, राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ठिकठिकाणी होणाऱ्या सभा असोत वा आंदोलने, मार्शल लॉ सारख्या महत्वाच्या घटना असोत वा सामान्य कार्यकर्त्यांनी केलेले झेंडा वंदनासारखे छोटे आंदोलन असो अशा स्वातंत्र्य चळवळीला पुष्टी देणाऱ्या सगळ्या घटनांना 'समाचार' ने आपल्या पानांवर महत्वाचे स्थान दिले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकजागृती घडून आली. दिनांक १२ ऑक्टोबर १९४२ च्या समाचारमध्ये 'झेंडावंदन केल्याचे आरोपावरून प्रत्येकी दीड वर्ष स.म. १00 रू. दंड' या शिर्षकाखाली बातमी दिली आहे. बातमीच्या प्रारंभी 'आमच्या वार्ताहराकडून' असा उल्लेख केला आहे. "गेल्या महिन्यात २७/९/४२ रोजी टिळक चौकात झेंडावदन केल्याच्या आरोपावरून श्री. राम विभुते व श्री भिमराव गुरव यांना अटक करून त्यांचेवर डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखाली खटला भरला होता. सदर खटल्याचा निकाल येथिल रेसिडेंट मॅजिस्ट्रीट यांचे कोर्टात आज रोजी लागून प्रत्येकी दीड वर्ष स.म. १00 रूपये दंड व दंड न दिल्यास २ महिने स.म. अशा शिक्षा देण्यात आल्या."[६४]

स्वातंत्र् जसे जसे जवळ दिसू लागले तसा सर्वत्र एक उत्साह संचारलेला होता. पाकिस्तान निर्मितीच्या गोंधळाचा काळ होता. ठिकठिकाणी शांतता प्रस्थापित करणे हे

एक आव्हान होते. दिनांक १४ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यदिनाच्या आदल्या दिवशी समाचारने या उत्सुकतेचे, तणावाचे आणि शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचा बातमीच्या स्वरूपात वेध घेतला आहे. "स्वातंत्र्य दिनाकडे शांततेने झुकू लागलेले सोलापूर" अशा शिर्षकाखाली ही बातमी दिली. शहरांत पोलीस व फौजेची परेद तसेच शांतिसेवकांच्या प्रचार फेऱ्या झाल्याचाही उल्लेख केला आहे. बातमीत पुढे म्हटले आहे, "आजच्या दिवशीही शहरात संपूर्ण शांतता नांदली. जनतेतील विश्वास वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. आज रोजी सकाळी पोलीस व फौजेची संयुक्त परेद शहरातून हिंडली. ज्या ज्या मोहल्ल्यात रात्रीच्या वेळी घबराट अगर दगडफेक दिसून आली त्या त्या मोहल्ल्यात हिंदू मुसलमान पुढारी संयुक्तरित्या हिंडल्यामुळे व त्यांनी शांतता राखून घबराट कमी करण्यावद्दल विनंती केल्यामुळे बराच चांगला परिणाम दिसून आला."[६५] याच अंकात –

> पंढरपुरातील 'सुतकी' हिंदुत्वनिष्ठ स्वातंत्र्यदिनात भाग घेणार नाहीत!
>
> कडाक्याची चर्चा होऊन वकिलांनी स्वातंत्र्यदिनात भाग घेण्याचे ठरविले!
>
> सोलापूरचे श्री कुलकर्णी बंधू यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त तयार केलेले पंडित जवाहरलाल नेहरू यांचे अडीच बाय साडेतीन साईजचे पेंटींग डॉ. अंत्रोळीकर यांच्या माडीवर ठेवले आहे.
>
> स्वातंत्र्य दिन कसा साजरा करावा? – श्री शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन स्वातंत्र्दिन साजरा कसा साजरा करावयाचा याची चर्चा झाली.
>
> सोलापूर तालुका उत्तर मामलेदार कचेरीवर ता. १५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त सकाळी ७ वाजता राष्ट्रध्वज फडकविण्यात येणार आहे.
>
> मेडिकल स्टाफ असोसिएशनचा स्वातंत्र्य दिन.[६६]

अशा अनेक बातम्या दिलेल्या आहेत. या सर्व बातम्यांची शिर्षके पाहिले तरी त्या काळातील वातावरणाचा अंदाज येऊ शकतो. सोलापूरच्या विविध क्षेत्रातील स्वातंत्र्यदिनाच्या आदल्या दिवशी काय वातावरण होते याचा अंदाज येऊ शकतो. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे आकलन होण्यासाठी या बातम्या पुरेशा ठरू शकतील.

'सोलापूर समाचार' ने दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा महोत्सव आपल्या पध्दतीने साजरा केला. शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी "स्वातंत्र्य महोत्सवाचा विशेषांक" प्रकाशित करण्यात आला. बाबुराव नरसप्पा जक्कल हे त्यावेळी समाचारचे संपादक होते. त्यांनी स्वातंत्र्य महोत्सवाचा विशेषांक काढला होता. त्यात सोलापूरचे सुप्रसिध्द कवि कुंजविहारी, नीलामन अशा अनेकांच्या कविता छापल्या होत्या. कवि कुंजविहारींची कविता ही तरी स्वतंत्र भारताच्या नव्या युग निर्मा त्यांना खूप मोलाचा संदेश देणारी होती.

**नव्या जगाच्या निर्मात्यांनो!**

स्वातंत्र्योत्सुक प्रगतीप्रेमी शांतीनिष्ठ अतीध्येयमती
नव्या जगाच्या निर्मात्यांनो अनंत नमने तुम्हाप्रती || धृ ||
आर्यभूमीच्या भाग्यरवीची सुवर्ण किरणे तुम्ही जणू
जगत् क्रांतीच्या महद् यशाची चाहूल अथवा तुम्हा जणू
इतिहासाची आशिर्वचने आकांक्षेची सुखस्वप्ने
आणि आजच्या प्रसन्नतेची तुम्ही मनोहर उद्याने
तुम्ही उद्याचे भारतभूषण रामकृष्ण शिवछत्रपती
नव्या युगाच्या निर्मात्यांनो अनंत नमने तुम्हाप्रती | १ || [६७]

या शिवाय लक्ष्मी विष्णू गिरणीतील एका कामगाराचीही कविता प्रकाशित केली आहे. 'कामगाराची काव्यस्फूर्ती' या शिर्षकाखाली प्रारंभी कामगाराने संपादकांना केलेली विनंती जशीच्या तशी प्रकाशित केली आहे. कामगार म्हणतो, स्वातंत्र्याच्या आनंद लहरी

रोमांरोमातून वाहू लागल्यामुळे गिरणीत साचावर काम करताना खालील काव्यपंक्ती ऱ्हदयातून बाहेर पडलेल्या आपण आपल्या समाचार पत्रातून १५ ऑगस्ट करीता प्रकाशित कराल अशी आशा आहे –

धन्य अजि दिन झाला आनंद राष्ट्राला |
पारतंत्र्याचा अनंत काळ हा अस्ताशी गेला ||
स्वातंत्र्याच्या सुवर्ण मनी उदयास आला |
पंधरा ऑगस्ट सत्तेचाळीस हा अमरदिन झाला || [६८]

समाचारच्या पहिल्या पानावर दोन बाजूला तिरंगा ध्वजाचे त्यावर चरखा असलेले चित्र छापलेले आहे. याच "स्वातंत्र्योत्सवाचा विशेषांक" मध्ये "स्वातंत्र्य आणि त्यापुढील कार्य" या शिर्षकाचा लेख छापलेला आहे. या लेखात लेखक म्हणतात, "येणाऱ्या कालातील लढा हा परकीय सत्तेविरूध्द जी लढाई आपण खेळलो तिच्यापेक्षा अनंत पटीने महत्वाचा आहे. अवघड कार्य आपल्या सर्व सामर्थ्यानिशी आपण सिध्द करणार नसलो तर मिळालेले स्वातंत्र जनहिताच्या दृष्टीने वांझोटे ठरेल." याच लेखात पुढे म्हटले आहे, "स्वातंत्र्य मिळताच या मिरासदारांची राष्ट्रीय चळवळीतील पकड घट्ट करण्यासाठी धडपड सुरू होते. आपल्या इतिहासात ती वेळ आज आली आहे. या मिरासदारांची सामान्य जनतेवरील मगरमिठी नाहीशी करणे हे स्वातंत्र्यातील पहिले कार्य असते. हे काम फार अवघड आहे."... "परकीय सत्तेविरूध्द लढताना जनतेला जो चेव येत असे, जी हिरीरी येत असे ती कायम राखली पाहिजे देशाच्या आर्थिक वैभवाच्या लढाईत जनतेला गुंतविता आले तर हा द्वेष, ही तिडीक, हा चेव, ही हिरीरी, विधायक कार्याला जुंपता आली पाहिजे."[६९] विशेष म्हणजे या अतिशय उद्बोधक लेखाच्या प्रारंभी लेखाचे संपादक रा. ना. उटगी असा लेखकाचा उल्लेख केला आहे.

"स्वातंत्र्याविषयी सूज्ञांचे विचार" या लेखामध्ये सर्व नेत्यांची मनोगते दिली आहेत. यात म.गांधी, पं.जवाहरलाल नेहरू, डॉ.राजेंद्रप्रसाद, मौ.आझाद, सरहद्द गांधी, ॲडॉल्फ हिटलर अशा मान्यवरांचे विचार संकलित स्वरूपात दिले आहेत.

"स्वातंत्र्याविषयी या देशामध्ये आपण पुष्कळ वर्षांपासून बोलत आहोत. प्रत्येकाची स्वातंत्र्याविषयीची कल्पना निरनिराळी आहे. व्हॉईसराय आणि मुस्लीम लीग देखील हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयी बोलतातच. कॉंग्रेसची स्वातंत्र्याविषयीची कल्पना अशी आहे की, हिंदुस्थानमध्ये परकीय सत्ता अजिबात असता कामा नये. आम्हाला हिंदुस्थानचे प्रजासत्ताक राज्य निर्माण करायचे आहे." **– पं. जवाहरलाल नेहरू.**

"इतिहासाचा क्रम पाहिला तर आजपर्यंत स्वातंत्र्य हे कुणालाही फुकटात मिळाले नाही आणि ज्यांना जे तसे मिळाले त्यांना ते क्षणभरही टिकवून ठेवता आले नाही. स्वातंत्र्यासाठी जबरदस्त मोल द्यावे लागते आणि ते टिकवून धरण्यासाठी प्राणपणाने झगडावे लागते." **– अडॉल्फ हिटलर.** [७०]

"राज्ययंत्र स्थिर करून, सर्व साधने एकवटून हिंद राज्य बलशाली होणे, हे आपले पहिले व प्रधान कार्य आहे. इतर सर्व कार्ये त्यापुढे दुय्यम आहेत." **– सरदार वल्लभभाई पटेल.** [७१]

'हिंदी स्वातंत्र्य संग्रामाचा महान इतिहास' (१८५७ ते १९४७) या शिर्षकाचा एक लेख या स्वातंत्र्योत्सवाच्या विशेषांकात छापला आहे. "१५ ऑगस्टला जेंव्हा हिंदी स्वातंत्र्याचे पहिले राष्ट्रीय निशाण रोवले जाईल, त्याचबरोबर ब्रिटीश साम्राज्यशाहीची काळीकुट्ट कारकीर्द समाप्त होईल. ब्रिटीश साम्राज्यशाहीचा इतिहास म्हणजे पिळवणूक, दडपशाही आणि जुलुम यांनी भरलेला आहे."[७२]

सोलापूरच्या चार हुतात्म्यांचा आणि त्यांच्या कार्याचा सविस्तर परिचय करून देणारा एक लेखदेखिल या विशेषांकात आहे. "आजचा अतीव आनंदाचा दिवस!" या शिर्षकाने समाचारचा अग्रलेख संपादक बाबुराव जक्कल यांनी लिहिला आहे. या

अग्रलेखात, "अशोकानंतर आज हजारो वर्षानंतर भारताला भाग्याचा व अतीव आनंदाचा दिवस प्राप्त झाला आहे. आजच्या स्वातंत्र्य महोत्सवात जे अबालवृध्द सहभागी होतील ते धन्य होत. आजचा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवला जाणार असल्याने ज्या पिढीला हे भाग्य पाहण्याचे लाभले, ती ही स्वतःला धन्य समजतील. या मंगल आणि आनंददायक प्रसंगी हा दिवस ज्या ज्ञात-अज्ञात नरवीरांनी, राजकारणी धुरंधरांनी, धैर्यधर पत्रकारांनी आपल्या अलोट कर्तृत्वाने, त्यागाने आणि बलिदानाने प्राप्त करून दिला त्यांचे पुण्यस्मरण करून त्यांना प्रणाम करणे हे आमचे पहिले कर्तव्य आहे. सोलापूर संबंधीचे बोलावयाचे म्हटले तर असे म्हणता येईल की, भारताच्या इतिहासात सोलापूरने एक विशिष्ट स्थान प्राप्त करून घेतले आहे. सोलापूरच्या जनतेला आजच्या दिवशी अभिमानाने सांगता येईल, असाच उज्ज्वल इतिहास सोलापूरच्या नररत्नांनी केलेल्या त्यागाने आणि बलिदानाने खच्चून भरलेला आहे. अशा त्यागी वीरांना आणि हुतात्म्यांना या प्रसंगी वंदन करणे हाही आमचा राष्ट्रधर्म आहे!"[७३]

'सोलापूर समाचार' ने प्रकाशित केलेला हा 'स्वातंत्र्योत्सवाचा विशेषांक' खरोखर बहारदार आणि माहितीपूर्ण आहे. जवळपास शतकभर चाललेल्या स्वातंत्र्य लढ्याची गाथा म्हणजेच हा विशेषांक आहे. इ.स.१८५७ ते इ.स.१९४७ या नव्वद वर्षाच्या लढ्याचे सिंहावलोकन या विशेषांकातून होते. भारताच्या स्वातंत्र्याचे जागतिक इतिहासाच्या दृष्टीने महत्वही यात सांगितले गेले आहे. देशाच्या फाळणीचे विवेचन आहे. स्वातंत्र्याचे गुणगान करणाऱ्या कविता आणि स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देणाऱ्या अनेक व्यापारी जाहिराती अशा सर्वांगानी समृध्द असा विशेषांक 'सोलापूर समाचार' ने काढला. या विशेषांकाचे पहिले पान हे रंगीत छापले आहे हे विशेष!

'समाचार' ने आपल्या संपूर्ण वाटचालीत कधीच राजकारण महत्वाचे मानले नाही - राष्ट्रकारणाला त्यांनी महत्व दिले. त्यामुळे टोकाला जाणारी टीका नाही आणि लाजीरवाणे समर्थनही कधी आढळले नाही. जे योग्य आहे, चांगले आहे, हिताचे आहे

त्याचे समर्थन केले आणि जे अनिष्ट आहे त्याचा संयमित शब्दात निषेध असेच जणू 'समाचार' कर्त्यांनी धोरण स्वीकारलेले होते.

**हिंदु – मुस्लिम ऐक्याचे प्रतिक ः 'गजनफर'**

**धनशेट्टी, शिंदे, सारडा, कुर्बान हुसेनी।**
**कुर्बान कर दी जान हिंदुस्तां पे अपनी॥**

सोलापुरच्या चार हुतात्म्यांच्या कार्याचा यथार्थ गौरव करणाऱ्या या दोन ओळी आहेत. या चौघांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपलं बलिदान दिलं या हुतात्म्यांच्या बलिदानाने अनेक मोठ्या कविंना स्फूर्ती मिळाली. त्यांच्या हौतात्म्याला, त्यागाला, देशकार्याला आपल्या काव्यामध्ये गुंफुन अनेक तरूणांना नवी प्रेरणा अनेक कवींनी दिली. या चार हुतात्म्यांपैकी सर्वात तरूण (वय २१ वर्ष) हुतात्मा म्हणून अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांचा गौरवाने उल्लेख केला जातो.

सोलापूर शहराला हुतात्मा नगरी म्हणून ओळखले जाते, ते केवळ या चार हुतात्म्यांमुळेच असे नाही तर या शहराला त्यागाची, बलिदानाची मोठी परंपरा आहे. दिनांक ८ मे १९३० रोजी जो सोलापुरातील रूपाभवानी मंदिरानजिक शिंदीबनात जनतेचा मोठा उठाव झाला त्या अंदाधुंदीमध्ये शंकर शिवदारे हा पहिला हुतात्मा ठरला. स्वातंत्र्य लढ्यात पुरूषांच्या बरोबरीने सोलापुरातील स्त्रीयांचेही मोठे योगदान आहे. या स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा समावेश मोठा होता. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून १९३० पर्यंत सोलापूरच्या महिलांनी स्त्री शिक्षण, स्त्री संघटन, स्त्री जागृती, सामाजिक कार्य यांच्या साह्याने सोलापुरात राजकीय जागृती निर्माण केली. इ.स.१९३० व इ.स.१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात महिला पूर्णपणे सहभागी झाल्या होत्या. पद्मश्री कै.पं.सुमतीबाई शहा, कै.अंबुबाई सिद्रामप्पा फुलारी, कै.राजयोगिनी राजमती पाटील, सौ.जुगुन बायस

अशा अनेक महिलांचा उल्लेख करता येईल.[७४] १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात कै. द्वारकाबाई देशपांडे यांनी मिरवणूकीत सहभाग घेतला. त्यामुळे त्यांना सहा महिने कारावास व रू. ५0 दंड अथवा दोन महिने कारावासाची शिक्षा झाली.[७५] पद्मश्री पं.सुमतिबाई शहा,[७६] कै.डॉ वत्सला आपटे (देशमुख), कै. विमल कोटणीस,[७७] कै.इंदिराबाई अंत्रोळीकर[७८] या स्त्रियांनी १९४२ च्या चले जाव आंदोलनात भूमिगत राहून कार्य केले. त्याखच्या कार्याची दखल 'सोलापूर समाचार', 'कल्पतरू' या वृत्तपत्रांनी घेतली.

**हुतात्म्या गंगुबाई भिमाजी किनरे** ः – हुतात्मा गंगुबाई भिमाजी किनरे यांनी इ.स. १९३२ साली स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्याबद्दल चार महिने कारावास भोगला होता. इ.स.१९४१ साली युध्दविरोधी घोषणा दिल्याबद्दल दोन महिने साधी शिक्षा झाली. इ.स.१९४२ साली चले जाव आंदोलनात सहभागी झाल्याबद्दल एक वर्ष सक्त मजुरी व १00 रू. दंड अथवा चार महिने जास्त शिक्षा झाली होती. इ.स.१९४२ साली त्यांचा जेलमध्येच मृत्यू झाला.[७९] स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या महिलांपैकी हौतात्म्य पत्करणाऱ्या गंगुबाई भिमाजी किनरे या सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या स्त्री हुतात्मा होत.[८0] हुतात्म्या गंगुबाई किनरे यांच्या जेलमधील मृत्यूची बातमी 'सोलापूर समाचार' ने प्रकाशित केली.

**अन्य महिलांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग** ः

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सोलापुरातील महिलांनी दिलेले योगदान लक्षणीय आहे. हुतात्मा गंगुबाई किनरे यांनी जशी स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष उडी घेतली त्याच प्रमाणे सोलापुरातील अन्य महिलांनी आपले योगदान दिले. त्यांना हौतात्म्य मिळाले नसेल पण त्यांचे कार्य नजरेआड करून चालणार नाही. त्यापैकी काही उल्लेखनीय नावे अशी ः–

**शांताबाई भगवानराव पतकी** ः स्वातंत्र्यसैनिकांसाठी गांधी टोप्या शिवणाऱ्या, पोलीसांना सुगावा न लागू देता खादी विकणाऱ्या, स्वातंत्र्यसैनिकांना आपल्या घरात लपवून ठेवणाऱ्या भूमिगत स्वातंत्र्यसैनिक म्हणून शांताबाई भगवानराव पतकी यांचा उल्लेख केला जातो. सन् १९१६ साली पंढरपूर येथे जन्मलेल्या शांताबाई देशभक्त तुळशीदास जाधव यांच्या वाड्यात त्या राहात. पती भगवानराव पतकी भूमिगत राहून विविध वेषांतरे करून स्वातंत्र्यसैनिकांना अन्नपदार्थ नेऊन द्यायचे. शांताबाई १९३६ च्या फैजपूरच्या कॉंग्रेस अधिवेशनास उपस्थित होत्या. त्यांच्या फैजपूर कॉंग्रेसला जाण्यासंबंधीच्या बातम्या सोलापुरातील सर्वच वृत्तपत्रांनी दिल्या. वयाच्या ९५व्या वर्षी सन् २०१० साली त्यांचे निधन झाले.

**रमाबाई नरसिंह पित्रे** ः पंडिता सुमतिबाई शहा, द्वारकाबाई देशपांडे, इंदिराबाई अंत्रोळीकर यांच्या बरोबरीने कार्य करणाऱ्या रमाबाई नरसिंह पित्रे. यांना सर्वाधिक तुरूंगवासाची शिक्षा झाली. सोलापुरातील पहिले प्रसुतिगृह काढणाऱ्या तसेच कर्तव्यदक्ष नगरसेविका म्हणून ज्यांनी कार्य केले त्या रमाबाईंचा जन्म १८९८ साली सांगली जिल्ह्यातल्या खानापूर तालुक्यात झाला. सोळाव्या वर्षी वैधव्य येऊनही त्यांनी स्वातंत्र्यासाठी आपले कार्य चालूच ठेवले. बुलेटिन्स वाटणे, ठिकठिकाणी भाषणे देणे, सत्याग्रह, मोर्चे यामध्ये त्यांचा सहभाग होता. वयाच्या ८९ व्या वर्षी सन् १९८७ साली त्यांचे निधन झाले.

**द्वारकाबाई देशपांडे** ः रमाबाई पित्रे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून १९४२ च्या चळवळीत सहभाग घेतला. आठ महिन्याचा तुरूंगवास भोगून आल्यानंतर कॉंग्रेस सेवादलाचे कार्य सुरू केले. १९८९ साली त्यांचे निधन झाले.

**पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहा** ः सोलापुरात 'मार्शल लॉ' लागू झाल्यानंतर टिळक चौकात तिरंगा फडकावण्याचं धाडस दाखविणारी तरूणी म्हणजे पंडिता

सुमतिबाई शहा. त्यांचा जन्म १९१२ साली झाला. प्राथमिक शिक्षण गुंजोटी ता. उमरगा या गावी झाले. सभा, मोर्चे, मिरवणुका या बरोबरीने स्त्रीयांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य मोलाचे आहे.

**मीनाक्षीताई साने** ः एक वादळी व्यक्तीमत्व अशीच मीनाक्षीताईंची ओळख होती. कामगार चळवळीतील आघाडीच्या कार्यकर्त्या असल्याने त्यांनी सोलापुरात मोठा कामगार लढा उभारला. कामगारांच्या प्रश्नाला वाहिलेले 'एकजूट' नावाचे साप्ताहिक त्या चालवत असत. त्यांच्या कामगार चळवळीच्या कार्याची, उपक्रमाची दखल 'सोलापूर समाचार', 'कल्पतरू' ने वेळोवेळी घेऊन त्या संबंधीच्या बातम्या आपल्या पत्रातून छापल्या.

**(वरील सर्व संदर्भ ः 'सोलापूरचे स्वातंत्रलढ्यातील दीपस्तंभ' लेखक ः डॉ श्रीकांत येळेगांवकर प्रकाशक ः अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर.)**

सोलापुरातील अशा अनेक कर्तृत्ववान महिला देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग करायला तयार झाल्या. या सर्वांना प्रेरणा मिळाली ती सोलापुरातील सर्व वृत्तपत्रांनी केलेल्या समाज प्रवोधनातूनच, हे निर्विवाद सत्य आहे. 'सोलापूर समाचार', 'कल्पतरू', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' अशा पत्रांनी स्वातंत्र्य चळवळ समाजातल्या सर्व स्तरापर्यंत पोहोचवली. वृत्तपत्राच्या माध्यमातून केलेल्या जनजागृतीमुळे स्वातंत्र्याची जाणीव या महिलांमध्ये अधिक बळकट झाली. त्या शिवाय सोलापुरातील तत्कालीन पुढारी आणि स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्ते यांच्याकडूनही प्रेरणा घेऊन या महिलांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेतला.

सोलापुरातील 'सरस्वती मंदिर', कामगार चळवळीतील महिला कार्यकर्त्यांचा सहभाग, स्वातंत्र्य चळवळीचे घराघरामध्ये असलेले वातावरण, स्थानिक वृत्तपत्राच्या माध्यमातून होणारे जनजागरण अशा अनेक कारणांनी महिला प्रभावीत झाल्या आणि

त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. पण यातील काही अंशी वाटा हा वृत्तपत्राच्या प्रबोधनाचा निश्चितच आहे.

सोलापुरातील पहिला हुतात्मा शंकर शिवदारे यांच्यापासून सुरू झालेली ही त्याग व बलिदानाची परंपरा चार हुतात्म्यांनी कायम राखली. पुढे सोलापुरातील महिलांनाही हे हौतात्म्य प्रेरणा देऊन गेले. एवढे महत्व या चार हुतात्म्यांच्या त्यागाला आणि बलिदानाला आहे. कुर्बान हुसेनने अतिशय तरूण वयात राष्ट्रीय चळवळीत उडी घेतली. ज्या समाजात शिक्षणाची फारशी गोडी नाही, अज्ञान-अंधःश्रध्दा आणि कर्मकांडाच्या चौकटीत जो समाज अडकला अशा मुस्लिम समाजात कुर्बान हुसेन यांचा जन्म झालेला. ज्या समाजातल्या पुढाऱ्यांनी 'हिंदु-मुस्लिम' द्वेषावरच आपली राजकीय स्वार्थाची पोळी भाजून घेतली अशा समाजातूतन पुढे आलेल्या कुर्बान हुसेन यांनी 'हिंदु – मुस्लिम ऐक्य' हेच आपल्या जीवनाचे महत्वाचे कार्य मानले. अवघ्या २१ वर्षाच्या (१९१०-१९३१) आयुष्यात कुर्बान हुसेन यांच्या कार्याची व विचारांची जी झेप होती ती आचंबित करणारी होती.

कुर्बान हुसेन यांचे संपूर्ण जीवन जसे झंझावाती आणि वादळी होते तसेच त्यांनी सुरू केलेले 'गजनफर' हे साप्ताहिकही वादळी ठरले. क्षणार्धात वीज चमकून अंतर्धान व्हावी तसे हे 'गजनफर' साप्ताहिक चालले आणि कुर्बान हुसेन यांच्या अटकेनंतर बंदच पडले. 'गजनफर' चे सगळे अंक आज उपलब्ध नाहीत. त्यांचे लेख अत्यंत तेजस्वी असायचे. त्यांच्या लेखातील मजकूर गव्हर्नरना कळविण्यासाठी त्यातल्या काही भागांचं भाषांतर झालेलं आहे. त्यावरून त्यांच्या स्फोटक लेखणीचा साधारणतः अंदाज येतो.[८१]

कुर्बान हुसेन यांनी आपल्या समर्थ लेखणीतून सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रश्नांचे अनेक पैलू अतिशय समर्थपणे हाताळले आहेत. स्वातंत्र्य, स्वदेशी, शिक्षण, हिंदु-मुस्लिम ऐक्य हे 'गजनफर' चे जिव्हाळ्याचे विषय होते. अत्यंत तर्कशुध्द मांडणी, भाषासौंदर्य, विचारातील स्पष्टता, आव्हानात्मक आणि आक्रमक लेखन यामुळे या

साप्ताहिकाचा प्रसार अल्पावधीत तरी वाढलाच पण राजकीय प्रबोधनाच्या वाटेवर अतिशय लख्ख प्रकाश टाकण्याचे काम त्यामुळे सुलभ झाले. याचा परिणाम म्हणून दर शुक्रवारी प्रकाशित होणाऱ्या 'गजनफर' मधील लेखांबद्दल लोकांमध्ये उत्सुकता असायची वाचकांचे मस्तक ठणकावून उठेल असे लेखन आपले डोके शांत ठेवून करण्याचे 'गजनफर' कारांचे कौशल्य अप्रतिम होते.[८२]

'गजनफर' या शब्दाचा अर्थ 'सिंह' म्हणजे केसरी असा होतो. या नावावरूनच कुर्बान हुसेन यांची वैचारिक बांधिलकी लो. टिळक प्रणित विचारधारेशी होती हे स्पष्ट होते. त्यांच्या लिखाणावर आणि वक्तृत्वावर टिळकांची छाप होती. लो.टिळकांची प्रत्यक्ष भेट अथवा सहवास लाभण्याची शक्यता नाहीच कारण टिळकांचे निधन इ.स.१९२0 साली झालेले आणि कुर्बान हुसेन यांचा जन्म इ.स.१९१0 चा. शिवाय लोकमान्य टिळक सोलापुरात आले ते इ.स.१९0७ साली. त्यावेळी कुर्बान हुसेन अगदीच लहान होते. पण कुर्बान हुसेन यांची विचारांची झेप पाहता टिळकांच्या विचाराचा पगडा लहान वयापासून त्यांच्या मनावर होता. असे म्हणण्यास वाव आहे.

कुर्बान हुसेन हे स्वतः गिरणी कामगार होते. स्थानिक कॉंग्रेसचे पुढारी डॉ.कृ.भि.अंत्रोळीकर यांचा सहवास आणि मार्गदर्शन कुर्बान हुसेन यांना वेळोवेळी लाभले होते. कुर्बान हुसेन स्वतः बुध्दीमान तरी होतेच पण ते उत्तम कार्यकर्ते होते. संघटक होते. त्यांच्या वक्तृत्वावर फिदा होणारा एक श्रोतृवर्ग होता. या सर्व प्रवासात त्यांना चांगले सामाजिक व राजकीय भान प्राप्त झालेले होते. राजकीय प्रश्नांची त्यांना उत्तम जाण आलेली होती. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे त्यांनी तळमळीने केलेले आवाहन वाचकांना आजही अस्वस्थ करून टाकते. कुर्बान हुसेन यांच्या लेखणी आणि वाणीचा सारा भर हा लोकशिक्षणावर होता. स्वतः गिरणी कामगार असल्याने कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी लढा उभारून कामगारांचे संप घडविण्यापासूनच त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरूवात केली. समाजवादी आणि ऐक्य प्रवर्तक

चळवळीला त्यांनी पाठिंबा दिला. शेतकरी व मजूर यांच्या संघटना बांधण्यात त्यांचा सहभाग महत्वाचा होता.

सोलापुरातील सर्व सच्च्या देशभक्तांसाठी 'गजनफर' हे एक व्यासपीठही होते. कुर्बान हुसेन यांनी ते सर्वांना उपलब्ध करून दिले. राष्ट्रीय राजकारण, समाजवाद, सामाजिक ऐक्य, स्वातंत्र्य, बंधुभाव अशा अनेकविध विषयांवर अनेकांचे लेख प्रसिध्द होत असत. कवि कुंजविहारी हे तरी कुर्बान हुसेन यांचे दैवतच होते. कवि कुंजविहारींच्या कविता देशभरातील क्रांतीकारकांना प्रेरणा देतच होत्या. कुर्बान हुसेन यांच्यासारख्या लढवय्या आणि संवेदनशील कार्यकर्त्यावर कुंजविहारींच्या कवितांची मोहीनी पडली नसेल तरच नवल होते. कुंजविहारींनी अनेक हिंदी कविता लिहिल्या –

भारत के संतान मरने लगे,<br>
इन्साफ के मुर्दे गिरने लगे ।<br>
मोहब्बत बनी दुश्मनीसे बुरी<br>
नेकीके गर्दनपर फिरती छुरी ॥ [८३]

अशा कवितांनी 'गजनफर' ची पाने सजलेली – नव्हे पेटलेली असायची.

हिंदु–मुसलमान ऐक्याचा प्रश्न त्याकाळात ज्वलंत व निकडीचा होता. देशात कुठेही कुरबुरी झाल्या की त्याचे पडसाद सोलापुरात उमटायचेच. लोकमान्य टिळकांनी 'लखनौ करारा' च्या माध्यमातून हिंदू – मुसलमान ऐक्य साधण्यात एक पाऊल पुढे टाकलेलेच होते. म. गांधींची पध्दत याहून निराळी होती. पण दोघांचे उद्दिष्ट मात्र एकच होते ते म्हणजे हिंदु मुस्लिम ऐक्याचे! पुण्यातील एका किरकोळ कारणावरून घडलेल्या दंगलीबाबत (इ.स.१९२८) 'गजनफर' कारांनी आपल्या अग्रलेखात लिहिले, "दंगलखोर अफवा पसरवून मोकळे होतात आणि नाहक बळी जातो तो निरपराध गरिबांचा... दंग्याच्या वणव्यात दोन्ही जातीचे दंगेखोर रस्त्याने येणाऱ्या–जाणाऱ्या निरपराधी व्यक्तींवरच आपले शौर्य गाजवीत असतात..."[८४] अशा अग्रलेखातून कुर्बान

हुसेन यांनी एका अर्थी दंगलीचे मानसशास्त्रच उकल करून सांगितले आहे. आज पाऊणशे वर्षानंतरच्या दंगलींकडे पाहिले तरी हेच सत्य आपल्या नजरेस पडते. खुर्बान हुसेन यांनी केवळ हिंदु – मुस्लिम ऐक्याचा पोकळ आग्रह धरला असे नाही तर त्यासाठी मुसलमान समाज जागरूक झाला पाहिजे, या समाजाला विकासाची गोडी लागली पाहिजे याची वास्तव जाणीव त्यांना होती. अशावेळी आपल्या समाजाला कधी प्रेमाने, आपलेपणाने तर कधी रागाने कानपिचक्या देण्याचे धाडस दाखविले. 'गुप्तशत्रूंचा सुळसुळाट' या अग्रलेखात ते म्हणतात, "आमच्या समाजातील झब्बुशाही पुढारी वर्ग म्हणजे शुध्द फद्या किंमतीचा ढब्बु आहे. नुसत्या शाब्दिक चलाखीवर लोकांना झुलवून पुढारीपण कायम टिकविण्याचीच त्यांच्या रक्ताला सवय असल्यामुळे निष्क्रियतेचा तो मुर्तीमंत पुतळा बनला आहे. लोकांची गाऱ्हाणी असली तरी किंवा त्यांच्यावर अत्याचार होत असले तरी नुसत्या शाब्दिक लटपटी पलिकडे कार्य करण्याची त्यांच्यात धमक नसल्याने आपला पुढारीपणा कायम ठेवण्यासाठी तो नाही नाही ते वाममार्ग योजित असतो. कार्य करण्याचा वकुब नाही, कष्ट करण्याची हिंमत नाही आणि कर्तृत्वशाली समाजसेवेची तोंड ओळखही नाही, पण पुढारीपणाची हौस, मोठेपणाचा हव्यास आणि श्रेष्ठपणाची फाजील महत्वाकांक्षा त्यांच्या रक्तात भिनलेली असल्यामुळे आजवर त्याने किती कर्त्या नवजवानांना कारस्थानाच्या खड्डयात गारद केले आहे याचा समग्र इतिहास लिहिल्यास तो एक प्रचंड ग्रंथच होईल! एखादा तरूण आपल्या तडफदार कर्तृत्वाने पुढे सरतो आहे, मुसलमान जनता त्याच्याकडे वळते आहे असे दिसून येताच या झब्बुशाही पुढारी वर्गाने चमकत्या नवतरूणाला त्याच्याच माणसाकडून त्याचाच त्याच्याच मालकीच्या घराबाहेर काढवून त्या तरूणाला शहर त्याग करावयाला भाग पाडून देशोधडीला लावले आहे."[८५]
यात शेवटी उल्लेख केलेली घटना सोलापुरातच एखाद्या मुस्लिम तरूणाच्या बाबतीत घडली असावी. घटनेचा तपशिल यात नाही. पण या घटनेच्या निमित्ताने कुर्बान हुसेन यांनी मुस्लिम समाजातील स्वार्थी पुढाऱ्यांच्या मानसिकतेवर जो हल्ला केला आहे तो

देखिल झणझणीत आहे. अत्यंत परखड शब्दांत त्यांनी मुसलमान समाजातल्या नेत्यांवर प्रहार केला आहेत.

'गजनफर' ला कोणतेही आर्थिक पाठबळ नव्हते की, कुणाचा वरदहस्त नव्हता. शिवाय कुर्बान हुसेन यांची स्वतःची घरची परिस्थिती बेताचीच होती. आर्थिक हलाखीमुळे 'गजनफर' चे प्रकाशन काही काळ बंद ठेवावे लागले. नंतर जेंव्हा ते सुरू झाले तेंव्हा पहिल्या "आत्मकथना" त ते लिहितात, "सर्वशक्तीमान 'ईलाही' च्या कृपाप्रसादाने आजला 'गजनफर' पुनरपी समाजसेवेच्या पवित्र आखाड्यात उतरतो आहे. समाजसेवा आणि लोकशिक्षणाच्या पवित्र हेतूने जन्मास आलेल्या 'गजनफर' ला दुर्दैवाने काही काळ आपला उदात्त हेतू बंद ठेवावा लागला. 'गजनफर' वर ही दुर्दैवी आपत्ती कोसळावयास अनेक कारणे झाली आहेत. त्या सर्वांचे वर्णन केल्यास तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल." अशी आत्मकथनाची सुरूवात करून, "...तो धार्मिक, सामाजिक आणि राजकीय तसेच औद्योगिक प्रश्नांची सडेतोड चर्चा करताना कोणाच्याही धाकधपटशाला किंवा आमिषाला भीक घालणार नाही हे पुन्हा जाहीर करावयास 'गजनफर' ला अभिमान वाटतो. धार्मिक बाबतीत तो पूर्ण सहिष्णू असला तरी पर धर्मियांनी त्याच्या धर्मावर उडवलेले शिंतोडे तो नामर्दाप्रमाणे सहन करणार नाही."[८६]

राष्ट्रीय राजकारणाबरोबर स्थानिक समस्यांवर आणि राजकारणावरही 'गजनफर' ने आपले लक्ष केंद्रीत केले होते. स्थानिक राजकारणातील सर्व विचारप्रवाह, त्यातील गटबाजी आणि त्याचा शहराच्या विकासावर होणारा परिणाम, राजकीय सभा, घटना, समोर घडणारे आणि पडद्यामागे घडणारे राजकारण अशा सर्व बाजूने 'गजनफर' ने लिखाण केले. त्यात कुणाचाही मुलाहिजा न बाळगता केवळ सत्य आणि सत्यच वाचकांपुढे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न 'गजनफर' कारांनी केला. सोलापुरातील नगरपालिका प्रशासन, त्यातील लालफितीचा कारभार, लोकप्रतिनिधी, नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष पदासाठी चाललेली कुरघोडी, त्यातील सबकमिट्यांवरही होणारी रणधुमाळी

याचे यथासांग चित्रण आणि त्यावरील अभिप्राय संपादकांनी दिले आहेत. कुर्बान हुसेन यांचा स्थानिक राजकारणाचा दांडगा अभ्यास होता. स्थानिक नेत्यांविषयीची, त्यांच्या धोरणविषयीची व कर्तृत्वाविषयीची अतिशय सडेतोड मतं स्पष्ट व परखड शब्दात मांडायला त्यांनी संकोच केला नाही.

म्युनिसिपालटीतील सबकमिट्या आणि त्यातील प्रतिनिधी यांचे कामदेखिल किती महत्वाचे व प्राधान्याचे आहे याचा वस्तुपाठच त्यांनी एका अग्रलेखात दिला आहे. "आजला आम्ही सबकमिट्यांचा विषय हाती घेणार आहोत. सोलापूर म्यूनिसिपालटीत ६/७ सबकमिट्या आहेत. इतक्या कमिट्यांतर्फे शहराच्या स्थानिक स्वराज्याचा कारभार चालतो. या सबकमिट्यांवरच आमच्या या छोटेखानी स्वराज्याच्या (म्युनिसिपालटीच्या) कारभाराचा बरेवाईटपणा अवलंबून आहे. तेंव्हा या सबकमिट्या तयार होताना लोकहितचिंतक आणि समाज कल्याणेच्छु सभासदांनी विशेष जागरूक राहणे. लोकसेवेची खरी कळकळ बाळगणारे एकजात समाजसेवक या कमिट्यातून निवडून येतील तर शहराची सर्वांगिण सुधारणा थोड्याच काळात होईल पण आमच्या या छोटेखानी नव्या पार्लमेंटच्या मनोवृत्तीचे संपूर्ण पृथःकरण करणे स्थलसंकोचामुळे आजला अशक्य आहे. शहर सुधारणेच्या आणि लोककल्याणाच्या बाबी करण्यात सात्विक स्पर्धा करण्याऐवजी आजच्या म्युनिसिपल पक्षांमध्ये व्यक्तीमहात्म्याचे प्रस्थ माजलेले आहे. व्यक्तीची आब राखण्यासाठी आंधळेपणाने त्याच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्या पक्षाच्या आणि आपल्या पक्षाशिवाय इतर पक्षातून-पार्टीतून एखादी लोककल्याणाची बाब जरी पुढे आली तरी ती मत्सराच्या जळफळाटातून हाणून पाडणाऱ्या मनोवृत्तीच्या पार्टीच्या भलेपणावर मुसलमान समाजाला विश्वासून राहता येत नाही. आजवरचा अनुभव मुसलमान समाजाला आणि त्याच्या प्रतिनिधींना (मेंबरना) अंजनाप्रमाणे उपयोगी पडेलच!" अग्रलेखात पुढे म्हटले आहे -

"या दोन्ही समाजाकडून धन्यता मिळविण्याची ही सुवर्णसंधी मुसलमान सभासदांनी दवडूं नये. या दोन्ही कमिटीच्या योगाने सर्व समाजाचे कल्याण कसे साधता येईल ही सविस्तर चर्चा जागेच्या अभावी पुढील एखाद्या खेपेसाठी लोटणे आम्हाला भाग पडले आहे. याबद्दल सूज्ञ वाचकांची आम्ही माफी चाहतो!"[८७]

स्थानिक राजकारणावर लिहितांना 'गजनफर' कारांची लेखणी कशी सरसरून उठते याची प्रचिती काही अग्रलेख वाचताना आपल्याला जरूर येते. 'कर्मयोगी' कार रामभाऊ राजवाडे यांनी आपल्या साप्ताहिकबरोबरच सोलापूर जिल्ह्यात मोठी लोकजागृती घडवून आणली. त्यासंबंधीच्या एक अग्रलेख "...... ला कुंकवाची उठाठेव" याच शिर्षकाने लिहिला. यातील त्याची शब्दकळा प्रसंगानुसार कशी धारदार आणि बोचरी होते याचे प्रत्यंतर येते. "वरील म्हणीची यथार्थता पाहावयाची झाल्यास 'कल्पतरू' चे मार्च ता. ३, १० व १७ चे तीन अंक चाळायला पाहिजेत! तिन्ही अंकातील विस्तृत विषयांचे आटोपशीर विवेचन या एकाच लेखात करण्याचे आम्ही योजले आहे!

"ता.३ मार्चच्या अंकातील "रा.ब.मुळे व 'कर्मयोगी' पक्ष" या लेखाचे जनकत्वच डॉ. मुळे यांच्या कंपुतील अथवा परिवारातील एखाद्या पर बुध्दीवाल्या लाळघोट्याचे असले पाहिजे, यांत बिलकुल शंका नको. 'कर्मयोगी' च्या जन्मा अगोदरच्या परिस्थितीचे भडक चित्र रंगवून तिचे खापर 'कर्मयोगी' वर फोडून हे शिष्ट विचारतात की, 'कर्मयोगी' पक्षातील कोणते देशभक्त आपले शहरातील आसन सोडून जिल्ह्यातून किती ठिकाणी प्रवासास गेले होते?' आम्हाला इतके खात्रीपूर्वक माहित आहे की रा.राजवाडे हे आपल्या सहकाऱ्यांसह सन् १९२१-२२ साली जिल्ह्यातून काही खेडी फिरून आले आहेत. त्यावेळी अल्पशी का होईना राजवाड्यांनी खेड्यापाड्यातून लोकजागृती घडवून आणली आहे. पण 'कर्मयोगी' पक्षातील व्यक्तींचा हिणकसपणा ठरविण्याचा मूर्ख प्रयत्न करणाऱ्या कुटीलबुध्दी लेखकाने निदान आपल्या कुटुंबात तरी

जागृती घडवून आणली आहे का? कर्मयागी पक्षाच्या कामगिरीच्या कुंकवासंबंधी नसती पोक्त उठाठेव करणाऱ्या या फटफटीत कपाळाच्या आजीबाईने एखाद्या आरशात आपले स्वतःचे अबद्र कपाळ तरी एकवार पाहावे!"[८८] अशा सडेतोड शब्दामध्ये 'कल्पतरू' मधील लेखाचा समाचार 'गजनफर' कारांनी घेतला.

'शेर ताशेरे' हे एक वैशिष्ट्यपूर्ण सदर 'गजनफर' मध्ये प्रकाशित केले जात असे. राजकारणातील अनेक घटनांवर, प्रसंगांवर, व्यक्तींवर तसेच म्यूनिसीपालटीचा कारभार, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात घडणाऱ्या घटनांवर अतिशय मार्मिक शब्दामध्ये टीकाटिपण्णी केली जात असे. अतिशय खुसखुशित व बोचरी शब्दकळा या आधारे भल्याभल्यांची फिरकी या सदरामध्ये घेतली जात असे. "म्यूनिसिपल इलेक्शनचा निकाल जाहीर झाल्यानंतर 'पराजित' झाल्याची बातमी ऐकताच जुन्या कमिटीच्या एका कौन्सिलरच्या मेंदूवर वज्राघात झाला. कारण हा वज्राघात होताच त्यांना बुध्दीभ्रंश झाला आणि बुध्दी भ्रमाच्या उसळी सरसे भिंतीकडे तोंड करून ते तणतणले, 'बरे आहे! या म्यूनिसीपालटीला आता माझा इंगा दाखवतो!'...... "मदतीपुरताच घरोबा करणाऱ्या मैत्रिणीशी इतका जन्माचा जिव्हाळा लावणाऱ्या प्रेमवेड्या माणसाच्या खुळेपणाला हसावे की रडावे?"[८९]

"लिहून आलेला मजकूर" हे सदरही अशाच विनोदबुध्दीचे दर्शक होते. "लिहून आलेला मजकूर" हा भाग संपादकाच्या विनोदबुध्दीची झलक दाखवितो. थोडा खट्याळपणा, थोडी खोडकर पण खिलाडूवृत्ती, थोडी टिंगलटवाळी आणि सूचक पण खोचक टीका त्यात अभिप्रेत आहे. प्रसिध्द, परिचित व्यक्तींचा व घटनांचा कधी स्पष्ट, कधी सूचक उल्लेख त्यात असल्याने काही वेळा गैरसमज व कटूता निर्माण होऊ शकते याची संपादकांना जाणीव आहे. 'प्रेसिडेंट साहेबांचा विरह' या लेखामुळे सुरूवातीस तसा झाला. सुरूवातीस टीप देऊम नंतरच्या एका अंकात खुलासाही द्यावा लागला. अर्थात

सर्वच लेख असे नाहीत. कामगार संप का पाहिजे, शहीदचा दफनविधी, दीन भारताची आठवण ठेवा या लेखातील विवेचन गंभीर व अंतर्मुख करणारे आहे."[९०]

स्थानिक राजकारणाचे दैनंदिन पडसाद 'गजनफर' च्या पाना-पानांवर तरी उमटतच होते. पण राष्ट्रीय स्तरावरील राजकारण, देशाची स्वातंत्र्य चळवळ अशा विषयांचे अभ्यासपूर्ण विवेचनही यात आढळते. इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याबाबतीतही एक अग्रलेख लिहून १० मे हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्यात यावा, असा आग्रह धरला होता. "हिंदी जनतेने स्वातंत्र्ययुध्दाची पहिली सलामी १८५७ साली तारिख १० मे रोजी ठोकली. यास्तव १० मे हा स्वातंत्र्यदिन म्हणून प्रत्येक हिंदु मुसलमानाने पाळला पाहिजे आणि या दिवसाची स्मृती तुफान दर्यातील दीपस्तंभाप्रमाणे नजरेसमोर ठेवून अत्याचार-रक्तपात-जाळपोळ इत्यादी स्वातंत्र्याच्या मार्गातील खडक टाळून ध्येय गाठण्यासाठी स्वातंत्र्याच्या चालू लढ्यात शतपट जोमाने आणि उत्साहाने भाग घेतला पाहिजे!"[९१]

स्थानिक राजकारण असो वा राष्ट्रीय राजकारण, आंतरराष्ट्रीय घडामोडी असोत, 'गजनफर' ने प्रबोधनाची कास कायम ठेवली. या सगळ्या राजकीय लिखाणातून हुतात्मा कुर्बान हुसेन यांची राजकीय प्रगल्भता आणि भाषेतील पोक्तपणा पदोपदी जाणवत राहतो. राजकीय घडामोडींची तटस्थपणे मिमांसा करणारी विश्लेषक बुध्दी कुर्बान हुसेन यांच्याकडे होती असे म्हणता येईल. मुसलमानांप्रती लिहिताना काही ठिकाणी धार्मिक अभिनिवेश जाणवत असला तरी त्यांच्या हेतूबद्दल शंका घेण्याची संधी वाचकाला कुठेच मिळत नाही. कसलेल्या राजकीय मुत्सद्याप्रमाणे त्यांनी राजकारणाचे सर्व पदर वाचकांसमोर उलगडून दाखविले आहेत. त्यांच्या सर्वच राजकीय अग्रलेखांची परिणामकारकता तत्कालीन वाचक वर्गावर प्रकर्षाने दिसून येते. प्रभावी, परखड, परिपक्व आणि पारदर्शी लिखाणातून 'गजनफर' ने आपला एक स्वतंत्र राजकीय बाणा ठळकपणे दाखविला. त्यातूनच समाजाला राजकीय प्रबोधनाचे धडे नकळतपणे गिरवता

आले. राजकीयदृष्ट्या समाज जागृत व जागरूक झाला पाहिजे याची तळमळ घेऊनच अल्पकाळाची वाटचाल परिणामकारकरित्या केली यात शंका नाही!

**'कर्मयोगी' पत्राने केलेले राजकीय प्रबोधन ः**

'साप्ताहिक कर्मयोगी' हे रामभाऊ राजवाडे यांनी सुरू केलेले वृत्तपत्र होय! श्री राजवाडे हे मुळातच स्वातंत्र्य चळवळीतील एक आघाडीचे कार्यकर्ते होते. संघटक होते. ते उत्तम वक्ते, प्रचारक होते. अशा सर्व भूमिकांमध्ये ते वावरत होते. सर्व थरातील लोकांशी त्यांचा चांगला संपर्क होता. कायद्याचे शिक्षण घेतलेले असल्याने चांगली जाणकारी होती. स्वतः कुस्तीचे शौकीन होते. देशी मैदानी खेळांविषयी त्यांना कमालीची आस्था होती. देशी खेळांविषयी त्यांना अभिमान होता. लोकमान्य टिळकांचे कट्टर अनुयायी म्हणूनच ते सोलापूरच्या राजकीय वातावरणात लोकप्रिय होते. "लिगाडे इस्टेट"चे विश्वस्त म्हणूनही त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. तितक्याच निष्ठेने 'कर्म योगी'च्या माध्यमातून पत्रकारितेचे व्रतही जोपासले.[९२] या सर्व क्षेत्रात राजवाडे यांचा स्वैर संचार होता. सोलापूरच्या सार्वजनिक क्षेत्रात रामभाऊ राजवाडे हे गणमान्य नांव होते. त्यामुळे या सर्व माध्यमांचा त्यांनी राजकीय प्रबोधनासाठी उपयोग केला. कै.रामभाऊ राजवाडे यांची कामगिरी प्रचंड मोठी आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांच्या 'कर्म योगी' च्या माध्यमातून केलेल्या अतुलनीय कामगिरीची तुलनाच होऊ शकत नाही. दिनांक ८ मे १९३० रोजी सोलापुरात पोलिसांनी केलेल्या अमानुष अत्याचार व गोळीबार त्यात मृत्यूमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांचा आक्रोश केवळ 'कर्मयोगी' मुळेच लोकांसमोर आणि सरकारसमोर उघड झाला.

पोलिसांनी केलेल्या गोळीबाराची आणि अत्याचाराची हकीकत थेट इंग्लंडपर्यंत जाऊन पोहोचली ती केवळ 'कर्मयोगी' मुळे! दिनांक ८ मे १९३० ची घटना दिनांक १० मे १९३० रोजी 'कर्मयोगी'चा विशेष अंक काढून प्रकाशित केली. दिनांक १० मे १९३०

रोजीचा 'कर्मयोगी' चा अंक म्हणजे सर्व पत्रकारांसाठी वार्तांकनाचा एक आदर्श वस्तुपाठच ठरावा. त्या वेळेसची तणावाची परिस्थिती, सर्वत्र कडेकोट बंदोबस्त, रस्त्यावर दिसताक्षणी गोळी छातीत घुसण्याची भिती, पारतंत्र्याचा काळ अशा परिस्थितीत शहरात सर्वत्र फिरून कुठे गोळीबार झाला, कुठे आणि किती माणसे मेली, त्यांची नांवे, त्यांची पार्श्वभूमी अशी इत्थंभूत माहिती गोळा करून दुसरेच दिवशी प्रकाशित केली. आजच्या काळात असते तशी वार्ताहरांची संख्या, सुविधा त्यावेळी नव्हत्या. आज पत्रकारांना जसा मिळतो तसा कर्फ्यूमध्ये फिरण्याचा पासदेखिल त्यावेळी नव्हता आणि सरकारही आपले नव्हते. तातडीने आणि मोठ्या संख्येने छपाई करण्यासारखी छपाई यंत्रणाही उपलब्ध नव्हती. अशा अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत रामभाऊ राजवाडे यांनी सरकारच्या अत्याचाराची कहाणी 'कर्मयोगी' च्या माध्यमातून जगासमोर आणली. राजवाडे यांनी दाखविलेले धाडस, तत्परता ही पत्रकारितेच्या इतिहासाला गौरव प्राप्त करून देणारी बाब आहे.

दिनांक ५ मे रोजी म. गांधींना पकडण्यात आल्याची वार्ता सोलापुरात आली तेंव्हा सोलापुरात दिनांक ६ मे १९३० पासून दररोज निषेधांच्या मिरवणुका, सभा चालत होत्या. दिनांक ८ मे १९३० रोजीही अशीच निषेधाची मिरवणूक निघाली. मिरवणुकीतील काही जमाव रूपाभवानी मंदिरालगत असलेल्या शिंदीच्या बनात गेला. शिंदीची झाडे तोडायला सुरूवात केली. कारण म.गांधीजींचा संदेश होता. इथपर्यंत सारं शांततेच्या मार्गाने चालू होते. पण कलेक्टर मि.नाईट यांनी काहीजणांची धरपकड केली. ज्यांना पकडले त्यातील कोणाचाच या आंदोलनाशी संबंध नव्हता. निरपराध लोकांना पकडल्याने जमाव प्रक्षुब्ध बनला. कलेक्टर नाईट यांच्यावर चालून गेला तेंव्हा त्यांच्या सार्जंटनी गोळीबार केला. त्यात शंकर शिवदारे हा तरूण शहीद झाला. सोलापुरातला तो पहिला हुतात्मा. मल्लप्पा धनशेट्टींनी जमावाला काबूत आणले नसते तर कदाचित त्यादिवशी मि.नाईट यांचाच बळी जमावाच्या हातून पडला असता. पण त्या

उपकाराची जाणीव न ठेवता मि.नाईट यांनी गोळीबाराचे आदेश दिले. प्रक्षुब्ध जमावाने दोन पोलीसांसह मंगळवार पेठ पोलीस चौकी जाळली. कोर्ट जाळण्यात आले. लोक जमावाने जणू रूद्रावतार धारण केला होता. ही सर्व दंगलग्रस्त परिस्थिती दुपारपर्यंत चालू होती. दुपारनंतर लोक घरोघर परतले होते. तेंव्हा कलेक्टर मि. नाईट आणि डीसीपी प्लेफेअर यांनी जो अमानुष अत्याचार आणि बेगुमान गोळीबार सुरू केला त्याची तुलना जालीयनवाला बाग हत्याकांडाशीच होऊ शकते. मि.नाईट व डीसीपी प्लेफेअर यांचा हा अमानुष खेळ दुपारी १ वाजल्यापासून रात्री ७ वाजेपर्यंत चालू होता. त्यात शांतताप्रिय आणि निरपराध लोकांचेच बळी जात होते. यास स्वैर गोळीबाराच्या सहा तासाच्या अवधीत एकूण १०३ गोळ्या झाडल्या गेल्या.[९३]

या गोळीबाराची सविस्तर हकिकत व विश्वसनीय माहिती आणि सत्य परिस्थिती लोकांना कळावी म्हणून देशभक्त रामभाऊ राजवाडे यांनी गोळीबाराच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १० मे १९३० रोजी 'कर्मयोगी' चा जादा अंक प्रकाशित केला. दिनांक ८ मे रोजी गोळीबार झाल्यानंतर रात्री रामभाऊ राजवाडे, श्री जगन्नाथ शिंदे आणि मल्लप्पा धनशेट्टी असे तिघेजण मुद्दाम सिव्हील हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली. मृतांची माहिती घेतली. जखमींच्या व मृतांच्या घरी खबर पोहोचवली. ही कामे सरकारने तरी केली नाहीतच पण स्वयंबुध्दीने करणाऱ्या स्वयंसेवकांच्या कामातही अडथळे आणले. भाऊसाहेब खडकीकर, भाई पु.ग.बेके, ना.म.दामले, श्रीनिवासराव काडगांवकर, डॉ.अंत्रोळीकर आदिंनी शहरात जातीने हिंडून माहिती गोळा केली. अशा रितीने दंगलीची व गोळीबाराची सविस्तर माहिती देणारा 'कर्मयोगी' चा जादा अंक दिनांक १० मे १९३० रोजी शनिवारी पहाटेच प्रसिध्द करण्यात आला.

'कर्मयोगी' ने लिहिलेला हा अग्रलेख म्हणजे 'दंभस्फोट करणारा अग्रलेख' होता. "कर्मयोगी चा १० मे १९३० चा अंक एक ऐतिहासिक दस्तावेज आहे. सत्य हकिकत प्रकाशित करून ब्रिटीश शासनाचे खरे रूप जगाला श्री राजवाडे यांनी दाखविले.

त्यासाठी त्यांना दहा हजार रूपये व साडेसात वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. गांधीजींच्या निर्वाणीच्या भूमिकेमुळे त्यांची सुटका झाली. सरकारची सूडबुध्दी त्यात दिसते. अंकात सरकारच्या काळ्या कर्तृत्वाची मन अस्वस्थ करणारी कहाणी वाचावयास मिळते. श्री राजवाडे, डॉ.अंत्रोळीकर, ल.गो.काकडे, श्रीनिवासराव काडगांवकर, महाजन वकिल, शेठ गुलाबचंद आणि अनेक विश्वासू सहकाऱ्यांनी घरोघर व दवाखान्यात विचारपूस करून ही माहिती गोळा केली. तिच्या सत्यतेबद्दल सरकार शंका घेऊ शकले नाही. अंकाची किंमत एक पैसा होती व वीस हजाराच्या वर प्रती खपल्या."[९४]

"सोलापूरकरांच्या स्वातंत्र्यलढ्यातील हे दिव्य पर्व होते. तीन दिवस (६, ७ व ८ मे १९३०) सरकारविरूध्द निदर्शनाचे, चार दिवस (९, १०, ११ व १२ मे १९३०) स्वातंत्र्याचे आणि ४९ दिवस (१२ मे ते ३० जून १९३०) मार्शल लॉच्या अंमलाचे असे एकूण ५६ दिवसांचे हे पर्व होते! आणि लढा अंतिम ध्येयाच्या दिशेने मार्ग क्रमू लागला. या पर्वाची दाहकता धनशेट्टी, सारडा, शिंदे व कुर्बान हुसेन या वीरांच्या स्वातंत्र्यवेदीवरील बलिदानात आहे. मार्शल लॉचा खोडा घालून सरकारने या प्रकरणाला कलाटणी दिली. या वीरांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कार्याचा विचार, राजकीय चळवळीच्या दृष्टीने करण्याऐवजी दंगलीच्या अंगाने केला. मार्शल लॉ पुकारल्याने राजकीय कैद्यांना मिळू शकणारे हक्कच बाद झाले!"[९५]

'सोलापूर समाचार' चे संपादक 'रावसाहेब' विठ्ठलराव जक्कल यांनी या स्वैर गोळीबाराची समग्र माहिती मिळवून आपला जादा अंक तयार केला होता. पण तो प्रकाशित करण्यात आला नाही. कारण रावसाहेब जक्कल हे मूळतः सात्विक वृत्तीचे गृहस्थ होते. शिवाय कलेक्टर मि. नाईट यांचा जक्कल यांच्यावर विशेष लोभ होता. समाचारने दंगलीची आणि गोळीबाराची माहिती मिळवून ती छापण्याच्या प्रयत्नांची कुणकुण मि.नाईट यांच्या कानावर गेली तेंव्हा मि. नाईट यांनी जक्कलांना बोलावून

घेऊन तसा अंक न काढण्याचे आश्वासन घेतले. इतकेच नव्हे तर सरकारी अत्याचाराची हकिकत वाचकांच्या हाती पडण्या अगोदर ते समाचारचे अंक जाळण्यात आले.[९६]

सोलापुरातली धगधगती परिस्थिती एकच होती. पण दोन वृत्तपत्रांमधील बाणेदारपणा आणि धाडस यांत जमीन अस्मानाचा फरक पडला. सोलापूरच्या मातीतच रूजलेली दोन वृत्तपत्रे, दोन्ही संपादकांनी इथल्या समाजमनाशी जुळलेली नाळ सारखीच असूनही 'कर्मयोगी' ने हे धगधगते वास्तव जगासमोर आणले आणि 'समाचार' च्या अंकावर कलेक्टर मि.नाईट यांच्या मोहिनीचा प्रभाव पडून त्याची राख केली गेली. या सत्याची इतिहासाचा अभ्यासक या नात्याने दुर्दैवाने दखल घेणे आवश्यक वाटले. पराक्रम हा नेहमी तुलनात्मक अग्निपरीचेनेच तावून सुलाखून अधोरेखित होतो, त्याला इतिहासकारांचाही नाईलाज असतो. सरकारी अधिकाऱ्यांची ही बेबंदशाही एका वृत्तपत्राने उलथून टाकण्याचे धाडस दाखवले. तर त्याचवेळी दुसऱ्या वृत्तपत्राने तात्कालिक व्यक्तीसंबंधाला प्राधान्य दिले, हे सोलापूरच्या शौर्य परंपरेचे विदारक वास्तव लपून राहिले नाही. 'समाचार' नेही असेच धाडस तेंव्हा आणि त्यानंतरच्या सर्व घटनांमध्ये दाखविले असते तर कदाचित सोलापूरचा इतिहास वेगळा लिहिला गेला असता. सुदैव असे 'कर्मयोगी' ने कुणाचाही मुलाहिजा न बाळगता या भिषण घटनेला वाचा फोडली, स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रत्येक घटना, प्रत्येक तपशिल नोंदवला. मुजोर सरकारी सार्जंटच्या बंदुकीतून सुटलेली प्रत्येक गोळी नोंदवून जगासमोर उघड केली. म्हणूनच केवळ सरकारची दडपशाही चव्हाट्यावर येऊ शकली. या एकाच सत्कर्माबद्दल स्वातंत्र्य देवता आणि स्वातंत्र्याचा इतिहास 'कर्मयोगी' पत्राबद्दल कृतज्ञ राहील.

दिनांक ८ मे च्या घटनेची भीषणता किती होती याची कल्पनाच करवत नाही. 'कर्मयोगी' ने केवळ त्या दिवशी गोळीबारात मृत पावलेल्यांची यादी व जखमींची यादी दिली. पण जखमींपैकी नंतरच्या काळात जे मृत्यूमुखी पडले त्याची नोंद कुणालाच पुरेशी घेता आली नाही. कारण 'कर्मयोगी' चा अंक त्या काळात नंतर प्रकाशित होऊ शकला

नाही. "दिनांक ८ मे च्या गोळीबारात जे लोक ठार झाले त्यांचा अंत्यविधी कशारितीने झाला याची कल्पनाच केलेली बरी. त्यादिवशी शहरातील एकंदर प्रकाराने आणि दुपारच्या गोळीबाराने शहरात भितीचे वातावरण होते. घराबाहेर पडण्यास कोणी धजत नव्हते. पुन्हा केंव्हा गोळीबार होईल याचा कुणालाच अंदाज येत नव्हता. जो तो आपापला जीव मुठीत धरून घरात बसून राहिलेला असल्यामुळे मृतांच्या अंत्यविधीला माणसे मिळणेही कठीण होऊन बसले. काहींनी बैलगाडीतून प्रेत स्मशानभूमित नेले. तर काहींनी एक-दोघांच्या सहाय्याने स्मशानभूमी गाठली. दुर्दैवी मृतांना त्यांच्या अंत्यविधीसाठी माणसे मिळू नयेत यासारखी भयानक परिस्थिती त्यादिवशी निर्माण झाली होती."[९७] या वर्णनावरूनच त्या दिवशीची सोलापुरातील परिस्थिती कळून येऊ शकते. अशा भयाण व जीवघेण्या परिस्थितीत 'कर्मयोगी' चे संपादक रामभाऊ राजवाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जीवावर उदार होऊन जे वृत्तांकन केले त्याला आधुनिक भाषेत 'जर्नालिझम विथ करेज' धाडसी पत्रकारिता म्हणतात.

या सर्व घटनांचा स्वाभाविक परिणाम 'कर्मयोगी' च्या आणि रामभाऊ राजवाडे यांच्या कारकिर्दीवर होणार होताच. या परिणामांची कल्पना राजवाडेंनाही होती. पण 'कि घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने' ही सावरकरी वृत्ती त्यांच्या रोमारोमात वास करीत होती. दिनांक १२ मे पासून म्हणजे ११ मे १९३० च्या मध्यरात्रीपासून सोलापुरात 'मार्शल लॉ' लागू करण्यात आला. बेसुमार धरपकड करण्यात येऊ लागली. दिनांक १३ मे १९३० रोजी 'कर्मयोगी' कार्यालयात श्री भाऊसाहेब खडकीकर, शेठ माणिकचंद वीरचंद, श्री राजवाडे यांनी मल्लप्पा धनशेट्टी यांना बोलावून घेतले व यापुढे तुम्ही गावात राहू नका असा सल्ला दिला. त्याच बैठकीत रामभाऊ राजवाडे यांनीही गावात राहू नये असे मत व्यक्त करण्यात आले. परंतु दोघांनीही "अशा परिस्थितीत स्वतःची चामडी वाचवण्यासाठी आम्ही येथून जाणे श्रेयस्कर ठरणार नाही. आमचे जे काही व्हायचे असेल

ते होवो." असे सांगितले.[९८] यावरूनच रामभाऊ राजवाडे यांचा पींड कोणत्या मुशीतून तयार झाला होता याची कल्पना येते.

शिक्षणाने वकिल, कर्तव्यनिष्ठ वडिलांचा वारसा, देशी खेळ आणि संस्कृतीवर प्रेम करणारा निस्सीम भक्त, अंगची कार्यकुशलता आणि कुशाग्र बुध्दीमत्ता, नसानसातून सळसळणारी राष्ट्रनिष्ठा अशा अनेक पैलूंमुळे कै.रामभाऊ राजवाडे यांचे व्यक्तिमत्व घडलेले होते. वक्तृत्व आणि कर्तृत्वानेही त्याला लकाकी प्राप्त झाली होती. राजकीय सभासंमेलने असोत की, सामाजिक उपक्रम सर्वच बाबतीत निस्पृह पुढाकार त्यांचा होता. इ.स.१९२0 च्या एप्रिलमध्ये सोलापुरात जी प्रांतिक परिषद झाली त्यात राजवाडे यांनी स्वयंसेवकांचा मुख्य नेता म्हणून जबाबदारी निभावली. लोकमान्य टिळक आणि कै.तात्यासाहेब केळकर यांच्यासारख्या महान पुढाऱ्यांची त्यांच्या तत्वाची व विचारसरणीची छाप मनावर बसलेली होती. पुण्यात केसरी कार्यालयात जाऊन दोन वर्ष त्यांनी संपादकीय विभागात काम करून माहिती घेतली. पुणे आणि केसरी हे दोन्ही तशा अर्थाने व्यक्ती घडणीचे प्रशिक्षण केंद्रच होते. कै.रामभाऊ राजवाडे यांच्यातील पत्रकार या तालमीतूनच तयार झालेला होता. स्पष्टवक्तेपणा आणि कमालीचा निडरपणा करारी वृत्ती यामुळे अनेकांच्या रोषालाही त्यांना बळी पडावे लागले. सन् १९२५ ते १९२७ या काळात सोलापुरात जातीय दंग्यांना ऊत आला होता. शहरातील अनेक हिंदूंना या दंग्यांची झळ पोहोचली होती. भाई बेके हे 'कर्मयोगी' चे सहसंपादक म्हणून कार्यरत होते. इ.स.१९२५ च्या दंग्यात त्यांच्या ओळखीच्याच एका गुंडाने त्यांना मारले होते. त्यावेळीही अत्यंत शांतपणे 'कर्मयोगी' ची सर्व धुरा राजवाडे यांनी वाहिली. मुस्लिम समाजाचा रोष आणि राजकीय पुढाऱ्यांची वक्रदृष्टी असूनही 'कर्मयोगी' चा बेडरपणा कमी होऊ दिला नाही. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर राजकीय चळवळीने दिशाच बदलली. गांधी युग सुरू झाले. मुस्लिमांच्या तुष्टीकरणाला गांधींचा हातभार लागला. काहींनी याविरूध्द बंड सुरू केले काहींनी गप्प राहणे पसंत केले. कै.रामभाऊ राजवाडे

यांना गप्प राहणे शक्यच नव्हते. त्यांनी स्पष्ट सांगितले, "कॉंग्रेसचे इतर हजार खुन मी माफ करेन पण मुसलमान धार्जिणी वृत्ती मी सहन करणार नाही."[९९] रामभाऊ हे महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीवर निवडून आलेले होते. इतर कॉंग्रेसी पुढाऱ्यांप्रमाणे प्रवाहपतीतपणा त्यांच्या रक्तात नव्हता.

कै.राजवाडे यांना मार्शल लॉ अंतर्गत अटक करण्यात आली, ती तारिख होती १६ मे १९३०! सात वर्ष सक्त मजुरी व १० हजार रूपये दंड ठोठावण्यात आला. त्यांच्या अटकेनंतर ५-६ महिने 'कर्मयोगी' चे प्रकाशन बंद पडले होते. पाच-सहा महिन्यानंतर परिस्थिती निवळल्याचे पाहून शेठ गुलाबचंद, भाऊसाहेब खडकीकर, डॉ.जगदेवराव देशमुख आदिंनी नोव्हेंबर १९३० मध्ये 'कर्मयोगी' पुन्हा चालू केला. जगदेवराव देशमुख संपादक झाले. म.गांधी-आयर्विन करारानुसार कै.राजवाडे मे १९३१ मध्ये सुटून आले. त्यांनी पुन्हा संपादकीय जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. पण फार काळ ते चालले नाही. इ.स.१९३२ साली सरकारी दडपशाही पुन्हा सुरू झाली. त्या दडपशाहीच्या वरवंट्याखाली 'कर्मयोगी' जप्त करण्यात आला. 'कर्मयोगी' चा छापखानाही सरकारने ताब्यात घेतला. यावेळीही कै.रामभाऊ राजवाडे यांना अटक करून पॅरोलवर सोडण्यात आले. या घटनेनंतर मात्र 'कर्मयागी' कायमचे बंद पडले.

**व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन यांचा ऑर्डिनन्स ः**

'मार्शल लॉ' मुळे सरकारला मोकाट सुटल्यामुळे सत्तेचा गैरवापर करता आला. जबाबदारी झटकून समाजाला वेठीस धरता आले. याचा आशय लक्षात आला म्हणजे हुतात्म्यांना व शहरवासीयांना दिलेल्या वागणुकीचा अर्थ लक्षात येतो. मार्शल लॉ पुकारण्याचा पहिला मान सोलापूरला मिळाला आणि तो जिल्हाधिकारी मि.नाईट यांच्यामुळे. सोलापूरचे नांव त्यामुळे लंडनपर्यंत दुमदुमले यात शंका नाही. सोलापुरात मार्शल लॉ पुकारण्यात आल्यानंतर अवघ्या तीनच दिवसात व्हॉईसरॉयनी सोलापूर विषयक

ऑर्डिनन्स काढला. व्हॉईसरॉय साहेबांचा ऑर्डिनन्स हा दिनांक १५ मे ला काढला असला तरी तो दिनांक १८ मे च्या गॅझेटमध्ये प्रसिध्द करण्यात आला.

"व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी सोलापुरातील लष्करी कायद्यासंबंधाने काढलेला जादा ऑर्डिनन्स दिनांक १५ मे १९३0 ला प्रसिध्द केला. त्यातील महत्वपूर्ण कलमे पुढीलप्रमाणे होती –

या कायद्याला सोलापूर मार्शल लॉ ऑर्डिनन्स १९३0 असे म्हणावे. सोलापूर शहराच्या म्यूनिसिपल हद्दीत हा कायदा लागू केला जाईल. पण सबंध सोलापूर जिल्ह्याला जरूर पडल्यास तो लागू करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारला दिला आहे.

हा कायदा अंमलात आल्यावर मुख्य सेनापती किंवा जनरल ऑफिसर कमांडिंग यांनी योग्य लष्करी अधिकाऱ्यांकडे त्यांचे अंमलबजावणीचे काम द्यावे. अशा अधिकाऱ्याला शांतता रक्षणाला जरूर ते कायदेकानू करण्याचा अधिकार आहे. पण अशा अधिकाऱ्याने होता होईल तो नागरिकांच्या नेहमीच्या व्यवहाराला बाधा येणार नाही, अशा रीतीने हे नियम करावेत. त्याचप्रमाणे जेथे लष्करी कायदा लागू केला आहे तेथील वरिष्ठ मुलकी अधिकाऱ्यांचा सल्ला त्याने घ्यावा. पण त्याचा सल्ला लष्करी अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही.

लष्करी अधिकारी जे कानून करतील ते नागरिकांना कळावेत म्हणून योग्य रितीने प्रसिध्द केले पाहिजेत. शत्रुला मदत करणे, सैन्याच्या हालचालीस अडथळा होईल असे वर्तन करणे वगैरे अपराध कोणी केल्यास इं.पि. कोडच्या १२१ कलमान्वये ते दोषी ठरतील.

शुत्रुपैकी कोणाला पैशाचा, अन्नाचा, दारूगोळ्याचा पुरवठा करणे हा गुन्हा असून त्याला १0 वर्षाची शिक्षा आहे. शत्रूची व्याख्या – लष्कर कायद्याच्या क्षेत्रात

बादशहांचे सैन्य अथवा पोलीस हे शांतता रक्षणासाठी ज्या दंगेखोरांविरूध्द आपला मोर्चा वळवितील त्यांना शत्रू असे लेखिले जाईल.

या कायद्याविरूध्द होणाऱ्या गुन्ह्याची चौकशी नेहमीच्या फौजदारी कोर्टाकडून केली जाईल. अत्याचार करणारा खेरीज इतरांना फटक्याची शिक्षा देण्याचा अधिकार ठेवलेला नाही.

या ऑर्डनन्सप्रमाणे दिलेले अधिकार बजावणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द कोणत्याही कोर्टात फिर्याद चालणार नाही.

सोलापुरातील लष्करी अधिकाऱ्यांनी  वरील कायद्याच्या पुरवणीदाखल पुढील नियम केले आहेत–

नुकत्याच झालेल्या दंग्यांशी संबंध असलेल्या लोकांना आश्रय देणे, किंवा मदत करणे, किंवा वाहनांचा पुरवठा करणे या अपराधाबद्दल ५ वर्ष सक्तमजुरी व दंड केला जाई ल.

चालू दंग्यांशी संबंध असलेले लोक किंवा त्यांचे नातेवाईक यांची माहिती असणाऱ्या लोकांनी ती ताबडतोब लष्करी किंवा मुलकी अधिकाऱ्यांना कळविली पाहिजे. तसे न केल्यास अशा लोकांना ५ वर्ष सक्तमजुरी व दंड अशा शिक्षेस पात्र ठरविले जाईल.

लष्करी अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ५ माणसांपेक्षा अधिक माणसांची मिरवणूक काढणे, किंवा सभेला हजर राहणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. त्याला ५ वर्ष सक्तमजुरी व दंड अशा शिक्षा सांगितल्या आहेत.

लष्करी अधिकाऱ्यांनी लावलेल्या नोटिसा किंवा जाहीरनामे फाडणे किंवा त्यावर खाडाखोड करणे हा गुन्हा असून त्याबद्दल १ वर्ष सक्तमजुरी व दंड अशी शिक्षा आहे.

पोलीस किंवा लष्करी अधिकारी यांनी मागणी केल्यास प्रत्येक इसमाने आपला बिनचुक पत्ता, नांवनिशीवार दिला पाहिजे. तसे न झाल्यास किंवा तसे न करणाऱ्यास २ वर्ष सक्तमजुरी व दंड ठोठावण्यात येईल.

लष्करी अधिकाऱ्यांनी कोणाचाही गाडी, घोडा किंवा घरदार किंवा कामगार यांचा पुरवठा सार्वजनिक कामासाठी आपणास पाहिजे आणि असे म्हटल्यास तो त्यास तावडतोब दिला पाहिजे. तसे न दिल्यास २ वर्ष सक्त मजुरी व दंड अशी शिक्षा आहे.

कर्नल पेज यांच्या सहीने दिलेल्या पासाशिवाय कोणीही रात्री सात नंतर घराबाहेर पडता कामा नये. हा नियम तोडणाराला अटक केली जाईल. त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर गोळीबार केला जाईल. बाळंतपण किंवा आजारीपण अशा बावतीत लष्करी अधिकाऱ्यांकडून पास मिळतील. ज नियम तोडणाऱ्याला ३ वर्ष सक्तमजुरी व दंड केला जाईल.

खोट्या बातम्या पसरविण्याच्या गुन्ह्याबद्दल ५ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व दंड अशा शिक्षा आहेत.[१००]

कोणत्याही कायद्याच्या कलमाचा अर्थ व्यवहारात वापर झाल्याशिवाय स्पष्ट होत नाही. शब्दार्थ व व्यावहारिक संदर्भातील त्याचा अन्वयार्थ प्रसंगानुरूप उलगडत जातो. मार्शल लॉच्या बाबतीत तसेच झाले. लष्करी व मुलकी अधिकारी जो अर्थ लावतील तो त्याचा अर्थ झाला. या कायद्याचा हवा तसा वापर या अधिकाऱ्यांनी करून लोकांवर अत्याचार केले. पोलीस व सैनिक यांच्या वर्तनाला कायद्याच्या संरक्षणामुळे मर्यादाच नव्हत्या. स्वतःच्या अधिकारात घरे ताब्यात घेणे, दुकाने उघडावयास लावून माल नाहीसा करणे अशा अनेक प्रकारच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अत्याचाराला धरबंदच नव्हता. "चाटी गल्लीतील दुकानातील कापडाची नासधूस केली. किंमती शालू पैठण्यांवर प्रातर्विधी

करून खराबी केली. नुकसान अंदाज १० लाख रूपयांचे! मारहाणीला तर सुमारच नव्हता. त्यांच्यातील पशू इतका बेफाम झाला होता की, म्हाताऱ्या भिकारणीची अनेकांनी केलेल्या अत्याचारातून मृत्यूनेच सुटका केली! एका सुंदर स्त्रीवरही हीच बला आली. त्यातून न सावरता ती कांही दिवसात ती मरण पावली."[१०१]

यावरूनच आपल्याला मार्शल लॉच्या दाहकतेचा अंदाज येऊ शकतो. श्री रामभाऊ राजवाडे यांनी कोणत्या परिस्थितीत ब्रिटीश सरकारच्या छळवादाची कहाणी सांगणारा ऐतिहासिक 'दंभस्फोट करणारा' दिनांक १० मे १९३० चा 'कर्मयोगी'चा अंक काढला याची कल्पना येऊ शकते. कै.रामभाऊ राजवाडेंना क्रांतीकारकांच्या कार्याचा आणि धाडसाचा मनस्वी अभिमान होता. कै.रामभाऊंची सुटका झाल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यासाठी एक सभा झाली. त्या सभेचे अध्यक्ष होते, श्री दाऊदसाहेब कुर्बान हुसेन म्हणजे हुतात्मा कुर्बान हुसेन यांचे धाकटे बंधू! या सत्कार सभेत रामभाऊंनी हुतात्म्यांबद्दलच्या आपल्या निखळ भावना व्यक्त केल्या. "तुम्ही माझे अभिनंदन करण्यापेक्षा, आपल्या अध्यक्षांच्या तरूण भावाने जे कार्य केले व ज्या करिता ते मेले त्या हुतात्मा कुर्बान हुसेनचे अभिनंदन करा. त्याच्या कार्यापुढे मी पासंगालाही पुरणार नाही. ... चार हुतात्म्यांची आठवण झाली म्हणजे काय वाटत असेल याची कल्पना करा. हुतात्मा कुर्बान हुसेनची आठवण झाली म्हणजे वीर अभिमन्यू बाळाची आठवण होते. तो बाळ जसा अगदी लहान वयात भयंकर रणसंग्राम करता करता मेला तसा हु. कुर्बान हुसेन हा राष्ट्रकार्य करता करता मेला."[१०२]

इ.स.१९३३ नंतर रामभाऊ राजवाडे हिंदुमहासभा व लोकशाही स्वराज्य पक्षाकडे वळले. महाराष्ट्र, मध्यप्रांत, निजामस्टेट वगैरे प्रांतातून त्यांनी पक्षाचे प्रचारकार्य केले. इ.स.१९३५ च्या हिंदुमहासभेच्या पुण्यातील अधिवेशनात त्यांचा सहभाग मोलाचा होता. इ.स.१९३७ च्या मुंबई असेंब्लीच्या निवडणुकीत लोकशाही स्वराज्य पक्षाचे ते अधिकृत उमेदवार होते. पण डॉ. अंत्रोळीकरांच्या विरोधात त्यांना ही निवडणुक गमवावी

लागली. इ.स. १९३९ च्या हैद्राबाद सत्याग्रहाच्या चळवळीची सूत्रेही त्यांच्याकडे होती. इतकेच नव्हे तर आर्य समाज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे कार्य सोलापुरात रूजवण्यात कै. राजवाडे यांचे कार्य महत्वपूर्ण होते. सन् १९४१ साली कै.वि.स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सोलापुरात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. त्यातही कै.राजवाडे यांचे भाषण आणि सहभाग लक्षणीय ठरला. इतके बहुआयामी व्यक्तिमत्व रामभाऊ राजवाडे यांचे होते. 'लिगाडे इस्टेट' चे विश्वस्त म्हणून सुरू झालेला हा जीवनप्रवास अनंत वळणे, खाचखळगे पार करीत इ.स.१९४१ च्या साहित्य संमेलनाच्या मांडवाशी स्थिरावला. इ.स.१९४१ ते इ.स.१९४९ पर्यंत ते जवळजवळ अंथरूणावरच पडून होते. दिनांक १८ एप्रिल १९४९ रोजी हा 'कर्मयोगी' अस्तास गेला.[१०३]

कै.रामभाऊ राजवाडे यांनी प्रत्येक भूमिकेत केवळ समाजाच्या हिताचाच विचार केला. देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा हाच त्यांचा श्वास होता. त्यामुळे कुस्तीच्या तालमी उभारणे असो की, 'कर्मयोगी' पत्राच्या निर्मितीचे काम असो, सामाजिक कार्य असो किंवा राजकीय निवडणुकीचे मैदान असो प्रत्येक ठिकाणी स्पष्ट, अत्यंत रोखठोक विचार, भारदस्त वाणी व लेखणी या माध्यमातून कै. राजवाडे यांनी प्रबोधनाच्या वाटा अधिक प्रशस्त केल्या.

सोलापुरातील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' व 'गजनफर' या चारही पत्रांनी केलेल्या राजकीय प्रबोधनाचा परिपाक म्हणून सोलापूर शहरातील लोकांच्या राजकीय जाणिवा अधिक प्रगल्भ झाल्या. स्वातंत्र्याची चळवळ, आंदोलने यांना वेग आला. स्वातत्र्याची प्रबळ इच्छा जागवण्यात या चारही पत्रांचा वाटा मोठा होता. शिवाय सामाजिक शांतता, सलोखा आणि समाजात सौहार्दाचे वातावरण कायम राहील, सामाजिक सुरक्षितता भंग पावणार नाही याची काटेकोर काळजी वृत्तपत्रांनी घेतली. आपल्या लिखाणातील संयमितपणा कधीही सोडला नाही. प्रक्षोभकपणाला थारा दिला नाही. अत्यंत जाणीवेने वृत्तपत्रांनी लेखन केलेले दिसते.

प्रकरण ४ थे

## संदर्भ व तळटीपा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सहस्त्रबुध्दे शिरीष | बखर कॉंग्रेसची | राजहंस प्रकाशन, प्रकाशक ः दिलीप माजगांवकर, प्रथमावृत्ती २८ डिसेंबर १९८५ पृ. १0 |
| २. | कित्ता | -- | पृ. १ |
| ३. | कित्ता | -- | पृ. ३ |
| ४. | डॉ. पवार सुधाकर | वृत्तपत्रे काल नि आज | पृ. ८६, ८७ |
| ५. | येवले शं.भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा | पृ. १३ |
| ६. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | -- | दिनांक १३ डिसेंबर १८६८ |
| ७. | डॉ पुंडे नीळकंठ | हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन कार्य आणि कर्तत्व – १९१0 – १९३१ | सप्टेंबर १९९७. अक्षय प्रकाशन, पुणे पृ. १३ |
| ८. | कित्ता | | पृ.१६ |
| ९. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा. | पृ. १५ |
| १0. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | | दिनांक ७ डिसेंबर १८९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Page : 173 to 176 |
| ११. | वि गो काकडे | | मुलाखतीतून |
| १२. | कित्ता | | |
| १३. | कित्ता | | |
| १४. | लेले रा के | मराठी वृत्तपत्राचा इतिहास | प्रकाशक ः कॉंटिनेन्टल प्रकाशन पुणे–३० पृ २२३ प्रथमावृत्ती – १९८४ |
| १५. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | –– | दिनांक १२ डिसेंबर १९०९ |
| १६. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | –– | दिनांक २० डिसेंबर १८९६ |
| १७. | Karkhanis Sharad | Indian Politics and role of the Press | Page – 13 to 15 |
| १८. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | –– | दिनांक १५ एप्रिल १९२८ |
| १९. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | –– | दिनांक १७ फेब्रुवारी १९०७ |
| २०. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | –– | दिनांक २९ नोव्हेंबर १९३१ |
| २१. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | –– | दिनांक २ मे १९२२ |
| २२. | डॉ. नभा काकडे | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' चे | अप्रकाशित शोध निबंध, शिवाजी विद्यापीठ इतिहास |

२३. कित्ता

२४. “The Text of the Roll of Honour presented to Mr.A.O.Hume by the Sholapur People’s Association Sholapur,on 29th November 1893.The Text is reproduced from the weekly Kalpataru Ani Anandvritta of 3rd December 1893.

**To,**

**A.O.Hume, Esqr .C.B.**

**Sir,**

We, the members of the People’s Association of Sholapur,respectfully beg leave to offer to you in the name and on behalf of the town and District of Sholapur a most

Cordial welcome on the occasion of this your first visit to our old and historic town.

We need scarcely observe that your invaluable services rendered during the long course of years and with such unselfish devotion and untiring energy to the cause of progress in India are throughout the length of breadth of the country highly appreciated and warmly recognized and we feel, we do no more than our simple duty in humbly joining in such recognition .Your name will always be honourably associated in the annals of Indian advance with the establishment and successful working of a national institution ,which –vesting as it does on the broad and solid basis. Of the common aims and aspirations of United India constitutes the centre of the nation’s political activities,and forms the sheet anchor of it’s hopes and which in its riper and richer developments,promises,in the progress of time and under the blessings of providence,the happiest results for the future welfare and advancement of this country. India has no truer or warmer friend, and the Indian National Congress has no more strenuous advocate or zealous supporter. And if our congress movement has been thus far successful if England is now awakening to a truer and juster sense of the importance and magnitude of her trust in regard to her Eastern

Dependency and of the solemn obligations it imposes upon her if there is an increasingly successful , resolute and organized endeavour to enforce, in respect of the Government of India ,a clear stricter and more direct responsibility to public opinion both here and in England if there is coming to be infused though as yet of course by low degrees a better and more sympathetic tone into the general administration if, above all the heart of the Nation is beginning to throb with higher hopes.This encouraging and gratifying result is by general consent acknowledge to be in no small measure, due to your indefatigable exertions unto the exertions of those high souled Englishman,whose sympathies and hearty co-operation you have worked so hard to enlist in our behalf.Such noble work should done and self denying singleness of purpose has own for you.the unbounded respect,love and admiration of the people of this land,and we would venture to add ,we can conceive of no higher or stronger title to a Nations gratitude .

Indeed the work of England's mission in India as conveyed by her gratest statesman is as difficult as it is grand, and would even appear to be impossible of accomplishment , were it not for the fact that she generously places at our disposal some of her best and highest talent and in the long and illustrious role of Englands sons, who have devoted their energies to the development of India's good,you hold and honoured place by your long continued and sustained labours in our interests.Surely a nation which can command the services of Brights and Fawcette and Bradlaoughs and Wedderburns and Humes has no reason to despair of its political futures.

Referring to rumours as to your contemplated retirement from the office of General Secretary of the Congress,we most sincerely trust that they have no foundation in fact,and we would further venture to express our confident hopes that nothing will occur to lead you to adopt any such decision.Our work ,as you are aware and no one perhaps has a truer perception of the fact is only just begun and with it, the difficulty of the practical endeavour, in the great constitutional struggle for justice and freedom and good and equal Government in which we are engaged and the Indian National Congress requires now even more than at any time before,all the assistance and skillful directions which its devoted founder and advocate alone can render as Generel Secretary. We are,however,confident that whether you our fear in our midst or in your distant Western Home your large heart will even be with us and with the great and just cause you have

already done so much to advance.

In this connection it is gratifying to the People's Association Sholapur,to see that we have with you as a collegue and co-worker Mr.Morgan Browne , a gentleman of wide attainments and large cultures sympathies , who as Joint Honourary Secretary to the British Committee of the Indian National Congress has already given proof of the warm interest he feels in our fortunes and of his determination to devote his time and youthful energies to the cause of political enfranchisement in this country.

In conclusion,we have to express our earnest and fervent hope,a hope in which we are sure all India will,with one voice join-that on your return home,the electors of Great Britain will accord to you their confidence,and by returning you as a representative to th House of Commons,place you in a position to work as one more member for India and to plead with your powerful voice for justice to her suffering and struggling millions,side by side with our wedderburns and Dadabhoys in tha August assembly the Parliament of Great Britain and may God in his mercy grant you health and strength to continue to devote yourself for many,many years to the best service of both India and England-is the fervid prayer of all India.

Thanking you and your colleague Mr.Morgan Browne for the honour of your visit to our humble town, and hoping that the present visit will not be the last parting visit,we beg with best regards to subscribe ourselves.

**Your obedient servants,**

| | | | |
|---|---|---|---|
| | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | | दिनांक ३ डिसेंबर १८९३ |
| २५. | डॉ. फडके य. दि. | विसाव्या शतकातील महाराष्ट्र | श्रीविद्या प्रकाशन , पुणे. पृ. १८६ व १८७ |
| २६. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | -- | दिनांक १९ जुलै १९३१ |
| २७. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | -- | दिनांक २ ऑगस्ट १९३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | -- | दिनांक ३0 ऑगस्ट १९३१ |
| २९. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | -- | दिनांक १५ ऑगस्ट १९४३ |
| ३0. | ‘कल्पतरू’ आणि आनंवृत्त | -- | दिनांक २४ नोव्हेंबर १९0७ |
| ३१. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | -- | दिनांक २ मार्च १९४७ |
| ३२. | डॉ. नभा काकडे | -- | उपरोक्त पृ. ५ |
| ३३. | कित्ता | | |
| ३४. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २0 ऑगस्ट १८७१ |
| ३५. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २८ एप्रिल १८७२ |
| ३६. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २१ जुलै १८७२ |
| ३७. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २ फेब्रुवारी १८७३ |
| ३८. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक १३ जुलै १८७३ |
| ३९. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक ३ डिसेंबर १८९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४०. | ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ | — | दिनांक २१ डिसेंबर १८८४ |
| ४१. | लेले रा. के. | मराठी वृत्तपत्राचा इतिहास | उपरोक्त पृ. ६३१ |
| ४२. | जक्कल जयंतराव | — | मुलाखतीतून |
| ४३. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक १५ फेबुवारी १९४५ |
| ४४. | कित्ता | — | |
| ४५. | कित्ता | — | |
| ४६. | कित्ता | — | |
| ४७. | जयंतराव जक्कल | — | मुलाखतीतून |
| ४८. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक २८ जानेवारी १९३४ |
| ४९. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक १६ जून १९३१ |
| ५०. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक २१ एप्रिल १९३१ |
| ५१. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक २१ एप्रिल १९३१ |
| ५२. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक १४ एप्रिल १९३१ |
| ५३. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक २० एप्रिल १९३१ |
| ५४. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक २६ जानेवारी १९३२ |
| ५५. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक ७ मार्च १९३१ |
| ५६. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक ९ फेब्रुवारी १९३१ |
| ५७. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक १ सप्टेंबर १९३१ |
| ५८. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक २३ जानेवारी १९३४ |
| ५९. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक ५ जुलै १९३१ |
| ६०. | ‘सोलापूर समाचार’ | — | दिनांक ४ ऑगस्ट १९३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६१. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक ११ ऑगस्ट १९३१ |
| ६२. | जतीन्द्र कऱ्हाडकर | युगान्तर | दिनांक ८ ते १४ फेब्रुवारी २00९ |
| ६३. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १२ ऑक्टोबर १९४२ |
| ६४. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १४ ऑगस्ट १९४७ |
| ६५. | कित्ता | — | |
| ६६. | 'सोलापूर समाचार' | — | दिनांक १५ ऑगस्ट १९४७पृ.१ |
| ६७. | कित्ता | — | |
| ६८. | कित्ता | — | |
| ६९. | कित्ता | — | |
| ७0. | कित्ता | — | |
| ७१. | कित्ता | — | |
| ७२. | कित्ता | — | |
| ७३ | डॉ. भ. ग. कुंटे | स्वातंत्र्यसेनानी चरित्रकोश | खंड ३ पृ. ५४९ |
| ७४. | कित्ता | | पृ. ५३४ |
| ७५. | पं.प. सुमतिबाई शहा | गौरवग्रंथ, सोलापूरच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक अनोखे पान, | पृ. ३७ |
| ७६. | येवले शं. भा. | सोलापूर जिल्ह्याचा स्वातंत्र्य लढा | पूर्वोक्त पृ. ८६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७७. | डॉ. कृ.भि. अंत्रोळीकर | समर्पण : डॉ. अंत्रोळीकर जीवनगाथा | डॉ. कृ.भि. अंत्रोळीकर स्मृतिग्रंथ , १९९०, पृ.५ |
| ७८. | येवले शं. भा. | | उपरोक्त पृ. ८६ |
| ७९. | श्री संतोष शिवाजी हंपे | 'भारतीय स्वातंत्र्यात सोलापुरातील स्त्रीयांचे योगदान' | (शोध निबंध संग्रह), पृ. १९४ |
| ८०. | डॉ. य. दि. फडके | 'सोलापूर मार्शल लॉचा दैदिप्यमान इतिहास' | भाषण : दिनांक ८ मे २००५ स्थळ : हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर. |
| ८१. | डॉ. पुंडे नीलकंठ | 'स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापूरची वृत्तपत्रसृष्टी' | दैनिक लोकमत शुभारंभ अंक, दि.२४ ऑक्टो.१९९३ |
| ८२. | कु. पायल जयभिम बनसोडे | 'हुतात्मा कुर्बान हुसेन : जीवन व कार्य' | अप्रकाशित शोधनिबंध |
| ८३. | प्रा.डॉ.पुंडे नीळकंठ | हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन : कार्य व कर्तृत्व | अक्षय प्रकाशन, पुणे. १९९७ पृ. ४० |
| ८४. | 'गजनफर' | -- | दिनांक २३ ऑगस्ट १९२९ |
| ८५. | 'गजनफर' | -- | दिनांक १५ फेब्रुवारी १९२९ |
| ८६. | 'गजनफर' | -- | दिनांक २२ फेब्रुवारी १९२९ |
| ८७. | 'गजनफर' | -- | दिनांक २२ मार्च १९२९ |
| ८८. | प्रा.डॉ.नीळकंठ पुंडे | हुतात्मा अब्दुल रसूल | अक्षय प्रकाशन, पुणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कुर्बान हुसेन ः कार्य आणि कर्तृत्व | १९९७, पृ. ११५ |
| ८९. | कित्ता | | पृ. १२४ |
| ९०. | कित्ता | | पृ. ६६ |
| ९१. | पुंडे डॉ. नीळकंठ | 'स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापूरची पत्रकारिता' | दैनिक लोकमत शुभारंभ अंक, दिनांक २४ ऑक्टोबर १९९३ |
| ९२. | अंदुरकर व्यं. गो. | सोलापूरचा मार्शल लॉ आणि चार हुतात्मे | पृ. ४९ ते ५२ |
| ९३. | पुंडे डॉ नीलकंठ | मार्शल लॉ आणि सोलापूरचे चार हुतात्मे | सुविद्या प्रकाशन, सोलापूर. प्रथम आवृत्ती मार्च २००९ पृ. ८ |
| ९४. | कित्ता | | पृ. ७ |
| ९५. | अंदुरकर व्यं. गो. | सोलापूरचा मार्शल लॉ आणि चार हुतात्मे | पृ. ५३ |
| ९६. | कित्ता | | पृ. ५७ ते ५९ |
| ९७. | कित्ता | | पृ. १०४ |
| ९८. | बुवा पु. ज. | संपादकीय, 'कर्मयोगी' – स्व. रामभाऊ राजवाडे | जन्मशताब्दी स्मरणिका, दिनांक ७ एप्रिल १९९१ |
| ९९. | डॉ नीलकंठ पुंडे | मार्शल लॉ आणि सोलापूरचे चार हुतात्मे | सुविद्या प्रकाशन, सोलापूर. प्र. आ. मार्च २००९ पृ. १७,१८ व १९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १00. | कित्ता | | पृ. २0 |
| १0१. | कित्ता | | पृ. ३३ |
| १0२. | बुवा पु.ज. | 'कर्मयोगी' – स्व. रामभाऊ राजवाडे | जन्मशताब्दी स्मरणिका, एप्रिल १९९१ प्रस्तावना पृ. ४ |

प्रकरण ५ वे

# ‘कल्पतरू’ आणि ‘सोलापूर समाचार’ चे चिकित्सात्मक टीकात्मक परीक्षण व योगदान

इ.स़.१८१८ नंतर भारतामध्ये एक मन्वंतर घडून आले ब्रिटिशांच्या आगमनाबरोबरच भारताने मध्ययुगातून आधुनिक युगात प्रवेश केला. संपूर्ण भारत राजकीयदृष्टया ब्रिटिशांच्या ताब्यात गेल्यावर येथील समाजाचा पुरोगामी युरोपियन समाजाशी घनिष्ट संवंध आला. त्यांचे आचार विचार, विज्ञाननिष्ठा, त्यांचे तंत्रज्ञान या सर्वांशी तत्कालीन भारतीय समाजाचा अतिशय जवळून परिचय झाला आणि त्याची गडद छाया येथील समाजावर पसरली. युरोपातील समाजप्रबोधनाचे विचार येथे मोठया जोमाने रूजले वृत्तपत्रे हे समाजप्रबोधनाचे अत्यंत महत्वाचे साधन आहे. मुंबई-पुण्याच्या बरोबरीने सोलापूरकरांची सजगता आणि प्रगल्भता वाखाणण्यासारखी आहे. वृत्तपत्राच्या प्रसाराबरोबरच सोलापूरात समाजप्रबोधनाचे व नवविचारांचे वारे वाहू लागते.

कै.अण्णाजी गोविंद इनामदार यांनी सन १८३२ च्या सुमारास ‘कल्पतरू’ व ‘आनंदवृत्त’ ही सप्ताहिके सुरू केली ते मूळचे इंदापूरचे राहणारे ही दोन्ही वृत्तपत्रे चालविण्यासाठी तेथील स्थानिक पुढारी श्री.देशपांडे यांचे सहकार्य त्यांनी घेतले. याच सुमारास वेदाध्ययनी व भिक्षुकी वृत्ती असणाऱ्या काकडे घराण्याशी नीरा नरसिंहपूरच्या सरदार देशपांडे यांचा संवंध आला. त्यांनी काकडे यांना इंदापूराला आणले. तेथे इनामदार व काकडे यांचा स्नेहबंध जुळला. काकडे कुटुंब अतिशय कष्टाळू, प्रामाणिक व व्यवहारी होते. त्यांचे एकंदरीत कर्तृत्व लक्षात घेऊन कै.इनामदार यांनी आपण चालवीत असलेल्या साप्ताहिकाची धुरा त्यांच्याकडे सोपविली. काकडे घराण्याने इनामदारांचा विश्वास सार्थ ठरवीत ही दोन्ही पत्रे दीर्घकाळ चालविली. इ.स.१८६७

मध्ये काकडे घराण्याकडे 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' ची मालकी आली. तेव्हापासूनचे स्थापनावर्ष त्या पत्रावर छापले आहे. पुढे बरोबर १00 वर्षे चालून १९७७ मध्ये हे वृत्तपत्र बंद पडले अन्यथा बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' या वृत्तपत्राच्या बरोबरीने 'कल्पतरू' चे नाव घेतले गेले असते आणि वृत्तपत्रसृष्टीत एक अभूतपूर्व असा इतिहास घडला असता. कारण दर्पण या वृत्तपत्राची स्थापना बाळशास्त्री जांभेकरांनी ६ जानेवारी १८३२ रोजी केली होती.

बळवंत नारायण, श्रीनिवास नारायण व गोविंद नारायण काकडे हे 'कल्पतरू' चे सुरूवातीच्या काळातले संपादक होते. 'कल्पतरू' चालवीत असताना सर्वांनीच कर्तबगारी दाखवली गोविंद नारायण काकडे हे राजकीय क्षेत्राशी संबंधीत होते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे सक्रीय पुढारी म्हणून ते तत्कालात कामगिरी बजावीत होते. राजकीय क्षेत्रामधील संचाराचा त्यांना वृत्तपत्रीय क्षेत्रातही फायदा झाला. सोलापूर जिल्हा व पंचक्रोशीत हे वृत्तपत्र प्रचंड लोकप्रिय झाले व त्याचा खपही वाढला सन १९0७ मध्ये सुरत येथील कॉंग्रेस अधिवेशनात लो.टिळकांचा जहाल गट आणि ना. गोखल्यांचा मवाळ गट असे सरळसरळ दोन तट पडले. काकडे राजकीय पुढारी आणि जहालांची तळी उचलून धरणारे असले तरी हे विचार आपणास पेलू शकणार नाहीत म्हणून 'कल्पतरू' ने मवाळ विचारांची कास धरली. पुढे गोविंदराव काकडे यांनी आपले ज्येष्ठ चिरंजीव लक्ष्मणराव उर्फ तात्यासाहेब काकडे यांच्याकडे 'कल्पतरू' च्या संपादकपदाची जबाबदारी सोपविली. शेवटपर्यंत तेच संपादक होते. साधारणपणे शंभर वर्षे चालून सन १९७७ मध्ये हे वृत्तपत्र बंद पडले.

लो.टिळकांच्या 'केसरी' या वृत्तपत्राच्या स्थापनेच्या अगोदर एक दशक 'कल्पतरू' हे वृत्तपत्र सुरू झाले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात संपूर्ण होत असलेल्या सामाजिक व राजकीय जागृतीचा परिणाम सोलापूर जिल्हा व आसपासच्या प्रदेशावरही उशीरा का होईना पण घडून आला होता. त्याचीच परिणती वृत्तपत्राच्या स्थापनेमध्ये

झाली. वृत्तपत्रे हे समाजजागृत्तीचे एक प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्रीय विचारांमुळे समाज संघटित करता येतो व हे संघटन मजबूतही करता येते. 'कल्पतरू' च्या माध्यमातून प्राधान्याने समाजप्रबोधन अधिक प्रकर्षाने होत होते. त्याचबरोबर नेमस्त राजकीय संकल्पना आणि विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य प्रभावीपणे करीत होते. त्यांच्या राजकीय प्रबोधनाचा धागा हा न्या.रानडे व ना.गोखले यांच्या विचारांशी जुळणारा होता. १९ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि २० व्या शतकाच्या सुरूवातीला भारतीय राजकारणात जहाल व मवाळ विचारसरणी अस्तित्वात होती. अर्थात या दोहोंमध्ये टोकाचा संघर्ष होता. जहालांचे नेतृत्व लो.टिळकांच्याकडे होते तर मवाळांचे नेतृत्व न्या.रानडे व पुढे ना.गोखले यांच्याकडे होते. 'कल्पतरू' चे एकंदरीत धोरण मवाळ अथवा नेमस्तवादी असल्याने साहजिकच सोलापूरातही नेमस्तवादी विचारसरणीचा प्रसार झाला. 'कल्पतरू' चे एका शतकाचे पत्रकारितेचे युग सोलापूरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या पत्रकारितेने अनेक घडामोडींच्याव्दारे भारतातील राजकीय व सामाजिक स्थित्यंतरे पाहिली, अनुभवली त्यानुसार समाजाला दिशा व प्रेरणा दिली. अत्यंत प्रतिकूल अशा सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक परिस्थितीत समाजाच्या जखमा अत्यंत कौशल्याने काही वेळा शस्त्राने तर काही वेळा धाडसाने त्यांनी भरून काढल्या.

तो काळ निरनिराळया राजकीय विचारांचा आणि सामाजिक व आर्थिक सुधारणांचा होता. हे सर्व प्रकारचे विचार 'कल्पतरू' ने जनसामान्यांपर्यंत वेळोवेळी पोहोचविली आणि समाजजागृतीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलला. राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांबरोबरच त्यांनी स्थानिक समस्यांचाही उहापोह केला स्थानिक-राजकीय व सामाजिक, तसेच अन्य विषय वृत्तपत्रामधून वेळोवेळी निःस्पृहपणे मांडले आणि समाजाचे प्रबोधन केले. लो.टिळकांच्यामुळे जहाल विचारसरणीचा बराच बोलबाला असला तरी 'कल्पतरू' कारांची मवाळ वृत्ती, व्यावहारिक स्पष्टता, कष्ट उपसण्याची तयारी आणि आपण स्वीकारलेल्या कामावर मनापासून निष्ठा या स्वभावामुळे त्यांना यश व लोकप्रियता

लाभली. सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर मान करीत सोलापूरसारख्या ठिकाणी हे पत्र इतकी वर्षे चालविले गेले. पण यात काकडे घराण्यातील सर्वच संपादकांनी हे आव्हान पेलले. आपल्या निर्भय लिखाणाने लक्ष्मणराव उर्फ तात्यासाहेब काकडे यांच्यासहित सर्व संपादकांनी 'कल्पतरू' ला एका वेगळयाच उंचीवर नेऊन ठेवले. सोलापूरच्या इतिहासाचा अत्यंत विश्वासू, प्रामाणिक आणि साक्षेपी साक्षीदार असा 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' चा लौकिक होता. त्यामुळे कोणत्याही काळात मराठी सारस्वतात वृत्तपत्रसृष्टीचा विचार आला तर 'कल्पतरू' ला वगळता येणार नाही हे निःसंशय !

'कल्पतरू' कारांनी अनेक सामाजिक संस्था निर्माण केल्या व त्यांचे कार्यही समर्थ पणे चालविले. सोलापूर हे पुणे-मुंबईसारखे मोठे शहर नसून एक मोठे खेडे होते. गिरणगाव असल्यामुळे या ठिकाणी कामगारवर्ग मोठया प्रमाणात होता. त्यामानाने सुशिक्षितांची संख्या खूप कमी होती. काही हाताच्या बोटावर मोजण्याइतके सुशिक्षित होते त्यांनी नेतृत्व केले. डॉ.अंत्रोळीकर, मार्शल जाजू छन्नुसिंग चंदले अशी नेतेमंडळी यामध्ये होती. राष्ट्रीय स्तरावर टिळकादी नेत्यांनी जी कामगिरी केली, तशाच प्रकारची कामगिरी स्थानिक स्तरावर अंत्रोळीकर, जाजू, चंदेले आदी नेत्यांनी केली. त्यांचे विचारही 'कल्पतरू' सारख्या प्रभावी वृत्तपत्र माध्यमातून सामान्यजनांपर्यत पोहोचविले होते. स्वराज्याशिवाय सुराज्य निर्माण होऊ शकत नाही ही लो.टिळकांची स्पष्ट भूमिका होती आणि सुराज्याशिवाय स्वराज्याला अर्थ नाही ही मवाळवाद्यांची भूमिका होती. 'कल्पतरू' कारांनी दुसऱ्या गटास जवळ केले. याचा अर्थ टिळकांच्या विचारांपासून ते दूर गेले असा अर्थ नाही.

सन १८६७ साली बळवंतराव काकडे 'कल्पतरू' व आनंदवृत्त चे संपादक झाले. तेव्हापासून  शेवटपर्यंत काकडे घराण्याकडेच या पत्राचे संपादकत्व होते ही दोन्ही पत्रे व त्यांचा छापखाना सोलापूरातील जुन्या रामाच्या देवळाजवळील एका वाडयात होता. तेथूनच दोन्ही पत्रे निघत असत. पण थोडयाच दिवसांनी बळवंतराव काकडे यांनी नव्या

पेठेतील जागा विकत घेऊन इमरत बांधली आणि सन १८७२ पासून शेवटपर्यंत तिथूनच हे वृत्तपत्र शेवटपर्यंत निघत होते [१] वृत्तपत्र छापण्यासाठी स्वताःची मोठी जागा असावी असे त्यांनी मनाने घेतले होते आणि त्याप्रमाणे त्यांची पावले पडत होती. काही काळातच भाडयाच्या जागेतून स्वतःच्या मोठया जागेत 'कल्पतरू' प्रेस नेला व तेथून वृत्तपत्र काढण्यास सुरूवात केली. त्यामुळे या वृत्तपत्रला एक प्रकारचा भारदस्तपणा आपोआपच प्राप्त झाला. 'कल्पतरू' चे संपादक बळवंतराव काकडे अतिशय महत्त्वाकांक्षी होते. त्यांनी आपला वृत्तपत्रव्यवसाय संपूर्ण महाराष्ट्रात विकसित करण्याचा प्रयत्न केला. विजापूर येथे 'रामदास' साप्तहिक सुरू केले. अनेक ठिकाणी वृत्तपत्रे काढण्याचा त्यांचा विचार होता. पण संपादकीय जबाबदारी पेलणाऱ्या व्यक्तींच्या अभावामुळे त्यांना तो विचार रद्द करावा लागला.[२] 'कल्पतरू' चे शेवटचे संपादक कै.ल.गो.काकडे यांचे बंधू विनायक गोविंद काकडे यांनी आपल्या मुलाखतीत या गोष्टीला दुजोरा दिला.[३] यातून बळवंतरावांचा द्रष्टेपणा दिसून येतो. त्यांची नजर भविष्यकाळावर होती. आजच्या काळात ज्या साखळी वृत्तपत्राचा बोलबाला आहे. पण त्याची रूजवात १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात 'कल्पतरू' करांनी प्रत्यक्ष अंमलात आणण्याच्या दृष्टिने पाऊल टाकले होते. पण त्यांना अशा प्रकारची साखळी वृत्तपत्रे सुरू करणे जमले नाही. 'रामदास' साप्ताहिक लवकरच बंद पडले. वृत्तपत्रांची साखळी निर्माण करण्यात त्यांना अपयश आले. संपादकांचे हे स्वप्न जर प्रत्यक्षात उतरले असते तर कदाचित मराठी वृत्तपत्रांचा इतिहास आणखी वेगळा लिहिला गेला असता.

'कल्पतरू' च्या कार्यकाळात त्याच्यावर अबुनुकसानीच्या फिर्यादी गुरूरण्यात आल्या. शन १८८९ बदनामीची पहिली फिर्याद अक्कलकोटचे दिवाण व कारभारी श्री.विठ्ठल टिकाजी उपलप यांनी दाखल केली परंतु पुढे प्रकरण चिघळू नये म्हणून 'कल्पतरू' चे संपादक बळवंतराव काकडे यांनी थोडा मनाचा मोठेपणा दाखवून जाहीर दिलगिरी व्यक्त केल्याने हे प्रकरण मिटले.[४] पण या प्रकरणामुळे अक्कलकोट संस्थान

आणि 'कल्पतरू' यांचे नाते जणू विळया-भोपळयाचे झाले. संस्थानातील अनेक प्रकरणे बाहेर काढून 'कल्पतरू'ने त्यास प्रसिध्दी दिली. त्यासाठी खास 'अक्कलकोट वार्तापत्र' सुरू केले. त्यामुळे 'कल्पतरू' चा खप खूप वाढला. लोक रांगा लावून अंक खरेदी करू लागले. पण संस्थानी अधिकाऱ्यांची वृत्तपत्रावर खप्पा मर्जी झाली. त्यांनी 'कल्पतरू' ला अक्कलकोटमध्ये प्रवेशबंदी केली. कारण त्यांनी बातमीपत्राचा धसकाच घेतला होता. अक्कलकोटचे गणपती विसर्जन मिरवणूक प्रकरण त्या काळात विशेष गाजले. कारण पूर्वापार चालत आलेल्या रस्त्यावरून मिरवणूक नेऊ देण्यास मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी विरोध केला. तेव्हा मिरवणुकीतील सर्व गणपती तिथेच रस्त्यावर रात्रभर ठेवण्यात आले. गणपतीच्या मुर्तीचे संरक्षण करण्यासाठी संस्थानचे मंत्री आणि पोलिस रात्रभर जागे होते. शेवटी पहाटे सरकारी इतमामाने त्या मिरवणुकीतील सर्व गणपतींचे विसर्जन करण्यात आले. या सर्व घटनेचा निषेध करण्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयाचे तत्कालीन डीन वैद्य श्री.नृसिंह नारायण बागेवाडीकरशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली सभा बोलविण्यात आली.[५] या सर्व घटनेचा तपशीलवार वृत्तांत 'कल्पतरू' ची लोकप्रियता खूप वाढली. 'कल्पतरूच्या' साप्ताहीक अक्कलकोट वार्तापत्रात आपल्याबद्दल काहीबाही छापून तर आले नाही ना अशी सतत धास्ती संस्थानी अधिकाऱ्यांना व मंत्र्याना वाटायची पण 'कल्पतरू' तील अक्कलकोट वार्तापत्राला उत्तर देण्यासाठी संस्थानच्या हाती कोणतेच माध्यम नव्हते. त्यामुळे त्यांनी 'सोलापूर समाचार' या पत्रास हाताशी धरले आणि 'समाचार' व 'कल्पतरू' यांच्यातील उत्तर-प्रतिउत्तर अशी जुगलबंदी सुरू झाली.[६] अशा रीतीने 'कल्पतरू' कार अक्कलकोट संस्थानच्या मागे हात धुऊन लागले. त्यामुळे संस्थानचे अधिकारी, मंत्री बिथरले. त्यांनी त्यांच्यावर शेवटी अब्रुनुकसानीची फिर्याद गुदरली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. शिवाय 'कल्पतरू' अक्कलकोट संस्थानात येऊ नये म्हणूनही खूप प्रयत्न झाले. पण त्याचाही उपयोग झाला नाही. वृत्तपत्रही कायदेशीररीत्या बंद करता येत नव्हते. पण या प्रकरणी संपादकांचे असीम

धैर्य दिसून आले. कोणत्याही दबावाला बळी न पडता त्यांनी अक्कलकोट प्रकरणी सातत्याने लेखन केले आणि त्यांच्या संभवितपणाचा बुरखा टराटरा फाडला.

'कल्पतरू' ने लोकशिक्षणाचे हाती घेतलेले कार्य लक्षणीय होते. हे त्यांचे कार्य दीर्घकाळ अव्याहतपणे चालू होते. लोकांनी पुढे यावे, शिकावे, उद्यमशील व्हावे मुंबई -कलकत्याप्रमाणे सोलापूर हे औद्योगिक शहर व्हावे ही तीव्र इच्छा 'कल्पतरू' कारांमध्ये होती. वृत्तपत्रीय माध्यमाचा हेतूही लोकजागृतीसाठी त्याचा योग्य तो उपयोग करून घेतला. सोलापूर शहरातील लोकांनी सातत्याने एकत्र येऊन चर्चा करावी असे 'कल्पतरू' कारांना वाटत होते. अशा चर्चेसाठी एखादे सार्वजनिक व्यासपीठ किंवा एखादी सार्व जनिक संस्था निर्माण केली जावी असे 'कल्पतरू' कारांना तीव्रतेने वाटत होते. दि. १६ जानेवारी १८७० च्या संपादकीय लेखामध्ये एक आवाहन करण्यात आले की, "शहरातील लोक शिक्षणाच्या बाबतीत तरी पुढारलेले नाहीत आणि उद्योगधंद्याच्या दृष्टीनेही हे शहर पुढारलेले नाही. शिक्षणाचा प्रसारही अगदी नगण्य आहे. म्हणून रयतेच्या शिक्षणासाठी आणि त्यांचे प्रश्न सरकातपर्यंत व्यवस्थित पोहोचविण्यासाठी एखाद्या सार्वजनिक संस्थेची आवश्यकता आहे.[७] म्हणजेच यावरून 'कल्पतरू' कार किती व कसा विचार करीत होते हे समजते. सोलापूरमधील जनसेविषयीची त्यांना किती कळवळ होती हे समजते संपादकीय लेखामुळे लोकजागृती होऊ लागली. शहरातील काही ज्येष्ठ नागरिकांनी अशा सार्वजनिक संस्था स्थापन करण्यासबंधी काही ठोस उपाययोजना सांगितल्या. लोकांचा प्रतिसाद पाहून गरजेनुसार संस्थेचे कामकाज चालावे अला हेतू यामागे होता. याचा परिणाम म्हणून लवकरच 'सोलापूर' सार्वजनिक सभा अस्तित्वात आली. या सभेच्या औपचारीक स्थापनेसाठी शहरातील मान्यवर व्यक्तींना आणि सरकारी अधिदकाऱ्यांना निमंत्रणे पाठविण्यात आली. शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी एखादी संस्था स्थापन करण्याची आहे असा स्पष्ट हेतू बैठकीच्या निमंत्रणपत्रिकेवरही छापण्यात आला होता. या खुल्या सभेला जवळपास ५०० ते ७०० लोक उपस्थित

होते. अण्णाजी गोविंद इनामदार यांनी प्रारंभी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीचा हेतू विशद केला. त्याची आवश्यकताही परवून दिली. त्यानंतर सुप्रसिध्द वकील दिनकर बल्लाळ चक्रदेव आणि श्री.विश्वनाथ नारायण सहस्त्रबुध्दे यांनी अशा सार्वजनिक सभेच्या स्थापनेच्या अण्णाजी गोविंद इनामदार यांच्या प्रस्तावास अनुमोदन दिले. आणि श्री. लक्ष्मण दिनकरशास्त्री शिंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली सभेस सुरूवात झाली. सभेत अनेकानी आपली मते प्रदर्शित केली. पुणे व मुंबईसारख्या शहरात अशी सभा आधीपासूनच काम करत आहे. सोलापुरातही अशी सभा स्थापन व्हावी लोक आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून ही सभा काम करेल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.[८] अशा पध्दतीने 'सोलापूर' सार्वजनिक सभा' अस्तित्वात आली. ही सभा स्थापन होण्यासाठी आणि ती संस्था चायवण्यासाठी जे अनुकूल वातावरण आणि समाजमन तयार करणे गरजेचे असते ते करण्यात 'कल्पतरू' चा वाटा मोठा आहे. वृत्तपत्रांचा सार्व जनिक जीवनाशी थेट संबंध नसतो. पण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जेव्हा माध्यमविषयक कुठल्याच जाणिवा अजून विकसित झालेल्या नव्हत्या त्या काळात 'कल्पतरू' ने बजावलेली भूमिका स्तुत्य अशीच म्हटली पाहिजे.

'कल्पतरू' ने मोठया प्रमाणावर लोकजागृतीचे कार्य केले. सोलापूर जिल्हयाची स्थिती कशी आहे. लोकांची आर्थिक स्थिती कशी सुधारेल, जिल्हयातील शिक्षणांचे प्रमाण कसे वाढेल, व्यापार आणि सरकार यांच्यातील समन्वय कसा राहील व्यापारवृध्दी कशी होईल, महिलांमध्ये जागृती घडविण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत अशा अनेक विषयांवर 'कल्पतरू' ने आपल्या अंकातून सातत्याने विचार मांडून लोकांमध्ये जागृती लिहिले. काही नमुन्यादाखल पुढीलप्रमाणे -

"पूर्वीपासूनच आमचा हा सोलापूर माव व्यापाराचा आगर आहे या जिल्हयात सहा तालुके आहेत. या जिल्हयालगत बहुतकरून मोगलाई काम मेहरवान पार्सनसाहेब सेकंड असिस्टंट कलेक्टर यांचे चार्जात आहे. सांगोले व सोलापूर मुख्य कलेक्टर यांनी

आपल्याकडे ठेविले आहेत व सोलापूर शहर डेप्युटी कलेक्टर यांचे अंमलात आहे. या प्रमाणे कामाची वाटणी झाली आहे. परंतु ज्याप्रमाणे पुणे जिल्हयात वहिवाट चालते त्याप्रमाणे या ठिकाणी चालत नाही. कारण या जिल्हयात बहुतकरून लिंगायत लोकांची वसती आहे. त्यातही ते लोक बहुतकरून व्यापारी आहेत व त्यास विद्या कमीच असते. या योगाने त्या लोकाल आपले महत्त्व किंवा हक्क किंवा सरकारशी कोणत्या रीतीने वागावे हे माहीत नाही. तेव्हा ते लोक बहुतकरून अज्ञानासारखे आहेत यात संशय नाही. पुणे जिल्हयात लोक बहुत करून विव्दान व सुशिक्षित आहेत. त्यायोगाने कायद्याचा अंमल जारी राहतो. या जिल्हयावर विद्येची अवकृपा असल्याने लोक फार अज्ञानात राबतात व नाना तऱ्हेचे अपायही सोसतात. तेव्हा या रयतेस सरकारशी कोणत्या रीतीने वागावे व आपले हक्क व दावे मागावे असे प्रकार समजण्यास असोसिएशन (संस्था) हे एक साधन आहे. तेव्हा आमचे जिल्हयातील लोक जर मदत करतील व एक असोसिएशन स्थापन होईल तर देश सुधारणेचे कारण होईय असे खचित वाटते ."[९]

लेखाचा दुसरा नमुनाही पाहण्यासारखा आहे. "आम्हास खेळावयास व मारावयास मिळाले म्हणजे झाले." या एका लेखात 'कल्पतरू' कारांनी सरकारी नोकरदारांच्या आळशीपणाबद्दल व 'आपण भले आपली नौकरी भली' या मानसिकतेबद्दल अत्यंत उपहासात्मक भाषेत चांगलेच खडसावले होते. "सरकारने दयाळू होऊन आम्हास नोकऱ्या दिल्या आहेत. त्यांच्यासाठी आम्हाला कितीही जरी काबाडकष्ट करावे लागले तरी चालतील. कचेरीतून सात-सात, आठ-आठ तास काम करूनही पुन्हा मोठया उत्साहाने व गर्वाने आमची मंडळी घरी काम आणण्यात व ते करण्यात निमग्न असते. परंतु त्यातल्या त्यात एखाद दुसरा तास खर्च करून काही सार्वजनिक उपयोगी काम करावयास सांगितले की मंडळीच्या कपाळास आठी पडते. इंग्रज सरकारास जणू काय लेखणी अर्पण केली आहे. सरकारी कामाशिवाय इतर कामास टाक लावावयचा नाही व सरकारी कामाशिवाय

दुसऱ्या कामाकडे ढुंकून पहावयाचे नाही असा व दुसरे सरकारचे दास्य याशिवाय जगात आपले दुसरे कर्तव्यकर्मच उरले नाही असे आम्हापैकी बहुतेक नोकरास वाटू लागले आहे असे दिसते. [१०]

उपरोक्त लेखातून 'कल्पतरू' कारांची सोलापूर जिल्हयातील लोकांच्या सर्वागीण प्रगतीबाबतची तळमळ दिसून येते. खायदयाचा अंमल जर व्यवस्थित व्हायचा असेल तर लोक सुशिक्षित व विव्दान व्हायला हवेत. त्यासाठी शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे. लोकांनी एकत्र येऊन चर्चा करण्यासाठी एक असोसिएशन (संस्था) स्थापन व्हावी यावर 'कल्पतरू' कारांनी भर दिला लोकांनी आळस झटकून देशाहिताच्या कामाला लागले पाहिजे. आपल्या बुध्दीचा, कार्यक्षमतेचा, शारीरिक क्षमतेच्या वापर देशहितासाठी केला पाहिजे. स्वदेशप्रीती आणि स्वदेशी वस्तूंचा वापर या गोष्टी आपल्या स्वभावाचा भाग झाल्या पाहिजेत. यासाठी 'कल्पतरू' ने वेळोवेळी लोकांना जागृत केले. 'कल्पतरू' चे हे लोकभिमुख कार्य स्तुत्य व प्रशंसनीय आहे.

'कल्पतरू' च्या सर्व संपादकांनी आपल्या पत्राला अधिकाअधिक लोकभिमुख केले. त्यांना लोकविकासाची व लोकशिक्षणाची आस होतो. सर्वच संपादक त्यातही कै.बळवंतराव काकडे अतिशय महत्त्वाकांक्षी होते आपले वृत्तपत्र अनेक जिल्हयातून निघावे यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. आजच्या साखळी वृत्तपत्रांची संकल्पना त्यांनी त्याकाळी राबविली. अत्यंत चिकाटीने व धडाडीने सलग २३ वर्षे 'कल्पतरू' यशस्वीपणे चालवून सन १८९0 मध्ये ते निधन पावले. [११]

पुढे अनुक्रमे श्री.श्रीनिवासराव व नंतर गोविंदराव यांच्याकडे 'कल्पतरू' च्या संपादकपदाची जबाबदारी आली. श्रीनिवासरावांच्या कारकिर्दीत 'कल्पतरू' ला चांगलेच बाळसे आले. पण त्यांच्या अकाली निधनानंतर गोविंदरावानी आपली महसूल खात्यातील नोकरी सोडली व 'कल्पतरू' ची एकंदर प्रवृत्ती मवाळच होती पण गोविंदरावांच्या स्पष्टवक्तेपणामुळे त्यांच्या काळात या पत्राची एक वेगळी ओळख निर्माण झाली त्यांचा

स्वभाव करारी व बाणेदार होता. लिखाण तिखट व बोचक होते. या काळात संपादकपदी मोहिनीराज रामचंद्र काकडे असे नाव असले तरी प्रत्यक्ष लिखाण गोविंदरावच करीत असत [१२]. कारण ते नावापुरते संपादक होते. पुढे ल.गो. उर्फ तात्यासाहेब काकडे हे प्रदीर्घ काळ संपादक राहिले ते 'कल्पतरू' चे शेवटचे संपादक होते. त्याच्याच काळात 'कल्पतरू' ने शंभरी गाठली. खरे तर मुळात पैसा कमविणे हा हेतूच पत्राच्या जन्माच्या मागे नव्हता. सर्वच संपादक कष्टाळू, प्रामाणिक, करारी, बाणेदार व महत्त्वाकांक्षी होते. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन 'कल्पतरू' ने आपली वाटचाल आरंभिली आणि पूर्ण केली. केवळ सोलापूर आणि देशहिताला समोर ठेऊन आलेल्या सर्व संकटाचा सामना केला. अनेकवेळा बदनामीला सामोरे जावे लागूनही त्याची कधी तमा बाळगली नाही किंवा आपल्या बाणेदारपणाला कधी ओहोटी येऊ दिली नाही. त्यामुळेच 'कल्पतरू' चे कार्य केवळ उल्लेखनीयच नाही तर अमूल्य आहे. वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासामध्ये 'कल्पतरू' चे कार्य बहुमूल्य व चिरंतन असेच आहे. त्याची दखल घेतल्याशिवाय पुढे जाताच येणर नाही.

'कल्पतरू' या वत्तपत्राच्या स्थापनेचे वर्ष सन १८६७ असे छापले आहे. लो.टिळकांच्या 'केसरी' सन १८८२ मध्ये सुरू झाया. याचाच अर्थ 'कल्पतरू' हे वृत्तपत्र 'केसरी' च्या आधी सुरू झालेले आहे. ही गोष्ट उल्लेखनीय असली तरी 'केसरी' राष्ट्रीय स्तरावर जी एक मोठी झेप घेतली आणि लोकप्रियता मिळविली, तेवढया उंचीपर्यत 'कल्पतरू' ला जाता आले नाही. काकडे घराण्यातील सर्व संपादक अतिशय कर्तबगार असले तरी 'कल्पतरू' चा आवाका सोलापूर जिल्हा व पंचक्रोशीपुरता मर्यादित राहिला. एक संपादक गोविंद नारायण काकडे हे राजकीय क्षेत्रात कार्यरत होते. नगरपालिकेच्या राजकारणात रस घेत होते. पण त्या गोष्टीला मर्यादा पडल्या होत्या.

लो.टिळक हे राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. एक काळ त्यांनी संपूर्ण देशाचे नेतृत्व केले. त्यांनी नेहमीच जहालमतवादी राजकारणाचा पुरस्कार केला. त्यांच्या

प्रेरणेने गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव देशभर सुरू झाले. या उत्सवांचा त्यांनी लोकसंघटन करण्यासाठी मोठया हुशारीने उपयोग करून घेतला रासबिहारी घोष, योगी अरविंद अशासारखे अनेक कर्तृत्वात सहकारी त्यांना लाभले. 'कल्पतरू' चे शेवटचे संपादक कै.लक्ष्मणराव काकडे हे टिळकांचे कहर अनुदायी होते. त्यांच्या जहालमतवाद काकडे यांना मान्य होता. पण प्रत्यक्षात 'कल्पतरू' ने नेहमीच मवाळ भूमिका घेतली होती. काकडे आणि 'कल्पतरू' स्थानिक स्तरावर कार्यरत राहिल्याने टिळक व केसरी यांच्याइतकी राष्ट्रीय स्तरावर मोठी झेप घेऊ शकले नाहीत. ते राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या परिघावरच राहीले. 'कल्पतरू' कारांनी सामाजिक संस्था निर्माण करून त्यांचे कार्यही यशस्वीपणे चालविले. परंतु एकही शैक्षणिक संस्था त्यांच्या नावावर नाही. याऊलट डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे संस्थापक टिळक असले तरी पुढे त्यांचा त्या संस्थेशी फारसा संबंध राहिला नाही. पण ही संस्था राष्ट्रिय स्तरावर नाराजली गेली तसेच अनेक नावाजलेल्या राजकीय व सामाजिक संस्थाशी टिळकांचा संबंध होता. याऊलट 'कल्पतरू' कारांचा अशा संस्थाशी संबंध असूनही त्यांचे सगळे कार्य स्थानिक स्तरापर्यंतच मर्यादित राहिले त्याची व्याप्ती कधीही फारशी वाढली नाही. 'कल्पतरू' वृत्तपत्रात येणारे विषयसुध्दा राष्ट्रीय स्तरावरील नव्हते. रोजच्या रोज स्थानिक ताज्या बातम्या वाचकांना देण्यावर 'कल्पतरू' चा भर होता. ते काही राष्ट्रिय पुढारी नव्हते.

सन १९३0 मध्ये सोलापूरला लागू केलेला मार्शल लॉ खूप गाजला. अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची चर्चा झाली. सोलापूरातील वृत्तपत्रांनीही त्या प्रकरणाच्या बातम्या लोकांपर्यत पोहोचविल्या त्यातही 'कर्मयोगी' पत्राने दिलेल्या सविस्तर व परखड बातमीमुळे इंग्रज सरकारने या पत्रावर बंदी आणलीः 'समाचार' व 'कल्पतरू' ने आस्ते कदम भूमिका घेतली. 'कल्पतरू' ची प्रवृत्ती मुळातच मवाळ पण टिळकांच्या 'केसरी' ने मात्र या प्रकरणाची कडक शब्दात हजेरी घेतली. राष्ट्रीय नेत्याचे राष्ट्रीय स्तरावरील हे

वृत्तपत्र असल्यामुळे त्या पत्रात आलेल्या बातमीला व विश्लेषणाला महत्त्व आले होते. पन एकंदरीत केसरीच्या मानाने 'कल्पतरू' हे वृत्तपत्र खुजंच राहिले.

'कल्पतरू' या वृत्तपत्राप्रमाणेच 'सोलापूर समाचार' चेही कार्य अजोड आहे. 'कल्पतरू' नंतर सोलापुरात सुरू झालेले दुसरे साप्ताहिक म्हणून 'सोलापूर समाचार' चा उल्लेख केला जातो. हे साप्ताहिक सुरू करणारे जक्कल घराणे मूळचे अहमदनगरचे ! तेथे आवण्णा लिंगूजी जक्कल यांनी 'नगर समाचार' हे साप्ताहिक सुरू केले. शहाजिकच त्यांचे पुत्र नरसप्पा यांना केवळ साप्ताहिकाचीच नाही तर छापखान्याची इत्थंभूत माहिती व ज्ञान वडिलांकडून मिळाले. कै.आवण्णा यांनी छापखान्याच्या मोठया मशिनरी मागवून सन १८७४ साली 'नगर समाचार' छापण्यास सुरूवात केली. एकंदरीत ३५ वर्ष त्यांनी हे साप्ताहिक चालविले. पण पुढे सरकारी रोषामुळे सन १९१0 मध्ये 'नगर समाचार' बंद पडले. सोलापुरात वृत्तपत्र सुरू करण्याची प्रेरणा कै.नरसप्पा यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाली. कारण वडिलांच्या हाताखालीच त्यांच्यावर संपादकीय संस्कार झाले होते. बराचसा अनुभवही मिळाला होता. त्या अनुभवाच्या जोरावरच त्यांनी सोलापुरात 'समाचर' ची मुहूर्तमेढ रोवली. पुढे ज्या लो.टिळकांच्या 'केसरी' पत्राने मराठी वृत्तपत्रांचे व स्वातंत्र्यचळवळीचेही नेतृत्व केले त्या केसरीच्या जन्मानंतर लगेच योगायोगाने 'समाचार' सुरू झाले. कारण प्रारंभीच्या या काळात टिळकांकडून वा केसरीकडून वृत्तपत्र सुरू करण्याची प्रेरणा मिळावी इतके नरसप्पा जक्कलांचे त्यांच्याशी संबंध आले नव्हते.

सोलापुरात समाचार सुरू होत असताना त्यापूर्वीच येथे 'कल्पतरू' या वृत्तपत्राने चांगलेच बाळसे धरले होते. 'कल्पतरू' शिळाप्रेसवर छापला जात असल्याने तो सुबक आणि वाचनीय टाईपातला होता. "येथे निघत असलेल्या शिळाप्रेसवरील 'कल्पतरू' शी स्पर्धा करता येईल अशा स्वरूपात काहीतरी विशिष्ट पध्दतीने आणि आगळयावेगळया विशेषत्वाने आपल्या पत्राची छपाई टाईपात सुबक आणि वाचकांच्या नजरेत भरण्यासारखी असावी अशी महत्वांकांक्षा बाळगून दि. ३ फेब्रुवारी १८८५ रोजी

'सोलापूर समाचार' हे साप्ताहिक सुरू केले.. [१३] कै.नरसप्पा आबण्णा जक्कल हे या पत्राचे संस्थापक व आद्य संपादक होते. 'समाचार' पुर्वी 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' या साप्ताहिकांमुळे वृत्तपत्र या माध्यमाचा सोलापूरकरांना अनुभव आला होता. समाचारच्या स्थापनेपर्यंत 'कल्पतरू' हे पत्र जनमानसात रूळले होत. आपल्याला येथे टिकून रहवयाचे असेल तर आपल्याला 'कल्पतरू'शी स्पर्धा करावीच लागेल, त्यांच्याइतकेच दर्जेदार स्वरूपा, दर्जेदार लेखल व बातम्या द्याव्या लागतील याची जाणीव 'समाचार' कारांना होती. हे निश्चित! पण समाचार सुरू करीत असताना आधीच सुरू असलेल्या 'कल्पतरू' ची दखल त्यांनी घेतली होती.

जक्कल घराणे अतिशय कर्तृत्ववान होते. ते मूळचे आंध्रप्रदेशातील असून कालौघात उदरनिर्वाहासाठी व कुटुंबाच्या पालनपोषणासाठी महाराष्ट्रात आले. प्रथम शिरूर व नंतर अहमदनगर आणि शेवटी सोलापुरात स्थायिक झाले. या ठिकाणी त्यांनी वृत्तपत्रव्यवसाय सुरू केला. त्याच्या जोडीनेच छापखाना सुरू करून छपाई हा स्वतंत्र व्यवसायही यशस्वीपणे चालविला. छपाईव्यवसायाच्या माध्यमातून व्यावसायिक यशस्वीपणे चालविला. छपाईव्यवसायाच्या माध्यामातून व्यावसायिक कौशल्ये त्यांनाा आत्मसात करता आली. तांत्रिक ज्ञान मिळाले अत्याधुनिक मशिनरी आपल्याकडे असावी यासाठी 'समाचार' कारांनी नेहमीच प्रयत्न केले. द्ययावसायिकाला आणि संपादकीय पूर्वा नुभव यांचा सुरेख मिलाफ 'समाचार' च्या जन्माच्या वेळी झाला होता. त्यामुळे या वृत्तपत्राने आपल्या वाटचालीची शंभरी सहजपणे पार पाडली. त्यापूर्वी या वृत्तपत्राने जेव्हा आपल्या वाटचालीची पन्नास वर्षे पूर्ण केली तेव्हा एक सिल्व्हर ज्युबिली अंक प्रकाशित केला होता. त्यात-

"विशाल तव छत्र तें मजवरी कृपेचे असो |
तुझीच नवचेतना मनमनी प्रभावी असो |
तुझ्याच भजनी तनुं विलीन होऊ दे सर्वदा |

करी हरण आमुच्या विविध त्या प्रभो आपदा |"[१४]

असे प्रभुस्मरण त्या अंकाच्या पहिल्या पानावरच छापले होत. आपल्या व्यावसायिक जीवनाचा प्रारंभ त्यांनी प्रभूच्या स्मरणाने केला. आपल्या वाटचालीतील ५० वर्षाच्या एका ठळक टप्प्यावरही प्रभूचे स्मरण करूनच त्यांनी आपली परमेश्वरभक्ती व्यक्त केली. यातूनच जक्कल घराण्याची धार्मिक वृत्ती दिसून येते. ते जात्याच श्रध्दाळू असल्यामुळे त्यांच्या घरातच श्रीस्ताचे मंदिर होत. कर्नाटकातील हुबळी येथील श्रीसिध्दारूढ महाराज हे या घराण्याचे सद्‍गुरू होते. अशा तऱ्हेने परमेश्वराचा व सद्‍गुरूंचा बरहस्त त्यांना लाभल्यामुळे त्यांनी स्थापन केलेले 'सोलापूर समाचार' हे पत्र जनमानसात रूजले, त्याने खूप लोकप्रियता मिळविली आणि शंभरीसुध्दा गाठली.

कै. नरसप्पा जक्कल या आद्य संपादकांनी 'समाचार' हे वृत्तपत्र सुरू करून २८ वर्षे एकहाती चालविले. प्रस्थापित व लोकप्रिय केले. त्याला चांगले स्थैर्य प्राप्त करून दिले. तसेच छापखानाही सुस्थितीत आणला. त्यासाठी अमाप कष्ट केले. आपल्या मृत्युपूर्वी एक वर्ष आधी म्हणजे दि. २८ एप्रिल १९१३ रोजी आपले ज्येष्ठ चिरंजीव श्री. विठ्ठलराव नरसप्पा जक्कल यांची 'सोलापूर समाचार' च्या संपादकपदी निवड केली.[१५] पुढे दि. २५ सप्टेंबर १९१४ रोजी नरसप्पा जक्कल यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर अनेक पातळीवरून दुखवटा व्यक्त केला गेला. सोलापूरच्या 'कल्पतरू' वृत्तपत्राबरोबरच पुण्यातील लो. टिळकांच्या केसरी या राष्ट्रीय वृत्तपत्रानेही त्यांच्या मृत्युची यथायोग्य दखल घेतली. त्याबरोबरच मुंबई, नगर, सातारा, रत्नागिरी येथील वृत्तपत्रांनीसुध्दा नरसप्पा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. म्हणजेच 'सोलापूर समाचार' हे वृत्तपत्र केवळ सोलापुरातच लोकप्रिय झाले होते असे नव्हे तर त्याची ख्याती अल्पावधीत मुंबइ-पुणे परिसरातही पसरली होती.

कै. नरसप्पा जक्कल यांच्या संपादकत्वाखाली विठ्ठलराव जक्कल यांना वृत्तपत्रीय कामाचा आणि छापखान्याच्या तंत्राचा पिढिजात अनुभव आलेला होता. विठ्ठलरावांनीही

आपल्या महत्त्वाकांक्षी धोरणाने 'समाचार' चा लौकिक अनेक पटींनी वाढविला. या पत्राला लोकभिमुखता आणली सुमारे २३ वर्षे संपादकत्वाची धुरा त्यांनी यशस्वीपणे वाहिली. त्यांनी आपल्या मृदू व गोड बोलण्याने आणि निःष्कपट व शांत स्वभावाने अनेक माणसे जोडली. अफाट लोकसंग्रह जमविला सरकार दरबारी त्यांचे चांगलेच वजन होत. अनेक इंग्रज अधिकारी, पुढारी इ. शी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. याचाच परिणाम म्हणून सरकारने त्यांना सन १९२१ मध्ये 'रावसाहेब' आणि सन १९३२ मध्ये 'रावबहादूर' या पदव्या त्यांना बहाल करण्यात आल्या. कै. विठ्ठलरावांनी वृत्तपत्रव्यवसायाबरोबरच इतरही अनेक कामे केली. काही काळ भागीदारीत कापडव्यवसाय केला. पुढे छापखान्यात केपेझिंग, प्रिंटिंग, बाईंडिंग इ. खामे केली. पुढे वडिलांनी त्यांना नोटिसा लिहिणे, प्रूफे तपासणे, छपाई कामाचे कॉस्टिंग काढणे अशी कामे शिकविली. पण त्या काळात छापखान्यात नोकर चार व मालक दोन अशी परिस्थिती निर्माण झाली. पण हे विठ्ठलरावांच्या उद्योगी स्वभावाला रूचले नाही. त्यांनी वडिलांच्या परवानगीने आणखी अत्याधुनिक मशिनरी आणून छापखान्याचा विस्तार केला. अत्यंत परिश्रमाने त्यांनी बार्शी लाईट रेल्वेची छपाई, तिकीट छपाईच्या कामाचे कंत्राट मिळविले.[१६] रेल्वेच्या कामाचे कंत्राट अत्यंत जोखमीचे होत. पण ते वेळेवर पूर्ण करून देऊन त्यांनी कंपनीचा विश्वास संपादन केला.

व्यावसायिक प्रगतीबरोबरच सामाजिक कामातही विठ्ठलरावांनी लक्ष घातले त्यांना मुळातच लोकहितकारी कामांचा ध्यास होता. त्यांनी आपले वृत्तपत्र तर लोकप्रिय केलेच पण त्याबरोबर ते सामाजिक कामासाठी ओळखले गेले. सन १९३0 च्या मार्शल लॉच्या काळात सा. 'सोलापूर समाचार' च्या जोडीला दैनिक समाचार सुरू करण्यात आला. त्यावेळी झालेल्या गोळीबाराची सविस्तर हकीकत 'कर्मयोगी' साप्ताहिकाने छापली. त्यात भर घालून समाचाराने एक अंक काढला होता. त्याची सर्व छपाई झाली होती. परंतु याबाबतीत सरकार कडक कारवाई करणार अशी गुप्त बातमी कळल्याने समाचाराने ते

सर्व अंक रात्रीतून जाळून टाकण्यात आले. तो अंक समाचाराने प्रसिध्द केला असता तर समचारवरही कडक इलाज होण्याची शक्यता होती.[१७] या मार्शल लॉच्या घटनेच्या निमित्ताने 'सोलापूर समाचार' चे दैनिकात रूपांतर होण्याची नांदी झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पण मार्शल लॉची सविस्तर बातमी देण्याच्या बाबतीत 'समाचार' काराचे धैर्य कमी पडले. त्यांच्या वृत्तपत्रावर येणारे गंडांतर टळले तरीही 'कर्मयोगी' प्रमाणे बाणेदारपणा आणि देशप्रेम त्यांना दाखविता आले नाही. जप्तीची शक्यता लक्षात येताच त्यांनी पाऊल मागे घेतले. ही त्यांच्यामधील मोठी उणीव म्हटली पाहिजेत.

विठ्ठलरावांच्यानंतर त्यांचे बंधु बाबुराव जक्कल हे 'समाचार' च्या संपादकपदी निवडले गेले. टे प्रदिर्घ काळ संपादक राहिले. दि.५ ऑक्टोबर १९३६ पासून पुढे सलग ३६ वर्षे त्यानी संपादक म्हणून काम पाहिले खरे तर त्यांचा मुख्य पिंड समाजसेवकाचाच आपल्या पूर्वीच्या संपादकांपेक्षा काकणभर अधिकच त्यांना समाजसेवेची आवड होती. 'समाचार' या पत्राचा उपयोग त्यांनी सामजिक कार्यासाठी चांगल्या प्रकारे करून घेतला. वृत्तपत्राच्या शक्तीचा समाजकार्यासाठी किती चांगला उपयोग करून घेता येऊ शकतो याचा उत्तम वस्तुपाठ म्हणजे बाबुराव जक्कल यांची संपादकीय कारकिर्द होय. कै.विठ्ठलराव जक्कलांचा पिंड काहीसा सरकारनिष्ठ होता तर बाबुरावांचा ओढा मात्र राष्ट्रभक्तीकडे होता. गांधीजीच्या असहकारितेच्या चळवळीच्या काळात कॉलेजवर बहिष्कार घालण्याचा गांधीजींचा आदेश शिरसावंद्य मानून बाबुराव आपले डेक्कन कॉलेजमधील शिक्षण अर्धवट सोडून सोलापूरला आले. [१८] पण एकाच घरातील हे दोन्ही बंधू भिन्न प्रकृतीचे होते. असे असले तरी दोघांमध्ये कधीही अंतर आले नाही. दोघांच्या नात्याला राम-लक्ष्मणाची उपमा दिली जायची.

'सोलापूर समाचार' ला आधुनिक व आकर्षक रूप देण्यावर संपादकांनी नेहमीच भर दिला. संपादकीय सुत्रे हाती घेतल्यावर बाबुरावांनी बदलत्या लोकभिरूचीचा विचार करून वृत्तपत्राचा ढांचा बदलून टाकला. लोकांना अधिकाधिक उपयुक्त मजकूर देण्यास

सुरूवात केली. आपल्या पत्रात जास्तीत जास्त स्थानिक म्हणजे सोलापूर शहर व जिल्हा मर्यादित ठेऊन अधिकाधिक बातम्या देण्याचा प्रयत्न केला. विविध विषयांवर खाल अंक, तसेच दिवाळी अक काढण्याची प्रथा 'सोलापूर समाचार' मध्ये आणि एकूणच सोलापुरात पहिल्यांदा बाबुराव जक्कलांनी सुरू केली. महाराष्ट्र साहित्य संमेलन सोलापूरात भरविण्यासाठी बाबुरावांचा खूप मोठा वाटा होता. त्याच बरोबरीने जिल्हा साहित्य संमेलने, तालुका संमेलने भरवून जिल्हयातील सर्वसामान्य लोकांमध्ये वृत्तपत्राबरोबरच साहित्याचीही आवड निर्माण केली. शन १९४५ मध्ये सोलापूर येथे कै.दा. वि. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली मराठी पत्रकार परिषद भरती होती. कै.बाबुराव जक्कल हे या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते.[१९] तसेच १९५0 मध्ये भरलेल्या जिल्हा पत्रकार संमेयनाचेही ते स्वागताध्यक्ष होते.

म्हणजेच अनेक वृत्तपत्राच्या संपादकांशी, साहित्यिकांशी, मान्यवर व्यक्तीशी बाबुरावांच्या नुसता संपर्कच नाही तर घनिष्ठ संबंध होता. अनेक प्रकारची सभा, संमेलने, साहित्यपरिषद व पत्रकारपरिषदांचे आयोजन करण्यामध्ये बाबुराव जक्कल निष्णात होते. याचा उपयोग वृत्तपत्राच्या वाढीसाठी व विकासासाठी त्यांनी करून घेतला. 'समाचार' पत्रला प्रांतिक पातळीपर्यत नेण्यासाठी त्यांनी केले. पण तरीही या सर्व प्रयत्नांना मर्यादा पडल्या. 'कल्पतरू' प्रमाणेच 'समाचार' कारही नेमस्त वृत्तीचे होते. मध्यममार्गी होते. त्यांचे सामाजिक कार्य मोलाचे असले तरी राजकीय बाबतीत त्यांना टिळकांसारखी किंवा स्वतंत्रपणे ठोस भूमिका घेता आली नाही. त्यामुळे त्यांनी प्रांतीय पातळीवर वृत्तपत्र नेण्याचा प्रयत्न केला तरी या वृत्तपत्राचे स्वरूप स्थानिकच राहिले. खास करून बाबुरावांच्या स्वभामुळे त्यांच्या राजकीय नेतृत्वाला मर्यादा पडल्या. टिळकांच्या केसरीप्रमाणे समाचाराला उत्तुंग भरारी घेता आली नाही.

खरे तर 'समाचार' ने नेहमीच काळाबरोबर पाऊल टाकले होते.तशी जागरूकता सतत दाखविली होती. दि. १४ नोव्हेंबर १९४९ रोजी प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाची

टेलिप्रिंटरची सर्व्हिस सुरू केली. त्यापूर्वी सन १९३५ मध्ये मुंबईच्या रॉयटर या वृत्तसंस्थेची तारेची सर्व्हिस सुरू केली होती. पण कालौघात ही जागरूकता समाचारकारांना टिकविता आली नाही. आधुनिकीकरणात सातत्य राखता आले नाही. अंतर्गत कलह आणि वाढती स्पर्धा ही त्याची कारणे असावीत. आधुनिकीकरणाला आलेल्या मर्यादेमुळे हे वृत्तपत्र शंभरी गाठून बंद पडले.

'समाचार' कर्ते जक्कल घराणे हे मूळचे आंध्रप्रदेशातील असले तरी पुढे ते महाराष्ट्रात स्थायिक झाले व इथलेच होऊन गेले. मराठी भाषा व संस्कृतीचा आणि त्यांचा संबंध येथे आल्यावरच आला. मातृभाषा तेलुगू असूनही एक मराठी वृत्तपत्र जक्कल घराण्याने सुरू केले आणि ते यशस्वीपणे चालवून आपले मराठीवरील प्रेम व्यक्त केले. येथील मातीशी त्यांची नाळ चांगलीच जुळली होती याचा हा पुरावा आहे. एका अमराठी संपादकाने मराठी वृत्तपत्र चालवून शंभरी पूर्ण केली हे गौरवास्पद आहे.

'सोलापूर समाचार' च्या ५० वर्षाच्या वाटचालीच्या निमित्ताने एक सिल्व्हर ज्युबली अंक प्रकाशित करण्यात आला त्यात सोलापूर जिल्हा व आसपासच्या भागातील महत्त्वाच्या निवडक बातम्यांचे संकलन करण्यात आले. त्या सर्व बातम्यांचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, त्या बातम्या अतिशय रंजक व सामन्य लोकांसाठी अतिशय उपयुक्त अशाच आहेत. उदा:- "१८९७-९८ या सालात सोलापुरात व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्लेगचे थैमान सुरू होते. गावेच्या गावे ओस पडली. लोक परागंदा झाले. त्याचा फटकाही जक्कल घराण्याला बसला. त्यांच्याच घरातील तीन-चार जणांचे अकस्मात मृत्यु झाले. या सर्वांचा परिणाम म्हणून १८९७-९८ या वर्षात काही काळ समाचाराचे प्रकाशतच बंद ठेवावे लागले.[२०]

दुसरा नमुना असा - "सोलापुरात प्रसिध्द असलेल्या म्हशींच्या लांब शिंगांमुळे त्यावेळच्या लहानशा रस्त्यावरून चालणाऱ्या रहदारीस अडथळा होतो."[२१] अशा प्रकारच्या अनेक तक्रारी समाचारात प्रसिध्द झाल्या आहेत. अशा लोकरूचीशी निगडित असलेल्या

बातम्यांमुळे समाचार लोकप्रिय झालाच. शिवाय लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्या काळातील संगीत, विविध कला, नाटक अशा घडामोडींनाही 'समाचार' ने महत्त्वाचे स्थान दिले होते. सन १८८७ साली सोलापूरात 'अण्णासाहेब किर्लोस्कर प्रासादिक सोलापूर संगीत मंडळी' या नावची संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या स्थापनेमध्ये सोलापूरातील अनेक मान्यवरांचा समावेश होता. 'समाचार' सुरू होऊन त्यावेळी जेमतेम दोन वर्षाच्या कालावधी लोटला होता. तरीही या वृत्तपत्राने अशा कला, साहित्य, नाटक या विषयांची लोकांची अभिरूची लक्षात घेऊन या बातम्यांना आपल्या पत्रात स्थान दिले. शन १८८९ मध्ये या प्रासादिक मंडळीच्या पहिला खेळ झाल्याची नोंद 'समाचार' ने घेतली.[२२]

सोलापूरातील आद्य वृत्तपत्र 'कल्पतरू' चेच एक भावंड 'मनोविहार' हे पत्र सन १८८८ मध्ये सुरू झाले. याचीही दखल 'समाचार' ने घेतली. "येथील 'कल्पतरू' छापखान्याच्या व्यवस्थेखाली 'मनोविहार' हे पत्र सुरू झाले. याशिवाय सोलापूरात 'भाला' व 'सोलापूर वृत्त' या नावाची पत्रेही याच काळात निघाली होती."[२३] असा उल्लेख ज्युबिली अंकात करण्यात आला आहे. विविध ज्ञानविस्तार, शिल्पदलाविज्ञान, नाटयकथार्णव, गृहिणी, बालाबेध इ मराठी मासिके या काळात प्रसिध्द होत असल्याचा उल्लेख 'समाचार' ने केला आहे. त्याचप्रमाणे भारतीय सिनेमा दादासाहेब फाळके यांनी सुरू केला असला तरी त्यापूर्वीच्या काळी हालते देखावे गावोगावी दाखविले जात असत. सन १९0४ मध्ये सोलापूरात 'रॉयल कॉरोनेशन सिनेमॅटोग्राफ कंपनी' या नावाच्या एका मंडळीने दिल्ली दरबारचे हालते देखावे दाखविले." [२४] असा उल्लेख 'समाचार' ने केला आहे. म्हणजेच सामाजिक व कलेच्या क्षेत्रात सतत ताज्या बातम्या देत राहून 'समाचाराने' सजगपणा दाखविला. प्रसंगी वेगवेगळया विषयांवर श्वास अंक काढून त्याचा प्रचार केला व लोकांचे लक्ष अनेक प्रकारच्या विषयांकडे वेधले तसेच 'समाचार' कारांनी साहित्य संमेलने, पत्रकार परिषद व इतरही अनेक गोष्टी करण्यात स्वत:

पुढाकार घेतला. मुख्यत या सर्वांसाठी आपल्याकडील वृत्तपत्रीय माध्यामाचा त्यांनी योग्य उपयोग करून घेतला.

धान्याचा अवास्तव साठा करणे आणि तुटवडा निर्माण करून नफा कमावणे ही मनोवृत्ती त्या काळीही होती. १८९६ सालच्या दुष्काळाला अनुसरून 'समाचार' ने व्यापाऱ्यांच्या या अपप्रवृत्तीचाही चांगलाच समाचार घेतला आहे. १८९६ सालातील विविध घटनांचा उल्लेख करताना 'समाचार' ने लिहिले आहे की, "या साली जिल्हयात पाऊस कमी झाला व फायद्याच्या आशेने सोलापूरच्या व्यापाऱ्यांनी धान्याची मोठी खरेदी केल ीव काही व्यापारी सट्टेही खेळू लागले. त्यामुळे धान्याचे भाव वाढले. परंतु त्याचा गरीब लोकांवर विपरीत परिणाम झाला. धान्य लुटल्याची अफवा शहरभर पसरली. हजारो लोक बाजारात उभे राहिले. उत्तर हिंदुस्थानातही या दुष्काळाचा तडाखा या साली जास्त होता. येथील सावरकारांनी व म्यु. ने ५0000/- रू.चा फंड गोळा करून स्वस्त मालाची दुकाने उघडली. यावेळी ज्वारीचा भाव रू.स. ५-६ शेर असा होता. शनिवार दि.७-११-१८९६ रोजी ज्वारी ४ शेर झाली. टेव्हा रविवारी अखेर ढोलके वाजवीत गरीब लोक कलेक्टरच्या बंगल्यावर गेले. १५-१६000 लोक बाजारात जमले धान्य वगैरे मालाच्या लुटालुटीस सुरूवातीस झाली. गुंडया बोरामणी वगैरेंच्या घरावर हल्ला झाला. पोलिसांना गोळीबार करावा लागला. या गोळीबारात तीन इसम मेले व चार-पाच जखमी झाले. या लुटालुटीने सुमारे २९-३0 हजाराचे नुकसान झाले. या प्रकरणमुळे येथील त्यावेळेचे कलेक्टर श्री. देशमुख यांची सोलापूरहून बदली करण्यात आली असे म्हणतात. सोलापूराप्रमाणेच य साली बार्शी, अक्कलकोट, कलबुर्गी या ठिकाणी धान्याची लुटालुट झाली."[२५] या मजकुराव्दारे सामान्य लोकांच्या प्रश्नाला 'समाचार' ने नेहमीच वाचा फोडली आणि आपण त्यांच्या पाठीशी आहोत हे दाखवून दिले. यामुळेच 'समाचार' ला उत्तरोत्तर लोकप्रियता मिळत गेली आणि शंभरीपर्यत

त्याची दमदार वाटचाल झाली. लोकांची नस त्याने ओळखली होती याची हा मतकूर निदर्शक आहे.

याबरोबरच स्त्रीशिक्षणाच्या चळवळीलाही 'समाचर' ने चांगलेच प्रोत्साहन दिले. ज्या व्यक्ती आणि संस्थांच्या माध्यमातून स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न केले जात होते. ते लोकांसमोर आणण्याचे प्रयत्न केले. सन १८६९ च्या आसपास सोलापूर जिल्हयात स्त्रीशिक्षणाची पाळेमुळे रूजू लागली. बार्शी येथे पहिली मुलींची शाळा सुरू झाल्याचा उल्लेख सापडतो. टेथे १७६ मुली शिकत होत्या असा उल्लेख 'समाचार' च्या ज्युबिली अंकात सापडतो. (पृ-१४२) "स्त्रियांना वैद्यकीय ज्ञान देण्यासाठी येथे १८९२ साली स्त्री वैद्यशाळा स्थापन झाली होती. त्यानंतर सौ.लक्ष्मीबाई किर्लोस्करांचे 'सरस्वती मंदिर' सौ. गंगाबाई मडकींचे 'महिला ज्ञान मंदिर, श्री.जवाहरलाल परदेशी यांच्या सुशील पत्नीने चालविलेले 'वनिता ज्ञानप्रसारक मंडळ' इ. संस्था महिलावर्गाच्या उन्नतीसाठी परिश्रम घेत होत्या."[२६] नंतरच्या काळातही स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न अनेक पातळयांवर होत गेले. सोलापूरात मे १९२३ मध्ये पुण्याच्या गोपाळ कृष्ण देवधर यांच्या 'सेवासदन' या संस्थेची शाखा सुरू करण्यात आली. त्याबाबत बातमी देताना 'समाचार' ने म्हटले आहे. की, "हिंदुस्थानातील स्त्रियांची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी निरनिराळया थोर मंडळींनी केलेल्या उपक्रमात श्री.गोपाळ कृष्ण देवधर, सौ.आय.ई., एम.ए.यांनी २५ वर्षा पूर्वी स्थापन केलेल्या सेवासदन संस्थेने अतिशय उत्कृष्ट व पहिल्या प्रतीची कामगिरी केली आहे. श्री.देवधर यांनी पुणे सेवासदन सोसायटीच्या शाखा निरनिरळया ठिकाणी उघडून त्याव्दारे स्त्रियांच्या व विशेषत : विधवा स्त्रियांच्या शिक्षणाची व निरनिराळया तऱ्हेने समाजकार्य करण्यास योग्य अशी कामे चालू केली आहेत. अशा प्रकारची एक शाखा सोलापूर शहरी सन १९२३ मे मध्ये स्थापन झाली."[२७]

राज राममोहन रॉय यांच्यापासून अनेक समाजसुधारकांनी अव्वल इंग्रजीत स्त्रीशिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन केले होते. त्यामुळे अनेक ठिकाणी त्यादृष्टीने कृती

करण्यास सुरूवात झाली होती. वृत्तपत्रे व व्याख्यानाव्दारे स्त्रीशिक्षणाचा प्रचारही सुरू होता हे लोण सोलापूरपर्यंत येऊन पोहोचले होते. काळाची ही हाक लक्षात घेऊन 'समाचार' कारांनी त्यासंबंधीच्या बातम्या सतत आपल्या वाचकांपर्यत पोहोचविल्या आणि आपले पुरोगामित्व सिध्द केले.

अर्थात 'समाचार' कारांचा या शिक्षणकार्यात प्रत्यक्ष सहभाग नव्हता संपादकांचा कल सुधारकी वृत्तीकडे असला तरी त्यांनी स्वत: कधी कुठली संस्था स्थापन केली नाही. स्त्रीशिक्षणविषयक विचारांना पाठिंबा देऊन त्याला आपल्या वृत्तपत्रातून ठळक प्रसिध्दी दिली. 'समाचार' कारांचा पिंड समाजसेवकाचा असला तरी महर्षी कर्वे, रमाबाई रानडे वा अन्य काही समाजसुधारकांप्रमाणे त्यांनी एखादी संस्था स्थापन केली नाही. कारण तो त्यांचा पिंड नव्हता. पण त्यासंबंधीच्या बातम्या लोकांपर्यत पोहोचवून त्यांनी लोकजागृती केली. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या सौ.लक्ष्मीबाई देशमुख, सौ.लक्ष्मीबाई किर्लोस्कर, सौ.बनुबाई देशपांडे, सौ.गंगाबाई मडकी, सौ.भसव्वाबाई वारद, सौ.पार्वतीबाई देगावकर इ. मंहिला कार्यकर्त्यांना व त्यांच्या कार्याला 'समाचार' ने प्रसिध्दी दिली. कृतिशिलतेपेक्षा एक प्रसारमाध्यम म्हणून 'समाचार' ने आपली भूमिका चोख बजावली.

'सोलापूर समाचार' कारांनी केवळ वृत्तपत्रच चालविले नाही तर नवनवीन पत्रकार निर्माण केले. पत्रकारांची जडणघडण केली. ती पत्रकारांची प्रशिक्षण संस्थाच होती. पत्रकारिता कशी असावी, ती कशी करावी याविषयी समाचाराच्या पुढाकाराने वेळोवेळी कार्यशाळा घेतल्या गेल्या. यथावकाश साप्ताहिक समाचाराचे दैनिक समाचारामध्ये रूपांतर झाले. अशा रीतीने समाचार वाढत असताना त्यांनी मुनष्यबळही वाढविले. नंतरच्या काळात नावारूपाला आलेले अनेक पत्रकार, अनेक दैनिकांचे नावाजलेले संपादक यांनी आपल्या कारकिर्दीची सुरूवात समाचारमध्येच केली. सोलपुरातील अनेक नामंकित पत्रकारांनी पत्रकारितेचे धडे सुरूवातीला समाचारमध्येच गिरविले. एका अर्थाने

'समाचार' हे पत्र पत्रकारांसाठी प्रत्यक्ष अनुभव देणारी कार्यशाळा होती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

साप्ताहिक समाचार दैनिक स्वरूपात आल्यानंतर दैनिकास लागणारी एक परिपूर्ण व्यवस्था तयार करण्यात आली. उपसंपादक, वृत्तसंपादक इ. जागांवर माणसे नेमली गेली. अशा तऱ्हेने सोलापूरातून प्रकाशित होणारे 'समाचार' हे पहिले दैनिक पत्र ठरले. यामुळे सोलापूरातील पत्रकारांना एक नवे व्यासपिठ मिळाले. वृत्तपत्रीय व्यवस्थापनाच्या विविध अंगांच्या अनुभव देणारी संस्था म्हणून 'समाचार' च्या कामाचे मोल मोठे आहे यात शंका नाही. दैनिक स्वरूपातील प्रकाशनामुळे समाजातील अनेक छोठया-मोठया घडामोडींना वृत्तपत्रात स्थान मिळाले. १९३६ ते १९४७ हा काळ विशेष घडामोडींचा होता. स्वातंत्र्यसूर्य समीप येत होता. या काळात राजकीय, सामाजिक व स्थानिक पातळीवरील घडामोडी वाढल्या होत्या. नेमक्या अशा काळात 'समाचार दैनिक स्वरूपात निघू लागल्याने अनेक प्रकारच्या घटना बातम्यांच्या स्वरूपात लोकांपर्यत पोहोचविणे शक्य झाले. त्या त्या घटनांना पुरेशी जागा देता आली. त्यामुळे लोकांमध्येही जागृती होऊ शकली.

'कल्पतरू' हे सोलापूरातील जागृती होऊ शकली तर समाचार हे दुसरे साप्ताहिक होते. काही कालावधीनंतर 'समाचार' हे वृत्तपत्र दैनिक स्वरूपात निघू लागल्याने ते सोलापूर जिल्हयातले पहिले दैनिक ठरले. सोलपूर हे बहुभाषिक शहर आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशाच्या सीमावर्ती भागात असल्याने तिन्ही राज्यांच्या संस्कृतीचा संगम इथे झालेला आहे. निजामी राजवटीच्या शेजारचा जिल्हा म्हणून निजामी संस्कृती आणि वातावरणाचही परिणाम सोलापूरवर झालेला होता. त्यामुळे उर्दु भाषिकांचे प्रमाणही येथे जास्त आहे. असे असले तरीही दोन्ही मराठी पत्रांनी येथे शतकी वाटचाल केली. येथील समाज बहुभाषिक असला तरी तो सहिष्णू आहे. एकमेकात मिळून-मिसळून राहणारा आहे. म्हणूनच दोन्ही पत्रे मराठी असुनही त्यांनी या बहुभाषिक समाजमनावर

राज्य केले होते. या दोन्ही पत्रांना समाजमान्याता मिळाली होती. समाजाच्या जडणघडणीवरही या पत्रांचा प्रभाव पडला होता.

राष्ट्रीय प्रांतिक आणि स्थानिक स्तरावरील राजकीय घडामोडी आणि त्याबरोबरच तत्कालीन सामाजिक घडामोडीचे पडसाद दोन्ही पत्रातून उमटत होते. दोन्ही वृत्तपत्राचे संपादकत्व अनुक्रमे काकडे व जक्कल घराण्याकडे होते ते वारसापध्दतीने आले असले तरी सर्वच संपादक कर्तृत्ववान होते. या प्रत्येक संपादकाने आपापल्या कर्तृत्वाचा ठसा पत्रावर उमटविला. आपापल्या पत्राांना अधिकाधिक लोकभिमुख करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी आपपल्या पत्रांना एका आगळया उंचीवर नेऊन ठेवले. कर्तृत्ववान संपादकाच्या तीन-चार पिढया या वृत्तपत्रांना लाभल्या हे विशेष !

वृत्तपत्राच्या समाजाभिमुखतेबरोबर समाताभिमुखता असलेल्या संपादक लाभणे हेही या दोन वृत्तपत्रांच्या बाबतीनले साम्यस्थळ सांगता येईल. 'समाचार' च्या आधी 'कल्पतरू' हे वृत्तपत्र सुरू झाले. 'कल्पतरू' ने सर्वप्रथम स्वातंत्र्यचळवळीचे आणि समाजप्रबोधनाचे महत्त्व जाणून लेखन करण्यास सुरूवात केली. 'कल्पतरू' कारांनी स्वत: पदरमोड करून एका विशिष्ट ध्येयाने वृत्तपत्र चालविले. त्यांच्यापासुन प्रेरणा घेऊन इतर काही वृत्तपत्रे सोलापूरात सुरू झाली. त्यांनीही स्वांतरत्र्यचळवळीसाठी लोकजागृती करण्यास सुरूवात केली. बातम्या व लेखांच्या माध्यमातून स्वातंत्र्यचळवळ लोकांपर्यत पोहोचविण्याचे महत्कार्य 'कल्पतरू' आणि 'समाचार' या दोन पत्रांनी केले.

असे असले तरी 'कल्पतरू' कार आणि 'समाचार' कार केवळ वृत्तपत्र चालविण्यात यशस्वी झाले. दोन्ही पत्रांचे संपादक नेमस्त होते. मध्यममार्गी होते. त्यामुळे वृत्तपत्रातून बातम्या व लेख तोलून-मापून दिले जात. टिळकांच्या 'केसरी' ने इंग्रज सरकारवर आसूड ओढले. झहालमतवाद स्वीकारून कडक टीका केली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रियता मिळविली. ही गोष्ट सोलापुरातील वृत्तपत्रांना जमली नाही. सन १९३0 च्या मार्शला लॉच्या काळात हे दिसून आले. यावेळी झालेल्या

गोळीबारानंतर दोन्ही वृत्तपत्रांनी धैर्याने परखड भूमिका घेतली नाही. 'समाचार' ने तर सरकारी जप्तीमुळे आदल्या रात्री 'समाचार' चे अंक जाळून टाकले सोलापूरातील 'कर्म योगी' या वृत्तपत्राने मात्र कणखर भूमिका घेऊन धैर्याने मार्शल लॉच्या वेळी झालेल्या गोळीबाराच्या वृतांत छापला व ते सरकारी जप्तीला सामोरे गेले. टिळकांच्या केसरीनेही याबाबत परखड धोरन स्वीकारून इंग्रज सरकारच्या कडक निषेध केला. त्यामुळे एकंदरीत 'कल्पतरू' व 'समाचार' या वृत्तपत्रांना 'केसरी' इतकी ऊत्तुंग झेप घेता आली नाही . ही वृत्तपत्रे म्हणुनच ओळखली गेली. अफाट लोकप्रियता मिळून आणि शंभरी साजरी करूनही त्यांच्यामध्ये राजकीय नेतृत्वाबद्दलची उणीव कायम राहिली. 'समाचार' ने शंभरी पूर्ण केली तरी अंतर्गत कलहामुळे कै.बाबुरावांना समाचार सोडावा लागला होता. याऊलट केसरी आजही दिमाखाने वाटचाल करीत आहे.

ब्रिटिशांच्या भारतातील आगमनाबरोबरच येथील समाजाने मध्ययुगातून आधुनिक युगात प्रवेश केला. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, त्याचप्रमाणे सामाजिक व राजकीय सुधारणांचा प्रसार ब्रिटिश अमलाबरोबरच येथे आपसूक होत गेला. समाजाच्या विचाराची दिशा बदलणाच्या व समाजजीवन ढवळून काढणाऱ्या वृत्तपत्रीय माध्यमाचा युरोपीय प्रभावाने येथे जोमाने प्रसार झाल. कलकत्ता, मद्रास, मुंबई, पुणे आदी अनेक ठिकाणी वृत्तपत्रे सुरू झाली. समाजप्रबोधनाची एकच लाट देशभर उसळली. अर्थात या घटनेला तत्कालातील सामाजिक व आर्थिक व राजकीय परिवर्तन कारणीभूत होते. त्यामुळेच मुंबई-पुण्याच्या तुलनेने छोटे शहर असलेल्या सोलापूरमध्येही वृत्तपत्रनिर्मितीची पार्श्वभूमी तयार झाली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात 'कल्पतरू' आणि सन १८६७ मध्ये हे वृत्तपत्र स्थापन झाले. मुळात हे वृत्तपत्र कै.इनामदार यांनी इंदापूर येथे सुरू केले. पूढे त्यांचा काकडे घराण्याशी सवंध आल्यानंतर त्यांनी हे वृत्तपत्र आपल्या पश्चात काकडे घराण्याकडे सोपविले. काकडे घराण्यातील पुरूषांची कष्टाळू आणि प्रामाणिक वृत्ती पाहून आपले वृत्तपत्र भविष्यात व्यवस्थित चालविण्यास ते योग्य आहेत असे

इनामदारांच्या मनाने घेतले आणि आपल्या वृत्तपत्राची मालकी त्यांच्याकडे सोपविली काही काळानंतर काकडे घराण्यातील व्यक्तींनी इंदापूरहून सोलापूरला स्थलांतर केले. लवकरच त्यांनी तेथे 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' चा श्रीगणेशा केला.

काकडे घराण्यातील बळवंतराव काकडे हे अत्यंत महत्त्वाकांक्षी होते. सोलापूरात येऊन त्यांनी 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' ही पत्रे सुरू केली आणि अल्पावधीतच ती लोकप्रिय केली. सोलापूर जिल्हा व आसपासच्या भागात या पत्रांचा जोमाने प्रसार झाला. हे पत्र पुढे जवळजवळ शंभर वर्षे टिकले. नंतर बंद पडले तरी त्याचे सोलापुरच्या राजकीय व सामाजीक क्षेत्रातील योगदान कदापि विसरता येणार नाही.

बळवंतराव काकडे महात्त्वाकांक्षी असल्यामुळे त्यांनी 'कल्पतरू' बरोबरच विजापूर येथून 'रामदास' नावाचे साप्ताहिक सुरू केले. प्रत्येक जिल्हयात एक वृत्तपत्र सुरू करण्याचा त्यांचा विचार होता. काही कारणाने तो तडीस गेला नाही. पण साखळी वृत्तपत्राची आजची कल्पना त्यांनी शंभर वर्षापूर्वीच अंमलात आणण्याचा प्रयत्न केला होता हे उल्लेखनीय आहे. ते प्रामाणिक, कष्टाळू आणि अतिशय व्यवहारकुशल होते म्हणूनच त्यांनी असा प्रयत्न केला.

एक काळ असा होता की त्या काळातील माणसे पराकोटीच्या ध्येयवादाने भारलेली होती. त्यामुळे साहजिकच जी जी वृत्तपत्रे सुरू झाली त्यांना काहीएक वैचारिक पाया, वैचारिक मूल्य आणि तत्त्वे होती. कितीही संकटे आली तरी ती त्यापासून तसुभरही ढळली नाहीत. 'कल्पतरू' हे वृत्तपत्र अशाच वृत्तपत्रांचे प्रतिनिधित्व करीत होते. वृत्तपत्राव्दारे त्यांनी दिलेले वैचारिक योगदान न विसरता येण्याजोगे आहे. या वृत्तपत्राच्या सर्वच संपादकांनी ताठ बाण्याने वृत्तपत्र चालविले. अक्कलकोट प्रकरणी 'कल्पतरू' वर अबुनुकसानीचा खटला दाखल झाला तरी संपादक डगमगले नाहीत. त्यांनी बदनामीच्या खटल्याला धीराने तोंड दिले.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर पुढची काही वर्षे मवाळ आणि जहाल विचारसरणीचा राजकारणामध्ये पगडा होता. 'कल्पतरू' कारांनी मवाळवादी विचारसरणीची कास धरली होती. त्या काळात टिळकांच्या जहालवादी विचारसरणीचा समाजमानसावर मोठा पगडा असूनही आपल्या वृत्तपत्रातून मवाळवादी दृष्टिकोनाचा प्रसार करण्यात व तो विचार जनेच्या मनावर ठसविण्यात संपादक यशस्वी झाले. 'कल्पतरू' ची उत्तरेत्तर वाढत गेलेली लोकप्रियता हा त्याचाच परिणाम होत. स्वातंत्र्यपूर्व चळवळीतले हे त्यांचे एक मोठेच योगदान मानावे लागेल.

वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे कार्य प्रभावीपणे होत असते. 'कल्पतरू'ने ते निष्ठेने केले. हे काम वृत्तपत्राच्या स्थापनेपासून अव्याहतपणे चालू होते. सोलापूर जिल्हा व आसपासच्या भागातील जनमानसाचे त्यांनी जाणीवपूर्वक राजकीय व सामाजिक शिक्षण केले. सातत्याने अनेक प्रकारच्या बातम्या सविस्तरपणे लोकांपर्यत पोहोचविण्याचा वसा घेतला होता. तो त्यांनी शेवटपर्यंत पार पाडला. लोकशिक्षणाबरोबरच 'कल्पतरू' ने उद्योगशिक्षणाचाही वसा हाती घेतला. सोलापूरकरांना उद्योगधंद्याचे शिक्षण देण्यासाठी 'कल्पतरू' कारांनी पुढाकार घेतला सोलापूर हे मुंबई-पुण्याइतके पुढारलेले मोठे शहर नव्हे. या ठिकाणी सामाजिक व राजकीय नेतृत्व निर्माण झाले. फोफावले विचारांचा जोमाने प्रसार झाल. पण नुसतेच विचारांवर न थांबता 'कल्पतरू' कारांनी कृतिशीलता दाखविली मुंबई-कलदत्याप्रमाणे सोलापूर हेही एक औद्योगिक शहर व्हावे असा ध्यास त्यांनी घेतला होता. त्या दिशेने त्यांचे प्रयत्न चालू होते. या ठिकाणी शिक्षणाचा प्रसार नगण्य होता. त्यामुळे रयतेच्या शिक्षणासाठी आणि त्यांचे प्रश्न सराकारपर्यंत पोहोचविण्यासाठी 'सोलापूर सार्वजनिक सभा' अस्तित्वात आली. म्हणजेच शिक्षण व उद्योग या दोन आघाडयांवरील 'कल्पतरू' चे योगदान उल्लेखनीय आहे.

'कल्पतरू' ने लोकजागृतीचे कार्यही मोठया जोमाने आणि हिरिरीने केल. वृत्तपत्रसारखे प्रभावी माध्यम त्यांच्याजवळ होते. त्याचा योग्य तो उपयोग त्यांनी केला.

कारण सोलापूर जिल्हयाची सर्वांगीण प्रगती व्हावी असे 'कल्पतरू' कारांना तीव्रतेने वाटत होते. सर्वांगीण लोकाजागृतीच्या दृष्टीने त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून अथक प्रयत्न केले. जनतेमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढावे. लोकांनी एकत्र यावे चर्चा, विचारविनिमय करावा. लोकांनी आळस झटकून देशहिताच्या कामाला लागले पाहिजे. सातत्याने याच गोष्टीचा विचार केला गेला पाहिजे. तसेच आपल्या बुध्दीचा, कार्यक्षमतेचा, शारिरीक क्षमतेचा, देशहितासाठी वापर केला पाहिजे. असे विचार 'कल्पतरू' कारांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रभावीपणे रूजविले. तसेच स्वदेशाविषयी प्रेम, स्वदेशी वस्तूंचा कटाक्षाने वापर या गोष्टी आपल्या स्वभावाचा भाग झाल्या पाहिजेत असेही त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. अशा प्रकारचे विचार सातत्याने समाजात रूजविण्याची कामगिरी त्यांनी केली. हे त्यांचे योगदान लक्षणीय आहे.

काकडे घराण्याची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे त्यांनी 'कल्पतरू' हे वृत्तपत्र अल्पवधीत अधिकाधिक लोकभिमुख केले. वृत्तपत्र चालवीत असताना जनतेचे प्रबोधन करण्यासाठी जनतेच्या जवळ जाण्याची गरज होती. जनमानस ओळखून त्यावरहुकूम धोरण ठरविणे आणि वृत्तपत्रामधून सतत पाठपुरावा करीत राहणे ही 'कल्पतरू' कारांची खासियत होती. त्यांनी नेहमीच लोकांच्या जिव्हाळयाचे प्रश्न मांडले. त्यामुळे वृत्तपत्र खूप लोकप्रिय झाले. म्हणजेच समाजमानसाची नाडी त्यांना नेमकेपणाने गवसली होती असेच म्हणावे लागेल. एकंदरीत 'कल्पतरू' हे वृत्तपत्र अधिकाधिक लोकभिमुख करण्यात सर्वच संपादकांनी महत्त्वाचे योगदान दिले.

'कल्पतरू' या वृत्तपत्राचे सर्वच संपादक वृत्तीने मवाळ अथवा नेमस्त होते. त्यामुळे साहजिकच त्यांच्या वृत्तपत्रातून सर्व प्रकारचे विचार अतिशय संयतणे मांडले जात. १९व्या शतकाच्या शेवटी आणि २0 व्या शतकाच्या सुरूवातीला लो. टिळकांच्या जहालमतवादी विचारांचा देशभर बोलबाला होता. लक्ष्मणराव काकडे हे टिळकांचे कट्टर अनुयायी होते. पण तरीही वृत्तपत्रीय लिखाणामधून मवाळवादी विचारसरणी नेहमीच

डोकावत राहिली. मुख्य म्हणजे सर्वसमावेशक बातम्या, सामान्य वाचकांच्या हिताला प्राधान्य देण्याची वृत्ती आणि सातत्याने लोकहिताचा विचार यामुळे 'कल्पतरू' ला व्यापक जनाधर लाभला. सर्व संपादकांमध्ये ल.गो. काकडे हे सर्वश्रेष्ठ संपादक म्हणावे लागतील. इतर संपादकांपेक्षाही त्यांच्या काळात 'कल्पतरू' चा खप वाढला. या वृत्तपत्राने त्यांच्याच काळात शंभरी साजरी केली. त्यांची वैयक्तिक लोकप्रियता आणि जनसंपर्कही खूप मोठा होता. त्यांनी नेमस्तपणाबरोबच पक्षनिरपेक्ष भूमिका घेतली होती. सर्वच पक्षाने जे जे चांगले आहे त्यास त्यांनी पाठिंबा दिला. प्रोत्साहन दिले. मुळात पैसा कमावणे हा हेतूच नसल्यामूळे सेवाभावी वृत्तीने हे वृत्तपत्र संपादकांकडून चालविले गेले. घडलेली प्रत्येक महत्वाची घटना ही लगेच वाचकांच्यापर्यंत पोहोचविली जात असे. आठवडाभरातील घटनांचे एक वार्तापत्र आठवडयाच्या शेवटी दिले जाई. अक्कलकोट प्रकरण असो. मार्शल लॉ प्रकरण असो किंवा अन्य कुठल्याही प्रकारच्या बातम्या लगेच नेमकेपणाने वाचकांपर्यंत पोहोचविल्या जात. त्यामुळे हे वृत्तपत्र दीर्घकाळ टिकण्यात संपादक ल.गो. काकडे यांचे मोठे योगदान राहिले आहे.

'सोलापूर समाचार' या नावाने प्रसिध्द असणारे हे वृत्तपत्र 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' चे समकालीन 'कल्पतरू' नंतर काही वर्षांनी म्हणजे सन १८८५ मध्ये य वृत्तपत्राची मुहूर्तमेढ सोलापूरात रोवली गेली. काकडे घराण्याप्रमाणेच सोलापूरात झालेल्या जक्कल घराण्याने हे वृत्तपत्र यशस्वीपणे चालविले आवण्णा लिंगूजी जक्कल, नरसप्पा आवण्णा जक्कल, विठ्ठलराव व बाबुराव जक्कल इ. संपादक या वृत्तपत्राला लाभले. त्यांच्यामुळे हे वृत्तपत्र अल्पावधीत लोकप्रिय झाले व त्याचा खपही वाढला. 'कल्पतरू' प्रमाणेच 'सोलापूर समाचार' नेही ताज्या बातम्या, खुसखुशीत सदरे इ.व्दारे जनमानसात स्थान मिळविले आणि आपली शंभरी साजरी केली.

वृत्तपत्राची छपाई सुबक होणे आणि ते वाचकांच्या नजरेत भरणे अशी महत्त्वाकांक्षा बाळगून 'समाचार' हे वृत्तपत्र सोलापूरात सुरू झाले. त्यापूर्वीच सोलापूरात

'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' ही साप्ताहिके होती व जनमानसात खूप लोकप्रिय होती. अशा प्रस्थापित साप्ताहिकाच्या बरोबरीन आपल्याला उभे रहायचे आहे व टिकून रहायचे आहे याची जाणीव समाचारकारांना होती.

जक्कल घराणे हेही काकडे घराण्याइतकेच कतृत्वात घराणे होते. 'सोलापूर समाचार' पूर्वी या घराण्याचे 'नगर समाचार' या नावाचे एक साप्ताहिक होते. पण कालौघात ते बंद पडल्यामुळे या घराण्यातील पुरूषांची सोलापूरला आले व येथे त्यांनी साप्ताहिक सुरू केले. या घराण्यातची सर्वात जमेची बाजू म्हणजे छापखाना चालविण्याचा अनुभव त्यांना घरातूनच मिळाला होता. त्यामुळे छापखान्यातील आधुनिक यंत्रसामग्री आपल्याकडे वेळोवेळी कशी येईल हे सर्वच संपादकांनी नेहमीच पाहिले आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने 'समाचार' ला वेळोवेळी प्रगत अवस्थेत ठेवले. संपादकीय पूर्वानुभव जक्कल घराण्याला होता. पण त्याचबरोबर त्यांनी त्याला व्यावसायिकतेची जोड दिली होती. म्हणूनच ते वृत्तपत्रव्यवसायात यशस्वी झाले आणि 'समाचार' ने सहज शंभरी गाठली.

'सोलापूर समाचार' ला आधुनिक व आकर्षक रूप देण्याचा प्रयत्न संपादकांनी नेहमीच केला. विशेषत संपादक बाबुराव जक्कल यांनी वृत्तपत्राचे स्वरूप बदलण्यांमध्ये बरेच योगदान दिले. नेहमीच ताज्या बातम्या देण्याचे धोरण 'समाचार' ने ठेवले होते. राष्ट्रीय बातम्यांच्याऐवजी जास्तीत जास्त स्थानिक बातम्या देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सोलापूर शहर व जिल्हा असे आपले मर्यादित क्षेत्र त्यांनी ठेवले होते. विविध विषयांवर खास अंक काढण्याची प्रथा आपल्या वृत्तपत्राव्दारे त्यांनी सोलापूरात प्रथमच सुरू केली. त्याचबरोबर 'समाचार' कारांनी महाराष्ट्र साहित्य संमेलन सोलापुरात भरविले त्याचबरोबर जिल्हा व तालुका संमेलने भरवून जिल्हयातील सर्वसामान्य लोकांमध्ये वृत्तपत्रवचबरोबरच साहित्याचीही आवड निर्माण केली. संपादक बाबुराव जक्कल यांची इतर वृत्तपत्रांच्या संपादकांशी व साहित्याकांशीही जिव्हाळयाचे संबंध होते मान्यवर साहित्यिकांचे व

विव्दानांचे लेख, तसेच खास दिवाळी अंक काढणाबरोबरच आपले वृत्तपत्र तंत्रदृष्टया उत्तम असावे, काळाबरोबर असावे असा ध्यास त्यांनी घेतला होता. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून त्यांनी सन १९३५ मध्ये मुंबईच्या 'रॉयटर' या वृत्तसंस्थेची तारेची सर्व्हिस सुरू केली. पुढे सन १९४९ मध्ये त्यांनी 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया' ची टेलिप्रिंटरची सर्व्हिस सुरू केल. अशा तऱ्हेने काळाच्या बरोबर राहण्याचे व्रत 'समाचार' ने घेतले होते.

खरे पाहता जक्कल घराणे मूळ आंध्रप्रदेशातील ! त्यांची मातृभाषा तेलुगू असली तरी महाराष्ट्रात स्थलांतर केल्यानंतर त्यांनी मराठी भाषा व मराठी संस्कृती आत्मसात कोली. 'सोलापूर समाचार' सारखे मराठी वृत्तपत्र काढून ते दीर्घकाळ यशस्वीपणे चालविले कारण त्यांची नाळ मराठी मातीशी जुळली होती. त्याचवेळी वृत्तपत्र चालविताना स्थानिक बातम्यांना प्राधान्य आणि स्थानिक सामाजिक व राजकीय घडामोडींचे अत्यंत वास्तववादी व सकारात्मक विश्येषण करण्याचे पथ्य कसोशीने पााळेल.

'सोलापूर समाचार' ला ५0 वर्षे पूर्ण झाली तेव्हा म्हणजे सन १९३६ मध्ये एक सिल्व्हर ज्युबिली अंक प्रकाशित करण्यात आला. या अंकामध्ये जक्कल घराण्याचा समग्र इतिहास देण्यात आला आहे. त्याबरोबरच सोलपूरचाही इतिहास देण्यात आला आहे. तसेच सोलपूरातील मंदिरे, इमारती, किल्ला आदींची माहिती देण्यात आली आहे. अक्कलकोट संस्थानाबद्दलही एक स्वतंत्र प्रकरण आहे. 'कल्पतरू' व 'आनंदवृत्त' तसेच त्याचे भावंड 'मनोविहार' ही पत्रे सुरू झाल्याची बातमी या ज्युबिली अंकात देऊन त्यांनी त्याची दखल घेतली. त्याच सुमारास विविधज्ञानविस्तार, शिल्पकला, विज्ञान, नाटयकथार्णव गृहिणी, ऐतिहासिक नाटयकथावली, बालबोध वगैरे मासिके प्रसिध्द होत असल्याचे या ज्युबिली अंकातील उल्लेखावरून कळते.

लोकांना ताज्या बातम्या देताना केवळ वस्तुस्थिती सांगणे एवढाच 'समाचार' कारांचा उद्देश नसे. तर त्या बातमीची सकारात्मक आणि नकारात्मक बाजूही ते

दाखवित असत. विशेषत धान्याचा अवास्तव साठा करणे आणि तुटवडा निर्माण करून भरामसाठ नफा कमावणे या सार्वकालिक अपप्रवृत्तींचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला आहे.

एक महत्वाचा स्तुत्य प्रयत्न म्हणजे स्त्रीशिक्षणाच्या चळवळीला 'समाचार' ने प्रोत्साहन दिले. ज्या व्यक्ती आणि संस्थांच्या माध्यमातून स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न केले जात होते त्या प्रयत्नांना लोकांसमोर आणण्याचे प्रयत्न केले. आपल्या वृत्तपत्रातून त्याचा सर्वत्र प्रचार केला. या काळात अनेक समाजसुधारक स्त्रीशिक्षणाची गरज प्रतिपादन करीत होते. 'समाचार' ने वेळोवेळी स्त्रीशिक्षणविषयक सर्व प्रकारच्या बातम्याना योग्य ते स्थान दिले. त्यामुळे वृत्तपत्र हे एक प्रसारमाध्यम आहे हे या ठिकाणी नक्कीच लक्षात येते.

पत्रकारांची पिढी घडविण्यामध्ये 'समाचार' चे मोठेच योगदान आहे. अनेक पत्रकारांनी आपल्या कारकिर्दीची सुरूवात 'समाचार' पत्रातूनच केली. प्राथमिक धडे तेथेच गिरवले. 'समाचार' ने पत्रकारांसाठी कार्यशाळासुध्दा आयोजित केल्या. यामध्ये नवेदितांना प्रत्यक्ष पत्रकारिता कशी करावी याबाबतचे मार्गदर्शन मिळत गेली. त्याचबरोबर प्रत्यक्ष काम करून अनुभव मिळविण्यासाठी प्रत्यक्ष 'समाचार' हे वृत्तपत्र होतेच. येथे प्राथमिक धडे गिरवून कित्येक पत्रकार पुढे नामवंत वृत्तपत्रांचे संपादक झालेले आहेत. 'समाचार' च्या दूरदृष्टिची व कल्पकतेची ही मोठीच पावती आहे.

'समाचार' पत्र हे स्थापनेपासून सन १९३६ पर्यत 'सप्ताहिक' होते पण त्यानंतर ते 'दैनिक' झाले. त्यामुळे त्याचे स्वरूप बदलून गेले. संपादक, उपसंपादक, वृत्तसंपादक आणि इतरही अनेक पातळीवर योग्य माणसे नेमली गेली. त्यातून दैनिकाला लागणारी एक परिपूर्ण व्यवस्था तयार झाली जक्कल घराण्याचा परंपरागत छापखाना होताच. त्यामुळे त्या अनुभवाचा उपयोग करून त्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला. त्यामध्ये काळाबरोबर राहण्याची दूरदृष्टी होती. लोकशिक्षणावरोवर पत्रकारांनाही कार्यशाळेव्दारे पत्रकारितेचे शास्त्रशुध्द शिक्षण मिळवण्याची व्यवस्था केली.

पत्रकारांचा फायदा असा की त्यांना कार्य करून दाखविण्यासाठी 'समाचार' सारखे व्यासपीठ मिळाले.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक व राजकीय परिस्थितीत स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक व राजकीय परिस्थितीत स्वातंत्र्योत्तर काळात काही बदल घडून आले. अशा परिवर्तनाच्या काळातच 'साप्ताहिक' समाचार 'दैनिक' स्वरूपात आला. अशा प्रकारे सोलापूर भागातील पहिले दैनिक म्हणून 'समाचार' ला मान मिळाला. एकूणच वृत्तपत्राच्या सर्वांगीण जडणघडणीपासून ते समाजशिक्षणापर्यंत अनेक प्रकारांनी 'समाचार' ने आपले योगदान दिले आहे. सर्व पातळयांवरील भक्कमपणामुळे समाचाराने सहज शंभर वर्षे पूर्ण केली समाजमानसावर या वृत्तपत्रातील बातम्यांचा प्रभाव निश्चितपणे पडत होता. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की वृत्तपत्रातील ताज्या आणि विस्तृत बातम्यामुळे समाजाची जडण घडण निश्चितपणे होत होती. समाचाराच्या सर्वच संपादकांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उपटविला. केवळ वृत्तपत्र हे यांत्रिकपणे न चालविता त्याला समाजभिमुखता व लोकभिमुखता आणण्यात ते यशस्वी झाले. समाजातील जागृतीला व हाकेला नेहमीच 'ओ' देण्याचे काम दैनिकाने केले. त्यामुळे कालांतराने हे वृत्तपत्र बंद पडले तरी समाजमनामध्ये त्याचे स्थान चिरंतन व अढळ राहील.

प्रकरण ५ वे

# संदर्भ व तळटीपा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अंदूरकर व्यं.गो. | सोलापूर जिल्ह्यातील वृत्तपत्रांचा इतिहास | स्मरणिका २५ फेब्रुवारी १९७३ पृ. २१ |
| २. | कित्ता | -- | पृ. ४१ |
| ३. | काकडे वि. गो. ('कल्पतरू'चे शेवटचे संपादक ल.गो.काकडे यांचे बंधू ) | | मुलाखतीतून |
| ४. | अंदुरकर व्यं. गो. | | पूर्वोक्त स्मरणिका पृ. २१ |
| ५. | कित्ता | | पृ. २३ |
| ६. | कित्ता | | पृ. २३ |
| ७. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | | संपादकीय लेख दिनांक १६ जानेवारी १८७0 |
| ८. | डॉ. येळेगावकर श्रीकांत | | |
| ९. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | | दिनांक १६ जानेवारी १८७0 |
| १0. | 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' | | दिनांक ३१ ऑगस्ट १८९0 |
| ११. | अंदुरकर व्यं. गो. | पूर्वोक्त स्मरणिका | पृ. ४२ |
| १२. | कित्ता | | पृ. ४३ |
| १३. | कित्ता | | पृ. २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | 'सोलापूर समाचार' | ज्यबिली अंक | दिनांक १४ जानेवारी १९३६ पृ. १ |
| १५. | अंदुरकर व्यं. गो. | पूर्वोक्त स्मरणिका | पृ. २६ |
| १६. | 'सोलापूर समाचार' | ज्यबिली अंक | दिनांक १४ जानेवारी १९३६ पृ. ९ |
| १७. | अंदुरकर व्यं. गो. | पूर्वोक्त स्मरणिका | पृ. २६ |
| १८. | कित्ता | | |
| १९. | कित्ता | | |
| २0. | 'सोलापूर समाचार' | ज्यबिली अंक | दिनांक १४ जानेवारी १९३६ पृ. १ |
| २१. | कित्ता | | पृ. ३ |
| २२. | कित्ता | | पृ. १२ |
| २३. | कित्ता | | पृ. १३ |
| २४. | कित्ता | | पृ. २३ |
| २५. | कित्ता | | पृ. १४२ |
| २६. | कित्ता | | पृ. १४२ |
| २७. | अंदुरकर व्यं. गो. | पूर्वोक्त स्मरणिका | पृ. २८ |

प्रकरण ६ वे

# उपसंहार

सोलापुरातील 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' अशा चार महत्वपूर्ण वृत्तपत्रांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अभ्यासत असताना सोलापुरच्या सामाजिक, राजकीय जीवनाला समृध्द करण्याचे काम या चारही पत्रांनी केल्याचे प्रकर्षाने जाणवते.

प्रकरण १ मध्ये विषय प्रवेशामध्ये मराठी वृत्तपत्रांचा उगम आणि विकासाचा थोडक्यात आढावा घेतला असून महाराष्ट्रातील समकालीन वृत्तपत्रांची वाटचाल याची चर्चा केली आहे. त्याचबरोबरीने सोलापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. इ.स.१८१८ साली मराठा सरदार गंगाधर पानसे यांचा पराभव करून ब्रिटिशांनी सोलापरचा ताबा मिळविला. ऐतिहासिक कालापासूनच संपूर्ण महाराष्ट्रात व देशाच्या राजकारणात सोलापूर या ना त्या कारणाने सतत चर्चेत राहिले आहे. मुळात सीमावर्ती भाग असल्याने कधी मुघल, कधी विजापूरची वा अहमदनगरची आदिलशाही, कधी निजामशाही, कधी मराठ्यांची सत्ता तर सर्वात शेवटी ब्रिटिशांची सत्ता अशा पध्दतीने सोलापूरवरील राजकीय सत्तेची मालकी सातत्याने बदलत राहिली. सोलापुरात भुईकोट किल्ला असल्याने ते लढायांचे केंद्र राहिले आहे. इतिहासातील अत्यंत महत्वपूर्ण घटना सोलापूर जिल्ह्याच्या परिसरात घडल्या आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचा वाटा नेहमीच मोठा राहिला आहे. इ.स.१८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्यसंग्रामापासून सोलापूरचा सहभाग होता, हे विशेष. सोलापूर हे आधुनिक कालखंडात देशाच्या आणि जगाच्या नकाशावर आले ते इ.स.१९३0 च्या घटनेमुळे. सोलापुरात लागू करण्यात आलेला 'मार्शल लॉ' आणि चार हुतात्म्यांना दिली गेलेली फाशी हे या इतिहासातील सुवर्ण पान मानले जाते.

दुसऱ्या प्रकरणात सोलापुरात वृत्तपत्रनिर्मितीला लाभलेली अत्यंत पोषक अशी सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी मांडली आहे. साधारणतः इ.स.१८५२ नंतरच्या काळात वृत्तपत्रांच्या निर्मितीसाठी पोषक सामाजिक व राजकीय स्थिती निर्माण झाली. नगरपालिकेची स्थापना, कापड गिरण्यांची निर्मिती, रेल्वे, वाढता कामगार वर्ग आणि सामाजिक संस्थांची निर्मिती ही साधारणतः इ.स.१८५२ नंतरच्याच कालखंडातच अधिक गतीमान झाली. त्यामुळे सोलापूरातील पहिले वृत्तपत्र 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' सुरू झाले ते इ.स.१८६७ मध्ये. त्यानंतर इ.स.१८८५ साली 'सोलापूर समाचार' हे पत्र सुरू झाले. उर्वरित 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' ही पत्रे २० व्या शतकाच्या प्रारंभात म्हणजे अनुक्रमे इ.स.१९२६ व इ.स.१९२७ साली सुरू झाली. पण स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे लक्षणीय योगदान महत्वाचे ठरले.

तर तिसऱ्या प्रकरणात वृत्तपत्रांनी राष्ट्रीय प्रबोधन व स्वातंज्य लढ्यातील प्रेरणादायी कार्याची चर्चा केली आहे. सोलापूरची राजकीय पार्श्वभूमी विकसित करण्यात लोकमान्य टिळक, म.गांधी आणि स्वा.सावरकरांच्या सोलापूर भेटी अत्यंत प्रेरणादायी ठरल्या. देशाच्या तरूणांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा आणि स्वातंत्र्य लढ्यासाठी उपयुक्त ठरणारी माध्यमे लो. टिळकांनी आणि महात्मा गांधींनी दिली. स्वदेशीचा वापर, विदेशीचा बहिष्कार, सविनय कायदेभंग, असहकार, राष्ट्रीय शिक्षण, सत्याग्रह, मोर्चे, मिरवणुका, हरताळ अशा अनेक माध्यमांनी सोलापूरच्या तरूणांनाही एक नवी प्रेरणा मिळाली. संपूर्ण देशभरच संघर्ष तीव्र होत चालला होता.

इ.स.१९३० सालापर्यंत त्याचा उत्कर्ष बिंदू गाठला होता. जवळपास ६० वर्षाच्या प्रयत्नांनी हा उत्कर्ष बिंदू गाठला गेला होता. सोलापूर सार्वजनिक सभा, सोलापूर लोकसभा, सोलापूर जिल्हा सभा, मुंबई इलाखा प्रांतिक सभा यांची व राष्ट्रीय सभेची अधिवेशने , वृत्तपत्रांचा प्रभाव यामुळे हा राजकीय तापमानाचा उत्कर्ष बिंदू गाठला गेला होता. माटे, वारद, चक्रदेव, देशमुख, पसारे, मल्लिकार्जूनप्पा पाटील अशा अनेकांच्या

कार्यातून राष्ट्रीय चळवळीला सोलापुरात स्थान मिळाले आणि गतीही मिळाली. यांच्या प्रेरणेतूनच जाजू, राठी, अंत्रोळीकर, जाधव, शिंदे, काडगांवकर, कुंजविहारी, कुर्बान हुसेन, मल्लप्पा धनशेट्टी, रामभाऊ राजवाडे अशी तरूणांची नवी फौज स्वातंत्र्याच्या आखाड्यात उतरली. त्यातच इ.स.१९२० ते इ.स.१९३० ही दहा वर्ष म.गांधींच्या झंझावाताने देश व्यापणारी होती. हे संपूर्ण दशकच गांधीजींच्या आवाहनाने आणि चैतन्याने भारावलेले होते. सुशिक्षित, व्यापारी, शेतकरी, मजूर, सामान्य स्त्री-पुरूष असा कोणीच या झंझावातापासून स्वतःला दूर ठेवू शकत नव्हता.

**वृत्तपत्रांनी केलेली स्वातंत्र्य जागृती ः**

चौथ्या प्रकरणातून देशाच्या स्वातंत्र्याची आकांक्षा तीव्र होण्यास व देशस्थिती समजण्यास सोलापुरातील वृत्तपत्रांचा वाटा किती मोठा होता याची चर्चा केली. राष्ट्रीय पातळीवरील घडामोडींचा सारा तपशिल सोलापुरातील वृत्तपत्रांतून समजत होता. त्यातून एक राष्ट्रीय मन घडत होते. सोलापुरात होणाऱ्या राजकीय सभा , त्यातील भाषणे यांचा स्वाभाविक परिणाम ही चळवळ गतीमान होण्यावर होत होता. अभ्यासविषय म्हणून निवडलेल्या चार पत्रांपैकी दोन वृत्तपत्रांचे संपादक – 'कर्मयोगी' चे संपादक कै. रामभाऊ राजवाडे आणि 'गजनफर' चे संपादक हु.कुर्बान हुसेन – हे दोघे तरी थेट स्वातंत्र्य चळवळीच्या आखाड्यातील अग्रणी नेते होते. पण 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' चे संपादक काकडे काय किंवा 'सोलापूर समाचार' चे संपादक जक्कल काय या दोन्ही घराण्याचे सोलापूरच्या सार्वजनिक जीवनात अत्यंत आदराचे स्थान होते. सोलापूरच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला गतीमान करण्यासाठी या दोन्ही घराण्यांनी मोठे योगदान दिले आहे. किंबहुना स्वातंत्र्यलढ्याला अधिक सशक्त करण्यामध्ये या चारही संपादकांनी आपल्या सामाजिक कार्याचा आणि त्यांच्या पत्रांचा प्रभावी शस्त्रासारखा

उपयोग केला. चौथ्या प्रकरणातील वृत्तपत्रांनी केलेल्या सामाजिक कार्याचा गोषवारा खालीलप्रमाणे सांगता येईल –

**वृत्तपत्रांचे सामाजिक योगदान ः**

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या चारही पत्रांचे समाजातील स्थान अत्यंत आदराचे होते. त्यामुळे पत्रातून व्यक्त झालेल्या मतांना जनाधार मिळत होता.

सोलापूर सार्वजनिक सभा, सोलापूर लोकसभा, देशहितकारणी सभा, सोलापूर क्लब, सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभा अशा विविध सार्वजनिक संस्थांच्या निर्मितीमध्ये 'कल्पतरू' कार काकडे व 'समाचार' कार जक्कल यांचा मोलाचा वाटा होता. या संस्थांच्या माध्यमातून आणि संस्थांच्या कार्याला आपल्या पत्रातून प्रसिध्दी देऊन त्यांनी समाज जीवनाला दिशा देण्याचेही काम केले.

सोलापूरच्या सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या सर्वच पत्रांनी केले. नगरपालिकेशी निगडीत प्रश्नांना योग्य त्या तीव्रतेने आणि पोटतिडकीने मांडण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या बाजूने या समस्यांबद्दल समाजामध्ये जागृती घडविण्याचे कार्यही या पत्रांनी केले.

सोलापूरला हिंदू–मुस्लिम दंग्यांची एक दुर्दैवी परंपरा आहे. 'कर्मयोगी' हे तसे उजव्या विचारसरणीचा पुरस्कार करणारे, कट्टर सावरकरवादी पत्र आणि 'गजनफर' हे एका मुस्लिम क्रांतीकारी तरूणाकडून चालविले जाणारे पत्र असूनही या दोन्ही पत्रांनी नेहमीच हिंदू – मुस्लिम ऐक्याचाच पुरस्कार केला. दोघांनीही समाजाच्या शिक्षणावर आणि परस्पर सामंजस्य राखण्यावर भर दिला. 'कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार' च्या संपादकांनीही हिंदू–मुस्लिम दंग्याने होणारे एकूण सामाजिक नुकसान अधोरेखित करून

ऐक्याचा आग्रह धरला. दोन्ही समाजातील दुही मिटवून सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.

तत्कालीन समाजात दृढमूल झालेल्या अनेक रूढी परंपरा आणि अंधःश्रध्दांना दूर सारून नवा सुशिक्षित आणि आधुनिकतेच्या विचारांचा पुरस्कार करणारा समाज घडविण्यात या पत्रांनी खुप मोठी भूमिका बजावली आहे. विधवांच्या समस्या, विधवा पुनर्विवाह, स्त्रीयांच्या शिक्षणाचा पुरस्कार, बालविवाहाला विरोध अशा अनेक विषयांवर परखड लेखन करून समाजात जागृती घडविण्याचा प्रयत्न 'कल्पतरू' आणि समाचारने विशेष करून केला आहे. सोलापुरात 'शारदा' खटला जोरात चालला त्याचे इत्थंभूत माहिती देऊन 'कल्पतरू' कारांनी खूप मोठी जागृती या विषयात घडवून आणली.

मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य मिळावे, समाजाकडूनही स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला जावा यासाठी सरस्वती विद्यामंदीरसारख्या अस्तित्वात आणण्यात काकडे आणि जक्कल यांचा मोठा वाटा होता. तसेच महिला मंडळ, भगिनी समाज यासारख्या संस्थांच्या माध्यमातून महिलांचे संघटन व्हावे म्हणूनही प्रयत्न केले गेले.

वृत्तपत्रांनी सोलापूर किंवा परिसरातील विधायक कामांची दखल घेऊन ते कार्य लोकांपर्यंत पोहोचवलेले दिसते. सोलापुरात श्री सिध्देश्वराची मोठी यात्रा भरते. या यात्रेला शेकडो वर्षाची परंपरा आहे. श्री सिध्दरामेश्वरांनी १२ व्या शतकात सामाजिक समतेचा पुरस्कार केला होता. तलाव खोदून पाणी पुरवठ्यासारख्या लोकहितकारी योजना त्यांच्या आशीर्वादाने आणि पुढाकाराने मार्गी लागल्या. त्यामुळेच सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात एक सुंदर तलाव शहराच्या सौंदर्यातही भर घालतो आहे. श्री सिध्देश्वरांनी आपल्या वचनांच्या माध्यमातून मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली. एकंदर या यात्रेची आणि श्री सिध्देश्वरांच्या कार्याची दखल 'कल्पतरू', 'सोलापूर समाचार', कर्मयागी आणि 'गजनफर' या चारही पत्रांनी घेतलेली दिसते.

सोलापूरची वाढती लोकसंख्या, वाढत्या लोकसंख्येचे वाढते प्रश्न डोळ्यासमोर ठेवून समाजात आपल्या हक्क व कर्तव्यासाठी जागरूकता निर्माण केली. सोलापूर हे शहर मराठी, तेलुगु, कानडी, हिंदी, गुजराथी, सिंधी अशा सर्व भाषा समुहाचे लोक एकत्र नांदविणारे हे शहर आहे. व्यापार, शेती, मजूर, कामगार, कारखानदार आणि सामान्य नोकरदार वर्ग अशा सर्व समाज घटकांना व्यापून टाकणारे प्रश्न या चारही वृत्तपत्रांनी उचलून धरले. त्याविषयी जागृती केली.

सोलापूरच्या सार्वजनिक जीवनाला आकार देण्यात 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' अशा चारही पत्रांच्या संपादकांनी खूप महत्वाची भूमिका बजावली. सोलापूरचे सामाजिक जीवन अधिक समृध्द आणि सर्वव्यापी बनविण्यात या पत्रांचे योगदान निश्चितच वाखाणण्यासारखे आहे.

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या चारही पत्रांच्या संपादकांच्या बाबतीत एक समान दुवा आहे तो म्हणजे या चौघांचाही सार्वजनिक जीवनातील सहभाग. या चौघांमधला 'संपादक' जेवढा मोठा होता तितकाच त्यांच्यातील सामाजिक कार्यकर्ताही मोठा आणि समाजमान्य होता. त्यामुळे हे केवळ 'लिहिते' संपादक नव्हते तर त्याबरोबरीने 'कर्ते' संपादकही होते. व्यापक जनसंपर्क, समाजातल्या तळागाळाशी असलेले थेट नाते आणि सामाजिक प्रश्नांची नेमकी जाण यामुळे या पत्रांवर लोकमान्यतेची मोहोर उमटलेली होती.

**वृत्तपत्रांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान ः**

सोलापूरची वृत्तपत्र सृष्टी केसरी मराठाची परंपरा सांगणारी असल्याने त्याच विचारांचा मोठा पगडा या पत्रांवर असल्याचे दिसून येते. 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या पत्राची वैचारिक बैठक गोखले-रानडे प्रणित नेमस्तवादाशी जवळीक सांगणारी होती. 'सोलापूर समाचार' ने थेट गोखले-रानडे विचाराशी नाते सांगितले नसले तरी नेमस्तपणा

हा त्यांचाही स्थायीभाव होता. 'कर्मयोगी' पत्राचा पाया रचला गेला तोच मुळी लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'च्या प्रेरणेने. स्वतः कै.रामभाऊ राजवाडेंनी केसरीमध्ये तात्यासाहेब केळकरांच्या हाताखाली पत्रकारीतेचे धडे गिरवलेले होते. त्यामुळे केसरीची सगळी वैशिष्ट्ये 'कर्मयोगी' पत्राने आपली मानली. 'गजनफर' या शब्दाचा अर्थच मुळात 'केसरी' असा होतो. संपादक हु.कुर्बान हुसेन यांनी अतिशय तरूण वयात हे पत्र सुरू केले. हु.कुर्बान हुसेन यांची आणि लोकमान्य टिळकांची प्रत्यक्ष भेट होण्याचा संभव नव्हताच कारण लो.टिळक इ.स.१९०७ च्या दरम्यान सोलापुरात आलेले होते. त्यावेळी हुसेन फारच लहान होते. वयाच्या २० व्या वर्षी त्यांनी 'गजनफर' सुरू केला. केसरीच्या प्रभावामुळे त्यांनी जहाल विचारांचा पुरस्कार करणे स्वाभाविक होते.

पाचव्या प्रकरणात 'कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार' च्या सामाजिक, राजकीय व वृत्तपत्रीय कार्याचा विशेष आढावा घेतला आहे. संशोधन विषयाला अनुसरून 'कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार' या वृत्तपत्रांचा आणि त्यांच्या संपादकांच्या कार्याचा सखोल अभ्यास केला आहे. या दोन्ही शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या पत्रांनी सोलापुरात वृत्तपत्र माध्यमाला सामाजिक स्थान मिळवून दिले. म्हणूनच या पाचव्या प्रकरणात या दोन्ही पत्रांचा विशेष अभ्यास करण्यात आला आहे.

या वृत्तपत्रांच्या माध्यमातून केलेल्या राजकीय जागृतीचा आणि स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचा आढावा घेताना काही ठळक निष्कर्ष समोर येतात ते असे –

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या चारही पत्रांनी देशभरातील स्वातंत्र्य चळवळीची माहिती त्यातील बारीकसारीक घटनांच्या तपशिलासह लोकांपर्यंत पोहोचवल्याने सोलापूरसारख्या एका कोपऱ्यात असलेल्या शहराला स्वातंत्र्य लढ्याच्या मुख्य प्रवाहात आणता आले. स्वातंत्र्य चळवळीचा एक अविभाज्य घटक होता आले. राजकीय जागृतीचा मूळ आधार हा

'माहिती' (information) असतो. या माहितीचे ज्ञानात (knowladge) रूपांतर होते आणि ज्ञानातून प्रेरणा (inspiration) मिळते. तेच नेमकेपणाने या पत्रांनी केले.

'कल्पतरू' हे मतपत्र होते. गोखले रानडे प्रणित सुधारणावादी नेमस्त विचाराची कास धरणारे पत्र होते. तर 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' चा बहुतांशी कल हा टिळक प्रणित जहालवादाकडे होता. समाचारने बातम्या देण्यावर अधिक भर दिला असला तरी काही वेळा विचारगर्भ लिखाणही केले आहे. सारांश या चारही पत्रांनी वाचकांचे वैचारिक भरण-पोषण खूप चांगल्या पध्दतीने केले आहे.

लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वा. सावरकर, मदनमोहन मालवीय अशा देशपातळीवरील नेतृत्वाच्या भाषणांना, आंदोलनाला, संप हरताळ या सारख्या घटनांना खूप चांगली प्रसिध्दी देऊन सोलापुरातील युवकांना तरूणांना या लढ्यात स्वतःला झोकून देण्यास प्रवृत्त केले. स्वदेशी, स्वातंत्र्य, समता यासारख्या मूल्यांची रूजवात सर्वसामान्य लोकांमध्ये होण्यात वृत्तपत्रांची भूमिका निश्चितच स्पृहणीय होती. महात्मा गांधींच्या असहकार, अहिंसा आणि सत्याची महिमा या पत्रांनीच लोकमानसात रूजवली. देशकाल स्थिती लोकांना अवगत झाली आणि देशाच्या स्वातंत्र्याची निकड लोकांना कळू लागली.

दिनांक ८ मे १९३० रोजी सोलापुरात झालेली दंगल आणि त्यानंतर ब्रिटिश सोल्जरांनी केलेला अनन्वित अत्याचाराचे सविस्तर वृत्तांत 'कर्मयोगी' साप्ताहिकाने देऊन अक्षरशः क्रांती घडवली. मार्शल लॉच्या काळात झालेले अनन्वित अत्याचार जगासमोर आले ते केवळ 'कर्मयोगी' ने प्रकाशित केलेल्या विशेष अंकामुळे. सोलापुरात ब्रिटिश पोलीसांनी कोणत्या ठिकाणी किती गोळीबार केला. किती लोक मृत्यूमुखी पडले किती जखमी झाले याचा तपशिल नावनिशीवार 'कर्मयोगी' ने छापला होता. त्यावेळेसची स्फोटक परिस्थिती पाहता हे धाडस केवळ अतुलनीय असेच होते. या विशेषांकाचे पडसाद पार ब्रिटिश पार्लमेंटपर्यंत सर्वत्र उमटले. 'कर्मयोगी' ची ही कामगिरी अजोडच होती. पण त्याहीपेक्षा या भारतमातेच्या मुक्ततेसाठी दिलेले फार मोठे योगदान होते.

'कर्मयोगी' च्या या अंकामुळे देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला नवी उत्तेजना तरी मिळालीच पण वेगळे परिमाणही लाभले.

मार्शल लॉ म्हणजे लष्करी कायदा लागू झाल्यानंतर लोकांसाठी हा कायदा अगदीच नवीन होता. ब्रिटिशांनीही असा कायदा भारतात पहिल्यांदाच सोलापुरात लागू केला होता. त्यामुळे या कायद्यातील तरतुदी आणि संभाव्य शिक्षा, कायद्याची अंमलबजावणी कशी होणार याविषयीची तपशिलात माहिती पत्रांनी प्रकाशित केली. मार्शल लॉच्या अंतर्गत कोणाकोणाला पकडण्यात आले आणि त्यांना शिक्षा कोणत्या शिक्षा फर्मावण्यात आल्या याची माहिती सर्वप्रथम 'कल्पतरू' ने दिली. त्यामुळे सामान्य लोकांना मार्शल लॉ कळायला सोपा झाला.

हुतात्मा कुर्बान हुसेन, मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे आणि श्रीकिसन सारडा या चार हुतात्म्यांना फाशीची शिक्षा जाहीर झाल्यापासून सर्वच पत्रांनी या शिक्षेच्या विरोधात रान उठविले. लोकांच्या भावना अधिक प्रक्षुब्ध केल्या. या शिक्षेच्या विरोधात लोकमानस तयार करण्यात वृत्तपत्रांनी पुढाकार घेतला नसता तर कदाचित या चारही थोर पुरूषांच्या त्यागाची महती लोकांपर्यंत पोहोचलीच नसती. शिवाय त्यांच्या बलिदानामागची प्रेरणा लोकांपर्यंत पोहोचली नसती. स्वातंत्र्य लढ्यातील बलिदानाचे हे सोनेरी पान लख्खपणे लोकांसमोर आले ते केवळ या वृत्तपत्रांमुळेच!

गांधी-आयर्विन करार हा या स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्वाचा टप्पा होता. या करारानुसार अनेक राजबंद्यांना मुक्त करण्यात आले. 'कर्मयोगी' चे संपादक रामभाऊ राजवाडे यांनाही पकडण्यात आले होते. प्रारंभी विजापूर आणि नंतर येरवड्याच्य तुरूंगात डांबण्यात आले. गांधी-आयर्विन करारानुसार त्यांची मुक्तता करण्यात आली. मुक्तता झाल्यानंतर रामभाऊ राजवाडे यांचे अनेक ठिकाणी सत्कार समारंभ झाले. हे सत्कार समारंभ केवळ कौतुकाचा भाग नव्हते तर त्यातून आणखी लोकांना प्रेरणा मिळावी

हा हेतू होता. तेंव्हाही सर्वच वृत्तपत्रांनी यातला घटनाक्रम आणि कराराचा तपशिल लोकांसमोर आणला. त्यामुळे या कराराचे महत्व अनेक पटीने लोकांसमोर आले.

सोलापूर हे कापड गिरण्यांचे केंद्र असल्याने बहुतांशी कामगार वर्ग होता. या कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी संप, हरताळ, मोर्चे अशा अनेक मार्गांनी कामगार चळवळ समृध्द झाली. कुर्बान हुसेन हे स्वतः गिरणी कामगार असल्याने कामगारांनाही देशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे सोपे झाले. डॉ.कृ.भि.अंत्रोळीकर, रामकृष्ण जाजू, शेठ वालचंद हिराचंद, शेठ गुलाबचंद हिराचंद, तुळशिदास जाधव अशा तत्कालीन तरूण पुढाऱ्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन ही चळवळ अधिक सशक्त होण्यामध्ये कारणिभूत ठरली. या स्थानिक पुढाऱ्यांना आणि त्यांच्या कार्याला लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम या पत्रांनी केले. थोडक्यात स्थानिक नेतृत्वाचा विकास करण्यामध्ये या पत्रांचे योगदान मोठे होते.

'कल्पतरू', समाचार, 'कर्मयोगी' किंवा 'गजनफर' असो अथवा तुळशीदास जाधवांनी चालवलेले लोकसेवा साप्ताहिक असो या सर्वच पत्रांनी स्थानिक राजकारणालाही तितकेच प्राधान्य दिले. स्थानिक राजकारणाचे अनेक रंग सामान्य वाचकांसमोर येऊ शकले. नगरपालिका असो, सोलापूर लोकसभा असो की त्या त्यावेळी होणाऱ्या निवडणुका असोत अशा सर्वच घटना प्रसंगाला या पत्रानी प्राधान्य दिले. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना मार्गदर्शनही होत होते आणि लोकांमध्ये जागृतीही होत होती.

भारतीयांनी स्वातंत्र्याची लढाई जिंकली, पण या लढाईपेक्षाही अत्यंत महत्वाचा प्रश्न म्हणजे पुढील कार्यात भारतीयांनी नेमके कोणते कार्य केले पाहिजे, कोणत्या सामर्थ्या निशी उतरले पाहिजे याचे दिशादर्शनही या वृत्तपत्रांनी केले. आपल्या देशाला आलेली मरगळ झटकून पुन्हा वैभव मिळवण्यासाठी कार्य केले पाहिजे. पण त्याच्या आधी ब्रिटिशांच्या पिळवणुकीने निर्माण झालेले दारिद्र्य नष्ट करून मानवाला मूलभूत गरजा भागविल्या पाहिजेत. फोडा आणि झोडा नीतिमुळे निर्माण झालेली विषमतेची,

जातीयतेची दरी दूर करून संपूर्ण समाज एकसंघ केला पाहिजे. अशा अनंत अडचणी आणि आव्हानांची जंत्रीच 'कल्पतरू', समाचार वगैरे पत्रांनी दिली. देशाच्या पुढच्या वाटचालीसाठी आणि राज्यकारभारासाठी दाखविलेली ही पायवाटच होती.

भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्त झाले म्हणजे असे म्हणता येईल की, जनतेच्या उन्नतीसाठीचे साधन प्राप्त झाले आहे. आता स्वतंत्र भारताने विधायक कार्य करण्यास सरसावले पाहिजे. त्यासाठी आता पूर्वीच्या संघटनांची आवश्यकता नसून आता नवीन संघटना शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, विद्यार्थ्यांच्या उभारून देशातील प्रश्नांचे निराकारण करण्याचे कार्य सुरू केले पाहिजे. अन्न टंचाई, कापड टंचाई, निवारा यांचे प्रश्न मिटवून सामाजिक विषमता कमी करण्याचे कार्य केले पाहिजे, त्यातून सामाजिक स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा होईल. अशा आशयाचे अगलेख स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर लगेचच 'कल्पतरू' आणि समाचारने लिहिले होते. यावरूनच तत्कालीन वृत्तपत्रांना देशाच्या मूलभूत समस्यांची किती नेमकेपणाने जाण होती हे पटायला लागते.

**सोलापुरातील वृत्तपत्रांचा जनमानसावरील प्रभाव ः**

'कल्पतरू', समाचार, 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या वृत्तपत्रांच्या कार्याचा खूपच प्रभाव समाजमनावर पडलेला होता. स्वातंत्र्य लढ्याशी निगडीत घडामोडी थेट घरामध्ये बसून वाचायला मिळत असल्याने संपूर्ण देशातील स्वातंत्र्य चळवळीसाठी चाललेले प्रयत्न लोकांपर्यंत पोहोचत होते. सोलापुरातील रॅली, मोर्चे, प्रभातफेऱ्या, पुढाऱ्यांच्या भाषणांचे वृत्तान्त छापून येत असल्याने घडामोडीच्या बरोबरीनेच थोरामोठ्यांचे विचार आपोआप लोकांपर्यंत पोहोचण्याला मदत होती. समाजमन घडण्यात याचा मोठा उपयोग होत होता.

**वृत्तपत्रांचे अंतरंग ः**

स्वातंत्र्यपूर्वकाळातील सर्वच वृत्तपत्रांचा विचार केला तर उत्पन्नाच्या साधनापेक्षा विचार प्रसाराचे साधन म्हणूनच वृत्तपत्रांकडे पाहिले जायचे. त्यामुळे व्यवसायिकता तरी दूरच पण किमान उत्पादन खर्च निघणेही अवघड. अशा विकट परिस्थितीत ही पत्रे चालू होती. 'कल्पतरू' हे पत्र आपल्या शंभर वर्षाच्या आयुष्यात केवळ दोन वर्ष नुकसान न होता चालले. असे काकडे घराण्याच्या स्नुषा प्रा.डॉ.नभा काकडे यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले. 'समाचार' ला वृत्तपत्राच्या बरोबरीने व्यवसायिक छापखान्याची जोड होती. त्यामुळे आर्थिक नुकसानीला फारसे तोंड द्यावे लागले नाही. 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' यांच्या संपादकांची आर्थिक स्थिती तशी बेताची होती. हुतात्मा कुर्बान हुसेन हे तरी गिरणी कामगार होते. अत्यंत बिकट अशी आर्थिक स्थिती होती. आर्थिक हलाखीमुळे वृत्तपत्राचे प्रकाशन एकदा बंदही करावे लागले.

'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'सोलापूर समाचार', 'कर्मयोगी', 'गजनफर' आणि लोकसेवा या सारख्या सोलापूरच्या वृत्तपत्रांनी सामाजिक ऐक्य, शिक्षण, कामगार, त्यांच्या संघटना, लढा, नेतृत्व आणि चळवळ अशा अनेक विषयांना आपलेसे करत समाजमनात आपले स्वतःचे स्थान निर्माण केले. समाजाच्या दैनंदिन जीवनाशी आपली नाळ जोडण्यात ही वृत्तपत्रे कमालीची यशस्वी झाली. समाजमनावर स्वतःचा ठसा उमटवू शकली. कामगार वर्ग जास्त असल्याने सोलापूरची आर्थिक स्थिती फारशी कधी चांगली नव्हती अशाही स्थिती पुरेसे आर्थिक पाठबळ नसताना या वृत्तपत्रांनी प्रसंगी नव्हे तर नेहमीच पदरमोड करून असिधारा व्रताप्रमाणे वृत्तपत्र चालविले.

- 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', 'कर्मयोगी' आणि 'गजनफर' या पत्रांना नेहमीच पदरमोड करून वृत्तपत्र चालवावे लागले. 'सोलापूर समाचार' ला छपाई व्यवसायाची जोड असल्याने थोडी आर्थिक स्थिती बरी होती.
- या वृत्तपत्रांनी व्यवसायापेक्षा ध्येयवादी पत्रकारितेला प्राधान्य दिले.

- सोलापूर शहर, जिल्हा आणि महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरांमध्ये ही वृत्तपत्रे नियमित वाचली जात होती. विशेषत्वाने सोलापूरच्या ग्रामीण भागातही स्वतःचा वाचक वर्ग निर्माण करण्यात यांना अल्पसे का होईना यश मिळाले होते.
- उपरोक्त चारही वृत्तपत्रांनी मूल्याधारीत पत्रकारितेचा मानदंड घालून दिला. आपल्या मूल्यांचा संकोच कधी होऊ दिला नाही. आपली मूल्ये रोखठोकपणे समाजात रूनविण्यात ती यशस्वी झाली. वृत्तपत्र म्हणून असलेली विश्वासार्हता कधीही डळमळीत होऊ दिली नाही.
- कोणत्याही राजकीय पक्षाची वा पुढाऱ्यांची तळी उचलून धरली नाहीत. विचाराच्या चौकटीत जेवढे माप खुलेपणाने देता आले तेवढे मात्र भरभरून दिले.
- देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सोलापूरच्या अवकाशात विचारांचा एक बौध्दिक लढा उभा करण्यात या चारही वृत्तपत्रांना यश मिळाले.

भारताच्या स्वातंज्य चळवळीत 'कल्पतरू' आणि 'सोलापूर समाचार' या वृत्तपत्रांनी लोकांना पारतंत्र्याची जाणीव करून दिली. त्याच बरोबरीने प्रबोधनाची भूमिकाही पार पाडली. त्यामुळे ही वृत्तपत्रे समाजप्रिय झाली.

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक साधने -

### अ] वृत्तपत्रे -

१) 'कल्पतरु' - (उपलब्ध सर्व अंक)

२) 'सोलापूर समाचार' - (उपलब्ध सर्व अंक)

३) 'कर्मयोगी' - (उपलब्ध सर्व अंक)

४) 'गज़नफर' - (उपलब्ध सर्व अंक)

५) कऱ्हाडकर जतींद्र - युगांतर - दि. ८ ते १४ फेब्रुवारी २००९

### ब] मुलाखती -

१) आहेरवाडी मौलासाहेब मक्तुमसाहेब - (ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक)

२) काकडे विनायक गोविंद - ('कल्पतरु' चे चौथे व शेवटचे संपादक ल.गो.काकडे यांचे बंधु आणि 'कल्पतरु'चे लेखक)

३) जक्कल जयंत बाबुराव - ('सोलापूर समाचार' चे संस्थापक नरसप्पा जक्कल यांचे नातू, माजी संपादक, सध्या 'विश्वसमाचार' चे सल्लागार)

४) जाजू शंकरलाल देवीचंद - (ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व तत्कालीन लढयाचे अग्रणी रामकृष्ण जाजू यांचे पुतणे)

५) श्रीमती ठोकळ निर्मलाताई शंकरराव - (माजी आमदार व स्वातंत्र्यसैनिक तुळशीदास जाधव यांच्या कन्या)

६) पाटील माधव पंढरीनाथ - (ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक)

## क] नियतकालिके / स्मरणिका/ गौरवग्रंथ -

| क्रमांक | लेखक | | पुस्तकाचे नाव | प्रकाशन व वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | अंदुरकर व्यं.गो. | - | सोलापूर जिल्हयातील वृत्तपत्राचा इतिहास | सोलापूर जिल्हा पत्रकार परिषद अधिवेशन स्मरणिका समिती, पंढरपूर, २५ फेब्रुवारी १९७३. |
| २) | कुलकर्णी गणेश पंढरीनाथ | - | सोलापूर नगरपालिका | शतसांवत्सरिक ग्रंथ, प्रका.- अनंत जोशी, १९५३. |
| ३) | जांभेकर गणेश गंगाधर | - | बाळशास्त्री जांभेकर शताब्दी स्मारक ग्रंथ खंड - २रा | आनंद प्रकाशन, रत्नागिरी, २००५ |
| ४) | देशपांडे डॉ.प्र.न | - | 'संशोधक' त्रैमासिक | इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, मार्च २००४ |
| ५) | बुवा पु.ज. | - | 'कर्मयोगी' स्व.रामभाऊ राजवाडे जन्मशताब्दी स्मरणिका | दि. ७ एप्रिल १९९१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | येवले शं.भा | - सोलापूर जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, | भारतीय स्वातत्र्य सुवर्णमहोत्सव समिती, मुंबई, १९९४. |
| ७) | शहा. पं. सुमतिबाई | - पं.सुमतिबाई शहा गौरव ग्रंथ सोलापूरच्या स्वांतत्र्यलढयातील एक अनोखे पान , | जीवराज जैन ग्रंथमाला, सोलापूर १९९0 |

**ड) English Sources**

1) Campbel James M. - Gazetteer of Bombay Presidency (Solapur District), Vol. – X X, 1884

2) Setu Madhavrao Pagdi and B.G. Kunte - Solapur District Gazetteer, Govt. of Maharashtra, Bombay, 2nd edn., 1977

3) The New Encyclopaedia Britanica - Vol. 26, Oxford University Press, London.

**दुय्यम साधने -**

**मराठी साधने-**


| क्रमांक | लेखक | | पुस्तकाचे नाव | प्रकाशन व वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | अकलूजकर प्रसन्नकुमार | - | वृत्तपत्रविद्या | श्रीविद्या प्रकाशन, पुणे २००० |
| २) | उपाध्ये नीला | - | युगप्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर: काळ आणि कर्तृत्व | श्रीविद्या प्रकाशन, पुणे,२००२ |
| ३) | काकडे गो.ना. | - | ब्रह्मविद्या प्रबोधरत्न | प्रकाशक- आर. जी.मते, सोलापूर, १९०२ |
| ४) | कानडे शं.गो. व लेले रा.के. | - | मराठी नियतकालिकांचा इतिहास | कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५ |
| ५) | कीर धनंजय | - | स्वातंत्र्यसंग्रामाचे जनक: लो.टिळक | वरदा बुक्स, पुणे, प्र.आ., १९७१ |
| ६) | केळकर न.चिं. | - | वृत्तपत्रमीमांसा | नीलकंठ प्रकाशन,पुणे १९६५ |
| ७) | खानोलकर गं.दे. | - | अर्वाचीन मराठी वाङ्मय | अक्षर प्रकाशन,पुणे १९६५ |
| ८) | खानोलकर गं.दे. | - | १९ व्या शतकातील महाराष्ट्र | अरूण प्रकाशन,पुणे, १९७० |
| ९) | गर्गे स.मा. | - | निवडक अग्रलेख | मानसन्मान प्रकाशन,पुणे,प्र.आ., |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १९९७ |
| १०) | गुर्जर वा.गं आणि गोखले ल.ना. | - पत्रकारांसाठी मराठी | कै.बाबासाहेब घोरपडे वृत्तविद्या प्रबोधिनी, पुणे,१९९१ |
| ११) | गोठी ऋतु | - मिडियाशोध | लक्ष्य पब्लिकेशन, नवी दिल्ली, प्र.आ., २००४ |
| १२) | जोशी वसंत | - भाषा व साहित्य संशोधन | अक्षरधारा प्रकाशन, लातूर २००३ |
| १३) | जोशी डॉ.न.म. | - पत्रकारांचा शिक्षणविचार | सुविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ.,१९९८ |
| १४) | जोशी डॉ.न.म. | - मराठी वाङ्मयाचा इतिहास | मराठी साहित्य परिषद, पुणे, खंड-५ २००१ |
| १५) | जोशी , वामन मल्हार | - विचारालहरी | चित्रशाळा प्रेस, पुणे १९५० |
| १६) | देशपांडे.अ.ना(संपा) | - आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहास | नागपूर प्रकाशन , नागपूर. १९८७ |
| १७) | देशपांडे.मा.धों | - एकनाथाच्या भारूडातील लोकसंवाद | (लघुशोधनिंबध) मराठवाडा विद्यापीठ , नागपूर प्रकाशन , नागपूर १९९२ |
| १८) | धारूरकर. वि.ल | - आजकालची पत्रकारिता | रामराज्य प्रकाशन औरंगाबाद, दु.आ., १९८४ |
| १९) | धारूरकर. वि.ल | - संपादक :कला आणि शास्त्र | प्रका सौ.शुभदा धारूरका, औरंगाबाद दु.आ., १९८९ |
| २०) | धारूरकर. वि.ल | - माध्यम दृष्टिक्षेप | चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१) | पटेल . डॉ.जी.एच | - मराठी वृत्तपत्रे आणि सामाजिक आंदोलन | स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., २००४ |
| २२) | परांजपे.डॉ.वनिता | - अग्रलेख: एक संवादमाध्यम | आदित्य प्रकाशन, औरंगाबाद, २००० |
| २३) | पवार.डॉ.सुधाकर | - वृत्तत्रव्यवसाय: काल व आज | विजय प्रकाशन, नाशिक. १९८६ |
| २४) | पवार.डॉ.सुधाकर | - ओळख: भारतीय वृत्तपत्रसृष्टी | मानसन्मान प्रकाशन, पुणे,प्र.आ. २००३ |
| २५) | प्रधान ग.प्र व जाधव रा.ग. | - हीरक महोत्सवी निवडक साधना खंड-६ (सामाजिक व सांस्कृतिक) | साधना प्रकाशन, पुणे, २००७ |
| २६) | पाध्ये.प्रभाकर(अनु.) प्र.ना.परांजपे/वसुधा परांजपे | - पत्रकारितेची मूलतत्त्वे | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्र.आ., १९९१ |
| २७) | पुंडे.डॉ.नी.त्र्यं | - हुतात्मा अब्दुर्रसूल कुर्वा न हुसेन: कार्य आणि कर्तृत्व | अक्षय प्रकाशन (१९१०-१९३१),पुणे,१९९७ |
| २८) | पुंडे.डॉ.नी.त्र्यं | - समग्र कुजविहारी | कवि कुंजविहारी जन्मशताब्दी समिती , सोलापूर दि.१० नोव्हेंबर १९९६ |
| २९) | पुंडे.डॉ.नी.त्र्यं | - मार्शल लॉ आणि | सुविद्या प्रकाशन सोलापूर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सोलापूरचे चार हुतात्मे | प्र.आ., २००९ |
| ३०) | पुरंदरे, बाबासाहेब | - राजा शिवछत्रपती | पुरंदरे प्रकाशन , पुणे, (पूर्वार्ध व उत्तरार्ध) आवृत्ती १४ वी, २००१ |
| ३१) | फडके.डॉ.य.दि | - सोलापूर मार्शल लॉचा दैदिप्यमान इतिहास | परिवर्तन अकादमी , सोलापूर, २००५ |
| ३२) | फडके.डॉ.य.दि | - विसाव्या शतकातील महाराष्ट्र | श्री विद्या प्रकाशन, पुणे १९८८ |
| ३३) | माडखोलकर ग.त्र्यं | - पखरण | नागपूर प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९७१ |
| ३४) | माने उज्ज्वलकुमार | - पोलिस आणि पत्रकारिता | मुक्तरंग प्रकाशन, लातूर २००८ |
| ३५) | लेले रा.के. | - मराठी वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास | कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९८९ |
| ३६) | विजापुरे गं.पा. | - मुद्रणकला | गंगाधर प्रकाशन, धारवाड,१९९६ |
| ३७) | सहस्त्रबुध्दे शिरीष | - बखर कॉंग्रेसची | राजहंस प्रकाशन, पुणे, १९८५ |

ब] हिंदी साधने -

| | | | |
|---|---|---|---|
| १) | तिवारी डॉ.अर्जुन | - म. गांधी की पत्रकारिता | जयभारती प्रकाशन, अलाहाबाद, प्र.आ., २००४ |
| २) | चतुर्वेदी जगदीशप्रसाद | - पत्रकारिता के परिप्रेक्ष्य | साहित्यसंगम, अलाहाबाद, प्र.आ., १९८७ |
| ३) | सुरेशचंद्र | - समाचारपत्रो कां उदय व विकास | संपा.- शिवकुमार गुप्त, श्री जैन संस्कृती संरक्षक संघ, जयपूर १९९९ |

**English Sources -**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Ahuja B.N. | - | Theory and Practice of Journalism, Surjeet Publications, New Delhi, 3rd edn., 1993 |
| 2) | Dey Pradeepkumar | - | Perspective in Mass Communication, Kalyani Publishers, Ludhiyana, 1st edn., 1994 |
| 3) | Duverger Mauries | - | The Study of Politics, Trans. by Robert Wagner, Thomas Nelson Ltd., Melbourn, Australia, 1973 |
| 4) | Kamat M.V. | - | The Journalism Hand Book, Vikas Publishing House, New Delhi, 2nd edn., 1995 |
| 5) | Karkhanis Sharad | - | Indian Politics and Role of the Press, Surjeet Publications, New Delhi, 1997 |
| 6) | Keval J. Kumar | - | Mass Communication in India, Jayaco Publications, New Delhi, 1979. |
| 7) | Mahajan V.D. | - | Modern Indian History, Surjeet Publications New Delhi,1955 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8) | Mahajan V.D. and Sethi R.R. | - | British Rule in India, Chand and Co., New Delhi, 1953 |
| 9) | Parasnis D.B. | - | Poona in Baygone Days, Pub. by D.B.Parasnis, Poona,1895 |
| 10) | Parthasarathi Rangaswami | - | Basic Journalism, Mac Millan India Ltd., Madras, rept., 1994 |
| 11) | Rananavare Dr. D.D. | - | History of Solapur (1882-1952), Abhay Prakashan, Akluj, 2000 |
| 12) | Scoot Paul Morer | - | The Educational Role of the Press, League of Nations Publications, New York, 1931. |
| 13) | Yelegaonkar Dr. Shrikant | - | The Study of the 19th Century Political Development in Maharashtra with special reference to the city of Solapur, (Unpublished thesis submitted for the award of Doctorate degree to the Shivaji University), Kolhapur, 1986. |

# मुलाखती

## मुलाखत – १

## श्री विनायक गोविंद काकडे

('कल्पतरू'चे चौथे व शेवटचे संपादक ल. गो. काकडे यांचे बंधू, 'कल्पतरू'चे लेखक.)

जन्म तारीख ः ०२/०६/१९१५ ः व्यवसाय – कामगार न्यायालयात वकिली

(पत्ता ः ६२, नवी पेठ सोलापूर – ४१३ ००१ )

**प्रश्न ः स्वातंत्र्य लढ्यातील 'कल्पतरू'चे व आपले सामाजिक व राजकीय योगदान कशा पध्दतीचे होते?**

**उत्तर ः** 'कल्पतरू'च्या माध्यमातून सामाजिक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. कर्मकांडाला विरोध केला. राजकीय स्वातंत्र्याची प्रेरणा लोकांमध्ये निर्माण केली. स्थानिक प्रश्नांना महत्व दिले. उदा. पाणी समस्या.

**प्रश्न ः स्वातंत्र्यचळवळीतील काही आठवणी सांगाल?**

**उत्तर ः** म. गांधीजींच्या सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी मला चांगले समजत होते. या चळवळीमध्ये मी सहभाग घेतला. लहान असूनही खादीचा वापर सुरू केला. स्वदेशीला महत्व दिले. जातीयतेला विरोध केला. दारूबंदी या म. गांधींच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. दलितांबरोबर सहभोजन केले.

**प्रश्न ः स्वातंत्र्यलढ्यातील सोलापुरातील वृत्तपत्रांनी जागृती कशी केली ?**

**उत्तर** ः 'कल्पतरू' हे वृत्तपत्र नसून मतपत्र होते. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य मी करीत होतो. लोकांच्या मताला किंमत होती. स्वातंत्र्य लढ्यात सोलापुरातल्या कामगारांचा उत्स्फूर्त सहभाग होता. संप, गिरणी मालकांविरूध्द लढे या विषयीची माहिती 'कल्पतरू'च्या माध्यमातून दिली. सोलापुरामध्ये दै. समाचार सुरू झाल्यानंतर त्यांचे कौतुक 'कल्पतरू'ने केले. 'कल्पतरू'ला भावंड मिळाले' असा अग्रलेख 'कल्पतरू'मध्ये प्रसिध्द झाला. दै. समाचारने देखिल समाज जागृतीचे कार्य जोमाने व नेटाने केले. जरी हे वृत्तपत्र सरकार धार्जिणे असले तरी या वृत्तपत्राने स्वातंत्र्य लढ्याच्या बऱ्याच बातम्या प्रसिध्द केल्या हे विशेष म्हणावे लागेल. गोविंद नारायण काकडे म्हणजे माझे वडिल संपादक असताना लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी 'कल्पतरू'च्या कार्यालयास भेट देऊन 'कल्पतरू'च्या कार्याचे कौतुक केले. कवि कुंजविहारी (नारायणराव कुलकर्णी सलगरकर) 'कर्मयोगी'चे संपादक रामभाऊ राजवाडे यांची बैठक 'कल्पतरू'च्या कार्यालयात नियमित असे. कर्मयागी, 'गजनफर', लोकसेवा या वृत्तपत्रांनी देखील स्वातंत्र्य लढ्याच्या बातम्या जनतेस देऊन खूप मोठी जागृती घडवून आणली.

**प्रश्न ः सोलापूरच्या समाजजीवनात वृत्तपत्रांची भूमिका काय होती ?**

**उत्तर** ः सोलापूर शहरातून 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', दै. 'सोलापूर समाचार' , 'कर्म योगी', 'गजनफर', लोकसेवा ही वृत्तपत्रे आघाडीवर होती. या सर्व वृत्तपत्रांनी सामाजिक जीवनाचा वेध घेणाऱ्या बातम्या प्रसिध्द केल्या 'कल्पतरू'ने विधवांचे प्रश्न , अस्पृश्यांच्या समस्या , कामगारांचे जीवन इ. सामाजिक विषय हाताळले. त्यामुळे काकडे कुटुंबियांना समाजाकडून खूप त्रासही सहन करावा लागला. दै. समाचारनेदेखिल बारीकसारीक सामाजिक घटनांना प्रसिध्दी देऊन लोकमान्यता मिळवली. 'कर्मयोगी' , 'गजनफर' , लोकसेवा या वृत्तपत्रांनी आरोग्य , पाणी , चोऱ्या, दरोडे , गुन्हेगारी वगैरे विषयांना प्राधान्य दिले. त्यामुळे समाजाची सर्वच वृत्तपत्रांना मान्यता होती.

**प्रश्न ः वृत्तपत्रांनी राजकीय प्रबोधन कसे केले?**

**उत्तर** ः 'कल्पतरू'ने लोकमान्य टिळक , म. गांधी यांनी केलेल्या आंदोलनाची माहिती लोकांना दिली. खादीचा वापर करा असा संदेश दिला. तसेच मार्शल लॉच्या बातम्या प्रसिध्द करून लोकप्रक्षोभ अधिक तीव्र करण्याचा प्रयत्न केला. दै. समाचारने आपल्या पत्रातून सरकारच्या विरोधी बातम्या न देता नकळत लोकांमध्ये राजकीय जागृत कशी निर्मान होईल या पध्दतीचे लेखन केले. त्यांच्या लेखनामुळे बरीच राजकीय माहिती लोकांना समजत असे. रामभाऊ राजवाडे हे आमच्या कुटुंबियांचे निकटवर्ती होते. त्यांनी आपल्या 'कर्मयोगी' या वृत्तपत्रातून झणझणीत राजकीय बातम्या प्रसिध्द केल्या. गोऱ्यांनी लोकांवर केलेला अन्याय , सोलापुरात दिनांक ८ मे रोजी झालेली दंगल आणि लोकांवर केलेले अनन्वित अत्याचाराच्या बातम्या प्रसिध्द केल्याने त्यांचा छापखाना ब्रिटिशांनी जप्त केला. कुर्बान हुसेनच्या 'गजनफर'मधून कामगारांच्या संपाच्या आणि

चळवळीच्या बातम्या प्रसिध्द होत असत. स्वत ः कुर्बान हुसेन कामगार पुढारी असल्याने त्यांची दु ःखे अधिक जवळून त्यांनी पाहिली व आपल्या पत्रातून मांडली. कॉंग्रेसचे पुढारी तुळशीदास जाधव यांनीही आपल्या लोकसेवा साप्ताहिकातून गांधी व कॉंग्रेसच्या विचारांचा प्रसार केला. या वृत्तपत्राने लोकमान्य टिळक आणि सेवाभाव, सोलापूर जिल्ह्यात खादी केंद्र , महात्माजींना तुरूंगातून पत्र अशा बातम्या प्रसिध्द केल्या.

प्रश्न ः **वृत्तपत्रांतून मार्शल लॉची माहिती कशी प्रसिध्द् झाली ?**

**उत्तर** ः मार्शल लॉ सुरू झाल्यानंतर या कायद्या अंतर्गत कोणती कलमे आहेत. त्यांचा अम्मल कसा होणार आहे. जनतेने या कायद्याचे पालन कसे करावे याविषयी तसेच कायद्याचे उल्लंघन केल्यास कोणती शिक्षा केली जाऊ शकते याची माहिती 'कल्पतरू' आणि 'कर्मयोगी'ने आपल्या पत्रातून दिली. कोणकोणत्या व्यक्तींना सोलापुरातून ब्रिटिश पोलीसांनी पकडलेले आहे याची माहिती लोकांना नव्हती. त्यावेळी आमचे बंधू व 'कल्पतरू'चे संपादक लक्ष्मण गोविंद काकडे हे खादी टोपी घालून कलेक्टर नाईट यांच्या समोर उभे राहिले. आणि म्हणाले , पकडलेल्या लोकांची यादी मला द्या. 'कल्पतरू'मध्ये प्रसिध्द करावयाची आहे. तात्यांचा करारी बाणा पाहून कलेक्टर नाईटने विना तक्रार यादी सुपूर्द केली आणि ही यादी प्रथम 'कल्पतरू'मध्ये प्रसिध्द झाली. त्यामुळे लोकांना मार्शल लॉबद्दल समाचारने देखिल मार्शल लॉची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली.

**प्रश्न ः स्वातंत्र्यपूर्वकाळातील वृत्तपत्रे आणि आजची वृत्तपत्रे यांच्यात नेमका कोणता फरक जाणवतो?**

**उत्तर ः** सोलापूर शहरातील वृत्तपत्रांनी शहरातील लोकांबरोबरच ग्रामीण भागातील लोकांना चळवळीची माहिती दिली. प्रत्येक बारीकसारीक घटना सरकारची पर्वा न करता लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य केले. जाहिराती मिळोत अथवा न मिळोत तरी सेवाभाव कायम ठेवला. अनेक वृत्तपत्रातून जाहिराती प्रसिध्द होत नसत. वृत्तपत्रे तोट्यात चालत असत. तरीही पदरमोड करून वृत्तपत्रे चालविली. हे कौतुकास पात्र आहे. आमचे 'कल्पतरू' हे वृत्तपत्रच जवळपास १०४ वर्ष चालले. पण त्यातील केवळ दोनच वर्ष ते फायद्यात चालले आणि उर्वरित सर्व काळ ते तोट्यातच चालत होते. 'कल्पतरू'चे पहिले संपादक कै. बळवंतराव काकडे हे मुळातच खूप महत्वाकांक्षी आणि व्यवहारी होते. सोलापूरसारखंच आसपासच्या जिल्ह्यातूनही आपलं वृत्तपत्र निघावं असं त्यांचं स्वप्न होतं. पण ते का अस्तित्वात आलं नाही हे माहीत नाही.

दै. समाचारनेही शंभरी ओलांडली आणि आजही ते चालू आहे. वृत्तपत्रांनी गावोगावीच्या बातम्या , व्यक्तींची नावे देऊन बातम्या थोडक्यात कशा द्याव्यात याचे तंत्र सांभाळले होते. परंतु आजच्या वृत्तपत्रांचे नेमके उलटे झाले आहे. पुढाऱ्यांच्या बातम्या छापणे, त्यांचे अनाठायी कौतुक करणे ही नित्याची बाब झाली आहे. अनेक वृत्तपत्रे पुढाऱ्यांच्या घोटाळे व गैरकारभाराच्या बातम्यादेखिल प्रसिध्द करीत नाहीत. कारण त्यांना संबंधित पुढाऱ्यांच्या वाढदिवसाच्या जाहिराती हव्या असतात. आजची वृत्तपत्रे ध्येयापेक्षा व्यवसायाला महत्व देतात. काळानुसार त्यांनी व्यवसाय करावा पण सेवाभावी वृत्तीने कार्य करणेही आवश्यक आहे.

(श्री विनायक गोविंद काकडे - मृत्यू - २२ डिसेंबर २००७)

**प्रत्यक्ष मुलाखतीच्या प्रसंगी उपस्थित -**
**श्री विनायक गोविंद काकडे**
**यांच्या स्नुषा इतिहास संशोधिका डॉ. नभा काकडे**

मुलाखत – २

## श्री जयंत बाबुराव जक्कल

(मंस्थापक नरसप्पा जक्कल यांचे नातू, माजी संपादक, 'सोलापूर समाचार', सध्या विश्व समाचारचे सल्लागार) (पत्ता : समाचार भवन, ३४0, शुक्रवार पेठ सोलापूर )

जन्म तारीख : २७/0२/१९२९

**प्रश्न : स्वातंत्र्य लढ्यातील समाचारचे व आपले सामाजिक व राजकीय योगदान कशा पध्दतीचे होते?**

**उत्तर** : 'सोलापूर समाचार'ची जबाबदारी स्वीकारल्यामुळे शिक्षण इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षातच सोडून द्यावे लागले. कोणतीही राजकीय बांधीलकी न स्वीकारता दैनिक समाचारमधून सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचविल्या. त्यामुळे समाज व राजकीय जीवनाशी जवळून संबंध आला. इंग्रजांच्या राजकीय खेळी कळू लागल्या. समाजाला इंग्रजांकडून मिळणारी वागणूक समजली. त्याचे प्रतिबिंब माझ्या लिखाणातून दै. समाचारमध्ये उमटू लागले.

**प्रश्न : स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या काही आठवणी सांगाल?**

**उत्तर** : या काळात मी वयाने लहान असलो तरी घरात नेहमी स्वातंत्र्य चळवळीतील घटना हा एकच विषय असल्यामुळे अनेक घटना ऐकण्याचे भाग्य मला लाभले. इ.स. १८६४ ते इ.स. १८८४ या काळात अहमदनगरमधून 'नगर समाचार' या नावाने प्रसिध्द

होणारे साप्ताहिक इ.स. १८८४ ते इ.स. १९३0 या काळात साप्ताहिक स्वरूपात सोलापुरात निघू लागले. इ.स. १९३0 मध्ये त्याचे दैनिकात रूपांतर झाले. या दैनिकामधून स्वातंत्र्य चळवळीतील बातम्या प्रसिध्द होत असत. त्याच्या अनेक आठवणीने माझे ऱ्हदय भरून येत आहे.

**प्रश्न ः भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सोलापुरातील तत्कालीन वृत्तपत्रांची भूमिका कोणती होती?**

**उत्तर ः** दै. समाचारच्या आधी सोलापुरात 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' या वृत्तपत्राने स्वातंत्र्य लढ्याच्या बातम्या प्रसिध्द करून स्वतःची निर्भिड वृत्तपत्र अशी ओळख करून दिली होती. इ.स. १९३0 मध्ये दै. समाचार सुरू होताच 'कल्पतरू'ने 'भावंड मिळाले' असा अग्रलेख लिहून स्वागत केले. आमच्यात कोणतीही स्पर्धा नव्हती. आमच्या वृत्तपत्राने स्वातंत्र्य चळवळीच्या बातम्या प्रसिध्द करून लोकांना प्रेरणा देण्याचे कार्य केले. वडिलांबरोबर मी देखिल वृत्तपत्र व्यवसायात काम करीत होतो. लहान असून देखिल बरीच प्रगल्भता आल्यामुळे इंग्रजांची कट कारस्थाने लोकांप्रर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. काकडेंचे 'कल्पतरू', राजवाड्याचे 'कर्मयोगी', कुर्बान हुसेन यांचे 'गजनफर' या वृत्तपत्रांनी इंग्रज सरकारला धारेवर धरले होते. लोकांना प्रक्षुब्ध करून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. आमचे वृत्तपत्र मवाळ असून देखिल इंग्रजांना छुपा विरोध करून त्यांच्या गोटातील बातम्या लोकांपर्यंत मराठीतून पोहोचविण्याचे कार्य केले. त्यामुळे राजकीय व सामाजिक जीवनात क्रांती झाली.

**प्रश्न ः सोलापुरातील सामाजिक जीवनात वृत्तपत्रांनी कोणते योगदान दिले?**

**उत्तर ः** खऱ्या अर्थाने समाजातील वाईट रूढी परंपरा लोकांसमोर वृत्तपत्रांनीच मांडल्या. समाज जीवनातील दोष दाखवून दिल्याने सुधारण्याची भावना लोकांमध्ये झाली. दै. समाचारने अनेक वाईट गोष्टींचा निषेध केला. तर 'कल्पतरू' ने विधवांच्या प्रश्नांसाठी अग्रलेख लिहिले. या पुरोगामी विचारसरणीमुळे समाजामध्ये हळूहळू परिवर्तन होईल असा आशावाद निर्माण झाला. त्यामुळे समाज जीवनाचा वृत्तपत्राने एका अर्थाने ठाव घेतला होता असे म्हणावे लागेल.

**प्रश्न ः स्वातंत्र्य चळवळीसाठी वृत्तपत्राने राजकीय प्रबोधन कसे केले?**

**उत्तर ः** आमचे वृत्तपत्र दैनिक समाचार कोणत्याही पक्षाचे नव्हते. मात्र ब्रिटिशांना अनुकुल होते. याचे कारण असे की, ब्रिटिशांकडून अनेक गुप्त बातम्या समजत होत्या. त्याचा मराठीतून वृत्तांत लोकांना सांगावा हा अनुकुलतेपाठीमागील महत्वाचा उद्देश होता. राजकीय बातम्या छापण्यामध्ये आमच्या वृत्तपत्रांप्रमाणेच 'कल्पतरू', 'कर्मयोगी', 'गजनफर' अग्रेसर होते. त्यामुळे लोकांचे चांगलेच राजकीय प्रबोधन झाले. लोकांची विचारसरणी गुलामगिरीतून मुक्त होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, अन्याय दूर झाला पाहिजे अशी भावना वृत्तपत्रांमुळेच झाली.

**प्रश्न ः मार्शल लॉच्या काळात वृत्तपत्रांची भूमिका कशी होती?**

**उत्तर ः** मार्शल लॉच्या काळात दैनिक समाचारने बंदी असूनही ब्रिटिश पोलीस व्यवस्था कशी आहे हे लोकांच्या निदर्शनास आणून दिले. सरकारला मदत करण्याची भूमिका

घेऊन त्यांच्या पुढील योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. मार्शल लॉबद्दल सविस्तर माहिती प्रसिध्द करून ब्रिटिशांच्या काळ्या कृत्यांची कल्पना लोकांना दिली. याच पध्दतीने बाकीच्या सर्व वृत्तपत्रांनी लोकांना जागरूक करण्याचे कार्य केले.

**प्रश्न ः स्वातंत्र्यपूर्वकाळातील वृत्तपत्रे आणि आजची वृत्तपत्रे यात नेमका कोणता फरक जाणवतो?**

**उत्तर** ः सोलापूर शहरातील वृत्तपत्रांनी गुणवत्ता व सेवा ही उद्दिष्टे ठेवून आपली नितीमत्ता सांभाळली होती. आमच्यात कोणतीही स्पर्धा नव्हती. ध्येय होते ते फक्त भारताला स्वातंत्र् मिळाले पाहिजे. परंतु आजच्या वृत्तपत्रांनी व्यवसायिकता हे ध्येय जोपासली आहे. वृत्तपत्रांची कामगिरी चांगली आहे परंतु पक्षाकडे झुकल्यामुळे त्यांच्या विश्वासार्ह तेबद्दल निष्कारण शंका निर्माण झाली आहे. आजच्या वृत्तपत्रांमुळेच सामाजिक व राजकीय घटना लोकाना समजल्यामुळे लोक पुरोगामी होत आहेत हे नाकारता येत नाही.

## मुलाखत – ३

## श्री माधवराव पंढरीनाथ पाटील

(ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी)

(पत्ता ः ११७, मुरारजी पेठ, पागे बंगला पार्क मैदानसमोर, सोलापूर )

**प्रश्न ः स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या काही आठवणी सांगाल?**

**उत्तर** ः स्वातंत्र् चळवळीतील घटना सांगताना मला मोठा अभिमान वाटत आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या निमित्ताने १९४२ साली मी पुणे येथे गेलो होतो. दि. ७ ऑगस्ट १९४२ ला त्यावेळचे पुण्याचे महापौर युसुफ मेहर यांचे भाषण ऐकले. त्यामुळे ब्रिटिशांविरूध्द लढण्याची प्रेरणा मिळाली. दि. ९ ऑगस्ट १९४२ ला म. गांधी, पं. नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासह शेकडो जणांना ब्रिटिशांनी अटक केली. त्यामुळे सर्वांचा संताप अनावर झाला. शेकडो विद्यार्थ्यांनी शिरूभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला. ब्रिटिश पोलीसांनी एस पी कॉलेज समोर मोर्चावर लाठीहल्ला व गोळीबार केला. त्यात अनेकजण जखमी झाले. आणि त्याच रात्री आपल्या सहकाऱ्याच्या सांडलेल्या रक्ताचा टिळा लावून मी ब्रिटिशांविरूध्द लढण्याची शपथ घेतली. आम्ही १४ विद्यार्थ्यांचा शिरू लिमये यांच्या नेतृत्वाखाली उद्ध्वस्त नावाचा ग्रुप तयार केला. खडकी येथील दारूगोळा कारखान्यातून हॅण्डग्रेड मिळविले. उद्ध्वस्त ग्रुपने हॅण्डग्रेडचे टाईम बॉम्बमध्ये रूपांतर केले. ब्रिटिश पोलीस आणि ब्रिटिश नागरिक व कॅपिटल आनि वेस्टर्न या दोन थिएटरमध्ये जात असत म्हणून आम्ही सात–आठ तरूणांनी ब्रिटिशांचा वेश परिधान करून थिएटरमध्ये प्रवेश मिळविला अत्यंत हुशारीने दोन्ही थिएटरमध्ये टाईम बॉम्ब ठेवले. त्यातील कॅपिटल थिएटरमधील बॉम्बच्या स्फोटात एक ब्रिटिश कॅप्टन व

१२ पोलीस ठार झाले. वेस्टर्न थिएटरमधील बॉम्ब फुटला नाही. दि. १८ मार्च रोजी आम्हा सर्वांना अटक करण्यात आली. न्यायलयाला पुरावे न मिळाल्यामुळे खटले मागे घेण्यात आले. पण आम्हाला दीड बर्ष येरवडा कारागृहात पाठविण्यात आले. त्यानंतर दोन वर्ष नाशिक तुरूंगात ठेवण्यात आले.

**प्रश्न ः भारताच्या स्वातंत्र्य लढयात सोलापुरातील तत्कालीन वृत्तपत्रांची भूमिका कशी होती?**

**उत्तर** ः स्वातंत्र्याची चळवळ वेगात सुरू असताना मी सोलापूर येथील पागे आजोबांकडे येत होतो. त्यावेळी 'कल्पतरू' व समाचार, 'कर्मयोगी', 'गजनफर', लोकसेवा वाचण्याची संधी मिळत असे. यातील समाचारचे धोरण इंग्रजांना अनुकुल होते. परंतु 'कल्पतरू' उघडपणे सरकारच्या विरूध्द लोकांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करीत असे. त्यांच्या अग्रलेखातून सरकारी धोरणांवर जहालपणे टीका केली जात असे. राजवाडे हे राजकीय चळवळीला पूरक असे बुलेटीन काढत असत.

**प्रश्न ः सोलापूरच्या समाज जीवनात वृत्तपत्रांनी कोणता ठसा उमटविला ?**

**उत्तर** ः 'कल्पतरू' व समाचार या वृत्तपत्राचे वाचन लोक उघडपणे करीत असत. त्यात कोणतीही गुप्तता किंवा भिती वाटत नसे. या वृत्तपत्रांनी सामाजिक जीवनात लोकांच्या ऱ्हदयाचा ठाव घेतला होता. वृत्तपत्रातून स्वातंत्र्य चळवळीच्या नवीन बातम्या येतात का यासाठी वृत्तपत्रांची लोक दररोज वाट पाहात असत. वृत्तपत्रांची किंमत देखील त्याकाळच्या मानाने जास्त असल्याने लोक समुहाने वृत्तपत्राचे वाचन करीत असत.

**प्रश्न ः सोलापूरच्या सामाजिक विकासात वृत्तपत्रांनी कोणते योगदान दिले?**

**उत्तर** ः 'कल्पतरू' वृत्तपत्राने समाजाला काय हवे हे ओळखले होते. समाजामध्ये पुरोगामी दृष्टीकोन आला पाहिजे, अंधःश्रध्दा, रूढी परंपरा नष्ट झाल्या पाहिजेत असे या वृत्तपत्राला वाटत असे. समाचारनेदेखिल सांस्कृतिक परंपरा जतन केली होती. या घटना समाजाच्या विकासास पोषक होत्या.

**प्रश्न ः तत्कालीन वृत्तपत्रांनी लोकांचे राजकीय प्रबोधन कशा पध्दतीने केले?**

**उत्तर** ः इंग्रज अन्याय व अत्याचार करीत असत. त्यांच्या विरूध्द लोकसमुहाने उठाव केला पाहिजे म्हणून 'कल्पतरू', समाचार, 'कर्मयोगी', 'गजनफर', लोकसेवा या पत्रांनी लोकांचे राजकीय प्रबोधन करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीच्या जवळ घेऊन जाण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

**प्रश्न ः चळवळ लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वृत्तपत्रे सहाय्यभूत कशी ठरली?**

**उत्तर** ः खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांनीच ब्रिटिशांपासून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रेरणा दिली होती. वृत्तपत्रातूनच स्वातंत्र्य चळवळीतील बारीक सारीक घटना लोकांना समजत होत्या. बातम्या वाचूनच लोक समुहाने चर्चा करीत होते. त्यामुळे चळवळीचे महत्व लोकांना समजू लागले.

**प्रश्न ः मार्शल लॉ च्या काळात वृत्तपत्रांनी कशी लोक जागृती केली ?**

**उत्तर** ः या काळात सोलापूरमध्ये ब्रिटिशांची पूर्णपणे दहशत होती. तरीही शहरातील वृत्तपत्रांनी या कायद्याबद्दलची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. त्यामुळे निदान लोकांना हा कायदा कसा आहे हे तरी कळाले.

**प्रश्न ः स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे आणि आजची वृत्तपत्रे यात नेमका कोणता फरक जाणवतो?**

**उत्तर** ः सोलापूर शहरातील वृत्तपत्रांनी लोकांना प्रेरणा दिली. त्याकाळातील वृत्तपत्रे राजकीय आणि सामाजिक प्रबोधन करीत असत. वेळप्रसंगी सरकारवर टीका करण्यासही ते मागेपुढे पाहात नसत. त्यामुळे लोकप्रबोधनाच्या दृष्टीने त्यांचे महत्व व्यापक होते. आजच्या वृत्तपत्रांनी देखील व्यावसायिकता सांभाळत लोकचळवळीचे कार्य सरकारपर्यंत पोहोचविण्यात यश मिळवले आहे. आजची वृत्तपत्रे व्यवसायिक झाली आहेत हे नाकारता येत नाही. परंतु वृत्तपत्रांनी तांत्रिक सुविधांचा वेध घेऊन व्यवसायिकतेतून कल्पकता साधण्याचा प्रयत्न केला आहे. मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक, आरोग्य विषयक बातम्या प्रसिध्द करण्यावर भर दिला आहे. त्यांच्याकडून ते जाहिरातीची अपेक्षा करीत नाहीत हे विशेष म्हणावे लागेल. वृत्तपत्रांच्या पानांची संख्या वाढली आहे. आजच्या वृत्तपत्रांचे कार्य प्रशंसनीय आहे.

(**श्री**.माधवराव पाटील - मृत्यू - १२ नोव्हेंबर २०१२)

**प्रत्यक्ष मुलाखतीच्या प्रसंगी उपस्थित -**

**ज्येष्ठ राजकीय समीक्षक, विचारवंत**

**डॉ. श्रीकांत येळेगांवकर**

**प्रमुख कार्यवाह, हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर**

## मुलाखत – ४

## श्री शंकरलाल देवीचंद जाजू

(ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व तत्कालीन लढ्याचे अग्रणी रामकष्ण जाजू यांचे पुतणे)

(पत्ता ः वालचंद इंजिनिअरींग कॉलेजमागे, स्वातंत्र्य सैनिक नगर, सोलापूर )

**प्रश्न ः स्वातंत्र्य चळवळीतील आपला व आपल्या काकांचा सहभाग कसा होता? त्यावेळेसच्या काही आठवणी सांगाल?**

**उत्तर** ः माझे काका रामकृष्ण जाजू हे टिळक चौकातील लक्ष्मी मंदिराच्या पाठीमागे शहर कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयात पक्षाचे अध्यक्ष या नात्याने कार्यात मग्न होते. त्यांच्या शेजारी राधाकृष्ण लोहिया व राम भाळवणकर हे दोन सहकारी बसलेले होते. अशावेळी अचानक ब्रिटिश सैनिकांनी कार्यालयात प्रवेश केला. त्यांनी काकांवर बंदुक रोखून गांधी टोपी काढण्याची सक्ती केली. परंतु काकांनी ती काढली नाही. चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना पाच वर्षाची कैद व दोन हजार रूपये दंड झाला. दंड न भरल्यास दोन वर्ष जादा शिक्षा सुनावण्यात आली. गांधी – आयर्विन कराराच्या तरतुदीनुसार काकांची सुटका करण्यात आली.

काकांपासून प्रेरणा घेऊन मी देखील स्वातंत्र्य चळवळीत गुप्तपणे सार्वजनिक शौचालयात व भिंतीवर बुलेटिन लावत असे. या बुलेटिनमध्ये विडंबनात्मक मजकूर, चित्रे, मार्मिक उतारे असत. त्यासाठी मला पोलीस स्टेशनमध्ये नेऊन अनेकवेळा मारहाण करण्यात आली. तरीदेखील आमचे कुटुंब चळवळीत अग्रेसरच राहिले.

**प्रश्न ः भारताच्या स्वातंत्र्य लढयात सोलापुरातील तत्कालीन वृत्तपत्रांची कामगिरी कशी होती?**

**उत्तर** ः 'कल्पतरू' हे भारदस्त वृत्तपत्र होते. काकडे घराणे उच्च असल्याने त्यांच्या शब्दांवर लोकांचा विश्वास होता. समाचार हे नेमस्तवादी वृत्तपत्र असले तरी त्यांची कामगिरी चळवळीच्या बाबतीत आघाडीवर होती.

**प्रश्न ः सोलापूरच्या समाज जीवनात वृत्तपत्रांची भूमिका कशा पध्दतीची होती?**

**उत्तर** ः वृत्तपत्रांनी त्याकाळात अंगावर शहारे आणणारे वृत्त छापून समाज जीवनात देशप्रेमाची बीजे रोवण्याचे काम मोठ्या हिमतीने केले.

**प्रश्न ः सोलापूरच्या सामाजिक विकासात कोणते योगदान दिले?**

**उत्तर** ः 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त', समाचार यांनी समाजातील बारीक सारीक घटनांना प्रसिध्दी देऊन जागृती घडवून आणली. सत्याग्रहाच्या बातम्या छापून समाजाचा विकास अहिंसात्मक मार्गाने होतो हे दाखवून दिले.

**प्रश्न ः तत्कालीन वृत्तपत्रांनी लोकांचे राजकीय प्रबोधन कशा पध्दतीने केले?**

**उत्तर** ः शहरातील 'कल्पतरू' या वृत्तपत्रांने ब्रिटिशांच्या विरोधी भूमिका घेऊन समाजाला संघटित करण्याचे कार्य केले. समाचार हे वृत्तपत्र सरकार पक्षाला अनुकुल असे होते. या वृत्तपत्राने हिंदू – मुसलमान तसेच इतर समाजामध्ये राजकीय जागृती व्हावी यासाठी

प्रयत्न केले. ही वृत्तपत्रे ग्रामीण भागापर्यंत जात होती. त्यामुळे राजकीय चळवळीबद्दल लोकांच्या मनात समर्पणाची भावना निर्माण झाली.

**प्रश्न ः मार्शल लॉची माहिती वृत्तपत्रांनी कशी दिली?**

**उत्तर** ः हा लष्करी कायदा होता. या कायद्याची माहिती वृत्तपत्रांनीच लोकांना करून दिली. कायदा लागू होताच सोलापुरामध्ये शांतता निर्माण झाली. लोकांचे जनजीवन सीमित झाले. परंतु विजापूर वेशीत मात्र जनजीवन पूर्ववत होते. कुर्बान हुसेन हा बोहरी जातीचा. मल्लप्पा धनशेट्टी हा लिंगायत, जगन्नाथ शिंदे हा मराठा तर श्रीकिसन सारडा ही गर्भ श्रीमंत व्यक्ती मारवाडी समाजातील होती. त्यांना ब्रिटिशांनी अतिशय क्रुरपणे वागविले. शरीराला चटके देणे, मारहाण करणे, उलटे टांगून बांधणे अशी अमानुष वागणूक दिली जात होती. त्यामुळे जनजीवन प्रक्षुब्ध झाले.

**प्रश्न ः स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे आणि आजची वृत्तपत्रे यात नेमका कोणता फरक जाणवतो?**

**उत्तर** ः त्या काळातील वृत्तपत्रातील बातम्यांमुळे राष्ट्रप्रेम जागृत होत असे. लोक खुलेआम वृत्तपत्र वाचत होते. नवाकाळ, ज्ञानप्रकाश, केसरी, ‘कल्पतरू’, समाचार, ‘कर्मयोगी’ यांनी ध्येयवादी पत्रकारिता जोपासली होती. बातम्या छापण्यासाठी पैसे घेतले जात नसत. केसरी सोलापुरात पोस्टाने येत असे. तो मी पाहिला आहे. आजच्या वृंत्तपत्रांनी तंत्रज्ञानामध्ये प्रगती केली आहे. परंतु व्यावसायिकतेला प्राधान्य देऊन समाजसेवेचे व्रत अंगीकारले आहे. त्यामुळे अधूनमधून स्वातंत्र्यपूर्वकाळातील घटनांचा आढावा प्रसंगानुसार देण्याकडे आजच्या वृत्तपत्रांचा कल आहे.

## मुलाखत – ५

## श्रीमती निर्मलाताई शंकरराव ठोकळ

(माजी आमदार, व स्वातंत्र्य सैनिक तुळशिदास जाधव यांच्या कन्या)

(पत्ता ः एस टी स्टॅण्ड नजीक, लोभा मास्तर चाळीसमोर, सोलापूर )

**प्रश्न ः स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या वडिलांचा सहभाग कसा होता? त्यावेळेसच्या काही आठवणी सांगाल?**

**उत्तर** ः स्वातंत्र्य चळवळीच्या काळात मी अवघी नऊ वर्षाची होते. त्यावेळेसच्या काही आठवणी पुसटशा माझ्या लक्षात आहेत. माझे वडिल स्वातंत्र्य सैनिक तुळशिदासजी जाधव हे या सर्व लढ्यात आघाडीवर होते. त्यांच्या जीवनातील सर्वात कसोटीचा क्षण होता तो मेकॅनिकी चौकातील. या प्रसंगाला स्वातंत्र्याच्या इतिहासात फार मोठे स्थान आहे. त्याचे काय झाले, माझे वडिल नेहमी गांधी टोपी घालून सार्वजनिक कार्यात व स्वातंत्र्याच्या कार्यात वावरत असत. प्रभात फेरी काढणे, चौका चौकात सभा घेणे, लोकांचे प्रबोधन करणे अशा अनेक मार्गांनी त्यांनी आपले कार्य सुरू केले होते. गांधी टोपी ही त्यांची ओळख बनली होती. एकदा मेकॅनिकी चौकात ब्रिटिश सोल्जरांनी डोक्यावरची गांधी टोपी काढण्याचा आदेश दिला. गांधी टोपी काढली नाही तर प्राणास मुकावे लागेल म्हणून बंदुक रोखून धरली. परंतु या गंभीर आणि जीवावर बेतणाऱ्या प्रसंगीदेखील त्यांनी आपली टोपी काढली नाही. त्यामुळे त्यांना अटक करून शिक्षा करण्यात आली. इ.स. १९४२ च्या चलेजाव आंदोलनात सहभागी झाल्यामुळे त्यांना येरवड्याच्या तुरूंगात पाठविण्यात आले. तेथे आम्ही कुटुंबिय त्यांना भेटण्यासाठी आम्ही जात होतो. जेलमध्ये मोठी घंटा होती. राजकैद्याप्रमाणेच दादांना वागविले जात असे.

माझ्या बहिणीचा विवाह माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्या बरोबर करण्याची संमती दादांनी येरवड्याच्या तुरूंगात असताना भोसले यांना सुताचा हार घालून दिली. दादांनी लोकसेवा साप्ताहिक या नावाने स्वतःचे वृत्तपत्र सुरू केले. सीताराम साळुंके हे या साप्ताहिकाचे संपादक होते. या वृत्तपत्राने सामाजिक व राजकीय चळवळीच्या बातम्या छापून मोठी जागृती केली.

**प्रश्न ः भारताच्या स्वातंत्र्य लढयात सोलापुरातील तत्कालीन वृत्तपत्रांची भूमिका कशी होती?**

**उत्तर** ः स्वातंत्र्य चळवळीतील घटनांचा आढावा त्यावेळची वृत्तपत्रे घेत असत. लोकांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण व्हावी म्हणून बातम्या छापल्या जात असत.

**प्रश्न ः सोलापूरच्या सामाजिक विकासात कोणते योगदान दिले?**

**उत्तर** ः समाजाचा विकास व्हावा म्हणून पुरूष व स्त्रियांच्या कार्याला वृत्तपत्राने समान संधी दिली होती. माझ्या बहिणीचा सूत कताई स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याची बातमी 'कल्पतरू' आणि लोकसेवा साप्ताहिकाने छापली होती. तिला सूत कताई स्पर्धेत बक्षीसही मिळाले होते. या घटना सामाजिक विकासास पोषक होत्या.

**प्रश्न ः तत्कालीन वृत्तपत्रांनी लोकांचे राजकीय प्रबोधन कशा पध्दतीने केले?**

**उत्तर** ः दादांना अटक झाल्याची बातमी त्यावेळच्या वृत्तपत्रांनी छापली. त्यामुळे लोकांना राजकीय चळवळीसाठी प्रेरणा मिळाली. वृत्तपत्रांमुळेच राजकीय प्रबोधनाला गती मिळाली असे दादा सांगत असत.

**प्रश्न ः स्वातंत्र्य चळवळ लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वृत्तपत्रे सहाय्यभूत कशी ठरली?**

**उत्तर** ः 'कल्पतरू', समाचार, 'कर्मयोगी', लोकसेवा या वृत्तपत्रांनी लोकांमध्ये जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांकडून होणाऱ्या अन्यायाची खबर तसेच कॉंग्रेसच्या नेतेमंडळींनी ब्रिटिशांविरूध्द घेतलेला प्रवित्रा सविस्तर लोकांपर्यंत पोहोचविण्यात तत्कालीन वृत्तपत्रे यशस्वी झाली.

**प्रश्न ः स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे आणि आजची वृत्तपत्रे यात नेमका कोणता फरक जाणवतो?**

**उत्तर** ः आजची वृत्तपत्रे व्यवसायिक झाली असली तरी त्यांनी समाजसेवेचा वारसा जोपासला आहे. वृत्तपत्रांना सुट्टी असेल तर लोकांना करमत नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्याकाळातील वृत्तपत्रांनी सतीचे वाण म्हणून लोकसेवा केली. अत्यंत खडतर परिस्थितीत लोकांपर्यंत जाऊन स्वातंत्र्याबद्दल आस्था निर्माण करण्याचे काम केले.

## मुलाखत – ६

## मौलासाहेब मक्तुमसाहेब आहेरवाडी

(ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक)

(पत्ता : मोमीन नगर नूतन बाशा मुजावर यांचे घर, हैद्राबाद रोड, मुळेगांव रस्ता सोलापूर)

जन्म तारीख : १३/०१/१९०४ सध्या वय १०७

**प्रश्न : स्वातंत्र्य चळवळीतील काही आठवणी सांगाल?**

**उत्तर** : मी स्वातंत्र्यपूर्वकाळात सोलापूरच्या चारही हुतात्म्यांसोबत काम केले आहे. ब्रिटिशांचा अन्याय अत्याचार सहन केला आहे. मी स्वत: पैलवान असल्यामुळे परिसरातील लोक मला 'पैलवान' असेच म्हणत. इ.स. १९३० साली देशभर ब्रिटिशांविरूध तीव्र लढा उभारण्यात आला होता. सोलापुरातदेखील मोठे आंदोलन सुरू झाले होते. ब्रिटिशांच्या विरोधात सोलापुरातील ७ ते ८ हजार लोकांनी राजेंद्र चौकात आंदोलन करून तेथील न्यायालय जाळले होते. ही घटना दिनांक ६ मे १९३० रोजी घडली. त्यानंतर दि. ७ मे रोजी वरळे गांव येथील शिंदीच्या बनातील झाडे तोडण्यात आली होती. ब्रिटिशांविरूध्द पेटून उठलेल्या सोलापूरकरांनी आपला मोर्चा मंगळवार पेठ येथील पोलीस चौकीकडे वळविला त्याठिकाणी ड्यूटीवर असलेल्या हवालदार जाफर पापा याला पात्यात घालून वरून रॉकेल ओतून जिवंत जाळण्यात आले याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी मि. नाईट यांनी घटनास्थळी भेट दिली. तेंव्हा मी स्वतः त्यांना तिरंगा झेंड्याने फटका मारला. तुला पहिला हुद्दा मिळेल असा नाईट यांनी दम दिला. ही भाषा मला समजली नाही. मात्र मला प्रथम आरोपी करणार हे लक्षात आले. त्यानंतर मला

अटक करण्यात आली. ब्रिटिशांच्या बुटाच्या लाथा, काठ्या खाऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात योगदान दिल्यामुळे जीवन कृतकृत्य वाटते.

**प्रश्न ः भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सोलापुरातील वृत्तपत्रांची भूमिका कशी होती?**

**उत्तर** ः सोलापुरातून काकडेंचे 'कल्पतरू' निघत होते. ते शहरात खूपच लोकप्रिय होते. जक्कलांचे दैनिक समाचार ग्रामीण भागात जात होते. लोक अदाणी होते. एखाद्याला वाचता येत असेल तर तो सर्वांना एकत्र करून बातमी वाचून दाखवित असे. त्यामुळे लोकांना दैनंदिन घटना समजत असत. पुढे काय करावयाचे याचे नियोजन करणे वृत्तपत्रांमुळेच शक्य झाले. रामभाऊ राजवाडे हे तर माझे सहकारी होते. त्यांचाही कर्म यागी या नावाचे वृत्तपत्र निघत असे. आम्ही सर्व सहकारी त्यात कोनापुरे, अंत्रोळीकर मिळून नेहमी राजवाडे यांना इंग्रजांच्या हालचालीबद्दल विचारत असू. तुळशीदास जाधव यांचे लोकसेवा हे वृत्तपत्र निघत होते. ते सुध्दा माझेच सहकारी होते. एकूणच वृत्तपत्रांमुळे जनजीवन प्रभावीत झाले होते. स्वातंत्र्य चळवळीला गती मिळाली होती.

**प्रश्न ः सोलापूरच्या समाज जीवनात तत्कालीन वृत्तपत्रांनी कोणत्या वृत्तास प्राधान्य दिले?**

**उत्तर** ः 'कल्पतरू', समाचार , 'कर्मयोगी' या वृत्तपत्रांतून समाजातील अंधःश्रध्दा, रूढी परंपरा, चाली रीती इ.च्या बातम्या प्रकाशित होत असत. या बातम्या कुटुंबातील सर्वा ंना समजाव्यात म्हणून कुटुंब प्रमुख चौकामध्ये जाऊन बातम्यांची खबरबात घरामध्ये घेऊन येत असत. त्यामुळे समाजात काय चालले आहे याची माहिती प्रत्येक घरातील सदस्यांना होत असे.

**प्रश्न ः तत्कालीन वृत्तपत्रांनी सोलापुरातीला लोकांचे राजकीय प्रबोधन कसे केले?**

**उत्तर** ः ब्रिटिशांच्या काळात सोलापुरात फक्त गोंधळच माजला होता. आम्ही सध्याच्या कौतम चौकातील बसवेश्वर पुतळ्याजवळ राहात होतो. तेथे आमचे घर होते आणि जवळच दैनिक समाचारचे कार्यालय आणि काही अंतरावर 'कल्पतरू' चे कार्यालय होते. त्यामुळे वृत्तपत्रातील बातम्या आम्हाला सर्वात आधी समजत होत्या. वृत्तपत्रांनी त्याकाळात शिंदीच्या बनात तोडलेल्या झाडांची बातमी, ब्रिटिशांविरूध्द सोलापूरकरांनी काढलेला मोर्चा, कलेक्टर नाईट यांनी केलेला अत्याचार तसेच ब्रिटिशांनी मार्शल लॉच्या काळात दिसताक्षणी गोळ्या घातल्यामुळे ठार झालेल्या व्यक्तींची नांवे दिल्यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले आणि राजकीय प्रबोधनाला गती मिळाली.

**प्रश्न ः स्वातंत्र्य चळवळ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रे साहाय्यभूत कशी ठरली? आपल्याला काय वाटते?**

**उत्तर** ः स्वातंत्र्य चळवळीच्या काळात आधुनिक काळाप्रमाणे जनसंपर्काची साधने नव्हती. त्यामुळे वृत्तपत्रांना समाज जीवनात खुपच महत्व प्राप्त झाले होते. अत्यंत निर्भि डपणे सोलापुरातील चार - पाच वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या विरोधात बातम्या छापून ब्रिटिशांविरूध्द जनमत प्रक्षुब्ध केले. लोकांनी वृत्तपत्रातील बातम्यांवर विश्वास ठेवला. वृत्तपत्रांचे संपादक अत्यंत कडक व जहाल मतवादी असल्यामुळे ते कलेक्टर नाई टलादेखील जाब विचारत असत. त्यांच्याकडून चळवळीच्या बातम्या मिळवत असत. मार्शल लॉच्या काळात बारीकसारीक घटना 'कल्पतरू' ने आपल्या वृत्तपत्रातून मांडल्या. त्यामुळे कोणा कोणाला कैद केले आहे हे समजत असे. मी येरवडा तुरूंगात होतो. निर्दो

ष सुटल्यानंतर वृत्तपत्रांची कामगिरी लोकांनी मला सांगितली. षावरून निश्चितच वृत्तपत्रांमुळे स्वातंत्र्य चळवळ लोकांपर्यंत पोहोचली.

**प्रश्न ः मार्शल लॉ च्या काळातील आपले योगदान सांगाल ?**

**उत्तर** ः इ.स. १९३० साली ब्रिटिशांविरूध्द तीव्र आंदोलन सुरू झाले. त्यावेळी सध्याच्या बसवेश्वर पुतळ्याजवळ तीन – चार पोलीसांना मी स्वतः गटारीमध्ये ढकलून दिले. मी पैलवान असल्यामुळे माझी तब्येत देखणी होती. पोलीसांना ढकलताच लोक पळत आले. हे पाहून बाकीचे युरोपियन पोलीस समाचार कार्यालयाकडे पळून गेले. तेंव्हा कलेक्टर नाईट यांनी तुम्ही पोलीसांना का मारता, तुमच्या भावना मी इंग्लंडच्या राणीला कळवितो त्यासाठी तुमचे नेतृत्व करणाऱ्या ५ – ६ लोकांची नावे द्या असे सांगितले. तेंव्हा त्यांच्यावर विश्वास ठेवून मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे मल्लप्पा कोनापुरे आणि माझे अशा सहा जणांची नांवे देण्यात आली. आम्हाला बोलावण्यात आले मात्र नाईट यांनी धोका दिला. त्यांनी रात्री मोठ्या प्रमाणावर मिलिटरी बोलावून घेतली. दिनांक ११ मेच्या दरम्यान मार्शल लॉ लागू करण्यात आला. दिसताक्षणी गोळी घालण्याचे आदेश ब्रिटिश सरकारने दिले होते. त्यात माणिकचंद शहा, लोखंडे, सारला, भोले बाबा, शंकर सिद्राम शिवदारे, थोरात, स्वामी, लोहार अशा एकूण २० लोकांना गोळ्या घालण्यात आल्या. आहेरवाडी येथील माझे घरदार ब्रिटिशांनी जाळून टाकले. आम्हाला अटक झाली. न्यायालयासमोर उभे करण्यात आले. त्यानंतर आमची रवानगी पुणे येथिल येरवडा जेलमध्ये करण्यात आली. मी आणि माझे मित्र मल्लप्पा कोनापुरे हे दोघे एकाच गावचे असल्याने गावच्या लोकांनी न्यायालयात अपील केले. वकील संगनबसप्पा यांनी युक्तीवाद करून आम्ही कॉंग्रेसचे कार्यकर्ते नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर दिनांक २७ डिसेंबर १९३० रोजी दोघांना

न्यायालयाने निर्दोष सोडून दिले. मात्र मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, कुर्बान हुसेन आणि जगनाथ शिंदे यांना दिनांक १२ जानेवारी १९३१ रोजी येरवडा येथे फाशी देण्यात आली.

अटक झाल्यानंतर सहा जण येरवडा येथील सहा नंबर ब्लॉकमध्ये महिनाभर होतो. तेथे कोणालाही येऊ दिले जात नसे. मातीच्या मडक्यामध्ये गंजी दिली जात असे. त्यावेळी आम्ही सोलापूरबद्दल खुप काही बोलत होतो. वृत्तपत्रांबद्दलदेखील चर्चा होत असे. परंतु माझे दुर्दैव असे की चार हुतात्म्यांसोबत मला फाशी झाली नाही याची खंत वाटते. मी आजही नेहमी हुतात्मा चौकात जाऊन चार हुतात्म्यांसमोर उभा राहातो. माझ्या भावना व विचार त्यांच्यासमोर व्यक्त करतो. यमेश कादर व हमीद पैलवान या माझ्या दोन मुलांचा मृत्यू झाला. मला चार मुली आहेत. त्या जिवंत आहेत. माझी नातवंडे पुणे व सोलापूर येथे आहेत. मोमीन नगर येथील माझी मुलगी नूतन बाशा हिच्या घरात मी राहातो. मला शासनाकडून पेन्शन मिळते. स्वातंत्र्य सैनिकाचा कोणताही लाभ मी मिळवला नाही. तशी कोणाकडे विनंती केली नाही. आज माझी तब्येत चांगली आहे. परंतु काही दिवसानंतर माझा अंत होईल मात्र देशासाठी माझे बलिदान गेले नाही याची खंत मला मरेपर्यंत राहील असे भावनिक मत त्यांनी मुलाखतीच्यावेळी व्यक्त केले.

**प्रश्न ः स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे आणि आजची वृत्तपत्रे यात नेमका कोणता फरक जाणवतो?**

**उत्तर** ः स्वातंत्र्य चळवळीच्या काळात चार हुतात्म्यांबरोबरच मी जवळजवळ सर्व स्वातंत्र्य सैनिकांबरोबर काम केले आहे. त्यांचे विचार ऐकले आहेत. माझे शिक्षण सातवीपर्यंत झाल्यामुळे वृत्तपत्रातील बातम्यांचे मला चांगलेच आकलन होत असे.

काकडे व जक्कल तसेच जाधव यांच्या वृत्तपत्रातून झेंडा वंदन, खादी वापरा, विधवा विवाह, भोंदूगिरी, समाजातील अनिष्ट रूढी यासंदर्भातील बातम्या येत असत. या बातम्यांचे मूल्य फार मोठे होते. वृत्तपत्रे फार तोट्यात चालत असत. वृत्तपत्रे विकत घेण्यासाठी लोकांकडे पैसे नसत. परंतु प्रत्येक गल्लीत किमान तीन ते चार जण वृत्तपत्र विकत घेत असत. त्यांचे वाचन झाल्यानंतर एखादी व्यक्ती हे वृत्तपत्र बाहेर आणून उत्सुकतेपोटी लोकांना वाचून दाखवत असत. एकाकडून दुसऱ्याकडे बातम्यांचे प्रसारण होत असे. त्यात थोड्याशा मसालेदार गमती जमती देखील मिसळल्या जात असत. त्यामुळे यापुढे इंग्रजांविरूध्द लढले पाहिजे अशी लोकांची भावना होत असे. आज युग बदलले आहे. वृत्तपत्रांची संख्या वाढली आहे. वृत्तपत्रे विकत घेऊन वाचली जात आहेत. दूरदर्शनवरून दर तासाला नवीन बातमी मिळते का याकडे लोकांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. एका अर्थाने जनजागृती झपाट्याने होत आहे. अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, मंत्र्यांकडून अधिकाराचा दुरूपयोग इत्यादी घटना जनतेला समजू लागल्या आहेत. एका अर्थाने देश स्वतंत्र झाला असला तरी प्रचंड हव्यासापोटी देशाची अवहेलना झाली.

परंतु आमचे कष्ट व्यर्थ जाणार नाहीत. भारत देश महासत्ता होईल यावर माझा विश्वास आहे. त्यावेळी मी असेन किंवा नसेन परंतु हे सर्व स्वातंत्र्य लढ्यामुळे आणि त्यातील योध्द्यांमुळे घडले याची जाण भारतीयांनी ठेवावी एवढीच अपेक्षा व्यक्त करतो.

## परिशिष्ट – १

## निवडक अग्रलेख – १

## ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’

# हिंदु मुसलमान व लखनौ करार!

सायमन कमिशन नेमल्यानंतर हिंदी लोकांनी बहिष्कार घालविण्याची चळवळ जोरात चालू ठेवली आहे. कमिशनवर नेमण्या योग्य असा कोणीच हिंदी गृहस्थ विलायतेतील हुजुर पक्षास आढळून आला नाही. असे म्हणण्यापेक्षा सध्याच्या हिंदु मुसलमान समाजात जी दृष्टी दिसून येत आहे. मग ती धार्मिक, राजकीय कारणांमुळे असो किंवा धूर्त राजकारणी ब्रिटिश मुत्सद्यांनी कुटील नितीने उत्पन्न केलेली असो – तिचा फायदा घेऊन पूर्णपणे गोरे कमिशन नेमण्यात आले आहे हे खरे. हिंदु मुसलमानातील दुहीचा हा जो गैरवाजवी फायदा ब्रिटिश साम्राज्यवादी मुत्सद्दी घेत आहेत तो त्यांना घेता येऊ नये एवढ्या करीता या दोन्ही समाजाने एकमुखी अशी राज्यघटना ठरवावी असे स्वराज्यप्रेमी हिंदी पुढाऱ्यांना वाटणे व त्याप्रमाणे कृती करण्यास लागणे जरूरीचे आहे हे कोणाच्याही लक्षात येणे साहजिक आहे व अशा प्रकारचे प्रयत्न सध्या चालू आहेत. हे पाहून कोणही हिंदी वासियांस आनंदच वाटेल.

हिंदू मुसलमानातील दिसणारी ही दुही ही राजकीय आहे का धार्मिक आहे याचा विचार केल्यास ही दुही राजकीय कारणांमुळे उत्पन्न झालेली आहे व त्या राजकीय परिस्थितीस उत्तर देण्याकरीता मुसलमान समाजाने अज्ञ समाजाच्या सहाय्याने धार्मिक वातावरणात धुमाकूळ घातला आहे. थोडा विचार केल्यास हे धार्मिक दुहीचे वारे उत्तर हिंदुस्थानातच जोरात आहे हे दिसून येईल. दक्षिणेतील मुसलमान समाजास चिथावणी देणारे मुल्ला मौलवी बहुदा उत्तर हिंदुस्थानातून आलेले असतात. मग साहजिकच असा प्रश्न उत्पन्न होतो की उत्तर हिंदुस्थानात राजकीय का होईना पण दुही तीव्र स्वरूपात का

असावी? बंगालात.मुसलमानांची संख्या शेकडा ५० असता त्यांच्या वाट्यास प्रतिनिधी शेकडा ४० दिले व पंजाबात मुसलमान शेकडा ५५ असता त्यांच्या वाट्यास शेकडा ५० प्रतिनिधी दिले गेले. अर्थात लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा थोडे कमी प्रतिनिधी या प्रांतात मुसलमानाला दिले गेले पण याच्या ऐवजीच्या प्रांतात मुसलमान समाज अल्पसंख्य आहे त्या प्रांतात मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक प्रतिनिधी दिले आहेत. मुंबई ईलाख्यात मुसलमानांची संख्या शेकडा २० – २२ असतां प्रतिनिधी शेकडा ३० या प्रमाणात, तर संयुक्त प्रांतात मुसलमानांच्या संख्येच्या दुप्पट प्रतिनिधी दिले आहेत. मद्रास ईलाख्यात मुसलमानांची लोकसंख्या शेकडा ६ असता त्यांच्या वाट्यास प्रतिनिधींची संख्या शेकडा १५ अशी दिली आहे. सारांश काय की, बंगाल व पंजाब या प्रांतात मुसलमानांच्या प्रतिनिधींचे प्रमाण थोडे कमी आहे, परंतु त्याऐवजी इतर प्रांतात त्यांना सवलती फारच दिलेल्या आहेत. राष्ट्रीय पुढाऱ्यांनी त्यावेळी दूरदर्शीपणानेच एकमुखी मागणी करता हे धोरण स्वीकारले व म्हणूनच माटफर्ड कमिशनच्यावेळी हिंदु मुसलमानांच्या दुहीचा प्रश्न पुढे आला नाही व थोडी का होईना राज्यकारभाराची प्रत्यक्ष जबाबदारी हिंदी लोकांच्या पदरी पडली.

सध्या मुसलमानांना पंजाब व बंगाल प्रांतात आपले बहुमत हवे आहे. पण लखनौचा करार बदलल्याशिवाय ही गोष्ट सुखासुखी त्यांच्या पदरात कशी पडणार? पंजाब व बंगाल येथे लोकसंख्या प्रमाणात प्रतिनिधी पाहिजे असते तर प्रांतातही लोकसंख्या प्रमाणात प्रतिनिधी घ्यावयास पाहिजेत. पण इतर प्रांतात आपले प्रतिनिधी कमी होणे कसे रूचणार? अर्थात ज्यावेळी मुसलमान जोरात बोलत असत त्यावेळी इतर प्रांतात मुसलमानांचे प्रतिनिधी आहेत तितकेच असावेतच, शिवाय पंजाब व बंगाल या प्रांतात आमचे बहुमत असावे – तर सर्व हे हिंदी समाजाला पटेल व मुसलमानांची दोन प्रांतातील बहुमताची कुरकुरही अजिबात नाहीशी होईल. परंतु असे म्हणण्यास आज मुसलमान समाज कसा तयार होईल? सरकार आपल्या बाजुचे आहे असे जोपर्यंत

मुसलमान बहुजनसमाजास वाटते तोपर्यंत जास्तीत जास्त स्वार्थ साधून घेतला पाहिजे. अशा प्रकारची वृत्ती राहणे मनुष्यस्वभावास अनुसरूनच नाही काय? सरकार जर अवास्तव मुसलमान समाजाला महत्व देणार नाही तर आम्ही म्हणतो तशा प्रकारचा करार होण्यास सुलभता आली असती. परंतु अशी स्थिती नाही. हे धडधडीत सत्य आहे. त्यातून राष्ट्रीय वळणी मुसलमान पुढारी कोणता मार्ग चोखाळीत आहेत त्या विषयीचा विचार स्थळ संकोचास्तव पुढे करू.

**(संपादकीय ः 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त' रविवार तारीख २९ माहे जानेवारी सन** १९२८)

## निवडक अग्रलेख – २

## 'कल्पतरू' आणि 'आनंदवृत्त'

# प्रतिसहकार पक्ष व बहिष्कार!

सायमन कमिशनच्या बहिष्काराच्या बाबतीत आत्तापर्यंत जे वाङमय, लेख व ठराव बाहेर पडले आहेत व प्रत्यही पडत आहेत त्यावरून एक गोष्ट निर्विवाद सिध्द होत आहे की, हा बष्किार केवळ शाब्दीक बुजगावणे नसून देशातील जबाबदार पुढाऱ्यांच्या मनास हा अपमान बाणासारखा लागून राहिला आहे. इतर बाबतीत जरी या पुढाऱ्यां – पुढाऱ्यांमध्ये मेळ दिसून येत नाही, उलट अधिकारी वर्गास गुदगुल्या होण्यासारखेच प्रदर्शन होते तरी या बहिष्काराच्या बाबतीत मात्र अंतःकरणापासूनचे एकमत आहे यांत शंका नाही. ना. सप्रु, चिंतामणी, सेटलवाड, कुंझरू, मोरोपंत जोशी अन् सुभेदार प्रभृति प्रागतिक पुढारी यांची या बाहिष्काराची भाषणे वाचली असता अधिकारी वर्गास सुध्दा त्यांच्या कल्पनेच्या बाहेर या बहिष्कारावरच्या चळवळीस पाठिंबा देशात मिळत आहे हे सांगावयास नको. त्याचप्रमाणे हिंदु महासभेचे प्रवर्तक मालवीयजी, मुंजे, अणे प्रभृति मंडळींनीही ही चळवळ यशस्वी करण्याचा विडा उचलला आहे. कॉंग्रेस पक्ष, स्वराज्य पक्ष व स्वतंत्र पक्ष या तिघा पक्षांनी आपले धोरण जाहीर केलेच आहे. खिलाफत व मुस्लिम लीग यांनीही बहिष्कार शक्य तितका जोराने पुकारला असून आता ब्राह्मणेतर पक्षाच्या परिषदेकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. मध्यंतरी पंजाब मुस्लीम लीग कलकत्त्याचे काही मारवाडी व ब्राह्मणेतरांपैकी काही सरकार कच्छपि पुढारी यांनी जरी विरोध दाखविला असला तरी बहिष्कारास अनुकुल अशी जी प्रचंड लाट धीमेपणाने पसरत चालली आहे. त्यापुढे या किरकोळ प्रवाहांचा फारसा टिकाव लागणे शक्य नाही व हीच गोष्ट आता ब्रिटिश मुत्सद्दी, अधिकारी व इंग्रजी वर्तमान पत्रकार यांच्या लक्षात आल्यामुळे या कमिशनच्या वातावरणात व भाषणात रंगपालट होऊ लागला आहे यात

शंका नाही. हा रंगपालट केवळ कल्पनासृष्टीतला नसून गेल्या आठवड्यात या बहिष्कारावर टाईम्सकाराने जो अग्रलेख लिहिला आहे त्यावरून पारा किती खाली उतरला आहे याची सहज कल्पना यईल. या बहिष्काराची टर उडवून व बहिष्कारास अनुकूल असलेल्या पुढाऱ्यांस मूर्खाच्या वर्गात काढणारे टाईम्सकार आता कालमचा अग्रलेख लिहून पगडी फिरवताना पाहून कोणास चमत्कार वाटणार नाही. 'ठोशास ठोसा' हे तत्व इंग्लिश मनाला झटकन पटत असल्याची म्हण आहे. त्याला अनुसरूनच पुढाऱ्यांनी हा बहिष्कार पुकारला. परंतु हा ठोसा निर्जीव असेल असे समजून ब्रिटिश मुत्सद्यांनी सुरूवातीस टर उडवली परंतु आता सर अल्लीइमामसारख्या मुसलमान व सरकार पक्षाचा एकेवेळी गणलेला अधिकारीसुध्दा या अपमानाने चिडून गेलेला पाहून येथिल ॲग्लोई डिक्सन पक्षकारांचे डोळे उघडले व घसरू दिलेल्या गाडीस कोठेतरी थांबविण्याच्या प्रयत्नास लागले. सर अल्लीइमाम यांनी कलकत्ता येथिल मुस्लीम लीगच्या बैठकीत स्पष्ट बजावले, "माझ्या डोक्यावरची भुरळ आता......... अर्जदारास जी योग्यता असते तिला जितपत सहकारीपणा आहे त्यापेक्षा या कमिट्यास अधिक नाही. जोपर्यंत या कमिट्यास अर्ज दारापेक्षा अधिक किंमत नाही तोपर्यंत लंडन येथे जाणाऱ्या हिंदी प्रतिनिधीस तरी अर्ज दारास तरी अधिक कशी किंमत मिळणार? आपण लक्षात ठेवले पाहिजे ब्रिटिश साम्राज्यात हिंदुस्थानची जागा खालची आहे हे खास. परंतु आपण आपला दर्जा व हक्क ठरवून घेतलाच पाहिजे. हिंदुस्थानच्या भावी राज्य घटनेत आम्हांस बरोबरीचा भाग घेऊ देणे हा आमचा हक्क आहे." उपरिनिर्दिष्ट केलेल्या पक्षा व्यतिरिक्त अद्यापि एक महत्वाचा महाराष्ट्र केसरी पक्ष अगर प्रतिसहकार पक्ष शिल्लक राहिला आहे व या पक्षाचे धोरण या बहिष्कारासंबंधी अनिश्चित असेच आहे. प्रागतिक व पुणेरी जहाल पक्षाचा आजपर्यंतचा इतिहास पाहता बहिष्काराचे शस्त्र पदोपदी उचलण्याचा मान या त्या वेळचा जहाल पक्षाकडे असे व प्रागतिक पक्षास उपहास निदर्शक मवाळ अशी संज्ञा देण्यात येत असे. परंतु लोकमान्यांच्या पाठीमागे व महात्माजींने लावलेल्या कसोटीमुळे या पक्षाची

अनेक स्थित्यंतरे व रंगपालट अल्पावकाशात होऊन आज घटकेस हा पक्ष राजकारणातून नामशेष होण्याच्याच पंथास लागला आहे. असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही. कॉंग्रेसच्या ठरावाविरूध्द कॉ. प्रवेश करतेवेळी या पक्षास विचारण्यात आले की, "तुमच्यात व प्रागतिकांत आता फरक तो कोणता राहिला?" तर तो फरक कृतीत नसून मनाच्या घटनेत आहे. असे सांगण्यात येत होते. आज मितीस सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनी बहिष्कार पुकारला असताना या पक्षाचे अध्वर्यू कोणताच मार्ग न स्वीकारून मध्येच लोंबकळत उभे राहिले आहेत व सायमनसाो इकडे समक्ष येईपर्यंत व आपल्या वाणीने 'महाराज आता स्वस्थपणाने खांद्यावर जू घ्या' असे म्हणेपर्यंत पुढारी असेच भटकत राहणार असा रंग दिसत आहे. वास्तविक बहिष्काराचे वाकडे प्रागतिक, स्वतंत्र, बेझंट, मालवीय, मुसलमान, ब्राह्मणेतर या पक्षास असावयाचे. परंतु हे सर्व एक झाले असताना जहाल नामाभिधानाने जन्मलेल्या या पुणेरी ...... त्या सा. नाव माहीत. इतर कोणत्याही पुढाऱ्यांस हे शक्य वाटत नाही व असली मार्गप्रतिक्षा करून हंसे करून घेण्याचे त्यांच्या मनात येत नाही. बहिष्कारास विरोधी जे अल्पसंख्यांक लोक आहेत त्यांनासुध्दा ताज्या सा.ना जी आशा वाटत आहे ती वाटत नाही. हे लोक जाणून बुजून जातिविषयक व स्वहीत प्राधान्य भावनेमुळे युरोपियन कमिशन चांगले व तेंच आम्हास पाहिजे असे म्हणत आहेत. परंतु सायमनसा. हिंदी कमिट्यास विशेष दर्जा देईल म्हणून बहिष्कार नको अशी त्यांची विचारसरणी नाही. असे असताना तात्यासाहेबांनी हा आशावादीपणा अनपेक्षित इतक्या मोठ्या प्रमाणात कल्पिला असावा याचे अद्यापि कोडेच आहे. व आता त्यांनी वर्षाची विश्रांती घेतल्यामुळे हे कोडे त्यांच्याकडून समर्पक सुटेल किंवा नाही ही शंकाच आहे. कॉंग्रेसच्या बैठकीतही महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व नामशेषच होते मग हा जो तात्यासाहेबांनी जो तृतीय मार्ग काढला त्याचा ऊहापोह व छाप मद्रास येथे पडणे लांबच राहिले. महाराष्ट्रात लोकमान्यांच्या नावावर हा प्रतिसहकारपक्ष विकला जात असल्यामुळे पुष्कळ अनुयायांची स्थिती चमत्कारिक झाली आहे व या पक्षाचे एखादे निश्चित धोरण

ठरविण्यासाठी म्हणून ज्यांप्रमाणे ब्राह्मणेतर परिषद भरविली जाणार आहे. त्याप्रमाणे या पक्षाची एक परिषद पुणे येथे भरवून कोणते तरी एखादे धोरण कायम करावे अशी आमची सूचना आहे. सुदैवाने हा पक्ष बहिष्कारास मिळाला तर उत्तमच झाले. न मिळाला तर त्या पक्षातील लोकांना पुढे काय करावे हे तरी निश्चित समजेल.

## साप्ताहिक 'गजनफर'

येथे 'गजनफर' म्हणजे सिंह या नावाचे मुसलमान समाजाचे साप्ताहिक पत्र मि. एम. बी. पठाण यांच्या संपादकत्वाखाली ता. १२-१२-२७ पासून प्रत्येक शुक्रवारी पसिध्द व्हावयास लागले अअहे. लोक शिक्षणाच्या दृष्टीने वर्तमान पत्र मुख्य नसले तरी महत्वाचे साधन आहे. हिंदुंप्रमाणे मुसलमानांसही शिक्षणाची आवश्यकता आहेच. आमच्या माहितीप्रमाणे मुसलमानांनी स्वतःच्या समाजातील शिक्षणासाठी चालविलेले हे पहिले साप्ताहिक असावे. ......

## निवडक अग्रलेख – ३

## ‘सोलापूर समाचार’

# बकरी ईद आणि हिंदू मुसलमानांची बेकी!

हिंदू मुसलमानांचे वैमनस्य आणि त्यापासून उद्‌भवणारे दंगे यामुळे हिंदुस्थान देशाचे जितके अपरिमित नुकसान होत आहे तितके कशानेही होत नसेल! हिंदु मुसलमानातील तेढीमुळे राजकीय आकांक्षा तर दुरावतच आहेत. पण इतर बाबतीतसुध्दा शांतता व सलोखा याचा लाभ होणे फार कठीण होऊन बसले आहे. ऐक्य परस्पर विश्वास आणि सद्‌भावना असली तरच कोणत्याही दोन पक्षात किंवा जाती जातीत सलोखा राहू शकतो! एका आईच्या पोटी जन्मलेले भाऊ जोपर्यंत सुख समाधानाने व एक दिलाने राहतात तोपर्यंत त्यांच्या घरात बेकीचे भूत कधीही थैमान घालणार नाही. तद्वतच भारतमातेचे दोन मोठे पुत्र हिंदु आनि मुसलमान एक दिलाने, एक भावनेने आणि एकाच ध्येयनिष्ठेने कर्तव्याला जागतील तर जगात अशी कोणतीही दानवी आणि मानवी शक्ती नाही जी की, हिंदु मुसलमानांच्या एकोप्यात बिघाड उत्पन्न करील! या एकोप्याच्या अभावीच बनारस, कानपूर वगैरे ठिकाणी नुकतेच भिषण दंगे होऊन रक्ताचा सडा शिंपला गेला! त्याच प्रमाणे मागे झालेल्या दंग्याचे हे दाखले इतके भयानक आहेत की, त्याची खरी जाणीव झाली तर कोणताही अविचारी माणूस भावनावश होऊन अत्याचाराला प्रवृत्त होणार नाही. दंग्यापासून किती आपत्ती ओढवते हे पुढाऱ्यांनी जनतेच्या मनावर चांगल्या रितीने बिंबवले तर दोन्ही समाजातील उतावळेपणा व उन्माद खात्रीने थोपवून धरता येईल. ही गोष्ट नुकत्याच पार पडलेल्या बकरीदच्या सणावरून स्पष्ट झाली आहे. हिंदुच्या रथाचे वगैरे मिरवणुकी किंवा मुसलमानांचे बकरीदसारखे सण शांततेने पार पडणे म्हणजे एक आश्‍चर्याची गोष्ट होऊन बसली आहे. कारण अशावेळी कोठे ना कोठे दंगे धोपे व्हावयाचे हे नेहमीच्या अनुभवावरून जणू ठरल्यासारखेच असते. त्यामुळे दोन्ही जातीचा

कसलाही सण, मिरवणुकी, संदल अशा वेळी दम्याच्या भितीने मन साशंक झालेले असणे स्वाभाविकच होय आणि त्याच दृष्टीने मागच्या बकरीदच्या प्रसंगी सरकारकडून लष्करी व पोलीस बंदोबस्त कडेकोट ठेवण्यात आला होता. तसेच कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनीही या बाबतीत सरकारशी सहकार्य करून शांतता रक्षणाच्या कामी मदत केली ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे. सौ. सरोजिनीदेवी नायडू, मौ. शौकतअली वगैरे प्रसिध्द पुढाऱ्यांनीही जाहीर प्रत्रके काढून शांततेने राहण्यास विनंती केली होती. दिल्ली, अलाहाबाद, सुरत, मुंबई, नागपूर, कानपूर वगैरे प्रमुख शहरातील हिंदु मुसलमान पुढाऱ्यांनी कोठे काही गडबड होऊ नये म्हणून पत्रके काढून आणि समेट कमिट्या नेमून शांतता राखण्यासाठी स्वयंसेवक उभे केले होते. त्यामुळे ठिकठिकाणी ईदचा सण शांततेने पार पडला अशा आनंदाच्या बातम्या येऊ लागल्या. परंतु दुधात मिठाचा खडा पडल्याप्रमाणे बंगालमधील दंग्याची हकीकत नुकतीच बाहेर आली आहे. फरीदपूर जिल्ह्यातील अडनपूर येथे बकरीदच्या सणानिमित्त गायीच्या वधावरून हिंदु मुसलमानात दंगा झाल्याची बातमी ता. ३० रोजी आली आहे. या दंग्यात बरीच प्राणहानी झाली आहे, असे समजते. परंतु विस्तृत हकीकत अद्याप बाहेर आली नाही. सुरतेजवळ संदेर गावांत बॉम्बचा स्फोट होऊन एक मुलगा जखमी झाला! बकरीदच्या सणानिमित्त बऱ्याच गायींचा वध होणार होता तो होऊ नये म्हणून त्यावर बॉम्ब टाकण्याचा हा बेत असावा असा संशय आहे.

परस्परांचे सण व धर्मभावना याबद्दल आदर बाळगून ऐक्याची घडी मोडू दिली नाही तर वर सांगितल्यासारखे दंगेधोपे व अत्याचार सहज टाळता येईल. जाती जातीत वैमनस्य वाढवून चिथावणी देणारे पुढारी इतर वेळी कितीही मोठाली राष्ट्रकार्ये करीत असले तरी जातीजातीतील ऐक्याचा प्रश्न पुढे असताना त्यांच्या राष्ट्रकार्याची कोनतीच किंमत करणार नाही. हिंदुमुसलमानांचे ऐक्य हेच पहिले राष्ट्रकार्य आहे. या कार्याची उभारणी प्रथम केली तरच पुढील कार्याची इमारत उठविता येईल. नाहीतर

हिंदुमुसलमानांच्या बेकीचे भूत भारताच्या मानगुटीवर कायमचे बसून दंगे व अत्याचाराच्या रूपाने थैमान घातल्याशिवाय राहणार नाही हे पक्के लक्षात ठेवले पाहिजे.

**(संपादकीय ः दै. 'सोलापूर समाचार', तारीख ४ माहे मे सन १९३१ )**

### निवडक अग्रलेख – ४

### ‘सोलापूर समाचार’

# आजचा अतीव आनंदाचा दिवस!

अशोकानंतर आज हजारो वर्षांनी भारताला भाग्याचा व अतीव आनंदाचा दिवस प्राप्त झाला आहे. आजच्या स्वातंत्र्य महोत्सवात जे अबालवृध्द स्त्री – पुरूष ते धन्य होत. आजचा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवला जाणार असल्यामुळे ज्या पिढीला हे भाग्य पहाण्याचे लाभले, तीही स्वतःला आज धन्य मानील. या मंगल आणि आनंददायक प्रसंगी हा दिवस ज्या ज्ञात – अज्ञात नरवीरांनी, राजकारणी धुरंधरांनी, धैर्यधर पत्रकारांनी, आपल्या अलोट कर्तृत्वाने, त्यागाने आणि बलिदानाने प्राप्त करून दिला त्यांचे पुण्यस्मरण करून त्यांना प्रणाम करणे हे आमचे पहिले कर्तव्य आहे. सोलापूर संबंधीच बोलावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, भारताच्या इतिहासात सोलापूरने एक विशिष्ट स्थान प्राप्त करून घेतले आहे. सोलापूरच्या जनतेला आजच्या दिवशी अभिमानाने सांगता येईल, असाच उज्ज्वल इतिहास सोलापूरच्या नररत्नांनी केलेल्या त्यागाने आणि बलिदानाने खच्चून भरलेला आहे. अशा त्यागी वीरांना आणि हुतात्म्यांना याप्रसंगी वंदन करणे हाही आमचा राष्ट्रधर्म आहे.

याप्रसंगी राष्ट्राने केलेल्या प्रगतीचे सिंहावलोकन करून पुढील मार्गाचे शोधन करणे इष्ट होईल असे वाटते. जगाचा इतिहास जरी वरवर चाळला तरी भारतासारखा खंडतुल्य व निःशस्त्र देश अवघ्या नव्वद वर्षात स्वतंत्र होतो हा इतिहासात एक फार मोठा चमत्कार समजला जाईल. इतिहासाला कलाटणी देणारा हा अद्‌भूत चमत्कार जर कोणी घडवून आणला असेल तर तो म. गांधीनीच होय! म. गांधीचे प्रासंगिक व अदूरदृष्टी टीकाकार काहींही म्हणोत, पण इतिहासाने ही गोष्ट आता सिध्द केली आहे. ती नाकारणे म्हणजे सूर्यप्रकाशच नाकारण्यासारखे आहे असे आमच्या अल्पबुध्दीला वाटते. पहिल्या महायुध्दनंतर जे भारतात घनदाट नैराश्य पसरले होते आणि देशावर जे

आर्थिक संकट कोसळले त्यातून बाहेर काढून राष्ट्राला नवचैतन्य आणि दुर्दम्य आशावादाने म. गांधीनीच मारून टाकले. सामुदायिक अहिंसक प्रतिकार आणि सत्याग्रह या दोन साधनांनी म. गांधींनी राष्ट्र निर्भय केले. सामुदायिक अहिंसक प्रतिकार आणि सत्याग्रहाचे यशस्वी प्रयोग पाहून ब्रिटीश साम्राज्य तरी हादरलेच पण सारे जग या अद्‌भूत प्रयोगाकडे विस्मयाने आणि सहानुभूतीने पाहू लागले. म. गांधीच्या सत्य अहिंसेतील तेज नि ताकत जरी काहीं कुत्सित टीकाकारांना समजू शकली नाही तरी आम हिंदी जनता व ब्रिटीश सरकार यांना त्याची पुरेपूर जाणीव होती. "चले जाव" अशी म. गांधींनी घोषणा केली त्यातील मर्म पुरेपूर ओळखून ब्रिटीश सरकारने गेल्या दोन तीन वर्षापासून हिंदुस्थानातील आपला गाशा गुंडाळण्यास सुरूवात करून आज ते आपखुशीने हिंदी पुढाऱ्यांचे हाती सर्व सत्ता सुपुर्त करून निघून जात आहेत. अशा तऱ्हेची रक्त विरहीत क्रांती जगाच्या इतिहासात फक्त भारतानेच म. गांधींच्या नेतृत्वाखाली घडवून आणली आहे. म्हणूनच जग आणि विशेषतः हिंदुस्थान या राष्ट्रपुरूषाचे ऋणी आहे.

अखेर हे महान हिंदी राष्ट्र आपल्या उच्चतम संस्कृतीने, वैभवाने, सन्मानो आणि तेजाने जगात चमको अशी कविवर्य रविंद्रनाथ टागोर यांच्या शब्दात आम्ही प्रार्थना करतो.

**(संपादकीय ः दैनिक 'सोलापूर समाचार', स्वातंत्र्योत्सवाचा विशेषांक, दि.– १५ऑगस्ट १९४७)**

## 'गजनफर'

# १० मे स्वातंत्र्यदिन!

स्वातंत्र्य यध्दाच्या पहिल्या सलामीत आत्मबलिदान करणाऱ्या लढवय्यांच्या वीरवृत्तीचा, जळजळीत स्वातंत्र्येच्छेचा अभिमान वाटून त्या स्वातंत्र्य भक्तांबद्दल अन्तःकरण आदराने भरून येते.

हिंदवी स्वातंत्र्यासाठी भाग्यवंचित भारतमातेच्या भालप्रदेशी स्वतःच्या रक्ताचा टिळा लावण्याकरिता पेटलेल्या आत्मयज्ञाच्या अग्निकुंडात बेगुमानपणे उड्या ठोकणाऱ्या देशसेवकांबद्दल कोणाचे मानवी ऱ्हदय भरून येणार नाही? जळजळीत स्वातंत्र्याच्या अभिलाष संजीवनीने उत्साहभरीत झालेल्या आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी भारताच्या दुर्दै वाच्य दुर्दमनीय दाढेत बेशक उड्या ठोकणाऱ्या या स्वातंत्र्यवीरांची स्मृती जितकी पवित्र आहे तितकीच राष्ट्रीय आत्मोन्नतीकारक आहे!

सन् १८५७ साली इंग्रजांच्या आक्रमक शक्तीचा पाश व इंग्रजी शासनाचा पसारा सर्व हिंदुस्थानभर पसरला होता. आणि जनतेच्या राष्ट्रीय जीवनाला पायबंद बसून तिच्या उन्नतीचा कोंडमारा होऊ लागला तेंव्हाच तिने जागे होऊन इंग्रजांनी व्यापलेला प्रांत परत मिळवण्यासाठी हा प्रयत्न केला. अनादिकालापासून अस्तित्वात असलेल्या भारतीय राष्ट्रीयत्वाला नामशेष करण्यासाठी इंग्रजांनी धर्म – समजुती – रितीरिवाज ग्रामसंस्था व देशी ... ... ... ...

सन् १८५७ सालचे युध्द म्हणजे अद्याप चालू असलेल्या स्वातंत्र्युध्दाची पहिली सलामी होय. हे आता अधिक विस्ताराने सांगण्याची जरूर राहिली नाही. आजच्या आणि त्यावेळच्या उपाययोजनेत आणि मोर्चेबंदीत जमीन अस्माना इतकी तफावत असली तरी ऐतिहासिक दृष्ट्या तिचे महत्व मुळीच कमी नाही. उलटपक्षी वर्तमान परिस्थितीत आणि

भविष्यकालीन स्वातंत्र्यप्राप्तीच्या चकमकीत सन १८५७ साली पहिल्याच सलामीला बसलेली ही राष्ट्र घातकी ठेच मार्गदर्शक होणार आहे यात लवमात्र संदेह नाही!

अगदी अलीकडे उपलब्ध झालेल्या माहितीवरून ५७ सालच्या युध्दाला स्वातंत्र्य युध्द म्हणून मान्य करणे प्रत्येक सद्सदविवेकबुध्दी माणसाला भागच पडेल! सन् १८५७ सालचे युध्द स्वातंत्र्युाध्द मान्य केल्यानंतर त्या युध्दात धारातिर्थी देह ठेवणाऱ्या वीरांना स्वातंत्र्यावादी मानणे  क्रमप्राप्त आहे!

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी – स्वराज्यासाठी 'कुर्बानी' करणाऱ्या नर रत्नांचा स्मृतीदिन निरनिराळ्या स्वरूपात पाळण्या... ... ... देशांत आहे गुलामगिरी... ... ...

...... ते ऐक्याला पोषक होणार आहेत. म्हणूनच हा स्मृतिदिन राष्ट्रीय स्वरूपात हिंदुमुसलमान या उभयतांनी पाळला पाहिजे!

हिंदी जनतेने स्वातंत्र्य युध्दाची पहिली सलामी १८५७ साली ता. १० मे रोजी ठोकली. याच दिवशी स्वातंत्र्याच्या युध्दाला तोंड लागले. यास्तव ता. १० मे हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून प्रत्येक हिंदुमुसलमानांने पाळला पाहिजे आणि या दिवसाची स्मृती तुफानदर्यातील दीपगृहाप्रमाणे नजरे समोर ठेवून अत्याचार रक्तपात – जाळपोळ इत्यादी स्वातंत्र्याच्या मार्गातील खडक टाळून ध्येय गाठण्यासाठी स्वातंत्र्याच्या चालू लढ्यात शतपट जोमाने आणि उत्साहाने भाग घेतला पाहिजे.

**('गजनफर' अग्रलेख ः ता. ९ जिल्काद १३४७ हिजरी)**

निवडक अग्रलेख – ६

# नव्या बोर्डाच्या अध्यक्षांची निवडणूक

पूर्वीच प्रसिध्द झाल्याप्रमाणे मंगळवार ता. २६-३-२९ रोजी म्युनिसिपालिटीच्या नव्या अध्यक्षांची निवडणूक झाली. अध्यक्षांच्या जागेसाठी डॉ. मुळे व रा. माणिकचंद शहा हे दोघे उभे होते. रा. माणिकचंद शहा यांना राष्ट्रीय पक्ष, मजूर पक्ष आणि राष्ट्रीय मुस्लीम पक्ष आणि काही स्वतंत्र बाण्याचे नॉमिनेटेड सभासद इत्यादी पक्षांचा पाठिंबा होता. डॉ मुळे यांचे बाजूला व्यक्तीगणिक पक्ष किंवा निनांवी पक्षांच्या सभासदांचा जोर होता. निरनिराळ्या सभासदांची मते कायमदायम करण्यासाठी गेल्या पंधरवड्यात प्रत्येक बाजू कसून मेहनत करीत होती. मंगळवारापूर्वी एक दोन दिवस तर ही खटपट फय्ल जोसात होती. ्रत्येक बाजूने आपापली खूप तयारी केली. पाट्या – मेजवान्या – अल्पोपहार वगैरेची रेलचेल होती.

मंगळवार संध्याकाळी ६ वाजता ही निवडणूक होण्याचे पूर्वीच जाहीर झाले होते. सभासदांप्रमाणे शहरवासियांतही एक प्रकारचा नवा उत्साह खेळत होता. ठरलेल्या वेळेच्या तीन चार तासापूर्वीच शहरवासियांच्या झुंडी म्युनिसिपल ऑफिसकडे लोटू लागल्या. पाच वाजण्याच्या सुमारास तर म्युनिसिपालटीच्या चारी बाजूच्या रस्त्यावर लोक समुदाय फुलुन गेला होता. लोक आपापसातच अध्यक्ष कोण येईल याचे ठोकताळे बांधीत होते. कित्येक जागी तर या ठोकताळ्याचे रूपांतर पैजेत होऊन शाब्दिक झुंजीला सुरूवात झाली.

त्यानंतर एकेक सभासद येऊ लागला. कन्ना, कोंतम, विन्नु आले. डॉ. वैशंपायन, लिमये आले. खडकीकर, राजवाडे , गुलाबचंद आले, शिवबळप्पा आले. डॉ. अंत्रोळीकर आले. रा. माणिकचंद, डॉ मुळेही आले. बरोबर सहा वाजता सर्व सभासद हजर झाले. सभेचा हॉल खच्चून भरला.

प्रत्येक बाजू आपापली गडी सज्ज करून होती. एका बाजूचे सभासद पक्षाच्या शिस्तीबरहुकुम मते टाकणार असल्यामुळे दिसेल त्या मोकळ्या खूर्चीवर फुटून फुटून बसले तर दुसऱ्या बाजूचे सभासद तीन तीन – चार चाराच्या गटाने आणि डळमळीत मताच्या सभासदाला दोघा दोघा – तिघा तिघांच्या कोंडीत धरून बसले होते.

सहा वाजता डॉ. मुळे स्थानापन्न झाले आणि त्यांनी सभेच्या सुरूवातीचे प्रास्ताविक भाषण केले. तदनंतर रा. शिवबाळप्पा देशमुख यांनी हरकत आणली की, रा. साठे व पापय्या मोची हे दोन सभासद म्युनिसिपालिटीचे कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यांचा म्युनिसिपालिटीशी व्यवहार चालू आहे. सबब त्यांना म्यु. ॲक्ट कलम १२ बी पोट कलम प्रमाणे अध्यक्षांच्या निवडणुकीत भाग घेता येत नाही.

यावर मि. बावालाल म्हणाले, कोर्टाचा तसा मनाई हुकुम नसल्यामुळे रा. साठे व पापय्या यांना भाग घेण्यास हरकत करता येत नाही.

नंतर डॉ. मुळ्यांनी चिफ ऑफिसरांना काही विचारले व निकाल दिला की, रा. साठे व पापय्या यांचा हल्ली म्युनिसिपालटीशी कॉन्ट्रॅक्टचा व्यवहार नाही. सबब त्यांना अध्यक्षांच्या निवडणुकीत भाग घेण्यास हरकत नाही.

रा. साठे व पापय्या यांचा अद्याप व्यवहार पुरा झालेला नाही. माझ्यापाशी कागदपत्रांच्या नकला आहेत. त्या पाहा व तेवढ्याने आपली खात्री होत नसेल तर मी सांगतो ती म्युनिसिपल बुके व कागदपत्रे तपासा. रा. शिवबळप्पा असे म्हणत असताही अध्यक्षांनी रा. साठे व पापय्या यांना निवडणुकीत भाग घेण्यास हरकत नाही असा निकाल दिल्यावर रा. शिवबाळप्पा यांनी आपली हरकत टिपून घेण्याबद्दल अध्यक्षांना विनंती केली व अध्यक्षांनी तो प्रोसिडींगमध्ये नोंदून घेतली.
त्यानंतर निवडणुकीसाठी कोणाला चेअरमन करावे हा प्रश्न पुढे आला.

डॉ. मुळे विरूध्द लिमये, डॉ. मुळे व रा.ब. लिमये या दोघांची नांवे सुचविण्यात आली. मत घेता डॉ. मुळे यांना २५ तर लिमये यांना २३ मते पडली. त्यामुळे डॉ. मुळेच चेअरमन झाले.

## तीन विरूध्द एक वर्ष

यापुढे अध्यक्षांची निवडणूक तीन वर्षाऐवजी एका वर्षाने होत जावी अशी महत्वाची सूचना डॉ. वैशंपायन यांनी आणली. खा. इमामसाहेब यांनी अध्यक्षांची निवडणुक पूर्वी प्रमाणेच दर तीन वर्षांनी व्हावी अशी सूचना आणली. डॉ. वैशंपायन यांच्या सूचनेवर मत घेता ती २५ विरूध्द २३ मतांनी पास झाली.

मि. बावालाल यांनी पोल मागितला. पुनः मतांची मोजणी करण्यात आली तेंव्हा डॉ. वैशंपायन यांच्या सूचनेला आणखी एक मत मिळून ती २६ विरूध्द २२ मतांनी पास झाल्याचे जाहीर करण्यात आले. पुढील तीन वर्षासाठी डॉ. मुळे यांना अध्यक्ष निवडावे अशी खा. इमामसाहेब यांनी सूचना आणली. रा. राजवाडे यांनी तीन वर्षाचे एक वर्ष करा, कारण आताच असा ठराव पास झाला आहे असा झणझणीत इशारा दिला.

त्याप्रमाणे दुरूस्ती होऊन खा. इमामसाहेबांनी डॉ. मुळे यांना अध्यक्षपदासाठी सुचवले. रा.शिवबाळप्पा यांनी रा. माणिकचंद शहा यांचे नांव अध्यक्षपदासाठी सुचविले. रीतसर अनुमोदन मिळाल्यावर डॉ. मुळे विरूध्द माणिकचंद अशी लढत सुरू झाली. मतांची मोजणी करण्यात आली. ऐन मतमोजणीच्यावेळी रा. माणिकचंद यांच्या बाजूचे दोन खात्रीचे सभासद पुढच्या हुकुमी पावलावर पावले टाकीत डॉ. मुळे यांच्या बाजुला वळले. ऐनवेळी धोका देणाऱ्या या सभासदांनी पुढच्या पावलावर पाऊल टाकताना पायघडीवरून चालणाऱ्या 'खालमुंड्या' नव्या नवरीची आठवण देत होते. दिलेल्या वचनाशी झालेल्या बेइमानीमुळे शरमेने अर्धमेल्या झालेल्यांची मस्तके खाली झाल्यास नवल नाही. पुढीलप्रमाणे मते पडली – डॉ. मुळे – नारायणदास, साठे,

महिंद्रकर, करणेकर, स्ट्रटन, लिमये, लक्ष्मीनारायण, भूमकर, कोंतम, कन्ना, सलगर, धर्मा, कोनापुरे, पापय्या, वड्डेपल्ली, डोंगरसिंग, विन्नू, कदम, इमामसाहेब, महमूद खान, महम्मद इसकए मनुनिया, बाबालाल, पेंटर व मुळे – एकूण २५. रा. माणिकचंद – राजवाडे, शिवबाळ, कानिटकर, दिवाकर, माणिकचंद, गोविंदप्रसाद, सरदार, लिमये, गुलाबचंद, चिंतलवार, वैशंपायन, खडकीकर, सोनी, म्हमाने, पाटील, अंत्रोळीकर, जक्कल, गायकवाड, सय्यदसाहेब, मौ. कमिशनर, फुलमामडी, येलिम व हाजीम, हानिफ करीमसाहेब – एकूण २३.

मि. जसावाला हे गैरहजर होते व मि. डेव्हीस हे तटस्थ राहिले. राहिलेल्या ४८ सभासदांपैकी दोन अधिक मतांनी डॉ. मुळे निवडून आल्याचे जाहीर होताच टाळ्या वाजल्या! महम्मद इसाक साहेबांनी तर टाळ्या पिटण्याऐवजी घरच्या मामल्याप्रमाणे तारस्वराने कल्ला करून टेबल आपटण्याला सुरूवात केली. व कोणत्याशा आनंदाच्या उसळीसरशी काला बाबांच्या गळ्याला मिठी मारून पोरकटपणाचे प्रदर्शन केले.

आणि काला बाबांनी त्यांची पाठ थोपटून व एक फुलाची माळ घालून मुलांचे कौतुक केले. डॉ. मुळ्यांना पुष्पहार घालण्यात आले वगैरे वगैरे पुढील अभिनंदनाचे व शेकहॅण्डचे विधी सालाबादप्रमाणे झाले!

आता एकाच बाबीचा उल्लेख करणे बाकी आहे.

वर्तमान पत्राच्या प्रतिनिधींसाठी खूर्ची टेबलाची व्यवस्था करणे जरूर असतानाही तिकडे कोणीच लक्ष पुरविलेले दिसत नाही. खूर्ची टेबलांच्या अभावी सगळ्याच प्रतिनिधींना गर्दीत उभे राहून रिपोर्ट घ्यावे लागले.

या गैरसोयीकडे म्युनिसिपल अधिकाऱ्यांचे लक्ष जाऊन पुढील सभेच्यावेळी योग्य तजवीज होईल का असा सवाल करण्याची पाळी यावयास नको होती!

**('गजनफर' ः अग्रलेख – शुक्रवार ता. २९ मार्च १९२९)**

निवडक अग्रलेख – ७

## जादा – 'कर्मयोगी' – शनिवार ता. १० माहे मे सन् १९३०

# सोलापूर येथील दंग्याची

# खरी हकिकत

### १४४ कलम पुकारले!

महात्मा गांधींना पकडल्याची बातमी ता. ५ रोजी रात्री १०/११ वाजता येथे समजली. ही बातमी समजल्याबरोबर स्वयंसेवकांची मिरवणूक निघून ही बातमी शहरभर पसरली. डुसरे दिवशी सबंध बाजार आपोआपच बंद राहिला. त्याचप्रमाणे गिरण्याही बंद ठेवल्या गेल्या. सकाळी म. गांधींच्या फोटोची प्रचंड मिरवणूक निघाली व् ती अत्यंत शांततेने पार पडली. रा. ८ वाजता टिळक चौकात जाहीर सभा होऊन लोकांनी महात्माजीस राष्ट्रसेवा करीत असता त्यास झालेल्या बंदीवासाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या सभेस सुमारे १५ हजार लोक हजर होते. सभा अत्यंत शांततेने पार पडली. त्या दिवशी म. गांधींच्या बंदिवासामुळे लोकांची मने अत्यंत उद्‌विग्न झाल्यामुळे दुसरे दिवशीही बाजार बंद ठेवण्याचे ठरविण्यात आले होते. बुधवारी सकाळी म. गांधींच्या फोटोची मिराणूक झाली. मिरवणूक चालू असताना दुसरीकडे काही बाजारबुणग्या लोकांनी एका म्यु. नाक्याचे छप्पर जाळले व दारू व शिंदी गुत्त्यावर जाऊन दारू व शिंदी ओतून नासधुस केली. यापेक्षा अधिक काही जाले नाही. स्थानिक पोलीस व इतर अधिकारी येथे सामोपचाराने वागत होते. डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांनी येथिल म्यु.टीचे अध्यक्ष शेठ माणिकचंद वगैरेंना बोलावून घेऊन परिस्थितीबद्दल वाटाघाट केली. गुरूवारी बाजार, गिरण्या इत्यादी सर्व व्यवहार सुरू होङ्गन लोक गुंतल्यास किरकोळ गडबडसुध्दा होणार नाही असे वाटून त्या दिशेने प्रयत्न करण्यात यावा असे ठरले. रात्री पुन्हा गांधी चौकात सभा झाली. त्यावेळी बुधवारच्या किरकोळ

अत्याचाराचा काही वक्त्यांनी निषेध केला व दुसऱ्या दिवशी लोकांनी गिरणीत जावे असे सांगण्यात आले. परंतु लोकमत तसे करण्यास तयार असल्याचे दिसले नाही.

गुरूवारी सकाळी दोन दिवसाप्रमाणे मिरवणूक वगैरे कार्यक्रम दहा-साडेदहा वाजेपर्यंत झाला व सर्व मंडळी आपापल्या घरी गेली. यावेळी काही मंडळी रूपाभवानीजवळील शिंदीची झाडे तोडण्यास गेली. ती बातमी पोलिसांना कळून त्या ठिकाणी पोलीस दाखल झाले. तमासगीर गोळा झाले व पोलीस व त्यांची जिकीर सुरू झाली. पोलिसांनी जमलेल्यापैकी सात-आठ लोकांना पकडले. ही गडबड चालू असतानाच वरील जागा बाजारपेठेच्या जवळ असल्यामुळे बाजारातील बरीच मंडळी तेथे जमा झाली. जमाव जमलेला पाहताच पोलीसही अधिक येऊन हे प्रकरण हातघाईवर येई लसे दिसू लागले. डि. मॅ. वगैरे अधिकारी तेथे होते. जमावातील लोक पकडलेल्या लोकांची नावे टिपून घेऊन त्यांना सोडून द्या असे म्हणू लागले. ही बोलाचाली चालू असताना एक शंकर नावाचा मुलगा पुढे होऊन पकडलेल्या लोकांना सोडले पाहिजे असे म्हणत असता एका सार्जंटाने त्याच्यावर गोळी मारली. लोक चिडले व त्यांनी दगड मारण्यास सुरूवात केली. त्यावर पोलिसांनी गोळीबार केला. या गोळीबारात दोन-तीन माणसे मेली व जमावातील लोक पळाले. या प्रकाराने लोकांचा राग अनावर होऊन ते आपल्या पुढाऱ्यांचेही ऐकेनासे झाले. तेथून या जमावापैकी काही माणसे मंगळवार पपेठ पोलीस चौकीवर येऊन त्यांनी चौकीतील काही कागद जाळले व दोन पोलिसांना मारून त्यापैकी एकास जळत्या कागदात व कपड्यात टाकून दिले. त्यानंतर काही लोकांचा जमाव दिवाणी कोर्टाकडे गेला व त्यांनी कोर्टात असलेल्या कारकुनांना बाहेर काढून सर्व कोर्टाच्या इमारती जाळून टाकल्या.

या प्रकाराने डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व स्थानिक पोलीस अधिकारी यांच्याही डोक्यातील विचारशक्ती नष्ट झाली व पिसाळून जाऊन त्यांनी शहरातील निरपराधी व

शांतताप्रिय नागरिकांची सरसहा कत्तल करण्यास सुरू केली. सशस्त्र शिपाई व मोटार लॉरीतून हिंडू लागले.

मोटार लॉरीमध्ये ड्रायव्हरच्या दोनही बाजूस सार्जंट असून त्यांच्या हातात बाहेर रोखून धरलेली पिस्तुले होती. आतल्या बाजूस पोलीस असून त्यांनी खिडकीतून रायफल्स नळया बाहेर काढून रोखलेल्या होत्या. टपावर दोन शिपाई बाहेर बंदुका रोखून आडवे पडलेले होते. मोटारीच्या पिछाडीस दोन पोलीस मागच्या दिशेने बंदुका रोखून बसलेले होते. एका लॉरीत वरच्या बाजूस मशीनगन्स ठेवलेल्या होत्या. अशा दोन लॉऱ्या ४०-५० मैलाच्या वेगाने हॉर्न न वाजविता एकसारख्या गोळ्या झाडीत व विशेषतः जेथे रस्त्यावर, खिडकीत, दाराच्या आड, माडीवर, जिन्यात कुठेही मनुष्य (स्त्री, पुरूष, मुलगा-मुलगी कोणीहï) दिसला तर त्यावर हटकून गोळ्या झाडीत! सर्व गांवभर दुपारी दीड वाजल्यापासून रात्री साडेसात पर्यंत हिंडत होत्या आणि या सहा तासाच्या फेरीत सुमारे २५ माणसे ठार झाली असून ५० वर जखमी झाली असावीत असा अंदाज आहे. यासंबंधी खात्रीलायक माहिती खाली देत आहोत -

१. हाजूभाई चौकात पानवाल्याच्या दुकानी शंकर पंढरीनाथ जोशी हे पान खात बसलेले असताना त्यांना गोळी घालण्यात आली. त्यांच्या छातीवर गोळी लागली असून ते दवाखान्यात आहेत.

२. विश्वनाथ शंकर साठे, नवी पेठ सोलापूर यांचे घराज्वळ बॉम्बे स्वीटमीटचे मालक कालिदास ओघळजी मिठाईवाला हे रस्त्यावरून जात होते. पोलिसांची मोटार आल्याबरोवर ते त्या घराच्या माडीवर चढू लागले. त्यांच्यावर एकदम तीन गोळ्या झाडण्यात आल्याचे दिसते. एक गोळी माडीचे दरवाज्यास लागली. दुसरी त्यांच्या पाठीला चाटून गेली व तिसरी मांडीला आरपार छेदून गेली. ताबडतोब ते खाली पडले. सांप्रत ते दवाखन्यात आहेत.

३. वरील घराच्या माडीवर गणपत बाळकृष्ण टेंबे नावाचे परगावचे श्री. टिकेकर यांचेकडे आलेले पाहुणे. पंढरपुरास जावयास निघ्ण्याकरिता जिन्यात आल्याबरोबर त्यांच्या पायावर गोळी मारली. सदरील गृहस्थ आपल्या जखमेस ड्रेसिंग करून कल्याणास निघून गेले.

४. मेकॅनिकी थिएटरच्या अगदी वरच्या पायरीवर बसलेल्या उज्जयिनीच्या भोले गरीबाबा नावाच्या एक ६0 वर्षे वयाच्या गोसाव्यावर गोळी घालण्यात आली.

५. पांजरापोळाजवळ हेच शूर (?) पोलीस गेले, येथे धरमसी चाळीतून तात्या आवजी या नावाचा इसम पांजरापोळ स्टॅंडवर आला होता. त्याच्यावर गोळी घालण्यात आली. त्याने पहिली गोळी चुकवली.दुसरी मारली. तरी तो उभा होता. तेंव्हा खाली उतरून त्याच्यावर तिसरी गोळी घालण्यात आल्यावर तो जागच्या जागी ठार झाला.

६. कुंभार वेशीजवळ एक मुसलमान खाटिक व परगावचा एक हिंदू इसम हे परसाकडेस जात होते. त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या.

७. बाळे वेस नजिक जैन बोर्डिंगचे सुपरिटेंडंट श्री. रानडे यांचा १४ – १५ वर्षाचा मुलगा बोर्डिंगच्या माडीवरील सज्जात उभा असताना त्याच्यावर गोळी घालण्यात आली. गोळी डोक्यास लागून कवटीच्या ठिकऱ्या उडाल्या व मुलाचा तावडतोब प्राण गेला. सज्जाच्या खांबास गोळ्या लागल्या आहेत.

८. शुक्रवार पेठेत शेठ हिराचंद यांचा १३ – १४ वर्षांचा मुलगा रतिलाल तिसऱ्या मजल्यावर गच्चीवर उभा असताना त्याला गोळी घालून ठार करण्यात आले. त्याचा मुनिम इरप्पा यास गोळी लागली.

९. श्री विष्णू शामराव वळसंगकर नरसिंग गिरजी गिरणीचे इंजिनियर. हे म्यु. दवाखान्यामागे मंगळवेढेकर यांच्या घरात राहतत. ते, त्यांचे बंधू व त्यांचे एक स्नेही ठोंबरे हे माडीत बोलत उभे असताना या पोलीस लॉरीतील पोलिसांनी मि.

ठोंबरे यांच्यावर नेम धरून गोळी झाडली. ती गोळी त्यांना न लागता त्यांच्या डोक्यावरून गेली व भिंत फोडून बाहेर पडली.

१०. बुरूज पेठेत इराबत्ती यांच्या घराजवळ राहणारा नरसप्पा अंतप्पा त्यारळ हा मि. कोंतम यांच्या कट्ट्यावर उभा असता त्यास गोळी घालून मारण्यात आले.

११. साखरपेठेत कनकट्टी यांच्या घराजवळ एक रंगाऱ्याची बाई परसाकडेस जात असता तिला गोळी घालण्यात आली.

१२. भडंगे नावाचा एक वेडसर म्हातारा मनुष्य चाटी आळीत बसला असता त्याच्यावर गोळी घालण्यात आली.

१३. सिध्देश्वर पेठेतील काडादीच्या चाळीजवळ संगप्पा करबसप्पा विभूते हा रस्त्यावर उभा त्याला गोळी घालण्यात आली. हा इसम दवाखान्यात आहे.

१४. जोडभावी पेठेतील मलकार्जूनप्पा स्वामी हा दुकानात उभा असता त्याला गोळी घालण्यात आली.

१५. मेकॅनिकी थिएटरच्या आवारातील खोलीत राहणारे सुंदरसिंग सरदारसिंग व त्यांच्या पत्नी गीताबाई हे आपल्या खोलीत बसले असता त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. गोळ्या अनुक्रमे छातीत व मांडीत लागल्या.

१६. मेकॅनिकी थिएटरजवळील हॉटेलात बाबुराव क्षेरे हा चहा पीत बसला असता त्याच्यावर गोळी घालण्यात आली. त्याच्या छातीचे डावे बाजूस गोळी लागली.

१७. परशराम बापूराव केमकर हा मेकॅनिकी थिएटरच्या दगडी खांबाजवळ उभा असता त्याच्यावर गोळी झाडण्यात आली. त्याच्या उजव्या मनगटाला गोळी लागली.

१८. हिरा बिल्डींगचे विष्णूपंत अकोटकर यांच्या खानावळीत मंडळी आतून कडी लावून बसली असता त्या घरावर गोळी मारण्यात आली. गोळी दाराला भोक पाडून आत घुसली व मनोहर कृष्णा जाधव याच्या उजव्या मांडीला चाटून डाव्या मांडीच्या आरपार गेली. हा मनुष्य दवाखान्यात आहे.

१९. वडगांवकरांच्या चाळीत माडीवर शंकर धोंडी बक्षी आपल्या खोलीच्या दारात उभे होते. त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली. थोडक्यात चुकले. गोळी त्यांच्या दोनही पायांच्यामधून भिंतीवर आपटून परत गॅलरीच्या बाहेर पडली.

२०. वडगांवकरांच्या खालच्या मजल्यात श्री. वासुदेवशास्त्री बागेवाडीकर हे आपल्या खोलीच्या दारात उभे असता त्यांच्यावर नेम धरून गोळी झाडण्यात आली. ती त्यास न लागता त्यांच्या खोलीसमोर असलेल्या झाडास लागली.

२१. सेवकराम जवाहीरलाल फोटोग्राफरचे माडीवर चंद्रसेन जाधव नावाचा त्यांचा मनुष्य उभा असता त्याच्यावर गोळी झाडली गेली. त्याने गोळी चुकविली. खिडकीच्या वरच्या बाजूस गोळी चाटून भिंतीवरील पाच फूट उंच टांगलेल्या फोटोस लागली व फोटो फुटला.

२२. अरूणोदय प्रेसजवळ श्री काकडे वगैरे उभे असताना त्यांच्यावर नेम धरून गोळ्या झाडल्या पण त्या म्युनिसिपालटीच्या भिंतीस लागल्या.

२३. म्युनिसिपल ऑफिस, 'कल्पतरू' छापखाना, शेठ गुलाबचंद यांचा राहता वाडा इत्यादी बऱ्याच ठिकाणी घरास, भिंतीस वगैरे गोळ्या, छरे लागल्याच्या स्पष्ट खुणा आहेत. व काही लागलेल्या गोळ्याही सापडलेल्या आहेत.

आत्तापर्यंत कळलेल्या माहितीवरून वरील हकिकत दिली आहे. वरचेवर माहिती कळत आहे. व जनतेनही साधार अशी माहिती कळवावी अशी विनंती आहे. विशेष असा की, गांधी टोपीवाल्याला मुद्दाम टिपून मारण्यात येते, किंवा ती हिसकावून टाकण्यात येते. एकंदरीत कुत्र्याला मारणे व माणसाला मारणे यात जणू काय काहीच अंतर नाही अशाच भावनेने परवा पोलीसांनी वर्तन केले. गोळ्या लागून मेलेल्या लोकांचे पंचनामेही पोलिसांनी केले नाहीत. इतकेच नव्हे तर पोलिसांच्या गोळ्यांनी जखमी होऊन पडलेल्या लोकांना औषधपाणी देण्याची किंवा हॉस्पितलला नेण्याचीही पोलिसांकडून व्यवस्था झाली नाही. बहुतेक सर्व पोलीस चौक्या मोकळ्या टाकून किंवा कुलुपे लावून पोलीस निघून

गेले आहेत. अशा रीतीने पोलिसांचे वर्तन अत्यंत भ्याडपणाचे, अमानुष आणि निंद्य असे झाले. कोर्टाच्या इमारती जाळण्याचे काम तीन तास चालू होते. पन ती आग विझवण्याची किंवा हटविण्याचे काम न करता घरात असलेल्या निरूपद्रवी लोकांना व बायका मुलांना गोळ्या घालून ठार मारण्यात पोलीस व मॅजिस्ट्रेटना काय पुरूषार्थ वाटला असेल हे त्यांना व त्यांचे मुख्य डिस्ट्री मॅजिस्ट्रेटसाहेब यांनाच ठाऊक!

शुक्रवार ता. १0 पासून कलेक्टरच्या सहीने पत्रक निघून क्रि.प्रो.को. १४४ कलमाप्रमाणे सभाबंदी, मिरवणूक बंदी व ५ मनुष्यापेक्षा जास्त माणसांना जमावबंदी करण्यात आली आहे. माझी वरील हकिकत छापत असताना आत्ताच मुंबई पुण्याची पत्रे वाचावयास मिळाली. मुंबईच्या टाईम्स ऑफ इंडियाने सोलापूरच्या दंग्याची हकीकत दिली आहे. खास बातमीदाराकडून, सोलापूरच्या बातमीदाराकडून व मुंबईस गेलेल्या लोकांकडून मिळवलेली म्हणून हकीकत दिली आहे. त्यापैकी पुष्कळशी हकीकत चुकीची व खोडसाळपणाची आहे.

टाईम्सकाराच्या बातमीदारांनी व त्यांनी लोकांच्या अत्याचाराचे भडक रंगाने वर्णन केले आहे. परंतु त्यांना पोलिसांच्या अमानुष अत्याचाराचा निरूपद्रवी शहरवासियांच्या कत्तलीचा मागमूसही लागलेला दिसत नाही. वरील प्रकारची एकांगी हकिकत कोणाची तरफदारी करण्यासाठी दिली आहे हे वाचकांच्या सहज लक्षात येईल. खालील काही गोष्टीवरून टाईम्सची हकीकत कशी एकांगी व खोडसाळपणाची आहे हे लक्षात येईल. टाईम्सकार म्हणतात –

१. सहा पोलीस लोकांच्या अंगावर रॉकेल ओतून जिवंत जाळले?

२. लोकांनी कोर्टाच्या इमारती जाळल्या. षाच ठिकाणी पोलीसांना (नक्की संख्या समजत नाही) जाळण्यात आले. हे दुर्दैवी पोलीस मुसलमान होते असे मिळालेल्या माहितीवरून कळते. त्यामुळे या दंग्यास जातिविषयक स्वरूप लागलीच आले.

३. असोसिएटेड प्रेसच्या बातमीत ३ मुसलमान पोलीस युनिफॉर्ममध्ये असलेल्या आसपास रॉकेल तेल ओतून जाळण्यात आल्यावर दुपारी या दंग्याला जातिविषयक स्वरूप आले.

४. खास बातमीदाराची ता. ८ च्या दंग्याची हकीकत. सिव्हील लाईन्स दंगेखोरांच्या ताब्यात होती. त्यांनी कित्येक दुकाने लुटली. काही ताडीची दुकाने नाश करण्यात आली. ... ... वगैरे.

वरील हकीकत वाचून कोणालाही टाईम्सच्या खोडसाळपणाबद्दल संताप आल्यावाचून राहणार नाही. दंगेखोरांनी अत्याचार केले ते पोलिसांवर म्हणून केले. मुसलमान म्हणून नव्हे हे कोणासही सहज समजण्यासारखे असून जातिवैमनस्य जे सध्या सोलापुरात नाही ते उत्पन्न करण्याचा टाईम्स पत्राचा हा हलकट प्रयत्न पाहिला म्हणजे त्याचा कोणीही झाले तरी तीव्र निषेधच करेल. टाईम्सने आपल्या स्फुटात ही खोटी नाटी हकीकत देऊन येथील नादान पोलिसांची पाठ थोपटली आहे. त्याचा समाचार आम्ही यथाकाळ घेऊ. तूर्त आम्हास येवढेच सांगावयाचे आहे की वरील हकीकतीवर कोणी विश्वास ठेवू नये. ज्ञानप्रकाश, केसरी वगैरे पत्रात टाईम्सच्या खास बातमीदाराच्या हकिकतीचे भाषांतर करूनच सोलापूरच्या दंग्याची हकिकत म्हणून दिली आहे. अर्थात तीही खरी नाही. खरी हकिकत आम्ही वर दिली आहे तशीच आहे. शहराची ता. ९ ची हालहवाल बाजार, गिरण्या, बॅंक, कचेऱ्या बंद होत्या. हत्यारी पोलिसांच्या व लष्करी शिपायांच्या मोटारी शहरातून फिरत होत्या. लोक उद्विग्न मनाने ता. ८ रोजी घडलेल्या गोष्टीचा विचार करीत होते. या दिवशी दंगाधोपा कोठे झाला नाही. पण वरचेवर हुली उडून लोकांत खळबळ उडत असे. गप्पीदास निरनिराळ्या गप्पा उडवीत हिंडत होते. काही लोक सोड्याची बाटली फोडून किंवा आपटबार काढून लोकांची गम्मत कशी उडते हे पाहण्याचा एक – दोनदा प्रयत्न केला. या खुशालचंदांना हल्लीच्या वेळी आपल्या थट्टेचा परिणाम काय होतो हे कळण्याइतके शहाणपण दिसत नाही.

आज ता. १0 रोजी ईदची सुट्टी असल्यामुळे गिरण्या, कचेऱ्या बंद आहेत. बाजारही उघडलेला नाही. क्वचित दुकाने उघडी दिसतात. आत्तापर्यंत वातावरण शांत व या पुढे शांत होईल अशी आशा आहे.

मुद्रक, प्रकाशक, संपादक

**रामचंद्र शंकर राजवाडे**

५७४, द.क., 'कर्मयोगी' छापखाना, सोलापूर

# परिशिष्ट – २
# सोलापुरातील वृत्तपत्रांचे बोधचिन्ह

‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’



पत्राची किंमत-

कल्पतरू

आणि

आनंदवृत्त.


टपालहशील-

नोटिशीचे दर-

पुस्तक १२ सोलापूर रविवार मिति फाल्गुन कृष्ण ९ शके १८०० बहुधान्यनाम संवत्सरे अंक २५
तारीख १६ माहे मार्च १८७९

सन १८७९ सालातील ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ चे पहिले पान

‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’



कल्पतरू

आनंदवृत्त

THE KALPATARU & ANANDA VRITTA

वर्ष ६२

VOL. 62

अंक ३१

NO 31

SHOLAPUR--8 TH JUNE 1930

पोलिसांच्या खुनाचा खटला.

चारी आरोपींना फांशीची शिक्षा.

सन १९३० सालातील ‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ चे पहिले पान

# परिशिष्ट – २
# सोलापुरातील वृत्तपत्रांचे बोधचिन्ह

'सोलापूर समाचार'



Register No 47

सोलापूर समाचार

SHOLAPUR स्थापना १८८४ SAMACHAR

र्ष ४६ वें ] मंगळवार ता० ४ माहे फेब्रुवारी सन १९३० [ अंक १ ला

सोलापुर जिल्ह्याचा स्थानिक स्वराज्य अंक.

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

सन १९३० सालातील 'सोलापूर समाचार' चे पहिले पान



र. नं. 2754

स्थापना १९३०

दैनीक


सोलापूर समाचार

SHOLAPUR SAMACHAR

संपादक-मुद्रक-प्रकाशक, बाबूराव नरसप्पा जक्कल, सोलापूर समाचार इ. प्रे. १४०, शुक्रवार पेठ सोलापूर.

वर्ष ६१ वें अंक ९० ] रविवार ता. १८ नोव्हेंबर १९४५ [ किंमत १ आणा.

सन १९४५ सालातील 'सोलापूर समाचार' चे पहिले पान



र.नं. २७५४

स्था. १९३०

दैनिक समाचार

DAILY सोलापूर SAMACHAR

SHOLAPUR

संपादक-मुद्रक-प्रकाशक, बाबूराव नरसप्पा जक्कल,

वर्ष १६ अंक १८९ ] गुरुवार ता. ११ एप्रिल १९४६ [ किंमत १ आणा

सन १९४६ सालातील 'सोलापूर समाचार' चे पहिले पान

## 'गजनफर'




साप्ताहिक गजनफरच्या अंकाचा नमुना

# ‘कर्मयोगी’




जादा—कर्मयोगी—शनिवार ता. १० माहे मे सन १९३०

सोलापूर येथील दंग्याची
खरी हकीकत

१४४ कलम पुकारले !

सोलापुरातील दंगलीची बातमी देणारा ‘कर्मयोगी’चा सन १९३० गाजलेला जादा अंक



दिनांक ८ मे १९३० रोजी नाथा रंगजी जैन बोर्डिंगवरील पोलीसांच्या गोळीबारात राजा रानडे हा चौदा वर्षाचा मुलगा ठार झाला.

# परिशिष्ट – ३
# सोलापुरातील वृत्तपत्रांशी निगडीत छायाचित्रे

‘कल्पतरू’ आणि ‘आनंदवृत्त’ ः



**‘कल्पतरू’कार ल. गो. काकडे**
सन् १९०५ ते १९९१



'सोलापूर समाचार' चे संस्थापक संपादक

**कै. नरसप्पा आबण्णा जक्कल**

जन्म ः १८५६


मृत्यू ः दि. २९ सप्टेंबर १९१४



रावबहादूर विठ्ठलराव नरसप्पा जक्कल
'सोलापूर समाचार' चे दुसरे संपादक



कै. बाबुराव नरसप्पा जक्कल
'सोलापूर समाचार' चे तिसरे संपादक
सोलापूर म्यूनिसिपालटीचे माजी अध्यक्ष



समाचार बिल्डिंग सन् १९१३

सोलापूरच्या चार हुतात्म्यांपैकी एक हुतात्मा



साप्ताहिक 'गजनफर'चे संस्थापक संपादक

## हु. अब्दुल रसूल कुर्बान हुसेन

इ.स. १९१० ते दिनांक १२ जानेवारी १९३१

सोलापूरच्या ऐतिहासिक दंगलीची व पोलीसी अत्याचाराची इत्थंभूत  माहिती
ज्या 'कर्मयोगी'मुळे संपूर्ण जगाला झाली त्या साप्ताहिकाचे संपादक



साप्ताहिक 'कर्मयोगी' चे संपादक

**कै. रामचंद्र शंकर ऊर्फ रामभाऊ राजवाडे**


**इ.स. १८९१ ते इ.स. १९४९**

‘कर्मयोगी’ ची इमारत



कै. रामभाऊ राजवाडे यांचे सहकारी प.रे.कोसंदर





स्वा. सावरकरांच्या सोलापूर भेटीप्रसंगी त्यांच्यासमवेत 'कर्मयोगी'चे संपादक कै.
रामभाऊ राजवाडे आणि सहकारी




शेठ गुलाबचंद हिराचंद



शेठ वालचंद हिराचंद

कै. रामभाऊ राजवाडे यांचे सहकारी


# स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापुरातील महत्वपूर्ण वास्तू




अनेक चढ उताराचा साक्षीदार ठरलेला सोलापूरचा भुईकोट किल्ला




जुनी कापड गिरणीचे फाटक व रेल्वे स्टेशन परिसर




वारद बिल्डिंग : पूर्वीची नगरपालिका व सध्याची महानगरपालिका इमारत




सोलापूर नगरपालिकेने सन् १८५३ साली बांधलेली पहिली म्युनिसिपल शाळा



हुतात्मा मल्लप्पा रेवणसिध्दप्पा धनशेट्टी
**इ.स. १८९८ ते दिनांक १२ जानेवारी १९३१**



हुतात्मा श्रीकिसन लक्ष्मीनारायण सारडा
इ.स. १८९३ ते दिनांक १२ जानेवारी १९३१



हुतात्मा जगन्नाथ भगवान शिंदे
**इ.स. १९०६ ते दिनांक १२ जानेवारी १९३१**



हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन
**इ.स. १९१० ते दिनांक १२ जानेवारी १९३१**

# परिशिष्ट – ४
## स्वातंत्र्यलढ्याशी निगडित सोलापुरातील महिलांची छायाचित्रे

स्वातंत्र्यसैनिक



रमाबाई नरसिंह पित्रे
(जन्म १८९८ – मृत्यू १९८७)

स्वातंत्र्यसैनिक



पंडिता सुमतिबाई शहा
(जन्म १९१२ – मृत्यू २०००)



द्वारकाबाई देशपांडे
(जन्म १९०९ – मृत्यू १९८९)



शांताबाई भगवानराव पतकी
(जन्म १९१६ – मृत्यू २०१०)



कॉ. मीनाक्षीताई साने
(जन्म १९०९ – मृत्यू १९८९)